
कॉम्रेड रा.प.नेने

स्मृती आणि विचारसंपदा



कॉम्रेड रा.प.नेने
स्मृती आणि विचारसंपदा

कॉम्रेड रा.प.नेने

स्मृती आणि विचारसंपदा

प्रथमावृत्ती : २३ मार्च २०११

अक्षरजुळणी : ज्ञानदा ग्राफिक्स, पुणे

मुखपृष्ठ : उदय बांदिवडेकर

मुद्रणस्थळ : एन.आर.प्रिंटर्स, पुणे

प्रकाशक :

- कॉ. रा.प.नेने स्मृतिग्रंथ समिती
- समाजविज्ञान अकादमी,
  अक्षय चेंबर्स, २१६, नारायण पेठ,
  पुणे ४११०३०.
  ०२०-२४४५६६९४
  svacademy216@gmail.com

₹ २५०/-

प्रस्तावना

ज्येष्ठ मार्क्सवादी अभ्यासक व कार्यकर्ते कॉ.रा.प.नेने २३ मार्च २०१० रोजी कालवश झाले. कॉ.नेने हे एक असाधारण व्यक्तिमत्त्व होते. पुरोगामी, डाव्या चळवळीतील सर्व प्रकारच्या संघटनांमधील सर्व प्रकारच्या कार्यकर्त्यांशी, त्यांचे एक खास नाते होते. त्यांचा प्रचंड व्यासंग; तपशील व बारकावे याबद्दलची त्यांची दक्षता; त्यांचा चतुरस्रपणा व अफाट स्मरणशक्ती; इतर कोणाचे विचार पटत नसले तरी ते नीट समजावून घेण्याची धडपड; विविध चळवळीत उतार वयातही सामील होण्याची तयारी; आपली मते, मतभेद स्पष्ट मांडून पण सहकार्य करण्याची वृत्ती; वैयक्तिक लाभ, स्थान, मानमरातब याच्या निरपेक्ष काम करण्याचा स्वभाव; हाडी-मासी रुजलेले सभ्य शिष्टाचार; रसिकता; वक्तशीरपणा, चिकाटी, साधी राहणी इत्यादी त्यांच्या गुणांचा विविध कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या चळवळींच्या संदर्भात अनुभव आला होता. अशा प्रकारे कार्यकर्त्यांना दिसलेल्या कॉ.नेनेंबद्दलच्या या स्मृती एका ग्रंथाच्या रूपात नेने यांच्या पहिल्या स्मृतिदिनी प्रसिद्ध कराव्यात असे ठरवून त्यासाठी 'कॉ.रा.प.नेने स्मृतिग्रंथ समिती' स्थापन करण्यात आली. तसेच नेने यांचे (अपवाद वगळता) सर्व प्रकाशित लेखही या ग्रंथात समाविष्ट करावेत असे ठरले कारण नेने यांचा व्यासंग चतुरस्र असूनही पुस्तक लिखाणासाठी कधी ते वेळ काढू शकले नाहीत. कॉ.नेनेंचे विविधांगी व्यक्तिमत्त्व व त्यांचे अभ्यासू विचारघन लिखाण हा दुहेरी वारसा या स्मृतिग्रंथामार्फत उपलब्ध झाला तर त्याचे पुरोगामी, डाव्या चळवळीतील सर्वांकडून स्वागत होईल या विश्वासाने हा स्मृतिग्रंथ प्रकाशित करत आहोत. मात्र कॉ.नेने यांच्यावरील लेखांचे स्वरूप 'संकलित लेख' असे असल्याने त्यात काहीशी पुनरावृत्ती व अपुरेपणा आला आहे याची आम्हाला जाणीव आहे.

जनवादी चळवळीतील विविध कार्यकर्त्यांनी, ज्येष्ठांनी त्यांना अनुभवाला आलेल्या नेनेंच्या विविध गुणांबद्दल व कार्याबद्दल लेख पाठवून सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. त्या-त्या चळवळींशी नेनेंच्या असलेल्या नात्याबद्दल व एका अंगाने त्या चळवळींबद्दलचे एक उद्‌बोधक चित्र या लेखांमधून उभे राहिले आहे. कॉ.नेने यांच्या कुटुंबीयांनीही त्यांच्या 'राजाभाऊ'बद्दलची त्यांची मनोगते लिहून दिली त्याबद्दल त्यांचे विशेष आभार! कॉ.नेने यांचा जीवनपट मांडणारा एक स्वतंत्र लेख या पुस्तकात सुरुवातीला दिला आहे. त्यामुळे त्याबाबतची पुनरावृत्ती टाळण्यासाठी इतर लेखांमधील हा पैलू वगळला आहे व अगदी आवश्यक असतील तेवढेच किमान संपादकीय संस्कार केले आहेत.

कॉ.नेने यांचे लेख ज्या नियतकालिकांमधून प्रथम प्रसिद्ध झाले होते त्यांच्या संपादकांनी हे लेख या पुस्तकासाठी उपलब्ध करून दिले यासाठी त्यांचे मन:पूर्वक

आभार. हे पूर्वप्रकाशित लेख त्यात कोणताही बदल वा संपादकीय संस्कार न करता या ग्रंथात समाविष्ट केले आहेत.

३६८ पानांचा हा ग्रंथ जास्तीत जास्त कार्यकर्त्यांपर्यंत पोचायचा असेल तर त्याची किंमत कमीत कमी ठेवायला हवी म्हणून व्यावसायिक प्रकाशकापेक्षा समाजविज्ञान अकादमीने तो प्रकाशित करावा व पुस्तक विक्रीतून कर्ज वजा जाता जी रक्कम शिल्लक राहील ती कॉ.नेने यांच्या पुढील स्मृतीदिनी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी वापरावी असा विचार पुढे आला. अकादमीच्या विश्वस्तांनी याला मान्यता दिली याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार! कॉ.नेने हे समाजविज्ञान अकादमीचे अध्यक्ष व अत्यंत सक्रिय विश्वस्त होते. त्यामुळे 'अकादमी'तर्फे हा ग्रंथ प्रकाशित करणे विशेष उचित आहे.

या ग्रंथासाठी लागणारा बराचसा निधी कॉ.नेने यांचे मित्र व कुटुंबीय यांनी दिलेल्या योगदानातून उभा राहिला आहे. या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

या ग्रंथाचे संपादन व निर्मिती यासाठी संपादक मंडळाने नियोजनपूर्वक काम करून कॉ.नेनेंच्या वृत्तीला भावेल अशा दर्जेदार ग्रंथाची निर्मिती केली तसेच निरनिराळ्या कार्यकर्त्यांनी या ग्रंथाच्या निर्मितीमध्ये विविध प्रकारे सहभाग दिला याबद्दल या सर्वांचे तसेच विभावरी भंडारे यांनी कॉ.नेनेंविषयीचे प्रेम व आदर या पोटी विशेष काळजीने अक्षरजुळणी केली याबद्दल त्यांचे आणि एन.आर.प्रिंटर्सचे अतुल श्रोत्री यांनी सुबक छपाई करून दिली त्याबद्दल त्यांचे आभार! उदय बांदिवडेकर यांनी पुस्तकाचे मुखपृष्ठ करून दिले त्याबद्दल त्यांचे आभार!

कॉ.नेनेंच्या स्मृतीला त्यांच्या सर्व चाहत्यांतर्फे हा ग्रंथ अर्पण करत आहोत. या ग्रंथाचे भरघोस स्वागत होईल व त्याचे मोल जाणले जाईल असा विश्वास आहे.

कॉ. रा.प.नेने स्मृतिग्रंथ समिती

कॉ. रा.प.नेने स्मृतिग्रंथ समिती

शांताताई रानडे, श्री.न.गुत्तीकर, विद्या बाळ, अनंत फडके, अन्वर राजन, दत्ता देसाई, श्रीपाल ललवाणी, अजित अभ्यंकर, विनया मा. ह., सुनीती सु.र., किरण मोघे, शमसुद्दिन तांबोळी, मिलिंद चव्हाण, शैलेश डिखळे, सम्राट शिरवळकर, अच्युत बोरगांवकर.

संपादक मंडळ

शांताताई रानडे, अंजली मुळे, अनंत फडके, दत्ता देसाई, सुनीती सु.र., मिलिंद चव्हाण, सम्राट शिरवळकर.

अनुक्रम

चाहत्यांच्या दृष्टीतून नेने

कॉ.रा.प.नेने यांची विचारसंपदा

लोकशाही, मानवी हक्क

चाहत्यांच्या दृष्टीतून नेने

रा. प. नेने यांचे अल्पचरित्र

अजित अभ्यंकर

राजाराम परशुराम अर्थात रा.प. नेने यांचा जन्म १३ एप्रिल १९२९ रोजी अलिबागजवळील किहिम येथे झाला. त्यांना त्यांच्या घरात राजाभाऊ म्हणून ओळखले जायचे. त्यांचे वडील ब्रह्मदेशाची राजधानी रंगून बंदर येथे हवामान खात्यात नोकरीला होते. वयाच्या तेरा वर्षांपर्यंतचा त्यांचा काळ ब्रह्मदेशात गेला. नेने यांच्यासह एकूण ४ भाऊ आणि ३ बहिणी असे त्यांचे कुटुंब होते. या भावंडांत रा.प. नेने हे सर्वात ज्येष्ठ होते. ब्रह्मदेशात असल्याने तेथील प्रॉटेस्टंट ख्रिश्चन शाळेत चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. वर्गात त्यांचा नेहमी वरचा क्रमांक असे. विशेष लक्षणीय बाब अशी की, त्यांना त्यांच्या वडिलांनी वैकल्पिक विषय म्हणून स्थानिक ब्राह्मी भाषा घेण्यास सांगितले होते. ब्राह्मी तसेच इंग्रजीमध्ये त्यांनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले होते. त्यांच्या प्राचार्यांनी त्यांचे त्याबद्दल जाहीर कौतुकदेखील केलेले होते.

दुसऱ्या म्हायुद्धात १९४२ मध्ये जपानने ब्रह्मदेशावर हल्ला केला. प्रथम सातत्याने हवाई बॉम्बहल्ले झाले. नंतर प्रत्यक्ष सैन्य घुसू लागले. त्या आधी सिंगापूर जपान्यांनी जिंकले होतेच. त्यामुळे रंगूनमधील हिंदी लोकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. सर्व काही सोडून जाण्याची वेळ आली. सामान तर नेणे शक्यच नव्हते. त्यावेळी नेनेंच्या वडिलांनी सर्व घर, आहे तसेच बंद करून तेथून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि नेने कुटुंब ब्रह्मदेशातून आसाममार्गे अतिशय खडतर असा प्रवास करत मोठ्या मुष्किलीने भारतात पोचले. मात्र ते येथे आल्यानंतर ब्रह्मदेशातील त्यांचे राहते घर स्थानिकांनी तोडून लुटले.

१९४२ मध्ये पुण्यात आल्यावर त्यांच्या आई-वडिलांनी लक्ष्मी रस्त्यावर गोखले सभागृहासमोर आपले घर थाटले. पुण्यातील पेरुगेटजवळील भावे हायस्कूलमध्ये रा. प. नेने यांचे नाव दाखल करण्यात आले. त्यावेळच्या पुण्यातील आणि कुटुंबातील वातावरणानुसार सायंकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाण्याची नेनेंची व्यवस्था त्यांच्या वडिलांकडून करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी रा. स्व. संघाच्या शाखेवर जाण्यास सुरुवात केली. महाविद्यालयात जाईपर्यंत त्यांच्यावर हिंदुत्ववादाचा, हिंदू

महासभेचा प्रभाव होता. नथुराम गोडसे यांनी स्थापन केलेल्या हिंदू राष्ट्र दलामध्येही ते जाऊ लागले होते.

मात्र शाळेमध्ये काही उत्तम शिक्षकदेखील त्यांना मिळाले. त्यात प्रख्यात समीक्षक श्री.के.क्षीरसागर यांचा समावेश होता. ते मराठी विषय शिकवीत. त्यांनी उमर खय्याम यांच्या काही रूबायाही शिकविल्याची आठवण नेने सांगतात. शाळेतील सर्वसाधारण वातावरण सावरकरी हिंदुत्ववादी असले, तरी काही शिक्षक हिंदुत्ववादी विचारसरणीपासून दूर होते. त्यांचासुद्धा काही प्रभाव नेने यांच्यावर पडत होता.

हिंदुत्ववादाच्या प्रभावाखाली आलेले असले, तरी नेने संवेदनशील व खुल्या मनाचे होते. एकदा महात्मा गांधी पुण्यात आलेले असताना त्यांच्या प्रार्थना कार्यक्रमाला नेने गेले होते. तेथील वातावरण आणि गांधींचे व्यक्तित्व यांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला. हे कळताच संघटनेच्या हिंदुत्ववादी नेत्यांचा तिळपापड झाला. गांधींबद्दल बोलताना नथुराम गोडसे यांचे सहकारी आपटे म्हणाले होते की, मला तर त्या महात्म्याच्या दोन थोबाडात ठेवून द्याव्याशा वाटल्या असत्या.

शालेय शिक्षणानंतर नेने यांनी पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात बी. ए.साठी प्रवेश घेतला. त्यांनी बी. ए. चा अभ्यासक्रम पूर्ण केला. एम् ए. च्या टर्म्स देखील त्यांनी पूर्ण केल्या. पण एम्.ए.ची परीक्षा कधीच दिली नाही.

महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात त्यांचे वाचन वाढले. त्यांचे महाविद्यालयीन विषय त्याला कारणीभूत झाले. तसेच प्रा.रा. ना. दांडेकर, प्रा.स. वा. कोगेकर, प्रा.ग.प्र.प्रधान, प्रा.डी. डी. कोसंबी ही दिग्गज विद्वान मंडळी त्यावेळी प्राध्यापक होती. त्यांच्या बुद्धिवादी, मनस्वी आणि व्रतस्थ व्यक्तित्वांचा नेने यांच्यावर प्रभाव पडणे अपरिहार्यच होते. त्याच प्रक्रियेत एम्. एन्. रॉय यांचे लिखाण तसेच पंडित नेहरू यांचे आत्मचरित्र त्यांनी वाचले. एकूण राजकीय विचारांशी आणि खास करून मार्क्सवादाशी त्यांचा परिचय झाला. त्यांचे निकटचे कुटुंबीय स. ह. मोडक हे त्याला कारणीभूत झाले. मोडक मार्क्सवादी होते. त्यांनी लिहिलेल्या पुस्तिकांपासून मार्क्सवादाशी संबंधित सर्वच विषयांवर नेने यांच्या समवेत त्यांच्या चर्चा होत असत.

त्यामुळेच नेने यांनी के. एन. फडके, दि. के. बेडेकर, अ. रा. कामत यांच्या अभ्यासवर्गांतून मार्क्सवाद आणि कम्युनिस्ट पक्षाची ध्येयधोरणे समजावून घेतली. त्या सर्वांच्या परिणामी 'ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन' या कम्युनिस्ट पक्षाच्या प्रभावाखालील विद्यार्थी संघटनेच्या १९४८ मध्ये मुंबई येथे झालेल्या अधिवेशनात ते सहभागी झाले होते. त्यावेळी कम्युनिस्ट पक्षाने सरकारविरोधात अतिरेकी कडक भूमिका घेऊन 'ये आझादी झूठी है' चा नारा दिलेला होता. त्यामुळे मोरारजीभाई देसाईंच्या सूचनेनुसार पोलिसांनी संघटनेचे हे अधिवेशन, मिरवणूक व सभा होऊ देणार नाही, अशी भूमिका घेऊन प्रचंड दडपशाही केली. लाठीमार करून अश्रुधुराचा वापर केला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नेत्या रोझा देशपांडे बेशुद्ध पडल्या. या प्रसंगाचा

नेने यांच्या मनावर खोल ठसा उमटला.

त्यानंतर त्यांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला. कम्युनिस्ट विचाराचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी डाव्या चळवळीला मदत करण्याचे काम आयुष्यभर केले.

नेने यांनी त्यांच्या सर्व बौद्धिक क्षमता डाव्या चळवळीलाच वाहिलेल्या होत्या. त्यांचे मुख्य कार्य अर्थातच वैचारिक क्षेत्रात राहिले. पण त्यांनी कोणतेच काम कमी दर्जाचे मानले नाही. डाव्या विचाराचा प्रभाव वाढविण्यासाठी पुण्यामध्ये लकडी पुलाजवळ 'पीपल्स बुक हाऊस' या नावाने एक पुस्तकाचे दुकान श्रीमती विजयाताई भागवत यांच्या सहकार्याने त्यांनी चालविण्यास सुरूवात केली. त्यामध्ये मार्क्स-एंगल्स-लेनिन यांची पुस्तके, सोविएत युनियनमधून प्रकाशित होणारे सर्व साहित्य, मुंबईच्या लोकवाङमय गृहाची प्रकाशने, कम्युनिस्ट पक्षाची प्रकाशने, आणि इतर डाव्या विचाराची पुस्तके मिळत असत.

पुण्यामध्ये १९६१ साली आलेल्या पुरामध्ये त्यांचे ते पुस्तकाचे दुकान त्यातील फर्निचर, पुस्तके यांच्यासहित वाहून गेले. त्यावेळी नेने यांचे कुटुंब एम्. ई. एस्. महाविद्यालयाजवळ एके ठिकाणी राहण्यास आलेले होते. या पुरात त्यांचे राहते घर देखील पाण्यात गेले. नेने कुटुंबाचा एकदा ब्रह्मदेशात उद्ध्वस्त झालेला संसार पुन्हा एकदा जमीनदोस्त होण्याची वेळ आली. पण त्यातून ते कुटुंब सावरले.

नेने आपले दुकान पुन्हा नव्या जोमाने चालवू लागले. नेने यांनी प्रत्यक्ष पीएच्.डी. किंवा एम्. ए. ही पदवी कधीच प्राप्त केली नसली, तरी त्यांचा पिंड संशोधकाचाच होता. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, यातील विषयांचे त्यांचे सैद्धांतिक आकलन विलक्षण होते. त्यांनी त्यांच्या जीवनात किमान २० महत्त्वाच्या संशोधन प्रकल्पात संशोधक म्हणून काम केले. त्यापैकी कित्येक प्रकल्पांचे मुख्य संशोधक परदेशातील प्रख्यात विद्वान होते. गोखले राज्यशास्त्र-अर्थशास्त्र संस्थेशी त्यांचा वाचक आणि संशोधक म्हणून सातत्याने संबंध होता. त्यामुळेच जात, धर्म, इतिहास ह्या कम्युनिस्टांना अनेकदा बुचकळ्यात टाकणाऱ्या विषयांवर अगदी मार्क्सवादी शिस्तीत नेने आत्मविश्वासाने बोलत असत.

त्यांना प्रख्यात मार्क्सवादी विचारवंत आणि इतिहासतज्ज्ञ डी. डी. कोसंबी यांचे काम जवळून पाहण्याची संधी मिळाली. कोसंबी यांची वैचारिक-तार्किक शिस्त, आखीव कार्यप्रणाली, व्यासंग, बहुआयामी विद्वत्ता, यांचा खूपच प्रभाव नेने यांच्यावर पडला.

नेने यांची कार्यपद्धती आणि जीवनपद्धती प्रखर बुद्धिवादी, अतिशय वक्तशीर, नियमित आणि अभ्यासू होती. मनमानी भावनिकता, गचाळपणा, ढिसाळपणा यांना त्यांच्या व्यक्तित्वात कधीच स्थान नव्हते. त्यांनी केलेले लिखाण गुणवत्तेने श्रेष्ठ असले तरी त्यांच्या वैचारिक क्षमतेच्या मानाने आकाराने अतिशय कमी आहे, ही खंत त्यांना भेटणाऱ्या कार्यकर्त्यांना नेहमीच वाटे.

नेने हे आयुष्यभर अविवाहित राहिले. त्यांनी त्यांच्या या निर्णयाबद्दल स्वतंत्रपणे

लेखही लिहिला आहे. तसेच त्यांनी कोठेही प्राध्यापक-संशोधक म्हणून कायमची नोकरी केली नाही. किंबहुना नोकरी हा पेशा त्यांनी कधीच स्वीकारला नाही.

नेने यांच्या वैचारिक निष्ठा या स्पष्टपणाने मार्क्सवादी होत्या. त्या अखेरपर्यंत कधीच बदलल्या नाहीत. पण त्यांचे कम्युनिस्ट पक्षाच्या कित्येक अधिकृत भूमिकांशी काही मतभेद असायचे. तरीही कम्युनिस्ट पक्षावर जाहीररीत्या टीका न करण्याचे त्यांचे धोरण होते. मात्र कार्यकर्त्यांना त्यांची मते ते जाणीवपूर्वक सांगायचे. म्हणूनच कम्युनिस्टेतर जनविभागांमध्ये ते स्पष्टपणाने कम्युनिस्ट भूमिकाच मांडत, तर कम्युनिस्ट कार्यकर्त्यांसमोर मात्र भ्रातृभावी टीका करत असत.

समाजविज्ञान अकादमीचे ते विश्वस्त आणि अखेरची काही वर्षे अध्यक्ष होते. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखालील *'एक गाव एक पाणवठा चळवळ'*, *'पुरोगामी सत्यशोधक'* हे मासिक, सुधीर बेडेकर यांच्या संपादकत्वाखाली निघणारे *'तात्पर्य'* हे मासिक, जागतिक शांततेसाठी साम्राज्यवादाविरोधात काम करणारी *'अखिल भारतीय शांतता आणि भ्रातृभाव संघटना'*, लोकशाही हक्कांसाठी काम करणारी *'लोकस्वतंत्रता संघटना'*, *'बुद्धिप्रामाण्यवादी मंच'*, या संस्थांचे ते प्रमुख आधारस्तंभ होते. त्यांनी नामांतर आंदोलनात सहभाग घेऊन तुरुंगवास भोगला, त्याबरोबरच 'राखीव जागा का असाव्यात?' 'हिंदु मुस्लिम तणाव आणि राष्ट्रीय एकात्मता', 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीच्या निमित्ताने दलितांवर झालेले अत्याचार', अशा त्यांनी लिहिलेल्या पुस्तिका चळवळीमध्ये फारच मार्गदर्शक ठरल्या. डिस्कशन ग्रुप, 'म. फुले समता प्रतिष्ठान', 'विषमता निर्मूलन समिती', 'राष्ट्रीय एकात्मता समिती', 'शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय', 'लोकविज्ञान संघटना', 'मार्क्स स्मृतिशताब्दी समिती', 'शहीद भगतसिंह' तसेच 'डी.डी. कोसंबी जन्मशताब्दी' समित्या, 'मिळून साऱ्याजणी', 'नर्मदा बचाओ आंदोलन', 'लोकशाही उत्सव' अशा विविध व्यासपीठे, संस्था, संघटना यांमध्ये त्यांचा क्रियाशील वा ठळक सहभाग राहिला.

त्यांचे वाचन आणि स्मरणशक्ती अफाट असल्याने ते कित्येक सामाजिक -राजकीय विषयांवर भूमिका घेण्यासाठी एखाद्या संदर्भग्रंथाप्रमाणे डाव्या संघटनांना - कार्यकर्त्यांना आधारभूत होत असत. त्यांच्याशी होणाऱ्या चर्चा उद्बोधक -मार्गदर्शक असत.

त्यांची प्रकृती त्यांच्या स्वभावाप्रमाणेच अत्यंत रसरशीत, उमदी आणि ठणठणीत अशीच होती. मात्र अखेरची काही वर्षे त्यांना पाठदुखीचा व मानेच्या विकाराचा त्रास होत असे. पण त्यामुळे ते निष्क्रिय कधीच झाले नाहीत. अगदी अखेरचे दोन महिने सोडले तर, ते पूर्ण आजारी पडले वा निष्क्रिय झाले असे कधीच घडले नाही.

२३ मार्च २०१० या दिवशी वयाच्या ८१व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी देहदान केले.

❑

'पीपल्स् बुक हाऊस'वाले कॉ.नेने

शांता रानडे

पुण्याच्या पुरोगामी विचारविश्वासाठी 'पीपल्स् बुक हाऊस' या पुस्तककेंद्राने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. कॉ.विजयाबाई भागवत व श्री.रा.प.नेने यांचे हयातभरचे परिश्रम त्यामागे आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५२ साली जी पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली, ती फार महत्त्वपूर्ण होती. १९५० साली भारताने आपली राज्यघटना स्वीकारल्यानंतर त्या घटनेने प्रत्येक सज्ञान नागरिकाला दिलेल्या मतदानाच्या हक्कानुसार ती पहिली निवडणूक लढवली गेली होती. म्हणून तिचे महत्त्व फार होते. त्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष प्रचंड बहुमताने सत्तेवर आला असला, तरी विरोधी पक्ष म्हणून दुसऱ्या क्रमांकाने भारतीय कम्युनिस्ट पक्ष लोकसभेत प्रविष्ट झाला होता. तेलंगणाच्या किसान लढ्याचे नेते कॉ.रविनारायण रेड्डी हे तर पं.नेहरूंपेक्षाही जास्त मते मिळवून निवडून आले होते. कॉ.भूपेश गुप्ता, कॉ.रविनारायण रेड्डी, कॉ.इंद्रजित गुप्ता, कॉ.ए.के. गोपालन यांच्यासारखे सर्वस्वाचा त्याग करून कम्युनिस्ट पक्षात काम करणारे निष्ठावंत लढवय्ये नेते लोकसभेत जनतेचे प्रश्न मांडत होते. त्यामुळे पुरोगामी विचारविश्वात उत्साहाचे वातावरण होते. सर्व पुरोगामी साहित्य मिळण्याची सोय पुण्यात नव्हती. ती उणीव 'पीपल्स् बुक हाऊस'ने पूर्ण केली.

या पुस्तककेंद्राची जागा फार मोक्याच्या ठिकाणी होती. लक्ष्मीरोडवर सेनापती बापट पुतळा चौकात आज हँडिक्राफ्ट एम्पोरियम आहे, तिथे पीपल्स् बुक हाऊस होते. राहुल सांकृत्यायन, धर्मानंद कोसंबी यासारख्या दिग्गज साहित्यिकांचे ग्रंथ, मार्क्सवादावरील अभिजात ग्रंथ, कम्युनिस्ट पक्षाने वेळोवेळी महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रसिद्ध केलेल्या पुस्तिका, पक्षाची मुखपत्रे, पुरोगामी लेखकांचे साहित्य तिथे उपलब्ध असेच. त्याशिवाय परदेशातील महत्त्वाची पुस्तके, नियतकालिके मागवून देण्याची सोय मुंबईच्या 'पीपल्स् पब्लिशिंग हाऊस' (पी.पी.एच.) मार्फत केली जात असे. कारण मुंबईच्या पी.पी.एच.कडे आंतरराष्ट्रीय लायसेन्स होते.

भारत-सोव्हिएत युनियन या दोन देशांत झालेल्या मैत्री करारानंतर सोव्हिएत

युनियनमधील दर्जेदार विपुल वाङ्मय भारतात येऊ लागले. त्यातील मेडिसिन, इंजिनियरिंग, भौतिकशास्त्रे, तंत्रज्ञान इ. विषयांवरील उत्कृष्ट पुस्तके, सुंदर बाल वाङ्मय खूपच लोकप्रिय झाले. अत्यंत स्वस्त किंमतीतील हे सर्व साहित्य, सोव्हिएत लॅण्ड मासिके, टॉलस्टॉय, डोस्तोवस्की, चेखोव, गॉर्की यांच्या कथा- कादंबऱ्या हे सर्व वाङ्मय 'पीपल्स् बुक हाऊस'मुळे उपलब्ध होई. अनेक पुरोगामी विचारवंत, पुरोगामी पक्षांचे पुढारी-कार्यकर्ते, प्राध्यापक, विद्यार्थी या पुस्तककेंद्रास नियमितपणे भेट देत. त्यामुळे अशा व्यक्तींच्या भेटीगाठींचे ते एक स्थान होते. सुरुवातीच्या काळात टेलिफोनचा प्रसार सार्वत्रिक नव्हता. त्यावेळी निरोपांची देवाण-घेवाण, चिठ्ठ्या-चपाट्यांचे आदान-प्रदान ही कामेही कॉ.विजयाबाई भागवत यांचेमार्फत चालत. कारण त्यांची पुस्तककेंद्रात कायम व वक्तशीर हजेरी असे. इतर सर्व कामात श्री.रा.प.नेने यांचा मोठा सहभाग होता. लष्करी उद्योग, सरकारी खाती अशासारख्या आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांना कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होण्यावर बंदी होती. त्यांची पक्षात 'सीक्रेट मेंबरशिप' असे. त्यांची नोंदणी पक्ष सदस्यांच्या यादीत नसे. अशा सीक्रेट मेंबर्सची पक्षसदस्यत्वाची वर्गणी, दर महिना द्यावयाची लेव्ही जमा करण्याचे काम येथेच चाले. कारण अशा मेंबर्सना पक्ष कार्यालयाशी थेट संपर्क ठेवणे धोकादायक असे. कम्युनिस्ट पक्ष, विविध जनसंघटना यांच्या कार्यक्रम-उपक्रमांच्या माहितीची देवाणघेवाण या पुस्तककेंद्रामुळे सतत होत राहात असे.

उभ्या महाराष्ट्रातील कम्युनिस्ट पक्ष सभासद, निरनिराळ्या राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते, पुरोगामी विचारवंत, अभ्यासू मंडळी, प्राध्यापक पुण्यात येत तेव्हा 'पीपल्स् बुक हाऊस'ला भेट हा त्यांच्या पुणे भेटीतील महत्त्वाचा कार्यक्रम असे. कारण नव्याने येणारे महत्त्वाच्या विषयावरील पुस्तक हमखास मिळण्याचे हे पुस्तककेंद्र एक ठिकाण होते.

या पुस्तककेंद्राचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पुस्तक खरेदीसाठी मार्गदर्शन. श्री.रा.प.नेने हे एक जबरदस्त वाचक होते. त्यामुळे तिथे आलेल्या पुस्तकप्रेमींना पुस्तकातील आशयाबद्दल माहिती मिळू शके व खरेदीसाठी डोळस मार्गदर्शन लाभे. कॉ.विजयाबाईंचाही आलेल्या नव्या पुस्तकांशी धावता का होईना पण परिचय असे. पुरोगामी विचारांशी असलेल्या बांधिलकीमुळे या दोघांचे ग्राहकांशी नाते फक्त पुस्तक खपवण्यापुरते मर्यादित नसे तर त्यात आपुलकी, जिव्हाळा, प्रेम असे. त्यामुळे अनेक व्यक्ती या पुस्तककेंद्राच्या कायमच्या सदस्य असल्यासारख्या होत्या.

अशा या सतत वर्दळ असलेल्या पुस्तककेंद्रावर १९६१ साली पुण्यातील पानशेत पुराने हल्ला केला. सबंध दुकान पाण्यात बुडाले. नुकताच आलेला सर्व नवा साठा पुराच्या पाण्याने चिंब भिजला. वास्तूचेही नुकसान झाले. आधीच जुनी असलेली इमारत दुरुस्तीच्या पलीकडे असल्याने संपूर्ण इमारत पाडून पुन्हा बांधण्याचा निर्णय मालकाने घेतला. त्यामुळे नवी इमारत होईपर्यंत दुकान पेट्रोल पंपामागील इमारतीतील

राहत्या घरात हलवावे लागले. त्याचा दुकानाच्या दैनंदिन व्यवहारावर बराच परिणाम झाला.

नवीन इमारत बांधून पूर्ण झाली. पण मालकाने लक्ष्मी रोडवरील जागा न देता इमारतीच्या मागील बाजूच्या न.चिं.केळकर रोडवर या पुस्तककेंद्राला जागा दिली. पूर्वीचे गजबजलेले पुस्तककेंद्र हे त्याचे स्वरूप थोडे बदलले. तरीही कॉ.विजयाबाई भागवत व श्री.रा.प.नेने यांनी सर्व संकटांवर मात करून नव्या जागेत पुस्तककेंद्राचे काम पुन्हा सुरू केले. नव्याने डाव्या विचारसरणीकडे वळणाऱ्या तरुणांना वैचारिक मार्गदर्शन देण्याचे या केंद्राचे काम कॉ.विजयाबाई भागवत यांच्या निधनापर्यंत चालू होते.

कॉ.विजयाबाई भागवत यांच्यासारख्या निष्ठावंत, चिवट कार्यकर्तीचे साहाय्य कमी झाल्यावर या पुस्तककेंद्राची पूर्ण जबाबदारी श्री.रा.प.नेने यांच्यावर पडली. त्यांच्या इतर कामांमुळे पुस्तककेंद्रावर पूर्ण लक्ष केंद्रित करणे त्यांना शक्य होत नव्हते. नोकरांकडून अपेक्षित दर्जाचे काम होऊ शकत नव्हते. या व इतर अनेक कारणांमुळे या पुस्तककेंद्राला त्याचे पूर्वीचे सांस्कृतिक समृद्ध रूप येऊ शकले नाही. अखेर ते दुसऱ्यांना चालवायला देणे भाग पडले. तरीही प्रश्न मिटलाच नाही. विशिष्ट कालखंडात या पुस्तककेंद्राने पर्यायाने कॉ.विजयाबाई भागवत व श्री.रा.प. नेने यांनी जे महत्त्वाचे योगदान दिले ते निश्चितच फार मोलाचे होते.

❑

कणखर आणि निर्लेप व्यक्तिमत्त्व

भाई वैद्य

पुणे शहरामधील विचारवंत कार्यकर्त्यांच्या समूहामध्ये कॉ.रा.प.नेने यांचे स्थान अग्रभागी होते. आयुष्यभर आपले जीवन त्यांनी सार्वजनिक कार्यासाठीच वेचले. पैसे मिळविण्याचा उद्योग एक कवडीचाही त्यांनी केला नाही. सुहृद आणि आप्तेष्ट यांनी जी काही त्यांच्या उदरनिर्वाहाची काळजी वाहिली असेल तीच. अगदी साधे पण नीटनेटके कपडे घालून ते वावरत असत. साधी पँट व अर्ध्या बाह्यांचा साधा शर्ट आणि हातात छोटीशी बॅग असा त्यांचा पेहराव पुणेकरांना परिचित होता. त्यांनी कधी कपड्यांचा षौक केला असेल असे मला अजिबात वाटत नाही. किंबहुना आपले कपडे नीटनेटकेपणाने ते वर्षानुवर्षे वापरत असत. 'स्पार्टन' राहणीचे ते मूर्तिमंत रूप होते. आपल्या गरजा न वाढवता कमीत कमी पैशात उदरनिर्वाह करणाऱ्यांचा ते जणू वस्तुपाठच होते. डाव्या आणि पुरोगामी तरुणांच्या विविध गटामध्ये अत्यंत आवडीने-आपलेपणाने परंतु शक्य तेवढे मागे राहून ते वावरत असत. त्यांना कोणी विचार मांडायचा आग्रह केला तरच आपले विचार सुस्पष्टपणे, ठामपणे व तार्किक पद्धतीने ते पेश करीत असत. कदाचित याबाबत त्यांची तुलना ज्येष्ठ समाजवादी विचारवंत विनायकराव कुलकर्णी यांच्याशीच करता येईल. वैचारिक भिन्नत्व असले तरीही सामाजिक निष्ठा, काटकसरीचे जीवन आणि तरुणांना पुढे करून त्यांना वैचारिक आधार देण्याची पद्धती याबाबत कॉ.नेने विनायकरावांचे धाकटे भाऊच शोभतील.

नेनेंचा आणि माझा खूप स्नेहसंबंध राहिलेला आहे. तसे आम्ही एकमेकांना एकमेकाकडे जाऊन आवर्जून भेटलो असे कधी घडले नाही. तरीही आमचा स्नेहबंध आणि आपलेपणा घट्ट होता, हे मला नमूद केले पाहिजे. मी काही कधी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याचे स्मरत नाही. मात्र, नित्यनेमाने त्यांच्या शुभेच्छा मात्र मला त्यांच्या सुवाच्य हस्ताक्षरात मिळत असत. त्यांची माझी पहिली भेट केव्हा झाली याचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा मला असे जाणवते की १९४६-४७ च्या सुमारास अगदी एकमेकांविरोधात आम्ही काम करत होतो. माझ्या स्मरणानुसार त्या वेळेला नेने कट्टर सावरकरवादी होते आणि आम्ही दोघेही आपापल्या विचारांसाठी

शालेय तरुणांच्या बैठका मधल्या सुट्टीत घेत असू. त्यानंतर त्यांना मी पाहिले ते लोकवाङ्मय गृहाच्या एल.आय.सी. बिल्डिंगमधील दुकानातच. त्या दुकानात कॉ.नेने व कॉ. भागवतबाई अत्यंत शांतपणे व निष्ठापूर्वक पक्षाच्या वाङ्मयाचा प्रसार करीत असत. त्यावेळची माझी प्रतिक्रिया अशी होती की नेनेंच्या विचारांचा लंबक बरोबर दुसऱ्या टोकाला पोचला आहे. त्यावेळी आम्ही समाजवादी सावरकरवाद्यांना व कम्युनिस्टांना परस्परविरोधाची दोन टोके परंतु वैचारिक कर्मठपणा असलेली मानत असू. आता मात्र सध्याच्या कम्युनिस्ट पक्षाबाबतची माझी ती भूमिका राहिलेली नाही. त्या काळातही कॉ.नेने कुलकर्णी पेट्रोल पंपावरील साध्या खोलीत अगदी साधेपणाने राहत असत. विचाराने अत्यंत कणखर परंतु मनाने निर्लेप आणि काहीसा आत्मलोपी वाटणारा माणूस मी नेनेंमध्ये पाहत आलो.

सुरुवातीला नेनेंच्या कम्युनिस्ट विचारांच्या कट्टरपणाबद्दल माझ्या काही समजुती होत्या. परंतु अधिक साहचर्यामधून त्या बदलत गेल्या. 'एक गाव, एक पाणवठा' मोहिमेच्या वेळी प्रा. विलास वाघांच्या बरोबर मुळशी तालुक्यातील खेडोपाडी जाऊन त्यांनी केलेले काम मी विसरू शकत नाही. मेधा पाटकरांच्या नेतृत्वाखाली 'नर्मदा बचाओ आंदोलनात'ही ते आवर्जून उपस्थित राहत असत. या आंदोलनामार्फत मेधा पाटकर यांनी विकासाच्या संकल्पनेबाबत जे प्रश्न उपस्थित केले होते, ते त्यांना अत्यंत रीतसर वाटत असत. माझ्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्ताने मित्रांनी आयोजित केलेल्या परिसंवादात माझ्याबद्दलचा जिव्हाळा बाळगून ते सामील झाले होते. पुणे शहराचा महापौर असताना त्यांना रस्त्याने चालताना पाहून गाडी थांबवून त्यांना त्यांच्या ठिकाणी पोचवल्याचे त्यांना किती अप्रूप वाटले होते याचे मलाच आश्चर्य वाटते. कॉ. नेने आणि ताहेरभाई पूनावाला यांची दोस्ती म्हणजे दोस्तीचा एक किस्साच ठरेल. हिंदू-मुस्लिम प्रश्नाबाबत त्या दोघांची एकदा माझ्यासमोरच चर्चा झडलेली मी पाहिली होती. दोघेही अटीतटीने एकमेकांवर तुटून पडत होते. पण त्यांची दोस्ती मात्र कधी तुटली नाही. ती अखेरपर्यंत घट्टच राहिली. डॉ. धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी व प्रा. डी.डी. कोसंबी जन्मशताब्दी यांचे त्यांनी काहीशा भक्तीभावाने जे कार्य केले त्यातून विचारवंत नेने हा त्यांच्याबद्दलचा ठसा माझ्या मनात अधिक दृढ झाला. डी. डी. कोसंबी आणि कॉ. नेने यांच्या संबंधाबद्दल ऐकल्यावर मी अगदी विस्मयचकित झालो. कॉ.नेनेंना डी. डी. कोसंबींसारख्या प्रकांडपंडिताचा सहवास लाभला ही बाब वैशिष्ट्यपूर्णच मानावी लागेल. त्यांचा संबंध गुरू व शिष्यापेक्षाही वैचारिक सहयोगाचा अधिक असावा अशी माझी भावना आहे. 'विषमता निर्मूलन' कार्यामध्येही त्यांनी वेळोवेळी आपला सहभाग नोंदवलेला आहे. कॉ. नेने यांच्या वैचारिक भूमिकेमध्ये हळूहळू बदल होत गेला अशी माझी समजूत आहे. त्यांच्याकडे पाहिल्यावर एखाद्या विचारपीठाचे ते घट्ट पाईक आहेत असे मला काही वाटले नाही. किंबहुना स्टालीनच्या अस्तानंतर, रशियाच्या पाडावानंतर आणि चीनच्या सुधारणावादी

बदलानंतर जगभरच्या कम्युनिस्टांतच एक बदल होत आलेला आहे, असे मला वाटते. युरो कम्युनिझमच्या मांडणीनंतर आणि त्याआधीच्या मिलोवन जिलासच्या 'न्यू क्लास' या ग्रंथानंतर हा बदल अधिक स्पष्ट होत गेला. भारतातील समाजवादी या बदलाची पुरेशी दखल घेत नाहीत, असे मला वाटते. मात्र श्री.मधू लिमये यांच्या 'सोशालिस्ट कम्युनिस्ट इंटरअॅक्शन इन इंडिया' या पुस्तकामध्ये आता दोघांनीही एकत्रित येण्याची गरज मांडलेली आहे. किंबहुना जागतिकीकरणाच्या अक्राळविक्राळ दुष्परिणामांमुळे त्याची आता निकडच निर्माण झाली आहे. माझ्या दृष्टीने कॉ. रा. प. नेने यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वामुळे व विचारसरणीमुळे ती निकड पुरी होण्याचा संभव आहे. माझे अनेक दशकांचे मित्र कॉ. रा. प. नेने यांना मी भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत आहे.

❑

विलक्षण दोस्ती

ताहेरभाई पुनावाला

(नेने आपल्यातनं निघून जाण्याच्या काही दिवस आधी ताहेरभाईंची ही मुलाखत अच्युत बोरगांवकर यांनी घेतलेली आहे.)

तुमची आणि नेनेंची भेट कधी झाली?

ते १९७७ साल होतं. एका बोहरा धर्मगुरूच्या विरुद्ध पीयूसीएलने (लोक स्वतंत्रता संघटना) एक कमिशन बसवलं होतं. त्या कमिशनला सपोर्ट करण्याकरिता बाबा आढावांनी एक पब्लिक मीटिंग बोलाविली होती. मीटिंगमध्ये बोहरा समाजाच्या काही लोकांनी गोंधळ घातल्यामुळे ती मीटिंग होऊ शकली नाही. त्या कार्यक्रमात नेनेही सहभागी होते. त्या घटनेनंतर बाबा आढाव आणि माझी दोस्ती झाली. त्यावेळी भवानी पेठेतील बाबा आढावांच्या महात्मा फुले प्रतिष्ठानमध्ये दर सोमवारी एक मीटिंग होत असे. मी त्या मीटिंगला जायला लागलो आणि नेनेही तिथे यायचे. तिथेच त्यांची आणि माझी ओळख झाली. चर्चेत आमच्यात अनेकदा मतभेद असायचा. आमचं क्वचितच एकमत व्हायचं. बाबा आढाव माझ्या मताशी सहमत असायचे. मीटिंग झाल्यानंतर मी नेनेंना माझ्या गाडीत लिफ्ट द्यायचो. नंतर अनेक भेटीनंतर ओळखीचं रुपांतर दोस्तीत कधी झालं हे कळलंही नाही.

कुठल्या मुद्द्यावर तुमचं आणि नेन्यांचं वेगळं मत होतं?

मुस्लिम प्रश्नावर नेहमी चर्चा व्हायची. त्यांना जेव्हा वाटायचं की मी उगाच मुस्लिमांच्या बाजूने बोलतो आहे तेव्हा त्याला ते विरोध करायचे. एकदा तर आमच्यात खूपच टोकाचे मतभेद झाले. आम्ही सातारा रोडने बहुतेक महाबळेश्वरला चाललो होतो. भाई वैद्यसुद्धा तिथे होते. चर्चेत आमचा दोघांचाही आवाज खूप चढला होता. नेने मला म्हणाले, ''तुम्ही कशाला इथे राहता? पाकिस्तानला निघून जा.'' मी त्यांना म्हणालो, ''मी अगोदर तुम्हाला पाकिस्तानला घेऊन जाईन, नंतरच मी जाईन.'' पण नेनेंशी मैत्री झाल्यानंतर मी नेनेंना चांगल्या प्रकारे ओळखायला लागलो. त्यांचं ज्ञान

आणि वाचन खूपच जास्त होतं. दहा वर्षांपूर्वीच्या गोष्टीही ते व्यवस्थित तारखा आणि वार लक्षात ठेवून सांगायचे. सुरुवातीला मला नेनेंचा खूप राग यायचा. कारण कधी कधी जेव्हा ते माझ्या सोबत असायचे तेव्हा अचानक स्वतःच्या विचारात इतके गुंग व्हायचे की मी त्यांच्या सोबत आहे हे विसरूनच जायचे. पण नंतर माझ्या लक्षात आलं की असं ते जाणूनबुजून करत नव्हते. ते माझ्या दुकानी आले की एखादं आर्टिकल मी त्यांना वाचायला देत असे. तो लेख वाचण्यात ते इतके तल्लीन होत की आपण कुठे बसलो आहोत हे विसरून जात. त्यांना लेखाबद्दल काही विचारलं की मला ते शब्द न शब्द सांगत, इतकं त्यांच्या ते लक्षात असायचं. माझा एक मित्र तर त्यांना चालताबोलता ज्ञानकोशच म्हणायचा. त्यांच्यामुळे मला खूप गोष्टी नव्याने कळल्या आणि समजल्या. आमच्यात कितीही वाद झाले तरी आमची मैत्री ही एकमेवाद्वितीय अशीच होती.

नेनेंवर कधीकधी हिंदुत्ववादी असल्याचा आरोप होतो. त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

नेने आणि माझ्यात इतक्या चर्चा व्हायच्या पण ते हिंदुत्ववादी आहेत असं मला कधीही वाटलं नाही. आपण सर्व हिंदूंच्यावतीने बोलत आहोत असा कधी त्यांचा रोख नसायचा. कधीही नाही. मला वाटतं की तुम्ही विशिष्ट धर्मात किंवा जातीत जन्माला येणं कधीकधी तुमचा डिसअडवांटेज ठरतो. माझंच उदाहरण द्यायचं झालं तर मी जन्माने मुसलमान असणं हा माझा डिसअडवांटेज आहे. मी मुस्लिमांवर अन्याय होत असेल तर बोलायला लागलो की लोक म्हणणार मी मुसलमान असल्यामुळेच त्यांच्या बाजूने बोलतो. पण मी दलित प्रश्नावरही बोलतो. गंमत म्हणजे खुद्द नेनेंनाही वाटायचं की मी कितीही नास्तिक असलो तरी मुसलमानच आहे. मी म्हणतो की तुम्ही ना. ग. गोरे किंवा एस. एम. जोशी किंवा दाभोळकरांना ब्राह्मणी म्हणणार का? माझ्या मते नेन्यांबाबतही असंच होत असणार. नेनेंवर ब्राह्मणी असल्याची टीका होते तीही चुकीची आहे. पण काही काही वेळेला नेनेंनी ती स्वतः ओढवूनही घेतली आहे. मला आठवतं त्यांचा आणि सावरकरांचा थोडासा संपर्क आला होता. तसं पाहायला गेलं तर पुष्कळ अर्थाने सावरकरसुद्धा क्रांतिकारी व्यक्ती होते. ते नास्तिकच झाले असते पण गांधींच्या एका विशिष्ट प्रकारच्या राजकारणामुळे सावरकर कट्टर धर्मवादी झाले असं माझं मत आहे. जीनांबद्दलही मला असंच वाटतं. मीसुद्धा सावरकरांना एका अर्थाने मानतो. त्यांनी त्यांच्या आयुष्यात खूपच संघर्ष केला आणि कारण काही असो पण त्यांनी खूप शिक्षाही भोगली होती. नेनेंच्या काही मित्र आणि सहकाऱ्यांना वाटतं की नेन्यांना आजही सावरकरांप्रति सॉफ्ट कॉर्नर आहे. पण मला तसं वाटत नाही.

मला असं वाटतं की नेन्यांमध्ये ज्या प्रमाणात फ्लेक्सिबिलीटी ऑफ थॉट हवी तेवढी नाही. मनमोकळेपणे एखादी गोष्ट स्वीकार करणे असं त्यांच्याबाबत होत नाही. पण त्यांच्याकडे एक प्रकारचा निष्पापपणा आहे. क्वचित एखाद्याचं मत जर त्यांना

पटत नसेल तर त्यांचा आवाज मोठा होतो. त्यांना सांगावं लागतं की नेने किती आवाज करताय? एकदा त्यांच्याच घरी मीटिंग होती. बाबा आढावसुद्धा त्या मीटिंगला आले होते. बाबा आणि नेनें यांच्यात बाचाबाची झाली. बाबा आढाव त्यांच्या घरातून रागारागाने निघून जायला लागले तर नेने त्यांना म्हणाले 'जायचं असेल तर जा.' मी नेन्यांना म्हणालो की तुम्ही हे बरोबर नाही केलं. ते तुमच्या घरी आले होते. आपण नंतर चर्चा करू असं तुम्ही त्यांना म्हणायला पाहिजे होतं. पण इतकं होऊनही आज नेने आणि बाबांचे खूपच जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

असं असूनही नेनेंचे सर्व प्रकारच्या राजकीय, सामाजिक वर्तुळांमध्ये चांगले संबंध आहेत. हे त्यांनी कसं साध्य केलं होतं असं तुम्हाला वाटतं?

नेन्यांकडे एक विशेष गुण हा आहे की कोणीही त्यांच्याकडे काही मदत मागायला गेलं किंवा कोणावर काही अन्याय होत असेल तर त्या वेळेला ते पाहत नाहीत की तो कोण आहे वा कोणत्या पार्टीचा आहे. क्लॅश कुठे होतो तर तो चर्चेच्या वेळेला आणि तेही जेव्हा ती चर्चा टोकाला जाते तेव्हा. बाकी वेळेला ते सगळ्यांनाच पाहिजे ती मदत करतात. कुठलंही काम असो नेने नाही म्हणत नाहीत. ते आपल्या विचारांमध्ये भक्कम होते.

हे झालं राजकीय–सामाजिक भूमिका आणि चर्चांच्या बाबतीत. या व्यतिरिक्तही तुम्ही नेन्यांचे जवळचे मित्र आहात. तुमच्या मैत्रीबद्दल सांगा.

नेन्यांशी मैत्री झाली तेव्हा मी ५५ वर्षांचा होतो. आता मी ८८ वर्षांचा आहे. नेने माझ्यापेक्षा सात आठ वर्षांनी लहान आहेत. आमची मैत्री खूप जुनी आहे. दुसरं काय आहे की मी त्यांची साथ सोडली नाही. त्यांनी सोडली अशातला भाग नाही. कुठलाही कार्यक्रम असला की मी त्यांना सोबत घेऊन जायची संधी सोडायचो नाही. मला ते जास्त आवडतात. तेही मला फोन करतात. पण ते आता, सुरुवातीला नाही. माझ्या आयुष्यात आलेल्या संकटातसुद्धा मानसिक आधार म्हणून आणि असं सुद्धा ते माझ्यासोबत कायम आहेत. दुसरं म्हणजे कधी कधी आम्ही संध्याकाळी 'प्रसादा'साठी एकत्र यायचो. पण प्रसाद म्हणजे प्रसाद. मला वाटतं आणि हे माझं वैयक्तिक मत आहे की नेनेंनी लग्न केलं असतं तर त्यांच्या वैयक्तिक जीवनात बराच फरक पडला असता.

कसा?

त्यांना फॅमिली असण्याचा जो अनुभव असतो तो आला नाही. म्हणजे त्यांच्या वाचनात किंवा चिंतनात तो विषय असेल. पण लग्न झाल्यानंतर समाजाचा एक दबाव असतो, कुटुंबाची जबाबदारी येते, मूल झालं तर ती जबाबदारी आणखीनच वाढते. या जबाबदाऱ्या निभवाव्याच लागतात. त्यापासून पळून जाता येत नाही. कुटुंबापेक्षाही

माणसाच्या आयुष्यात कुणीतरी सोबती असणं फार महत्त्वाचं असतं. मी या विषयावर त्यांच्याशी अनेकदा बोललोही आहे.

त्यांचे आणखी कोणते गुण तुम्हाला आवडतात?

त्यांचं वाचन चौफेर होतं. त्यांची स्मरणशक्ती कमालीची होती. एखादी घटना घडली की मी त्यांच्याकडे त्यासंबंधी चर्चा करायचो. ती घटना किंवा त्या गोष्टीच्या पाळामुळांपर्यंत पोचेपर्यंत त्यांनाही चैन पडायचं नाही. त्यामुळे ते मला आवडायचे आणि म्हणूनच आम्ही इतके जिवलग मित्र झालो. किंवा कदाचित असं म्हणता येईल की आम्हा दोघांनाही एकमेकांमध्ये अशा काही गोष्टी सापडल्या होत्या की ज्यांनी आम्हाला एकत्र ठेवलं आणि जे मतभेद होते त्याच्यावरही आम्ही बऱ्यापैकी मात केली.

खरं तर काही वैगुण्य असली तरी नेने हे ज्यांच्यावर भरभरून प्रेम करावं वाटतं अशी व्यक्ती आहेत. आणि ती वैगुण्यंही आपल्याला तशी वाटतात म्हणून. नाही तर नेनेंच्या मताप्रमाणे ती तशी नाहीतच. त्यांना ती वैगुण्यं वाटली असती तर ते त्यातून बाहेर आलेच असते. पण मग ते नेने राहिले नसते. नेनेंच्या या गुणदोषांमुळेच लोक त्यांच्यावर टीकाही करतात आणि त्यांच्याकडे आकर्षितही होतात. तुम्ही मला नेन्यांबद्दल बोलायला लावलंत ते खूप चांगलं केलंत. नेने माझ्या आयुष्यातील किती महत्त्वपूर्ण व्यक्ती आहेत हे मला कळलं. ते एक उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व आहेत.

❑

ज्ञानसंदर्भाची पाणपोई

बाबा आढाव

(कॉ.नेने यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने 'परिवर्तनाच्या वाटसरू'मध्ये लिहिलेला लेख)

सार्वजनिक जीवनात काम करताना विचारांच्या दिशेबाबत काही वेळेस गोंधळ उडतो. अशा वेळी नेमक्या मार्गदर्शनाची गरज भासते. तशी तहानभूक लागते. अशा वेळी पुण्यात सर्वश्री विनायकराव कुलकर्णी, रा.प.नेने, आचार्य श्रीपाद केळकर, प्रा. अ.भि.शहा, प्रा.राम बापट, प्रा.व्ही.डी. देशपांडे इ. मंडळींची आठवण होते. त्यांची भेट व त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून विचारांचा गुंता कमी होतो असा माझा वर्षानुवर्षाचा अनुभव आहे. मी दिलेली यादी पूर्ण नाही. तीत अनेक नावे लिहिण्याचे राहून गेले आहे. अलिकडे मलाही विस्मरणाचा विकार जडताना दिसत आहे. तर अशी ही मंडळी म्हणजे साक्षात ज्ञानसंदर्भाच्या पाणपोया होत असे म्हणता येईल.

सर्वश्री विनायकराव कुलकर्णी, प्रा.अ.भि.शहा, प्रा.व्ही.डी.देशपांडे, आचार्य केळकर ही मंडळी काळाच्या पोटात विसावली आहेत. प्रा.राम बापटांची भेट जवळपास दुर्मिळ झाली असली तरी रा.प.नेने यांचेकडून तत्परतेने फोनवर दाद मिळते.

रा.प.नेन्यांची आणि माझी गेले ३०-४० वर्षांची मैत्री. आम्ही साधारणत: समान वयाचे आहोत. एखाद्या वर्षाने मी लहान असेन. 'एक गाव-एक पाणवठा' मोहिमेत आम्ही जवळ आलो. म.जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, विषमता निर्मूलन समिती, इंडियन सेक्युलर सोसायटी, बुद्धिप्रामाण्यवादी मंच (नेन्यांच्या भाषेत विवेकवादी मंच), मुस्लिम सत्यशोधक मंडळ अशा कितीतरी संस्था व उपक्रमात आमचे दळणवळण वाढले. नेने मार्क्सवादी परंतु डी.डी.कोसंबींच्यामुळे प्राचीन-अर्वाचीन भारतीय इतिहासाकडे पाहण्याचा नेने यांचा खास दृष्टिकोन बनला आहे. प्रा.गं.बा.सरदारांच्या सान्निध्यामुळे तर नेने आमच्या अधिक जवळ आले. विनायकराव, राम बापट, नेने तिघेही अविवाहित. पैकी पहिल्या दोघांच्या लेखण्या अगदी खुडुक बनलेल्या. नेने लिहितात, परंतु अगदी मोजून मापून!!! अघळपणा, उथळपणाचा मागमूसही नसणार.

नेनेंना कधीही फोन करावा. आकडेवारी-माहिती-विषयाची व्याप्ती नेने लक्षात आणून देणार. मंडल आयोगाच्या शिफारशीनंतर आम्ही 'पुरोगामी सत्यशोधक'चा विशेषांक प्रसिद्ध केला. नेनेंनी त्या अंकासाठी अपार मेहनत घेऊन संपादन केले. जातीव्यवस्थेची मूलगामी चिकित्सा नेन्यांनी केली आहे. काही मार्क्सवादी मंडळींना 'जात' या घटकाचे विलक्षण वावडे असते. नेने याला अपवाद आहेत. मार्क्सवादी असले तरी मार्क्सवादी विचारानेच ते जात प्रश्नाचा वैचारिक विकास करतात. मांडणी करतात. सौंदर्य स्पर्धा या विषयावर नेन्यांनी माहिती देऊन आम्हा मंडळींना मंत्रमुग्ध केले. किस्से सांगण्यात तर नेन्यांचा हातखंडा. थोडक्यात सांगतो म्हणत सविस्तर पण मुद्देसूद मांडणी करणार.

शहाद्याची श्रमिक संघटना, शंकर ब्रह्मे समाज विज्ञान संस्था, मागोवा इ. उपक्रमांच्या जडणघडणीत नेन्यांचे योगदान मोठे आहे. मात्र त्याबद्दल नेने अवाक्षरही बोलत नाहीत. नेन्यांना 'मीपण' रुचत नाही. ते अत्यंत निर्लेप मनाने, नि:पक्षपातीपणे मांडणी करतात. आचरणही करतात. त्याबाबतचा अगदी अलीकडचा अनुभव नोंदण्याजोगा आहे. सामाजिक कृतज्ञता निधीचा यंदाचा पुरस्कार नेनेंना देण्याचे आम्ही ठरवले. त्यांच्याशी न बोलताच आम्ही ठराव पास केला. नेन्यांनी शांतपणे व ठामपणे नकार दिला. मला आश्चर्य वाटले नाही. नेन्यांचा स्वभाव मला थोडाफार समजलेला आहे. त्यांच्यातला माणूस, त्यांच्या आवडीनिवडींची थोडीशी झलक मीच पूर्वी अनुभवली आहे. त्यामुळे नेने 'स्तुतिसुमनां'चा वर्षाव टाळतीलच परंतु साधी कृतज्ञता व्यक्त करू देतील असे मला वाटत होते. परंतु तसे घडले नाही. नेन्यांच्या बरोबर प्रवास वा तुरुंगवास हाही असाच प्रत्ययकारी अनुभव ठरतो. नेने चहा व पावावर दिवस काढणार! अत्यंत काटेकोरपणे खाणेपिणे करणार. तुरुंगातील भाकर-कालवण त्यांच्या प्रकृतीला कसे मानवणार? नेन्यांची उपासमार फक्त पाहत बसायचे. चेष्टा मस्करीला ते हसून दाद देणार! नेने हाडाचे सहृदयी शिक्षक आहेत. त्यांचे ज्ञानार्जन व ज्ञानदान सतत सुरू असते. पर्यावरण, महिला-दलितांच्या चळवळीशी त्यांचे वैचारिक नाते जमले आहे. त्यासाठी तन-मन-धनाने ते कार्य करतात. सर्वस्व झोकून देतात. शहीद भगतसिंग सभागृहातील समाजविज्ञान अकादमीचे ते अध्यक्ष आहेत. लोकवाङ्मय गृहाच्या पुस्तकविक्रीच्या दुकानापासून अकादमीच्या अध्यक्षपदापर्यंतची नेन्यांची वाटचाल मी पाहिली आहे.

नेनेंची पंचाहत्तरी! डाव्या चळवळी व प्रचलित राजकारण या विषयावर नेने बरेच काही सांगू शकतील. इतिहासाचा मागोवा घेतील, नव्हे ऑडिट करतील. आकडेवारी पेश करतील. ७५ या आकड्याला विशेष महत्त्व न देता ते पुढे जातील. फक्त एवढेच म्हणतील, ''७५ असे आहे काय?''

❑

एका विचारवंत मित्राच्या आठवणी

भालचंद्र केरकर

एल्आयसीच्या अलका टॉकीज चौकातील जीवनदर्शन इमारतीमध्ये कॉ.नेनेंच्या 'पीपल्स् बुक हाऊस'मध्ये एक पुस्तकवेडा म्हणून मी अधूनमधून जात असे व तेथील पुस्तकांपैकी कोणती कशी आहेत याची माहिती कॉ.नेने देत असत. अतिशय स्वस्त दरात प्रोग्रेसिव्ह पब्लिशर्सची पुस्तके मिळत असत व आज दुर्मिळ झालेली अनेक पुस्तके मी तिथे विकत घेऊन वाचू शकलो. त्यामध्ये केवळ वैचारिक नव्हे तर साहित्यिक, प्रवासवर्णने, शिकारी, उत्तमोत्तम सोव्हिएत लेखकांच्या कथा कादंबऱ्या हा मोठा खजिनाच होता. मध्यमवर्गातली मंडळी कम्युनिस्ट म्हणजे अस्पृश्य असं मानून, त्याकडे दुर्लक्ष करीत. पण सोव्हिएत लेखक, कवींनी निर्माण केलेलं वाङ्मय केवढं अजोड आहे याचा अनुभव मला तेथील पुस्तके वाचताना आला. त्यामध्ये नेनेंचं मार्गदर्शन मोलाचे होते.

२००६ साली झालेल्या लाल निशाण पक्षाच्या शिबिरात भारतीय इतिहासातील 'वर्गसंघर्षाची वाटचाल' या विषयावर कॉ.नेने बोलले होते. त्यावर बरीच उलटसुलट चर्चाही झाली होती. त्यावेळी अनेक चुटके, गोष्टी सांगत त्यांनी तो गंभीर विषयही चांगला मनोरंजक बनवल्याची आठवण मनात ताजी आहे.

कॉ.नेनेंशी माझे तसे खूप जवळचे संबंध होते. अधूनमधून त्यांना भेटायला जात असे आणि कम्युनिस्ट चळवळींतील किंवा सैद्धांतिक प्रश्नाबद्दलही त्यांचे मार्गदर्शन घेत असे. फोनवरूनही काही वेळा ही चर्चा होत असे.

अलीकडेच त्यांनी डी.डी.कोसंबींचा जन्मशताब्दी कार्यक्रम काही सहकाऱ्यांच्या मदतीने अतिशय उत्तम रीतीने राबवला. त्यानिमित्त त्यांनी आयोजित केलेली विविध विषयांवरील व्याख्याने म्हणजे एक वैचारिक मेजवानीच होती. त्यांच्यामुळे कोसंबी जन्मशताब्दी समितीचा मीही एक सदस्य होतो.

आज कॉ.नेने नसणे ही मोठी उणीव जाणवते.

एका मोठ्या वैचारिक खजिन्याला आणि अभ्यासू मित्राला आम्ही मुकलो आहोत हे उत्कटतेने जाणवते.

❑

निष्ठावंत पण खुल्या विचाराचे मार्क्सवादी

राम बापट

नेन्यांची आणि माझी ओळख त्यांच्या पीपल्स् बुक हाऊस या पुस्तकाच्या दुकानात झाली. मुंबईचे कॉ. देशपांडे १९५४ च्या काळात पुण्यात येऊन नाना चौकात अभ्यास वर्ग घेत असत. मी तिथे जात असे. माझे मार्क्सवादाबद्दलचे पहिले कुतूहल तिथेच जागे झाले. नंतर माझा पीपल्स् बुक हाऊसशी संबंध आला कारण मी तिथे फेऱ्या मारत असे. मी अतिशय कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबातून आलो होतो व वडिलांवर अवलंबून होतो. त्यामुळे एखादंच छोटं पुस्तक विकत घेणं शक्य होतं. नंतर एमए सोबतच एक छोटी नोकरीसुद्धा करत असल्यामुळे मला पुस्तक घेण्याची ऐपत आली. मग मी नेनेंना कुठलं पुस्तक घेऊ म्हणून विचारत असे. ते मला पचेल असं पुस्तक सुचवित. ही आमच्या स्नेहाची सुरवात होती. मधल्या काळात दि. के. बेडेकरांशी माझी चांगली मैत्री झाली व त्यांच्याकडून मला बरंच काही शिकायला मिळालं. बेडेकरांमुळे माझ्यावर मार्क्सवादाचे सखोल संस्कार झाले वं माझी मार्क्सवादाकडील ओढ अजून वाढली. नेनेंचा परिचय झाल्यानंतर आम्ही त्या काळात गुडलक, लकी इ. रेस्टॉरंटमध्ये चालू घडामोडींबद्दल चर्चा करू लागलो.

नेनेंचे मत हे अतिशय स्वच्छ, तर्कशुद्ध, ठाम, साधार व अभ्यासपूर्ण असे. त्यांचे ज्ञान हे अचूक माहितीवर आधारलेले असे. त्यांच्या या गुणांचा उपयोग अनेक संघटना, चळवळींना आणि एनजीओंनादेखील होत असे. ते नीट माहिती काढूनच बोलत असत. ही माहिती मिळविण्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करत. नेने हे चर्चेला ठाम पण विरोधी मतांचा व्यक्तिगत संबंधांवर परिणाम न होऊ देणारे दुर्मिळ असे कार्यकर्ता-विचारवंत होते. त्यांच्या मनात काही किल्मिष राहत नसे. ते दुसऱ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकत असत व स्वतःचे म्हणणे पटवून देत असत. पुरोगामी चळवळीतील अगदी सामान्य कार्यकर्ता जरी त्यांच्याकडे गेला तरी ते त्याला मदत व मार्गदर्शन करत. त्यामुळेच त्यांचा निरनिराळ्या जनसमूहांमध्ये व वर्तुळांमध्ये चाहता वर्ग निर्माण झाला.

नेने कधी पक्षाचे कार्डहोल्डर होते का किंवा किती सालापर्यंत होते असले प्रश्न कधी मी त्यांना विचारले नाहीत. ते सीपीआयमध्ये होते का किंवा पक्ष फुटल्यावर

कोणत्या बाजूला राहिले तेही माहिती नाही. पण मार्क्सवाद-लेनिनवादाशी ते ठाम होते. ते किती स्टॅलिनवादी होते याबद्दल मला शंका आहे. फुले आंबेडकरवादाबद्दल ते म्हणत की याबाबतीत खुलेपणाने विचार केला गेला पाहिजे. म्हणजे तो केला जात नाही किंवा चळवळीची वा कम्युनिस्ट पक्षाची त्याबद्दलची समज कमी पडते आहे अशा पद्धतीचे विधान करताना त्यांना मी कधी पाहिले नाही. ते साधारणतः कम्युनिस्ट पक्षाबद्दलची नकारात्मक टिप्पणी करणं टाळत असत असा माझा अनुभव आहे. मार्क्सवादी-लेनिनवादी पक्षांचा जाती निर्मूलनाचा पुढचा प्रोग्राम काय आहे याबद्दल मात्र ते फारसं बोलत नसत. सीपीएमने एकदा केरळातील अधिवेशनात जातीच्या प्रश्नाचं थोडंसं रिफॉर्म्युलेशन केलं तेव्हा मी म्हणालो हे तर डोंगर पोखरून उंदीर काढण्यासारखं आहे तर ते त्यावर नुसते हसले.

नेनेंबरोबर काही बोलायला जायचे म्हणजे आपले तासन्तास जातील हे लक्षात ठेवूनच जावं लागत असे. नेने एकदा बोलायला उभे राहिले की खूप बारीक तपशील सांगत. म्हणून श्रोत्यांना ते खूप बोलतात असं वाटायचं. पण तो त्यांच्या स्वभावाचा भाग होता. त्यांना ओढ होती की नवीन पिढीला हे सारं कळलं पाहिजे. त्यामुळे त्यांचं सादरीकरण झालं की मी त्यांना म्हणत असे - नेने तुमचा आज अगदी धबधबा झाला. त्यावर आम्ही दोघेही हसायचो.

नेनेंनी फार काही लिहून ठेवलं नाही. खरं तर इतिहासावर त्यांची पकड उत्तम होती. त्यांची विश्लेषण शक्तीही उत्तम होती. जर त्यांनी लिहिलं असतं तर ते महाराष्ट्रातलं एक मोठं योगदान ठरलं असतं. बहुधा नेनेंचा तो अंगभूत गुण नसावा. मात्र कोणाशी बोलायचं असेल तर सर्व पूर्वतयारी करून ते तासन्तास बोलायला तयार असत.

हिंदू-मुस्लिम प्रश्नासंबंधीची नेन्यांची भूमिका पुरोगामी किंवा मार्क्सवाद्यांपेक्षा वेगळी होती. ती या अर्थाने की जितक्या ठामपणे या प्रश्नाची भूमिका समजून घेणं गरजेचं आहे तितकी आपण समजून घेत नाही असं त्यांना वाटायचं. म्हणजे मुस्लिम जरी अल्पसंख्य असले तरी काही मुद्द्यांबाबतचा त्यांचा हेकेखोरपणा सेक्युलॅरिझमच्या नावाखाली किंवा परिवर्तनवादाच्या कामी चालवता कामा नये असे ते म्हणत. ते मोकळेपणाने हे बोलत याबद्दल लोकांनी त्यांना त्यांच्या पाठीमागे सॉफ्ट हिंदुत्ववादी म्हटले का हे मला माहीत नाही. पण याबाबत ते वेगळे व उठून दिसत. कारण पुरोगामी मार्क्सवाद्यांची या संदर्भातील मांडणी ठरावीक तऱ्हेची असते. अर्थातच नेने हिंदुत्ववादी नव्हते किंवा त्यांना सॉफ्ट हिंदुत्ववादी म्हणावे असे काही घडले असेल असे मला वाटत नाही.

मलाही एकदा ज्ञानप्रबोधिनीने राष्ट्रवादावर मांडणी करण्यासाठी बोलविले होते. मला फारच थोडा वेळ दिला होता. मी माझी भूमिका मांडली. नेने त्यांच्या अभ्यासवर्गांना नियमित जात असत. पण आमच्या त्यावर चर्चा झाल्या किंवा तुम्ही असं का करता? असं मी त्यांना कधी विचारलं नाही. नेने ज्ञानप्रबोधिनीत जात असल्यामुळे त्यांची

मार्क्सवादावरील निष्ठा ढळली असं मला कधी वाटलं नाही. कुठला प्लॅटफॉर्म आहे, प्रेक्षकांना रुचेल का असा किंवा गुळमुळीतपणाने विचार करून नेने आपली भूमिका मांडत नसत. ते त्यांच्या स्वभावातच नव्हतं.

नेनेंची मार्क्सवाद व लेनिनवादावरची श्रद्धा शेवटपर्यंत अभंग होती. ते त्याबद्दल अत्यंत आग्रहाने प्रसंगी टोकाला जाऊन पण तितक्याच सचेपणाने बोलत असत. एखादी भूमिका घेताना ती मार्क्सवादी छावण्यांमध्ये किंवा समूहांमध्ये लोकप्रिय नाही असे दिसत असताना देखील त्याचा त्यांनी विचार केला नाही. काही वेळा त्यांचे मत तत्कालीन रुढ मार्क्सवाद्यांना पटत नसे. ते ठाम मार्क्सवादी असूनही खुल्या विचारांचे होते. त्यामुळे त्यांना कधी कधी मी थट्टेने लास्ट स्टॅलिनिस्ट इन द वर्ल्ड म्हणत असे.

आजची आपल्या भोवतीची परिस्थिती बघता ती खूप गोंधळाची आहे. पण त्यामुळेच आपण सिनिकल न बनता अधिक सजगपणे व स्पष्टपणे विचार करायला शिकलं पाहिजे असं मला वाटतं. नेनेंचं हेच वैशिष्ट्य होतं की त्यांनी कधीही सिनिकल वाटेल असं विधान थट्टेतही केलं नाही. त्यांना परिस्थितीची गुंतागुंत लक्षात यायची असं मला वाटतं आणि त्यामुळेच ते त्यांच्या काळाशी जास्त सुसंगत होते.

(शब्दांकन : अच्युत बोरगांवकर)

❑

वैचारिक समृद्धी देणारे कॉ. नेने

श्रीकृष्ण गुत्तीकर

माझी जी थोडीफार वैचारिक घडण होत गेली त्यात नेन्यांचा वाटा महत्त्वाचा आहे. हमाल पंचायतीच्या भवानी पेठेतील कार्यालयातून खाली उतरत असताना, शांत, तसे निर्विकार चेहऱ्याचे, साध्याच पण अत्यंत नीट नेटक्या पेहरावातील एक गृहस्थ जिना उतरत होते. आपली ओळख? नेने! मग शांतता. 'बापरे नावाइतकेच मितभाषी दिसतायेत', हे माझे नेनेंविषयीचे पहिले मत. पण नंतर लोकविज्ञान संघटनेत काम करू लागलो आणि नेन्यांची ओळख वाढत गेली. संघटनेच्या सुरवातीच्या काळात मेंदूला हिसका देणाऱ्या ज्या चर्चा चालत त्यात नेने असत. तेथेच त्यांच्या इतिहासाच्या आणि मार्क्सच्या अभ्यासाची प्रचिती येत गेली आणि माझ्या अनाभ्यासू प्रकृतीला माहिती मिळवण्याचा एक विश्वासार्ह शॉर्टकट सापडला. आमची ओळख वाढत गेली व दृढमैत्रीत रूपांतरित झाली. मैत्रीचे स्वरूप येऊ लागले ते भोपाळला झालेल्या (बहुदा १९८५) 'अखिल भारतीय शांतता आणि भातृभाव' संघटनेच्या अधिवेशनापासून.

एक दिवस नेनेंचा फोन आला, ''भोपाळला अधिवेशनाला येता का?'' मी विचारले, ''कोण कोण, बरोबर आहे? त्यांना माझी कंपनी चालणार असेल तर नक्कीच आवडेल!'' ''ताहेरभाई पुनावाला आणि एल्.आय्.सी.तील वाळिंबे आहेत व तुमचे छान जमेल'' या नेनेंच्या आश्वासनावर मी भोपाळला गेलो. १९८५ मध्ये लोकविज्ञान संघटनेने अण्वस्त्रविरोधी मोर्चा काढला होता, त्यावरचे प्रदर्शनही आम्ही अनेक ठिकाणी दाखवत होतो. माझा अण्वस्त्रांना असलेला ठाम विरोध पाहूनच बहुदा नेनेंनी मला विचारले असावे. अधिवेशनाचा विषय 'अण्वस्त्रविरोध व शांतता' हाच होता.

भोपाळच्या अधिवेशनामुळे ताहेरभाईंसारखा दिलदार मित्र तर लाभलाच पण तेथे पी.एन.हक्सर, रोमेष भंडारी, रोमिला थापर आणि इतर अनेक बुद्धिवान व्यक्तींचे विचार ऐकायला मिळाले. मी नुसता भारावून गेलो. पुण्याला परतल्यावर मी नेनेंना म्हणालो, तुम्ही या अधिवेशनाबद्दल लेख लिहा. ''छापत नाहीत हो!'' असे म्हणून नेनेंनी नकार दिला. मग मी जरा घाबरतच म्हटले, ''तुमच्या नोटस् दिल्यात तर मी प्रयत्न करून बघतो.'' अगदी आनंदानी त्यांनी नोटस् माझ्या स्वाधीन केल्या व मी

'बहुराष्ट्रीय कंपन्यांची अण्वस्त्रस्पर्धेतील भूमिका' असा लेख लिहिला. त्यावेळचे रविवार सकाळचे संपादक श्री.सदा डुंबरे यांनी तो तशाचा तसा रविवार सकाळमध्ये छापला. लेख वाचताच नेनेंचा आश्चर्य वाटल्याचा आणि लेखाचे कौतुक करणारा फोन आला. नेनेंच्या नोटस् नसत्या तर मी 'शून्य' होतो.

पुढे नेनेंनी मला अनेक सभांची, चर्चांची आमंत्रणे दिली. प्रा.ह.कृ.परांजपे यांनी स्थापन केलेल्या 'discussion group' च्या सभांना मला नियमित आमंत्रणे असत ती नेनेंमुळेच. या सभांमध्ये पत्रकार नसत, फक्त निमंत्रित असत. त्यामुळे वक्ते अगदी स्पष्टपणे इतरत्र न बोलता येण्यासारखी माहिती मांडत. त्यातील काही मुद्यांवर नंतर नेनेंशी चर्चा करून अधिक आनंद लाभे. नेन्यांचे परदेशातील (बहुतांश अमेरिकन) मित्र/मैत्रिणी जे एखाद्या प्रोजेक्टसाठी नेन्यांबरोबर काम करून गेलेले असत ते नेन्यांना जे लिखित साहित्य पाठवत त्यातील मी वाचावे असे लेख नेने झेरॉक्स करून पाठवत. विशेषत: विज्ञानविषयक. त्यातील 'मार्क्सवाद आणि डार्विन' वाद हा एक उत्कृष्ट लेख!

नेनेंचा व्यासंग मार्क्स आणि इतिहासापुरता मर्यादित नव्हता. इंग्रजी वाङ्मय, मराठी नाटक सिनेमा, (हिंदी कमी) कादंबरी, यांचेही त्यांचे भरपूर वाचन होते. काही नाटके, सिनेमा आम्ही एकत्र पाहिले. त्यावरही चर्चा होत असे. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकात सॉक्रेटिसचे 'परिपूर्ण व्यक्तित्व दाखवले जात नाही' असे नेनेंनी संदर्भासह श्रीराम लागूंना कळवले होते.

नेनेंचा आणि माझा एक करार होता! नेनेंनी लेख लिहिला की मी त्यांना माझ्या घरी पार्टी द्यायची. नेनेंकडे जो माहितीचा खजिना होता तो लेखरूपात यावा यासाठी हा प्रयत्न होता. नेनेंना माझ्या हातचे चिकन फार आवडत होते. तीर्थ (नेन्यांचा मद्यासाठीचा आवडता शब्द) ते प्रमाणातच घेत. ही पार्टीसुद्धा चांगल्या चर्चांमुळे रंगायची. अनेक विषयावर चर्चा होत. पार्टीमध्ये राम बापट असत व त्या दोघांची वैचारिक देवाण घेवाण (वादावादी) पाहून/ऐकून ज्ञानात निश्चितच भर पडत असे, मौजही वाटे. माझे संपूर्ण कुटुंब नेनेंचे चाहते असल्याने अडचण कधीच भासली नाही.

नेनेंकडे प्राचीन, मध्ययुगीन इतिहासाबरोबरच स्वातंत्र्य लढ्याची बारीकसारीक माहिती खूप होती. म.गांधींच्या खुनाबद्दल कोठेही उपलब्ध नसलेली माहिती नेने सांगत. 'नामांतर चळवळी' च्या काळात दलितांच्या झोपड्या जाळल्या गेल्या त्याबद्दल पीयूसीएलतर्फे त्यांनी केलेल्या पाहणीच्या वेळचा एक बोलका अनुभव त्यांनी सांगितला. ''आंबेडकराचे नाव देण्यासाठी दलित शांततेने चळवळ करतायेत तसा तुम्ही शांततेने विरोध करा ना? घरे जाळण्याचे कारण काय?'' या त्यांच्या प्रश्नावर मिळालेले उत्तर ''अहो काल परवापर्यंत जोहार मायबाप म्हणणारे आज छाती काढून 'जयभीम म्हणतात' दाखवला हिसका!'' सावरकरांनी ब्रिटिशांची किती वेळा माफी मागितली; म.गांधी गोलमेज परिषदेला गेले तेव्हा ब्रिटिश सरकारने मानसशास्त्रज्ञांना गांधींची मानसिकता


काय आहे हे हुडकण्यास कसे सांगितले; असे अनेक तपशील नेनेंकडे असत (हे सर्व रेकॉर्ड करायचे ठरले होते पण राहून गेले ही खंत आता कायम बाळगावी लागणार.)

नेनेंच्या काही मतांबद्दल माझा विरोध असे. तो मी त्यांना स्पष्टपणे सांगत असे. त्यांचा आग्रह असे की दुसऱ्या बाजूचे मतही लक्षात घ्यावे. मी म्हणायचो ज्या जमातवादी, भांडवलशाही शक्तींविरुद्ध लढायचे, त्यांचे म्हणणे मान्य नाही म्हणून तर लढे उभे राहतात. त्यांची ताकद, त्यांचा धूर्तपणा, सर्व क्षेत्रात घुसखोरी हे उघड दिसत असताना त्यांच्या म्हणण्याचा विचार करायची गरजच काय? चळवळीच्या तंत्रात हे बसते का? अर्थात हे नेन्यांना पटत नसे.

या सर्व चर्चा, व्याख्याने, त्यांनी दिलेले लेख, पुस्तके यातून माझी स्वत:ची वैचारिक वाढ होण्यात खूपच मदत झाली. समोरचा माणूस किती ज्ञानी आहे, प्रज्ञावंत आहे याचा कार्यकर्त्यांच्या बाबतीत नेने कधीच विचार करत नसत. त्याच्या पातळीवर जाऊन समजावण्याची हातोटी नेनेंकडे होती. कार्यकर्ते अभ्यास करत नाहीत, फारसे वाचत नाहीत याबद्दल त्यांना हळहळ वाटत असे.

इंग्रजी भाषेमध्ये इतर अनेक पर्यायी शब्द असताना मार्क्सने 'कॉम्रेड' हाच शब्द का निवडला याबद्दल नेनेंनी सांगितले की 'कॉम्रेड' म्हणजे स्वत:च्या आधी जो दुसऱ्याचा विचार करतो तो. इतरांना वैचारिक समृद्धी देणाऱ्या कॉम्रेड नेनेंच्या स्मृतीला माझा सलाम!

❑




फोन २५४५३४७७ [illegible]

रा. प. नेने
[illegible]
[illegible] रोड, पुणे ४११०३०
दि. २२. ८. २००[illegible]

श्री. गुत्तीकर यांस स. न.

लोकविज्ञान संघटनेच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाली या निमित्त आयोजित केलेल्या [illegible] (?) [illegible] (?) [illegible] (?) [illegible] (?) सोमवार दि. २१ ऑगस्ट रोजी दुपारी [illegible] कार्यक्रम संपन्न झाला असल्यामुळे मला उपस्थित राहणे शक्य नाही म्हणून [illegible] हे पत्र पाठवीत आहे. पुढील [illegible] कार्यक्रम जर २५ वर्षांनी होणार असेल तर माझा [illegible] पत्र पाठवावे लागेल, लोकविज्ञान [illegible]



[illegible] मी तुम्हाला [illegible] आनंदाने उपभोगीत असेन आणि तुम्हाला [illegible] तर मी तुम्हाला माझा [illegible] निमंत्रण पाठवीन!!
प्रो. [illegible] निमंत्रण मिळाल्यामुळे [illegible] आनंदपूर्ण [illegible] आला. [illegible] उपस्थित [illegible] झाले. [illegible]
स्नेह
रा. प. नेने

श्री. न. गुत्तीकर
महाराष्ट्र लोकविज्ञान संघटना
सी-७ आनंद [illegible] अपार्टमेंट,
सेक्टर नं. २४, प्लॉट नं. १०, पुणे
४ १ १ ० ५ २
[illegible]
पुणे - ४११०५२
PUNE - 411052

निरअहंकारी थोर विचारवंत

अरविंद बाळ

श्री. रा. प. नेने (यांची पुरोगामी वगैरे सार्वजनिक वर्तुळांतील ओळख ''रापं'' अशीच होती) यांचा माझा परिचय खूप उशिराचा म्हणजे मी २००० साली पुण्यात स्थायिक झाल्यानंतरचा. रापंची ओळख झाली ती अनेक व्याख्यानाप्रसंगी एकमेकांना पाहून. त्यांच्याविषयी अनेक आठवणी वगैरे इतर बरेच जण लिहितील. मी फक्त तीन संस्थांमधून आमचा जो संबंध आला त्याबद्दल लिहिणार आहे.

पहिला संबंध ज्ञानप्रबोधिनीमध्ये चालणाऱ्या 'राष्ट्रवाद विचार मंडळ' या मासिक व्याख्यानांच्या निमित्ताने. 'राष्ट्रवाद'च्या बैठकीतून मोकळेपणाने अनेक विषयांवर चर्चा होत असे. मी रापंना एका महिन्यात त्यांचे विचार मांडायची विनंती केली आणि त्यांनी ती आनंदाने स्वीकारली. त्यांचं राष्ट्रवाद बैठकीत, जानेवारी २००३ मध्ये 'भारताच्या फाळणीची प्रक्रिया - एक सिंहावलोकन' या विषयावर व्याख्यान झालं. त्यांचे विचार पुरोगामी होते, पण पोथीनिष्ठ नव्हते. भारताच्या फाळणीची आर्थिक कारणं त्यांनी अवश्य सांगितली, पण त्यांचा इस्लामचा धर्म म्हणून आणि मुसलमानांचा लोकसमूह म्हणून जो अभ्यास होता त्याचंही प्रतिबिंब या व्याख्यानात पडलं. यानंतरही अगदी शेवटपर्यंत ते राष्ट्रवाद बैठकीच्या व्याख्यानांना हजर असत आणि प्रश्नोत्तरांच्या वेळी अनेक प्रश्न विचारून वक्त्याला व बरेचदा श्रोत्यांनाही अडचणीत आणीत असत.

आमचा दुसरा संबंध Pakistan - India Peoples Forum for Peace and Democracy या संस्थेत आला. आम्ही दोघेही PIPFPD चे सभासद होतो. त्या व्यासपीठावर आमच्या मासिक सभांतून त्यांचे खूप मतभेद होत. PIPFPD ची लिखित धोरणं, कार्यक्रम आणि मासिक सभा आणि वर्षांतून होणारे कार्यक्रम याचा तसा ताळमेळ असेच असं नाही. 'रापं' निर्भीडपणे आपले मतभेद मांडत असत. विशेषतः पाकिस्तानात लोकशाही आली तरी त्यांचा भारतद्वेष कमी होणार नाही असं ते स्पष्टपणे मांडत. उदाहरण म्हणून ते भुट्टो प्रधानमंत्री असताना त्यांनी केलेली भाषणं सांगत. भारताविरुद्ध १००० वर्ष लढाई लढण्याच्या घोषणांना प्रचंड टाळ्या पडत. या टाळ्या पाकिस्तानी 'अवाम'चं खरं मत उघड करीत. PIPFPD च्या सभांतून पाकिस्तानात जाऊन आलेले

मंडळीजण, तिथे आपलं कसं स्वागत झालं याचं कौतुकाने वर्णन करीत, तेव्हा 'रापं' त्यांना आपल्या वैयक्तिक अनुभवांतून भोळेभाबडे निष्कर्ष काढू नका, असं बजावीत. PIPFPD च्या सभांतून व कार्यक्रमांतून भारतातील हिंदू-मुसलमान प्रश्नावर चर्चा होऊ नये, असं त्यांचं मत होतं. हा फोरम पाकिस्तान-इंडिया प्रश्नांसाठी आहे, भारतातील हिंदू-मुसलमान प्रश्नासाठी नाही, असं ते स्पष्ट सांगत.

कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करून आपली मतं निर्भीडपणे मांडणाऱ्यांवर एकटे पडण्याची आणि अनुल्लेखाची जी शिक्षा भोगण्याचे प्रसंग येतात. त्याला 'रापं' पण अपवाद नव्हते. मी अशा अनेक सभांना उपस्थित होतो की जेथे व्यासपीठावरच्या ४-५ वक्त्यांच्या व्याख्यानात 'रापं'च व्याख्यान व मांडणी सर्वोत्कृष्ट असायची. पण दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात त्यांचं जेमतेम नाव यायचं, इतरांच्या विस्कळीत भाषणांचा मात्र गोषवारा यायचा.

आमचा तिसरा संबंध श्री. विनय हर्डीकर यांनी दोन वर्षं चालवलेल्या 'चिकित्सा' या अभ्यासगटात आला. तिथे ऑक्टोबर २००७ ला 'रापं'चं radical liberalism (जहाल उदारमतवाद) यावर पांडित्यपूर्ण भाषण झालं. या विषयावर त्यांनी किती मूलभूत विचार केला होता ते पाहून आम्ही सर्वच प्रभावित झालो. फिडल कॅस्ट्रो आणि चे गवेरा यांच्यावर त्यांनी स्वतंत्रपणे बोलावं असं ठरलं. पण हा विचारमंचच बंद पडल्याने त्यांचे या विषयावरचे विचार ऐकायचा योग आला नाही.

'रापं'चा अनेक विषयांवर अभ्यास, स्वतंत्र चिंतन होतं. दुर्दैवाने activism च्या व्यापात त्यांच्याकडून स्वतंत्र ग्रंथनिर्मिती मात्र झाली नाही. पण व्यक्तिशः मला मात्र त्यांचे विचार ऐकण्याची आणि समजून घेण्याची संधी मिळाली.

मी त्यांच्या घरी म्हणजे मठीत अनेक वेळा जात असे. तासन्‌तास अनेक विषयांवर आमची चर्चा व्हायची. याला मी आमचा चौथा सर्वात हृद्य संबंध म्हणेन. त्यांचे लहानपणचे ब्रह्मदेशातील अनुभव, कुमारवयात नथुराम गोडसे, स्वा. सावरकर यांच्याशी त्यांचा आलेला संबंध, हिंदुत्वाविषयी आकर्षण पण गोडसे-आपटेंच्या जिंजर ग्रुपच्या महात्मा गांधींविषयी असणाऱ्या पराकोटीच्या अनादराविषयी घृणा, नंतर मार्क्सचा अभ्यास, मार्क्सवाद-साम्यवाद यांचं साक्षेपी चिंतन आणि संबंधित अनेक विषयांचा व इतिहासाचा व्यासंग या सर्वांची भरभरून माहिती मला अशा चर्चांतून मला मिळाली. त्यांना विशेषतः दामोदर कोसंबींचं विशेष आकर्षण होतं. डी.डी. कोसंबींचे Exasperating Essays हे 'रापं'कडूनच समजावून घ्यावेत. 'रापं'ची मठी ही ज्ञानाची पाणपोईच होती.

'रापं'चा मार्क्सवादाचा सैद्धान्तिक अभ्यास अफाट होता. कित्येक इंग्रजी शब्दांचा मराठी अनुवाद ते वेगळ्या पद्धतीने करीत serf चं भाषांतर 'भूदास' ऐवजी 'अल्पभूधारक गुलामवजा शेतकरी' हे त्यांना जास्त पसंत पडे. bourgeois, proletariat इत्यादी अनेक शब्दांना त्यांचे असे मराठी प्रतिशब्द असत. त्याचा वेगळाच कोश करणं आवश्यक होतं. पण ते राहूनच गेलं. भारताच्या इतिहासाविषयी आमच्या खूप चर्चा होत. तो

इतिहास ते मार्क्सवादी दृष्टिकोनातून नक्कीच मांडत असत. पण अनेक वर्षांपूर्वीपासून भारतात उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम कोणतीतरी सांस्कृतिक, भावनिक एकात्मता होती असं त्यांना वाटे. ते अगदी दूरान्वयानेही हिंदुत्ववादी नव्हते हे आवर्जून सांगणं आवश्यक आहे. पण आमच्या चर्चांतून ते पोथीनिष्ठ मार्क्सवादी-साम्यवादी नव्हते हेही जाणवे.

त्यांचा संबंध मुस्लिम सत्यशोधक मंडळाशीही असे. तिथेही आमच्या भेटी होत. मु. स. मं. लाही त्याची वैचारिक मदत असे. हमीद दलवाईंच्या विचारांशी आजच्या मु. स. मं. ने एकनिष्ठ राहायला हवं, केवळ तलाक एवढाच भारतीय मुसलमानांपुढचा प्रश्न नाही, हिंदूंसह भारतीय एकात्मता हा वेगळा प्रश्न आहे याची ते स्पष्ट जाणीव देत. स्वावलंबन, तिळगूळ समारंभ अशा कॉस्मॅटिक उपायांवर त्यांचा विश्वास नव्हता.

सप्टेंबर २००९ मध्ये राजाराणी ट्रॅव्हल्सने म्यानमारची conducted tour काढली होती. मी जायचं ठरवलं आणि 'रापं'ना येण्याविषयी आग्रह केला. कारण 'रापं'च बालपण १९३० ते १९४४ पर्यंत रंगूनला गेलं. त्यांचं ते राहतं घर अजूनही आहे, असं 'रापं' सांगत. ते या सहलीला येऊ शकले नाहीत. पण त्यांचे धाकटे बंधू श्री.शरद नेने (तेही रंगूनला होते) सहलीला त्या घराचा पत्ता, फोटो वगैरे घेऊन आले होते. राजाराणीच्या व सहप्रवाशांच्या सहकार्यामुळे ते घर शोधण्यात यश आले. वास्तविक दगडमाती किंवा वास्तूंमध्ये तसं काय असतं? पण ज्या घरात 'रापं' लहानाचे मोठे झाले, त्यांच्या वडिलांनी त्यांना ICS करण्याच्या उद्देशाने protestent school मध्ये रंगूनलाच शिकायला पाठवलं या सर्व आठवणी, ती वास्तू पाहताना जागृत झाल्या आणि ते घर पाहण्याचं भाग्य मला लाभलं याचा आनंद झाला.

रापं 'अजातशत्रू' हा गुण कधीच मानीत नसत. पण त्यांच्या स्वतंत्र विचारांमुळे जरी त्यांनी शत्रू निर्माण केले नाहीत तरी ते कोणत्याच 'कळपा'त नांदू, वाढू शकले नाहीत. पण स्वतंत्र प्रज्ञावान, थोर विचारवंत अशीच त्यांची आठवण मात्र कायम राहील.

अशा या विद्वान, निरहंकारी, आत्मतृप्त, कोणत्याच विषयाला अस्पृश्य न मानणाऱ्या विद्वान व्यक्तीशी व्यक्तिगत मैत्री जुळण्याचा योग आला हे माझं सद्‌भाग्यच समजतो. अशा मित्राला ही भावपूर्ण श्रद्धांजली!

❑

एक निर्मळ, नीरव स्रोत

विद्या बाळ

माझी मुलं लहान असताना त्यांच्यासाठी, रंगीत चित्रांची, मोठ्या अक्षरांची आणि परवडणाऱ्या किंमतीची सुंदर पुस्तकं घेण्यासाठी, मी पुण्यातल्या पीपल्स् बुक हाऊसमध्ये जात असे. त्या दुकानात, बहुधा रा.प. नेने दिसत. मी त्यांना अशी ४०/४२ वर्षांपासून बघत, ओळखत होते. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी, मी नव्यानेच छोट्या स्वरूपात सामाजिक कामात शिरले. तेव्हापासून अनेक सार्वजनिक सभांमध्ये, कार्यकर्त्यांबरोबरच्या गटांमध्ये बघूनबघून नेन्यांना मी दुरूनच पण अधिक ओळखायला लागले. त्यानंतर पी.यू.सी.एल.च्या बैठकामंध्ये ते भेटायला लागले. या बैठका डॉ.सत्यरंजन साठे किंवा ताहेरभाई पूनावालांकडे होत असत. गेल्या १५/२० वर्षांत, 'मिळून साऱ्याजणी'च्या माध्यमातून लेखक म्हणूनही त्यांच्याबरोबरची देवघेव सुरू झाली होती आणि २००३ सालापासून, तर 'निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'चे ते ट्रस्टी म्हणून 'साऱ्याजणी'च्या परिवारात सहभागी झाले होते. तेव्हापासून मात्र, त्यांच्याबरोबरच्या नियमित भेटीगाठी आणि चर्चा यांमधून नेनेंच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू अधिकाधिक ओळखीचे झाले.

त्यांच्या निधनानंतर झालेल्या शोकसभेत बोलणाऱ्या (आणि काही न बोललेल्याही) अनेकांकडून मला प्रथमच त्यांच्या भोवतीच्या, तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंतच्या आणि विविध चळवळीतल्या माणसांच्या गोतावळ्याचा आवाका समजून आला. तसे ते एकटेच राहत होते पण त्यांच्याभोवती असण्यातून खूप काही मिळवणाऱ्यांचं एक छानसं कुटुंब त्यांच्याभोवती होतं.

त्यांच्याजवळ एक वेगळीच लढाऊ वृत्तीही होती. सरकारी किंवा खासगीही ऑफिसात, कुणावर अन्याय झाला असेल आणि नेन्यांना त्याची खात्री पटली असेल, तर सर्व शक्तीनिशी त्याच्या निवारणार्थ ते उभे राहात. त्यासाठी आवश्यक बारकाव्यांचा आणि नियमांचा ते अभ्यास करत आणि त्या प्रकरणाची तड लावत. त्यासाठी स्वत:ची पाठदुखी विसरून किंवा दूर ठेवून, रिक्षासारखं त्रासदायक वाहन वापरून, पदरमोड करून ते कुठेकुठे जात असत. अशाच एका प्रकरणात, त्यांच्याबरोबर वडगाव शेरीला

जाण्याचा मी स्वत:च अनुभव घेतला आहे. पोस्टखातं, रिक्षाप्रवास यासारख्या संदर्भातील तक्रारींसाठी ते नुसती कुरकूर करत नसत. त्याही साठी पत्र पाठवणे, फोन करून रिक्षानंबर कळवणे असा ते पाठपुरावा करत. कधीकधी तर असा पाठपुरावा करून, नियम दाखवून देत, त्या त्या खात्यातल्या अधिकाऱ्यांनाही चकित करून टाकत असत.

पाठीच्या कण्याचा खूप वर्षांचा त्रास सोसत, त्याविषयी फारसं काहीच न बोलता, नेने कितीतरी आंदोलनांत, मोर्चांमध्ये सहभागी होत असत. पुण्यामधल्या नर्मदा समर्थन गटाच्या रस्त्यावरच्या धरण्यांमध्ये मी त्यांना बघितलं आहे. प्रत्यक्ष नर्मदेच्या खोऱ्यापर्यंतचा कष्टप्रद प्रवास करून, आदिवासींच्या शिबिरातला, सभांमधला त्यांचा सहभागही मी पाहिला आहे. मेधा पाटकरांच्या सर्व ध्येयधोरणांबाबत त्यांचं एकमत नव्हतं. तरीसुद्धा सहमतीच्या मुद्यांवर ते नेहमीच पाठिंबा देत असत. एकदा मेधा आणि तिच्या बरोबरच्या कार्यकर्त्यांनी अहिंसक सत्याग्रह केला असतानाही, त्या साऱ्यांना मारहाण झाल्याचं समजलं, तेव्हा त्यावेळचे मंत्री गोपीनाथ मुंडे यांना निवेदन देण्यासाठी नेनेंबरोबर सर्किट हाऊसवर गेल्याचं मला लख्ख आठवतं आहे.

एकदा, माझ्यावरच्या एका वृत्तपत्रीय लेखनातील अन्यायाच्या संदर्भात मी प्रेस कौन्सिलकडे तक्रार नोंदविली होती. त्यावेळी त्या तक्रारीची दखल घेत, प्रेस कौन्सिलने नागपूरला बोलावलं होतं. त्यावेळी नेने माझ्याबरोबर नागपूरला आले. त्यांनी केलेली मांडणी ऐकून प्रेस कौन्सिलने, अनिल थत्ते या पत्रकाराला माफी मागायला लावली आणि ती वृत्तपत्रात प्रसिद्धही करण्यात आली होती. या घटनेच्या संदर्भात नेन्यांची मला कृतज्ञतापूर्वक आठवण नोंदवावीशी वाटते आहे.

आपल्या जवळच्या माहितीची नोंद करणाऱ्या नेनेंच्या मेंदूमध्ये एखादा सुपरसंगणक असावा असा अनुभव आहे. एखाद्या चर्चेत, संभाषणात, व्याख्यानात त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्मरणाचा आणि ते उद्‌धृत करण्याचा प्रत्यय अनेकांनी घेतला आहे. नेने लिहायचे कमी आणि त्याबाबत अनेकांना खंत वाटत असे. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त स्नेहीजनांचा मेळावा भरला असताना, कुणीतरी त्यांच्या अल्पलेखनाविषयीची तक्रार प्रेमळपणे नोंदवली आणि त्यांनी लिहावं असं आग्रहपूर्वक आवाहनही केलं. त्यावेळी, मी मात्र या तक्रारीशी सहमत नव्हते. उलट इतरांना हेवा वाटेल एवढं लेखन (सुमारे १५ लेख) त्यांनी 'मिळून साऱ्याजणी'त केलं होतं. या सगळ्यात जागतिक स्त्री सौंदर्यस्पर्धांच्या संदर्भातील सविस्तर लेख अतिशय महत्त्वाचा होता. या स्पर्धांमागचं अर्थकारण आणि सौंदर्यवतींचं शोषण याबाबत त्यांनी आकडेवारीसह मांडणी केली होती. हा लेख कितीतरी लोकांनी झेरॉक्स करून संदर्भासाठी उपयोगात आणल्याचं मला आठवतं.

नेन्यांचा आणखी एक विशेष म्हणजे ते चित्रपटांचे अत्यंत शौकीन होते. चित्रपट महोत्सवात त्यांची नियमित हजेरी असायची. अत्यंत आनंदाने, आवडीने, रसिकपणे

आणि शिवाय चिकित्सकपणे ते चित्रपट बघत. महोत्सवात, कित्येक तास चित्रपट पाहत असताना त्यांना पाठदुखीचाही विसर पडत असावा. आपसात बोलताना, ते स्वतःहून तब्बेतीविषयी फारसं कधीच बोलत नसत. पण एकदा चौकशी केल्यावर समजलं; त्यांनी या पाठदुखीवर अनेक उपचार करूनही ती थांबणारी नाही. त्यांची पाठ सतत दुखत असते हे त्यांनी सांगितलं नसतं, तर कधीच कळलं नसतं, इतके ते त्या वेदनांबाबत निर्विकार दिसत.

रा.प.नेने कसे होते, असा मी विचार करते तेव्हा मला वाटतं की, नेने म्हणजे अशी एक जागा, एक स्पेस होती जिथे कुणीही आपली तक्रार, आपला अभ्यास, आपलं लेखन, आपला वैचारिक गोंधळ घेऊन जाऊ शकत असे. त्या व्यक्तीला नेन्यांकडून मोकळेपणाने आणि सढळ हाताने मदत मिळाल्यामुळे त्याच्या मनात हे ठिकाण पुन:पुन्हा येण्यासाठी नक्की होत असे. विचाराने, पैशाने, कष्टाने काही ना काही मिळणारच अशी ही जागा होती. आणि हे सारं अत्यंत निरपेक्षपणे! एखादा सावली देणारा वृक्ष, त्याभोवती बसण्यासाठीचा ऐसपैस पार. शेजारीच पाणपोईसारखा सतत जलदान करणारा स्रोत - असं नेने नावाचं एक ठिकाण होतं!

❑

रा.प.नेने आणि ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय

सुलभा ब्रह्मे

ब्रह्मे ग्रंथालय

१९६६-६७ साल जागतिक पातळीवर आणि भारतातही विद्रोही वर्ष म्हणूनच गाजले. फ्रान्समध्ये विद्यार्थी, अमेरिकेत कृष्णवंशीय, भारतात नक्षलवादी उठाव. पुण्यातही युक्रांद, पुढे दलित पँथर आणि पिंपरीचिंचवड औद्योगिक क्षेत्रातील कामगार चळवळी वाढत होत्या. या सर्वांना अभ्यासासाठी एक ग्रंथालय आणि विचारमंथनासाठी व्यासपीठ उभे करावे, त्यामध्ये युवक व अन्य अभ्यासू यांनी निर्भीड विचारमंथन करावे आणि त्यातून संवेदनशील, नवसमाज निर्मितीची प्रेरणा असलेला क्रियाशील तरुण निर्माण व्हावा यादृष्टीने स्थलशिल्पी शंकर ब्रह्मे, सुलभा ब्रह्मे आदी कामाला लागले. शंकर ब्रह्मे यांच्या जंगलीमहाराज रस्त्यावरील कॉ. दि.के. बेडेकर यांच्या बंगल्यातील कार्यालयाच्या प्रशस्त जागेत त्यांनी १९६८ साली ग्रंथालय सुरू केले. ब्रह्मे, दि.के.बेडेकर, के.एन.फडके, ध.रा.गाडगीळ, नेने आदींनी त्यांच्या संग्रहातील निवडक पुस्तके ग्रंथालयाला दिली. परंतु १० एप्रिल १९६९ रोजी कामावर असतानाच आकस्मिकपणे शंकर ब्रह्मे यांचे हृदयविकाराने निधन झाले. तेव्हा त्यांचे सहकारी व गोखले अर्थशास्त्र संस्थेतील प्रा.गुहा, राव, कुमुद पोरे, नेने आदींनी 'शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय' या नावे संस्थेची नोंदणी करून ग्रंथालयाच्या कामात भरीव सहभाग घेण्याचे ठरवले.

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाचे नेने हे प्रारंभीपासून क्रियाशील सदस्य व १९७२ पासून कार्यकारी मंडळाचे सदस्य या नात्याने सक्रिय सहभागी होते. ग्रंथालयातर्फे १९७० मार्चमध्ये लेनिन जन्मशताब्दीनिमित्त 'साम्राज्यवाद व राष्ट्रवाद' यावर परिसंवाद, १९७१ साली 'भारतातील दारिद्र्य', 'परकीय भांडवल व औद्योगिक विकास', १९७२ मध्ये 'जुळी मुंबई', १९७३ साली 'दलितांच्या समस्या' व सत्यशोधक समाज शताब्दीनिमित्त सप्टेंबर १९७३ मध्ये दलित व स्त्रियांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चासत्र आदी प्रचलित समस्या व खास प्रसंगी (शताब्दी) अभ्यासपूर्ण परिसंवाद, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासशिबिरे, तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्रे आदी कार्यक्रम

आयोजित करण्यामध्ये नेने यांचा उत्साही सहभाग असे. ऐंशीच्या दशकामध्ये 'राखीव जागा', 'हिंदु-मुस्लिम तणाव', 'महागाई' आदी ज्वलंत प्रश्नांवर परिसंवाद आणि मार्च १९८३ मध्ये मार्क्स शताब्दीनिमित्त मार्क्सवादाच्या चौकटीत शेतकरी, दलित, धर्म, इतिहास, शोषण आदी विषयांवर व्याख्यानसत्र व लोकलढे आणि ऐतिहासिक संक्रमणाविषयक प्रागतिक बोलपट-सत्र असे कार्यक्रम आयोजित करण्यात विशेषत: बोलपटांची निवड यामध्ये नेने यांचे खास योगदान होते. १९८५ साली 'शांतता वर्ष', त्यासंबंधीच्या चर्चा व परिसंवाद यामध्ये 'शांतता' हा प्रश्न नेने यांच्या खास जिव्हाळ्याचा असल्याने नेने यांनी पुढाकार घेतला होता. परिसंवादात सादर केलेले निबंध व खास समस्या यांविषयी ग्रंथालयामार्फत पुस्तिका प्रकाशनही केले जाई. त्यामध्ये नेने यांची बहुमोल मदत असे. काही लेखही त्यांनी परिसंवादासाठी सादर केले. परंतु नेने यांचा बहुतेक वेळ इतरांना हरतऱ्हेची मदत, विविध संस्था-संघटनांच्या जबाबदाऱ्या, चर्चा, विविध कार्यक्रमात उपस्थिती, वाचन, संशोधन प्रकल्पाचे काम, पुस्तकाचे दुकान आदी कार्यांमध्ये गुंतला जात असल्याने, त्यांचा अभ्यास व अनुभव लक्षात घेता त्यांनी केलेल्या लिखाणाचा मात्र मर्यादितच ठेवा उपलब्ध आहे.

लोकशाही हक्क संरक्षण समिती

१९६६-६७ नंतर भारतातील आर्थिक अरिष्ट व राजकीय अस्थिरता वाढत गेली त्याबरोबर शासनाचे लोकचळवळींवरील हल्ले आणि लोकशाही हक्कांची पायमल्ली वाढली. तेव्हा लोकशाही हक्कांवरील वाढत्या अतिक्रमाविरोधात प्रयत्न करण्याच्या दृष्टीने ग्रंथालय सदस्य व अन्य समविचारी यांनी पुणे येथे लोकशाही हक्क संरक्षण समितीची १ जानेवारी १९७४ रोजी स्थापना केली. या कामात नेने विशेष सक्रिय होते. लोकशाही हक्कांवरील अतिक्रमणांची माहिती गोळा करणे, त्यास प्रसिद्धी देणे, त्या प्रश्नी निषेधसभा-चर्चा आयोजित करणे आणि कायदेशीर मदत उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणे अशी समितीची उद्दिष्टे होती. ८ मे १९७४ रोजी सुरू झालेल्या अखिल भारतीय रेल्वे संपाला जाहीर पाठिंबा, ६ जुलै १९७४ रोजी शासनाने वेतन गोठवणुकीचा वटहुकूम काढला त्याला विरोध, जंगल-जमीन हक्कांसाठी चाललेल्या आदिवासी आंदोलनावरील दडपशाहीचा निषेध, बिहार आंदोलकांवरील जुलुमजबरदस्तीचा निषेध, राजकीय बंदीची, फाशीची शिक्षा रद्द करून घेण्यासाठी प्रयत्न, बजाज ऑटोमधील आंदोलकांवरील गोळीबारात एक कामगार ठार झाला, त्याचा चौकशी समितीद्वारा वस्तुस्थितीदर्शक अहवाल व कामगारांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न आदी उपक्रमांमध्ये नेने यांनी महत्त्वाची जबाबदारी उचलली. परंतु जून १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर झाल्याने लोकशाही हक्काबाबत जाहीर कामाची शक्यता संपली.

'बायजा' द्वैमासिकाची सुरुवात

लोकशाही हक्क चळवळीबरोबर व वर्गीय चळवळीबरोबर महिला चळवळीची सांगड घालण्याच्या दृष्टीने १९७४ साली ग्रंथालय सदस्य व अन्य पुरोगामी स्त्री कार्यकर्त्या यांनी पुरोगामी स्त्री संघटना स्थापन केली. १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्या निमित्ताने १९७५ साली ऑक्टोबरमध्ये पुणे येथे आदिवासी, दलित, श्रमिक, कामगार, शेतकरी व नोकरदार महिलांची महाराष्ट्रव्यापी परिषद मुंबई-पुणे येथील कार्यकर्त्यांनी आयोजित केली. स्त्री समस्यांचे व्यापक सामाजिक, आर्थिक संदर्भात शास्त्रीय विश्लेषण, स्त्री मुक्तीचा प्रश्न मानवमुक्तीच्या प्रश्नाशी सांधणे यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पुणे-मुंबई येथील कार्यकर्त्यांनी १९७७ सालापासून 'बायजा' हे द्वैमासिक सुरू केले. त्यामध्येही प्रारंभापासून लिखाणाद्वारे नेने यांचे सहकार्य होते.

'खाऊजा' धोरण विरोध

१९९१ सालापासून भारत सरकारने नियोजन-नियमन मोडीत काढून खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे बेबंद अर्थव्यवहाराचे धोरण स्वीकारले. तेव्हापासून या धोरणामागील हितसंबंध व त्याचे परिणाम याचे वस्तुनिष्ठ विवेचन; वा त्या विरोधातील चळवळीमध्ये नेने व अन्य ग्रंथालय सदस्य यांचा सक्रिय सहभाग होता. काळ्या यादीतील एन्रॉन कंपनीचा वीजप्रकल्प किती महागडा आणि देश बुडवा आहे याचे शास्त्रीय विश्लेषण उपलब्ध करून एन्रॉनविरोधी चळवळीला वैचारिक बैठक पुरवणे व ती चळवळ महाराष्ट्रभर पसरवणे यासाठी ग्रंथालय सदस्यांनी परिश्रम घेतले. त्यात नेनेंचा सहभाग लक्षणीय होता.

१९९२ साली बाबरी मशीद जमीनदोस्त केल्यानंतर देशभर उसळलेल्या धार्मिक हिंसाचारापासून २००२ मध्ये गुजराथमधील मुस्लिम संहारापर्यंत हिंदुत्ववादी सत्ताकारणाने उभ्या केलेल्या अत्यंत धोकादायक संकटाशी मुकाबला करण्याच्या दृष्टीने वैचारिक अधिष्ठान, लोकसंवाद, कृतिकार्यक्रम यामधील ग्रंथालयाच्या सहभागात नेने यांचा खास पुढाकार होता. अशा तऱ्हेने ग्रंथालयाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व क्षेत्रांमधील महाराष्ट्र-भारत-जागतिक स्तरांवरील समस्या व झगड्यांमध्ये नेने ४० वर्षे कार्यरत होते.

❑

तपशील वगळून आठवलेले नेने...

चित्रा बेडेकर

नेने गेल्यावर मला सर्वात प्रथम आठवलं ते आइस्पो संघटनेचं नाव. ऑल इंडिया पीस अॅन्ड सॉलिडॅरिटी ऑर्गनायझेशन (AIPSO). कारण नेन्यांचा आणि माझा आमने-सामने भेटसंबंध प्रथम त्या कामामुळेच आला होता. एखाद्या संघटनेच्या इतकं 'आत' जाऊन काम करण्याचा तो माझा पहिलाच (आणि शेवटचासुद्धा!) अनुभव होता आणि तो योग केवळ नेनेंमुळेच घडून आला होता.

संरक्षणखात्यात शस्त्रास्त्रांच्या प्रकल्पांवर काम करताना एकीकडे स्फोटकांचे चक्रावून टाकणारे विस्मयजनक गुणधर्म आणि दुसरीकडे युद्धात माणसं मारण्याचं पद्धतशीर तंत्र या कात्रीत मी अडकले होते. दि.के. व सुधीर बेडेकरांच्या वास्तूतल्या सामाजिक-राजकीय वातावरणाचा मोह पडून अखेर वैज्ञानिक अधिकारीपदाचा राजीनामा देऊन काठाकाठाने चळवळीसोबत चालत राहण्याचा मी निर्णय घेतला. पण लेखणी सरसावून पुन्हा अण्वस्त्रांच्या कचाट्यात मी सापडले. या वेळी मात्र अण्वस्त्रविरोधासाठी.

सुरुवातीला राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये वावरताना बुजल्यासारखं वाटायचं. पण 'तात्पर्य' किंवा इतर दैनिकात, मासिकात त्या विषयावर लिहीत होते. नेने त्यांच्या सवयीनुसार ते सर्व वाचत असावेत. तोपर्यंत तसा प्रत्यक्ष बोलण्याचा, चर्चा वगैरे करण्याचा योग कधी आला नव्हता आणि एक दिवस अचानक नेन्यांनी बॉंबगोळा टाकला. 'आइप्सो'च्या कामात सहभागी होण्याचा माझ्यापुढे प्रस्ताव मांडला!

''छे हो, मला कसं जमेल? मी कधी असं कुठल्या संघटनेत काम केलेलं नाही.'' अशी माझी नकारात्मक चुळबुळ सुरू झाल्यावर नेने त्यांच्या स्वाभाविक सवयीनुसार रोखठोकपणे बोलले, ''अहो जमणार नाही कसं म्हणता? अण्वस्त्रांवर इतका अभ्यास केलात, अण्वस्त्रस्पर्धेवर पुस्तिका लिहिलीत, ठिकठिकाणी लेख लिहिताय आणि जमणार नाही काय म्हणताय?'' आणि त्याच, अगदी त्याच क्षणी मला जाणवलं की नेनेंच्या आग्रहाला विरोध करणं हे अण्वस्त्रस्पर्धेला विरोध करण्यापेक्षाही अवघड आहे.

कधीही, कुठेही मला भाषण देण्याचा आग्रह करू नका या अटीवर अखेर माझ्यात आणि नेनेंमध्ये तह झाला. कोणत्याही चर्चेच्या वेळी तोंड न उघडता निमूटपणे कागद-पेनाच्या आधाराने मी मनापासून 'आइप्सो'च्या कामात सहभागी झाले. विज्ञान चळवळीतल्या किंवा इतर डाव्या पुरोगामी चळवळीतल्या सर्वांशी माझी बऱ्यापैकी ओळख होती. शिवाय 'आइप्सो'च्या कामामुळे, नेनेंमुळे विशेषकरून सी. पी. आय. मधल्या काही ज्येष्ठ मंडळींशी माझी ओळख झाली.

'आइप्सो'मुळे आणखी एक घडलं; दुरून ऐकलेले आणि दुरून पाहिलेले कुणीतरी 'रा. प. नेने' मला चक्क वडिलधारे नेने वाटू लागले. म्हणजे कसं? राजकारणातले किंवा चळवळीतले आपण लिंबूटिंबू असूनही तसं कधी जाणवू न देता नेने आपल्याला इतरांसारखंच वागवतात, सर्वांसोबत सामावून घेतात याचा अनुभव आला. त्यामुळे सुरुवातीच्या नकारात्मक चुळबुळीकडून मी सकारात्मक सहभागापर्यंत मजल मारू शकले.

पण एकदा मात्र नेनेंनी आमच्यातल्या तहाचा भंग केला. 'आइप्सो'तर्फे पुण्यात युद्धविरोधी लघुपटांचं आयोजन केलं होतं. मी नुकताच फिल्म इन्स्टिट्यूटचा दोन महिन्यांचा चित्रपट रसग्रहणवर्ग पूर्ण केला होता. त्यामुळे सुरुवातीला त्या लघुपटांची मी ओळख करून द्यावी असा काहींनी आग्रह धरला. नेने शिताफीने तेथून निसटले. मिश्किलपणे हसत, डोळे बारीक करून दुरून सर्व गंमत बघत राहिले आणि मला चक्क स्टेजवर जाऊन लघुपटांविषयी बोलावं लागलं!

'आइप्सो'च्या बंगलोरच्या अधिवेशनाला आम्ही पुण्यातले काहीजण इथून एकत्र गेलो होतो. त्यावेळी राजकीय विषयांपलीकडच्या नेन्यांची थोड्याफार प्रमाणात व्यक्ती म्हणून ओळख झाली. प्रवासात नेने काही खात नाहीत, फार तर चहा-बिस्किटं घेतात हे त्यावेळी समजलं. एरवीसुद्धा नेने फक्त एकदाच जेवतात हेसुद्धा समजलं! माझ्यासारख्या 'चराऊ' व्यक्तीला या बातम्या हलकेसे धक्के देणाऱ्याच होत्या.

बंगलोरला आमची सर्वांची जिथे उतरायची सोय केली होती तिथे दुसऱ्या दिवशी नेनेंच्या खोलीबाहेरच्या दोरीवर भल्या सकाळीच स्वच्छ धुतलेले, झटकून एकही चुणी पडू न देता वाळत घातलेले कपडे दिसले. त्यांची शिस्त आणि वक्तशीरपणा अधिवेशनाच्या निमित्ताने पुढचे तीन-चार दिवस बऱ्यापैकी जाणवत राहिला होता.

'आइप्सो'च्या कामाच्या संदर्भात पुढे वर्षभर काही ना काही कार्यक्रम होत राहिले होते. पण एक दणकेबाज प्रसंग मात्र कायमचा माझ्या स्मरणात राहिला. त्यातले तपशील आता आठवत नाहीत. मनात सारखं येत राहातं की नेनेंना हा सर्व तपशील या क्षणी आठवला असता. आयुष्यात जेव्हा जेव्हा तपशीलांची गरज वाटते तेव्हा साक्षात नेनेच आठवतात. सध्याच्या भाषेत फार तर असं म्हणता येईल की 'तपशील' हा नेनेंचा 'युनिक आयडेंटिफिकेशन कोड' होता.

तो दणकेबाज प्रसंग म्हणजे लग्नमंडपात वरपक्ष आणि वधूपक्ष यांच्यात

मानपानावरून जे खटके उडत असतात त्याचाच रिमेक वाटावा असा होता. 'आइप्सो'च्या कामातल्या लेखी जबाबदाऱ्या बऱ्याचदा मी पार पाडत होते. त्यामुळेच बहुधा विनायकराव भावे माझ्यावर नाराज होते. आमंत्रण-निमंत्रणाचा काहीतरी किरकोळ मुद्दा असावा. पण विनायकरावांना डावलल्यासारखं त्यावेळी वाटलं होतं. त्या मुद्यावरच आगडबंब देहाच्या विनायकरावांचा गडगडाट आणि प्रत्येक गोष्ट ठणकावून सांगणाऱ्या नेनेंचा ठणठणाट या जुगलबंदीत माझी अगदीच केविलवाणी अवस्था झाली होती.

विनायकराव तिथून गेल्यानंतर माझा पडलेला चेहरा पाहून नेने मात्र म्हणाले, ''जाऊ द्या हो, इतकं काय मनावर घेता तुम्ही? तुम्ही फक्त माझ्या सांगण्यानुसार कार्यवाही केलीत. त्यात तुमचा काय दोष?''

'आइप्सो'नंतर एक झालं, जगात इतर कुठे युद्ध सुरू झालं की नेन्यांचा एखादा फोन हमखास यायचा. त्यांच्या परदेशस्थ मित्रपरिवाराकडून त्यांना मिळालेला एखादा महत्त्वाचा लेख झेरॉक्स करून ते मला पाठवायचे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात झालेल्या अनेक छोट्यामोठ्या युद्धांचा तपशील असणारं एक पुस्तकसुद्धा त्यांनी एकदा माझ्याकडे पाठवलं होतं.

हे सर्व लक्षात घेता माझे आणि नेनेंचे युद्धपातळीवर घनिष्ठ संबंध होते असं गंमतीने म्हणायला हरकत नसावी.

❑

एक व्यासंगी विवेकवादी...

श्रीपाल कुं. ललवाणी

बुद्धिप्रामाण्यवादी मंचाचे काम करत असताना श्री. रा. प. नेने यांचा परिचय झाला आणि अनेक वर्षे त्यांच्याशी कायम संपर्क राहिला. सर्वप्रथम मी भारावून गेलो ते त्यांच्या वक्तृत्वाने. इतर वेळी मितभाषी वाटणारे नेने सभेत बोलावयास उभे राहिले की त्यांची वाणी नदीच्या प्रवाहासारखी अव्याहत वाहत असे. अस्खलित वक्तृत्व, शब्दांवर असणारे हुकुमी प्रभुत्व, विषयाची अतिशय मुद्देसूद व सखोल मांडणी, आपल्या मुद्याच्या पुष्टर्थ दिलेले विविध संदर्भ यामुळे श्रोते अगदी प्रभावित होऊन जात. त्यांचे भाषण ऐकणे ही एक खास बौद्धिक मेजवानीच असे!

'बुद्धिप्रामाण्यवादी मंचा'चे आम्ही काही सभासद आठवड्यातून एकदा एकत्र जमत असू. त्यावेळी होणाऱ्या वेगवेगळ्या विषयांवरील चर्चेत नेने यांचा सहभाग लक्षणीय असे. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा प्रतिवाद करणे सहसा कोणाला जमत नसे. आपले म्हणणे बिनतोड मांडण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते.

'इझनॉटीस्ट' या शब्दाचा अर्थ 'विवेकप्रामाण्यवादी' असा ते करत. बुद्धिप्रामाण्यवादी मंचाचे नाव 'विवेकप्रामाण्यवादी मंच' असे असावे असे प्रतिपादन त्यांनी केले होते, परंतु बहुमताचा कल त्यांनी मान्य केला. आपल्या मुद्यावर ते अडून राहिले नाहीत. बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे फक्त बुवाबाजी किंवा अंधश्रद्धांना विरोध करणे एवढेच नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विवेकाने निर्णय घेणे म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद असे ते सांगत. मंचाचे अध्यक्ष असताना लोकशाही उत्सवादरम्यान दर वर्षी मंचातर्फे एक व्याख्यान आयोजित केले जाई. लोकशाही, शिक्षण, स्त्रीविषयक कायदे, स्त्रीमुक्ती अशा वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्याकडे नेनेंचा कटाक्ष असे.

नेनेंचा आणखी एक गुण म्हणजे काटेकोरपणा. दिलेला शब्द आणि वेळ पाळण्यात ते अत्यंत दक्ष असत. तशीच अपेक्षा ते दुसऱ्याकडूनही करत आणि दुसरा तसे न वागल्यास ते नाराज होत. शेवटच्या आजारपणात ते लक्ष्मी रोडवरील दुकानदारांना काही प्रश्नांबाबत मार्गदर्शन करीत होते. औंधला राहावयास जावे लागल्यानंतरही ते

दुकानदारांना फोन करून काय करावयास पाहिजे ते सांगत. परंतु त्या दुकानदारांनी सांगितलेल्या वेळेला फोन न केल्यास ते अस्वस्थ होत. २०१० च्या जानेवारीतील 'लोकशाही उत्सवा'त आजारपणामुळे ते सहभागी होऊ शकले नाहीत. त्यावेळी ते हॉस्पिटलला होते पण त्यांचे मन मात्र कार्यक्रमाकडेच असे. कार्यक्रम झाल्यानंतर कार्यक्रम कसा झाला हे मी त्यांना फोनवरून सांगत असे. फोनची ते आतुरतेने वाट पाहात असत. कार्यक्रम चांगला झाल्याचे कळल्यावर त्यांना वेगळेच समाधान लाभत असे.

जवळच्या नातेवाईकांच्या विवाहादी कार्यक्रमात होणाऱ्या धार्मिक कर्मकाण्डांना स्पष्टीकरणासहित विरोध करणे, नेने कुळाच्या संमेलनात सहभागी होण्यास नकार देणे अशा गोष्टी ते निग्रहाने करत. बुद्धिप्रामाण्यवादाचा स्वीकार केल्यावर ते कोणत्याही धार्मिक कर्मकाण्डात सहभागी झाले नाहीत. स्वीकारेल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणे हाच नेने यांचा मोठेपणा!

❑

माहितीचा अखंड झरा!

हनुमंत गवळी

माझी आणि नेने यांची ओळख झाली ती दिवेकरांच्या माडीवर जिथे 'महात्मा फुले प्रतिष्ठान' आणि 'विषमता निर्मूलन समिती'चे काम चालायचे. डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या या कामात अनेक कार्यकर्ते भाग घ्यायचे. त्यात विलास वाघ, सय्यदभाई, बापू विरूळे, दत्ता काळेबेरे, किसन बनकर, विनायकराव कुलकर्णी, रायकर, शांताराम दिवेकर, काका पायगुडे अशा अनेक कार्यकर्त्यांची दर सोमवारी हजेरी लागत असे. नेने चर्चेत जेव्हा भाग घेत, तेव्हा विविध विषयांवरील त्यांच्या वाचनाचं दर्शन आम्हाला घडत असे. त्यांच्या या वाचनाच्या व्यासंगामुळे मी नेहमीच चर्चा करण्यासाठी त्यांच्याकडे जात असे. मार्क्स, गांधी, भारतीय स्वातंत्र्य चळवळ, अगर कोणत्याही महायुद्धाचा तपशील असो, नेनेंचं ज्ञान अगदी अद्ययावत असायचं. त्यांच्याशी गप्पा मारण्यात तासन्तास कधी जायचे कळायचे नाही.

नेनेंचा नुसता वाचनाचाच व्यासंग असायचा असे नव्हे तर, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामातसुद्धा त्यांना रूची होती. तीस वर्षांपूर्वीची गोष्ट. पुरंदर तालुक्यातील कानिफनाथाचं मंदिर (दर्गा). मंदिराला अगदी छोटे म्हणजे २' X २' चे छोटे प्रवेशद्वार. कुठलाही जाड माणूस त्या दरवाज्यातून जातो अशी श्रद्धा. किर्लोस्कर न्यूमॅटिकमध्ये काम करीत असताना कामगारांमध्ये नेहमीच अशी चर्चा. ही गोष्ट मी सोमवारी भरणाऱ्या मीटिंगमध्ये मांडली. मी, दत्ता काळेबेरे आणि नेने, तिघेजण कानिफनाथच्या टेकडीवर गेलो. प्रथम प्रवेशद्वाराचे निरीक्षण केले. मी आणि दत्ता आतमध्ये गेलो (देवाकडे डोके करून) जाताना शरीर थोडे तिरके केले की मधल्या अंतरामुळे आत येते. ही वस्तुस्थिती. येताना मात्र आमचे पाय देवाकडे होते. देवाकडे पाय करून परत आल्यास रक्ताच्या गुळण्या होतात अशी अंधश्रद्धा. परंतु आम्हाला काहीही झाले नाही. नेने यांनी धीर दिला होताच. आम्ही सुखरूप पोहचलो.

❑

समाजवादी प्रबोधनकर्ते

डॉ. अशोक चौसाळकर

समाजवादी प्रबोधिनीशी श्री.रा.प.नेने यांचा जवळचा संबंध होता. सुरवातीच्या काळात प्रबोधिनीच्या वैचारिक मांडणीत प्रा.गं.बा.सरदार यांच्याबरोबरच नेने यांचे महत्त्वाचे योगदान होते. प्रबोधिनीच्या विविध कार्यक्रमात ते आनंदाने सहभागी होत व योगदानही करत. प्रबोधिनीच्या कामातले सातत्य व त्यात कार्यरत असणारे ग्रामीण भागातील कार्यकर्ते याचे त्यांना कौतुक वाटत असे. नव्या संदर्भात समाजवादाची मांडणी कशी करायची हा प्रश्न त्यांना सतावत होता.

प्रा.कोसंबी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठात डॉ.कोसंबी यांच्यावर झालेल्या कार्यशाळेत त्यांनी महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करून मोलाचे योगदान केले. नेने स्वत:ला समाजाशी जोडून घेणारे विचारवंत होते. त्यांच्या स्वभावात वैयक्तिक स्वार्थाचा वा महत्त्वाकांक्षेचा लवलेशही नव्हता. ज्ञानार्जन, अर्जित ज्ञानाचे नव्या अभ्यासकात वितरण व डाव्या चळवळीचे वैचारिकीकरण, पुनर्भरण हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. आयुष्यभर हे काम ते सातत्याने करत राहिले!

(प्रबोधन प्रकाशन ज्योती, एप्रिल २०१० मधील लेखातील निवडक भाग)

❑

समृद्ध व्यासंगाचा नैष्ठिक विचारवंत

किशोर बेडकिहाळ

श्री.रा.प.नेने यांचा व माझा परिचय सुमारे ३०/३१ वर्षांपूर्वी पुण्यातील हमाल भवनात (मार्च ७७) विषमता निर्मूलन शिबिराच्या निमित्ताने झाला व नंतर तो उत्तरोत्तर अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने दृढ होत गेला. या सर्व काळात नेन्यांच्या व्यासंगाने थक्क व्हायला व्हायचे. राजीव गांधी लोंगोवाल करारानंतर आम्ही साताऱ्याला नेने यांना पंजाब प्रश्नावर बोलण्यास निमंत्रित केले होते. त्यांनी त्यावेळी पंजाबचा संपूर्ण इतिहास, विविध पक्षांच्या-गटांच्या भूमिका, स्वातंत्र्यचळवळीतील घडामोडी, फाळणी याचा इतका सविस्तर ऊहापोह (व तोही आकडेवारीसह) केला, की कार्यकर्ते अगदी खूश झाले. हे करत असताना कोणताही अभिनिवेश त्यांच्यापाशी नव्हता. वैचारिकदृष्ट्या कार्यकर्ता घडवण्यासाठी लागणारी तटस्थता त्यांच्या ठायी पुरेपूर होती. त्याच वेळी स्वत:च्या वैचारिक भूमिकेवरही ते ठाम असत. पुरावे, आकडेवारी त्यांच्या अगदी जीभेवर नाचत असे. त्यांची अभिव्यक्तीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वासारखीच साधी पण नेटकी होती. आखीव-रेखीव मांडणी कशी करावी याचा वस्तुपाठ म्हणजे नेने असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कोणताही विषय मांडताना नेने आपली शैली बदलत नसत. अतिशय शांतपणे ते मुद्यामागून मुद्दे मांडत जायचे. ऐकणाऱ्यापुढे त्या विषयाचा पट अलगद उलगडत जायचा व शेवटी संदर्भ संपृक्ततेचा अनुभव यायचा. तुच्छता, उपहास, अकारण विनोद, भोंगळ शब्द, जाता जाता डिवचणे अशा आजच्या वाङ्मयीन दुर्गुणांपासून मुक्त असणारे नेने यांचे व्यक्तिमत्त्व त्यामुळेच आदराला पात्र असे. या आदरातूनच त्यांचा दरारा-धाकही आमच्यासारख्यांना वाटत असे. त्यांची स्मरणशक्तीही तीव्र होती. त्यामुळे कोणत्याही मुद्यावर अचूक संदर्भ देणे हा त्यांच्या हातचा मळ होता.

नेनेंच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचा बाज हा ज्ञानसंपन्न, व्यासंगसमृद्ध व त्याचबरोबर नैतिक व पारदर्शक व्यक्तीचा होता. त्यामुळे चर्चासत्रे, शिबिरे, कार्यशाळा, व्याख्याने यात जिथे जिथे नेने असत तिथे-तिथे गांभीर्य असे. अशी ही 'गंभीर' प्रकृतीची व्यक्ती एकदा 'आपण विवाह का केला नाही' या विषयावर पुण्यात बोलणार होती.

कुतूहल म्हणून नेन्यांचे हे भाषण ऐकायला मी व डॉ. यशवंत सुमंत मुद्दामहून गेलो होतो. आश्चर्य म्हणजे या विषयावरचेही नेन्यांचे भाषण हे गंभीर, मुद्देसूद व तर्कशुद्ध होते.

नेने यांची घडण ज्या कालखंडात झाली तो काळ भारतात तरी खूपच महत्त्वाचा होता. स्वातंत्र्योत्तर भारताच्या पुनर्रचनेचे तत्कालीन विचारविश्व होते व युगधर्म म्हणजे समाजवादाचा मूल्यविचार मान्य झाला होता. भांडवलशाही व साम्राज्यवादविरोधी तत्कालीन पुरोगामी पक्षांची आंदोलने, स्वातंत्र्यलढा, कामगार चळवळ आदींच्या भरभराटीचा हा काळ जसा होता तसाच अव्वल वैचारिकतेचाही हा काळ होता. 'स्टडी सर्कल्स्' ही त्या काळातील महत्त्वाची घडामोड होती. नेन्यांसारखा विचक्षण माणूस यात सामील न होता तरच नवल. तात्कालिक (व नंतरचीही) राजकीय तत्त्वज्ञाने, आंतरराष्ट्रीय राजकीय प्रवाह व राजकारण, भारतीय वास्तव याचे नेन्यांनी 'मार्क्सिस्ट' दृष्टीतून आकलन, अवलोकन केले. (स्थूलपणे) त्यांची हीच दृष्टी पुढेही कायम राहिली. पण हे करत असताना 'ऐतिहासिकतेचा' विसर त्यांना कधीच झाला नाही. भारतातील परिवर्तनाचा लढा केवळ वर्गसंघर्षातून पुढे जाणार नाही तर त्याला वर्ण, जातविरोधी लढ्यांची तसेच हिंदू-मुस्लिम प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीची ठाम जोड हवी, असे त्यांना नेहमीच वाटे. राखीव जागांचा प्रश्न असो की, हिंदू-मुस्लिम दंगलींचा, नेन्यांनी आपली 'मार्क्सिस्ट'दृष्टी राखून या प्रश्नांमागचे राजकारण-अर्थकारण सतत समोर आणले व कार्यकर्त्यांना एक विश्लेषक दृष्टी दिली. त्यांचे लेख, पुस्तिका, भाषणे यांचा परिवर्तनाच्या चळवळीत सातत्याने उपयोग झाला. शत्रुपक्षाच्या मतलबी प्रचाराला आकडेवारी, वस्तुस्थिती व ऐतिहासिकदृष्टी याच्या आधारे दिलेले ते उत्तर ठरले, प्रसंगी हत्यारही ठरले. भारतीय राजकीय नेतृत्वाचे नेनेंचे आकलन ठोकळेबाज नव्हते. विशेषत: नेहरूंबद्दलचे त्यांचे आकलन याची साक्ष होईल. ऐतिहासिक प्रवाहांच्या संदर्भात पुढे जाण्याची दिशा कशी ठरवायची याचे दिग्दर्शन त्यात दिसते. शिवाजी विद्यापीठात मार्च २००५ मध्ये नेहरूंच्या पुस्तकांवरील त्यांची व्याख्याने या दृष्टीने मला अजूनही मार्गदर्शक वाटतात. खरे तर ऐतिहासिक दृष्टीचे अचूक उपयोजन हा त्यांच्या वैचारिकतेचा गाभाच म्हणायला हवा.

कार्यकर्त्यांची छोटी शिबिरे, चर्चासत्रे, विचारवेधसारखी संमेलने, विद्यापीठांच्या कार्यशाळा, राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रे (मराठी-इंग्रजीतील) यात नेने सारख्याच तन्मयतेने सहभागी असत. त्यांची मांडणी आखीव-रेखीव व कालबद्ध असे व इतरांच्या आकलनात भर घालणारी असे. याबरोबरच नेने इतरांना खुलेपणाने दाद देणारेही होते.

मार्च २००९ मध्ये शिवाजी विद्यापीठात पं.नेहरूंच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'वर एक कार्यशाळा डॉ.चौसाळकरांनी आयोजित केली होती. नेने यांचे बीजभाषण अत्यंत संदर्भसंपन्न व उत्कृष्ट झाले. नेहरूंबद्दलच्या मिथकाचा त्यांनी (उदा. पॅरिसहून कपडे

धुवून येण्याची अशा) सहजपणे निचरा केला. याच कार्यशाळेत मी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'तील 'सेक्युलॅरिझम' या विषयावर सुमारे ४५ ते ५० मिनिटे बोललो. त्यावेळी नेने व्यासपीठावर होते. नेन्यांच्या व माझ्या मांडणीत काही मतभेदाचे मुद्दे होते. कार्यशाळेचा समारोप नेन्यांनी केला. आश्चर्य म्हणजे कोणताही ग्रह, पूर्वग्रह न ठेवता नेन्यांनी माझ्या भाषणाची मुक्तकंठाने सुस्ती केली. एवढेच नव्हे, तर 'विचारवेध'चा संघटक म्हणून असलेल्या माझ्या विषयीच्या माहितीचाही त्यांनी सभागृहाला परिचय करून दिला. माझ्या भाषणातील मतभेदांच्या मुद्यांचाही त्यांनी ऊहापोह केला. नेन्यांच्या स्तुतीने मला संकोचल्यासारखे झाले, पण नेन्यांचा आविर्भाव मात्र काही विशेष न केल्याचाच राहिला. कार्यकर्ते, अभ्यासक व विचारवंत या सर्वांशीच नेन्यांचा संबंध आला व तो दीर्घकाळ टिकलाही. या प्रकारच्या संग्रहाला आड येणारा त्यांचा स्वभाव नव्हता. खरेतर ते आपल्या भूमिकेविषयी जेवढे ठाम असत तेवढा आग्रही त्यांचा स्वभाव नव्हता. पुरोगाम्यांकडून अनेक 'वैचारिक'कामे शिस्तीने व्हावीत, चळवळीत एक निकोप बौद्धिक वातावरण असावे ही त्यांची शेवटपर्यंत तळमळ होती.

दि.के.बेडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या समग्र वा निवडक साहित्याचे प्रकाशन व्हावे यासाठी ते शेवटपर्यंत प्रयत्नशील होते. चळवळीतील कार्यकर्त्यांनी 'वाचावे' बौद्धिकदृष्ट्या 'चोख' असावे व त्यांच्या राजकीय-सामाजिक कृतींना या बौद्धिकतेचा आधार असावा या तळमळीतून ते शेवटपर्यंत कार्यरत राहिले. महाराष्ट्राला शरद पाटील, वसंत पळशीकर अशा विद्यापीठबाह्य क्षेत्रातील व्यासंगी विचारवंताची एक कसदार परंपरा आहे. नेने या परंपरेत अतिशय चपखलपणे बसतात. त्यांच्या व्यासंगातून त्यांचा दरारा निर्माण झाला पण या दराऱ्याने त्यांच्या सुसंस्कृतपणावर, ऋजुतेवर कधीच मात केली नाही. म्हणूनच नेने म्हटले की, डोळ्यासमोर उभी राहाते ती, सुसंस्कृत, व्यासंगी, स्नेहशील अशा नैष्ठिक विचारवंताची प्रतिमा. नेन्यांच्या जाण्याने मराठी विचारविश्वाची कोणती आणि किती हानी झाली, हे आता वेगळे सांगावयास नकोच...

❑

अंतर्बाह्य मार्क्सवादी

दत्ता देसाई

रा. प. नेने हे नाव मी पहिल्यांदाच वाचले ते मुंबईत असताना 'तात्पर्य' मासिकाचा अंक हातात पडला तेव्हा, साधारण १९८० मध्ये. आजवरचे आपले समज, विचार आणि दृष्टी उलटेपालटे करणारे हे मासिक आहे तरी काय असे पाहताना संपादकीय पानावर विश्वस्त मंडळात एन्. डी. पाटील, प्रा. गं. बा. सरदार, अ. रा. कामत, प्रा. नलिनी पंडित, बाबुराव बागुल, सुधीर बेडेकर अशा दिग्गज मंडळींबरोबर नंतर नेनेंचे नाव वाचले.

त्यांना प्रत्यक्ष पाहिले ते १९८० मध्ये पुण्यात आल्यावर. शांत आणि 'स्कॉलर' चेहरा, ठेंगणी गोलसर मूर्ती, स्पष्ट स्वच्छ पुणेरी उच्चार, औपचारिक भाषा आणि ठसठशीतपणे मुद्दे मांडण्याची पद्धत. माझ्यासारख्या कोल्हापूर-मुंबईवाल्याला भांबावून टाकणारे प्रकरण. त्यांच्या गंभीर मांडणीचा परिणाम ''हं, ऐकलं ना, आता नीट विचार करा'' असा जणू वैचारिक दम देण्यात होत असे! त्यांची उपस्थिती दिसे कधी लोकविज्ञान संघटनेच्या बैठकीमध्ये, कधी शंकर ब्रह्मे ग्रंथालयाच्या चर्चांमध्ये. 'तात्पर्य'ला धडकून येण्याच्या ओढीमुळे मी जात असे तेव्हा तिथे त्यांच्या बैठकीसाठी आलेले असताना ते एकदोनदा दिसलेले.

सुरुवातीला मी जरा दचकून, बिचकून लांबच. एकतर सामाजिक क्षेत्राची, त्यात वैचारिक क्षेत्राची, त्यात आणखी डाव्या मार्क्सवादी प्रवाहाची नव्यानेच होत असलेली ओळख आणि त्यात पुन्हा नेनेंचे गंभीर, विचारी व्यक्तिमत्व.

हळूहळू त्यांचा परिचय होत गेला, त्यांची टिपणे वाचून, विचार ऐकून. त्यांची 'पीपल्स बुक हाऊस'मध्ये भेट व्हायची. पण अपवाद वगळता तिथे चर्चा कानावर पडण्याचा योग फारसा आला नाही. त्यांची खरी धावपळ आणि कार्यक्रम संघटित करण्यातला सहभाग मला पाहायला मिळाला तो १९८३ मध्ये, मार्क्स स्मृतिशताब्दी व्याख्यानमालांच्या निमित्ताने. पण मी श्रोता, परिघावरचा!

त्याच वर्षी मी समाजविज्ञान अकादमीचे पूर्ण वेळ काम सुरू केले आणि नेनेंशी होणाऱ्या भेटीगाठी, चर्चा वाढत गेल्या; पुढे एकत्र काम करत गेलो आणि तासन्‌तास

चर्चा, अधेमधे वादावादी, प्रेमळ चिमटे आणि त्यांनी माझ्या पीजेंना दाद देण्यापर्यंतचा मोकळेपणा मी अनुभवला. आमच्या वयातले २५ हून अधिक वर्षांचे अंतर आणि मतभेद विचारसरणीत कार्यशैलीत दिसत राहिलेच, पण व्यक्ती म्हणून समान वागणूक ते सतत देत राहिले. ज्येष्ठ म्हणून आधार देत राहिले आणि वेळोवेळी प्रोत्साहनही देत राहिले.

गेल्या ३० वर्षांत एक कार्यकर्ता म्हणून मला नेनेंकडून काय काय मिळाले आणि नेनेंनी सामाजिक क्षेत्राला काय काय दिले याचे वर्णन करायचे झाल्यास मला एक 'आत्मनिवेदनात्मक' नेनेंचे चरित्रच लिहावे लागेल. पण प्रस्तुत ग्रंथातील जागेच्या मर्यादेचे भान ठेवणे आवश्यक आहे. नाहीतर जसे नेनेंना २ मिनिटांच्या कामासाठी आपण फोन केला की मस्त तास-सव्वातास सलग चर्चा व्हायची तसे या लेखाचे व्हायचे! म्हणून हा लेख थोडका ठेवण्याचा प्रयत्न मी करतो!

व्यक्ती आणि समाज : संतुलित दृष्टीचा आग्रह

विद्यार्थीदशेपासून ते ज्यांना भेटले आणि ज्यांच्याबरोबर त्यांनी काम केले असे ज्येष्ठ आणि समकालीन दिग्गज हा त्यांच्या आस्थेचा विषय. या थोर व्यक्तींचे भेट-प्रसंग, त्यांच्या जीवनातील मौलिक घटना आणि विवादस्थळे, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे योगदान, त्यांच्यातील त्रुटी यांचे जिवंत, रंजक, रसपूर्ण आणि संतुलित चित्रण ते बोलता बोलता करत. म. गांधी आणि सावरकर, जागतिक शांतता चळवळीचे नेतृत्व करणारे रोमेशचंद्र पतीपत्नी, साम्यवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते कॉ.डांगे-रणदिवे-अधिकारी, समाजवादी चळवळीतील एसेम्-ना. ग. गोरे, सामाजिक चळवळीतील गं. बा. सरदार, दि. के. बेडेकर, डॉ. बाबा आढाव, धनंजयराव गाडगीळ, ह. कृ. परांजपे, सत्यरंजन साठे, य. दि. फडके यांच्यासारखे अभ्यासक, ज्यांच्याबद्दल त्यांना अतीव आदर होता ते डी. डी. कोसंबी असे सर्वजण या गप्पांमध्ये येत. या व्यक्तींच्या 'बलस्थानाविषयी' (त्यांचाच शब्द) ते आदराने, उत्साहाने बोलत आणि 'शबलस्थानां'विषयी जपून जबाबदारीने. अगदी शरद पवारांसारख्या व्यक्तीविषयी बोलताना नेने आपला संतुलित दृष्टिकोन सोडत नसत. या व्यक्तींविषयी वा त्यांचे स्वतःचे लेखन नेनेंनी वाचलेले असे आणि या व्यक्तींना ते सामाजिक-ऐतिहासिक संदर्भात 'बघत', त्यांच्या दृष्टिकोनातील शास्त्रीयता आणि वस्तुनिष्ठता त्यातून पुनःपुन्हा दिसून येई. अर्थात थोर व्यक्ती या सामाजिक प्रवाहाचे व प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात आणि इतिहास व्यक्तींना 'थोर' घडवतो हे त्यात अभिप्रेत असे. पण त्या त्या कालखंडात त्या व्यक्तीचा 'व्यक्ती'पणा हा यांत्रिकपणे सामूहिकतेतून आलेला नसतो तर त्या व्यक्तीची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका हा 'व्यक्तिनिष्ठ' (subjective) घटकही अत्यंत महत्त्वाचा असतो यावर ते भर देत. म. फुले, लोकहितवादींपासून महाराष्ट्राची प्रबोधनाची सामाजिक कार्याची परंपरा असो वा संतांचे योगदान असो, नेनेंनी कोणाचेही

गौरवीकरण केले नाही आणि त्यांचे मोठेपण सांगताना हातचे राखून ते काही कधी बोलले नाहीत. व्यक्ती, समाज आणि इतिहास यांच्यातल्या द्वंद्वात्मक नात्यांवर भर देण्याचा त्यांचा आटापिटा असे.

ही संतुलित, स्वच्छ, सकारात्मक आणि शास्त्रीय दृष्टी एकंदरच आधुनिक मूल्यांवर आधारित समाजसंस्कृती घडवण्यात तर मोलाची असतेच, पण आपण स्वत: एक व्यक्ती, एक कार्यकर्ता म्हणून व्यवहार करताना ती अधिकच महत्त्वाची ठरते, हे मला उत्तरोत्तर पटत गेले. प्रचलित व्यवस्था, सत्ताधारी वर्ग आणि प्रस्थापित नेतृत्व यांची परखड समीक्षा करणे हा परिवर्तनवादी डाव्या चळवळींचा अत्यावश्यक भाग. पण कळत नकळत त्यात तुच्छतेचा, कडवटपणाचा, एकांगी, नकारात्मक, विद्वेषी सूर धरला जातो हे महाराष्ट्रात आपण वेळोवेळी पाहिले आहे. आपल्याच भिन्न प्रवाहांना वा वेगळे मत ठेवणाऱ्या परिवर्तनवाद्यांना असेच वागवण्याची संस्कृतीही आपण पाहिली आहे. अशा एकांगी, संकुचितपणात कार्यकर्त्यांनी, नव्या अभ्यासकांनी अडकू नये अशी नेनेंची धडपड असे. त्यासाठी ते चर्चा करत, वाद घालत, प्रसंगी कटुपणा घेत पण हे तत्त्व समोर ठेवत. इतक्या वर्षांमध्ये अत्यंत अपवादात्मक क्षणी ते त्यांना स्वत:ला 'मोठ्या' व्यक्तींपासून झालेल्या त्रासाबद्दल त्राग्याने आणि तेही अत्यंत खाजगीत बोललेले मी पाहिले, पण दुसऱ्याच क्षणी त्यातील भावनात्मकतेपासून ते दूर होत.

संशोधन, अभ्यास वा प्रत्यक्ष कार्य या गुणांविषयी त्यांना आदर होता. पण अशा कोणत्याही क्षेत्रातील कितीही मोठी व्यक्ती असली तरी तिच्याशी स्पष्ट भूमिकेतून व दबाव न घेता वैचारिक चर्चा वा वादविवाद केला पाहिजे असे ते नेहमी म्हणत. अनेक प्रसंगी वैयक्तिक चर्चेत वा सार्वजनिक कार्यक्रमात पुरेसा आदर व भान ठेवून असा स्पष्टवक्तेपणा करताना मी नेनेंना पाहिले आहे. समाजवादी जगातील पडझडीची पुसटशीदेखील कल्पना येण्याआधीच्या एका चर्चेची विशेष आठवण मला नेहमी येते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्युरो सदस्य व सैद्धांतिक मांडणीतील अग्रणी कॉ. बी. टी. रणदिवे यांच्याविषयी नेनेंना अपार आदर - काहीसा कौतुकमिश्रित आदर होता. ते पुण्यात आले असताना इथल्या बुद्धिवंतांशी एक चर्चा माकपने ठेवली होती. तिला उपस्थित राहण्याची संधी आमच्यासारख्या तरुणांनाही दिली गेली होती. नेने यांनी आधी काही सहकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न काढले होते आणि ते चर्चेत बी. टी. रणदिवेंसमोर ठेवले होते. त्यात भारतातील कम्युनिस्ट पक्ष रोझा लक्झेंबर्ग, ग्राम्शी, अल्थुसर यांच्यासारख्या मार्क्सवादी क्रांतिकारकांच्या वैचारिक-सैद्धांतिक योगदानाकडे संपूर्ण दुर्लक्ष का करतो इथपासून ते भारतीय परिस्थितीच्या विश्लेषणाबाबतच्या पक्षांच्या मूलभूत त्रुटींपर्यंत विविध प्रश्न त्यांनी विचारले होते. वैचारिक बंदिस्तपणा वा मुक्त विचारविनिमयांचे भय हा आधुनिक जीवनदृष्टीचा, शास्त्रीयतेचा व मार्क्सवादाचा भाग असूच शकत नाही याबाबत ते ठाम असत. तसेच नाट्य, साहित्य, चित्रपट अशा

क्षेत्रांकडेही ते केवळ प्रेक्षक वा वाचक म्हणून पाहत नसत. त्यांचा वर उल्लेखलेला दृष्टिकोन तिथेही जागा असे. त्यामुळेच एका चर्चेत त्यांनी प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकरांना त्यांनी 'माणसांची गिधाडे होतात ते तुम्ही दाखवता ही चांगली गोष्ट आहे पण माणसांची गिधाडे का होतात याबद्दल तुम्ही काहीच का म्हणत नाही?' असा प्रश्न केला होता आणि अर्थातच हा केवळ निर्भीडपणाचा भाग नव्हता तर मानवी समस्यांचे सामाजिक संदर्भ काय आणि व्यवस्थात्मक संबंध कोणते हे उलगडल्याशिवाय मानवी मन आणि संस्कृती अधिक उन्नत होण्याची प्रक्रिया पुढे कशी जाणार असा प्रश्न त्यांच्या समोर असे. त्याला भिडल्याशिवाय खरी अंतर्भेदी वा क्रांतिकारक दृष्टी वा नवनिर्मिती विकसित होऊ शकत नाही असे त्यांचे म्हणणे असे.

नेने, कोसंबी आणि इतिहास : एक जैव नाते

नेने, कोसंबी आणि इतिहास, हा एक फार मोठा विषय - स्वतंत्र ग्रंथ होईल असा. इतिहासाची भौतिकवादी दृष्टिकोनातून विश्लेषण करण्याची एक चौकट आणि दृष्टी, एक पद्धती आणि काही संकल्पनात्मक हत्यारे प्राथमिक स्वरूपात मार्क्सवादी शिबिरातून-वाचनातून मला मिळाली होती. पण या दृष्टीचा विकास करण्यात एक मोठा वाटा कोसंबींच्या ग्रंथांचा होता आणि त्यांचा अर्थ लावणारी कोसंबींची, त्यांच्या संशोधन पद्धतीची ओळख करून दिली ती नेनेंनी. कोसंबींची तेजतल्लख कुशाग्र बुद्धी, कठोर शिस्त, विज्ञान-इतिहास, पुरातत्त्वशास्त्र-नाणेशास्त्र या आधारे एक नवी अभ्यासपद्धती विकसित करण्याची दृष्टी यांचा परिचय देता देता एखाद्या गावाचे नाव, एखादे लेणे, एखादी इतिहासपूर्व अवशेष सापडलेली जागा, एखादी मिथ्यकथा अशी उदाहरणे घेऊन त्यांची पद्धती समजावून देत. वर्षानुवर्षे त्यांच्या सहवासात राहून त्यांच्यासोबत काम करून नेनेंनी स्वत: ती पद्धती आत्मसात केलेली असल्याने त्यांचा 'फर्स्ट हॅंड' अनुभव व अभ्यास समोर ठेवत. माझ्यासह अनेक कार्यकर्त्यांना तर याचा उपयोग होतच असे, पण अकादमीच्या अगदी अलीकडच्या 'इतिहास, संस्कृती आणि समाज' या विषयावर अभ्यासक्रम आणि कार्यशाळांची मालिका विकसित करण्यासाठी कोसंबी-नेने 'इनपुटस्' कामी आले.

कोसंबींनी यांत्रिक दृष्टिकोन नाकारून भारतीय इतिहास-संस्कृतीची नवी मार्क्सवादी मांडणी विकसित करताना कॉ. डांगे किंवा रशियन अभ्यासक यांच्या मांडणीतील मूलभूत दोष कसे दाखवले याची तपशीलवार कहाणी नेनेंच्या तोंडूनच ऐकण्यासारखी असे. कोसंबींवरचे स्मृतिग्रंथ काढण्याचे काम असो, व्याख्यानमाला असो वा अकादमीने काढलेले 'सायन्स, सोसायटी अँड पीस' सारखे पुस्तक असो, या साऱ्याचा मुख्य आधार नेनेच असत. कोसंबींच्या परखडपणाच्या अनेक कथा नेने सांगत. ते वेळेविषयी अतिशय काटेकोर होते. त्यांना भेटायला गेलेल्या रँग्लर परांजपेंना ठरलेल्या वेळेपेक्षा ५ मिनिटे उशीर झाला तर कोसंबींनी स्वत:च दार उघडून 'कोसंबी

ऱ्यात नाहीत' असे परांजप्यांना सांगितल्याचे उदाहरण नेने सांगत आणि पहिल्या भेटीला नेनेंना कोसंबींनी पहाटे ५ वाजता बोलावले होते तेव्हा नेने कसे ५ मिनिटे आधीच जाऊन दाराबाहेर उभे राहिले आणि बरोबर ५ वाजता बेल वाजवल्याने कोसंबींनी त्यांना पहिल्या परीक्षेत तरी पास केले. ही केवळ कथा उरत नसे तर त्यावर नेनेंच्या काटेकोरपणाचे संदर्भ लक्षात येतात. नेनेंना कोसंबींविषयी प्रगाढ आदर असला तरी त्यांचा तऱ्हेवाईकपणा, शीघ्रकोपी स्वभाव, कुटुंबीयांवर आलेला ताण याबद्दलही नेने बोलता बोलता कल्पना देत. एवढेच नव्हे तर डेक्कन पुरातत्त्व महाविद्यालयाचे संचालक ह. धी. सांखलियांसारखे तज्ज्ञ कोसंबींच्या पुरातत्त्वशास्त्रीय अभ्यासातील उणीवा कशा दाखवत हेही नेने समोर ठेवत.

मात्र त्याच वेळी ज्या भटक्या जमाती, स्थानिक कष्टकरी यांच्याकडून थोडीफार माहिती घेतलेली असे, त्यांना कोसंबी कसे काही ना काही साहाय्य करत तेही नेने सांगत.

पानशेत पुरानंतर कोसंबी स्वत: दोन्ही हातात दोन १६ किलोचे मोठे पत्र्याचे डबे गव्हाने भरून नेनेंच्या दारात हजर कसे होते आणि 'पीपल्स बुक हाऊस'ची पुस्तके भिजलेली पाहून आर्थिक साहाय्य कसे देऊ केले होते हेही सांगत.

डी. डी. कोसंबी जन्मशताब्दी व्याख्यानमाला (२००७) ही नेनेंनी त्यांना वाहिलेली शेवटची आदरांजली. ही व्याख्यानमाला समितीने संघटित केली आणि देशातील नामवंत अभ्यासक, विचारवंत त्यात बोलून गेले. पण ही कल्पना पुढे ठेवल्यापासून सभागृह व्यवस्थेपर्यंत आणि दरवेळी २००-२५० पत्रे तिकिटे चिकटवून पाठवण्यापर्यंत सर्व कामे नेनेंनी उत्साहाने आणि तत्परतेने केली, वयाच्या ७८ व्या वर्षी!

इतिहास हा नेनेंचा आवडता आणि हातखंडा विषय. इतिहास रंजक व गोष्टीवेल्हाळ पद्धतीने, घटनांच्या रूपात आणि बारीकसारीक तपशीलासह मांडणे ही त्यांची खासियत. त्यांच्या या तपशीलवार, ठोस वस्तुतथ्यांवर आधारलेल्या इतिहास (विशेषत: आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास) मांडणीमुळे मी त्यांना 'मार्क्सवाद्यांचे य. दि. फडके' असेच म्हणत असे. प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, वसाहतकालीन व आधुनिक इतिहास या साऱ्यातच त्यांना रस होता. मात्र ते इतिहासरंजनात दंग होणारे, इतिहासकाळात रममाण होणारे व त्याचे गौरवीकरण करणारे अजिबात नव्हते. इतिहासाचा अर्थ लावणे, त्यातील विसंगती, ताण आणि अंतर्विरोध पुढे आणणे, दडलेल्या प्रवृत्ती आणि लपलेले हितसंबंध बाहेर काढणे यावर त्यांचा भर असे. कोणत्याही घटनेची, चळवळीची, समाजाची, राष्ट्राची आणि जगाची वाटचाल व त्याची दिशा समजून घ्यायची तर इतिहासाचे आकलन अधिकाधिक शास्त्रशुद्ध व समग्र हवे हा त्यांचा आग्रह असे. नेनेंचा जन्म १९२९ चा - जागतिक महामंदीच्या काळातला. त्यांच्या ऐंशीव्या वर्षी जगात आर्थिक महाअरिष्ट आलेले. या काळातल्या जगातल्या व देशातल्या ऐतिहासिक घडामोडींविषयीचा त्यांचा अभ्यास इतका होता की त्यांच्या तोंडून तो ऐकताना ते जणू

साक्षात चालताबोलता इतिहास झाल्यासारखे भासे.

कोसंबी, शर्मा, थापर, इरफान हबीब असे देशपातळीवरचे इतिहासकार तसेच महाराष्ट्रातील इतिहासकार यांच्या संशोधनाचा नेनेंनी बराच अभ्यास केला होता. व्याख्याने, शिबिरे, चर्चा यांमध्ये ते त्याचा उपयोगही करत. मात्र या विषयांवर त्यांनी लेखन केले नाही. त्यांचे लेखन हे मुख्यत: समकालीन आर्थिक-सामाजिक प्रश्नांवर व लेख-पुस्तिका रूपात थोडेफार झाले. इतिहासविषयक त्यांचा अभ्यास व त्यांचे चिंतन ग्रंथरूपात जर उपलब्ध होऊ शकले असते तर एक मोठा समृद्ध खजिना आपल्या हाती आला असता. प्रबोधन व समाज जागृतीसाठीची अभ्यासपूर्ण संकलने व मांडणी यांच्या रूपात का होईना पण हा त्यांचा अभ्यास आपल्यासोबत राहिला असता.

प्रत्यक्ष अनुमान, पाहणी, ठोस पुरावे आणि नेमकी वस्तुतथ्ये (facts) या विषयी नेने नेहमीच आग्रही असत. केवळ राजकीय विचारसरणी व कल्पनाप्रणालींच्या पातळीवरच्या भूमिकांवर आधारित युक्तिवाद करण्याला त्यांचा विरोध असल्यामुळे मार्क्सवादी परंपरेतील प्रत्यक्ष वस्तुस्थिती व व्यवहाराशी जोडून सिद्धांतन/विचार करण्याची पद्धत त्यांनी अंगीकारली होती. विविध पाश्चात्य अभ्यासकांपासून ते फुले, आंबेडकर, गं. बा. सरदार, दि. के. बेडेकर अशा विचारवंतांकडून बारकाव्याने जाणारी व विविधांगाने प्रश्नांकडे बघणारी दृष्टीही त्यांनी आत्मसात केली होती. तथापि कधीकधी ते कोसंबींच्या काळातील सिद्धांतन/निष्कर्षांवर खूपच विसंबत, तसेच ब्रिटिश-अमेरिकी प्रत्यक्षार्थवादी (positivist) दृष्टिकोनाचा त्यांच्यावरचा प्रभाव प्रकर्षाने जाणवे. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासविषयीचे नवे प्रवाह व नवे दृष्टिकोन आणि तसे अभ्यासक यांच्याशी नेनेंची वादावादी चांगलीच रंगे. नेने नव्या प्रश्नांचे, नव्या माहितीचे व वस्तुतथ्यांचे स्वागत करत. पण वैचारिक भूमिकेबाबत आपल्या चौकटीवर ठाम राहात. त्याविषयी मतभेद असले तरी नव्या अभ्यासकांना वा अन्य प्रवाहातील व्यक्तींना नेनेंबरोबरच्या वाद-संवादाचा मात्र खूपच उपयोग होत असे.

नेनेंचा इतिहासविषयक दृष्टिकोन हा त्यांच्या आधुनिकतावादी जीवनदृष्टीचा भाग होता. १९ व्या शतकातील क्रांतिकारी मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या आधारे व त्या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकाने जगाच्या इतिहासाकडे पाहण्याचा शास्त्रीय व गतिमान असा विचार दिला. नेने त्या विचाराच्या मुशीत घडले. इतिहास समजून घ्यायचा तो इतिहास घडवण्यासाठी आणि बदलण्यासाठी हा विश्वास त्यामध्ये होता. नेनेंच्या विचाराचा आणि कृतिशीलतेचाच नव्हे, तर एकंदर संपूर्ण जगण्याचाच तो मुख्य प्रेरणास्त्रोत होता आणि यामुळेच नेनेंच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला कृतिशील आणि विचारशील व्हावेसे वाटे, राहावेसे वाटे, निष्क्रिय राहण्याबद्दल किमान अपराधी वाटे. याचाच एक भाग म्हणून 'इतिहास' जाणण्यात रस वाटे.

अथक साहाय्यकर्ता आणि निरपेक्ष कार्यकर्ता

विविध क्षेत्रातले दिग्गज आणि 'इतिहास' या विषयीचे 'दडपण' व 'दुरावा' दूर करण्यात मला मार्क्सवादाने आणि अनेक कार्यकर्ते, अभ्यासक, मित्र यांनी हात दिला. नेने त्यातले एक महत्त्वाचे ज्येष्ठ मित्र-अभ्यासक-कार्यकर्ते होते. हे तर वर आलेच आहे, पण नेनेंनी मला - आणि बऱ्याच कार्यकर्त्यांना, नव्या अभ्यासकांना - आणखी एका 'भया'पासून मुक्त केले. ते म्हणजे गोखले अर्थशास्त्र संस्थेचे ग्रंथालय. त्या अवाढव्य आणि हरवून जाऊ अशी भीती वाटणाऱ्या - खरे तर काही सापडेल की नाही अशी भीती बाळगणाऱ्या - मला त्यांनी या 'पुस्तकी' गांगरलेपणातून बाहेर पडायला मदत केली. ग्रंथालयात शिरण्याच्या पहिल्या काऊंटरपासून, कार्डे पाहण्यापासून ते पुस्तके, नियतकालिके, अहवाल शोधणे आणि वापरण्यापर्यंत माझे सर्व पहिले प्रशिक्षण नेनेंनी केले. या विविध स्रोतांचा वापर करून योग्य व हवी ती माहिती आणि आकडेवारी कशी काढावी आणि तिचा अर्थ कसा लावावा हेही सुरुवातीला त्यांच्याकडून नेमकेपणाने कळले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समोर येणारी सर्वच माहिती, आकडेवारी वा विश्लेषणे, युक्तिवाद हे प्रमाण मानू नयेत आणि ते उलट-सुलट संदर्भ, स्त्रोतांच्या आधारे तपासून घ्यावेत याचे ठोस भान यायला नेनेंबरोबरच्या चर्चा (अर्थातच अनेकदा त्यांनी दिलेल्या चहासह!) उपयोगी पडल्या. 'महाराष्ट्रातील दुष्काळ' या विषयावरची आकडेवारी व माहिती गोळा करताना नेनेंचे असे मार्गदर्शन उपयोगी पडले.

माझ्यासह हा अनेकांचा अनुभव आहे की नेनेंना काही संदर्भ, नेमकी घटना वा आकडेवारी विचारली की ते स्वतःच स्कूटरवर टांग मारून 'गोखले'ला जात आणि नेटकेपणाने हवे ते 'हाजिर' करत. अगदी अलीकडची २/४ वर्षे वगळली तर वर्षानुवर्षे ते हे करत होते. पाठीच्या, मानेच्या त्रासाने नंतर त्यांना स्कूटर बंद करावी लागली तर ते रिक्षाने जाऊन ते काम करत. 'पदराला' पैशाची आणि वेळेची 'खार' लावून इतके 'नीरस' काम इतका 'रस' घेऊन करणारी दुसरी व्यक्ती मी तरी पाहिली नाही. ती तशी शोधूनही सापडणार नाही! समाज विज्ञान अकादमीच्या कार्यक्रमांच्या आखणीच्या संदर्भात अनेकदा त्यांच्याशी आमची चर्चा होत असे. एकदा पर्यावरणावर मोठं चर्चासत्र घेण्याची कल्पना त्यांना बोलून दाखवल्यावर आठ दिवसात त्यांनी ३/४ पानी एक संदर्भसूचीच आणून दिली. या विषयावरील पुस्तके आणि महत्त्वाचे लेख त्यात होते. तरुण, नव्या कार्यकर्त्यांपासून मोठ्या नेत्या-विचारवंतांपर्यंत अनेकांना त्यांच्या या 'माहिती सेवे'चा पुन:पुन्हा लाभ मिळत असे.

नेनेंनी अमेरिका वा युरोपातील अनेक अभ्यासकांच्या संशोधन प्रकल्पामध्ये साहाय्यक म्हणून २० वर्षे तरी काम केले. एका अर्थी हे व्यावसायिक स्वरूपाचे काम असे. नेने त्यात व्यावसायिक बांधिलकी बरोबरच 'सामाजिक कार्या'ची भावना व बांधिलकीही ओतत. त्यामुळे प्रकल्प कार्य संपल्यानंतरदेखील या अभ्यासकांनी नेनेंशी आस्थेने संपर्क ठेवलेला असे. वेळोवेळी महत्त्वाची माहिती, संदर्भ, लेख आणि चक्क

एखादे उत्तम पुस्तक यापैकी काही मंडळी नेनेंना पाठवत. 'मी मार्क्सवादी नाही, पण मि. नेने तुम्हाला त्यात रस आहे म्हणून मी अमुकतमुक मार्क्सवादी साहित्य तुमच्यासाठी पाठवतो.' असे म्हणणारे एक अमेरिकी अभ्यासक त्यांच्या मित्रपरिवारात होते. अगदी अलीकडच्या एक-दोन वर्षांत इंटरनेटचा वापर शिकल्यावर तर नेनेंचा या परदेशी अभ्यासकांशी नेटसंपर्क सुरू झाला आणि नेनेंना तिकडून नेट साहित्य येऊ लागले. मी 'जागतिकीकरण आणि पाणी' (व शेती) या विषयाचा अभ्यास करत होतो तेव्हा अमेरिकेतल्या एका विदुषीने पाठवलेले या विषयावरचे काही लेख मला नेनेंनी आस्थेने उपलब्ध करून दिले होते.

नेनेंची ही साहाय्यकर्त्याची भूमिका फक्त अशी अभ्यास-प्रबोधनापुरती मर्यादित नव्हती. पुरोगामी चळवळीत पूर्वी क्रियाशील असलेल्या आणि नंतर रिक्षांचा वाहतूक व्यवसाय करणाऱ्या जोडप्याला प्रचंड आर्थिक अडचण निर्माण झाली आणि बँकेने वाहन जप्त केले. पैसे उभारण्याचे सर्व मार्ग बंद झाले आणि साहाय्य मिळण्याचे सर्व सामाजिक मार्ग खुंटले, तेव्हा ते जोडपे नेनेंकडे आले. नेनेंनी दुसऱ्या एका सामाजिक कार्यकर्त्याकडे शब्द टाकून बचत गटातल्या महिलांकडून मोठे कर्ज मिळवून दिले (आणि तेही परत देण्यात त्या जोडप्याकडून हलगर्जीपणा झाल्यावर कर्ज देणाऱ्या महिलांचा राग झेलण्याची वेळ नेनेंवर आली). शाळा व्यवस्थापनाकडून वा निमशासकीय वैद्यक संस्थेकडून अन्याय झालेल्या एकेकट्या महिला कर्मचाऱ्यांना जेव्हा ट्रेड युनियन्सकडूनही आधार मिळत नाहीसा दिसे तेव्हा वर्षानुवर्षे त्या 'केसेस' लढवायचे व न्याय मिळवून देण्याचे काम नेनेंनी केले. त्यासाठी टायपिंग, झेरॉक्स, टपाल व रिक्षा खर्च नेने स्वतःच्या खिशातून करत आणि वकिलांनीही धडे घ्यावेत असे युक्तिवाद व निवेदने ते स्वतः लिहून काढत. नेनेंच्या दुकानाचा गाळा ज्या इमारतीत आहे ती इमारत एलआयसी (आयुर्विमा महामंडळ) ची आहे. 'मालक' या नात्याने एलआयसी गेली २५/३० वर्षे सर्व भाडेकरू गाळाधारकांना काढण्याच्या कायदेशीर प्रयत्नात आहे. भरपूर कमाई करणारे आणि एरवी मिशीला पीळ भरणारे गाळेधारक एलआयसीसमोर सटपटले, पण एकटे नेने उभे राहिले. आपल्या कायदेशीर युक्तिवादाने एलआयसीच्या नामवंत वकिलांनाही तटवून धरले आणि हे सारे पदराला खार लावून! किमान डझनभर दुकानदार व्यावसायिकांचे वकील खर्चाचे हजारो रुपये वाचवून वर भाड्यात हजारो रुपये नेनेंनी वाचवून दिले. पण त्याबद्दल त्या मंडळींनी नेनेंकडे साधी कृतज्ञताही व्यक्त केली नाही. मी नेनेंना नेहमी म्हणे की ''या साऱ्यात किमान आर्थिक खर्च तरी तुम्ही संबंधितांकडून घ्या आणि दुसरे म्हणजे तुम्ही जे करताय याची त्यांना किमान किंमत कळेल अशी जाणीव त्यांना करून द्या.'' नेने फक्त स्मित करून सोडून देत.

नेनेंचा आर्थिक आधार (प्रकल्प कामाची वर्षे वगळता, गेल्या २५-३० वर्षांत) हा त्यांच्या मोठ्या दुकानगाळ्याचे भाडे एवढाच होता. विविध संघटना, व्यासपीठे,

कार्यक्रम आणि वर उल्लेखलेले निरपेक्ष कार्य याच्या फोनबिलातच त्याचा पाव हिस्सा जात असावा. असाच बराचसा भाग स्टेशनरी, पोस्टेज, प्रवास इ. मध्ये. त्याअर्थी त्यांची स्थिती बेताबेताची. एकटे होते म्हणूनच निभावून जाणारी. असे असताना सामाजिक क्षेत्रात क्रियाशील असलेल्या एका व्यक्तीने ती जागा भाड्याने घेतली पण ४/६ महिन्यांचे भाडेच दिले नाही. घरी येणारे अवैध असे भरपूर उत्पन्न असूनसुद्धा! त्या व्यक्तीची ही टाळाटाळ बेजबाबदारपणाची होती. नेनेंनी त्याचा फक्त एकदा माझ्यासमोर उल्लेख केला, पण राग वा संताप असा काहीही भाग त्यात नव्हता, फक्त थोडीशी नाराजी होती.

सामाजिक क्षेत्रातही अनेकदा आपणहून कष्ट करणाऱ्या व्यक्तीला 'गृहित' धरण्याचा व पुरेशी किंमत, किमान आदरही न देण्याचा प्रकार दिसतो. स्वत:चा सामाजिक वा राजकीय 'रुबाब' सांभाळणाऱ्यांना अधिक मान देण्याचे प्रकार परिवर्तनवादी प्रवाहातसुद्धा अनेकदा दिसतात. 'कष्ट' करणाऱ्याला प्रचलित भांडवली व्यवस्थेच्या 'संस्कृती' प्रमाणे कमी किंमत देण्याची प्रवृत्ती इथेही काहीवेळा आढळून येते. कधीकधी नेनेंना तसे वागवले जाई असे मला दिसे. म्हणून मी अस्वस्थ होऊन त्यांना म्हणे की ''तुम्हाला 'गृहित धरले' जाईल असे वागू नका, तुमच्या कष्टाची किंमत लहान मोठ्यांना, कार्यकर्ते-दिग्गजांना कळेल असे वागा.'' यावर नेनेंचे उत्तर म्हणजे फक्त स्मितहास्य असे. 'आपण आपल्याला वाटते म्हणून असे करायचे असते, त्याबद्दल इतरांना काय वाटते ते गौण आहे.' असाच भाव त्यात असायचा. कोणीही चांगली सामाजिक कार्यकर्ती व्यक्ती ही अशीच असते, असायला हवी हे मलाही पटे. पण तरीही नेनेंसाठी नाही, लोकांनी स्वत:ची 'किंमत' कमी होऊ नये यासाठी तरी नेनेंच्या कष्टाचे मोल ओळखायला पाहिजे असे वाटे.

त्यांच्या वयाच्या ६६ व्या वर्षी, ७५ निमित्त आणि ८० व्या वाढदिवसानिमित्त असे चढत्या क्रमाने त्यांचे तीन वैशिष्ट्यपूर्ण रीतीने सत्कार करून त्यांच्याविषयीचा आदर सर्व कार्यकर्ते व मित्र-मैत्रिणी यांनी व्यक्त केला. ते मात्र सर्वांनाच समाधान देणारे होते. पुण्यातील कोणाही प्रसिद्ध व्यक्तीचे निधन झाले की सर्व वृत्तपत्रातील अग्रलेख, टिपणे, बातम्या यांची कात्रणे काढून त्यांची एक फाईल त्यांच्या घरी पाठवण्याची नेनेंची प्रथा होती. 'त्यात' मदत करणाऱ्या त्यांच्याकडच्या मनोज परदेशीने नेनेंच्या निधनानंतर नेनेंची तशी फाईल बनवून त्यांच्या कुटुंबीयांकडे दिली. नेनेंच्या तालमीची पावती अशी आगळी आदरांजली म्हणून मिळाली!

संस्थात्मक कामासाठी विसंबावे असे...

नेनेंनी अनेक संस्था, संघटना, चळवळी आणि व्यासपीठांशी जोडून काम केले. प्रत्येक ठिकाणी त्यांचा अनुभव व त्यांचे योगदान वेगवेगळे असणार यात शंका नाही. मात्र समाज विज्ञान अकादमीशी त्यांचा संबंध प्रदीर्घ म्हणजे जवळजवळ ३० वर्षांचा

राहिला. संस्थात्मक आणि प्रबोधनाच्या कामात ज्यांच्यावर विसंबता येते, ज्यांचे मार्गदर्शन व मदत खात्रीने मिळते असे व्यक्तिमत्त्व म्हणजे नेने असा माझा अनुभव राहिला. नेने अकादमीचे विश्वस्त वा पदाधिकारी नव्हते तेव्हा, विश्वस्त झाले त्या काळात आणि अध्यक्ष झाले त्याकाळातही ते मदत करायला सदैव तयार असत.

१९८९-९० चा काळ. म. फुले स्मृतिशताब्दी आणि डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी वर्षांचा काळ. अकादमीच्या वतीने महाराष्ट्रभर जास्तीत जास्त शिबिरे घेण्याची कल्पना होती. म. फुले, ब्राह्मणेतर चळवळ, डॉ. आंबेडकर आणि सद्य:स्थिती या संदर्भात जातीव्यवस्था व सामाजिक परिवर्तन या विषयावर सर्व लोकशाही डाव्या संघटनांचे कार्यकर्ते व प्रबोधन कार्यकर्ते यांच्यात मंथन घडवण्याचा विचार होता. या कल्पनेचे मनापासून स्वागत करून नेने त्यात उत्साहाने वक्ता म्हणून तसेच आखणीमध्ये सहभागी झाले. पहिले शिबिर यशस्वीपणे पार पडले. तेवढ्यावरच थांबावे अशी सूचना एका विश्वस्तांकडून आली. मी जरा वैतागलो. एकतर या निमित्ताने हा विषय डाव्या आणि बिगर डाव्या अशा सर्व कार्यकर्त्यांसमोर मार्क्सवादी पद्धतीने मांडण्याची मोठी संधी होती. नलिनी पंडित, रावसाहेब कसबे अशा ज्येष्ठ विचारवंतांचा सहभाग मिळणार होता. दुसरे म्हणजे समाजवादी देशांमधल्या पडझडीमुळे मार्क्सवादाला, विशेषत: समतावादी विचारांना मोठा धक्का बसला होता. कार्यकर्त्यांमध्ये एक प्रकारचे नैराश्य जाणवत होते. अशा वेळी फुले-आंबेडकरांच्या आधारे समतावादी विचारांना उजाळा देणे आणि कार्यकर्त्यांमध्ये वैचारिक उत्साह वाढवणे आवश्यक होते. हा कार्यक्रम न थांबता पुढे जाणे अत्यावश्यक होते. मदतीसाठी मी नेनेंवर विसंबलो आणि पुढची सव्वीस शिबिरे (एकूण सत्तावीस जिल्हाशिबिरे), नेने सलग त्यात सहभागी होते, वर्षभर सगळीकडे फिरत होते.

नंतरच्या काळात नेने अकादमीचे विश्वस्त झाले आणि २००२ ते २००९ पर्यंत ते अध्यक्ष राहिले. या काळात ज्येष्ठ व्यक्तींना फोन करणे, प्रत्यक्ष भेटीसाठी वेळ काढणे इथपासून निमंत्रण पत्रिकेचा मसुदा तयार करणे व निमंत्रितांच्या याद्या करण्यांपर्यंत प्रत्येक बारीकसारीक बाबतीत नेने मदतीला तयार असत. कार्यक्रम म्हटला की त्यांचा उत्साह ओसंडून वाहे आणि वृत्तपत्रप्रसिद्धीपर्यंत सर्व गोष्टींची पूर्तता वेळेवर आणि पद्धतीप्रमाणे होते ना याची खातरजमा केल्याशिवाय त्यांना स्वस्थता लाभत नसे. एखादी त्रुटी राहिली तर शांतपणे ती लक्षात आणून देण्याचे काम जसे ते करत, तसे प्रोत्साहन देण्याचे आणि चांगल्या गोष्टींचे कौतुकही ते करत. एखाद्या पत्राचा वा निमंत्रण पत्रिकेचा पहिला मसुदा जर त्यांनी बनवला तर हाती देताना 'तुमच्या स्टाईलने यात बदल करा आणि आकर्षक बनवा' असं ते सांगत. कार्यक्रम नीट संघटित केला की त्याचाही ते आवर्जून उल्लेख करत.

अर्थात या साऱ्याच्या नियोजनात नेनेंबरोबरची सत्रे संस्मरणीय ठरत. अर्ध्या तासाच्या विचाराने पोचलेलो असताना किमान ३-४ तासांची बैठक जमे! बऱ्याचदा

गप्पांच्या वेळी निरनिराळी सरबते, आसामच्या खास चहासह विविध प्रकारचे चहा, निरनिराळ्या बेकऱ्यांमधील वेचक बिस्किटे आणि एखाद्या छोट्या शब्दावरून, मुद्यावरून वा प्रसंगावरून नेनेंनी त्यांच्या आठवणींच्या, वाचनाच्या समृद्ध खजिन्यात हात घालून बाहेर काढलेल्या उद्‌बोधक कथा अशी मैफिल रंगे. वेळेसाठी समोरची व्यक्ती आतून कितीही अस्वस्थ असली तरी त्या गप्पांमधून होणाऱ्या विश्वरूपदर्शनाने 'गुंगलेली' जात असे. अशा गप्पा, विविध कार्यक्रमांचे रिपोर्टिंग-देवघेव, वैचारिक वाद-चर्चा आणि यात हळूहळू पुढे सरकणारा मुख्य कार्यक्रम नियोजनाचा वा संस्थात्मक कामाचा अजेंडा हा नेनेंचा अतिशय आवडता भाग. निश्चित असे काम झाले, नियोजन झाले, कार्यक्रम ठरला की नेनेंना फार आनंद होई. पण ते घाईघाईने, रूक्षपणे, कर्तव्यकठोरपणे नव्हे तर वर म्हटल्याप्रमाणे एखाद्या 'मैफिली'च्या थाटात व्हावे लागे.

सर्वसाधारणपणे नव्या कल्पना, नवे उपक्रम, नवे कार्यक्रम यांचे नेने उत्साहाने स्वागत करत. पण काही वेळा अखेरीच्या काही वर्षात नवे प्रश्न, बदललेली परिस्थिती, केवळ नवे मुद्दे नव्हे तर नवा विचार-चौकट निर्माण करण्याची गरज आणि वेगळ्या धाटणीचे कार्यक्रम, याबाबत कधीकधी ते मतभेद व्यक्त करताना आढळत. घेतलेल्या कार्यक्रमांचे, कृतींमध्ये रुपांतर न होण्यामुळे, परिवर्तनवादी डाव्या प्रवाहाचा घटता प्रभाव व उतरती गतिमानता-कल्पकता यामुळे आणि प्रबोधन उपक्रमांना चळवळींकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळू शकत नसल्यामुळे असेल, पण कधीकधी ते साशंक बनताना दिसत. अर्थात ही अनेकदा तात्पुरती प्रतिक्रिया असे. कधी चर्चेत, कधी नंतर फोन करून तर कधी कार्यक्रम झाल्यावर मनमोकळेपणाने ते हे मान्य करत की त्यांची आधीची शंका निराधार होती. याचे मूळ कारण त्यांचा स्वागतशील व खुला दृष्टिकोन, विवेकी विचार, प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व देण्याचा आणि मूलत: उत्साही स्वभाव.

अनेक संस्थांना तळमळीने आणि तपशीलाने ते अशी मदत करताना दिसत. अशी विसंबण्याजोगी माणसे सध्यातरी दुर्मिळ होत चालली आहेत.

नेन्यांचे डावेपण

पुण्यातल्या ज्येष्ठ अभ्यासकांना, इतिहास वा सामाजिक क्षेत्रातल्या व्यक्तींना भेटल्यावर मी बऱ्याचदा नेन्यांचा संदर्भ देत असे. ती व्यक्ती जर डाव्या पुरोगामी वर्तुळाबाहेरची असेल तर काही वेळा दोन प्रतिक्रिया असत. ''हे कोण? गो. प. नेनेंचे भाऊ का?'' त्याबद्दल नेन्यांकडूनच खुलासा मिळाला होता की हिंदी भाषेचे तज्ज्ञ गो. प. नेने यांचा रा. पं. शी काही संबंध नव्हता. दुसरी प्रतिक्रिया असे, ''ते (कधीकधी 'तो') कम्युनिस्ट नेने?''

सुरुवातीला पुण्यातल्या माकपाच्या व अन्य मार्क्सवाद्यांच्या मते ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे होते तर त्या काळातच भाकपच्या काही लोकांच्या मते ते माकपचे होते! कधीकधी 'हे पक्षबाह्य मार्क्सवादी ना...' असा सूरही ऐंशीच्या दशकात

त्यांच्याबाबत कानावर येत असे.

महाविद्यालयीन विद्यार्थी दशेत आणि विद्यार्थी चळवळीत असताना अत्यंत भला काळ म्हणजे चक्क काही महिने/एखादे वर्ष नेने भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होते. नंतर तहहयात ते मार्क्सवादी कार्यकर्ते, अभ्यासक आणि कम्युनिस्ट पक्षांचे व एकंदर सर्व पुरोगामी चळवळींचे मित्र म्हणूनच वावरले. त्या-त्या प्रवाहाशी, उपप्रवाहाशी, संघटनांशी आणि नेते-कार्यकर्ते यांच्याशी मतभेदांबाबत योग्य वेळी जबाबदारीने चर्चाही करत. एका अर्थी ते 'चिकित्सक मित्र' होते, मात्र गोखले अर्थशास्त्र संस्थेतील टी-क्लबच्या टेबलावर बसलेल्या अभ्यासकांपासून तो ज्ञानप्रबोधिनीपर्यंत आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीयांपासून दलित-लोकशाही समाजवादी चळवळींपर्यंत सर्वत्र ते कम्युनिस्ट भूमिका आणि विचारांची बाजू घेऊन 'लढत' असत आणि अर्थातच कम्युनिस्ट प्रवाहाशी पर्यावरण, जातिव्यवस्था, धर्मांध राजकारण याबद्दलही त्यांचे वाद,चर्चा होत असे. या पक्षांच्या कार्यकर्त्यांशी राज्य आणि केंद्रीय पातळीवरील नेत्यांशी होणाऱ्या चर्चांमध्ये ते 'नव्या', 'दुर्लक्षित', 'उपेक्षित' मुद्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत.

सत्तरीच्या आणि ऐंशीच्या दशकामध्ये महाराष्ट्रात डाव्या प्रवाहामध्ये जातिव्यवस्था, राखीव जागा तसेच धर्मांध राजकारण, धर्मनिरपेक्षता आणि महाराष्ट्रीयन सामाजिक प्रश्नांचा इतिहास-सामाजिक सुधारणा चळवळ याविषयीची जाण वाढवणाऱ्या मोजक्या मार्क्सवाद्यांपैकी नेने हे एक आघाडीचे प्रबोधक होते. त्यांच्या अभ्यासाचा व मांडणीचा उपयोग अर्थातच सर्व पुरोगामी चळवळींनाही होत असे. सोविएत युनियन, क्यूबा, पूर्व युरोप येथील समाज/देश व मानवजात प्रगतीच्या पुढच्या टप्प्यात काय कमाई करू शकते आणि अर्थातच या व्यवस्थांमध्ये कोणते प्रश्न, अडचणी व अरिष्टे निर्माण झाली याचे मार्क्सवादी विवेचन करण्यात त्यांना रस होता. आंतरराष्ट्रीय राजकारण, समाजवादी राष्ट्रगट व प्रगत भांडवली राष्ट्रगट यातील संघर्ष आणि तिसरे जग, अलिप्ततावादी चळवळ व शांतता चळवळ याबाबतही ते सतत वाचन, अभ्यास व काही लेखन करत असत. या साऱ्यामध्ये काही छटा, काही मुद्दे वा भर देण्याची गरज या अंगांवर त्यांचे वेगळे म्हणणे असे पण मूलतः त्यांची भूमिका ही मार्क्सवादी विचारधारांशी सुसंगत असे.

या साऱ्यातून डावे प्रबोधन आणि डावी चळवळ यात नेनेंचे असे एक स्थान तयार झाले होते. आधीच्या कालखंडामध्ये काही अभ्यासक-विचारवंतांना, काही काळ खुद्द नेनेंना, 'पक्षबाह्य मार्क्सवादी' म्हणून जो काहीएक दुरावा वा साशंकतेने पाहिले जाण्याचा अनुभव होता तो हळूहळू नष्ट झाला. डाव्या पक्षांकडून पक्षबाह्य मार्क्सवाद्यांबाबत अधिक सहकार्याची, जवळीकीची व आदराची भूमिका घेतली जाऊ लागली. यामध्ये पक्षांच्या नेतृत्वाच्या परिपक्वतेचा व व्यापक समजेचा वाढता भाग जसा होता, तसाच महाराष्ट्रातील पक्षबाह्य मार्क्सवादी अभ्यासक, विचारवंत, प्रबोधक यांनी केलेल्या कामाचा, दाखवलेल्या सातत्याचा व परिपक्वतेचा आणि सतत केलेल्या संवादाचाही

भाग होता. असे काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मोजक्या व्यक्तींमध्ये नेनेंचे नाव अगदी पुढे येईल यात शंका नाही.

नेने हे एक दांडगा जनसंपर्क आणि व्यापक प्रमाणावर संबंध असलेले मार्क्सवादी होते. अगदी रा.स्व.संघ - नवहिंदुत्ववादी विचारवंत अभ्यासकांपासून ते बुद्धिप्रामाण्यवादी अंधश्रद्धा निर्मूलन समितीपर्यंत, पुरोगामी मुस्लिम कार्यकर्त्यांपासून काँग्रेसजनांपर्यंत, गांधीवादी पर्यावरणवाद्यांपासून नक्षलवाद्यांपर्यंत, स्त्रीवादी दलित कार्यकर्त्यांपासून एनजीओंपर्यंत, सर्व छटांच्या लोकशाही समाजवाद्यांपासून सर्व छटांच्या कम्युनिस्टांपर्यंत आणि नव्या-जुन्या विद्यार्थी युवा संघटनांपर्यंत नेनेंचा सर्वांशी जिवंत संबंध असे. अशा चळवळींच्या, संघटनांच्या बैठका, जाहीर कार्यक्रम यांना तर ते हजर राहातच पण पुण्यातील बहुतेक सर्व प्रगतीशील सभा, व्याख्याने, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम यांना ते उपस्थित राहात. असे सारे उलट-सुलट दृष्टिकोन, आक्षेप आणि युक्तिवाद ऐकल्याशिवाय चांगला मार्क्सवादी दृष्टिकोन आणि क्रांतिकारक कार्यकर्ता कसा विकसित होणार हा त्यांचा प्रश्न असे. कोणतीही व्यक्ती, संघटना, चळवळ वा प्रवाह केवळ आत्ममग्न राहून क्रांतिकारी बनूच शकत नाही असे त्यांचे म्हणणे असे, पण प्रत्यक्ष सामाजिक, राजकीय व्यवहारातही आपण ते पाहतोच आहोत. त्यामुळे नेने हे मार्क्सवादी वा कम्युनिस्ट असूनही व्यापक दृष्टिकोन बाळगत होते असे कोणी कौतुकाने म्हणेल. पण नेनेंच्या मार्क्सवादी असण्याचा अंगभूत भाग म्हणून ते व्यापक होते ही वस्तुस्थिती आहे.

गतिशीलता आणि आशावाद : नेन्यांचे प्रेरणास्रोत

समाजातील गुंतागुंत, कोणत्याही प्रश्नाची व्यामिश्रता आणि वास्तवाचे विविधांगी पैलू हे नजरेआड केले जाऊ नयेत असा त्यांचा आग्रह असे. भूमिका घेताना व्यक्तींना वा संघटनांना ठामपणा लागतो तो असलाच पाहिजे पण याचा अर्थ ठोकळेबाज भूमिका घेणे असा होता कामा नये असे ते आग्रहाने मांडत. विचारसरणी कोणतीही असो तिच्यामध्ये एकांगीपणा, मूलतत्त्ववाद व यांत्रिकपणा अशा स्वरूपाचा ठोकळेबाज प्रवाह असतोच. हे केवळ मार्क्सवादाला लागू असते असा काही वेळा समज असतो. पण ते तसे नाही. मार्क्सवादात आत्मसमीक्षा व शास्त्रीयतेचा आग्रह असल्याने या धोक्यावर मात केली जाण्याची शक्यता अधिक असते. पण अन्य सर्व परिवर्तनवादी विचारांमध्ये आणि विशेष करून 'गतिमान' भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या विचारसरणींमध्ये ठोकळेबाजपणाची शक्यता अधिक असते. अशा सर्व प्रवाहातील ठोकळेबाजपणाविरुद्ध नेने वैचारिक संघर्ष करत. केवळ प्रतिगामीच नव्हे तर सर्व छटांच्या पुरोगामी प्रवाहातील कार्यकर्त्यांशी-नेत्यांशी होणारे त्यांचे वाद आणि संवाद म्हणजे एक सातत्याने चालणारी शिक्षणप्रक्रियाच असे.

अनेकांना नेनेंबरोबरची 'पहली मुलाकात' संस्मरणीय असेल. वैचारिक अभिनिवेश

वा एकांगी भूमिका घेतलेल्या, पूर्वग्रहात अडकलेल्या वा नव्यानव्याने पेटून उठलेल्या कार्यकर्ता व्यक्तीची नेनेंची पहिली भेट वा चर्चा होई तेव्हा 'ठिणग्या' उडणे अटळ असे. एकाच बाजूने एखाद्या प्रश्नाचा वा विषयाचा विचार करणाऱ्यांना नेने त्याची 'दुसरी बाजू' दाखवत. नेनेंकडून 'उलटे' युक्तिवाद येताना पाहून प्रथमदर्शनी त्या व्यक्तिला 'नेने' हे आपले मित्र/समर्थक झालेत की 'विरोधक' असाच प्रश्न पडे. हळूहळू नेनेंची जशी नीट ओळख होत जाई आणि नेनेंचा हा पवित्रा म्हणजे वस्तुनिष्ठ, संतुलित, समग्र भूमिकेसाठीचा आग्रह असून तो आपली चळवळ व आपला विचार हे बळकट व्हावे या उद्देशाने आहे हे लक्षात येई. तेव्हा नेनेंचे काही युक्तिवाद वा काही मते विवाद्य वाटली तरी त्यांचा नितळ, प्रामाणिक उद्देश लक्षात आल्याने समोरची व्यक्ती ही नेनेंच्या संपर्कात राही, वा स्नेही वा सहप्रवासी बनून जाई.

वैचारिक मतभेद वा वाद हे वैयक्तिक नात्यात न आणता प्रत्येकाचा आदर करणारे आणि समान वागणूक देणारे नेने हे खरोखरी आधुनिकतावादी होते. 'आधुनिकतावादी' हा शब्द त्यातून उपस्थित होणाऱ्या प्रश्नांसह नेनेंच्या बाबतीत खरा होता. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावर त्यांचा संपूर्ण विश्वास होता. विज्ञान तंत्रज्ञानाचा गैर वा अविवेकी वापर नको याबाबत ते ठाम असत. पण आपले जीवन समृद्ध करण्यासाठी व चळवळी सशक्त करण्यासाठी त्यांचा उपयोग ते आवश्यक मानत. पण मुळात आधुनिक विज्ञानाचा-तंत्रज्ञानाचा विकास व निवड यातही त्रुटी असतात, सांस्कृतिक घटक प्रभावी असू शकतात किंवा पारंपरिक वा स्थानिक ज्ञान-तंत्रज्ञान पद्धती आणि व्यवहार यातही काही तथ्यांश असू शकतो आणि त्यांना जसे आधुनिक विज्ञानाने तपासले पाहिजे तसेच पारंपारिक ज्ञान-तंत्रज्ञान उपचारपद्धतीदेखील आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाला प्रश्न विचारू शकतात ही गोष्ट ते अर्थहीन, केवळ अभिनिवेशी चर्चेचा भाग आहे असे मानत. युरोपातून आलेल्या आधुनिकतेने आणलेल्या सांस्कृतिक गोष्टी, सवयी, पोषाख, सौंदर्यदृष्टी, 'विवेकवाद', 'विज्ञानवाद' वा 'विकासवाद' आणि त्याविषयीची मूल्ये ही सर्वार्थाने प्रगतीकारक आहेत (त्यातून भांडवलशाही काढल्यास) असा काहीसा त्यांचा विश्वास होता. विकासाच्या एकरेषीय वा युरोपकेंद्री कल्पनेची चिकित्सा, वा तिसऱ्या जगाने स्वत:च्या काही सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा आग्रह धरणे, किंवा आधी म्हटले त्याप्रमाणे युरोपकेंद्री सांस्कृतिक गोष्टी नाकारणे हे प्रगतीला मारक ठरेल असे त्यांना वाटे.

यामागे अर्थातच आधुनिकतेचा लाभ आजही आपल्याला मिळवणे आवश्यक आहे हा त्यांचा विचार अत्यंत महत्त्वाचा होता; मात्र त्यातून आधुनिकतावादाचा पुरस्कार होण्याचा व परिणामी एक यांत्रिकपणा ठोकळेबाजपणा पुढे येण्याचाही धोका असतो ही बाब तातडीने विचारात घेणे महत्त्वाचे आहे, असे त्यांना वाटत नसावे. असे असले तरी स्त्रीवाद, पर्यावरणवाद, जनविज्ञान आंदोलन यांनी पुढे आणलेल्या मुद्यांबाबत ते नेहमीच स्वागतशील असत आणि गेली सुमारे तीन दशके ते त्यात वेळोवेळी क्रियाशीलपणे

सहभागीही होत आले होते. काही विशिष्ट मते वा दृष्टिकोन वगळता त्यांच्यातील मार्क्सवादी हा नेहमीच सजग, क्रियाशील आणि जिज्ञासू असल्यामुळेच हे घडू शकत होते आणि त्यामुळेच परिवर्तनवादी चळवळीतील सर्व प्रवाहांना त्यांचा नेहमीच आधार वाटत असे.

नेनेंकडे एक छान थेटपणा आणि पारदर्शीपणा होता. त्यांच्या शास्त्रीयतेच्या वा वस्तुनिष्ठतेच्या आग्रहामुळे ते कधीकधी अभिनिवेशी वाटले तरी तसे ते नाहीत हे पुढच्याच क्षणी वा पुढच्याच भेटीत जाणवे आणि म्हणूनच सर्वांना त्यांच्याविषयी आस्था, आदर व प्रेम वाटे. वयाच्या ६६ व्या वर्षी छोटेखानी सत्कार मेळाव्यात अनौपचारिक गप्पांमध्ये का होईना पण, ''तुम्ही अविवाहित का राहिलात?'' या प्रश्नाला ''मला स्त्रियांची भीती वाटत असे.'' असे दिलखुलास उत्तर कितीजणांनी दिले असते? असे उत्तर देणारे नेने स्त्री सहकारी, कार्यकर्त्या, विदुषी, स्त्री संशोधक अशा सर्वांशी समदृष्टीने कमालीचे छान वागत. परिवर्तन आणि क्रांती, समाजवाद आणि समाजसत्तावाद असे फरक स्पष्ट करून सांगणारे नेने ''मी अभ्यासक आहे, विचारवंत नाही'' असेही सांगत. ''आजकाल कोणालाही विचारवंत म्हटले जाते पण जी व्यक्ती वैचारिक/सैद्धांतिक/सात्विक योगदान देते तिलाच हा शब्द वापरणे योग्य आहे.'' असे ते स्पष्ट करत. हा त्यांचा नम्रपणा तर होताच पण, त्यांच्या शास्त्रशुद्ध विचारपद्धतीचाही तो परिपाक होता.

त्यांची ही सारी वैशिष्ट्ये आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, त्यांचे विचार आणि त्यांचे कार्य, त्यांचे योगदान आणि त्यांच्यातील दुर्दम्य आशावाद या साऱ्याचा मूलस्त्रोत काय होता? विसाव्या शतकाने दिलेल्या क्रांतिकारी परिवर्तनाचा विचार आणि मार्क्सवादी दृष्टिकोन हा त्याचा मूलाधार होता. मानवजातीच्या कल्याणासाठी 'समाजसत्तावाद' हीच पुढील विकासाची उचित अवस्था आहे असा ठाम विश्वास त्यांना होता. मानवी कर्तृत्वाबद्दल आणि विश्वाला गवसणी घालण्याच्या मानवाच्या क्षमतेबद्दल त्यांच्या मनात कोणताही संदेह नव्हता. अखेरच्या श्वासापर्यंत, सजग अवस्थेत असो वा ग्लानीत, घरी असो वा इस्पितळात, त्यांच्या मुखातून निराशेचा व हताशेचा उद्‌गार कधीही निघाला नाही. त्यांच्या वैचारिक निष्ठा, त्यांच्या जाणिवे-नेणिवेपर्यंत पक्क्या रूजल्या होत्या.

त्यांना केवळ भावनिक वा औपचारिक आदरांजली वाहणे हे त्यांचा अनादर करण्यासारखेच होईल. त्यांचा खरा आदर करायचा तर एकविसाव्या शतकात नव्याने क्रांतिकारी परिवर्तनाची विशाल प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणे हीच योग्य कृती ठरेल.

❑

नेनेसर

मृणालिनी आठल्ये

१४ जानेवारी, २००३ रोजी मी प्रथम नेनेसरांना भेटले. त्यावेळी माझ्या ऑफिसमध्ये मला त्रास दिला जात होता आणि त्या संदर्भात माझ्या एका मैत्रिणीने मला त्यांचे नाव सुचविले होते.

सरांकडे जाताना मनात थोडी भीती होती, पण त्यांना पाहिले आणि ते एकदम खूप जवळचे, अगदी आजोबा असल्यासारखे वाटले. त्यांनी माझी समस्या समजून घेतली आणि आपण यातून निश्चित मार्ग काढू असे आश्वासन दिले आणि ते पूर्णपण केले. तेव्हापासून आमचा ऋणानुबंध जुळला. मला ऑफिसमध्ये तेव्हा रोज मेमो मिळत आणि त्याचे स्पष्टीकरण चोवीस तासात द्यायचे असायचे. त्यावेळी मी त्यांना फोन करून मेमोचा विषय सांगत असे आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्याकडे गेल्यावर मेमोचे उत्तर लिहून तयार असायचे. मी त्यांना अनेक वेळा म्हटले की, मी आल्यावर तुम्ही मला सांगत जा. मी लिहून घेत जाईन, पण ते त्यांनी कधीही ऐकले नाही, उलट मलाच म्हणायचे, तुम्ही काही संकोच करू नका, मी काही विशेष करत नाहीए.

त्यांनी लिहून दिलेल्या पत्रांमुळे मी माझी अन्यायाविरुद्धची लढाई जिंकले. केवळ नेनेसर पाठीशी असल्याने मी पण खंबीरपणे उभी राहू शकले. मला यश मिळावे म्हणून त्यांनी पुण्यातल्या नामवंत, प्रतिष्ठित लोकांच्या सह्यांचे पत्र दिल्लीला पाठविले. माझ्यावर झालेल्या अन्यायाविषयी ते सगळ्यांना सांगत असत. मी गेलेले असताना जर कोणी दुसरे त्यांच्याकडे आले तर नेनेसर त्यांना सांगत, मी तुम्हाला सांगितले होते ना, त्याच ह्या मृणालिनीताई. हो, त्यांनी कधीही मला नुसतंच मृणालिनी म्हटले नाही, नेहमी मृणालिनीताई म्हणत असत. या छोट्या आणि वरवर साध्या दिसणाऱ्या गोष्टींमधूनच त्यांचा मोठेपणा दिसून येतो. आपण जाऊन बसलो आणि ते जर काही कामात असतील तर आल्यावर, 'सॉरी हं, तुम्हाला बसावे लागले', असे म्हणत असत. केवढा हा मनाचा मोठेपणा!

तशी मी अगदी सामान्य स्त्री, पण सरांचा स्वभाव आणि समोरच्याशी वागणे असे

असायचे की त्या सामान्यालासुद्धा आपण कोणीतरी विशेष आहोत असे वाटावे आणि हेच नेनेसरांचे असामान्यत्व होते, असे मला वाटते. त्यांच्याशी बोलण्यात २-३ तास केव्हा निघून जात, कळत नसे. खूप नव्या-नव्या गोष्टी त्यांच्याकडून समजत असत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ते स्वत:विषयी कधीही बोलत नसत. सरांना भेटेपर्यंत मला वाटत होते की, प्रत्येकजण स्वत:चा स्वार्थ असल्याशिवाय कोणाला मदत करत नाही, पण त्यांना भेटल्यानंतर समाजासाठी काम करणारी माणसंही या जगात आहेत आणि त्यांचा जर काही स्वार्थ असेल तर तो फक्त माणसं जोडणे, त्यांचे भले करणे एवढाच असतो.

नेनेसरांमुळे माझी विद्याताई बाळ यांच्याशी ओळख झाली. तोपर्यंत मी विद्याताईंचे 'मिळून साऱ्याजणी'मध्ये लेख वाचले होते. त्यांच्याशी माझी ओळख होईल आणि त्या माझ्या घरी येतील असे मला कधीही वाटले नव्हते. नेनेसर आणि विद्याताईंनी मला जी मदत केली आणि माझ्यावर जो विश्वास दाखविला त्यामुळे मी अन्यायाविरुद्ध लढू शकले. मी दोघांना एकदा माझ्या घरी यायची विनंती केली आणि त्यांनी लगेच ती मान्यही केली. फेब्रुवारी २००४ मध्ये विद्याताई आणि नेनेसर माझ्या घरी आले होते, तो दिवस मी कधीच विसरणार नाही. नेनेसरांनी मला बोलता-बोलता एकदा सांगितले होते की, त्यांना आईस्क्रिम खूप आवडते, म्हणून मी त्या दिवशी त्यांच्यासाठी आईस्क्रिम आणले होते आणि त्यांनीसुद्धा अगदी नि:संकोचपणे पोटभर आईस्क्रिम खाल्ले. ते सहसा कोणाच्या घरी जात नसत, पण त्यांनी माझे आमंत्रण स्वीकारले हा त्यांचा मोठेपणा. सर प्रत्येकाला बरोबरीची वागणूक देत असत. ते कधीही कोणाला कमी लेखत नसत. या ६-७ वर्षांच्या सहवासात मी त्यांना कधीही कोणाविषयी वाईट बोलताना, कोणाची टिंगल करताना ऐकले नाही. मला नेहमी वाटते आपल्या प्रत्येकात थोड्याफार प्रमाणात जरी हे गुण आले तर आपले जीवन खूप सुखी होईल.

नेनेसर एवढे मोठे असून खूप साधे होते. मी त्यांना फोन केला आणि ते जर घरी नसतील तर आल्यावर आठवणीने मला फोन करत. ते जर ४-५ दिवसांसाठी पुण्याबाहेर जाणार असतील तर मला तसे सांगत आणि शक्य असेल तर तेथला फोन नंबर पण देत. कारण अचानक जर काही प्रॉब्लेम आला तर मला त्यांच्याशी संपर्क साधता आला पाहिजे. हल्ली कोण कोणाची एवढी काळजी करतं? अगदी आपले म्हणविणारे सुद्धा संकटं आली की आपल्यापासून दूर जातात. ते एकटे राहत पण त्यांच्या घरी गेल्यावर चहा-कॉफी-सरबत दिल्याशिवाय ते जाऊ देत नसत. एखादे वेळी ते गडबडीत असतील तर पुढल्या वेळी आपण नक्की कॉफी पिऊ असे म्हणत आणि ते लक्षात ठेवत.

नोबेल पारितोषिक मिळविलेल्या स्त्रियांवर त्यांनी 'मिळून साऱ्याजणी' मध्ये एक लेखमाला लिहिली होती. त्यातील १-२ लेख त्यांनी मला स्वत: झेरॉक्स करून पाठविले होते. सरांना भेटेपर्यंत ऑफिस आणि घर एवढेच माझे विश्व होते. पण त्यांच्यामुळे

समाजाकडे बघण्याची एक नवी दृष्टी मला मिळाली. दुसऱ्यांना नि:स्वार्थीपणे मदत करण्यात काय समाधान असते ते मला समजले. स्पाँडिलेसिसचा त्रास असूनसुद्धा ते तासन्-तास बसत. अलीकडे तर त्यांनी कॉम्प्युटर शिकायला सुरुवात केली होती. म्हणजे अगदी क्लास लावला होता आणि नियमितपणे जातसुद्धा होते. त्यांचा हा उत्साह एखाद्या तरुणाला लाजवेल असा होता. कोणतीही नवीन गोष्ट शिकायला वयाचे बंधन नसते हे त्यांनी अक्षरश: दाखवून दिले.

५-६ वर्षांपासून मी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य करते आहे. पुण्यातल्या १०-१२ स्वयंसेवी संस्था-संघटना मिळून दरवर्षी २६ ते ३० जानेवारी दरम्यान 'लोकशाही उत्सव' साजरा करतात. हे मला नेनेसरांमुळे समजले आणि जानेवारी २००६ मध्ये येरवडा-वडगाव शेरी-चंदननगर परिसरात प्रथमच आम्ही 'लोकशाही उत्सव' साजरा केला आणि लोकांना तो अतिशय आवडला. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी केवळ नेनेसरांमुळे मी करू शकले.

नेनेसर आजारी असल्याचे समजल्यावर खरं तर मला त्यांना भेटायला जायचे होते. पण काही ना काही कारणामुळे राहून गेले, याची मला कायम रुखरूख वाटत राहील. ते दवाखान्यातून घरी आल्यावर मी त्यांना फोन केला होता. आवाज अगदी खोल गेला होता, दम देखील लागत होता. मी त्यांना म्हटले की, तुम्ही जास्त बोलू नका, त्रास होईल. पण त्यांना बोलायचे होते. म्हणाले की 'नाही, मला काही त्रास होत नाहीए, तुम्ही बोला', आणि अगदी आस्थेने माझी चौकशी केली.

आजही मला त्यांची सतत आठवण येते. काही नवीन करायचे असेल तर मी त्यांना सांगत असे, त्यांचा सल्ला घेत असे. त्यांच्याबरोबर काही काळ मला काम करायला मिळाले, हे मी माझे भाग्य समजते. त्यांनी मला केलेली मदत मी शब्दांत नाही मांडू शकत, पण त्यांना श्रद्धांजली म्हणून केलेला हा एक प्रयत्न.

❑

मला भावलेले नेने

विनया मालती हरी

नेनेंची माझी पहिली भेट नेमकी कधी झाली हे सांगता यायचं नाही. पण मे १९८३ मध्ये टिळक स्मारक येथे जागतिक शांततेसाठी झालेल्या सभेत त्यांचं पहिलं भाषण ऐकलेलं लक्षात आहे. डेक्कन ते टिळक स्मारक अशा निघालेल्या शांतता मिरवणुकीनंतरची सभा. माझी मुलगी नूपुर तेव्हा एक महिन्याची होती. मिरवणुकीतील सर्वात लहान वयाची मोर्चेकरी असा त्यावेळी तिचा झालेला उल्लेखही मला स्पष्ट आठवतो. जागतिक शांतता संघटनेचे नेते पेरिन व रोमेशचंद्र यांचे यावेळी मार्गदर्शन लाभले होते. ते दशक म्हणजे रशिया-अमेरिकेच्या शीतयुद्धाचा काळ होता. अनियंत्रित शस्त्रास्त्र स्पर्धेचा धोका वाढत होता. त्यावेळी शांततेसाठी चळवळ ही फार महत्त्वाची होती. अखिल भारतीय शांतता व भ्रातृभाव संघटनेची अखिल भारतीय परिषद होणार होती. त्याचा प्रचार व तयारी म्हणून हा कार्यक्रम होता. पुण्याच्या पश्चिम भागातील मराठी शाळांनी प्रतिसाद दिला नाही. मात्र नेनेंनी चिकाटी सोडली नाही. कार्यकर्त्यांच्या मदतीने कँप मधील शाळांमध्ये जाऊन नेनेंनी स्वत: प्रचार केला व कार्यक्रमात अनेक शाळांचा सहभाग मिळाला. विचारवंत असूनही अगदी सहजतेने प्रत्यक्ष लोकांपर्यंत जाऊन त्यांची प्रचार करण्याची तयारी. नेनेंची वैचारिक स्पष्टता आणि कृतीविषयक तळमळ अशा असंख्य प्रसंगातून दिसे.

चळवळीतील माझ्या सुरुवातीच्या काळात विद्वान लोकांपासून मी चार हात लांबच असायची. परंतु नंतरनंतर नेनेंच्या बाबतीत माझी भीड चेपली ती नेनेंनी दाखवलेल्या अगत्यामुळे व स्नेहामुळे. काही वर्षातच आम्ही त्यांच्या घराजवळ राहायला आलो. त्यांच्याकडे न सांगता कितीही वाजता जाता यायचे. घरी गेले की स्वत: चहा करून देणे, आवर्जून काहीतरी खायला देणे हे ते नेहमीच करत. एकदा तुम्हाला स्पेशल चहा पाजतो म्हणून आसामचा ४०० रु. किलोवाला चहा पाजला होता. त्याची चव विचित्र होती. त्यांनी इतका कौतुकाने चहा केला त्यामुळे मी छान आहे असं म्हटलं तरी बहुतेक माझ्या चेहऱ्यावरून त्यांनी ओळखलं की हिला काही चहा आवडलेला नाही. आणि परत काही तो चहा त्यांनी पाजला नाही.

त्यांच्याकडे राहाणाऱ्या मावशी - अनुराधा पारटे - सर्वच कार्यकर्त्यांच्या परिचयाच्या. आधी त्यांची नणंद नेनेंकडे काम करायची, मग या काम करायला लागल्या. त्या आपल्या छोटीला घेऊन कामाला यायच्या. अनुराधाबाईंची अडचण लक्षात घेऊन नेनेंनी त्यांना घरी ठेवून आधार दिला तो कायमचाच. अनुराधाबाई सांगत की नेनेंनी कधीही त्यांच्या स्वयंपाकाला नावं ठेवली नाहीत. तसेच त्यांची राहायची सोय केली म्हणून त्यांचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर कामाचा बोजा टाकला नाही. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा तर होताच, शिवाय कष्टकरी वर्ग व महिलांच्याबद्दल असलेली आत्मीयता आणि अंगात बाणलेली समानतेची आधुनिक मूल्ये याचेच हे प्रतिबिंब होते.

नेने, कॉम्रेड विजयाताई भागवत, वासंती फडके व उदय यांचे छोटे कम्युनच कुलकर्णी पेट्रोल पंपाच्या इमारतीत होतं म्हटलं तर वावगं होणार नाही. ते आणि विजयाताई यांचे पीपल्स बुक हाऊस हे केळकर रोडवरचं पुस्तक दुकान आजही स्पष्टपणे डोळ्यासमोर दिसतं. सर्व डाव्या-पुरोगामी कार्यकर्त्यांना वैचारिक व साहित्यिक पुस्तकांचा खजिना इथे उपलब्ध होत असे. त्यातून त्यांना किती पैसे मिळायचे हा प्रश्नच आहे. परंतु निष्ठेने चळवळीचे काम म्हणून या दोघांनी ते केले. निरलसपणे नेने काम करीत राहिले. अशा सगळ्या लोकांमुळे आमच्या पिढीवर वेगळे संस्कार झाले यात शंकाच नाही.

नेनेंची आणखी एक लक्षात ठेवण्यासारखी आठवण म्हणजे 'सहमत'च्या प्रदर्शनाच्या वेळची. बाबरी मस्जीद पाडल्यानंतर रामाच्या इतिहासासंदर्भातील एक प्रदर्शन सहमतने बनवले होते. या प्रदर्शनावर देशभर हिंदुत्ववाद्यांनी विवाद उभा केला होता. हे प्रदर्शन जनवादी महिला संघटनेच्या पुढाकाराने इतिहास संशोधक मंडळात लावायचे ठरले. सकाळी १०वाजता उद्घाटनापूर्वी नेहमीच्या शिस्तीने नेने वेळेत हजर होते. मी शेवटचे पोस्टर लावत होते. दिल्लीचे कार्यकर्ते होते, पण स्थानिक कार्यकर्ते मंडळी अजून यायची होती. तेवढ्यात भगवा टिळा लावलेल्या १५-२० हिंदुत्ववाद्यांनी आत शिरून 'जय शिवाजी, जय भवानी'च्या घोषणा देण्यास सुरुवात केली. उद्घाटनात व्यत्यय आणून पोस्टर फाडण्याचा त्यांचा विचार होता. नेने व मी मध्ये पडलो. धावत जाऊन जवळच्या पेरुगेट चौकीतील पोलिसांकडे तक्रार दिली, ते आले. साऱ्यांना त्यांनी पकडून नेले. उद्घाटनाचा कार्यक्रम करून मी व नेने रीतसर तक्रार द्यायला चौकीत गेलो. त्यावेळी पोलिस उपायुक्तांबरोबर अस्खलित इंग्रजीत, शांतपणे वाद घालून त्यांना नामोहरम केलेले मी पाहिले. तेव्हा त्यांची एक वेगळीच झलक दिसली. माझ्यासारख्या असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या आणि सतत आक्रमक पवित्रा घ्यावा लागणाऱ्या कार्यकर्तीला पोलिसांना शांतपणे कसे नमवायचे हे शिकायला मिळाले. त्याचप्रमाणे १० वर्षांनंतर केस उभी राहिली, तेव्हा अटक झालेले लोक साधे पण भडकवले गेलेले आहेत हे लक्षात घेऊन त्यांना केवळ माफीवर सोडून देण्याचे राजकीय शहाणपणही मी शिकले. राजकीय नेत्याप्रमाणे कधीही फारसे प्रकाशझोतात नसलेल्या, अतिशय

शांत-साध्या व्यक्तिमत्त्वातसुद्धा जो ठामपणा दिसला तो त्यांच्या प्रगाढ वैचारिकतेतून, लोकशाहीवर असलेल्या विश्वासातूनच होता याचे प्रत्यंतर मला आले.

त्यांच्या बरोबरची मैत्री कशी वाढली आणि कॉम्रेड नेने असा औपचारिकपणा जाऊन नेनेकाका कधी म्हणायला लागले हे नक्की सांगता येत नाही. त्यांचा आग्रह असला तरी वयाने एवढ्या मोठ्या माणसाला अरेतुरे म्हणणं पटत नव्हतं. कदाचित ते माझ्यावरचे जुने संस्कार असतील पण केवळ वयामुळे नाही तर त्यांच्या या साऱ्या वैचारिक व जीवनकार्यामुळे जो आदर राहिला तो यातून व्यक्त करता येतो असं वाटलं. त्यांनीही ते स्वीकारलं. त्यांच्यामुळेच ताहेरभाई पूनावालांसारख्या ज्येष्ठ व्यक्तीची व भार्भीची जवळून ओळख व मैत्री झाली. मी व दत्ता दोघेही नोकरी सोडून पूर्णवेळ कार्य करतो हे नेनेंकडून ताहेरभाईंना कळल्यावर त्यांचे दोन दिवसात आम्हाला अतिशय प्रोत्साहनपर पत्र आले. नेने म्हणाले, ...तुमच्याकडून हे कळण्याची वाटच पहात होतो. अशी आवर्जून पत्रे पाठवण्याची त्यांची सवय आहे. तुम्ही उत्तर नक्की लिहा... एवढे म्हणून ते थांबले नाहीत तर इंग्रजी पत्राचा मसुदा नेनेंनी पाहिल्यावर मगच ते पत्र पाठवलं. अशा सगळ्या बारीकसारीक गोष्टी करायला त्यांच्याकडे कुठून ऊर्जा येई कळत नसे. केवळ एक वेळ जेवून ही सगळी कामं ते अतिशय उत्साहाने करायचे! पाठीचे, हाताचे दुखणे असूनही थकल्याचे कधीच त्यांनी दाखवले नाही. ते अविरत काम करीत राहिले, अगदी शेवटी शेवटी संगणकही शिकले. वेगवेगळ्या मेलचा भडीमार सर्वांवर करीत राहिले. कोणाविषयी त्यांनी कधी तुच्छता दाखवली नाही की गॉसिपिंग केलेलेही मी कधीच पाहिले नाही. त्यांच्या जगण्यामागे व कार्यामागे असलेली मार्क्सवादाची वैचारिक पकड ही या साऱ्याचा आधार होती. त्याशिवाय हे शक्यच नव्हते. असे मध्यमवर्गीय, विचारवंत-अभ्यासक मोठ्या प्रमाणावर कार्यात उतरले तर...? तर नक्कीच परिस्थितीत बदल होतील. परिवर्तनाचा इतिहास जागता ठेवणाऱ्या नेनेंसारख्यांना आदरांजली वाहताना येत्या काळात मध्यमवर्गाकडून मोठी अपेक्षा आहे. ही अपेक्षा हा वर्ग पुरी करेल असा विश्वास वाटतो.

❑

आदरणीय मित्र

सुनीती सु. र.

रा.प.नेने असं भारदस्त नाव आणि त्याला साजेसं प्रगल्भ, गंभीर व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तीशी आपली 'मैत्री' होईल असं मला ३० वर्षांपूर्वी स्वप्नातही वाटलं नसेल. ऐंशीच्या दशकात, लग्न होऊन पुण्यात आल्यानंतर मी ओघानेच बाबा आढावांकडे म.फुले समता प्रतिष्ठानच्या ऑफिसवरच्या अभ्यासमंडळांना नियमित जाऊ लागले तेव्हाही 'रा.प.नेने' या नावाचा तिथे दबदबाच होता. त्यांची संयत-ठाम शैली, प्रगल्भता, संदर्भश्रीमंती या सर्वांमुळे एक प्रकारचा भीतियुक्त आदरच त्यांच्याविषयी सुरवातीपासून निर्माण झाला आणि तो आदर उत्तरोत्तर वाढत जाऊन(ही) भीतीची जागा मैत्रीने कधी घेतली हे मलाच सांगता येणार नाही. एवढं नक्की म्हणता येईल की याचं सगळं श्रेय नेनेसरांकडेच जातं. 'रा.प.नेने' या दूरस्थ नावापासून ते क्रमाक्रमाने 'नेनेसर' आणि अखेर नुस्तेच 'नेने' कधी आणि कसे झाले? वेळीअवेळी (- ''कधीही करा हो तुम्ही फोन; हरकत नाही''- चं अभय त्यांच्याकडून मोकळेपणाने मिळालेलं असल्यामुळे अक्षरश: वेळी-अवेळी) संदर्भ विचारण्यासाठी, माहिती तपासून घेण्यासाठी केलेल्या फोनला उत्साहाने त्यांनी दिलेल्या प्रतिसादांतून, त्यातील अचूकतेसाठी त्यांनी केलेल्या मेहनतीतून हे नातं दृढ होत गेलं; की कुठल्याही परीक्षेच्या घडीला - विशेषत: आंदोलनांच्या पातळीवर - त्यांची आश्वासक साथ-सोबत मिळण्यातून ते विणलं गेलं? की लोकशाही उत्सवासारख्या, अनेक संस्था-संघटनांनी मिळून चालवलेल्या उपक्रमात अखेर (आलटूनपालटून दरवर्षी बदलणाऱ्या साथींसोबत) नेनेसर, शांताताई रानडे, मिलिंद चव्हाण, अंजलीताई मुळे आणि एनएपीएमचे मी-विनय-सुहास असे एवढेच चिकाटीने भेटत राहिलो, ठरवत राहिलो, पार पाडत राहिलो, त्याची मजा घेत राहिलो, स्वत:ची आणि एकमेकांची पाठ थोपटून घेत राहिलो, त्या अनौपचारिक भेटींतून घडत गेलं? काहीही असो, त्या नात्याच्या बांधणीत एक टक्काही श्रेय आपलं नाही; आहे ते सर्व नेनेंचंच आहे - हे आज, ते नाहीत आता, अशा वेळी तर अधिकच तीव्रपणे वाटून-दाटून येतंय.

मला आठवतंय, नर्मदा आंदोलनाच्या सुरवातीच्या काळापासून नर्मदा समर्थक

गावाच्या स्नेहसदनमध्ये होणाऱ्या मंगळवारच्या मीटिंग्जना नेने आवर्जून यायचे. शांतपणे आपलं मत मांडायचे. ज्या विकासनीतीला आंदोलन विरोध करत होतं त्या विरोधाविषयी त्यांचे निश्चितपणे काही मूलभूत मतभेद होते. ते ते गंभीरपणे, ठामपणे मांडत. मात्र आंदोलनाच्या एकंदर भूमिकेला, विस्थापनविरोधाला, जे मुद्दे आम्ही आकडेवारीनिशी मांडत होतो त्या मुद्द्यांना त्यांचा मन:पूर्वक (यात विचारपूर्वक अध्याहृत - कारण नेनेंचं सर्वच मन आणि विचार या दोन्ही पातळ्यांवर संतुलित असं असे -) पाठिंबा होता, तो कायम राहिला. १९९३ मध्ये, जलसमर्पण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही उपोषणाला बसलो तेव्हा कलेक्टर ऑफिससमोर उन्हापावसात आमच्यासोबत नेने बसून राहिले होते. मात्र, सरकारने पुनर्विचार समितीची मागणी मान्य केल्यावर मीटिंगमध्ये उत्साहाच्या भरात मी 'विजय मिरवणूक' वगैरे काढण्याचा (बालिश) प्रस्ताव ठेवला तेव्हा - ''तसे काही करू नका. हा काही अंतिम विजय नाही. आणखी खूप लढाई बाकी आहे'' - हे मला तिथल्या तिथे तोडत नेनेंनी म्हटलं तेव्हा मी चांगलीच वरमले होते आणि अर्थातच त्यांचं मानलंही होतं. पण त्यांच्यासमोर कुठलाही कॉम्प्लेक्स कधीच येत नसे हे त्यांचं वैशिष्ट्य. अनेक शिष्टमंडळांत, नेने सोबत असायचे तेव्हा त्यांच्यासोबत असण्याची आश्वासक ऊब मी अनुभवली आहे. अशा वेळी, सर्वांत आणि सर्वार्थाने सीनियर असूनही, त्या-त्या आंदोलनाचा प्रमुख कार्यकर्ता या नात्याने ते पुढे व्हायला लावत, आग्रहपूर्वक मुख्य मांडणी करायला लावत आणि त्या-त्या मीटिंगनंतर मन:पूर्वक (म्हणजे मोजक्याच शब्दात, तुमच्यापुरतंच) कौतुकही करत. माझा व्यक्तिगत अनुभव तर असा आहे की अशा प्रसंगी भीड चेपण्याचं बळ आणि कौशल्य मला मिळण्यात मोठा वाटा नेनेंचा आहे.

आज आठवतंय ते नर्मदा, एन्रॉन ते अगदी अलीकडे माण, लवासा इथपर्यंतच्या लढ्यांत त्यांचं आमच्यासोबत असणं. आठवतंय ते एन्रॉन हटल्यावर १ जानेवारीला नववर्षाचं स्वागत गुहागरच्या समुद्रावर जोशात करून परतताना रात्रभर बसमध्ये म्हटलेली गाणी आणि त्यामध्ये आम्ही सगळ्यांनी (- विद्याताई बाळांपासून तर अजित अभ्यंकर, मिलिंद चव्हाण, असे आम्ही सगळे -) नेनेंनाही गायचा केलेला आग्रह आणि त्यांचं ते संकोचणं...! आठवतंय ते माणला पोलिसांनी गोळीबार केल्याची खबर येताच एका हाकेसरशी तिकडे आमच्यासोबत यायला निघालेले नेने (अशी हक्काची आणि आश्वासक दुसरी व्यक्तीही त्यावेळी अर्थातच सोबत होती - भाई वैद्य!) आणि जीपमधल्या त्या काळजीयुक्त तणावाच्या तासाभराच्या प्रवासातही ''- पण विकास करायचा असेल तर जमीन नको का? शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणार असेल तर विरोध कशासाठी? -'' या मुद्यावर झालेली गरमागरम चर्चा आणि तिथे पोचल्यावर, आपले मुद्दे सौम्यपणे मांडत, ''शेतकऱ्यांना जमीन विकायची नसेल तर सरकारने सक्ती करता कामा नये'' असा, आंदोलनाला त्यांनी केलेला ठाम सपोर्ट.

हे सर्व होतं म्हणून तर अगदी नंदीग्राम-सिंगूरवरही आम्ही व्यक्तिगत कटुता येऊ

न देता चर्चा करू शकलो - शकायचो. 'विकास आणि त्याची द्यावी लागणारी किंमत' याबाबत त्यांची भूमिका ना मी बदलू शकले, आणि 'पण ती किती, कुणी चुकवायची आणि कुणासाठी?' हा माझा प्रश्न - याभोवती आम्हा दोघांची चर्चा प्रत्येक-प्रत्येक लढाईच्या वेळी रंगली आहे आणि तरीही त्या प्रत्येक-प्रत्येक लढाईत नेनेंची नि:संदिग्ध, ठाम साथ राहिली आहे.

२०१० च्या जानेवारीत 'लोकशाही उत्सवा'त नेने सहभागी होऊ शकले नाहीत. मिलिंद जाऊन त्यांच्याशी शेअर करत राहायचा, पण मला जाणं जमलं नाही. पूर्वतयारीच्या काही बैठकींना ते आले आणि नेहमीच्याच हुरुपाने कार्यक्रम ठरवण्यात सहभागी झाले खरे, पण प्रत्यक्ष 'उत्सवात' नेनेंचं नसणं आम्हा सर्वांनाच हुरहुर लावणारं होतं. अगदी अखेरपर्यंत, आपण रिक्षापर्यंत पोचवायला आलो की किंचित सुखावत, पण त्याहूनही संकोचत, ''तसं जमतंय मला सगळं, पण'' - म्हणत केलेली तब्येतीची तक्रारही इतकी सौम्य, की त्यांना तसं एकट्यांना रिक्षात बसवून परत जाताना वाटणारा अपराधभावही तात्कालिक होऊन जायचा.

नेनेंच्या काही वैशिष्ट्यांबद्दल मला नेहमीच कोडं पडायचं. त्यातला एक विषय म्हणजे त्यांना वाटणारा गांधींबद्दलचा, त्यांच्या नेतृत्वशैलीबद्दलचा आदर-कौतुक. या विषयावर ते चक्क काहीशा अभिनिवेशानं बोलत. इतकं की या विषयावर त्यांनी गांधीवादी मंडळींचं (- आणि मार्क्सवादी मंडळींचंही -) अभ्यासमंडळ घ्यावं असं मी गमतीनं म्हणत असे.

दुसरं म्हणजे इतकं काटेकोर, नीटनेटकं, शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व; पण त्यांना लेख देण्याची वेळ मात्र कधीही पाळता येत नसे. आपण फोन करकरून त्यांना छळू लागलो की ते अगदी संकोचून पुढच्या तारखेचा वायदा करायचे. आणि डेडलाईनही उलटून गेली की मी अगदी जाऊन बैठकच मारायचे तेव्हा (आता मी येणार या 'धमकी'मुळे!) पूर्ण केलेला लेख हातात ठेवताना पुन्हा तोच संकोच, माफी मागणारा स्वर यांसोबत (बहुतेकदा कोकम) सरबताचा ग्लासही पुढे येई. हातात पडे तो त्यांचा एकटाकी, दुरुस्त्या असल्या तरी सुस्पष्ट-व्यवस्थित, किंचित गोलगोल अक्षरातला मुद्देसूद लेख. तो परिपूर्ण करण्याच्या नादातच खरं तर टाईमटेबल गडबडलेलं असे. क्वचित त्यानंतरही - ''तुम्हाला सहज शक्य असेल तर -'' म्हणत काही सूचना येत, ज्या मी आनंदाने मान्य करायची. मात्र अगदी विरामचिन्हातही बदल झालेला त्यांना चालत नसे. नेनेंचा लेख मी आणि विभावरी मूळ कॉपीतून दोनदोनदा वाचून घेत असू.

हा आमचा सिलसिला 'आंदोलन'च्या वाटचालीत दीर्घकाळ चालला. लॅटिन अमेरिकेवरील (दिवाळी २००६) विशेषांकात तर त्यांनी लॅटिन अमेरिकेतल्या प्रत्येक देशाची इत्यंभूत माहिती परीश्रमपूर्वक काढून (त्याच एकटाकी, सुंदर, स्वच्छ अक्षरात) दिली तेव्हा मी त्यांना मनोमन - आणि प्रत्यक्षही - सलाम केला!

अलीकडच्या काळात नेनेंना इंटरनेटचा छंद म्हणा, नाद म्हणा, लागला होता.

कॉम्प्युटर त्यांनी झपाट्याने आत्मसात केला. आणि मग दुनियाभरच्या विविध विषयांवरच्या गमतीजमती दररोज मेलबॉक्समध्ये येऊन पडू लागल्या. पहिल्यापहिल्यांदा मी 'नेनेंकडून आलेलं' म्हणून उत्सुकतेने पाहिलं. मग मात्र गडबडीत मागे पडू लागलं. नेनेंना मी हे (नको तितक्या परखडपणे) सांगितलं तेव्हा ताबडतोब त्यांच्या मेल येणं बंद झालं; इतकं, की मला त्यामुळे बेचैन होऊ लागलं. मग एक लांबलचक खुलासा केला की अहो नेने, मग तुम्ही काही गंभीर, महत्त्वाचं पाठवलंत तरी 'पाहू नंतर' म्हणत पाहायचं राहून जाऊ शकतं, त्यामुळे तुम्ही 'गंभीर' आणि 'गमतीदार' अशा काही खुणा करून पाठवत जा पाहू! त्यावर लगेच नेहमीच्या सकारात्मकतेने ते घेऊन, ''हो-हो, तसा प्रयत्न करेन मी'' - म्हणत, तो 'बहिष्कार' उठला आणि त्यांच्या मेल (बहुदा गाळून) पुन्हा येऊ लागल्या.

''नेने, तुमच्यापेक्षा मी दीड पिढीने तरी लहान आहे. तेव्हा प्लीज मला 'अहो-जाहो' म्हणू नका'' हा माझा आग्रह सस्मित (ही नेनेंची खास मुद्रा) नाकारताना - ''ते वळण पडलं आहे जिभेला. कुणालाही एकेरी संबोधणं मला अंमळ जडच जातं. तेव्हा तुम्ही आग्रह करू नका'' असं म्हणत त्यांनी ठाम नम्रपणे (हीदेखील त्यांच्या शैलीची खासियत) धुडकावला होता. आपल्या व्रतस्थशा व्यक्तिमत्त्वापेक्षा काहीसं वेगळं वागत आमच्या ग्रामोद्योग मित्रमंडळाच्या खादीच्या प्रदर्शनात बहिणींसाठी खादी सिल्कच्या साड्यांची चिकित्सकपणे दणदणीत खरेदी करताना नेनेंना तुम्ही पाहायला हवं होतं. ''नेने, तुम्ही इंग्लंडातच जन्मायला हवं होतंत!'' म्हटल्यावर ते सस्मित स्वीकारत ''खरोखरच मला ब्रिटिश शिस्त आवडते'' म्हणत ते कौतुक झेलणारे नेने, ''तुम्ही लग्न का केलं नाहीत? एका सहिष्णु नवऱ्याला महिलावर्ग मुकला ना!'' म्हटल्यावर एकदा त्या विषयावरही गंभीरपणे बोललेले नेने... अशी त्यांची कितीतरी रूपं याक्षणी मनापुढे उमटताहेत - आणि या सर्वांच्याही पलीकडे, ते आता भेटणार नाहीयेत - ही लागलेली, न संपणारी हुरहुर!

❑

येथे कर माझे जुळती

प्रा. शमसुद्दिन तांबोळी

समाजपरिवर्तन, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांच्या आग्रहासाठी आंदोलन करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध सामाजिक संघटनांच्या पाठीशी यथाशक्ती (सर्वशक्तीने) उभे राहणारे रा.प.नेने मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे एक आधारस्तंभ होते. या मंडळाबद्दल केवळ आस्थाच नाही तर या चळवळीच्या वाटचालीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान करणाऱ्या निवडक विचारवंतांमध्ये रा.प.नेने यांचे स्थान अग्रस्थानी आहे. कार्यकर्त्यांचे आणि चळवळीचे वैचारिक अधिष्ठान अधिकाधिक तर्कशुद्ध, अचूक आणि परिपक्व असावे यासाठी आग्रही असणाऱ्या नेने यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या बौद्धिक शिबिरात, परिसंवादात, मेळाव्यात आणि जनआंदोलनांच्या विविध उपक्रमांत सातत्याने आणि सक्रिय सहभाग घेतला. सय्यदभाई नेहमी त्यांच्या संपर्कात असत व त्यांच्याशी चर्चा करून भूमिका घेत असत.

धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्य, काश्मीर प्रश्न, अयोध्या प्रश्न, समान नागरी कायदा, राष्ट्रीय एकात्मता, दहशतवाद यांसारख्या विषयांवर त्यांचा सखोल अभ्यास होता. कोणत्याही विषयावर बोलताना त्यांच्या टिपणांमध्ये ऐतिहासिक संदर्भ, उदाहरणे, विश्लेषण यांचा आधार घेऊन शांतपणे त्यावर भाष्य करणे ही त्यांची ख्याती. कार्यकर्त्यांच्या वैचारिक जडण-घडणीत त्यांचे विचार महत्त्वपूर्ण ठरून पुढील अभ्यासासाठी प्रेरणा देणारे असत. केवळ अभ्यासपूर्ण विवेचन न करता त्या विचारांचा पाठपुरावा आणि प्रसार करण्यासाठी कार्यक्रम कशा स्वरूपात आयोजित केले पाहिजेत यासाठी ते सूचना करीत. परंतु आपल्या सूचना या सूचना आहेत त्या आपापल्या मर्यादा ओळखून कशा राबवाव्यात हे ते त्या चळवळीवर सोपवत. ''ही माझी सूचना आणि प्रामाणिक मत आहे यावर आपण विचार करावा एवढेच मला सुचवायचे आहे'' असे एक वाक्य शेवटी जोडलेले. सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करताना आर्थिक अडचणीही असतात याची दखल घेऊन आपल्या जवळच्या मित्रांना त्याची कल्पना देऊन, पैसे जमवून चळवळीतील कार्यकर्त्यांकडे सोपवणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग होता.

अतिशय मृदु स्वभावी रा.प.नेने भाषेचा, शब्दांचा विचारपूर्वक आणि नेमक्या पद्धतीने वापर करीत. सर्वसामान्यांना रुक्ष किंवा कंटाळा असणाऱ्या विषयावर विवेचन करताना विनोदी किस्से सांगण्यातही त्यांची हातोटी होती. ऐकणाऱ्यांबरोबर आपल्या खास शैलीतील त्यांचे हसणे अनेकांच्या स्मृतीतून बाहेर पडणे शक्य नाही. ऐतिहासिक, सामाजिक, साहित्य क्षेत्रातील मान्यवरांच्या व्यक्तिमत्त्वांतील आणि खासगी जीवनातील विनोदी आणि विसंगत किस्से सांगताना - महापुरुषांचे पायदेखील मातीचेच असतात, खासगी जीवनात अपघाताने आणि अपरिहार्यतेतून काही न पटणाऱ्या गोष्टी घडतात आणि अशा घटना या मानवी स्वभावातील गुणदोषांचा भाग म्हणून स्वीकारल्या पाहिजेत, अशा घटनांचा त्या माणसाच्या सामाजिक मूल्यमापनात समावेश असू नये, या घटनांकडे फार सौम्यपणे पाहिले पाहिजे अशी 'टिप्पणी' द्यायला ते विसरत नसत.

रा.प.नेने हे स्वत: बुद्धिप्रामाण्यवादी होते परंतु बुद्धिप्रामाण्यतेपेक्षा 'विवेकवादी' हा शब्द त्यांना अधिक भावणारा होता. बुद्धिप्रामाण्यतेमध्ये वास्तव असते परंतु विवेकवादामध्ये सामाजिक संदर्भात योग्य-अयोग्यतेचा विचार व भान असते. अनेक वैज्ञानिक शोधात बुद्धिचाच वापर असतो परंतु मानवाच्या व्यापक-दूरगामी हितासाठी ते किती उपयुक्त आहे हे 'विवेकवाद' ठरवत असतो. तसेच सर्वसामान्यपणे 'अजात-शत्रू' हा शब्दसुद्धा नेनेंना खटकणारा होता. 'अजातशत्रू' हे विशेषण आपल्या तत्त्वांशी-विचारांशी तडजोड केल्याशिवाय मिळत नाही. अजातशत्रू होण्यासाठी सर्वांना खूष ठेवण्याचा, मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न होतो. रूढीप्रिय लोकांमध्ये सुधारणा करायची असेल तर विरोध होणार आणि लोक दुखावणार हे गृहितच असते. म्हणून एखाद्या सामाजिक कार्यकर्त्यासंदर्भात अजातशत्रू हे विशेषण वापरल्यास त्या कार्यकर्त्याच्या हेतूबद्दल शंका उपस्थित होतात असे त्यांचे मत होते.

आपल्या विचारांशी आणि मतांशी प्रामाणिक असणाऱ्या रा.प.नेने यांच्यावर परिवर्तनवादी चळवळीतील काही कार्यकर्त्यांनी नेने हे 'हिंदुत्ववादी विचारांना पुष्टी देतात' असे आरोपही केले. मला आठवतं, 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन' च्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या मध्यंतरात एक कार्यकर्ती वाद घालत असताना त्यांच्यावर हा आरोप केला होता. नेनेंना याबद्दल खंत वाटली परंतु ते एवढेच म्हणाले ''मला जे वाटते ते मी मांडले. आता मला काय ठरवायचे ते तुम्ही ठरवा.''

मध्यंतरीच्या काळात म्हणजे हिंदू जमातवादी शक्तींच्या दहशतवादी कारवाया उघड होण्यापूर्वी - भारतीय संसदेवरील हल्ला, अक्षरधाम मंदिरावरील हल्ला, मुंबईतील विविध स्फोटांच्या मालिका, काश्मीरमधील परिस्थिती आणि मुस्लिम जमातवादी लोकांकडून होणाऱ्या विघातक प्रकारांबद्दल, पुरोगामी मुस्लिम लोकांनी पत्रके काढून, उपोषण करून, मोर्चे काढून किंवा अन्य पद्धतीने निषेध नोंदवावा, पाहिजे त्या प्रमाणात पुरोगामी लोक या संदर्भात भूमिका घेत नाहीत यामुळे चांगले चित्र समोर येत नाही व

त्याचा परिणाम वाईट होतो अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या या भूमिकेला विरोध करताना ती कार्यकर्ती म्हणाली, ''आमच्या राष्ट्रनिष्ठा पुन्हा-पुन्हा सिद्ध करण्यासाठी आमच्या गळ्यात पाट्या बांधायच्या का? आम्ही राष्ट्रीय आहोत याचे पुरावे द्यायचे का?'' रा.प.नेने यांचा एवढाच आग्रह होता की, मुस्लिमांचा, मुस्लिम जमातवाद्यांना विरोध आहे, सर्व समाजास वेठीस धरले जाऊ नये यासाठी तरी पुढे यायला पाहिजे आणि थोडे जास्तीचे प्रयत्न झाले पाहिजेत. रा.प.नेने यांचे जवळचे मित्र डॉ.सत्यरंजन साठे यांच्यावरही असे आरोप होत असल्याचे आठवते, परंतु त्या दोघांनीही त्याची पर्वा केली नाही.

एकदा ताहेरभाई, सदा डुंबरे, रा.प.नेने, गुत्तीकर आणि मी दुपारच्या जेवणानिमित्त जमलो होतो. अशा प्रसंगी हिंदु-मुस्लिम संबंध, राजकारण आणि विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा होत असे. रा.प.नेने आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहून मते मांडत, परंतु आपल्या माहितीमध्ये काही उणीव आहे, हे लक्षात आल्याबरोबर ''मग मी कबूल करतो, हे मी मान्य करतो... ते मला तपासून पाहायला पाहिजे किंवा असे असेल तर माझी माघार...'' असे म्हणत. आपल्या माहितीमध्ये किंवा निष्कर्षामध्ये अपुरेपणा असू शकतो हे मान्य करण्याचा मोठेपणा नेने यांनी नेहमीच दाखवला आहे. ताहेरभाई आणि रा.प. यांचे परस्परांवरील प्रेम आणि मैत्री हे सर्वश्रुत आहे. परंतु आपसात काही विषयांवर मतभेद असू शकतात, हे मतभेद जिवंत असताना त्यासाठी वाटेल तेवढे बोलू, वाद-विवाद होताना टोकाला जाऊन आरोप-प्रत्यारोप करू परंतु त्याचा परस्परांवरील प्रेमावर आणि मैत्रीवर आघात होणार नाही किंवा होऊ द्यायचा नसतो, हे लोकशाही मूल्य त्यांच्या सहवासातून मला शिकता आले. त्यांनी मला आपल्या खास परिघात घेऊन, माझ्यासारख्या वयाने आणि अनुभवाने छोट्या कार्यकर्त्याला अनौपचारिक प्रशिक्षण दिले हे माझे भाग्य!

विविध विषयांवरील संदर्भग्रंथ पाहण्यासाठी रा.प.नेने गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या ग्रंथालयात नेहमी येत असत. मी त्याच रस्त्यावरील मराठवाडा मित्र मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयात असल्यामुळे, आमच्या वेळा ठरवून आम्ही जमेल तसे भेटत असू. आय.एम.डी.आर.ची कँटिन किंवा हॉटेल रुपालीत फिंगर चिप्स्, चहा, टोस्ट घेत गप्पा मारत नेने बहुतेक वेळा माझ्याशी मुस्लिम प्रश्नावर, चालू घडामोडी, वाचनात आलेले नवे विषय-संदर्भ घेऊन बोलत. त्यांच्या सहवासातून माझ्या अनुभवविश्वात मोठी भर पडली. चालता-बोलता एन्सायक्लोपिडिया म्हणूनच मी नेनेंकडे आकर्षिला गेलो. विनायकराव कुलकर्णी आणि रा.प.नेने हे सामाजिक कार्यकर्त्यांसाठी स्वतंत्र, नेहमी खुली असणारी सार्वजनिक ग्रंथालये होती. चळवळीतील कोणत्याही सामान्य कार्यकर्त्याशी जवळीक साधणाऱ्या, स्वत:ला उपलब्ध करून देणाऱ्या नेनेंनी माझ्या हृदयात वेगळ्या कारणाने कायमचे घर केले आहे. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या काळात, आजारी असताना मला त्यांचा अधिक सहवास लाभला. कॉलेज संपल्यावर

फिजिओथेरपीसाठी मी त्यांच्या सोबत जात असे. ठरलेल्या दिवशी ठरल्या वेळी मी जात असे. एकदा त्यांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डॉक्टरांकडे बुधवारी जायचे होते. मी चार वाजेपर्यंत येतो असे सांगितल्यामुळे ते माझी वाट पाहून रिक्षा करून पुढेच गेले. तिथे गेल्यावर हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनी आज बुधवार नाही मंगळवार आहे असे लक्षात आणून दिले. मला हे सर्व त्यांच्याकडे गेल्यानंतर समजले. ते म्हणाले, ''कोणास ठाऊक, मी आजचीच अपॉईंटमेंट आहे असं समजलो. आजच बुधवार आहे असं वाटलं. तुमच्या मागे अनेक कामं असतात... मी फोनची वाट पाहिली आणि निघालो...'' किती निरपेक्ष वृत्ती!

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या चाळीसाव्या वर्धापनदिनी, माझ्या तीन पुस्तकांचे एकत्रित प्रकाशन होते. त्यांच्या हस्ते एका पुस्तकाचे प्रकाशन व्हावे अशी माझी इच्छा होती. २२ मार्च २०१० रोजी मंडळाच्या वर्धापनदिनी प्रत्येक कार्यक्रमात उपस्थित असणाऱ्या नेनेंची अनुपस्थिती अस्वस्थ करीत होती आणि दुसऱ्याच दिवशी २३ मार्च, शहीद भगतसिंग यांच्या स्मृतिदिनी, त्यांनी कायमचा निरोप घेतला.. आणि बा.भ.बोरकर यांच्या ओळी आठवल्या -

''देखणा देहांत तो, जो सागरी सूर्यास्तसा
अग्नीचा पेरून जातो, रात्रगर्भी वारसा''

❑

आर पी नेने इज ऑफलाईन

सम्राट शिरवळकर

१९९७/९८ साली पुण्यातील 'समाज विज्ञान अकादमी' तर्फे आम्ही काही तरुणांनी 'चौकशा' नावाचा चर्चा गट चालवला होता. अकादमीचे एक विश्वस्त म्हणून नेनेंची आणि माझी ओळख झाली. पुढे आम्ही त्यांना काही विषयांवर तरुणांशी संवाद साधण्यासाठी बोलवत असू. अतिशय आनंदानी ते यायला तयार होत. तरुणांशी संवाद साधण्यात त्यांना विशेष स्वारस्य होतं. कोणताही विषय ते बारकाव्यांसह मांडत. एकदा 'सौंदर्य स्पर्धा', या विषयावर त्यांनी असल्या स्पर्धांची काढलेली 'मापं' मला अजून आठवतात. मनोरंजन, माहिती आणि बोध ह्यांचा उत्तम मिलाफ त्यांच्या व्याख्यानांमध्ये असे. अर्थकारण, राजकारण, समाजकारणावरील त्यांचे भाष्य अभ्यासपूर्ण आणि सखोल असे. 'दोन भिन्न युगातील पाटा-वरवंटा/खल-बत्ता आणि मिक्सर-ग्राईन्डर एकाच घरी अजूनही नांदतात तसाच भारतीय समाज सरंजामी आणि भांडवली मूल्य एकाच वेळी जोपासतो.' अशी उदाहरणांची विपुल रेलचेल त्यांच्या व्याख्यानात असे. जुन्या पुण्याविषयी बोलताना नदीपलीकडे प्रभात रस्त्याची त्याकाळची 'आधुनिक' संस्कृती वसल्यानंतर चालणारे 'गुप्त क्लब' आणि इतर किस्से असोत, किंवा नऊवारी पातळाची पाचवारी साडी नेसायला बायकांनी सुरुवात केल्यानंतर पेटलेला वाद असो, नेनेंचं व्याख्यान रंगून जाई!

१९९९ नंतर आम्ही काही समविचारी मित्र-मैत्रिणींनी, 'चित्रबोली' ही संस्कृती आणि माध्यमे ह्या विषयात रस असलेली संस्था सुरू केली. त्या निमित्ताने नेनेंच्या गाठीभेटी पुढेही होत राहिल्या. चित्रपट, त्यातील मूल्यं, त्याची निर्मिती, 'सेन्सॉरशिप' आणि अन्य तांत्रिक बाबी असोत वा अभिव्यक्ती स्वातंत्र्य, 'ड्रेस कोड', वंदेमातरम्‌वरील वाद असोत... नेनेंना सांस्कृतिक विषयातही रस होता! 'आशय' आणि 'राष्ट्रीय चित्रपट संग्रहालया' द्वारे चालणाऱ्या 'फिल्म क्लबचे' ते सभासद होते. मीही 'राष्ट्रीय संग्रहालया'नी चालवलेल्या 'फिल्म क्लब'चा सभासद होतो. तिथेही आमची भेट ठरलेली असे. घरी जाता जाता, पाहिलेल्या चित्रपटावर विशेष टिप्पणी केल्याशिवाय नेनेंची स्वारी हलत नसे. 'लोकशाही उत्सवा'च्या सर्वच कामात ते पुढे असत, परंतु

दर वर्षी एक चित्रपट निवडून तो दाखवून त्याची पार्श्वभूमी समजावून देण्याचे एक विशेष काम करायला त्यांना मनापासून आवडे. 'चौकशा'चा एक सभासद म्हणून नेने मला ओळखत. पुढे 'चित्रबोली'च्या निमित्ताने नेने आणि माझ्यातील संबंध दृढ होत गेले.

एक दिवस मला अचानक नेनेंचा फोन आला. ते म्हणाले की, त्यांनी संगणक शिकायचं मनावर घेतलं आहे आणि त्यांना काही अडचणी येत आहेत. त्यांना माझ्या बोलण्यातून कधीतरी कळलं होतं की मी इंटरनेट वापरतो आणि संगणकाबाबत थोडीबहुत माहिती पण मला आहे. नेने त्यावेळी मुख्यत: इंटरनेट शिकण्यात गर्क होते. 'एम. एस. ऑफिस' वगैरे त्यांचं बऱ्यापैकी शिकून झालं होतं. वयाच्या ऐंशीव्या वर्षी हा माणूस नव्या युगाशी नातं राखून होता. त्याला इंटरनेटच्या माध्यमाचा वापर करून मिळणारा माहितीचा खजिना खुणावत होता. मी चकित झालो! मी खूश झालो! आणि नेनेंना 'शिकवणी' मान्य करून टाकली. त्यांनी मला माझी फी विचारली. अर्थातच मी त्याला नकार दिला. पण त्याचं कारण मात्र मला त्यांना पटवून द्यावं लागलं. त्यात मी यशस्वी झालो! मी त्यांना म्हटलं की हा काही माझा व्यवसाय नाही. ही माझी हौस आहे. जे काम माझ्या व्यवसायाचा भाग नाही त्याचे मी पैसे घेणार नाही! मग माझं त्यांच्या घरी वारंवार जाणं सुरू झालं. (इंटरनेटला 'मायाजाल' का म्हणतात याचा प्रत्यय मी नेन्यांना शिकवताना आणून दिला.) तांत्रिक बाबींपासून ते असंख्य माहिती हुडकून काढण्यासाठी लागणारं सर्व कसब नेने आत्मसात करू लागले. कधीही त्यांचा फोन येई आणि मी फोनवरूनच किंवा प्रत्यक्ष जाऊन त्यांच्या अडचणी दूर करी. नेने इतके गंभीर प्रवृत्तीचे होते की कुठल्याही आलतू-फालतू जाहिरातीच्या इ-मेलसुद्धा ते पूर्ण वाचून काढत आणि पाठवणाऱ्या व्यक्तीशी (?) संवाद साधायचा प्रयत्न करत. हा सगळा 'बाजार' आणि प्रोग्रामिंग/ऑटोमायझेशन, विकत/ओपन सोर्स सॉफ्टवेअर प्रणाली, त्या संबंधीची नवीन आंदोलनं, पायरसी, पोर्नोग्राफी, लाईव गेम्स, चॅटिंग, हॅकिंग, व्हायरस, सर्व्हर, इंटरनेट तंत्रज्ञान इत्यादी विषयांवर नेनेंचं कुतूहल शमवताना माझ्या नाकी नऊ येत असे.

माझा नेनेंशी आता फक्त परिचय उरला नव्हता तर घरोबा झाला होता! कित्येकदा सांगूनही मला 'आहो- जाहो' न म्हणणं मात्र त्यांना जमलं नाही. एकदा नेनेंचा फोन आला. नेहमीप्रमाणेच काहीतरी 'गडबड' झाली होती. मी गेलो आणि बघितलं तर गडबड किरकोळ नव्हती. मी त्यांना म्हटलं, यावेळी डागडुजी करून चालणार नाही, पाटी धुवून काढावी लागणार. (म्हणजे हार्ड-डिस्क 'फॉरमॅट' करावी लागणार. असे कित्येक 'पर्यायी शब्दच' आम्ही योजले होते, सहज आणि सुलभ संगणक प्रशिक्षणासाठी!) काही तासांचं काम आहे. दिवस ठरला, मी ठरल्या वेळी पोचलो. नेने आवरून सावरून तयारीत बसले होते. मी त्यांना म्हटलं की तुम्ही तुमची काही कामं असतील तर उरकून घ्या, थोडा वेळ लागेल आणि तुम्हाला हे सगळं शिकत

बसायची काही जरुरी नाही. पण ते थांबले आणि मग थोड्या वेळानी म्हणाले की मी जरा बाहेर जाऊन येतो, तुमचं चालू देत! नेने बाहेर पडले आणि कधी परत आले मला कळलं नाही. मी माझं काम संपवलं आणि त्यांना म्हटलं, ''बघा आता अगदी सर्व समस्यारहित धावेल तो (संगणक)!'' नेने खूश झाले. ते खूश झालेले त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसे. तसं स्मित करताना ते अत्यंत प्रेमळ आणि गोड दिसत. तसं त्यांना बोलून दाखवलं तर ते लाजत असत. मग आम्ही बाहेरच्या खोलीत आलो आणि काय आश्चर्य! नेहमी पुस्तकं आणि वर्तमानपत्रांनी गर्दी केलेला टी-पॉय निरनिराळ्या डिशनी सजला होता. डिश पांढऱ्या, जुन्या जाड काचेच्या, काठावर लाल फुलांची नक्षी असलेल्या आणि स्वच्छ होत्या. जुन्या म्हणजे ब्रिटिशकालीन असाव्यात; अतिशय उत्तम दर्जाच्या मुद्दाम ठरवून खराब केल्या तरच रंग उडणाऱ्या... एका डिशमध्ये 'श्रुसबेरी'ची नेनेंची आवडती बिस्किटं आणि दुसरीमध्ये चटपटीत पदार्थ. नेनेंची सरबराई आणि त्या पाठीमागील भावना समजून आता माझ्यावर लाजायची पाळी आली होती. त्यात नेने म्हणाले की मघाशी ते जे बाहेर गेले ते ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या गल्लीतून हा खाऊ आणायला! बिस्किटं आधीच आणून ठेवली होती. पण म्हणे एवढा वेळ काम केल्यावर मला भूक लागली असणार. काय बोलणार? ''कशाला अहो...'' वगैरे म्हणत मी खाऊ लागलो. त्यातही नेनेंनी आग्रह केला म्हणून मग मी सगळंच फस्त करून टाकलं. मग नेने स्वयंपाकघरात गेले आणि दोन झक्कास कॉफीचे वाफाळते कप घेऊन आले. आणि म्हणाले बघा जमली आहे का, आज मोहिनीची आई आली नाही (नेनेंना हवं नको सर्व त्याच बघायच्या) तर मीच केली आहे. कमाल झाली! मी निघताना त्यांनी मला एक इलेक्ट्रॉनिक डायरी भेट दिली. म्हणे ती त्यांना कोणी दिली होती पण तिचा वापर मात्र त्यांना करायला कधी जमला नव्हता. अर्थात ती त्यांनी सवयीप्रमाणे पॅकिंगसह नीट ठेवली होती. ते मला म्हणाले, की त्यांच्यापेक्षा मलाच तिचा जास्त उपयोग होईल. नेने आजारी पडण्याआधीची माझी आणि त्यांची ही शेवटची प्रत्यक्ष भेट.

नेने गेले त्यामुळे काही गोष्टी राहून गेल्या आहेत. त्यांना एक खंत होती की त्यांची छायाचित्र काही मनाजोगी येत नाहीत! पत्रकार श्री. अभय वैद्य यांनी काढलेला नेनेंचा एक फोटो त्यांना फार आवडे. तो त्यांनी आपल्या पुस्तकाच्या शेल्फ शेजारी फ्रेम करून लावून ठेवला होता. हा विषय निघाला तेव्हा मी त्यांना म्हणालो होतो, की मी त्यांचा त्यांना आवडेल असा फोटो काढून देईन! त्याची तत्क्षणी झलक म्हणून मी त्यांना माझ्या मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यातून एक फोटो काढून दिला आणि तो त्यांच्या 'जी मेल' खात्याला जोडून दिला. मात्र चांगल्या कॅमेऱ्यातून त्यांच्या मनासारखा फोटो काढणं मात्र राहून गेलं. दुसरी गोष्ट म्हणजे नेनेंनी इमेल धाडण्याचं/फॉरवर्ड करण्याचं काम मनावर घेतलं होतं. त्यासाठी त्यांना इ-मेल पत्त्यांचे विविध गट तयार करायचे होते. म्हणजे कोणती इ-मेल कोणाला धाडायची हे सहज ठरवता येईल, या

दृष्टीने! त्यांच्या गुगल खात्यात शेकडो इ-पत्ते होते त्यामुळे तसे गट करणं हे काही दिवसांचं काम होतं, तेही राहून गेलं. तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी की नेन्यांचा गोष्टीवेल्हाळपणा मला आणि माझ्या साथीदारांना इतका भावला होता की हा चालता बोलता खजिना रेकॉर्डिंगच्या स्वरूपात जतन करून ठेवावा अशी योजना आम्ही आखली होती. नेने अचानक गेले, असं झालं नाही. त्यांचं वय लक्षात घेता पुढील मोजकी वर्षंच आपल्या हातात आहेत याची जाणीव मला किंवा त्यांना होतीच नं! पण तरीही मी या तीन गोष्टी 'वेळेत' पूर्ण केल्या नाहीत याची सल माझ्या मनाला आहे.

संगणक आणि त्यावर आधारित प्रणाली माणसाच्या मेंदूप्रमाणेच काम करते म्हणे! नेनेंचा इ-पत्ता मी माझ्या 'मेलिंग लिस्ट'मध्ये समाविष्ट करून ठेवला आहे. तसाच तो इतर काही 'इ-ग्रुप्स'मध्येही समाविष्ट केला आहे. पण मी तो स्वत:हून काढून टाकणार नाही आहे. काही महिन्यांनी/वर्षांनी तो वापरात नसल्याने त्यावर ज्या हजारो इ-मेल येऊन आदळतील त्यामुळे त्याची साठवण क्षमता संपेल. मग एक दिवस आपण पाठवलेल्या इ-मेल बाऊन्स होऊ लागतील. सरतेशेवटी त्या खात्याचं इ-अस्तित्व आपोआप नष्ट होईल. पण माझ्या स्मृतीपटलावरील नेन्यांच्या आठवणी पुसल्या जातील का? उत्तर 'हो!' आहे - मी जगातून 'लॉग ऑफ' झाल्यावर!

❑

राजाभाऊ - एक संपन्न व्यक्तिमत्त्व

बा. वा. नेने

राजाभाऊ नेने हे माझे चुलत बंधू. माझ्यापेक्षा आठ-दहा वर्षांनी लहान, त्यामुळे त्यांच्या जन्मापासून मी त्यांना ओळखतो असे म्हणावयास हरकत नाही. राजाभाऊंच्या लहानपणी त्यांचे वडील ब्रह्मदेशात रंगून येथे नोकरीस होते. राजाभाऊंचे प्राथमिक शिक्षण तेथील कॉन्व्हेंट स्कूलमध्ये झाले. वर्गात त्यांचा नेहमी पहिला-दुसरा नंबर असे. दुसरे महायुद्ध सुरू झाले व जपानी सैन्य ब्रह्मदेशात घुसले. ब्रह्मदेशांतील हिंदवासीयांवर हे मोठेच संकट कोसळले. राजाभाऊंच्या वडिलांनी रंगूनमधील आपल्या दुमजली घराला आतील सुसज्ज संसार तसाच ठेवून कुलूप लावले व ते सर्व कुटुंब निर्वासितांच्या लोंढ्यात सामील होऊन हिंदुस्थानात यावयास निघाले. त्यांची पाठ वळते ना वळते तोच ब्रह्मी लोकांनी त्यांचे घर फोडून आतील सर्व चीजवस्तू लुटून नेल्या. अनेक हालअपेष्टांना तोंड देत ते सात जणांचे कुटुंब ब्रह्मदेशातून पायी आसाममध्ये एकदाचे सुखरूप आले. पुढे त्यांनी पुण्यातच राहाण्याचे ठरवून लक्ष्मीरोडवर गोखले हॉलसमोर भाड्याचे घरात संसार थाटला.

राजाभाऊंचे धाकटे बंधू शरदकाका व मी आपआपले उद्योगधंदे सांभाळून सुतारकाम हा वडिलोपार्जित छंद जोपासतो. राजाभाऊंनी त्यांच्या दुकानाकरिता आम्हास एक मोठ्या आकाराचे टेबल बनविण्यास सांगितले. तयार झाल्यावर ते टेबल दुकानात गेले व त्यावर पुस्तकांची आकर्षक रीतीने मांडणी केली गेली. पुढे काही दिवसांनी राजाभाऊ आम्हाला म्हणाले, ''अरे, खरंच सांगतो, ते टेबल दुकानात आल्यापासून पुस्तकाचा खप चांगलाच वाढला.'' मला व शरदकाकांना हे ऐकून फार आनंद झाला हे सांगावयास नकोच. पण, हा आमचा आनंद फार काळ टिकला नाही. पानशेत धरण फुटले! दुकान पुलानजीकच! मग काय विचारता, आमचे टेबल, खुद्द दुकान, आतील सर्व कपाटे व पुस्तके कोठच्या कोठे पुरात वाहून गेली. इकडे राजाभाऊ व त्यांचे कुटुंबीय कर्वे रोडवर एम.ई.एस्.कॉलेज समोर राहावयास आले होते. ते ठिकाणही नदीजवळच. ते तळमजल्यावर राहात होते. घरात छतापर्यंत पाणी चढले. गाद्या, कपडे-लत्ते, पुस्तके व फर्निचर यांची चिखलाच्या पाण्याने नासधूस केली. दुसऱ्यांदा

संसार उद्ध्वस्त होण्याची या कुटुंबावर पाळी आली. सुदैवाने जीवितहानी मात्र झाली नाही. परंतु हा फटका ब्रह्मदेशातील आघातापेक्षा फारच सौम्य होता असे म्हटले पाहिजे. त्यांचे घर व भांडीकुंडी सुरक्षित राहिली.

दुकान वाहून गेल्यामुळे राजाभाऊंना मोठाच धक्का बसला. परंतु अनंत हात त्यांच्या मदतीला आले. लकडी पुलाजवळ केळकर रस्त्यावर त्यांनी पुन्हा दुकान थाटले व पूर्वीच्याच जोमाने ते दुकान चालवू लागले.

कंपनीच्या कामाकरिता मला एकदा मुंबईहून मद्रासला जावयाचे होते. माझे आईवडील व सर्व कुटुंबीय पुण्यास होते. मद्रास मेलने मी जाणार होतो. ती पुण्यास अगदी अपरात्री साडेतीन वाजता येते. मद्रासला जात असल्याचे पत्र मी पुण्यास पाठविले व त्यात विनोदाने लिहिले, एवढ्या रात्री मला चहा कोण आणून देणार? अर्थात याचे उत्तर 'कोणीही नाही'. वडिलांनी या पत्राचा अगदी अक्षरश: अर्थ घेतला व स्टेशनवर कोणी जावयाचे याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. राजाभाऊंनी ही कामगिरी आनंदाने पत्करली. गाडी पुण्याला आल्यावर पाय मोकळे करण्याकरिता मी प्लॅटफॉर्मवर उतरलो व दूर राजाभाऊंना पाहिले. टाळ्या वाजवून व हाका मारून त्यांना बोलावले व विचारले, ''तू मद्रासपर्यंत येणार आहेस का वाटेत कोठे सोलापूरला उतरणार आहेस?'' ते कोठेही जाणार नसून माझा चहा घेऊन इतक्या रात्री ते येथे आले आहेत हे कळल्यावर मी अगदी सर्द झालो. त्यांनी आणलेला चहा माझ्या थर्मासमध्ये ओतून त्यांना म्हणालो, ''राजाभाऊ, आता खूप रात्र झाली आहे. घरी जा व स्वस्थ झोप. येथे गाडी बराच वेळ थांबते. ती सुटेपर्यंत तू येथे राहू नकोस.'' आमच्या खूप गप्पा झाल्या. गाडी सुटेपर्यंत राजाभाऊ तेथे होते व हलत्या गाडीतून मी त्यांना निरोप दिला.

या आठवणी म्हणजे पूर्ण राजाभाऊ नव्हेत. त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य फार मोठे आहे व ते खरे राजाभाऊ!

❑

आमचा राजाभाऊ

प्रभा नेने

राजाभाऊ एक विलक्षण व्यक्तिमत्त्व! राजकीय, सामाजिक, क्षेत्रात बुडालेला. कुठल्याही विषयाचा सखोल अभ्यास, कोणालाही कसलीही जमेल ती मदत करण्याची वृत्ती.

'तेहेलका', 'निवडणुका', 'अयोध्या' यासारखे ज्वलंत विषय व श्री.निखिल वागळे यांचे टी.व्ही.वरचे कार्यक्रम ऐकायला आधी फोनवर वेळ ठरवून, राजाभाऊ आवर्जून माझ्याकडे येत असे. वेगवेगळ्या न्यूज चॅनेल्स्‌वरची, वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक, कार्यकर्त्यांची, वेगवेगळ्या प्रश्नांवरची भाषणे त्याला ऐकावयाची असत. बातम्यांकरिता त्याचा आवडता चॅनेल म्हणजे बीबीसी. रात्री ८-८॥ पासून थेट ११-११॥ पर्यंत ते कार्यक्रम ऐकण्यात तो अगदी दंग असे. मग ११ च्या पुढे आम्ही कॉफी घेऊन तो दिवस आटोपता घ्यायचो. इतक्या रात्री मी त्याला मोटरने सोडायला येते म्हटले की म्हणायचा, ''मी गल्लीच्या तोंडाशी जातो, बहुतेक रिक्षा मिळेल, नाहीच मिळाली तर तू सोड.'' मग मी पण त्याला 'बरं' म्हणून तो चालत गल्लीशी पोहोचेपर्यंत गाडी बाहेर काढून, 'चल बस' म्हणून त्याला घरपोच करून येत असे आणि याचा त्याला विशेष आनंद व्हायचा आणि वा! थँक्स्‌ म्हणून आम्ही निरोप घ्यायचो.

मध्यंतरी, माझा भाचा श्री.शशिकांत नेने, माझ्याकडे आला होता. त्याला 'राजाकाका'ची आठवण आली. आम्ही अधूनमधून गप्पांसाठी एकत्र जमत असू. गप्पांच्या ओघात एखादा असा काही विषय निघे की ज्यावर जोरदार चर्चा सुरू होई. मतभिन्नता थोडीफार असायचीच. परंतु राजाभाऊचे त्या विषयावरील वाचन आणि अभ्यास यामुळे एखादा मुद्दा तपशीलासह मांडण्यास त्याने सुरुवात केली की बाकी सर्व अवाक्‌ होत. यावर माझा भाचा म्हणाला, 'आपण काही वेळा उगाचच राजाकाकाला विरोध करायचो नाही का? याबद्दल खरंच वाईट वाटतं आता. कारण त्यांच्या म्हणण्याला, त्या विषयाच्या अभ्यासाची जोड असते.'

ईश्वरावर त्याची श्रद्धा नव्हती. तरी सणवार आवडायचे त्याला! विशेषत: राखीपौर्णिमा व भाऊबीज हे दोन्ही सण आम्ही सर्व भावंडं एकत्र जमून करायचो. या कार्यक्रमांचा

तपशील - वार, वेळ आणि कोणाकडे इ. फोनवर विचारून घेऊन तो वेळ आपल्या कुटुंबासाठी - बहीणभावांसाठी राखून ठेवायचा. भाऊबीजेला ओल्या नारळाच्या करंज्या व रक्षाबंधनाला मऊसर अशा नारळाच्या वड्या तो मोठ्या आवडीने खायचा!

आईवडिलांच्या पश्चात, मोठा भाऊ म्हणून राजाभाऊने आम्हा सर्वांना तेच प्रेम आणि माया दिली. असा आमचा राजाभाऊ आज आपल्यात नाही ही खंत सतत मनात राहणार आणि एखाद्या समस्येवर मी आता कोणाला विचारू बरं हा प्रश्न सतत राहणार.

❑

भाषाप्रभू

सौ. अनुराधा परांजपे

रा.प.नेने म्हणजे आमचा मोठा भाऊ. त्याला आम्ही राजाभाऊ म्हणत होतो.

रा.प. यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व सर्वश्रुतच आहे. शाळेत असताना एखादा अवघड शब्द किंवा नवा शब्द आला की, इंग्रजीचे शिक्षक मुलांना त्याचा अर्थ विचारीत. वर्गातील सर्व मुले जेव्हा गप्प बसत तेव्हा सर म्हणत, नाही कोणाला येत मग आपण आता 'इंग्रजीच्या डिक्शनरीला'च म्हणजेच रा.प.नेनेला विचारू या. अर्थात त्या शब्दाचा अर्थ व उपयोग तो सहजच सांगे व सरांनी दाखविलेला विश्वास सार्थ करीत असे. अशा शाळेतील आठवणी त्याच्या पाठचा आमचा भाऊ वसंत नेने अनेक वेळा सांगतो. इंग्रजी विषयाप्रमाणे मराठीवरही त्याचे प्रभुत्व होते. तो उत्तमप्रकारे मराठीतही लिहीत-बोलत असे. याशिवाय त्याच्या भाषाप्रभुत्वाची एक फार महत्त्वाची आठवण आमचे वडील सांगत असत.

नोकरीनिमित्ताने आमचे वडील काही वर्षे ब्रह्मदेशात वास्तव्य करून होते. त्यावेळी राजाभाऊ व वसंत तेथील शाळेत शिकत होते. त्यावेळी इंग्रजीशिवाय सेकंड लँग्वेज म्हणून त्यांना ब्राह्मी भाषा शिकावी लागे. वडिलांनी या दोघांसाठी ब्राह्मी भाषा शिकविण्यासाठी 'सयामा' नावाची शिक्षिका ठेवली होती. दोघेही विद्यार्थी हुशार. त्यामुळे ती मनापासून शिकवीत असे. त्याचा परिणाम या दोघांना ब्राह्मी भाषेत उत्तम गुण मिळत असत, याचे कौतुक शाळेच्या ब्रिटिश प्रिन्सिपलनी सबंध शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांसमोर केले होते. ते म्हणाले, आपल्या शाळेत दोन असे विद्यार्थी आहेत की, ज्यांची मातृभाषा ना इंग्रजी ना ब्राह्मी, तरी हे दोघे विद्यार्थी या दोन्ही विषयांत सर्वात जास्त गुण पटकावून बसले आहेत ते म्हणजे आपले नेनेबंधू!

त्याची स्मरणशक्तीही उत्तम होती. केव्हा, कुठे वाचलेले पूर्ण लक्षात असे त्याच्या. त्याला चालता बोलता संगणकच त्याचे चाहते म्हणतात.

७/८ वर्षांपूर्वी मी दासबोध ग्रंथावरील परीक्षा देत होते. त्यात एक प्रश्न होता सिद्धावस्थेत प्राप्त होणारी निर्भयता, नि:स्पृहता लो.टिळकांच्या चरित्रातील त्यांच्यावरील बॉम्बची माहिती छापल्याबद्दलच्या खटल्याच्या प्रसंगी दिसून येते, तो

प्रसंग वर्णन करा.

टिळकांच्या ठरावीक कथा मला माहीत होत्या पण चरित्रातील हा प्रसंग माहीत नव्हता. ही माहिती खात्रीने मिळेल म्हणून मी एका सकाळी राजाभाऊला फोन केला व वरील प्रश्नाबाबत सवडीने सांगशील का, असे विचारले तर तो म्हणाला, सवडीने कशाला, आताच ऐक व लिही म्हणून त्याने तत्कालीन सनावलीसह संपूर्ण प्रसंग तपशीलवार लगेच सांगितला. मला खरंच कमाल वाटली. पाहतो, नंतर बघून सांगतो वगैरे काही नाही. मी पण तो प्रश्न सविस्तर लिहिल्याने परीक्षकांकडून शाबासकी मिळवली.

राजाभाऊला महिलांबद्दल विशेष आस्था होती. त्यांना पुरुषांबरोबरीने स्थान मिळालेच पाहिजे असा त्याचा आग्रह असे. अगदी साधाच प्रसंग होता. आमच्या भाच्याकडे दादरला तो गेला होता. संध्याकाळी भाच्याची दोन्ही मुले 'शुभं करोति' म्हणत होती. राजाभाऊ कौतुकाने ऐकत होता. त्यातील एक ओळ 'बाहेरची लक्ष्मी घरात येवो, घरच्या धन्याला उदंड आयुष्य लाभो' अशी मुलांनी म्हटली. स्तोत्र पूर्ण झाल्यावर राजाभाऊ त्या मुलांना म्हणाला, ''काय रे फक्त घरच्या धन्यालाच उदंड आयुष्य का? धनीणीला नको का? ती तर घरासाठी सर्वस्व वेचते, खस्ता खाते. मग तिच्यासाठी का नाही प्रार्थना करीत?'' ती लहान मुले नुसतीच बघत राहिली. त्यांना याची तळमळ कशी कळणार? अशी त्याची उच्च विचारसरणी होती.

महिलांप्रमाणे तळागाळातील मंडळींबाबतही तो आत्मीयतेने बोलत असे. एका वर्षी भाऊबीजेसाठी सर्व भाऊ, बहीण, वहिनी सर्वजण नेहमीप्रमाणे आमच्याकडे जमणार होते. त्याच दिवशी घरकाम करणाऱ्या बायकांनी (मोलकरणींनी) संप पुकारला. राजाभाऊचा मला सकाळीच फोन आला, काय गं, आज आम्ही यायचे ना? कारण तुझ्या कामावरच्या बायका संपावर असणार. मग तुला जमेल का सगळं? मी म्हटलं, आमच्या बायका संपावर नाहीत. त्यांना कामावर ठेवतानाच त्यांच्या गरजा, अटी व आमच्या गरजा, अटी समझोत्याने घेऊन त्यांच्या मागणीप्रमाणे पगारही मी देते. त्यामुळे संपवाल्यांना या बायकांनी आमची काही तक्रार नाही म्हणून कामावर जाणार असे सांगून त्या आल्या. हे ऐकल्यावर तो एकदम म्हणाला, 'व्हेरी गुड. इतकी जाण पुढच्या पिढीतून येऊ लागली असल्यास समाधान आहे.'

ठरल्याप्रमाणे सर्वजण जमून भाऊबीजेचा कार्यक्रम छान पार पडला. ओवाळणीबरोबर राजाभाऊने माझ्यासाठी खास मिठाई आणून अभिनंदन केले.

असा हा आमचा भाऊ. सर्वांबद्दल आपुलकी, तळमळ असे त्याला!

निष्काम कर्मयोगी

सुधीर तु. देवरे

१९६१ साली श्रीमती विजयाताई भागवत यांनी आम्हाला लकडीपुलाजवळच्या त्यांच्या घराशेजारच्या फ्लॅटमध्ये राहायला बोलावले तेव्हापासूनची आमची नेनेकाकांची ओळख. विजयाताई व वसंतराव भागवत हे माझ्या वडिलांचे - कै.डॉ.तु.ना देवरे यांचे - जवळचे स्नेही. विजयाताई बरीच वर्षे पीपल्स् बुक हाऊस चालवत होत्या. नेनेकाका, त्यांचे सहकारी वसंतराव, विजयाताई ही नि:स्वार्थी, कसलीही अपेक्षा नसलेली, सज्जनपणाचं उदाहरण अशी देवमाणसं. आमचा व त्यांचा तेव्हापासून झालेला घरोबा आजपर्यंत चालत आला. नेनेकाकांबरोबर मैत्री झाली ती इतक्या वर्षांनंतरही कमी झाली नाही. अजूनही मला ते दिवस आठवतात व नेनेकाकांचा हसरा, मिस्कील चेहरा डोळ्यांसमोर येतो. त्यांचा साधा पण टापटिपीचा वेष, वक्तशीरपणा, भराभर काम करण्याचा वेग, बोलण्यातली अदब, सुंदर इंग्रजी भाषा इ. अनेक गोष्टी आठवतात. आम्ही - बहीण सुधा, भाऊ सुभाष व मी त्यांना सारखेच काहीतरी विचारायला जायचो. कोणत्याही विषयावर चर्चा करण्यापासून ते फॉर्म भरताना काय व कसं लिहावं यासाठी सल्ला घेण्यापर्यंत. त्यांचा शांतपणा कमालीचा होता. आम्हाला कितीही फोन आले तरी नेनेकाका आमच्या फ्लॅटची घंटा किंवा दार वाजवून निरोप द्यायचे. चेहऱ्यावर कधीही त्रासलेला किंवा वैतागलेला भाव नसे.

विजयाताईंचे घर म्हणजे महाराष्ट्रातल्या विचारवंतांचा एक अड्डाच होता असे म्हणायला हरकत नाही. डी.डी.कोसंबी तेथे नेहमी येत असत. आम्ही मुले त्यांचे धिप्पाड उंचेपुरे व्यक्तिमत्त्व पाहातच रहायचो. कॉ.फडके, प्रिन्सिपॉल किंकर, डॉ.केळकर अशी अनेक मंडळी वारंवार यायची.

१९६१ जुलैच्या पानशेत पुरात लक्ष्मीरोडचे विजयाताईंचे दुकान पूर्णपणे वाहून गेले. समोरच्या बिल्डिंगमध्ये त्या, नेनेकाका, माझी आई व भाऊ या भयाण प्रसंगाला धीराने तोंड देत होते. आमचे सगळ्यांचे नशीब मोठे म्हणून आमची इमारत शाबूत राहिली. दुकानाचे एवढे मोठे नुकसान झाल्यावरही नेनेकाकांच्या वागण्यात बोलण्यात कसलाही फरक पडला नाही. खंबीरपणे या आपत्तीला सामोरे जाऊन वर्षा-दीड

वर्षात त्यांनी व विजयाताईंनी शेजारच्या रस्त्यावर पीपल्स् बुक हाऊस परत उभे केले.

देशातल्या राजकीय परिस्थितीतल्या किंवा आर्थिक जीवनातल्या विषमता, अन्याय किंवा भ्रष्टाचार याविरुद्ध त्यांचे संवेदनशील मन बंड करीत असे. त्याबाबत ते मोठ्या आवेशाने बोलत आणि अत्यंत सुसूत्रपणे आपले विचार मांडीत असत. त्यांच्या कार्यात किंवा विचारात सभ्यता, प्रगल्भता व शांतपणा यांचा कधीच खंड पडताना दिसायचा नाही.

नेनेकाका हे स्वतःच एक संस्था होते असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्र व देश एका सच्च्या व पारदर्शी विचारवंताला व कार्यकर्त्याला मुकला आहे.

❑

अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

सुभाष तु. देवरे

१९६१ पासून १९६७ पर्यंत आम्ही नेनेकाकांच्या शेजारी राहत होतो. मी त्यावेळी शाळेत शिकत होतो. मी बऱ्यापैकी हुशार विद्यार्थी असलो तरी माझा वर्गात दहा-बारावा नंबर येत असे. एकदा सहज बोलत असताना नेनेकाकांनी मला आव्हान दिले की मी कसोशीने अभ्यास केला तर माझा नंबर सहज पाचाच्या आत येऊ शकेल. त्यावेळी माझ्या वर्गात इतके दिग्गज विद्यार्थी होते की माझा इतका वर नंबर लागू शकेल यावर माझा स्वत:चाच विश्वास नव्हता. माझी चलबिचल बघून नेनेकाकांनी जाहीर केले की जर माझा नंबर तिनाच्या आत आला तर मला एक मोठे बक्षीस देण्यात येईल. खरं म्हणजे तिनाच्या आत नंबर ही एक अशक्य गोष्ट होती. परंतु नेनेकाकांनी माझ्यावर ठेवलेल्या विश्वासामुळे आणि थोड्याफार प्रमाणात त्या बक्षिसाच्या लोभामुळे मी त्यावर्षी खरोखरच कसून प्रयत्न केले आणि माझा वर्गात चौथा नंबर लागला. मी निराश होऊन जरा दबकतच नेनेकाकांना ही बातमी सांगितली. त्यांनी एक क्षणही न दवडता प्रथम माझं भरभरून अभिनंदन केले व मला उत्तेजनार्थ बक्षीस देण्याचा निर्णय घेतला. काही दिवसांनी त्यांनी दिलेले ते बक्षीस इतके आकर्षक होते की ते घेताना मला अत्यंत ओशाळवाणे झाले.

विश्वासाच्या बळावर आपल्या अनुयायांकडून असामान्य स्वरूपाची कामगिरी करून घेणे हे नेतृत्वाचे एक मोठे लक्षण आहे हे मी पुढे मॅनेजमेंटमध्ये शिकलो. या तत्त्वाचा प्रत्यक्ष प्रत्यय मला नेनेकाकांमुळे माझ्या शाळकरी जीवनामध्येच आला आणि त्यामुळे त्यांची ही आठवण मी कधीच विसरू शकत नाही.

नेनेकाका स्वत: कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते असले तरी ज्या हातोटीने ते पीपल्स् बुक हाऊस चालवत असत ते पाहून कोणीही भांडवलदार अवाक झाला असता. मी बऱ्याच वेळा दुकानात जाऊन बसत असे व तो एक मौल्यवान अनुभव होता. दरवर्षी साधारण जानेवारी महिन्यात या दुकानातर्फे रशियन पुस्तकांचा एक मोठा सेल आयोजित करण्यात येत असे. या सेलची वर्तमानपत्रात जाहिरात यायची आणि पुस्तके खूप उपयुक्त आणि किंमतीने स्वस्त असल्याने ग्राहकांची झुंबड उडत असे. पुस्तके

खरेदी करणाऱ्यांना एक उत्कृष्ट कॅलेंडर भेट म्हणून देण्यात यायचे. श्रीमती विजयाताई आणि नेनेकाकांची या सेलच्या दिवसांत चांगलीच तारांबळ होत असे. मात्र नेनेकाका सतत हसतमुख चेहऱ्याने तेथे वावरत असायचे. त्यावेळी अनेक चोखंदळ ग्राहकांनी विचारलेल्या अस्सल पुणेरी प्रश्नांना नेनेकाकांनी मोठ्या कौशल्याने दिलेली उत्तरे मी ऐकलेली आहेत.

नेनेकाका हे एक प्रगल्भ, व्यासंगी विचारवंत आणि कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. ते तितकेच निपुण, व्यवहारी व्यावसायिक होते हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. नेनेकाकांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा आणि अत्यंत साहाय्यकारी स्वभावाचा माझ्या मनावर झालेला प्रभाव आणि त्यांच्याकडून शिकायला मिळालेल्या अनेक गोष्टी यामुळे मी त्यांचा कायम ऋणी राहीन.

❑

नेनेकाका

सौ. मोहिनी उमेश काकडे

माझी आई (सौ. अनुराधा पारटे) नेनेकाकांकडे कामाला जायची. मी तिच्या बरोबर माझ्या वयाच्या तेराव्या वर्षीपासून काकांकडे जाऊ लागले. नेनेकाका हे आमच्या घरातलेच एक होते. त्यांनी आम्हाला कधी कामवालीसारखी वागणूक दिली नाही. त्यांनी मला अभ्यासात खूप मदत केली. आमच्या घरातल्या कारणांमुळे त्यांनी आम्हाला त्यांच्या घरात राहायला जागा दिली.

काकांनी आमच्याशी कोणताही भेदभाव कधी केला नाही. घरातल्या एखाद्या मोठ्या व्यक्तीप्रमाणेच ते आम्हाला होते. मी त्यांना म्हणायचे, ''काका, तुम्ही ब्राह्मण आहात तुम्हाला माझ्या हातचं चालेल का?'' ते म्हणायचे, ''मी जात-धर्म मानत नाही. मी फक्त माणूस ओळखतो.'' माझं लग्न झाल्यावरही अडीअडचणीला ते आम्हाल सल्ला द्यायचे. घरात भांडणं झाली तर आम्हा नवरा-बायकोची समजूत घालायचे. 'भांडू नका, सर्वांना समजावून घ्या', असे म्हणायचे. माझ्या मुलीवरही त्यांचा जीव होता. तिला नेहमी जवळ घ्यायचे. जरा दिसली नाही तर 'बुलबुल कुठे?' म्हणून विचारायचे. त्यांचे कपडे शी-शू करून तिने खराब केले तरी काही न बोलता कपडे बदलून परत तिला जवळ घ्यायचे.

माझ्या वडिलांनी दुसरं लग्न केल्यावर आम्ही काकांकडेच राहायला गेलो. आईविषयी त्यांना सगळी माहिती असे. माझे वडील दारू पिऊन काकांना घरी येऊन शिव्या देत. काका मग म्हणायचे की, 'दारूचं व्यसन लागलेला आणि तऱ्हेतऱ्हेचे नाद असलेला माणूस दुसरं काय करणार?' पण त्यांनी आम्हाला मात्र कधीही घर सोडून जायला सांगितलं नाही.

महेश उर्फ दिगूला (माझा धाकटा भाऊ) जेव्हा जेव्हा क्रिकेटचं सामान लागे तेव्हा तेव्हा काका त्याला ते आणून देत. आम्ही दोघं बहीणभाऊ त्यांच्याकडे खाण्या-पिण्यासाठी हट्ट करायचो आणि ते आमचे सगळे हट्ट पुरवायचे. मी त्यांना त्यांच्या सभांविषयी नेहमी विचारायचे. 'कुठे, कोणती, कोणाची सभा आहे?' वगैरे. त्यांना तसं विचारलेलं खूप आवडायचं. त्यांच्या मुळे पेपरात नावं येणाऱ्या खूप मोठ्या लोकांशी

माझ्या ओळखी झाल्या. 'अॅकॅडमीत' कशासाठी सभा होतात, महिलांचे प्रश्न, कचरा वेचणाऱ्यांचे प्रश्न इत्यादी माहिती ते मला देत. फिल्म अर्काइव्हला ते दर शनिवारी जात. रात्री आल्यावर उशिरापर्यंत माझ्याशी गप्पा मारत. ते जेव्हा त्यांचे मित्र नाहेरभाईंकडे जायचे तेव्हा मी त्यांना नेहमी म्हणायचे की, 'काका जरा 'तीर्थ' कमी घ्या'. त्यावर ते खूप हसायचे. ते एकच वेळ जेवायचे पण नेमकं! त्यांचा आहार ठरलेला होतं. तीन चमचे तांदूळ, दोन चमचे मसूर डाळ, मूग किंवा चवळी कडधान्याची भाजी. आईला आणि मला त्यांना आवडायच्या तशा मऊ पोळ्या जमत नसत तरी कधीतरी ते पोळी खात असत. पुरणपोळी त्यांना खूप आवडे. पाऊस पडला की लगेच, 'भजी करून खाऊ' म्हणत. पाणी खूप कमी प्यायचे ते. पण चहा मात्र दिवसाला दोनदा चारदा लागायचा त्यांना! त्यांचा चहा माझ्या लक्षात राहील. त्यांना OP+ BOP. टीच चहा पावडर लागे. चहात साखर चालत नसे.

स्वयंपाक करायच्या आधी, बाहेरून आल्यावर आधी हात स्वच्छ करावेत, पोळ्या करताना हाताखाली एक कापड घ्यावे अशा साध्या साध्या गोष्टीही काका आम्हाला शिकवत असत. एखादी गोष्ट जागेवर दिसली नाही तर खूप चिडायचे. ती वस्तू परत जागेवर दिसेपर्यंत त्यांना चैन पडायचे नाही. आम्ही त्यांचं ऐकलं नाही तर म्हणायचे, 'तुम्हाला आज कळणार नाही, पुढे कळेल की काका असं का सांगायचे.' ते सारखे म्हणायचे की, 'खूप वाचा म्हणजे विचार बदलतील.' काकांना टी.व्ही.वरील कार्यक्रमही आवडायचे. ते बघण्यासाठी ते आपल्या बहिणीच्या किंवा भावाच्या घरी जात. मग आईनी त्यांच्यासाठी टी.व्ही. घेतला तेव्हा म्हणाले, 'कशाला घ्यायचा तो?' मात्र झी मराठी वाहिनी ते आवडीने बघत. 'कुंकू' मालिका चालू असताना मध्ये कोणी बोललेले त्यांना खपत नसे. बातम्या त्यांना आवडत!

डिसेंबर महिन्यात त्यांना आधी सर्दी-खोकला झाला. तेव्हापासून त्यांची तब्येत ठीक नव्हती. ढगाळ वातावरणाचा त्रास होऊ लागला की त्यांना जास्त त्रास होई व एरवी कमी झोपणारे काका जास्त वेळ झोपत. त्यांना बरं वाटत नव्हतं म्हणून आम्ही दत्ता देसाईंना फोन केला. त्यांनी डॉ. अनंत फडकेंना बोलावून घेतले. त्यांनी औषधं दिली. नंतर त्यांना दीनानाथ रुग्णालयात अॅडमिट केलं होतं. आम्ही तिथे बघायला गेल्यावर म्हणाले, ' तुमच्या रिक्षाचे भाडे मांडून ठेवा. मी घरी येणार आहे, काळजी करू नका. परत आलो की पैसे देईन.' तिथून ते त्यांच्या भावाकडे राहायला गेले. पण त्यांना न सांगताच माघारी निघून आले. तेव्हा घराचे रंगकाम चालू होते म्हणून आई म्हणाली की, 'अजून दोन दिवस तिकडे रहा.' तर म्हटले, 'मला माहीत आहे तुम्हाला त्रास होतो. मी आजारपणातल्या देखभालीसाठी दुसरा माणूस नेमतो.' नंतर त्यांना रत्ना हॉस्पिटलमध्ये ठेवले. तिथे त्यांनी आईला पोळी आणून द्यायला सांगितली होती. पण त्याच दिवशी तांबोळी खिचडी आणून देणार होते म्हणून आई गेली नाही. त्यांना आईचा राग आला असावा. एकदा राग आला की ते बोलायचे नाहीत. हॉस्पिटलमध्ये

त्यांना हाक मारली तर ते सिस्टरबरोबर बोलायचे. तिथून त्यांना आश्रमात ठेवले. असं वाटलं की, त्यांनी आमच्यासाठी एवढे केले होते तर त्यांच्यासाठी आम्ही सगळं केलं असतं.

अजूनही असं वाटतं की काका आहेत. त्यांचे विचार खूप भन्नाट होते. त्यातले काही पटायचे तर काही नाही! त्यांच्याबद्दल खूप काही सांगायचे आहे, बोलायचे आहे पण त्यासाठी शब्द अपुरे पडतील.

❑

R. P. Nene

C. K. Raju

Nene became a family friend when I was in Pune. During the early 1980's, Pune was a relatively quiet place, appropriate for retired people. Bhandarkar Road used to become desolate by 8 in the evening, and I recollect reaching Pune University from my house in Deccan Gymkhana in a little over 4 minutes on my motorcycle.

We formed a small study group on nuclear strategy, which used to meet in a place which Nene frequented: the Gokhale Institute. The meetings were typically in the evenings after the Institute closed (like a factory, at 5). We tried to understand in-depth the various nuclear strategies such as mutually assured destruction (MAD) nuclear use theories (NUTS), and Ronald Reagan's Star Wars.

Nene always maintained that intellectuals should not stay shut in ivory towers. So, we also worked under the banner of the 'All India Peace and Solidarity Organization', organizing street demonstrations, film shows, talks, conferences etc. Our talks included speakers like P. Sainath and Vivek Monteiro. Mr Nair of the nearby film archives provided us with some material for films to be shown on the theme of peace and solidarity. These shows were well attended. The street demonstrations were on a variety of issues, including one demonstration against the US invasion of Iraq during the first Gulf War. Nene remained a constant but self-effacing part of the demonstrations.

A big conference was organized with the idea that people in the armed forces should also understand some of these issues. Invited speakers included Raja Mohan who gave a first hand account of Gorbachev's brave new Soviet Union (as it was still called then). The conference was held in Pune University and saw some interesting encounters between generals and academics like Ram Bapat.

This was the basis of his other great interest, from an early age: D.

D. Kosambi. Nene probably had the most complete collection of papers by D. D. Kosambi.

Way back, in the late eighties, Nene had approached me with a request to write on Kosambi's mathematics. He gave me a complete list of Kosambi's papers, which he had probably himself prepared. I confess that my first reaction was that I was a bit put off by Kosambi's interest in what seemed to me esoteric topics like Finsler spaces, and the Riemann hypothesis. On the other hand I was intrigued because I too had the experience of commuting to the Tata Institute of Fundamental Research (TIFR) by Deccan Queen, and I had just drafted a book "Myth and/or Reality" with a title similar to the book which Kosambi wrote, and which had shocked the traditionalists in Pune. However, I couldn't get any source material: frustrated, I gave up. Later, in the mid 90's, I drafted a long note on Kosambi and Bhabha, interviewing Nene in the process. Thanks to Nene's extraordinary persistence in this matter concerning Kosambi's work on mathematics, eventually, I gave in and wrote for EPW on Kosambi the mathematician, in time for Nene's 80th birthday, acknowledging his many inputs. By this time he had moved on with technology, using email.

Nene was a close family friend and regularly visited for dinner and discussion for the ten years I was in Pune. He also had a separate relationship with my son, taking him out for films and ice cream. In his last days, my wife and elder son both went to Pune to see him, but he was completely paralysed and unable to communicate. Fittingly, he died on Shahdat day.

❑

With Mr. R.P.Nene... through the years.

George Chira

(with inputs from Rabby D'sa & Ingrid Mendonca)

"Nene - unfortunately I cannot recieve your call now. You are speaking to the answering machine. I am out of my house for a meeting and will be back at 02:00 pm. After the beep, without disconnecting the phone, please leave your name, telephone number and your message clearly and concisely. I will certainly call you back as soon as I return home."

Nene's message on his answering machine was as vivid and descriptive as he always was. During long conversations, one always thought he did not have to repeat all the details we mutually knew. But Nene had to say everything and he did so.

My introduction to Nene happened through People's Book House (PBH). I used to go to PBH rather often in the late seventies to browse through books. In between browsing I looked towards Nene who either sat on the counter or stood at the door conversing with someone or the other. Both of us were very reluctant to talk to each other. To me he looked very stiff and serious; for him I imagined, a total stranger in Sadashiv Peth. Finally the ice broke when I needed a copy of 'The Economic Philosophic Manuscript' by Marx. Since then it became a long standing friendship and never concluding discussion.

The discussions and conversations led to Nene introducing me to a lot of people in Pune and Maharashtra and me introducing him to a few of my Christian friends who became his friends and a few others in Kerala, Kolkata, Jharkhand, Bihar and Delhi, subsequently a few in Germany.

Thus the discussions multiplied, they turned into workshops, seminars, *abhyas shibirs* (study seminars), conferences on 'Nationality Question, Caste and Class in India' and Non Governmental Organisation conferences.

It was not armchair discussion. There were actions on the street as well, beginning from the Namantar Andolan continuing to antinuclear agitation to demonstrations for communal harmony. The Nationality question in India was a joint venture of Nene, Ram Bapat and George Chira from Training for Development Scholarship Society (TDSS) with a lot of support from Sonia and Ingrid. Ingrid was then the local Christian lady introduced to Nene, who always threatened to pillion drive Nene on her rickety M-50. Nene never declined clearly but did not take the offer until the end!

The preparatory meetings among us were often mini seminars.

The discussions on the nationality question among the.organising committee always remained "conflictual". Nene refusing to go beyond the federal structure within the constitutional framework and vehemently putting forward the co-existence of many nationalities within a nation; principles of self determination and autonomy were viewed by him as "non-practical theoretical formulations". So, he welcomed the accession of Sikkim by India and did not feel that the contradictions between the Indian Mainland and the North eastern states had much ground to hold. Nevertheless it was always possible to work with Nene with different perspectives and different positions as long as one did not want him to agree or "accept' the same.

The seminar itself brought together a large group of engaged and erudite academicians and activists with radically different perspectives and news. The discussions and the conclusions themselves were as diverse as the positions. Nene did play a strong role; a balancing act together with Bapat, who of course did not agree with Nene on many points. Often they agreed to disagree, so that the discussions could continue.

The Conference on the 'nationality question' and the subsequent book was largely acclaimed and followed up with smaller workshops in different states, particularly in the line of understanding 'social history', culture and language .

Every meeting with Nene was interspersed with stories on his experiences of working with Dr. D. D. Kosambi, the eminent historian. Nene's stories about Kosambi being a stickler for punctuality and how Kosambi used to tell his doctors that his health had deteriorated due to the ten minutes' waiting at the doctors consultancy, often sounded as Nene's own keenness for punctuality. Similar were other stories about strong positions and viewpoints. The one story we often heard was about Kosambi's fight with the Oxford University Press (OUP) about his

address in the book, which was being published by them. While Kosambi insisted on his Deccan Queen address, the OUP did not agree. Finally Nene was called upon to mediate, which he did.

The post nationality question period pushed us together into a large number of workshops and study classes for activists from social action groups and political groups. The idea was to help activists to understand the social situation better to formulate effective strategies for change and also to create possibilities of common engagement. This was also the period when Nene got introduced to more Christian activists or colleagues. Sr. Noelline Pinto, the then Director of TDSS and my boss got along with Mr. Nene and was always willing to listen to him for long hours!. Audrey Fernandes joined the Nene-Bapat-George trio around this time both in organizing the study camps and subsequently working towards the national conference on "Caste and Class" in India. Audrey always addressed Nene as "Mr.Nene"; while it was much easier to start addressing Bapat as just "Bapat". Nene was quite taken aback by our Marathi skills, which he latently attributed to the Christian upbringing. This led to many stories about Ornella's High School at Quarter Gate. This also resulted in him explaining the difference between the catholic and protestant approaches to preaching and conversions in the past. While reportedly the emphasis of the catholic approach was material benefits, the protestants emphasized on structural changes and integrated themselves better with the local language and culture. He emphatically argued this difference with concrete examples.

Many hours which were spent in the preparatory discussions on the "Caste and class" situation, the list of speakers and the examination of various positions were very educative. The different views from Nene and Bapat did not confuse as they were distinct and clear by themselves. Nene's description of the caste system being perpetrated by the mutually appeasing strategies was repeated many times. He strongly argued that the barber or the thread maker were wiling to be discriminated and exploited all through their lives because of the occasional veneration and feeling of inevitability conveyed to them on occasions of marriage or other ceremonies. The upper caste could not exist without the services of these communities and these communities felt so important as they had to contribute to the life and existence of the upper castes and were willing to suffer discrimination the rest of the time.

After the "caste and class" seminar some new developments led me to join Terre des hommes. This bought in, a shift in the focus of my

engagement and work. The 'Abhyas Shibir's' and political discussions and national conferences were no more possible. I began working with NGO's more and more. There was then the possibility of training the NGO group themselves, this was done through annual meetings with NGO personnel, first in Maharashtra and then in other states. Nene helped in this a great deal as well. He was always there to plan these workshops, to suggest and help in contacting speakers and of course was there to speak and take sessions whenever we required. Ingrid, Vidya Apte and myself spent hours in preparing these workshops in Maharashtra and elsewhere. The discussions often took place in his house, often distracted with Ingrid's Mendonca's remarks on cleaning up and organizing his personal library at home. which of course was not a priority for Nene. She never forgot to remind him that "he and Bapat were the most eligible bachelors" she knew. !!! Nene got very fond of Vidya too, kept contact with her and even sent 'Tilgul' (special sweets with jaggery and sesame seeds exchanged at Makar Sankrant in Maharashtra) by post to Mumbai on Makar Sankrant.

Nene liked the feast of Makar Sankranti and never failed-to repeat the significance of it and the solar event behind it to whomever he spoke to on this occasion. His lucid description of the transmigration of the sun from one zodiac to the other, in this case from Sagittarius to Capricorn, and how it was indicative of the beginning of longer days, was always exciting to listen to. The many ways in which this festival was celebrated all over South Asia was his favourite topic. Diwali was the other festival dear to Nene. Latika, Alice (my wife and daughter) and me regularly made a Diwali visit to Nene's house and tasted the malai pedha, burfis and the soft drinks. Latika and Alice too enjoyed his stories, particularly the one on "Malapan dya ani samajwad anna" (Give me also and bring socialism)

Working together with Nene also created a lot of friendship, socialization and, if one may say so, 'partying'. Nene enjoyed this as well but always within limits. He was so punctual at these parties, sometimes embarrassingly so, because he would arrive at 7.30 p.m. and the rest at 9.00 p.m. Well, he didn't really care too much about the punctuality of the Christian friends. Two whiskies and a couple of pieces of chicken with an ice-cream at the end was the best menu for Nene, often nothing beyond this. He could never get used to Champagne or wine as much as he could not get used to the 'dancing'. He loved to watch them and even took a great liking for the vigorous ones of the many dancers, particularly, my friend Rabby D'sa. Later he called him

"A true comrade" as Rabby has often been one of those P.L. Deshpande style "Narayans" who is always helpful and willing to do anything for others and remain in the background. So Rabby and Nene hit it off with each other and even worked together in PUCL for a while. They engaged in many a polemical discussion, particularly on Islam and the communal question. Inspite of the difference of opinions and vehement arguments, the friendship, and the partying continued.

The Christmas party on Rabby and Laxmi's terrace was an annual feature which Nene never missed, as much as the New year parties at my house. Those were really happy and engaging times which also included a lot of political discussions. Those were also the times when some other friends sat next to him and listened to his erudite counsels. Brian Dcruz did this, often bringing in an international flavour into the discussions. Then there was Carlo Back with millions of questions on cultural and environmental issues of the country, Nene had a view and a say on everything. The last party that Nene attended was in December 2008. By then Nene had become a commoner within these circles.

"How is Mr.Nene?" is a question that I continue to answer to many people even now. I had always answered this question with the details of the latest discussion that we had engaged in. This is no more possible. I last met Nene at the Ratna Hospital where he was admitted. I went in to see him. He was there with a mask around his face and many tubes. I retreated soon because I thought he would not be able to talk. Outside the room, someone told me that he had just dozed off to sleep and would be awake again soon. I re-entered after 15 minutes and called him to ask how he was feeling. He brightened up. After about 45 minutes of listening to him I had to quietly tell him that he was in the ICU and everyone was staring at me as we were probably disturbing the whole ward. I said goodbye promising to see him again soon but that was not to be. But Mr. Nene continues to live and he continues to speak.

❑

Nene Sir - A Friend in Deed

Dr. Malika B. Mistry

Nene Sir was one of the VIPs who moulded me into a good activist, researcher and teacher of economics. Nene Sir was a dynamic person and like an encyclopaedia. Whenever I had a problem in academics, I used to seek his help. In spite of his various preoccupations, he always gave me time. Once I wanted to go to Malegaon city college in Nashik (in 2004) to deliver a lecture on "Unemployment of educated Youth". I had very little time to prepare. I went to Nene sir, sat with him and had discussion with him on this topic. The lecture was a success. Also, another time (in 2005), I wanted to renew a paper on conflict in Kashmir for Minority Rights Group International (MRG), UK. I did have some knowledge on this topic, yet I did not have confidence. I went to Nene sir. We sat together and had in depth discussion. His insights into Kashmir problem were amazing. It was because of him that I could pin-point many short-comings in the analysis of the Kashmir conflict. My comments were well appreciated and changes were made accordingly in the research paper before it was published by MRG.

❑

कॉ. रा.प.नेने यांची विचारसंपदा

लोकशाही, मानवी हक्क

आयर्लंड : व्यर्थ न हो बलिदान

'अधिकात अधिक आघात करणारे नव्हे तर अधिकात अधिक (क्लेश) सहन करू शकणारेच शेवटी विजयी होतील!' ७४ दिवस प्राणांतिक उपोषण करून इंग्लंडमधील ब्रिक्स्टन तुरुंगामध्ये १९२० साली हौतात्म्य स्वीकारणाऱ्या टेरेन्स मॅक्सविनी या धीरोदात्त आयरिश नेत्याचे हे अखेरचे उद्‌गार होते. मॅक्सविनी हा आयरिश रिपब्लिकन आर्मीचा, म्हणजे सैन्याचा एक नेता होता, हे लक्षात घेतले म्हणजे आघात करण्याची आवश्यकता त्याला समजत नव्हती असे म्हणता येणार नाही.

सहा दशके लोटल्यानंतरही बॉबी सॅण्डस् या आयर्लंडमधील २७ वर्षाच्या युवकाला बलिदानाची ही परंपरा चालू ठेवावी लागली. त्याचे नाव आहे रॉबर्ट जेरार्ड सॅण्डस्. त्याचे लाडके नाव आहे बॉबी. बॉबीला त्याचा मृत्यू जितका गौरवास्पद आहे तितकाच संसदीय राज्यपद्धतीची माता (मदर ऑफ पार्लमेंटस्) म्हणून मिरवणाऱ्या इंग्लंडला तो लांच्छनास्पद आहे यात शंका नाही. मार्चच्या १ तारखेला सुरुवात करून एकूण ६६ दिवस अन्नत्याग केल्यानंतर मंगळवारी ५ मे रोजी पहाटे एक वाजून सतरा मिनिटांनी, आधीचे दोन दिवस बेशुद्धावस्थेत काढल्यानंतर बॉबी सॅण्डस् तुरूंगात मरण पावला. नि:सीम त्यागाच्या या निर्णयापासून त्याला परावृत्त करण्यासाठी वेगवेगळ्या प्रतिष्ठितांनी प्रयत्न केले होते. पोपने त्याचे दोन खास दूत पाठवून बॉबीला उपोषण सोडण्याची विनंती केली होती. आयर्लंडमधील लोकसभेचे काही सभासद, तसेच आयर्लंडचा मजूर पक्षीय नेता कॉन्केनॉन याने त्याची भेट घेऊन आपला निर्णय बदलावा असे आवाहन केले होते. अनेक भयभीत नागरिकांनी बॉबीला मृत्यू आला तर सर्वत्र तीव्र स्वरूपाचे उठाव होतील म्हणून त्याला दीर्घायुष्य मिळो अशा प्रार्थना केल्या होत्या. युरोपीय देशांची मानवी हक्क संरक्षण समिती आहे, तिने या प्रश्नात लक्ष घालावे अशी विनंती अगदी अखेरीस उत्तर आयर्लंडच्या पंतप्रधानांनी केली होती. परंतु आयरिश रिपब्लिकन आर्मीच्या या निष्ठावंत सैनिकाचा निर्णय शेवटपर्यंत ढळला नाही. त्याच्या आधी तुरुंगातील त्याच्यासारख्या इतर काही सैनिकांनी

अन्नसत्याग्रह केला होता. परंतु बॉबीप्रमाणे ते शेवटपर्यंत आपला निर्धार टिकवू शकले नाहीत. या उपोषणाबाबत सर्वात कठोर भूमिका कोणी घेतली असेल तर इंग्लंडच्या पंतप्रधान मागरिट थॅचर व या प्रश्नावर त्यांना बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या त्या देशातील मजूर पक्षाने. आपणाला व आपल्या तुरुंगातील ७०० सहकाऱ्यांना राजबंदी म्हणून दर्जा देण्यात यावा आणि त्यानुसार वागणूकही देण्यात यावी; या प्रमुख मागण्यांना मान्यता मिळावी याकरता बॉबी सॅण्डस्ने प्रदीर्घ काळाचा अन्नसत्याग्रह केला होता. परंतु बॉबी व त्याचे सहकारी हे दहशतवादी, हिंसक कृत्यांवर विश्वास ठेवणारे खुनी व मारेकरी असल्यामुळे ते सामान्य गुन्हेगार आहेत व त्यांना त्या व्यतिरिक्त अन्य कोणताही दर्जा दिला जाणार नाही अशी घोषणा थॅचरबाईंनी केली आणि या भूमिकेशी आपण सहमत असल्याचे मजूर पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी सांगितले. प्रत्यक्षात मात्र बेकायदेशीरपणे पिस्तुल बाळगणे या आरोपाखाली बॉबीला १४ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली होती. 'बॉबी व त्याच्या सहकाऱ्यांनी इतरांचे जीव त्यांच्या इच्छेविरूद्ध घेतले होते, बॉबीने मात्र स्वतःहून स्वतःची आत्महत्या केली आहे', अशी त्याच्या हौतात्म्याची कुचेष्टा थॅचरबाईंनी केली.

इंग्लंडची 'लोक'शाही उघडी पडली

बॉबी व त्याच्या मागोमाग त्याच्याचप्रमाणे ५९ दिवस उपोषण करून १२ मे रोजी वीरमरण पत्करणाऱ्या २५ वर्षे वयाच्या फ्रान्सिस ह्युजिस्च्या हातातील शस्त्रांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण घटना 'लोकशाहीवादी' थॅचरबाई व मजूर पक्षाला खुपते आहे. ती घटना म्हणजे तुरुंगातील उपोषणाच्या चाळिसाव्या दिवशी फर्मानाघ व दक्षिण टायरोन या मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत बॉबी हा इंग्लंडच्या लोकसभेवर निवडून आला होता. ह्युजिस या युवकाला ब्रिटिश पोलीसांनी झटापट करताना पायाला बंदुकीच्या आठ गोळ्या काढण्याकरता शस्त्रक्रियेसाठी डॉक्टर जेव्हा उभे राहिले तेव्हा आपल्याला भूल न देता ही शस्त्रक्रिया करावी असा आग्रह ह्युजिसने धरला होता. भूल देऊन आपणाकडून संघटनेची प्रकट न करण्याजोगी माहिती काढण्याचा प्रयत्न होईल, त्यापेक्षा यातना सहन करणे अधिक श्रेयस्कर असे ह्युजिसने ठरविले होते! तुरुंगात असणाऱ्या राजबंद्यांपैकी सुमारे ८५ टक्के राजबंद्यांविरुद्धचे आरोप त्यांच्याकडून घेण्यात आलेल्या 'कबुलीजबाबांतून सिद्ध करण्यात' आले होते. म्हणून ह्युजिसला वाटत असलेली धास्ती रास्त होती. परंतु ह्युजिसच्या अचाट धैर्यापेक्षासुद्धा, बॉबीला ३० हजारांपेक्षा अधिक मतदारांनी निवडून दिले होते ही परिस्थिती इंग्लंडमधील 'लोकशाहीवाद्यां'ना अधिक भयावह वाटत होती. बॉबीचा पराभव करण्याकरता आयर्लंडचा मजूर पक्षाचा नेता व इतर लहानमोठ्या धेंडांनी जोरदार अपप्रचार मोहीम उघडली होती. 'या खुन्याला, या लुटारूला आपटी द्या' अशा आशयाचा प्रचार सर्वत्र होत होता. स्वतः सैनिक नसूनही आयरिश रिपब्लिकन आर्मीची प्रचार मोहीम निर्भयपणे

आणि चिकाटीने चालविणाऱ्या बर्नाडेट डेव्हलिन मॅक्‌ॲलिस्के या महिलेवर आणि इतर पाचजणांवर बॉबीच्या विरोधकांनी गोळ्या झाडल्या होत्या. तरीही न डगमगता या महिलेने कुबड्या घेऊन, 'राजबंद्यांना त्यांचे हक्क मिळालेच पाहिजेत' अशी घोषणा देत प्रचार मोहीम चालवली आणि अखेरीस बॉबी निवडून आला.

बॉबीच्या या यशाने ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे धाबे दणाणले. आपल्याला पचेल व रूचेल असे निर्णय जनता देईल तोपर्यंत लोकशाही हे कालातीत स्वयंपूर्ण मूल्य आहे अशा स्वरूपाचा उद्‌घोष करावयाचा आणि 'वाट चुकलेली' अथवा 'अडाणी' जनता जर अप्रिय निर्णय देऊ लागली तर तिला बांध घालण्याकरता आपल्या सोयीनुसार 'लोकशाही दुरूस्त करावयाची' असे या सत्ताधाऱ्यांनी मजूरपक्षीयांशी संगनमत करून ठरवले. त्यानुसार, ज्याला कायद्यानुसार मतदानाचा हक्क असेल त्यालाच निवडणुकीला उभे राहाण्याचा हक्क राहील असे नवीन विधेयक लोकसभेत सादर करण्यात येणार आहे. विविध कारणांकरता खास वेगळे कायदे अथवा खास न्यायालये असू शकतात. परंतु राजद्रोही तुरुंगवासींना खास वेगळे स्थान असूच शकत नाही अशी जगातील भांडवलशाही देशांतील अजब लोकशाही आहे. यामुळे स्वतःला वाटणारे लोकहित डोळ्यांसमोर ठेवून उच्च ध्येय साध्य करण्यासाठी तुरुंगवास पत्करणारा राजकीय अथवा सामाजिक कार्यकर्ता आणि वैयक्तिक स्वार्थासाठी डाका घालणारा अथवा बलात्कार करणारा गुन्हेगार या दोघांचा दर्जा समान आहे असे कायदा ठरवितो. सामान्य गुन्हेगाराला निवडणुकांबाबत जे नियम लागू पडतात तेच नियम ध्येयासक्त कार्यकर्त्यालाही लागू पडावेत अशी तरतूद या विधेयकाद्वारे केली जाणार आहे हे उघड आहे. बॉबी आणि त्याच्या सहकाऱ्यांना खुनी ठरविणाऱ्या आजच्या सत्ताधाऱ्यांच्या नजिकच्या काळातील पूर्वजांनी ३० जानेवारी १९७२ रोजी पंधरा हजार निःशस्त्र आयरिश नागरिकांच्या जमावावर बेछूटपणे गोळीबार करून तेरा जणांना ठार मारले होते. 'रक्तलांच्छित रविवार' म्हणून त्याची इतिहासात नोंद झाली आहे.

प्राणाची बाजी लावून लढणाऱ्या या आयरिश रिपब्लिकन आर्मीच्या सुमारे एक हजार निष्ठावंत सक्रिय सैनिकांना आणि त्यांच्या हजारो सहानुभूतीदारांना नेमके काय हवे आहे? ब्रिटिशांच्या जुलमी जाचातून मुक्त होऊन त्यांना स्वतंत्र, सार्वभौम व अखंड आयर्लंडची निर्मिती करावयाची आहे. मात्र आयर्लंडचा हा मुक्तिलढा काहीसा गुंतागुंतीचा आहे.

सरंजामी युगातील संघर्ष

आयर्लंड नेहमी ख्रिश्चन धर्मातील रोमन कॅथॉलिक पंथीयांच्या वर्चस्वाखाली राहिलेला आहे. ११७१ साली इंग्लंडचा राजा दुसरा हेन्री याने आपले वर्चस्व आयर्लंडमध्ये प्रस्थापित करण्याचा पहिल्या प्रथम प्रयत्न केला. आयर्लंडमधील जमिनीचा कब्जा कोणाच्या हातात असावा यावरून मुख्यतः या लढाया होत असत.

परंतु इंग्लंडमधील राजे अथवा राण्या प्रॉटेस्टंट पंथाच्या असल्या म्हणजे या लढाया दोन धार्मिक पंथीयांमध्ये होत असत असे भासत असे. या सर्व लढायांतून आयरिश जनतेचा काहीच फायदा होत नसे. त्यांना नुसते एकदा या बाजूने तर एकदा उलट बाजूने लढून, जिवंत राहिल्यास चरितार्थ चालविता येत असे आणि मरण पावल्यास त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात भर पडत असे. या लढायांना कंटाळून व त्रस्त होऊन कित्येक आयरिश लोकांनी (शिपायांनी व सामान्य लोकांनी) देशांतर केले आणि फ्रान्ससारख्या अन्य कॅथॉलिक पंथांच्या देशांमध्ये जाऊन ते स्थायिक होऊ लागले. पुढे पुढे आयर्लंडमधील कॅथॉलिक उमरावही याचप्रमाणे स्थलांतर करू लागले. त्यानंतरच्या काळात दुष्काळांमुळेही देशांतर करणारे बरेच लोक निघाले. याचा एक परिणाम म्हणजे आज स्वतःला आयरिश असे म्हणवून घेणाऱ्या अनेकांपैकी ५०% लोक हे आयर्लंडच्या बाहेर स्थायिक झाले आहेत. तथापि आयर्लंडबद्दलचा वाटणारा अभिमान त्यांच्या मनात अद्याप कायम आहे.

आयरिश लोकांच्या या देशांतराचा फायदा इंग्लंडमधील प्रॉटेस्टंट पंथीय जमीनदारांनी घेतला. उत्तर आयर्लंडमध्ये हे जमीनदार गेले आणि तेथील शेतजमिनीचा कब्जा घेऊन तेथील मूळच्या कॅथॉलिक लोकांवर त्यांनी आपले वर्चस्व स्थापले. त्यांच्याबरोबर स्कॉटलंडमधील काही जमीनदारही आले. त्यातील बहुसंख्य प्रोटेस्टंट पंथाचेच होते. आपले मानवी हक्क हिरावून घेतले जात आहेत हे लक्षात आल्यावर आयर्लंडमधील उरलेल्या कॅथॉलिक जमीनदारांनी आयरिश जनतेच्या साहाय्याने तुरळक बंडे केली. परंतु ती सर्व इंग्लंडच्या सैन्याने दडपून टाकली. राजनिष्ठ कॅथॉलिक जमीनदारांना त्यांच्या मूळच्या सुपीक जमिनीच्या बदल्यात अन्य जमिनी स्वीकारण्यास भाग पाडण्यात आले. अन्य काही कायदे करून कॅथॉलिक लोकांचे मतदानाचे अथवा स्थानिक प्रातिनिधिक संस्थांमध्ये निवडून देण्याचे अधिकार मर्यादित करण्यात आले. एवढेच नव्हे तर पुढे इंग्लंडमधील तिसरा विल्यम या राजाच्या कारकीर्दीत आयर्लंडमधील लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून देण्याचा अधिकार फक्त प्रॉटेस्टंट पंथीयांनाच राखून ठेवण्यात आला. १७०३ सालापर्यंत मूळच्या कॅथॉलिक रहिवाशांच्या हातात उत्तर आयर्लंडमधील फक्त १०% जमीन शिल्लक राहिली. उत्तर आयर्लंडमध्ये कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट यांच्यात आज असणाऱ्या भेदभावाची मूळ कारणे कशात आहेत हे यावरून लक्षात येईल.

स्वातंत्र्याच्या प्रेरणा व तडजोडी

कॅथॉलिक लोकांना हतबल करून टाकल्यानंतर उत्तर आयर्लंडमधील धनाढ्य प्रॉटेस्टंट जमीनदारांना इंग्लंडपासूनही स्वतंत्र होण्याची आकांक्षा निर्माण झाली. याच सुमारास अमेरिकेमध्ये ब्रिटिशांविरुद्ध त्यांचे अधिपत्य नष्ट करून टाकण्यासाठी अमेरिकन लोकांनी स्वातंत्र्यसंग्राम सुरू केला होता. या संग्रामापासून आयरिश जनतेला

व त्यांच्या प्रॉटेस्टंट राज्यकर्त्यांना स्फूर्ती मिळाली. इंग्रजांना आपले बरेच सैन्य आयर्लंडमधून काढून घेऊन अमेरिकेमध्ये पाठवावे लागले होते. अशा वेळेस आयर्लंडमध्ये इंग्रजांविरुद्ध उठाव होण्याची शक्यता होती. म्हणून इंग्लंडमधील राज्यकर्त्या प्रॉटेस्टंट पंथीय वर्गाने आयर्लंडमधील सत्ताधारी प्रॉटेस्टंट वर्गाला कमकुवत करण्यासाठी तेथील कॅथॉलिक पंथीयांना विविध स्वरूपाच्या सवलती जाहीर केल्या. कॅथॉलिक पंथीय फ्रान्समध्येही सुप्रसिद्ध असलेली फ्रेंच राज्यक्रांती याच सुमारास झाली होती. उत्तर व दक्षिण आयर्लंडमधील कॅथॉलिकांचे ही क्रांती हे एक स्फूर्तीस्थान होते. भूमिगत कार्य करून फ्रेंचांनी दिलेली मदत स्वीकारून थिओवॉल्ड टोनच्या नेतृत्वाखाली १७९८ साली त्यांनी एक उठाव केला. उत्तरेतील धनाढ्य प्रॉटेस्टंट पंथीय सत्ताधारी आयरिश वर्गालाही या बंडाबद्दल सहानुभूती वाटू लागली. कारण यश मिळाले असते तर आयर्लंडच्या अर्थकारणावरील व राजकारणावरील ब्रिटिशांची पकड नष्ट झाली असती. दुर्दैवाने हा उठाव व त्यानंतर १८०३ मध्ये झालेला उठावही चिरडून टाकण्यात ब्रिटिशांना यश आले. अमेरिकेवरील ताबा नष्ट झाला परंतु आयर्लंड टिकवता आले. मोठ्या लगबगीने ग्रेट ब्रिटनच्या संयुक्त राज्यात आयर्लंडचा समावेश करण्यात आला.

आयर्लंडमधील या घडामोडीनंतर त्या देशातील सामाजिक तणावाला पुन्हा वेगळे वळण लागले. मध्यंतरीच्या काळात प्रॉटेस्टंट पंथात फूट पडलेली असल्यामुळे प्रेसबटीरियन व एस्पिकोपेलियन असे उपपंथ निर्माण झाले होते. सत्ताधारी प्रॉटेस्टंट पंथीय जमीनदार हे एस्पिकोपेलियन पंथाचे होते. आपले आसन स्थिर राखण्याकरता आपल्याच पंथातील एक गट आपल्या विरोधात राहू देणे परवडण्यासारखे नव्हते. प्रेसबटीरियन या विरोधी उपपंथातही जमीनदार होतेच. इंग्लंडच्या अडचणीच्या वेळी कॅथॉलिक पंथीयांना ज्या सवलती देणे सत्ताधाऱ्यांना भाग पडले होते त्यात त्यांना खुल्या स्पर्धेत जमीन घेऊन ती बाळगण्याचा व धार्मिक आचरणातील स्वातंत्र्याचे काही अधिकार मिळाले होते. आयर्लंडमधील लोकसभेवर प्रतिनिधित्व मिळविण्याचेही काही अधिकार मिळाले होते. त्यामुळे कॅथॉलिक पंथीयांमध्ये अधिक स्वातंत्र्य व सवलती मिळवण्याची ईर्षा उत्पन्न झाली व त्याकरता त्यांनी चळवळी सुरू केल्या. १८२८ साली तर डॅनिएल ओ कॉनेल नावाचा एक कॅथॉलिक नेता लोकसभेवर निवडून आला. त्याची लोकप्रियता वाढू लागली तेव्हा सत्ताधारी एस्पिकोपेलियन पंथीयांनी कॅथॉलिकांच्या वाढत्या बळाचा बागुलबुवा उभा करून प्रेसबटिरियन लोकांना आपल्या बाजूला जिंकून घेतले. दोघांनी मिळून सर्वपंथीय शेतकरी कुळाला काही सवलती देऊन कॅथॉलिक जमीनदारांचा त्यांच्यावरील प्रभाव कमी केला.

तेव्हापासून दोन्हीही प्रॉटेस्टंट पंथीय एकजुटीने कॅथॉलिक लोकांना विरोध करत आले आहेत. त्याचप्रमाणे ब्रिटिश राजवटीला विरोध करण्याच्या ऐवजी हे दोनही प्रॉटेस्टंट पंथ इंग्लंडबरोबर संयुक्त राज्य असावे, सार्वभौम सत्ता इंग्लंडमधून चालणाऱ्या

सरकारकडे असावी व देशांतर्गत कारभारांचे अधिकार आयर्लंडकडे असावेत असे मानतात. याच्या उलट डॅनिएल ओ कॉनेलच्या नेतृत्वाखाली संयुक्त राज्यापासून फुटून स्वतंत्र आयर्लंड स्थापन करण्यासाठी सुरू झालेली चळवळ मुख्यत: कॅथॉलिक पंथीयांनी अद्याप तेवत ठेवलेली आहे.

एकोणिसाव्या शतकातील स्वातंत्र्यसंग्राम

ब्रिटिशांनी शांततामय मार्गांनी चाललेल्या निदर्शनांवरही सैन्य व शस्त्रधारी पोलिसांकरवी हल्ला चढविला. तरीही ओ कॉनेल सनदशीर मार्गाचाच पुरस्कार करत राहिला. साहजिकच युवकांना ते रूचले नाही. त्यांनी यंग आयर्लंड (युवा आयर्लंड) नावाचा गट स्थापन करून एक उठाव घडवून आणण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यानंतर १८४० मध्ये, आयर्लंडमध्ये पडलेल्या भीषण दुष्काळामुळे अमेरिका व इंग्लंडमध्ये ज्या आयरिश लोकांनी स्थलांतर केले होते त्यातील काहीजणांनी गुप्त संघटना स्थापन करून भूमिगत आंदोलन चालू केले. आयर्लंडमध्ये प्रख्यात असलेल्या आख्यायिकेनुसार फियाना नावाचे सामर्थ्यशाली सैन्य भूतकाळात पराक्रम गाजवत असे त्या वरून हे आंदोलनकर्ते स्वत:ला फॅनियन म्हणवत असत. या संघटनेच्या कार्यकर्त्यांना व नेत्यांना जहाल लिखाणातून १४ ते १५ वर्षे इतक्या दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. १८६७ साली त्यांनी केलेला उठाव चिरडण्यात आला आणि तुरुंगरक्षकांशी झटापट करून, वेळप्रसंगी जरूर पडल्यास त्यांना गोळ्या झाडून आपल्या बंदिस्त सहकाऱ्यांना सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना फासावर चढविण्यात आले. इंग्रजांनी त्यांना खुनी ठरविले. आयर्लंडमधील जनता मात्र आजही त्या हुतात्म्यांचे स्मृतिदिन अभिमानाने साजरे करते.

चळवळीचे स्वरूप तीव्र होऊ लागल्यावर लहान जमीनमालक शेतकरी व कुळेही आपल्या शोषणमुक्तीसाठी संघटित होऊन लढू लागली. इंग्लंडमध्ये उदारमतवादी पक्ष राज्यावर आल्यावर त्यांची जमीन मालकी व तद्नुषंगिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने काही महत्त्वाची पावले टाकली. जागृत आयरिश लोकांनी त्यानंतर आयरिश भाषा, वाङ्मय, नृत्यकला इत्यादींच्या पुनरुज्जीवनाची सांस्कृतिक चळवळ सुरू केली.

याच सुमारास म्हणजे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात अनेक भारतीय राष्ट्रवाद्यांना परिचित असलेली 'ग्रीन फेन' म्हणजे 'आमचे आम्ही' (आमच्या भविष्याचे शिल्पकार आम्हीच होणार) ही जहाल देशभक्तांची चळवळ सुरू झाली. या सर्व चळवळींमधून आयर्लंडच्या उत्तर व दक्षिण अशा दोन्ही भागातील लोक भाग घेत असत. परंतु तुलनेने विपन्नावस्थेत असलेले कॅथॉलिक पंथीय लोकच त्यात अधिक मोठ्या संख्येने असत. अर्थात दक्षिण आयर्लंडमध्ये त्यांची संख्याही जवळजवळ ९५ टक्के होती व अजूनही ती तेवढीच आहे. स्वराज्य मागणीची चळवळ उत्तर आयर्लंडमध्ये

फार तीव्र होऊ नये याकरता त्रेथे जी प्रॉटेस्टंट पंथीय कुळे होती त्यांना ते कसत असलेल्या जमिनी काही अटी परिपूर्ण केल्यावर देऊन टाकण्यात याव्यात अशी भूमिका. या भूमिकेला तोपर्यंत वर्षानुवर्ष विरोध करणाऱ्या इंग्लंडमधील सनातनी हुजूर पक्षानेही ती भूमिका घेतली. अल्पसंख्य प्रॉटेस्टंट जमीनमालक जरी त्यामुळे काहीसे नाराज झाले तरी बहुसंख्य प्रॉटेस्टंट लोकांचा पाठिंबा टिकवून धरण्यात अशा रीतीने धूर्त इंग्रज राज्यकर्त्यांना यश आले. कारण बहुसंख्य कुळे प्रॉटेस्टंट होती.

ब्रिटिशांच्या धूर्तपणाशी मुकाबला करण्याचे आयरिश नेत्यांनी व जनतेने आटोकाट प्रयत्न केले. छोट्या शेतकऱ्यांना व कुळांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या चार्ल्स स्टुअर्ट पार्नेल या संसदपटू आयरिश प्रॉटेस्टंट नेत्याची लोकप्रियता एका घटस्फोट प्रकरणातून ओसरल्यानंतर, जॉन रेडमंड नावाचा नेता पुढे आला. त्यावेळेस इंग्लंडमधील उदारमतवादी पक्षाला, आपल्या देशातील वरच्या प्रातिनिधिक सभागृहात (हाऊस ऑफ् लॉर्डस्) वर्चस्व असलेल्या उमराव घराण्यातील सभासदाचे अधिकार खंडित करावयाचे होते. त्याबाबतचे विधेयक संमत करून घेण्यासाठी उदारमतवादी पक्षाला लोकसभेतील आयरिश खासदारांचा पाठिंबा मिळविणे अगत्याचे होते. आयरिश खासदारांनी साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे आश्वासन मिळवून उदारमतवाद्यांना पाठिंबा दिला आणि १९११ साली नियोजित विधेयक मंजूर करून घेण्यात उदारमतवाद्यांना यश आले.

इंग्लंडमधील सभापती हुजूरपक्षीय नेते या घटना पाहून अस्वस्थ झाले. आयर्लंडला जर स्वराज्य मिळाले तर बहुसंख्याक कॅथॉलिक लोकांच्या हातात सत्ता जाईल व आपला जवळजवळ तीन शतके उत्तर आयर्लंडमध्ये असलेला प्रभाव कमी होईल, ही त्यांना भीती. त्यांनी नव्याने उदयाला आलेला नेता एडवर्ड कार्सन याच्या नेतृत्वाखाली स्वराज्याला विरोध केला. नंतर त्यांनी सबंध आयर्लंडच्या सुमारे एकषष्ठांश क्षेत्रफळ असलेल्या अखंड आयर्लंडमधील एकूण ३५ जिल्ह्यांपैकी फक्त ६ जिल्ह्यांच्या (सहा कोटी लोकसंख्या) उत्तर आयर्लंडला तरी निदान स्वराज्य नको असून इंग्लंडबरोबर संयुक्त राज्याचा घटक म्हणूनच रहाण्याची इच्छा असल्याचे हजारो लोकांच्या सह्यांची मोहीम काढून १९१२ साली जाहीर केले. आपली मागणी पुढे रेटण्याकरता त्यांनी अल्सटर स्वयंसेवक दल (उत्तर आयर्लंडला अल्सटर असे म्हणतात) नावाची सशस्त्र संघटना स्थापन करून दंगेधोपे करण्यास सुरूवात केली. या दलाला शह देऊन त्यांच्याशी सामना करण्याकरता १९१३ मध्ये दक्षिण आयर्लंडमधील डब्लिन या गावी आयरिश स्वयंसेवक (आघाडी) नावाची सशस्त्र संघटना स्थापन झाली. दोन्ही संघटनात मारामाऱ्या होऊन या संघर्षाला जवळजवळ यादवी युद्धाचे स्वरूप आले. याच सुमारास म्हणजे १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाल्यामुळे इंग्लंडमधील आयर्लंडच्या स्वराज्यविरोधकांना यादवी युद्धात फारसे लक्ष घालणे शक्य नव्हते, म्हणून हे यादवी युद्ध अधिक भडकले नाही.

डी व्हॅलेरा

रेडमंड या नेत्याने ब्रिटिशांबरोबर लोकसभेत वाटाघाटी व दबावाचे राजकारणी डावपेच टाकून स्वराज्य मिळविण्यात यश संपादन केले नाही हे पाहून आयर्लंडमधील युवक संतप्त झाले आणि पुन्हा एकवार जहाल व दहशतवादी संघटनात भूमिगत राहून संघटित उठाव घडवून आणण्याच्या कामात ते दंग झाले. आयरिश रिपब्लिकन ब्रदरहुड (मातृभाषाधिष्ठित आयरिश लोकसत्तावादी संघटना) नावाच्या संघटनेने विशेष कामगिरी बजावली. त्यांनी इंग्लंडचे शत्रूराष्ट्र जर्मनीशी १९१६ मध्ये संधान बांधून शस्त्रास्त्रे मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु ती जुनीपुराणी असल्याचे त्यांना आढळून आले. त्या तुटपुंज्या सामुग्रीच्या साहाय्याने अवघ्या दोन हजार स्वातंत्र्यसैनिकांनी बलाढ्य आणि सुसज्ज ब्रिटिश सैन्याविरुद्ध २४ एप्रिल १९१६ रोजी उठाव केला आणि डब्लिन शहरातील प्रमुख पोस्ट ऑफिस व अन्य काही सरकारी इमारतींचा ताबा घेऊन आयर्लंड हे स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र झाले असल्याचे जाहीर केले. एका आठवड्यातच हा उठाव ब्रिटिशांनी बेमुर्वतपणे दडपला आणि अटक केलेल्या नेत्यांना फाशी दिले.

१९१६ मधील उठावात सहभागी झालेला परंतु त्यावेळी ब्रिटिशांच्या तावडीत न सापडलेला इमॉन डी व्हॅलेरा हा झुंजार कार्यकर्ता आयरिश जनतेच्या पुढील लढ्याचा नेता बनला. त्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी पुन्हा एकवार आयरिश प्रजासत्ताक स्थापन झाले असल्याचे जाहीर केले. या प्रजासत्ताकाचे रक्षण प्राणपणाने केले पाहिजे आणि राक्षसी ब्रिटिश दमनकर्त्यांना खडे चारले पाहिजेत असा दृढ निश्चय केलेल्या स्वातंत्र्यप्रेमी तरुणांनी आयरिश रिपब्लिकन आर्मी नावाची संघटना स्थापन केली. याच्यातही एक अधिक जहाल गट पुढे उदयास आला. आयर्लंडमधील मेझ या गावी असलेल्या तुरुंगात दास्यापेक्षा आत्मार्पण श्रेष्ठ मानणारे, बॉबी सॅण्डस् आणि त्याचे तीन खंदे सहकारी हे याच जहाल गटाचे कार्यकर्ते होते.

आयर्लंडचा स्वातंत्र्य लढा पाशवी शस्त्रबळाने दडपता येत नाही. आयर्लंडमध्ये नेमलेले आयरिश पोलिस हे स्वातंत्र्यसैनिकांवर गोळ्या घालण्याऐवजी राजीनामे देतात हे पाहून आणि देशांतर करून हजारो मूळचे आयरिश ज्या देशांत स्थायिक झाले आहेत त्या अमेरिका या देशातील सरकारने इंग्लंडवर नैतिक दडपण आणल्यामुळे, इंग्रजांना माघार घ्यावी लागली. मात्र अखंड आयर्लंडला स्वातंत्र्य देण्याऐवजी त्यांनी १९२० साली त्या देशाची फाळणी करून उत्तर आयर्लंड आणि दक्षिण आयर्लंड अशी दोन साम्राज्यांतर्गत स्वतंत्र राष्ट्रे निर्माण केली. देशाच्या या फाळणीला व ब्रिटिश राज्यसत्तेशी एकनिष्ठ राहाण्याची शपथ घेण्याच्या अटीला, बहुसंख्य आयरिश नेत्यांचा व जनतेचा विरोध होता. तथापि या अटीवर स्वराज्य न स्वीकारल्यास आयर्लंडविरुद्ध युद्ध करण्याची धमकी ब्रिटिश पंतप्रधानांनी दिली. या युद्धात आपल्याला यश मिळणार नाही असे वाटल्यामुळे, आयरिश नेत्यांनी इंग्रजांशी करार करून मिळेल त्या स्वरूपातील

स्वराज्य स्वीकारले. आयर्लंडमधील इमॉन डी व्हॅलेरासारख्या ज्या नेत्यांना ब्रिटिशांच्या धमकीला भीक घालू नये असे वाटत होते, त्यांनी हा करार धुडकावून लावण्याचे ठरविले. त्यामुळे सरकार पक्षाचे नेते व त्यांचे अनुयायी आणि संपूर्ण सार्वभौम प्रजासत्ताकाचे कैवारी यांच्यात एक आठवडाभर यादवी युद्ध झाले. काही ब्रिटिश अधिकाऱ्यांना व दगाबाज ठरलेल्या आयरिश नेत्यांना ठार मारण्यात आले. यादवी युद्धात सार्वभौम प्रजासत्ताक मागणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचा पराभव झाला. अटक झालेल्या शेकडो जणांना अत्यंत क्रूर वागणूक देण्यात आली आणि निदान ७० लोकांना फाशी देण्यात आली. सशस्त्र लढा यापुढे यशस्वी होणार नाही असे ठरवून डी व्हॅलेराने त्यातून अंग काढून घेतले आणि १९२३ पासून तो निवडणुकीच्या राजकारणात उतरला.

१९३३ ते १९४८ पर्यंत डी व्हॅलेराच्या हातात सत्ता होती. या काळात त्याने दक्षिण आयर्लंडचे औद्योगिकीकरण घडवून आणण्याचे प्रयत्न केले. नवी राज्यघटना बनवली. परंतु सार्वभौम प्रजासत्ताक स्थापन केले नाही. आयरिश रिपब्लिकन आर्मीतील असंतुष्ट जहाल तरुणांनी दहशतवादी कृत्याचे सत्र चालू केले. तेव्हा त्यातील काहीजणांना डी व्हॅलेराच्या कारकिर्दीतही फाशी देण्यात आले. सार्वभौम प्रजासत्ताक स्थापन करण्याचे जे कार्य डी व्हॅलेराला साधले नाही ते पुढे १९४९ साली, दुसऱ्या महायुद्धात इंग्लंड हे राष्ट्र खच्ची झाल्यानंतर जॉन कॉस्टेली या नेत्याने व्हॅलेराचा पराभव करून सत्तेवर आल्यावर साध्य केले.

आयर्लंडच्या गुंतागुंतीच्या स्वातंत्र्यलढ्याची हकिगत संक्षिप्तपणे वर दिली आहे. उत्तर आयर्लंडमध्ये आज ३५% कॅथॉलिक, ३०% प्रेसबटीरियन, २५% एपिस्कोपेलियन व उरलेले मेथॉडिस्ट इ. म्हणजे प्रॉटेस्टंट पंथाचेच उपपंथ आहेत. म्हणजे कॅथॉलिकांपेक्षा प्रॉटेस्टंटांची संख्या जवळजवळ दुप्पट आहे. नोकऱ्या, घरे इत्यादीबाबत कॅथॉलिकांविरुद्ध भेदभाव दाखविला जातो. उत्तर आयर्लंड औद्योगिकदृष्ट्या प्रगत आहे. परंतु तेथेही आर्थिक सत्ता प्रॉटेस्टंटच्या हातात अधिक केंद्रित झाली आहे. वाढत जाणाऱ्या बेकारीची झळ कॅथॉलिकांना अधिक जाणवते. यामुळे १९६८ सालापासून अखंड व समताधिष्ठित आयर्लंड निर्माण करण्याच्या चळवळीला जोर आला आहे. पण केवळ दहशतवादाने यश मिळणार नाही. उत्तर व दक्षिण आयर्लंडमधील श्रमजीवी जनता संघटित लढे उभारूनच समाजसत्तावादी राज्य स्थापन करून धार्मिक तणाव नष्ट करू शकेल.

(तात्पर्य, जून १९८१)

❑

मानवी संस्कृतीवरील वज्रलेपी कलंक
६ ऑगस्ट : हिरोशिमा, ९ ऑगस्ट : नागासाकी

ऑगस्ट महिना हा भारतीयांना उत्साहित आणि आनंदित करणारा महिना आहे. राजकीय पारतंत्र्याच्या शृंखला अल्पावधीत तोडून टाकण्याचा निर्धार ९ ऑगस्ट रोजी करण्यात आला आणि तेव्हापासून अवघ्या पाच वर्षांत, १५ ऑगस्ट रोजी वसाहतवादाचा अंत घोषित करणारा भारताचा ध्वज देशाच्या राजधानीत फडकला. परंतु हाच ऑगस्ट महिना दरवर्षी उजाडला म्हणजे जपानमधील जनता भयग्रस्त बनते आणि दु:खाच्या अनावर वेदनांनी, ती स्तब्ध, मुग्ध होत असते.

इतके अमानुष कृत्य अमेरिकेने का केले असावे? एप्रिल १९४५ मध्ये रुझवेल्ट यांच्या मृत्यूनंतर हॅरी ट्रुमन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले होते, त्यांनी, शासकीय अधिकाऱ्यांनी आणि सैन्यातील अधिकाऱ्यांनी दिलेले समर्थन आणि त्यावेळेस समर्थनाला मिळणारा पाठिंबा पुढीलप्रमाणे होता -

१९४५ च्या मे महिन्यात जर्मनी शरण आला तरीसुद्धा जपानने, विशेषत: त्यातील कट्टर युद्धपिपासू सैन्याधिकाऱ्यांनी युद्ध चालू ठेवण्याचा निर्णय घेतला होता, अशा परिस्थितीत जपानवर प्रखर हल्ला चढवून त्या देशावर संरक्षणात्मक आक्रमण करणे क्रमप्राप्त होते. त्या घनघोर युद्धात जपानचा पराभव झाला असता, परंतु अमेरिकेचे ५ लाख सैनिक गारद झाले असते असा अंदाज ट्रुमन यांनी व्यक्त केला. इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांनी तर या बॉम्बला, 'मुक्ती देणारा अद्भुत चमत्कार' असे म्हटले आहे. त्यांनी १० लाख सैनिक मारले गेले असते असा अंदाज व्यक्त केला! त्यापेक्षा दोन अणुबॉम्ब टाकल्याबरोबर शत्रूचे निर्दालन एका आठवड्याच्या आत झाले आणि दुसरे महायुद्ध समाप्त झाले यात वाईट काय झाले, असा या समर्थनाचा रोख आहे.

जर्मनी लवकर अणुबॉम्ब तयार करण्याची शक्यता आहे असा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला असल्यामुळे १९३९ सालीच प्रचंड गुंतवणूक करण्याचा निर्णय घेऊन, लोकप्रतिनिधी सभागृहांना विश्वासात न घेता अध्यक्ष रुझवेल्ट यांनी गुप्तता राखून अणुबॉम्ब निर्मितीच्या प्रकल्पाला प्रोत्साहन दिले होते. बॉम्बची चाचणी १६ जुलै १९४५ रोजी घेण्यात आली होती. ती यशस्वी ठरली होती. एवढी प्रचंड गुंतवणूक

आणि अवाढव्य खटाटोप करून तयार केलेला 'यशस्वी बॉम्ब' जर न वापरता सैनिक मरू दिले तर लोकप्रतिनिधी, सैन्याधिकारी आणि आम जनता आपले वाभाडे काढतील अशी भीती शासनकर्त्यांमधील अनेक उच्चपदस्थांना वाटत होती. चाचणी ओसाड प्रदेशावर घेण्यात आली होती. आता या 'दिव्य शस्त्राची' परिणामकारकता युद्धभूमीवर का अजमावू नये? असे याचे दुसरे समर्थन होते.

युद्धकाळातील जपानची वागणूक अतिशय घृणास्पद आणि निंद्य होती. पर्ल हार्बरवर जपानने केलेला आकस्मिक हल्ला, पादाक्रांत देशातील लोकांवर त्याने केलेले अनन्वित अत्याचार, चीनवर आक्रमण केल्यावर नानकिंग येथे त्यांनी केलेली सामान्य नागरिकांची भीषण कत्तल आणि युद्धकैद्यांना त्यांनी दिलेली अतिशय हीन वागणूक यामुळे अमेरिकन लोकमत संतप्त झालेले होते. सैन्य व सैन्यातील अधिकाऱ्यांनाही अधिक मनुष्यहानी होऊ न देता युद्ध संपेल तर बरे होईल असे वाटत होते. लोकक्षोभ लक्षात घेता, अणुबॉम्ब टाकणे अपरिहार्य होते असे तिसरे समर्थन दिले जाते.

जपानचा दारूण पराभव करणे संपूर्णतया समर्थनीय असले तरी जपानमधील सैनिकांपेक्षासुद्धा सामान्य नागरिकांचा क्रूर संहार करणारे अणुबॉम्बसारखे अजस्र शस्त्र वापरण्याची गरज होती का हा प्रश्न युद्धानंतर सुमारे २५-३० वर्षांनंतर चर्चेच्या ऐरणीवर आला. तोपर्यंत अनेक सरकारी 'गोपनीय' या सदराखालील कागदपत्रे खुली झाली होती. अनेक नेत्यांनी लिहिलेल्या आठवणी, शास्त्रज्ञांचा पत्रव्यवहार, वृत्तपत्र-स्तंभ लेखकांनी शोधून काढलेली माहिती प्रसिद्ध झाली होती. त्या सर्व सामुग्रीच्या आधारे विद्वान, अभ्यासू इतिहास व राजकीय विश्लेषण करणाऱ्या लेखकांनी असा निष्कर्ष काढला की अणुबॉम्ब टाकण्याची मुख्य कारणे राजकीय होती. जपानचा लवकर पराभव करण्याकरिता तो वापरण्याची गरज नव्हती आणि जपानवर हल्ला करून वर्चस्व प्रस्थापित करण्याकरिता कराव्या लागणाऱ्या युद्धात ट्रुमन-चर्चिल यांनी जे संभाव्य सैनिक-हत्येचे आकडे दिले आहेत ते फारच अतिशयोक्तीपूर्ण आहेत. या विद्वान लेखकांनी पुढील मुद्यांकडे लक्ष वेधले आहे.

बॉम्बचे अक्राळ-विक्राळ स्वरूप जर चाचणीच्या वेळीच प्रकर्षाने लक्षात आले होते, तर प्रत्यक्ष नागरिकांना लक्ष्य बनवून तो भेसूर, अमानुष संहार पुन्हा बघण्याची काय गरज होती?

बॉम्ब प्रकल्पातील (याला मॅनहाटन प्रकल्प असे म्हणतात) १२४ प्रमुख शास्त्रज्ञांनी जुलै १९४५ मध्ये बॉम्ब प्रत्यक्ष कोठे वापरू नये, परंतु त्याचे संहारक स्वरूप चाचणीच्या मार्गाने शत्रूच्या लक्षात आणून द्यावे, त्यातून दहशत निर्माण होईल तेवढी पुरण्यासारखी आहे असे आपले मत नोंदविले होते. श्रेष्ठ शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी बॉम्ब निर्मितीत सहभागी असलेले एक ज्येष्ठ शास्त्रज्ञ लिओ झिलार्ड यांच्या सल्ल्यावरून रूझवेल्ट यांना बॉम्बची चाचणी होण्यापूर्वी लिहिलेल्या पत्रात, बॉम्ब जर प्रत्यक्ष वापरला तर नजीकच्या भविष्यकाळात अमेरिका व सोविएत रशिया यांच्यात असे अधिकात

अधिक बॉम्ब बनविण्याची घातक स्पर्धा सुरू होईल असा इशारा दिला होता. इतरही अनेक शास्त्रज्ञांनी दिलेल्या अशा आशयाच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

अणुबॉम्ब टाकला जाण्यापूर्वी, जपानला जेरीस आणण्यासाठी जे तीन प्रयत्न झाले होते त्यात अमेरिकन सैनिकांची हत्या ट्रुमन-चर्चिल यांनी दिलेल्या संभाव्य मनुष्य-हानीच्या हत्येपेक्षा पुष्कळच कमी होती. उलट जपानमधील गारद झालेल्यांची संख्या फार मोठी होती. फेब्रुवारी १९४५ मध्ये यार्डा-यार्डावर झालेल्या'आयबो जिमा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लढाईत अमेरिकेचे ६८०० सैनिक मारले गेले होते. मार्च १९४५ मध्ये टोकिओ शहरावर तुफानी बॉम्बहल्ला (आग पेटवणारे बॉम्ब) करण्यात आला होता, तेव्हा ८३ हजार जपानी प्राणास मुकले होते. एप्रिल १९४५ मध्ये 'ओकितावा युद्ध' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या घनघोर युद्धात अमेरिकेचे ७ हजार सैनिक व ५ हजार खलाशी मारले गेले होते तर जपानचे सामान्य नागरिकांसहित सुमारे एक लाख लोक मारले गेले होते. म्हणून, फार मोठ्या प्रमाणावर अमेरिकन सैनिकांचे प्राण वाचविण्याकरीता अणुबॉम्ब टाकणे क्रमप्राप्त होते या समर्थनात तथ्य आहे असे म्हणण्याला आधार आहे असे दिसत नाही.

युद्ध सुरू झाले तेव्हा सोव्हिएट रशियाचा जपानशी अनाक्रमणाचा करार होता. परंतु सर्व फॅसिस्ट शक्तीचे पुरे पारिपत्य करण्याकरिता आणि क्रांति झाल्यापासून सो.युनियनशी सतत वैरभाव धारण करणाऱ्या इंग्लंड-अमेरिकेकडून युद्धानंतर पुरेशा सवलती मिळविता याव्यात आणि आपल्या वर्चस्वाचा टापू वाढविता यावा याकरिता क्रिमिया आणि याल्टा येथील दोस्त राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेत सो.युनियनने जपानविरुद्धच्या लढाईत भाग घेण्याकरिता ऑगस्ट १९४५ पर्यंत मुदत मागितली होती.

दिलेल्या आश्वासनाप्रमाणे, सो.युनियनने मांचुरिआच्या सीमेवर आपले सैन्य उभे करण्यास सुरूवात केली आणि ऑगस्ट ९, १९४५ रोजी चढविलेल्या हल्ल्यात जपानचा जबरदस्त पराभव केला. सो.युनियन युद्धात भाग घेणार हे आश्वासन मिळाल्यानंतर जपानची शरणागती फार काळ लांबली नसती हे उघड दिसत असूनही अमेरिकेला मानवी जीविताबद्दल एवढी क्रूर बेपर्वाई हिरोशिमा व नागासाकीच्या भूमीवर दाखविण्याची गरज होती काय?

पराभवाची लक्षणे दिसू लागल्यावर, जपानमधील लोक, राजकीय नेते, युद्ध-धोरण सल्लागार, काही सेनाधिकारी आणि मुख्य म्हणजे जपानचे राजे हिरोहिटो हे शरणागती पत्करावयास अनुकूल झालेले होते. सो.युनियनने याकरिता मध्यस्थी करावी म्हणून आपल्या मॉस्कोमधील राजदूतामार्फत त्यांनी प्रयत्नही सुरू केले होते. या सर्व घडामोडींची इत्थंभूत माहिती अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना व प्रमुख शासकीय अधिकाऱ्यांना होती. जपानची अट फक्त एकच होती. जपानचे लोक हे आपल्या राजाला प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार मानीत असल्यामुळे, शरणागतीनंतर, राजाला युद्ध-गुन्हेगार ठरवू

नये, त्याला अटक करण्यात येऊ नये आणि परंपरेने चालत आलेल्या याच राजघराण्याला अभय देण्यात यावे एवढीच अपेक्षा जपानतर्फे व्यक्त करण्यात येत होती. ही अट तेवढी स्वीकारून, जपानची बिनशर्त शरणागती मागावी असे मत अमेरिकेतील अनेक राजकीय नेत्यांचे व काही नामवंत सेनानींचे होते. विन्स्टन चर्चिलही सर्वसामान्यपणे ही अट स्वीकारण्यास अनुकूल होते. परंतु या कोणाच्याही मताचा प्रभाव अध्यक्ष ट्रुमन यांच्यावर पडला नाही.

ट्रुमन यांच्यावर मुख्य प्रभाव जो पडला, तो जेम्स बर्नस् या त्यांच्या प्रमुख राष्ट्र सचिवाचा. भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांचे वैयक्तिक राजकीय सल्लागार हॅरी हॉपकिन्स आणि दोन उपराष्ट्र सचिव आर्चिबॉल्ड मॅकलीश आणि डीन ॲचिसन हेही बर्नस् यांच्याशी सहमत होते. बर्नस् यांनी आपली भूमिका आडपडदा ठेवून मांडली नाही. त्यांचे प्रमुख मुद्दे होते -

१) जपान शरण येण्याच्या परिस्थितीला येऊन ठेपला असताना राष्ट्राध्यक्षस्थानी कोणत्याही अटी स्वीकारण्याबाबत वाटाघाटी करणे म्हणजे आत्मदौर्बल्याचे लक्षण ठरेल. म्हणून युद्धानंतर, लोकमतावर अधिष्ठित व शांततेला कटिबद्ध असलेले सरकार सत्तारूढ होऊ शकेल या पलीकडे कोणतेही आश्वासन जपानला देऊ नये असे त्यांनी मांडले.

२) अणुबॉम्ब टाकून जपानला जे शरण आणावयाचे त्याचे मुख्य कारण अमेरिकन सैनिकांचे प्राण वाचविणे याहीपेक्षा, सो.युनियनचे प्रभाव-क्षेत्र आकुंचित करणे, ते युद्धात पडले तर त्यांना जपानपर्यंत धडक मारू न देणे आणि अणुबॉम्बची मक्तेदारी तोपर्यंत तरी निदान अमेरिकेपुरतीच मर्यादित असल्यामुळे त्या दहशतीच्या जोरावर युद्ध समाप्तीनंतर सो.युनियनला 'काबूत ठेवणे' या तीन उद्दिष्टांवर बर्न्स यांनी भर दिला आणि तो सल्ला अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी स्वीकारला. खुद्द अणुबॉम्ब संहारक प्रभाव किती असू शकतो याचा नेमका अंदाज घेता यावा याकरिता ज्या शहरांवर अन्य कोणत्याही प्रकारचा बॉम्बहल्ला झालेला नव्हता अशी हिरोशिमा व नागासाकी ही शहरे निवडण्यात आली!

जगातील सर्व आक्रमक युद्धखोरांचे हात रोखण्याकरिता अतिशय जागरूक अशा लोकमताची आणि परिणामकारक उपक्रमांची किती गरज आहे याची हिरोशिमा-नागासाकीच्या मन विदीर्ण करणाऱ्या वरील अत्यंत संक्षिप्तपणे विशद केलेल्या कहाणीवरून वाचकांना कल्पना येईल ही अपेक्षा.

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, ऑगस्ट १९९७)

❑

मानवी हक्क
संस्कृतीच्या विकासाचा सजग प्रवास

इस. १४०० ते १७०० या तीन शतकांच्या अवधीत युरोपमध्ये 'चेटकिणी' असा आरोप असलेल्या सुमारे ५ लाख स्त्रियांचे धर्मपीठांच्या संगनमताने हत्याकांड झाले. १९३३ ते ४५ या दरम्यान जर्मनीतील नाझी राजवटीने सुमारे ६० लाख यहुदी पंथीयांची (ज्यूंची) कत्तल केली. सुमारे १९३० ते ४० च्या दरम्यान 'क्रांतिविरोधक' या आरोपाखाली सोविएत युनियनमध्ये ज्यांना नेस्तनाबूत करण्यात आले त्यांची संख्या अद्याप अनिश्चित असली तरी अधिकात अधिक ४० लाखाच्या आसपास ती असू शकेल असे अंदाज बांधण्यात आले आहेत. या सर्व घटनांमध्ये लक्षात घेण्याजोगे आहे ते हे की, हा मानवसंहार महायुद्धात झालेला नव्हता. प्रस्थापिताला विरोध करण्याचे स्वातंत्र्य नाकारण्यासाठी या निर्दय शिक्षा बहुतांशी फरमावण्यात आल्या होत्या.

आपले मत-स्वातंत्र्य अबाधित राखण्याकरिता मानवाच्या इतिहासात ज्या व्यक्तींनी प्राणाचे मोल दिले किंवा निदान तसा धोका पत्करला त्यांच्या जीवनाची हकीकत जशी हृदयद्रावक आहे तशीच ती स्फूर्तीदायकही आहे. सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी सॉक्रेटिस या ग्रीक तत्त्वचिंतकावर 'युवकांची मती भ्रष्ट करणारा', 'शहर (अॅथेन्स) ज्या देवांची पूजा करते त्या देवांचा अधिक्षेप करणारा', असे आरोप ठेवण्यात आले होते. सॉक्रेटिसने ते आरोप नाकारले. लोकांचे हितरक्षण करण्याकरिता आपल्याला पटलेली नीती सांगणारा अशी आपली भूमिका त्याने न्यायासनासमोर मांडली आणि त्याकरिता विषप्राशन ही तत्कालीन देहांताची शिक्षा स्वीकारली. तुरुंगातून निसटून जाण्याची व्यवस्था त्याचे मित्र करावयास तयार असूनही, त्याने तो मार्ग अव्हेरला.

वेदप्रामाण्य नाकारणारा नास्तिक (बहुधा इ.स. दुसऱ्या ते सातव्या शतकात केव्हा तरी) चार्वाक हा ब्राह्मणांच्या ब्रह्मतेजाने दग्ध झाला! (म्हणजे त्याला जाळून टाकण्यात आले.)

ब्रूनो या इटालियन शास्त्रज्ञाने धर्ममार्तण्डांसमोर मान झुकवली नाही, आपले सिद्धांत बरोबर असल्याचा आग्रह त्याने धरला म्हणून इ.स. १५९३ साली त्याला

जिवंत जाळण्यात आले.

१६५० साली देहत्याग केलेल्या (की खून झालेल्या?) तुकाराम महाराजांनी 'अंत्यजादि योनी तरल्या हरिभजने, तयांची पुराणे भाट झाली' असा निर्णय आपल्या अभंगातून जाहीर केला होता. त्या तुकाराम महाराजांना, 'बायकांना नादी लावतो' असल्या बिनबुडाच्या आरोपांना तोंड द्यावे लागले, त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला, त्यांचे लिखित-साहित्य इंद्रायणीत बुडविण्यात आले.

देशोदेशी दर एक शतकात मानवी हक्कांचा विस्तार करणाऱ्या अशा कित्येक महापुरुषांची यादी व जीवनकार्य देता येईल. त्यातून प्रकट होणारे सत्य कोणते याचा ऊहापोह या लहानशा टिपणात करावयाचा असल्यामुळे ही यादी न वाढविता त्या सत्यावर लक्ष केंद्रित करणे अधिक उचित ठरेल.

मानवी हक्कांची बदलती क्षितिजे

मानवाचे वैशिष्ट्य वेगवेगळ्या तऱ्हेने सांगितले जाते. मनुष्य हा विचार करणारा प्राणी आहे. मनुष्य हा आयुधे व अवजारे बनवतो. तो केवळ निसर्गाला प्रतिसाद किंवा प्रतिक्रिया देत नाही, तर निसर्गाचे नियम समजावून घेऊन, निसर्गावर प्रक्रिया करतो आणि निसर्गाला आणि स्वत:ला बदलीत असतो. दुसऱ्या शब्दांत असे म्हणता येईल की गाय गवत खाते, मनुष्य गवत उगवितो. मनुष्य हा हत्ती किंवा हरणांप्रमाणे नुसता कळप करून राहात नाही तर तो एकमेकांशी संबंध प्रस्थापित करणारा आणि कालौघाबरोबर हे संबंध बदलणारा समाज घडवितो. असा हा सदैव जिज्ञासाग्रस्त असलेला मानव हरएक प्रकारच्या बंधनातून स्वत:ला मुक्त करवून घेऊन, श्रेयगर्भ जीवन जगण्यासाठी धडपडत असतो. वर्गबद्ध, श्रेणीबद्ध, धर्मसंस्था-रुढी अधिष्ठित, विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या अनेक बंधनांतून मुक्त होण्याकरिता मानवाला आपले हक्क प्रस्थापित करावे लागतात. स्वातंत्र्याची ऊर्मी हा या हक्कप्रस्थापनेचा मूळ स्रोत आहे.

फार प्राचीन काळापासून वैयक्तिक व सामूहिक पातळीवर स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न झाले असले तरी मानवी हक्कांची सनद या स्वरूपात (ते हक्क त्या काळी कितीही मर्यादित असले तरी) त्यांची मांडणी पहिल्या प्रथम १२१५ साली इंग्लंडमध्ये झाली. इंग्लंडचा तत्कालीन राजा जॉन, याला त्या वर्षी रनीमेड मैदानावर गाठून (घेराव घालून), त्याच्याकडून एका सनदेवर सही-शिक्का घेण्यात आला. 'मॅग्ना चार्टा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सनदेतील अनेक कलमांपैकी एक महत्त्वपूर्ण कलम (कलम क्र. ३९) होते ते हे की 'कोणाही व्यक्तीचे स्वातंत्र्य देशातील कायद्यानुसार, न्यायप्रक्रिया झाल्याखेरीज हिरावून घेता येणार नाही.' हा हक्क प्रस्थापित झाला असला तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी लब्धप्रतिष्ठित लोकांपुरतीच मर्यादित होती. राज्यकारभारात लोकांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहभाग वाढत जाण्यासाठी

पुढील सुमारे ४०० वर्षे लोकांना लढे द्यावे लागले. राजे-राण्यांना फाशी देण्याचे धैर्य लोकलढ्यांतून निर्माण झाले.

या सर्व लढ्यांची परिणती म्हणजे इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेत वेगवेगळे कायदे संमत करण्यात आले. संक्षिप्त आढाव्यात यातील महत्त्वपूर्ण कायद्यांची केवळ नोंद केली तरी ज्या विविध टप्प्यांतून मानवी हक्कांचे क्षितिज कसे विस्तारत गेले त्याची कल्पना येऊ शकेल.

१६२८ : पिटिशन ऑफ राईट - इंग्लंड

१६८९ : बिल ऑफ राईटस् - इंग्लंड

१७७६ : स्वातंत्र्याचा जाहीरनामा - अमेरिका

१७९१ : अमेरिकन बिल ऑफ राईटस् - अमेरिका

१७८९ : फ्रेंच डेक्लरेशन ऑफ द राईटस् ऑफ मॅन अँड ऑफ द सिटिझन - फ्रान्स

१९१७ : रशियन राज्यक्रांतीनंतर या राजकीय हक्कांना आर्थिक व सामाजिक आशय देण्यात आला.

या महत्त्वपूर्ण कायद्यांव्यतिरिक्त या कालावधीत व त्यानंतरही अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वृत्तपत्र स्वातंत्र्य, शांततामय सामूहिक प्रतिकाराचे स्वातंत्र्य अशा अनेकविध हक्कांना युरोपमधील अनेक देशांमध्ये तात्त्विक पातळीवर मान्यता देण्यात आली. एकच उदाहरण घ्यावयाचे झाले तर १७२७-९७ या दरम्यान वैयक्तिक जीवनात प्रस्थापित नीतीनियमांचा बेछूटपणे भंग करणारा जॉन विल्कस या नावाचा एक अफलातून पत्रकार इंग्लंडमध्ये होऊन गेला. तो आपल्या वर्तमानपत्रामध्ये खळबळजनक प्रक्षोभक वृत्तांतांना प्रसिद्धी देत असे, त्यामुळे त्याच्याबद्दल लोकमत प्रतिकूल होते. परंतु तो राज्यकारभारातील, राजघराण्यातील व उमराव घराण्यातील अनेक कुलंगडी चव्हाट्यावर आणू लागला म्हणून त्याची लोकप्रियता वाढत गेली आणि तो लंडन शहराचा नगराध्यक्ष झाला. एवढेच नव्हे, तर लोकसभेच्या निवडणुकांत तो वारंवार यशस्वी झाला. मंत्र्यांच्या कारभारावर त्याने आपले टीकास्त्र चालूच ठेवले म्हणून त्याला लोकसभेतून व नंतर देशातून हद्दपार करण्यात आले. परंतु तो डगमगला नाही. लोकसभेतील चर्चेला प्रसिद्धी देण्यास त्या काळात बंदी होती, तसेच व्यक्तीचे नाव, निश्चित आरोपांचा उल्लेख न करता कोणाही व्यक्तीला अटक-वॉरंट काढून अटक करण्याची मुभा त्या वेळच्या राज्यकर्त्यांना होती. जॉन विल्कसने या दोन्ही प्रथांविरुद्ध आवाज उठविला. लोकसभेतील कारभाराला प्रसिद्धी देण्यास त्याने इतर वर्तमानपत्रांनाही उत्तेजन दिले आणि पकड-वॉरंट तपशीलांसकटच काढण्यात आले पाहिजे हा हक्क त्याने प्रस्थापित केला. त्याच्या वैयक्तिक जीवनाबद्दलची नापसंती बाजूला सारून आली. व्यक्तिस्वातंत्र्याच्या लढ्यातील एक लक्षणीय टप्पा व्यक्त करणारा त्याचा पुतळा आज इंग्लंडमध्ये उभा आहे.

विकसित होत गेलेली संकल्पना

वर उल्लेख केल्याप्रमाणे एक-एक हक्क कालक्रमाने प्रस्थापित केले गेले हे जरी खरे असले तरी मुख्यत: तात्त्विक अथवा अमूर्त पातळीवरच प्रस्थापित केले गेले होते हे लक्षात घेतले पाहिजे. त्या हक्कांच्या अंमलबजावणीत वर्गीय पक्षपात होता. त्यामुळेच जॉन स्टुअर्ट मिलसारख्या (१८०६-७३) तत्त्ववेत्त्यांनी 'स्वातंत्र्य-मीमांसा' हा ग्रंथ लिहिला परंतु भारताला इंग्रजांच्या वर्चस्वापासून मुक्त होण्याचा अधिकार ते मानावयास तयार नव्हते. त्यांच्या साम्राज्यवादी देशाचे हितसंबंध त्यांना अधिक मोलाचे वाटले. 'समता, बंधुता, स्वतंत्रता' ही तेजस्वी घोषणा फ्रेंच राज्यक्रांतीने अजरामर केली. कॅप्टन ड्रीफस या सैन्यातील एका अधिकाऱ्याला खोट्या आरोपांखाली बडतर्फ करण्यात आले होते. त्याची न्याय्य बाजू उचलून धरून त्याला त्याच्या पदावर पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी एमिल झोला (१८४०-१९०२) हा फ्रेंच साहित्यिक जिद्दीने लढला. परंतु फ्रान्स या साम्राज्यवादी देशाच्या वसाहतींमध्ये लोकांवर जुलूमही करण्यात आले आणि वंशभेदही पाळण्यात आला. वर उल्लेखिल्याप्रमाणे जॉन विल्कस हा वृत्तपत्र-स्वातंत्र्यासाठी लढला. परंतु इंग्रज राज्यकर्त्यांनी लो.टिळकांना वृत्तपत्र-स्वातंत्र्य नाकारले आणि राजद्रोहाच्या आरोपाखाली त्यांना शिक्षा ठोठावण्यात आली. सार्वत्रिक मतदानाचा हक्क मान्य झाल्यानंतरही इंग्लंडसारख्या देशामध्येसुद्धा १९१८ सालपर्यंत आणि अमेरिकेत १९२० पर्यंत स्त्रियांना मतदानाचा हक्क नाकारण्यात आला होता.

वरील मुद्याच्या अनुषंगानेच दुसरा एक मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे. व्यक्तिगत हक्कांच्या या संकल्पनेत शासनसंस्थेचा हस्तक्षेप कमीत कमी असावा, असे गृहीत धरलेले आहे. म्हणजेच शासनसंस्थेचे अधिकार अथवा वर्चस्व जितके शबल असेल तितके व्यक्तीचे हक्क सबळ असतील असे यात गृहीत धरलेले आहे. परंतु ही संकल्पना कित्येकदा समाजद्रोही बनू शकते. सती प्रथा, हुंडाबळी, गर्भजलपरीक्षेतून होणारी बालिकांची हत्या, बालकामगारांचे शोषण, भूदास पद्धती, दलितांवरील अत्याचार अशी अनेक दुष्कृत्ये शासनसंस्थेच्या हस्तक्षेपाशिवाय रोखता येतील काय? म्हणून मानवी हक्क हे समाजहितपोषकच असले पाहिजेत आणि हे एकदा गृहीत धरल्यानंतर बंधनरहित स्वातंत्र्य असूच शकत नाही हे मानणे क्रमप्राप्त ठरते.

अनेक शतकांच्या विचारमंथनातून आणि आंदोलनांतून मानवी हक्कांची संकल्पना आकार धारण करीत गेली. हे आतापर्यंतच्या विवेचनातून लक्षात येईल. दुसरे महायुद्ध संपेपर्यंत या हक्कांचे रक्षण ज्या-त्या देशातील शासनसंस्थेने (शासन यंत्रणेने) व खुद्द समाजाने जागरूकतेने करावे, असे मानण्यात येत होते. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या आधी व युद्धकाळात फॅसिस्ट सत्ताधाऱ्यांनी जे अनन्वित अत्याचार केले, वंशवर्चस्वाचा आक्रमक प्रचार केला त्यातून जगातील उदारमतवादी, लोकशाहीवादी व समतावादी सुन्न झाले. मानवी हक्कांची व्याप्ती वाढविली पाहिजे, या हक्कांचे सर्वमान्य निकष ठरविले गेले पाहिजेत आणि ज्या-ज्या देशात या हक्कांचे जबरदस्त उल्लंघन होत

असेल, त्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा झाली पाहिजे, एवढेच नव्हे तर या हक्कांची पायमल्ली थांबविण्याकरिता इतर राष्ट्रांनी सहकार्याने दबाव आणला पाहिजे असा मतप्रवाह प्रभावी होऊ लागला. या मतप्रवाहाचे प्रतिबिंब संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करताना जी सनद स्वीकृत केली गेली त्यात पडलेले दिसते. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय राष्ट्र संघटनेतही (लीग ऑफ नेशन्स) काही मानवी हक्कांवर (विशेषत: ज्या-त्या देशातील अल्पसंख्याकांचे हक्क, श्रमजीवी लोकांचे काही हक्क आणि वासाहतिक देशातील नागरिकांचे काही हक्क) भर दिलेला दिसतो. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या कालावधीत भरलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमधून मानवी हक्कांबद्दल जेवढी चर्चा झाली, तेवढी यापूर्वी मानवी इतिहासात कधी झाली नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या उद्दिष्टे घोषित करणाऱ्या उपोद्घातात मानवी हक्कांची ग्वाही देणारी क्र. १, १३, ५५, ५६, ६२ आणि ६८ ही कलमे जी अनुस्यूत करण्यात आली आहेत ती वरील विविध परिषदांच्यात झालेल्या विचारमंथनाची परिणती आहे.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या वर उल्लेख केलेल्या कलमांतील उद्दिष्टांना निश्चित अधिक नि:संदिग्ध आशय प्राप्त करून देण्याकरिता मानवी हक्कांची तपशीलवार यादी देणे व त्यांचा गाभा व्यक्त करणे आवश्यक होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक व सामाजिक समस्यांकडे अधिक लक्ष पुरविणाऱ्या पोटशाखेच्या साह्याने तीस कलमांचा मानवी हक्कांचा आंतरराष्ट्रीय जाहीरनामा तयार करण्यात आला. यालाच 'युनिव्हर्सल डेक्लेरेशन ऑफ ह्यूमन राईटस्' असे म्हणतात. हा जाहीरनामा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी संमत केला. पुढे १९५० साली संमत करण्यात आलेल्या ठरावानुसार १० डिसेंबर हा दिवस दरवर्षी 'मानवी हक्क दिन' म्हणून सर्व राष्ट्रांनी पाळावा, असे ठरविण्यात आले. या आंतरराष्ट्रीय जाहीरनाम्यात पुढील प्रमुख हक्कांचा समावेश करण्यात आला आहे.

१) कायदेशीर प्रक्रियेशिवाय अटक करण्याला व बंदिस्त करून ठेवण्याला मज्जाव

२) संघटना व संचार स्वातंत्र्य

३) अभिव्यक्ती स्वातंत्र्य

४) राष्ट्रांतर्गत सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमात सहभागी होण्याचा हक्क

५) किमान शिक्षण प्राप्त करून घेण्याचा हक्क

६) कुटुंब उभारण्याचा हक्क व कौटुंबिक हक्कांचे संरक्षण

७) राष्ट्रीय नागरिकत्वाचा हक्क

८) वैयक्तिक मालमत्ता धारण करण्याचा हक्क

९) स्वत:च्या देशाच्या बाहेर इतर देशात संरक्षणासाठी स्थलांतर करून आश्रय मागण्याचा हक्क

या व अन्य हक्कांचा भंग जेथे होत असेल तेथे प्रत्यक्ष हस्तक्षेप करून कारवाई

करण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्र संघटनेला असावा अशी एक भूमिका चर्चेसाठी आली. परंतु असा अधिकार देण्याला बहुसंख्य राष्ट्रांनी विरोध केला. अंशत: त्यामुळे मानवी हक्कांचा एक बहुतांशी आदर्श जाहीरनामा आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्तित्वात असूनही या हक्कांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. सलमान रश्दी या लेखकाने लिहिलेल्या कादंबरीत प्रेषित महंम्मद यांची बदनामी करण्यात आली आहे, या सबबीखाली इराणच्या सत्ताधाऱ्यांनी लेखकाला देहांताची शिक्षा फर्मावली आहे. मारेकरी अंगावर घालून ही शिक्षा अंमलात आणण्यात यावी असाही फतवा काढण्यात आला आहे. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाला इराणविरुद्ध कारवाई करून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अनेक देशांतील हक्कांच्या पायमल्लीबद्दल जागतिक पातळीवर चर्चा होऊ शकते, निषेध व्यक्त करता येतो परंतु हक्कांचे संरक्षण करता येत नाही.

भारतीय वास्तव

सोमवार ता. १ डिसेंबर १९९७ रोजी बिहारमध्ये जमीनदारांच्या एका 'सेनेने' जे हत्याकांड घडवून आणले, त्यात दुर्बल घटकांतील ६१ लोकांना प्राणास मुकावे लागले. मानवी हक्कांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा टप्पा गाठण्यास अद्याप किती प्रखर आंदोलनाची गरज आहे, हे यावरून सर्व विचारी नागरिकांच्या लक्षात येईल.

बिहारमध्ये घडली तशा घटना घडल्या म्हणजे मानवी हक्क रक्षणाबाबत भारतातील स्थिती किती शोचनीय आणि निषेधार्ह आहे याची कल्पना देशातील नागरिकांना येत असते. मृत्यूची संख्या कमी-जास्त असली, तरी स्वातंत्र्योत्तर काळातील केवळ गेल्या काही वर्षांतील नोंदविल्या गेलेल्या घटनांवर ओझरती नजर फिरवली तरी जे चित्र दिसते ते उपेक्षणीय नाही.

दहशतीने आपले उद्दिष्ट साध्य करून घेणे हे वेगवेगळ्या संघटनांच्या नावाने वावरणाऱ्या आतंकवाद्यांकडून जसे होत असते, तसेच ते पोलिस यंत्रणेकडूनही होत असते.

४ फेब्रुवारी १९९६, त्रिपुरा या राज्यातील दाब बारी या गावातील लोकांवर आतंकवाद्यांनी हल्ला चढविला. त्यात त्यांनी बेछूट गोळीबार केला आणि घरांना आगी लावल्या. या हल्ल्यात ५ प्रौढ स्त्रिया, १ लहान मुलगी आणि एका चार वर्षाच्या बालकाला जाळून भस्मसात करण्यात आले.

मणिपूर राज्यात अनेक सरकारी खाती, बँका, रुग्णालये, शाळा यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून आतंकवादी दरमहा ५० रु.पासून २०० पर्यंत खंडणी वसूल करीत असतात. महाराष्ट्रात, व्यापारी, बांधकाम उद्योजक, चित्रपट निर्माते, घरमालक अथवा भाडेकरू, अल्पसंख्याक जमातीतील लोक यांच्याकडून 'शिवशाही'ची राजवट चालवणारे शिवसैनिक धाकाने प्रचंड रकमांची खंडणी वसूल करीत असतात.

२३ फेब्रुवारी १९९६ : बोडो आतंकवाद्यांनी आसाममधील कोकराझार जिल्ह्यातील एके ठिकाणी छावणीत विश्रांती घेत बसलेल्या, दैनंदिन मजुरीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकऱ्यांवर गोळीबार केला त्यात आठ मजूर मरण पावले आणि दोन जबर जखमी झाले.

काश्मीर, पंजाब व ईशान्य भारतातील अनेक राज्यांत सरकारी खाती अथवा खासगी कंपन्या यात काम करणारे उच्च पदाधिकारी यांचे अपहरण, लूटमार व त्यांना ठार मारणे हे प्रकार सर्रास चालू असतात. यात राजकीय घडामोडींशी संबंध नसलेल्या सामान्य नागरिकांना सुद्धा बळी पडावे लागले आहे. अशा सर्वांची गेल्या सुमारे १०-१२ वर्षांची यादी केल्यास ती हजारोंच्या घरात जाईल. १९९४ मध्ये करतार सिंग विरुद्ध पंजाब सरकार या खटल्यासंबंधी भारतातील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आपल्या निर्णयपत्रात भारतात व जगभर दहशतवाद किती मोठ्या प्रमाणावर वाढला आहे याची दखल घेण्यात दहा पाने खर्ची घातली आहेत.

संबंध वर्षात जवळजवळ असा एकही दिवस जात नाही की ज्या दिवशी देशात कोठे ना कोठे तरी दलित अथवा आदिवासींवर अत्याचार होत नाही. या दुर्बल घटकांच्या वस्त्यांजवळील विहिरीत विष टाकणे; सवर्णांच्या वस्तीजवळ रस्त्यांवरून जाण्यास त्यांना मज्जाव करणे अथवा धोतर-लुंगी गुडघ्यांच्यावर नेसावयास लावणे व अनवाणी चालावयास त्यांना भाग पाडणे; त्यांच्या शेतजमिनीवर अतिक्रमण करणे; त्यांच्यातील युवक-युवतींनी आंतरजातीय प्रेमविवाह करण्याचे ठरविल्यास त्यांच्यावर व त्यांच्या पालकांवर हल्ले चढवून त्यांना जायबंदी करणे; कामाचे तास, वेतन अथवा रजा याबद्दल शेतमजुरांनी प्रश्न उपस्थित केल्यास, त्यांच्या वस्त्या जाळून टाकणे; त्यांच्यावर बहिष्कार टाकून, गावातील पाण्याचा वापर करण्यास अथवा दुकानातील वस्तू घेण्यास त्यांना बंदी करणे; निवडणुकीत मतदान करण्यास जबरदस्तीने रोखणे अथवा आणणे; त्यांच्या महिलांवर बलात्कार करणे, अशा मानुषतेला काळिमा फासणाऱ्या विविध घटना हरघडीला घडत असतात. यातील केवळ अतिभीषण प्रमादांची देशभरातील यादीच द्यावयाची ठरविल्यास, ती खूप मोठी होईल. अनुसूचित जाती जमातींच्या समस्यांमध्ये लक्ष घालणाऱ्या मध्यवर्ती सरकारच्या समाज कल्याण समितीने १९९५ मध्ये अहवालात अशा घटनांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला व प्रखर टीकाही केलेली आहे.

भारतीय राज्य घटनेत शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे नोंदविले गेलेले नाही. घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांत ती सरकारची एक जबाबदारी असल्याचे नोंदविले गेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने याला हक्काचा दर्जा देण्यात यावा असे आपल्या निकालात फर्माविले आहे. आज भारतात सुमारे ३३ कोटी लोक निरक्षर आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश सरकारने मानल्यास, स्वातंत्र्योत्तरकाळातील भारतीय राज्यकारभारातील एक कलंक पुसला जाण्याची शक्यता निर्माण होईल.

१९९४ मध्ये नोंदविल्या गेलेल्या स्त्रियांवरील बलात्कारांची संख्या १०,२२६ होती. त्याचवर्षी हुंडा-बळींची नोंदविली गेलेली संख्या ४,२७७ होती. महिलांसंबंधी नोंदविण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची त्या सालची संख्या ८२,८१८ होती.

देशातील सुमारे २० कोटी बालकामगारांचे किमान हक्क सुद्धा किती बेदरकारपणे तुडविले जात असतात यावर अलीकडच्या काळात लिहिले गेले आहे.

प्रकल्पग्रस्त विस्थापित, आदिवासी, अल्पसंख्याक अशा विविध समाज घटकांच्या हक्कभंगाची करुण कहाणी या लहानशा टिपणात वगळण्यात येत आहे.

ज्या पोलीस यंत्रणेमार्फत लोकांच्या हक्कांचे संरक्षण होणे अपेक्षित आहे ती पोलीस यंत्रणाच लोकांचे हक्क वारंवार पायदळी तुडवीत असते. इशारा न देता करण्यात येणारे गोळीबार, तुरुंगातील आरोपींवर अनन्वित अत्याचार करणे व त्यांचा मृत्यू घडवून आणणे, महिलांवर बलात्कार, आरोपींचे डोळे फोडणे, महिलांच्या कपाळावर तीक्ष्ण शस्त्राने 'चोर' किंवा अन्य गुन्हा नोंदवणे अशी पोलिसांच्या गुन्ह्यांची मोठी यादी पुरेशा प्रमाणात नसली, तरी आतापर्यंत उजेडात आलेली आहे.

भारताची जगातील सर्वात विस्तृत राज्यघटना, राष्ट्रीय मानवी हक्क संरक्षण आयोग, न्यायालये यांना मानवी हक्क रक्षणाचे बाबतीत अद्याप फारच अपुरे यश प्राप्त झाले आहे, असे भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या वर्षी खेदाने नोंदविणे क्रमप्राप्त ठरते.

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, डिसेंबर १९९७)

❑

युद्धस्य कथा रम्या?

१० जून १९९८ : सत्तारूढ भारतीय सरकारने अणुबॉम्बच्या चाचण्या घेतल्याला एक महिना झाला होता. चाचण्या यशस्वी झाल्यामुळे सरकारी प्रवक्त्यांच्या, नेत्यांच्या गगनभेदी घोषणा व वक्तव्यांमुळे हजारो लोकांच्या मनात सामर्थ्याच्या आभासाचा उन्माद निर्माण झाला होता. तो अजूनही ओसरलेला नाही. सर्व संहारक शस्त्रास्त्रांनी देशाला सज्ज व्हावे लागते आहे याची खंत अनेकांना वाटेनाशी झाली आहे.

पुण्याच्या 'फिल्म अर्काईव्हज्'मध्ये तेथील विद्यार्थ्यांसाठी चालणाऱ्या अभ्यासक्रमात ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन प्रसिद्ध चित्रपट समीक्षक व निवृत्त प्राध्यापक डॉ.सतीश बहाद्दूर यांनी १० जूनच्या संध्याकाळच्या सत्रात चार चित्रपट दाखवले. हे चित्रपट बघण्यासाठी त्यांनी मलाही निमंत्रण दिले होते.

पहिला चित्रपट होता 'ट्रायम्फ ऑफ द विल'. हा चित्रपट १९३३ साली खास हिटलरच्या हुकुमावरून जर्मनीत तयार झाला. लेनी रीफेनस्टाल या त्या चित्रपटाच्या दिग्दर्शिका. त्या जगातल्या उत्तम दिग्दर्शकांपैकी एक मानल्या जातात आणि विशेषत: त्या काळात उपलब्ध तंत्रज्ञानात कमालीचे नावीन्य त्यांनी निर्माण केले होते. त्यांचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन हिटलरने त्या आपल्या प्रचारासाठी उपयोगी पडतील म्हणून त्यांना हेरलं व त्यांनी आपल्या तंत्राचा अतिशय उत्कृष्ट वापर करून हा चित्रपट तयार केला.

१९३४ मध्ये हिटलर न्यूरेनबर्गला एका प्रचंड मेळाव्याला 'दर्शन' देण्यासाठी जाणार होता. 'पहिल्या महायुद्धानंतर वीस वर्षांनी, जर्मनीच्या हालअपेष्टा सुरू झाल्यानंतर १४ वर्षांनी आणि हिटलरच्या रूपाने जर्मनीचे 'उत्थान' सुरू झाल्यापासून एकोणीस महिन्यांनी!' अशी शीर्षके ठळक अक्षरात दाखवून या चित्रपटाला सुरूवात होते. हिटलर साक्षात परमेश्वर वाटावा असं वातावरण तयारही झालं होतं आणि तेच या चित्रपटात अत्यंत प्रभावीपणे दाखवलं आहे. ही संपूर्ण फिल्म मूक असून हिटलरची भाषणं एवढाच 'आवाज' त्यात आहे. त्यावेळीही आधुनिक इमारती वगैरे न्यूरेनबर्गमध्ये होत्या. परंतु 'प्राचीन ते श्रेष्ठ!' या हिटलरच्या तत्त्वानुसार वातावरणनिर्मितीसाठी सारं

चित्रीकरण पुरातन स्थापत्यावर केलेलं दिसतं. शिपायांना मिळणारं ट्रेनिंग, संचलन, पताका, स्वस्तिक अंकित ध्वज, गरुडांच्या भराऱ्या, लोकगीते, टाळ्यांचा कडकडाट स्वीकारीत खुल्या मोटारीतून जाणाऱ्या हिटलरचे दर्शन, कवायतीतून निर्माण करण्यात आलेली दहशत, शिस्त यांचं चित्रण या चित्रपटात आहे. लहान मुलं-स्त्रिया-पुरुष हे सारे हिटलरच्या प्रभावाखाली कसे होते याचं प्रभावी चित्रण यात येतं. या चित्रपटावर हिटलर अतिशय खूष झाला होता. युद्धजन्य वातावरण तयार केलं की काय होतं याचं एक दर्शन या चित्रपटात होतं.

दुसरी फिल्म होती 'नाईट अँड फॉग'. ही फिल्म ॲलन रेसनाईस या फ्रेंच दिग्दर्शकाने १९५५ साली तयार केली. चित्रपटातील निवेदन हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आणि हृद्य आहे. ते जीन कॅरोल या कवीने केले आहे. ही फिल्म युद्ध संपल्यानंतर दहा वर्षांनी तयार झाली. हिटलर सत्तेवर आल्यानंतर जर्मनीत करण्यात आलेले क्रूर अत्याचार जगाच्या समोर प्रत्यक्षात आणावेत, लोकांनी ते विसरू नयेत या हेतूने ती तयार केली गेली.

जर्मनीत-छळछावणी-कॉन्सन्ट्रेशन कॅम्प-जी आजही म्युझियमसारखी शिल्लक ठेवण्यात आली आहे - ही या फिल्मची पार्श्वभूमी. ''इथे सध्या तुम्हाला उगवलेलं पण कुणालाही उपयोगी न पडणारं गवत व उजाड प्रदेश दिसेल. पण या बराकीत इतिहास घडलेला आहे... नव्वद लाख लोक या बराकीत मारले गेले...'' निवेदक सांगत असतो. त्या काळातल्या डॉक्युमेंटरीज आणि त्यावर चित्रपटाचे कथानक असे अनुक्रमे ब्लॅक अँड व्हाईट व फिक्या रंगांतील काँट्रास्ट साधणारे अतिशय प्रभावी चित्रण यात केले आहे. अनन्वित अत्याचार, मृतदेहांबद्दलही काहीही पावित्र्य न वाटणारे नाझी ऑफिसर्स, विवस्त्र करणे, छळ, संस्कृतीहीन वर्तनाचे मन विषण्ण करणारे विदारक चित्रण यात येते. मृतदेहांचे अवयव वाया जाता कामा नयेत. केस-सोफासेटची बैठक बनविण्याकरता तर काही अवयव साबण बनविण्याकरीता वापरले जातात. नुसतं सांगितलं तर 'खरंच का हे या जगात घडलं आहे' असं वाटेल. ज्यावेळी दोस्त राष्ट्रे जर्मनीचा पराभव करून जर्मनीत शिरली तेव्हा बरॅक्समध्ये कोंबून ठेवलेले मृतदेह तेथे पडलेले होते. भयंकर दुर्गंधी होती. शेवटी त्या सर्वांचे सामुदायिक दफन करण्यात आलं. अक्षरश: स्टीम रोलर्सने गोळा करून आणि त्यांचं स्मारक बांधण्यात आलं - परंतु एक शंका निवेदक सतत व्यक्त करतो जी प्रेक्षकालाही भिडते ''हे सारे मी तुम्हाला दाखवतो आहे. पण ही अशी शेवटची घटना असेल का याबद्दल मी साशंक आहे.''

हा चित्रपट जगभर खूप गाजला. 'युद्ध ही सहजतेने घेण्याची गोष्ट नाही.' 'युद्ध नको' ही भावना हा चित्रपट पाहिल्यावर तीव्रतेने होते. परंतु आजूबाजूला आजही हिटलरसारख्या प्रवृत्ती दिसत असताना, आक्रमक होत असताना आपल्याही मनात शंका येत राहते, की हे खरंच शेवटचं ठरेल?

'द बॉय हू वाँटेड टु नो व्हॉट फिअर वॉज' हा तिसरा चित्रपट. १९३६ साली सात ते नऊ वर्षे वयोगटातल्या लहान मुलांसाठी जर्मनीत तयार केलेला. भुतंखेतं-राजकन्या अशा मुलांना मजा वाटेल अशा बाबतीत व अशा तऱ्हेने. एका गुहेत प्रवेश करून दैत्य-पिशाच्चांशी लढत असताना मुलाच्या मनातली भीती जाते. शत्रूंची डोकी उडवायची, पोटात भाला खुपसायचा... या तऱ्हेची दृष्यं दाखवून लहान मुलांना 'तयार' करायचं हे या चित्रपटाचं उद्दिष्ट होतं. चित्रपटातली गुन्हेगारी पाहून परिणाम होतात का, हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. सतत अशा तऱ्हेचे चित्रपट पाहून गुन्हेगारीबद्दल काही वाटेनासं होणं, बधिरता येणं हे घडतं. दुसऱ्याचे हाल-हाल करीत असताना एक प्रकारचा आनंद वाटणं किंवा निदान काही न वाटणं यासाठी जर्मनीत शिक्षण दिलं जात असे. भावनांची पूर्ण बधिरता हा जर्मनीत शिक्षणाचा भाग बनला होता. हिमलर या हिटलरच्या सहकाऱ्याची ही कामगिरी. 'हिमलर स्कूल' या नावाने ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली होती. या 'स्कूल'मध्ये पशू-प्राण्यांना क्रूरपणे मारले जाई. त्यांचे हाल-हाल होत असताना त्यांच्या यातना बघून काही न वाटणं हेच अनेक सैनिकांना दिलेलं शिक्षण होतं.

शिक्षणाचं विकृतीकरण कसं होतं हे दाखवण्यासाठी युनेस्कोने ही व अशा फिल्मस् पुढे ताब्यात घेतल्या.

शेवटचा 'द वॉर गेम' हा सर्वात भयानक चित्रपट. १९६५ साली तयार झालेला. त्या सुमाराला अमेरिकेचे जे इंग्लंडमध्ये तळ होते त्यावरून व इंग्लंडच्या तळांवरून 'सज्जते'चा इशारा देण्यासाठी व सोव्हिएत युनियनचा धोका जगाला आहे हे सांगण्यासाठी इंग्लंड व अमेरिकेची विमानं अण्वस्त्रे घेऊन घिरट्या घालीत असत. 'अण्वस्त्रांच्या कवायती' असे त्यांना म्हणता येईल.

पीटर वॉटकिन्स या प्रतिभाशाली दिग्दर्शकाला बीबीसीने चांगली डॉक्युमेंटरी करायला निमंत्रित केले. विषय व मांडणीचे पूर्ण स्वातंत्र्य देऊन. लोक सहजतेने अणुबॉम्बबद्दल बोलतात. खरोखरी त्याचे कायम परिणाम आहेत ते लोकांना कळावेत या हेतूने वॉटकिन्सने ही फिल्म तयार केली. युद्धाला किती क्षुल्लक निमित्त पुरतं आणि दोन बलाढ्य राष्ट्रं दोन बाजू घेऊन उभी राहिली की काय होतं याचं प्रत्ययकारी चित्रण या चित्रपटात केलेलं आहे.

रशियन बॉम्ब आपल्यावर येऊन पडणार असं इंग्लंडमध्ये वातावरण - बॉम्ब कुठं पडणार? तळावर. मग त्याच्या भोवतालच्या व धोक्याच्या टप्प्यात येणाऱ्या माणसांचं स्थलांतर सुरू होतं. आणीबाणीचा हुकूम निघतो. त्यातही 'ब्लॅक' च्या शेजारी रहावं लागणार या कल्पनेने अस्वस्थ झालेल्या गोऱ्या माणसाची मानसिकताही ओघात येते व संकटप्रसंगीसुद्धा हा भेद कसा कायम राहतो यावर भाष्य करून जाते.

अखेर बॉम्ब पडतो. तो पडल्यानंतरची दृष्यं थरकाप उडवणारी आहेत. प्रचंड उष्णता-आगी-होरपळणारे-विद्रुप झालेले लोक. युद्ध युद्धतळापुरतं मर्यादित राहत

नाही. सामान्य लोकही त्यात ओढले जातात. तडफडणारे मरणारे लोक-बालकं-गरोदर स्त्रिया...!

मग प्रत्युत्तर म्हणून इंग्लंडने टाकलेला बॉम्ब. त्याने पुन्हा भयानक संहार. अन्नाचा तुटवडा - त्यातून अन्नासाठी दंगल. सैनिकांसाठी शिल्लक ठेवून उरलेलं अन्न लोकांना वाटलं जातं हे कळल्यावर रक्षणकर्त्या पोलिसालाच एकजण अन्नासाठी बंदुकीने मारतो -अशा अनेक मानवी प्रवृत्ती! आणि अखेरीस बेचिराख होणं हा अणुस्पर्धेचा परिणाम!

बीबीसीने ही फिल्म पाहिल्यावर बॉम्बचे रौद्र भयानक परिणाम पाहून ती प्रसृत करायला नकार दिला. अभिव्यक्ती स्वातंत्र्य व विशेषत: ज्या घटनेचे देशावर इतके परिणाम होणार आहेत हे दाखवायला बंदी का, या मुद्द्यांवर त्यातून मोठा वाद उसळला. शेवटी इंग्लंडमधील ब्रिटिश फिल्म इन्स्टिट्यूटने ही फिल्म दाखवण्यात पुढाकार घेतला व २२ थिएटर्समध्ये ती दाखवली गेली. ती बघताना लोक बेशुद्धही पडत व त्यामुळे दर चित्रपटगृहात प्रथमोपचाराची व्यवस्था सक्तीची करावी लागत असे.

अण्वस्त्रनिर्मितीचे एवढे भयानक परिणाम असताना त्यात सहभागी होऊ नये याचे शहाणपण राज्यकर्त्यांना यावे यासाठीच कलावंतांचा हा इशारा आहे.

हजारो भारतीयांना पाहावे असे हे एकामागून एक हादरा देणारे अनुबोधपट पाहिल्यानंतर मन केवळ सुन्न झाले नाही, चित्रपटगृहाबाहेर पडल्यानंतर अनेक विचार मनात गर्दी करू लागले त्यातील काही विचारांची ही नोंद -

● कलिंग युद्ध जिंकल्यानंतर सम्राट अशोकाचे मन त्यातील संहाराने व्याकुळ झाले आणि शांतता जतन करण्याचे ब्रीद त्याने स्वीकारले. अशोकचक्र ज्यांच्या राष्ट्रध्वजावर विराजमान झाले आहे, त्या भारतीयांनी अण्वस्त्रधारी नसलेल्या बहुसंख्य राष्ट्रांच्या सहकार्याने जगातील अण्वस्त्रे नष्ट करण्यासाठी एक प्रचंड आंतरराष्ट्रीय मोहीम का उभारू नये? जग जोपर्यंत नि:शस्त्र बनत नाही तोपर्यंत शस्त्रसंन्यास न घेता सामर्थ्यशाली बनणे कदाचित अपरिहार्य असेल. परंतु ही अपरिहार्यता गौरवास्पद न मानता खेदजनक आपत्ती आहे असे मानले तरच किमान अण्वस्त्रे नष्ट करण्याची मोहीम उभारण्याची प्रेरणा निर्माण होऊ शकेल.

● हे चित्रपट इतके प्रभावी का झाले आहेत याची चर्चा चित्रपट निर्मितीचा ध्यास करणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी आपल्या अभ्यासक्रमात करतील. कॅमेऱ्याची किमया, ध्वनियोजना, संकलन, अभिनय अशा विविध पैलूंचे प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विवेचन होईल. परंतु कलावंतांच्या सामाजिक जबाबदारीवर चर्चा करण्याकरीता पुरेसा वेळ दिला जाईल काय? आक्रमकता, वंशसंहार, हुकूमशाही, साम्राज्यविस्तार या धोरणांचा आणि मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या हिटलरची सरशी दाखविणारा चित्रपट लेनी राफेनस्टाल या दिग्दर्शिकेने निर्माण केला. तो तांत्रिकदृष्ट्या निर्दोष होता. याच्या उलट मानव अद्याप किती असंस्कृत आहे, त्याला अद्याप केवढा मोठा पल्ला गाठावयाचा आहे याची जाणीव निर्माण करणारे चित्रपट ॲलेन रेसनाईस आणि पीटर वॅटकिन्स

या अनुक्रमे फ्रेंच व ब्रिटिश दिग्दर्शकांनी निर्माण केले. तेही तांत्रिकदृष्ट्या अव्वल दर्जाचे आहेत. परंतु यातील श्रेष्ठ कलावंत कोण ठरतो? चित्रपट निर्मितीचा अभ्यास करणाऱ्यांनी आदर्श कोणाचा ठेवावा?

● 'द वॉर गेम' हा चित्रपट पाहून इंग्लंडमधील लोक बेचैन झाले. परंतु आपल्या देशातील सत्ताधाऱ्यांना अण्वस्त्रनिर्मितीपासून परावृत्त करण्यात त्यांना अद्याप यश आलेले नाही. कलावंताने आपली जबाबदारी पार पाडली होती. परंतु मानवी संबंध उच्चतर पातळीवर नेणारे आमूलाग्र समाज परिवर्तनाचे व्यापक आंदोलन जगभर प्रभावी झाल्याखेरीज युद्धखोरांचे हात रोखता येतील काय?

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, जुलै १९९८)

❑

अमेरिकेची बेमुर्वत दांडगाई : कोसोवोची दुर्दशा

४ एप्रिल १९९९ हा ख्रिश्चन धर्मीयांचा एक महत्त्वपूर्ण सण. त्याचे नाव आहे ईस्टर. येशू ख्रिस्ताला फाशी दिल्यानंतर त्याचे पुनरुत्थान झाले असे मानण्याची परंपरा आहे, तो हा सणासुदीचा दिवस. भ्रातृभाव, शांतता, सहिष्णुता, प्रेम या गुणांची जोपासना करण्याचा हा दिवस. परंतु उत्तर अटलांटिक करार संघटनेत (नाटो संघटनेत) सामील झालेल्या युरोपियन राष्ट्रांनी अमेरिकेच्या दडपणाने २४ मार्च १९९९ रोजी युगोस्लाविया या देशावर चालू केलेला तुफानी बॉम्बहल्ला, येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीला तिलांजली देऊन तसाच चालू ठेवला, या घटनेला आता तीन आठवड्यांपेक्षा अधिक काळ लोटला आहे.

नाटो ही संघटना अस्तित्वात आली त्याला या वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. सोवियत युनियनच्या नेतृत्वाखालील समाजसत्तावादी राजवटींच्या संभाव्य हल्ल्यांपासून संरक्षण करण्याकरीता ही संघटना मुळात अस्तित्वात आली. या राजवटी आता कोलमडून पडल्या आहेत. विदीर्ण व दुर्बल झाल्या आहेत. त्याच्या कारणांबद्दल वाद असला, तरी या राजवटी कमकुवत झाल्या आहेत हे सत्य निश्चितच अविवाद्य आहे. म्हणून नाटो संघटनेच्या सुवर्ण महोत्सवाच्या वर्षी वास्तविक पाहता या संघटनेचा सांगता समारंभ करावयास हवा. परंतु तसे करण्याचे ऐवजी, आपल्या अस्तित्वाचे समर्थन करण्यासाठी नाटोने एक नवे लक्ष्य शोधून काढले आहे. हे लक्ष्य आहे युगोस्लाविया.

पूर्वपीठिका

युगोस्लाविया या देशाची जडण-घडण आणि त्याचे १९९० नंतर झालेले विघटन याचा एक प्रदीर्घ हकिकतीचा इतिहास आहे. सध्या जे भीषण अरिष्ट तेथे निर्माण झाले आहे ते समजावून घेण्याकरीता त्या प्रदीर्घ इतिहासाची थोडक्यात मांडणी आवश्यक ठरेल. युगोस्लाविया या नावाने ओळखले जाणारे राष्ट्र पहिल्या प्रथम १९२९ साली अस्तित्वात आले. मुळात स्लोवेनिया, क्रोएशिया, सर्बीया अशा नावाने ओळखल्या

जाणाऱ्या वेगवेगळ्या राष्ट्रांचे ते एक संयुक्त राज्य बनले आणि या संयुक्त राज्याचे युगोस्लाविया असे नाव सर्वांच्या संमतीने घोषित करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धात टिटोच्या नेतृत्वाखाली युगोस्लावियाचा प्रदेश-विस्तार झाला आणि युद्धाच्या अखेरीस नवा युगोस्लाविया अस्तित्वात आला. समाजसत्तावादाची घोषणा करून, नियोजनाधिष्ठित, विकेंद्रित राज्यार्थ व्यवस्था अमलात आणण्याचा प्रयोग सुरू करण्यात आला. स्टॅलिनच्या वर्चस्वाला टिटोने मोठ्या धिटाईने विरोध केला. परंतु स्वत:च्या देशात स्वत:च्या हातात सर्व सत्ता केंद्रित करण्याची तजवीजही त्याने राज्यघटनेच्या माध्यमांतूनच करण्याची अजब लोकशाही प्रस्थापित केली! त्याचा परिणाम असा झाला की एकीकडे आर्थिक प्रगती झाली, परंतु लोकशाहीची संस्कृती तेथे रुजली नाही आणि समतेचा व्यापक आशय लक्षात घेण्याकडे दुर्लक्ष झाले. योजनाधिष्ठित विकासातून प्रादेशिक असमतोल दूर करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात मात्र स्लोवेनिया व क्रोएशिया सारख्या उत्तरेकडील राज्यघटकांची भरभराट होत गेली तर मॅसिडोनिया व कोसोवासारखे दक्षिणेकडचे राज्यघटक तुलनेने अविकसित राहिले. वास्तविक पाहता, दुसऱ्या महायुद्धापूर्वीचा कोसोवो आणि नियोजनबद्ध आर्थिक व्यवस्थेतून निर्माण झालेला कोसोवो (प्रांत) यात पुष्कळ फरक पडला होता. शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले. औद्योगीकरण पुढे सरकत होते. परंतु, १९७९ साली संपूर्ण युगोस्लावियाचे दरडोई वार्षिक उत्पन्न २,६३५ डॉलर होते; कोसोवोचे मात्र दरडोई उत्पन्न फक्त ७९५ डॉलर होते आणि राष्ट्रीय सरासरीच्या एक तृतीयांशापेक्षाही कमी होते. इतर राज्यघटकांशी तुलना करिता कोसोवोतील बेकारीचे विशेषत: सुशिक्षित बेकारांचे प्रमाणही जास्त होते. या सर्व परिस्थितीमुळे कोसोवोत असंतोष धुमसत होता, तो वाढू लागला. १९८० साली झालेल्या टिटोच्या मृत्युनंतर युद्धकाळातील पराक्रमी, लोकप्रिय नेता आणि कर्तृत्ववान परंतु एकाधिकारशाही गाजविणारा प्रशासकही गेला.

१९८८ साली अखेर वैतागून कोसोवोवासीयांनी रस्त्यावर येऊन उग्र निदर्शने केली. सार्वत्रिक संप पुकारला. विद्यार्थी आणि श्रमिक खांद्याला खांदा लावून लढले. या असंतोषाची कारणे समजावून घेण्याचे ऐवजी मध्यवर्ती सरकारने निर्घृण दडपशाही करून हे आंदोलन दडपण्याची पावले उचलली. कोसोवोतील दडपशाही पाहून आपल्यावरही असाच प्रसंग येईल हे लक्षात घेऊन स्लोवेनिया आणि क्रोएशिया यांनी स्वयंनिर्णयाचा हक्क जाहीर केला. युगोस्लावियात यादवी युद्ध सुरू झाले आणि अखेर त्याचे विघटन झाले. हे विघटन घडवून आणण्यात जर्मनीने अनेक कारवाया केल्या हेही नजरेआड करून चालणार नाही.

युगोस्लावियातील राज्यघटकांपैकी सर्बीया या घटकाचा कोसोवो हा सुमारे २० लाख लोकसंख्या असलेला एक अतिशय लहान उपप्रदेश (मराठवाडा हा जसा महाराष्ट्राचा उपप्रदेश आहे तसा) आहे. कोसोवोतील लोकसंख्येपैकी सुमारे ९०% लोक हे इस्लाम धर्म मानणारे आहेत. संपूर्ण सर्बीयांतील सर्ब्स व खुद्द कोसोवोमधील

सर्ब्स हे ख्रिश्चनधर्मीय आहेत. सर्बीयाचा अध्यक्ष (हुकुमशाही पद्धतीने राज्य करणारा) स्लोवोहान मिलेसोविच याने आणि कोसोवोतील नेत्यांनी या संघर्षाला धार्मिक वळण दिले. त्यामुळे इतिहासाचा दुरुपयोग करण्यास दोन्ही बाजूंनी सुरुवात झाली. २८ जून १३८९ रोजी झालेल्या लढाईत तुर्की साम्राज्याच्या अखत्यारीत असणाऱ्या तत्कालीन कोसोवोने ख्रिश्चन झालेल्या सर्ब्सचा पराभव केला होता त्याची आठवण कोसोवोतील नेते आणि त्यांचे धर्मांध बनलेले अनुयायी देऊ लागले. उलटपक्षी कोसोवो हे नावच त्या प्रदेशाचे नाही, त्याचे नाव कोसोवो मेथोहिजा असे आहे असे सर्ब्स दरडावून सांगत असतात. मेथोहिजा या ग्रीक शब्दाचा अर्थ चर्चची इस्टेट (मालमत्ता) असा आहे. म्हणजे कोसोवो हा ख्रिश्चनांचा प्रदेश आहे म्हणून अल्बेनिया या देशातून स्थलांतर करून आलेल्या कोसोवोतील नागरिकांनी तो प्रदेश सोडावा याकरिता सर्बीयातील राज्यकर्ते अमानुषपणे दडपशाही करीत आहेत.

सर्बीया करीत असलेली ही दडपशाही समर्थनीय निश्चितच नाही. कोसोवोतील नागरिकांच्या सशस्त्र सेना आता दहशतवादी कृत्ये करीत आहेत तर सर्बीयाचे सैन्य व पोलीस दल अनेक गावांना आगी लावत आहे, लुटालूट करीत आहे, बलात्कार, खून वाढत आहेत. थोडक्यात म्हणजे कोसोवोवासीयांचे जीवन असह्य करून टाकणाऱ्या अनेक घटना या लहानशा प्रदेशात घडत आहेत. नागरिकांच्या झुंडीच्या झुंडी ग्रीस, अल्बेनिया, मॅसिडोनिया या देशांत किंवा युगोस्लावियाचा घटक असलेल्या माँटेनिग्रोमध्ये निर्वासित म्हणून आश्रय घेत आहेत. आपल्या देशाची फाळणी होत असताना जी हृदयद्रावक परिस्थिती निर्माण झाली होती, जवळजवळ तशीच परिस्थिती आज कोसोवोमध्ये निर्माण झाली आहे. कोसोवोवासीयांना आता केवळ स्वायत्तता नको आहे, त्यांना युगोस्लावियातून म्हणजेच सर्बीयापासून फुटून निघून संपूर्ण स्वातंत्र्य हवे आहे. ही मागणी मान्य न करता किंवा रास्त तोडगा शोधून काढण्याचा प्रयत्नही न करीता कोसोवोला जी स्वायत्तता देण्यात आली होती ती नष्ट करण्यात आली आणि आता तर मिलेसोविच वंशसंहार करण्याचा मार्ग अवलंबित आहे.

आज जगातील अनेक भाषिक-सांस्कृतिक-आर्थिक घटकांना आपल्या अस्मितेची अभिव्यक्ती स्वतंत्र शासनसंस्था (राष्ट्र) प्रस्थापित करूनच परिपूर्ण होईल, स्वायत्तता ही केवळ कागदावर राहते असे वाटू लागले आहे. पूर्वीच्या सोविएत युनियनमधील च्येचेन किंवा अर्मेनिया, इराक किंवा तुर्कस्तानमधील कुर्द लोकसमूह, श्रीलंकेतील तामीळ, पाकिस्तानातील पख्तून, रवांडामधील तुत्सी लोकसमूह स्वतंत्र राष्ट्र बनण्याची आकांक्षा बाळगीत आहेत. कोसोवोची आकांक्षा ही या मालिकेतीलच एक आकांक्षा आहे.

अमेरिकेची दांडगाई

रवांडामध्ये दहा लाख तुत्सी लोकांचे हत्याकांड करण्यात आले. परंतु, 'मानवतावादी' दृष्टीचा जयघोष करून, 'दुर्बल जनांच्या हक्क रक्षणाकरिता' अमेरिका नाटोचा झेंडा फडकवीत मध्ये पडली नाही. कुर्द लोकांवर अमानुष दडपशाही अद्याप चालू आहे, परंतु नाटो राष्ट्रांच्या डोळ्यात अश्रू येताना दिसत नाहीत. परंतु कोसोवोवासीयांचे रक्षण युगोस्लावियावर (सर्बीयावर) बॉम्बफेक करून केलेच पाहिजे! ते सुद्धा संयुक्त राष्ट्रसंघाचा पाठिंबा घेऊन नव्हे, तर नाटोला आक्रमक बनवून!

मानवतावादी दृष्टी धारण करून, मध्यस्थी करून जर कोसोवोवासीयांची दुर्दशा थोपवावयाची असेल तर तातडीने काय करता येणे शक्य आहे?

● सर्बीया आणि कोसोवो या दोघांनाही मान्य होतील अशा तटस्थ राष्ट्रांचे सैन्य संयुक्त राष्ट्र संघाच्या खर्चाने सुमारे तीन वर्षे कोसोवोमध्ये तेथील नागरिकांच्या संरक्षणाकरिता उभारता येईल.

● कोसोवोला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा देण्यास जर सर्बीया तयार नसेल तर हद्दपार केलेल्या व नाईलाजाने स्थलांतर केलेल्या कोसोवोवासीयांना सन्मानाने परत बोलावून त्यांना सुरक्षित जीवन जगता येईल अशी निःसंदिग्ध हमी सर्बीयाने देणे व कोसोवोतील दहशतवादी संघटना, सैन्यदले इ. विसर्जित करण्याची शाश्वती कोसोवोने देणे अत्यावश्यक आहे.

● निर्वासितांना मदत करण्याकरिता, त्यांचे सुयोग्य पुनर्वसन करण्याकरिता आणि त्यांच्या नेत्यांशी सल्लामसलत करून कोसोवोची सामाजिक-आर्थिक घडी पुन्हा बसविण्याकरिता आंतरराष्ट्रीय निधी उभारणे.

अशा स्वरूपाच्या कोणत्याही उपायांचा विचार न करता नाटोचे सुमारे २८,००० संख्या भरेल इतके सैन्य कोसोवोत ठेवले जाईल आणि त्याला सर्बीयाने मान्यता द्यावी अशी अट उद्दामपणे अमेरिकेच्या दडपणाखालील नाटो राष्ट्रांनी घातली. ती अट मिलोसेविचने धुडकावून लावली म्हणून नाटोने बॉम्बहल्ला सुरू केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या सर्बीयाने कोसोवोतील लोकांवर पूर्वीपेक्षा अधिक जुलूम करण्यास सुरूवात केली आहे. अमेरिकेच्या 'मानवतावादा'चे हे फलित आहे. अमेरिका व युरोपियन राष्ट्रांचा यातून फायदा कोणता होतो आहे?

● मंदीच्या सध्याच्या कालखंडात, इतर उद्योग तेजीत नसल्यामुळे, शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांची भरभराट करून युद्ध पेटवून, देशांतील ढासळणारी आर्थिक घडी सावरण्याचा प्रयत्न करणे.

● इतरांची हत्या करून नव्या, अधिक आधुनिक शस्त्रास्त्रांची चाचणी घेणे.

● संयुक्त राष्ट्रसंघाला निष्प्रभ बनविणे.

● युरोपमधील राष्ट्रे अमेरिकेच्या वर्चस्वाविरुद्ध आवाज उठवू लागली होती. आपापसातील वितुष्टालाही अधूनमधून वाचा फुटू लागली होती. या राष्ट्रांना युद्धात

गुंतवून ठेवणे.

● कोसोवोसारख्या लहान लोकसमूहांना, राष्ट्रांना, प्रदेशांना, त्यांच्या हक्कांना संरक्षण देण्याच्या नावाखाली त्यांना परावलंबी किंवा अंकित करणे.

युगोस्लावियातील यादवी युद्धात अमेरिकेने नाक खुपसण्याचे कारण नाही अशी मागणी सर्व विकसनशील राष्ट्रांनी करणे हे अत्यावश्यक आहे.

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, मे १९९९)

❑

मे दिन : कारुण्यपूर्ण स्फूर्तिदायक घटना

● जगातील एकूण कुपोषणग्रस्त बालकांपैकी चाळीस टक्के बालके भारतात राहतात.

● भारतात दर ५४ मिनिटांना एका स्त्रीवर बलात्कार होत असतो, तर दर १ तास ४२ मिनिटांना एक हुंडाबळीची घटना घडत असते.

● ग्रेहॅम स्टेन्स या ऑस्ट्रेलियन ख्रिश्चन धर्मोपदेशकाच्या खुनास जबाबदार असल्याचा आरोप असलेला आरोपी दारासिंग हा आपल्या साथीदारांसह ऑगस्ट १९९९ मध्ये ओरिसा राज्यातील मयूरभंज जिल्ह्यांत गेला. कापडाचे दुकान चालविणाऱ्या शेख रहमान नावाच्या मुसलमान व्यापाऱ्याचे सुमारे ४०० लोकांसमोर या टोळक्याने हात छाटून, शरीर पेटवून दिले.

● उत्तर प्रदेश या राज्यात गेल्या वर्षी ३५२ दलितांचे खून करण्यात आले, २९२ दलित स्त्रियांवर बलात्कार करण्यात आले आणि ६८८ दलित हिंसात्मक हल्ल्यात जबर जखमी झाले.

● १९९७ साली (म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्यापासून ५० वर्षांनी) न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी आरोपी म्हणून तुरूंगात बंदिस्त असणाऱ्यांपैकी १००० पेक्षा अधिक आरोपी पोलिसांच्या दंडेलीमुळे मृत्युमुखी पडले.

● सप्टेंबर-ऑक्टोबर १९९९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत, निवडणुकीच्या अनुषंगाने झालेल्या हिंसाचारात १०० पेक्षा अधिक लोक मरण पावले.

● दारिद्र्यरेषेखाली असलेल्या लोकांची संख्या, महाराष्ट्रात ३७.९३ टक्के आहे, तर बिहारमध्ये ५६ टक्के आहे.

वरील अधिकृत अथवा विश्वसनीय आकडेवारीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या, प्रकल्पग्रस्तांची हलाखी व त्यांच्या आंदोलनांवर होणारे लाठी हल्ले, एकतर्फी प्रेमसंबंधांतून होणारे युवतींचे खून, शालेय अथवा महाविद्यालयीन परीक्षांमधील अपयशातून होणाऱ्या आत्महत्या, कामगारांच्या संप-लढ्यांतून होणारी अनेकांची वाताहत, अशा कितीतरी घटनांची भर घातली तरी, या वर्षीच्या मे दिनाची पार्श्वभूमी पुरेशा प्रमाणात प्रकट होण्याची शक्यता नाही.

भारतातील पहिला मे दिन

भारतात कामगार दिन म्हणजेच मे दिन जो पहिल्या प्रथम साजरा करण्यात आला, तो १९२७ साली. म्हणजे ज्या ऐतिहासिक घटनेतून मे दिन पाळण्याची प्रथा जगभर पडली, त्यानंतर ४१ वर्षांनी. १८८६ साली झालेल्या या घटनेला आज ११४ वर्षे पूर्ण होत आहेत. सध्या भारतभर हा दिन साजरा होत असतो. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या लढ्यात डाव्या पक्षांनी फार मोठी कामगिरी पार पाडली होती म्हणून या पक्षांच्या आग्रहाला मान देण्याकरिता मे दिन हा संयुक्त महाराष्ट्राचा स्थापना दिन म्हणून घोषित करण्याचा आणि त्या दिवशी सुटी देण्याचा स्वागतार्ह निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला. परंतु ज्या एका स्फूर्तिदायक लढ्यातून हा दिन साजरा करण्याची प्रेरणा जगाला मिळाली, त्या लढ्याचा इतिहास अनेकांच्या स्मरणांतून गेलेला असतो हे खेदाने नमूद करावे लागते. त्या लढ्याचे स्मरण करून, नि:स्वार्थ बुद्धीने व नेटाने संघर्ष करण्याची व समताधिष्ठित नवसमाज निर्माण करण्याची तयारी केल्याखेरीज आरंभी नोंदविलेल्या भारतातील दारूण परिस्थितीवर मात करता येईल अशी शक्यता दिसत नाही.

लढ्याचे मुख्य उद्दिष्ट : आठ तासांचा दिवस

औद्योगिक क्रांती (१७६०) झाल्यानंतर ४० वर्षांनी सुद्धा युरोप व अमेरिकेतील औद्योगिक कामगारांची स्थिती अतिशय शोचनीय होती. कित्येक कारखान्यांमध्ये कामाचे तास 'सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत' ठरविण्यात आलेले असत, तर त्याहून अधिक कारखान्यात कामगारांना १६ ते १८ तास राबविण्यात येत असे. साधारणत: १८२० सालापासून कामगारांनी याविरुद्ध आवाज उठविण्यास सुरुवात केली. कामाचा दिवस १० तासांचा असावा अशी मागणी पुढे येऊ लागली, त्याकरीता ठिकठिकाणी संपही झाले. परंतु, कामगार अद्याप सुसंघटित झालेले नव्हते.

कामगारांची जगातील पहिली ट्रेड युनियन अमेरिकेतील फिलाडेल्फियामध्ये 'मेकॅनिक्स युनियन ऑफ फिलाडेल्फिया' या नावाने स्थापन झाली. १८२७ साली एक संपलढा उभारून १० तासांच्या दिवसांची पहिली संघटित मागणी या कामगार संघटनेने केली. तेव्हापासून पुढील १० वर्षे या मागणीचा आग्रह धरण्यासाठी अनेक आंदोलने झाली. त्याचा परिणाम म्हणून १८३७ साली अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांनी एका हुकमाद्वारे सर्व सरकारी कर्मचाऱ्यांसाठी कामाचा दिवस हा दहा तासांचा असेल असे ठरवून दिले. पुढील वीस वर्षांत म्हणजे १८५७ पर्यंत अनेक मोठ्या कारखानदारांनी व अन्य उद्योजकांनी १० तासांच्या दिवसाला मान्यता दिली.

मिळविण्यात आलेल्या या यशामुळे कामगारांना हुरूप आला आणि त्यांनी आता आठ तासांच्या दिवसांची मागणी करण्यास प्रारंभ केला. ही मागणी आता अमेरिकेपुरती मर्यादित राहिली नाही. ती युरोपभर पसरू लागली. १८५६ साली आस्ट्रेलियातील

बांधकाम कामगारांनी ''आठ तास काम, आठ तास करमणूक आणि आठ तास विश्रांती'' अशी घोषणा देऊन आंदोलन उभारले. त्यांची मागणी अखेर मंजूर करण्यात आली.

नॅशनल लेबर युनियनची स्थापना

आठ तासांच्या मागणीला अमेरिकेत जो वेग आला आणि आंदोलनांना तीव्रता येऊ लागली ती १८८४ सालापासून. १८६१-६२च्या दरम्यान अमेरिकेत गुलामगिरी नष्ट करण्यासाठी यादवी युद्ध झाले. त्याच्या जरा आधी आणि नंतरच्या सार्वत्रिक गोंधळाच्या काळात ज्या अनेक ट्रेड युनियन्स स्थापन झालेल्या होत्या, त्या विघटित आणि निष्प्रभ झाल्या. स्थानिक पातळीवर असलेल्या लहान ट्रेड युनियन्सना अखिल देशपातळीवर युनियन्स असाव्यात अशी गरज भासू लागली. २० ऑगस्ट १८६६ रोजी ६० ट्रेड युनियन्सच्या प्रतिनिधींनी बाल्टीमोर शहरात एक परिषद भरविली. मुळात साचे बनविण्याच्या कारखान्यातील कामगारांचा (मोल्डर्स युनियन) धडाडीचे व्यक्तिमत्त्व असलेला नेता हा या परिषदेचा नेता बनला. त्याचे नाव होते विल्यम सिल्व्हिस. व्यापक दृष्टी असलेल्या या नेत्याचा लंडनला स्थापन करण्यात आलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय (मजूर) परिषदेच्या म्हणजेच फर्स्ट इंटरनॅशनलच्या नेत्यांशी पत्रव्यवहार होत असे. त्याच्या मार्गदर्शनाखाली बाल्टीमोरमधील परिषदेतून नॅशनल लेबर युनियन या संघटनेची स्थापना करण्यात आली आणि या स्थापनादिनाच्या दिवशीच अमेरिकेत संपूर्ण देशात भांडवलशाहीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचा आणि आठ तासांच्या दिवसाला मान्यता मिळविण्याचे ध्येय गाठण्याचा ठराव संमत करण्यात आला. कामगारांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे प्रतिनिधी निवडून यावेत याकरिता राजकीय आंदोलन उभारण्याचा ठरावही या परिषदेत मंजूर करण्यात आला.

या ठरावानंतर देशांत सर्वत्र आठ तासांची मागणी करणाऱ्या संघटना स्थापन करण्यात आल्या (एट अवर लीगस्) त्याबरोबर या चळवळीला गती आली. इरा स्टीवर्ड या नावाचा बोस्टनमध्ये काम करणारा एक साधा मशीनिस्ट या आंदोलनात अहर्निश झटला. अनेक राज्य सरकारांनी आपापल्या कर्मचाऱ्यांसाठी आठ तासांच्या दिवसाला मंजुरी दिली आणि पुढे १८६८ साली अमेरिकन लोकप्रतिनिधीगृहाने सुद्धा आठ तासाच्या दिवसाला मान्यता दिली. परंतु त्यानंतर सुद्धा एका दिव्यातून कामगारवर्गाला जावे लागले.

वर उल्लेख केलेल्या नॅशनल लेबर युनियनने आठ तासांच्या मागणीकरिता पुढाकार घेतलेला असला तरी त्याकरिता करावयाच्या निकराच्या लढ्याची तारीख निश्चित केलेली नव्हती. म्हणून वीस वर्षेपर्यंत लढे चालू राहिले. अंतिम इशारा देण्याची वेळ आता येऊन ठेपली होती.

अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबरचा ठोस इशारा

नॅशनल लेबर युनियनच्या नंतर अमेरिका व कॅनडा येथील कामगारांची दुसरी एक संघटना स्थापन झाली. तिचे पहिले नाव जरी थोडे विस्तृत होते तरी पुढे ती 'अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर' या संक्षिप्त नावाने ओळखली जाऊ लागली. ७ ऑक्टोबर १८८४ रोजी या संघटनेचे चौथे अधिवेशन भरले. या अधिवेशनात १ मे १८८६ पासून आठ तासाच्या दिवसाला सर्वत्र मान्यता मिळविण्याचा निर्धारयुक्त ठराव संमत करण्यात आला. त्या दिवशी सार्वत्रिक संप जाहीर करण्याचा आणि आवश्यक असल्यास तो दीर्घकाळही चालविण्याचे निश्चित ठरविण्यात आले.

१८७७ साली रेल्वे व पोलाद कारखान्यातील हजारो कामगार संपांच्या तीव्र लढ्यातून, लाठीमार गोळीबार अशा अनन्वित हालअपेष्टांना तोंड देऊन तावून सुलाखून बाहेर पडले होते. 'नाईटस् ऑफ लेबर' (कामगारांचे शिलेदार) या संघटनेचा प्रभाव फोफावत होता. त्यातील काही नेते कच खात असले तरी अनुयायी तीव्र लढ्याला तयार होते. १८८६ साली ६ लाख कामगारांनी वेगवेगळ्या संपलढ्यात भाग घेतला होता.

संपलढ्याचे प्रमुख केंद्र : शिकागो

वर उल्लेख केलेल्या कामगार संघटनांचा १ मे १८८६ हा निर्धारदिन उजाडला. न्यूयॉर्क, बाल्टीमोर, वॉशिंग्टन, सिनसिनाटी, पिटस्बर्ग, डेट्रॉईट अशा वेगवेगळ्या शहरांतून कामगार संपलढ्यात सामील झाले. शिकागो शहरातील कामगारांचा जोश काही औरच होता. तेथे खूप आधीपासून तयारी करण्यात आली होती. संपाचे प्रमुख नेते अराज्यवादी विचारसरणीचे (ॲनार्किस्टस् - म्हणजे अराजकवादी नव्हे) होते. संपूर्ण स्वातंत्र्याचे ते भोक्ते होते परंतु डाव्यांसकट विविध विचारसरणींशी निगडित असणारे कामगार 'एट अवर्स असोसिएशन' (आठ तास मागणी संघटना) या झेंड्याखाली एकत्र झाले होते. संपात भाग घेणारांची संख्या सुमारे ४ लाखापर्यंत पोहोचली. त्या दिवशी गिरण्यांच्या धुराड्यांतून धूर बाहेर पडलाच नाही आणि साबाथ सणाच्या दिवशी दिसणारी गंभीरता सर्वत्र पसरली होती असे त्या दिवसाचे वर्णन शिकागोतील एका तत्कालीन वर्तमानपत्राने करून ठेवले होते. केवळ औद्योगिक कामगार नव्हे तर सुतार, सिगारेट कामगार असे हरतऱ्हेचे श्रमजीवी, उत्साहाने या मागणीसाठी पुढे सरसावले. त्या दिवशी संप शांतपणे पार पडला. त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे ३ मे रोजी सुमारे ६ हजार सुतार कामगारांची एक सभा झाली.

सेंट्रल लेबर युनियन या संघटनेचा प्रमुख नेता, ऑगस्ट स्पाईज हा भाषणासाठी उभा राहिला. 'अधिकाऱ्यांच्या दडपणाखाली खचू नका, एकजुटीने उभे राहा' असे आवाहन तो करीत होता. तो जेथे भाषण देत होता त्याच्या जवळच मॅकॉर्मिक हारवेस्टर कंपनी या नावाच्या कंपनीतील बरेच कामगार संपात सहभागी झाले. परंतु त्यात काही

संपफोडे कामगारही होते. ते संपाची कारखान्याजवळील जागा सोडून निघून जाऊ लागले. त्याबरोबर त्या कारखान्यांतील संपावर असलेले कामगार संतप्त झाले. त्यांच्या मदतीला सुतार कामगारही धावून आले आणि त्यांनी या संपफोड्यांना कारखान्याच्या आवारात आणून ढकलून दिले. संप मोडण्याकरिता संधी मिळण्याची वाट पाहत असलेले २०० पोलीस, इशारा न देता लगेच पुढे घुसले. तेथील जमावावर त्यांनी लाठीहल्ला चढवला; पिस्तुलांनी केलेल्या गोळीबारात एक कामगार मारला गेला. पाच-सहा जबर जखमी झाले आणि इतर अनेकांना इजा पोहोचली. (काही वृत्तांतानुसार गोळीबारात ६ कामगार ठार मारण्यात आले)

लढ्याचा चवथा दिवस : हे मार्केट

३ मे रोजी पोलिसांनी केलेली बेगुमान वर्तणूक पाहून ऑगस्ट स्पाईज हा नेता उद्विग्न व संतप्त झाला. जर्मनीहून स्थलांतर करून अमेरिकेत राहावयास आलेल्या जर्मन कामगारांचे 'आर्बिटर झीटुंक' या नावाचे अराज्यवाद ही विचारसरणी मानणारे एक दैनिक होते. या दैनिकाच्या कचेरीत जाऊन स्पाईजने एक आवाहन प्रसिद्ध केले. त्यात दुसऱ्या दिवशी म्हणजे ४ मे रोजी पोलिसांच्या वर्तणुकीचा निषेध करण्यासाठी रात्री आयोजित केलेल्या सभेला कामगारांनी उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली होती. ही सभा 'हे मार्केट' या नावाने प्रसिद्ध असलेल्या चौकात ठरल्याप्रमाणे भरली.

सभेत, स्पाईज व्यतिरिक्त ॲल्बर्ट पार्सन्स आणि सॅम्युअल फील्डेन या दोन प्रसिद्ध नेत्यांची भाषणे झाली. सभेला शहराचे महापौर कार्टर हॅरिसन हे उपस्थित होते. सभा शांतपणे चालू होती. फील्डेनचे भाषण संपत आले होते. रात्रीचे दहा वाजले होते. पाऊस जोरात कोसळू लागला म्हणून गर्दी ओसरली. सुमारे फक्त २०० लोक शिल्लक होते. पोलिसांचा मोठा ताफा उभा होता. महापौर पोलीस प्रमुख कॅप्टन जॉन बॉनफिल्ड यांचेकडे गेले आणि ''सर्व काही शांतपणे पार पडले आहे. तेव्हा पोलिसांच्या मध्यस्थीची गरज पडणार नाही. पोलिसांना घरी परत पाठविण्यास हरकत नाही.'' असे म्हणाले. महापौरांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून, कॅप्टन बॉनफील्ड सभेच्या जागी १८० पोलीस बरोबर घेऊन आला आणि सभा ताबडतोब विसर्जित करण्यात यावी असा हुकूम त्याने फर्मावला. भाषण संपवित असलेल्या फील्डेनने त्यास विरोध केला. ''सभा शांतपणे चालू आहे'' असे तो म्हणाला.

हा वाद चालू होता तेवढ्यात पोलीस उभे होते त्या ठिकाणी एक बॉम्ब येऊन आदळला. त्यात एक सार्जंट मारला गेला, ६ पोलीस मारले गेले आणि सहा इतर लोक जखमी झाले (काही वृत्तांतांप्रमाणे ७ पोलीस आणि ४ कामगार मारले गेले) पोलिसांनी केलेल्या गोळीबारात कितीजण मारले गेले आणि कितीजण जखमी झाले याची संख्या अद्यापपावेतो निश्चित करण्यात आलेली नाही.

या सर्व घटनेचे विपर्यस्त वृत्त सर्वत्र प्रसृत करण्यात आले. हा बॉम्ब समाजसत्तावादी आणि अराज्यवाद्यांनी टाकला असे काहूर वर्तमानपत्रे आणि उजव्या विचारसरणीच्या प्रवर्तकांनी उठविले. याचा सूड घेण्यात यावा असेही बजावण्यात आले. सभागृहे, ट्रेड युनियन्सच्या कचेऱ्या, छापखाने एवढेच नव्हे तर काहींच्या घरावरही पोलिसांच्या धाडी पडल्या. राज्याच्या सरकारी वकीलाने, 'प्रथम धाडी घाला, मग कायद्याकडे लक्ष द्या' असा हुकूम दिला, त्याबरोबर समाजसत्तावाद, अराज्यवाद या विचारसरणींशी काही संबंध नसलेले अनेक निरपराध नागरिक यांची धरपकड करण्यात आली.

खटल्याचा फार्स

या धरपकडीनंतर खुनाच्या कटात सामील असल्याचे आरोपपत्र आठजणांवर दाखल करण्यात आले. स्पाईज, फील्डेन, पार्सन्स या नेत्यांचा त्यात समावेश होता. या व्यतिरिक्त कामगार चळवळीत कार्यरत असणाऱ्या ॲडॉल्फ, फिस्चर, जॉर्ज एनगल्, मायकेल श्वाब, लुई लिंग आणि ऑस्कर नीब या लहान मोठ्या कार्यकर्त्यांनाही या खटल्यात गोवण्यात आले.

घडलेल्या घटनेनंतर सुमारे ६ आठवड्यांनी म्हणजे २१ जून १८८६ रोजी खटला सुरू करण्याची तारीख नेमून देण्यात आली. ज्युरींची नि:पक्षपातीपणे निवड करण्याची नेहमीची प्रथा अव्हेरण्यात आली. सरकारी वकील ग्रिनेल याने एक खास बेलिफ नियुक्त केला आणि त्याने ज्युरींची निवड करावी असे फर्माविले. या खास बेलिफने असे जाहीर विधान केले होते की, ''मी हे प्रकरण (खटला) सांभाळतो आहे आणि काय करावयाचे असते याची मला पुरेपूर माहिती आहे. मृत्युची शाश्वती जशी निश्चितपणे देता येते तितक्याच खात्रीने मला हे माहीत आहे की या लोकांना फाशीची शिक्षा होणार आहे'' हे विधान पुरावा म्हणून सादर करण्यास आरोपींना परवानगी नाकारण्यात आली.

उद्योगपती, त्यांचे कारकून आणि मृत्यू पावलेल्या एका पोलिसाचा नातेवाईक असे 'नि:पक्षपाती' ज्यूरी निकाल देण्यासाठी निवडण्यात आले होते! आठही आरोपींपैकी कोणीही बॉम्ब टाकल्याचा, बॉम्ब टाकण्याशी संबंध असल्याचा किंवा अशी कृत्ये करणे त्यांना मंजूर असल्याचा कोणताही पुरावा सादर करण्यात आला नाही. वास्तविक आठ आरोपींपैकी तीन आरोपी तर त्या दिवशी रात्री हे मार्केट चौकात हजरही नव्हते. हिंसेला उत्तेजन देणारी भाषणे झाली असाही पुरावा नव्हता. महापौरांनी आपल्या साक्षीत भाषणे 'सौम्य' झाली अशीच ग्वाही दिली होती. हिंसेला लोकांना प्रवृत्त करावयाचे असते तर पार्सन्सने आपल्या दोन मुलांना सभेला आणले असते का या पुराव्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले.

आरोपी अराज्यवादी आहेत आणि कामगार संघटनांत कार्य करतात हा खटला भरण्यामागील एक हेतू आरंभीच स्पष्ट करण्यात आला होता. सरकारी वकील समारोप

करताना म्हणाले, ''ही परीक्षा कायद्याची आहे. अराजकवादावर हा खटला आहे. हे आरोपी हे नेते आहेत म्हणूनच ज्युरींनी निषेध करून, त्यांना गुन्हेगार ठरविले आहे. यांचे हजारो अनुयायी हेही त्यांच्याइतकेच गुन्हेगार आहेत. ज्युरींच्या सन्माननीय सभासदांनो, आपल्या संस्था आणि समाज वाचविण्याकरिता यांना गुन्हेगार ठरवून, धडा शिकवा आणि त्यांना फाशी द्या.!''

दोन महिन्यांत जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार १९ ऑगस्ट १८८६ रोजी ७ जणांना फाशी आणि निबीला १५ वर्षे तुरूंगवास अशी शिक्षा सुनावण्यात आली. या निकालाविरुद्ध जगभर प्रतिक्रिया उमटल्या. सर्वांना सोडून देण्याच्या मागणीने जोर धरला. शेवटी अमेरिकन राज्य सरकार काहीसे नमले. तडजोड म्हणून श्वाब आणि फील्डेन यांची फाशीची शिक्षा रद्द करून, त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. लिंगने फाशीच्या आदल्या दिवशी, त्याला फाशी देणाऱ्याला चकवून आत्महत्या केली. ११ नोव्हेंबर १८८७ रोजी पार्सन्स, एनगल, स्पाईज, आत्रण फिस्चर यांना फासावर चढविण्यात आले.

या ज्वालातून उठतील...

फाशीची शिक्षा ऐकून स्पाईज डगमगला नाही. तो आत्मविश्वासाने म्हणाला, ''हजारो दैन्यग्रस्त, भुकेकंगाल, पीडित लोकांच्या मुक्तीसाठी असलेली कामगार चळवळ आम्हाला फाशी दिल्याने तुम्ही दडपून टाकू शकाल अशी जर तुमची समजूत असेल, तर आम्हाला खुशाल फाशी द्या! पण (लक्षात ठेवा) तुम्ही ठिणगीवर पाऊल टाकीत आहात. त्यातून तुमच्या मागे, तुमच्या पुढे, सर्वत्र ज्वाळा भडकतील. हा वडवानल तुम्हाला विझवता येणार नाही!''

चार हुतात्म्यांच्या अंत्ययात्रेत ६ लाख लोक सामील झाले होते. उरलेल्या तीन बंदिवानांच्या मुक्ततेसाठी जगभर मोहीम चालू ठेवण्यात आली. लोकमताचा प्रभाव पडला. २६ जून १८९३ रोजी राज्यपाल आल्ट जेल्डने तिघांना बंधमुक्त केले. शिक्षा रद्द करताना राज्यपालांनी स्पष्टीकरण दिले की या तिघांनी पुरेसा काळ यातना भोगल्या आहेत म्हणून त्यांना मुक्त करण्यात येत आहे असे नव्हे, तर ते निरपराध आहेत (त्यांच्यावर भरलेले खटले अन्याय्य आहेत) म्हणून त्यांना मुक्त करण्यात येत आहे. हे तिघे आणि फाशी देण्यात आलेल्या व्यक्ती या त्यांच्याविरुद्ध उठविण्यात आलेल्या वावटळीचे, अवाजवीपणे भरती केलेल्या ज्युरींच्या आणि पक्षपाती न्यायाधीशांच्या निर्णयांचे बळी आहेत असाही अभिप्राय राज्यपालांनी दिला.

पुढे चौकशीनंतर असेही उघडकीस आले की सभेच्या वेळी जो बॉम्ब टाकण्यात आला होता तो पोलीस अधिकारी कॅप्टन बॉनफिल्ड याच्या सांगण्यावरून त्याच्या एका हस्तकाने टाकला होता. पोलाद कारखान्यांच्या काही मालकांनी कामगार चळवळ नेस्तनाबूत करण्याकरिता पोलिसांशी संगनमत करून हा कट रचला होता!

१८८९ : मे दिनाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता

हुतात्म्यांच्या बलिदानानंतर कामगार चळवळ मोडली तर नाहीच, उलट आठ तासांच्या मागणीसकट, समुचित राहणीमानाचा हक्क, जागतिक शांतता, शोषणमुक्त समाजव्यवस्था अशा अनेक मागण्या मांडीत, ही चळवळ पुढे सरसावली.

१४ जुलै १८८९ हा दिवस उजाडला. १०० वर्षांपूर्वी याच दिवशी बॅस्टाईलचा तुरूंग फोडून फ्रान्समधील जनतेने आधुनिक युगातील पहिली राज्यक्रांती घडवून आणली होती. पहिली आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (फर्स्ट इंटरनॅशनल) वेगवेगळ्या कारणांकरिता १८७६ साली विसर्जित करण्यात आली होती. पुन्हा एकदा अशी संघटना उभारण्याच्या उद्देशाने जगातील अनेक संघटनांचे प्रतिनिधी बॅस्टाईलच्या स्मृतिदिनाच्या दिवशी पॅरिसला जमले. या परिषदेला सेकंड इंटरनॅशनल असे नाव रूढ झाले. अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबरचे प्रतिनिधीसुद्धा या परिषदेला हजर होतेच. या संघटनेने हुतात्म्यांच्या बलिदानानंतर एक वर्षाने म्हणजे १८८८ साली भरविण्यात आलेल्या अधिवेशनांत १ मे १८९० पासून आठ तासाच्या मागणीसकट इतर मागण्यांचे आंदोलन जोमाने पुढे चालू करण्याचा निर्णय घेतला होता. हाच दिवस जगात सर्वांनी स्वीकारावा अशी अपेक्षा पॅरिस येथे या संघटनेच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली. ही अपेक्षा रास्त आहे असे मानून सेकंड इंटरनॅशनलच्या पॅरिस परिषदेने १ मे १८९० पासून जगभर हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते संमत केला.

१ मे १८९० साली युरोपमधील अनेक देशांनी हा दिवस साजरा केला. या दिवसाचा संदेश जगातील इतर अनेक देशात पोहोचण्यास पुष्कळ कालावधी गेला. सध्या हा दिवस जगभर साजरा होत असतो.

कोणताही नैतिक अगर कायदेशीर गुन्हा केला नसताना कामगारांच्या हितासाठी धीरोदात्तपणे आत्मार्पण केलेल्या किंवा यातना सहन केलेल्या नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करण्याचा हा दिवस! अनेक लढे करून श्रमजीवी वर्गाने, अपुरे असले, तरी जे यश संपादन केले आहे, त्याबद्दल जल्लोष करण्याचाही हाच दिवस! परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे समग्रलक्ष्यी दृष्टी ठेवून, आमूलाग्र समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे ध्येय गाठण्यासाठी कोणत्या टप्प्यावर आजची कामगार वर्गाची चळवळ येऊन थडकली आहे याचे आत्मपरीक्षण करण्याचाही हाच दिवस!

पुढील दिशा

या लेखाच्या आरंभी भारताच्या सद्य:स्थितीचे अपुरे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. कामगार चळवळीसमोर ही विदारक परिस्थिती बदलण्याचे आव्हान आहे. मे दिन हा जगातील सर्व कामगारांनी एकमेकाला साथ देऊन भांडवलशाहीच्या व आर्थिक साम्राज्यशाहीच्या आक्रमणाचा पराभव करण्यासाठी संघर्षाला कटिबद्ध होण्याचा

दिवस. परंतु आज कित्येकदा कामगार संकुचित निष्ठा जोपसताना आढळतो. अलीकडे, नोव्हेंबर १९९९ मध्ये सिॲटल येथे जागतिक व्यापार संघटनेविरुद्ध उग्र निदर्शने झाली. अमेरिकन कामगार त्यात सहभागी झाल्यामुळे आंदोलनाला धार आली परंतु या कामगारांना जागतिकीकरणामुळे, विकसनशील देशांचे शोषण कसे व किती होईल यापेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्या आपले नफे टिकविण्याकरीता स्थलांतर करू लागल्या तर आपल्याला बेकार व्हावे लागेल याची चिंता मुख्यत: होती. आज युरोपमधील कामगार विकसनशील देशातील कामगारांच्या पगार-वाढीला पाठिंबा देतात. परंतु त्या मागचा हेतू कोणता असतो? विकसनशील देशातील कामगारांचे वेतन वाढले तर तेथील कारखानदारांचा उत्पादन खर्च वाढेल, त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत हे कारखाने पराभूत होतील आणि त्यामुळे युरोपियन कामगारांना आपले वेतन टिकविता अथवा वाढविता येईल आणि त्याचबरोबर आपल्यावरील बेकारीचे संकट टळेल हा त्या पाठिंब्यामागचा हेतू असतो. तुर्कस्तान अथवा अन्य देशांतून अनेक कामगार स्थलांतर करून रोजगारासाठी युरोपमध्ये आले. युरोपियन कामगारापेक्षा पुष्कळ कमी वेतन स्वीकारून त्यांनी तुलनेने कमी कसब व कमी प्रतिष्ठा असलेली कामे केली. परंतु युरोपमधील देशांना बेकारीची झळ कमी-अधिक प्रमाणात पोहोचू लागल्याबरोबर जागतिक कामगारांच्या भ्रातृभावाची विस्मृती झाली. स्थलांतर करून आलेल्या कामगारांची हकालपट्टी करण्याची मागणी युरोपमधील काही देशांतील कामगार आपल्या सरकारांकडे करू लागले. कामगारांची अधिसत्ता असल्याचा दावा करणाऱ्या, समाजसत्तावाद रूजू लागल्याची ग्वाही देणाऱ्या राजवटी टिकल्या. परंतु तेथे आज वांशिक भेदांसकट अनेक कारणांवरून रक्तपातलांछित विग्रह होताना दिसतो आहे.

लोकमान्य टिळकांना मंडालेची शिक्षा झाल्याबरोबर, संप पुकारून, रस्त्यावर येऊन सहा दिवस पोलिसांशी झुंज देणारा भारतीय कामगार, नौदलाने उभारलेल्या विद्रोहाला पाठिंबा देऊन हिरिरीने संपात सामील होऊन गोळीबाराला सामोरा जाणारा कामगार, आज कोणत्या राजकीय-सामाजिक लढ्यात आपल्याला उतरताना दिसतो? बाबरी मशीदीच्या विध्वंसनानंतर देशांतील १६ राज्यांत दंगली उसळल्या. सुमारे २००० लोक प्राणास मुकले. भारतीय कामगार हस्तक्षेप करून हा रक्तपात थोपविण्यात असमर्थ ठरला. कारखान्यात जात-पात बव्हंशी न मानणारा कामगार आपल्या गावी परत गेला म्हणजे जातीची उतरंड विसरत नाही. लिंगभेद जवळजवळ पूर्वी इतक्याच कटाक्षाने तो पाळतो. भांडवलशाहीला कामगार वर्गात फूट पाडण्यात फार मोठे यश सध्या प्राप्त झाले आहे. टेल्कोसारख्या कारखान्यातील सफाई कामगाराचा सुद्धा पगार एखाद्या लहान कारखान्यात काम करणाऱ्या कसबी कामगारापेक्षा जास्त असतो. त्यामुळे कसबी कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा देण्याचा भ्रातृभाव क्षीण होत जातो. त्याचप्रमाणे मक्तेदारी उद्योगातील कामगारांचे पगार पुष्कळ उंचावलेले असतात, त्यांना असंघटित व अन्य दुर्बल श्रमिकांना ठराव करण्यापलीकडे पाठिंबा देण्यात

फारसे स्वारस्य नसते.

आज एन्.जी.ओ. अथवा स्वयंसेवी संघटना या नावाने वावरणाऱ्या अनेक संघटना देशात निर्माण झाल्या आहेत. सामाजिक-राजकीय कार्याचा धंदा करणाऱ्या यातील संघटना विचारात घेण्याचे कारण नाही. परंतु एक-एक समस्या सुटेपणाने घेऊन (धरणग्रस्त, हुंडाबळी, बालकामगारांच्या व्यथा इत्यादी) प्रामाणिकपणे, निर्धाराने कार्यरत असणाऱ्या संघटनांना, भांडवलशाहीच्या निर्घृण दडपणाखाली आपण भरडले जाऊ याचे पुरेसे भान नाही. कामगारांना या समस्यांना सामोरे जाण्याची व न्यायासाठी संघर्ष उभारण्याची गरज आहे असे प्रकर्षाने वाटते आहे असे दिसत नाही.

आत्मपरीक्षण करण्याची आणि आपले बहु-आयामी सामर्थ्य प्रकट करण्याकरिता कृतीशी निगडित निर्धार व्यक्त करण्यासाठी मे दिनाच्या दिवशी कामगार संघटनांना संधी मिळेल. ही संधी, रोम असो अथवा न्यूयॉर्क असो, मनिला असो अथवा मुंबई असो, कामगार संघटना घेण्याचा विचार करतील की केवळ निदर्शने करून झाल्यावर सुटीतील मौज-मजा अनुभवण्यात त्या आनंदमग्न असतील?

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, मे २०००)

❑

फिजीतील संघर्ष : झुंडशाही विरुद्ध लोकशाही

ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या वर्चस्वाखाली असलेल्या वासाहतिक देशांमध्ये 'फोडा आणि झोडा' या राजनीतीला बहुतांशी यश आले आहे, हे ऐतिहासिक सत्य कोणत्याही वस्तुनिष्ठ अभ्यासकाला नाकारता येईलसे दिसत नाही.

पॅसिफिक समुद्रातील ३३२ लहान-मोठ्या बेटांचा समूह असलेल्या फिजी या देशात हेच ऐतिहासिक सत्य प्रकर्षाने प्रकट होणार की इतिहासाला कलाटणी देणारी, लोकशाहीवर अधिष्ठित राजनीती यशस्वी होणार? ही चिंता मूळच्या भारतीय असलेल्या, परंतु स्थलांतरानंतर फिजीचे नागरिक बनलेल्या लोकांना सध्या लागलेली आहे.

फिजीच्या ३३२ पैकी फक्त सुमारे १/३ बेटांवर लोकवस्ती आहे. एकूण लोकसंख्या सुमारे ८ लाख असलेल्या या चिमुकल्या देशात मूळच्या भारतीयांचे प्रमाण सध्या सुमारे ४४ टक्के आहे. शेती करण्यास लायक असलेली जमीन फक्त १६ टक्के आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी शेतीचा हिस्सा २५ टक्के आहे. दरडोई उत्पन्न भारताच्या सुमारे ७ पट अधिक असले तरी विषमता लक्षणीय असल्यामुळे एकूण लोकसंख्येपैकी दारिद्र्यग्रस्त लोकसंख्येचे प्रमाण सुमारे १/३ आहे. नागरी लोकसंख्येचे प्रमाण सुमारे ४० टक्के असून सुवा या राजधानीची लोकसंख्या पाऊण लाखाच्या आसपास आहे. एकूण लोकसंख्येपैकी ख्रिश्चन धर्मीयांचे प्रमाण सर्वात अधिक असून (सुमारे ५३ टक्के) प्रौढ साक्षरतेचे प्रमाणही लक्षणीय, म्हणजे सुमारे ८७ टक्के आहे.

ऊस, नारळ, आले, तंबाखू, कोको ही सध्या मुख्य पिके असलेल्या या बेट-समूहांची माहिती युरोपमधील देशांना जी पहिल्या प्रथम झाली ती अॅबेल टॅसमन या धाडसी डच पर्यटकाने १६४३ साली आपल्या नौका या बेटांजवळ थडकविल्या त्यावेळेस. पुढे इतर युरोपिअन देशातील पर्यटक सुद्धा या बेटांचा शोध घेण्यास बाहेर पडले. त्यापैकी इंग्लंडमधील दर्यावर्दी, 'बाउन्टी' नावाच्या बोटीतून १७८९ साली या बेटांचा अधिक तपशीलाने शोध घेण्यास निघाले. या बोटीवरील खलाशांनी बंड केले, म्हणून या बंडास 'म्युटिनी ऑफ दी बाउन्टी' असे म्हणतात. नियोजित मोहीम यशस्वी झाली नाही. काही खलाशी मायदेशी परतले तर काही जवळच्या अन्य बेटांवर

जाऊन राहिले. कॅप्टन ब्लाय व त्याच्याशी एकनिष्ठ राहिलेले खलाशी मात्र फिजी या बेट-समूहापर्यंत पोहोचले आणि त्यांनी पहिल्या प्रथम या प्रदेशाची तपशीलवार माहिती नोंदविली. या प्रदेशात चंदनाचे लाकूड मिळते असे आढळल्यावर, त्यावर वर्चस्व प्रस्थापित करून, व्यापार करण्यास १९व्या शतकात स्पर्धा सुरू झाली. अनेक व्यापारी, ख्रिश्चन धर्मप्रसारक, बोटींना अपघात झाल्यामुळे वाहून आलेले खलाशी, या सर्वांच्या संमिश्र प्रभावामुळे मूळच्या रहिवाशांच्या जीवनाची घडी बदलली. ही घडी विस्कळीत झाल्यावर तेथील आदिवासी गणसंघांमध्ये युद्धे पेटली. या बेबनावाचा फायदा घेऊन, ब्रिटिशांनी १० ऑक्टोबर १८७४ रोजी आपले संपूर्ण वर्चस्व या ३३२ बेटांवर प्रस्थापित केले आणि पुढे १८८१ साली जवळच असलेल्या रोटूमा या बेटाचाही कब्जा घेऊन त्याला फिजीचा अविभाज्य भाग बनविले.

वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर ब्रिटिशांनी तेथील समाजव्यवस्थेचे आधुनिकीकरण सुरू केले. वेगवेगळ्या गणसंघांच्या प्रमुखांशी बोलणी करून ग्रेट कौन्सिल ऑफ चीफस् या नावाची संघटना स्थापन करण्यात आली. शेत-जमिनीवर नगदी पिके घेण्याकरिता राबणाऱ्या मजुरांची गरज होती. तेथील जमिनीवर वैयक्तिक मालकी कोणाचीही नव्हती. एकेका गणसंघाची (जमातीची) अथवा खेड्याची सामूहिक मालकीची प्रथा अस्तित्वात होती. ब्रिटिश आक्रमण थोपविण्याकरिता, तेथील गणसंघ शौर्याने लढले परंतु पराभूत झाले. त्यांच्यात अधिक असंतोष निर्माण होऊ नये याकरिता सामूहिक मालकीच्या प्रथेला धक्का न लावता व जमिनीवर राबण्याची सक्ती न करिता ब्रिटिश राजवटीने, ब्रिटिश व अन्य युरोपिअनांना जमीन खंडाने देण्यास सुरवात केली. शेतांवर राबण्याकरिता, जंगलातील लाकूड तोडण्याकरिता व तत्सम काबाडकष्ट करण्याकरिता भोवतालच्या बेटांवर मोहीम करून तेथील लोकांना पकडून जबरदस्तीने फिजीमध्ये आणण्यात आले. या कष्टाळू गुलामांना 'ब्लॅक बर्डस' असे म्हटले जात असे.

भारतावर संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर वरील 'ब्लॅक बर्डस'ची प्रथा बंद करण्यात आली. भारतातील कंत्राटदारांशी करारनामे करून शेकडो भारतीय मजुरांना कष्टाची कामे करण्याकरिता ग्वायना, सुरिनाम, ट्रिनिदाड, द.आफ्रिका, मॉरिशस, फिजी अशा विविध ब्रिटिश वसाहतींमध्ये नेण्यात आले. याला 'इन्डेंचर्ड लेबर' असे म्हणतात. १४ मे १८७९ रोजी ४६३ भारतीय मजूर असलेले पहिले जहाज फिजीला पोहोचले. बहुतांशी उसाच्या मळ्यात अतोनात काम करणाऱ्या या मजुरांना अतिशय हिणकस वागणूक दिली जात असे. तोताराम सिन्दया याने 'माझी फिजीतील २१ वर्षे' या आपल्या ग्रंथात या परिस्थितीचे भेदक वर्णन केलेले आहे. विशेषत: ते वाचल्यावर अनेक भारतीयांना धक्का बसला. म.गांधींनी, त्यांचे सहकारी श्री. सी. एफ्. अँड्रुज यांना चौकशी करण्याकरिता फिजीला पाठविले. १९२० साली ही 'इनडेंचर्ड लेबर'ची प्रथा बंद होईतोपर्यंत फिजीला सुमारे ६३,००० मजूर पोहोचलेले होते आणि फिजीला कामासाठी गेल्यापासून १० वर्षांनंतर मायदेशी परतण्याची मुभा असली तरी बहुसंख्य

भारतीय, फिजीतच स्थायिक झाले.

फिजीबद्दल बरीच माहिती उपलब्ध झाल्यानंतर तेथे व्यापार करून व उद्योग प्रस्थापित करून संपन्न होण्याला संधी आहे असे लक्षात आल्यानंतर अनेक भारतीय, विशेषत: गुजराथी फिजीत गेले आणि साखर कारखाने, तयार कपडे, पर्यटन अशा उद्योगात काहींनी दुकाने काढून व्यापारात तर काहींनी खंडाने शेतजमीन घेऊन शेती व्यवसायात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मजूर, उद्योजक, पारंपरिक व आधुनिक कसबी व्यावसायिक अशा सर्वांची मिळून भारतीयांची लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली. १९०४ साली एक लहानसे विधिमंडळ जरी ब्रिटिश राजवटीत स्थापन करण्यात आले असले तरी त्यात युरोपिअनांचेच वर्चस्व होते. भारतीयांना नागरिकत्व असले तरी मताधिकारही नव्हता आणि प्रतिनिधित्वही नव्हते. फिजीतील मूळ रहिवाशांचे राज्यपालाने नेमलेले दोन प्रतिनिधी या विधिमंडळाच्या कामकाजासाठी नियुक्त केले जात असत. यामुळे भारतीयांच्यात असंतोष निर्माण होऊ लागला होता. परंतु फिजी व भारतीयांनी मिळून स्वातंत्र्य लढा कधी उभारला नाही.

अनेक वसाहतींमधील असंतोषामुळे ब्रिटिशांना वसाहतींवर वर्चस्व ठेवणे अशक्य झाले आणि म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतींच्या विसर्जनाचे पर्व सुरू झाले. या प्रक्रियेतूनच १० ऑक्टोबर १९७० रोजी म्हणजे ब्रिटिशांनी फिजीवर वर्चस्व प्रस्थापित केल्यापासून बरोबर ९६ वर्षांनी फिजीला राष्ट्रकुलांतर्गत स्वातंत्र्य प्राप्त झाले.

स्वातंत्र्यानंतर जी राज्यघटना तयार करण्यात आली त्यात फिजी, भारतीय फिजी व उरलेल्या अन्य नागरिकांचे हित रक्षण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या घटनेनुसार एकूण ५३ लोकप्रतिनिधींच्या सभागृहात फिजिअन्सना २२, भारतीय फिजिअन्सना २२, फिजीमधील इतर नागरिकांना ८ व रोटुका बेटाला एक जागा देण्याची तरतूद करण्यात आली. प्रत्येकी २२ प्रतिनिधींपैकी ११ प्रतिनिधी त्या-त्या समाज घटकाने (म्हणजे भारतीय व फिजिअन्स मतदारांनी) निवडून द्यावेत व उरलेले प्रत्येकी ११ प्रतिनिधी सर्व मतदारांनी निवडून द्यावेत अशीही तरतूद राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या दृष्टीने करण्यात आली होती. वांशिक अथवा अन्य भेदभाव संपूर्णतया टाळण्यासाठी प्रत्येक नागरिक मतदाराला एक मताचा अधिकार देऊन, सर्वांनी मिळून लोकप्रतिनिधीगृह निवडून द्यावे अशी काही भारतीयांनी १९२९-३० सालापासून केलेली सूचना तेव्हाही मंजूर झाली नाही आणि स्वातंत्र्यानंतरच्या या घटनेनेही ती स्वीकारली नाही. १९७०च्या सुमारास भारतीय व इतरांची मिळून असलेली लोकसंख्या ही मूळच्या फिजिअन्सपेक्षा थोडी अधिक झाली होती. त्यामुळे आपल्यासाठी निश्चित जागांची तरतूद केली नाही तर लोकप्रतिनिधीगृहात प्रभाव पाडण्याइतके स्थान आपल्याला उरणार नाही अशी धास्ती फिजिअन नेत्यांना वाटत होती, म्हणून वरील तरतुदींची राज्यघटना तयार करण्यात आली आणि सध्या असलेले फिजीचे राष्ट्राध्यक्ष रातू सिर कमीसेसे मारा हे त्यावेळेस फिजीचे पहिले पंतप्रधान झाले.

१९७२ ते १९८७ पर्यंत मारा यांच्या नेतृत्वाखालील फिजिअन्सचे प्रभुत्व असलेला नॅशनल अलायन्स पार्टीचा राज्यकारभार चालू होता. परंतु १९८७ च्या निवडणुकीत या पक्षाचा पराभव झाला आणि नॅशनल फेडरेशन पार्टी आणि फिजी लेबर पार्टी यांच्या युतीचे सरकार स्थापन करण्यात आले. फिजिअन्स व भारतीय यांच्या मंत्र्यांच्या जागांचे समान वाटप करण्यात आले परंतु राज्यकारभारात भारतीयांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. टिमोसी बावाद्रा हे पंतप्रधान फिजिअन होते परंतु भारतीयांचे प्रभुत्व असलेल्या लेबर पार्टीचे ते सभासद व एक नेते होते.

या घटना घडत होत्या तोपर्यंत फिजिअन लोकांमध्ये, विशेषत: युवकांमध्ये व नेत्यांमध्ये भारतीयांविषयी असंतोष पसरू लागला होता. ३० वर्षांचे करारनामे करून स्थलांतरित भारतीय, हे भारतीय शेतमजुरांकरवी जमीन कसत होते आणि त्याचा प्रचंड नफा भारतीयांना मिळत होता. पुढे-मागे खंडाने जमीन कसण्याची पद्धत नष्ट करून, भारतीय आपले स्वामित्व जमिनीवर प्रस्थापित करतील अशी भीती फिजिअन्सना वाटू लागली. भारतीयांचे प्रभुत्व असलेल्या व्यापार-उद्योगात फिजिअन्सना फारशा नोकऱ्याही मिळत नव्हत्या. कोठल्याही कारणाकरिता भारतीय फिजीतून स्थलांतर करतात तेव्हा ते मायदेशी परत जात नाहीत तर न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा अशा सधन देशात जातात. त्यावरून भारतीयांची निष्ठा धड फिजीशी नाही, धड भारताशी नाही, ती फक्त संपत्तीशी आहे याचा राग अनेक फिजिअन्सच्या मनात आहे. अनेक सधन भारतीय आपल्यापाशी दोन-तीन देशांचे पासपोर्ट सतत असतात अशा बढाया मारीत असतात हेही फिजिअन्सना खटकत होते.

या असंतोषाचा फायदा सिटिवेनी राम्बूका या नावाच्या सैन्यातील एका माजी अधिकाऱ्याने घेण्याचा निश्चय केला. त्याने मोजक्या अनुयायांकरवी १९८७ साली निवडून आलेले सरकार शस्त्रबळाने उलथून टाकण्याचा कट रचला. पहिला कट फसला परंतु दुसऱ्या कटात यशस्वी झाल्यानंतर त्याने आपले सरकार घोषित केले आणि स्वत: पंतप्रधानपद हस्तगत केले. १९९० साली त्याने पहिली राज्यघटना रद्द केली आणि फिजिअन्सना वरचष्मा देणारी नवी राज्यघटना घोषित केली. या घटनेनुसार फिजिअन्सना ३७, भारतीयांना २७, इतरांना ५ आणि रोटूमा बेटाला एक जागा देण्याची तरतूद करण्यात आली. फिजी हे स्वतंत्र, सार्वभौम, लोकसत्ताक राज्य असल्याचे जाहीर करून त्याने लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न केला. या राज्यघटनेनुसार १९९२ मध्ये तो व त्याचा एस्.व्ही.टी. पक्ष यांनी निवडणूक जिंकली व तो रीतसर पंतप्रधान झाला. त्याचा राज्यकारभार दोन वर्षे चालला तेवढ्यातच त्याच्या पक्षात १९९४ साली फूट पडली आणि लोकप्रतिनिधी गृहात एका विधेयकाच्या वेळी त्याचा पराभव झाला तेव्हा त्याने भारतीयांचे प्रभुत्व असलेल्या महेंद्र चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पक्षाचे सहकार्य स्वीकारण्याचा निर्णय घेतला! पक्षपाती

राज्यघटना बदलण्याच्या अटीवर महेंद्र चौधरी यांनी राम्बूकाला पाठिंबा दिला. १९९५ साली एक आयोग नेमण्यात आला आणि त्यांच्या शिफारसींवर विचारविनिमय होऊन नवीन राज्यघटना अंमलात आणण्याचे ठरले. १९९७ साली मंजूर करण्यात आलेल्या या घटनेनुसार फिजिअन्सना २३, भारतीयांना १९, इतरांना ३, रोटुमान बेटाला १ व खुल्या २५ जागांचे असे ७१ सदस्यांचे लोकप्रतिनिधी गृह उभारण्याची तरतूद करण्यात आली. या राज्यघटनेनुसार १९९९ साली झालेल्या निवडणुकीत महेंद्र चौधरींच्या लेबर पार्टीने मोठा विजय मिळविला आणि इतर पक्षांच्या सहकार्याने ते फिजीचे पहिले भारतीय पंतप्रधान झाले.

१९८७ मध्ये रीतसर निवडून आलेले सरकार उलथल्यापासून पुढील १० वर्षात देशात जवळपास अंदाधुंदीचे राज्य होते. सुमारे ७००० भारतीय फिजी देश सोडून भारत वगळून इतर देशात गेले. यात मुख्यत: सुशिक्षित व्यावसायिकांची संख्या जास्त होती. असुरक्षितता वाटू लागल्यामुळे देशातील भांडवल बाहेर गेले आणि परदेशीयांची फिजीतील गुंतवणूक खंडित झाली. पर्यटकही येईनासे झाल्यामुळे पर्यटन उद्योगापासून मिळणारे उत्पन्नही घटले. ऊसतोडणी वेळेवर होईना म्हणून साखरेचे उत्पादन घटले आणि त्यामुळे निर्यात कमी झाली. फिजीच्या निर्यातीपैकी ३० टक्के प्रमाण साखरेचे असते. फिजीच्या चलनाचे (फिजिअन डॉलरचे) दोनदा अवमूल्यन झाले. परकीय चलनाचा साठा आकुंचित झाला. महागाई वाढली आणि बेकारीत भर पडली.

मजूर नेते महेंद्र चौधरी यांनी देशापुढील हे आव्हान स्वीकारून काही निर्णय जोमाने घेण्यास सुरुवात केली. अन्नधान्याच्या किंमती उतरविण्यात आल्या आणि १७ जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती निर्धारित करण्यात आल्या. शिक्षण, आरोग्य, काही मूलभूत सुविधा यांच्याकरिता खर्चाची तरतूद करणे आवश्यक असल्यामुळे करांचे प्रमाण वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. किमान वेतन कायदा सर्वत्र लागू करण्याचाही निर्णय जाहीर झाला. बँका व विमा उद्योगात बोकाळलेला भ्रष्टाचार व गैरकारभार रोखण्याकरिता पावले उचलण्यास प्रारंभ झाला.

या धूमधडाक्याच्या कार्यक्रमामुळे देशातील सधन लोकांना धास्ती वाटू लागली. फिजी व भारतीय या दोघांनाही ती धास्ती होती आणि म्हणून हे लोकाभिमुख सरकार उलथण्याचा कट जॉर्ज स्पेट नावाच्या उद्योगधंद्यात अयशस्वी ठरलेल्या एका भ्रष्ट व्यावसायिकाने रचला. एका ब्रिटिश विमा कंपनीत उच्च पदावर असताना भ्रष्टाचाराबद्दल त्याला बडतर्फ करण्यात आले होते. तसेच एका सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचा अध्यक्ष असताना तेथील भ्रष्टाचाराबद्दलही त्याला बडतर्फ करण्यात आले होते. भारतीयांचे वर्चस्व उधळून लावण्याची घोषणा करून त्याने काही फिजिअन्सची सहानुभूती संपादन केली. ७ बुरखाधारी अनुयायांसमवेत हातात बंदुका व मशीनगन्स घेऊन, त्याने लोकप्रतिनिधी गृहाचा कब्जा घेतला आणि मंत्रिमंडळ व अन्य सभासद अशा एकूण ३४ लोकप्रतिनिधींना (काही वृत्तांतांप्रमाणे ४० प्रतिनिधींना) ठार मारण्याचा

धाक दाखवून त्यांनी राजीनामा द्यावा अशी निर्वाणीची मागणी केली. पंतप्रधान चौधरींचा मुलगा (वैयक्तिक सचिव) आणि राष्ट्राध्यक्ष मारा यांची पर्यटन मंत्री असलेली मुलगी यांचाही या मृत्यूच्या धाकाखाली बंदिस्त असणाऱ्यांमध्ये समावेश आहे. पंतप्रधान चौधरी यांनी राजीनामा देण्याचे नाकारले म्हणून त्यांना मारहाणही करण्यात आली आहे. दहशत अधिक वाढविण्याकरिता सुवा या राजधानीमधील भारतीय व्यापाऱ्यांची दुकाने लुटणे, घरांना आगी लावणे, पिके उद्ध्वस्त करणे अशी बेगुमानशाही बिनदिक्कतपणे चालू आहे. राष्ट्राध्यक्षांना निर्धाराने निर्णय घेता न आल्या कारणाने, 'कौन्सिल ऑफ चीफस्नी' दुसरा पंतप्रधान निवडण्याबाबत अथवा फेरनिवडणुका घेण्याबाबत निर्णय घ्यावा असे त्यांनी आपले मत जाहीर केले. राष्ट्राध्यक्षांनी आणीबाणी जाहीर केली असली तरी त्याचा फारसा काही परिणाम झालेला नाही. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड व अन्य देश स्पेटच्या लोकशाही विरोधी धोरणांचा आणि कृतींचा निषेध करीत असले तरी त्याचीही दखल तो घेत नाही हे पाहून, फिजीचा सरसेनापती, कमोडर बैनीमारामा याने फिजीमध्ये लष्करी अंमल (मार्शल लॉ) सुरू झाल्याचे घोषित केले. फिजीतील आदर-आतिथ्याच्या परंपरेनुसार त्याने राष्ट्राध्यक्षांना प्रतिकात्मक देवमासा अर्पण केला आणि त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडल्यानंतर, स्वत:च्या जावयाची पंतप्रधान म्हणून नेमणूक केली. टेलिकॉम कामगार संघटनेचा माजी अध्यक्ष स्पेट या फिजीमधील नगण्य व्यक्तीची पंतप्रधानपदी नेमणूक झाली आहे! बंदुकीच्या धाकाखाली बंदिस्त असलेल्या सर्वांची सुटका केल्यास सरकार उलथवून टाकण्याच्या कटात सामील असणाऱ्या स्पेटसकट सर्वांना माफी देण्यात येईल आणि त्यानंतर फेरनिवडणुका, राज्यघटनेचे पुनरावलोकन किंवा अन्य पर्यायांचा विचार करता येईल असेही पूर्वीचा पंतप्रधान राम्बूका याच्यातर्फे व स्वत: सरसेनापतींनी सुचवून पाहिले. परंतु पुढील सरकारात फिजिअन्सना प्रभुत्व व स्वत:ला पंतप्रधानपद देण्याची हमखास ग्वाही दिल्याखेरीज कोणत्याही प्रस्तावाचा विचार आपण करणार नाही असे स्पेटने कळविले आहे.

मूळ परदेशीय असलेल्या व्यक्तीला भारताचे पंतप्रधानपद व अन्य उच्च पद देण्यात येऊ नये अशी भूमिका सत्तारूढ सरकारमधील भाजप पक्षाची असल्यामुळे फिजीत कोणते धोरण आखावे याबाबत या सरकारसमोर पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे परराष्ट्र खात्यातील उच्चाधिकाऱ्यास भारतीयांची विचारपूस करण्यासाठी पाठविण्यापलीकडे आणि कॉमनवेल्थमधील देशांची आळवणी करण्यापलीकडे भारताला अद्याप काहीही करता आलेले नाही!

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, जुलै २०००)

❑

एक सुबोध, अभ्यासपूर्ण पुस्तिका

(भारतीय राज्यघटना पुनरावलोकन, लेखक : डॉ. ना. य. डोळे, उदगीर, किंमत : रु.३०.०० प्रकाशक : एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३.)

सध्या देशपातळीवर जे अनेक वाद चालू आहेत, त्यात भारतीय राज्यघटनेचे पुनरावलोकन हा एक महत्त्वपूर्ण विषय बनला आहे. तांत्रिक मुद्दे आणि अस्सल राजकीय गाभा असे या वादाचे दुहेरी स्वरूप आहे. राज्यघटनेचे हे पुनरावलोकन नसून, राज्यघटनेच्या कार्यवाहीचे हे पुनरावलोकन आहे, असा खुलासा सत्ताधारी राज्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आला आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात जोपासण्यात आलेल्या समाजहितपोषक मूल्यांची पायमल्ली करण्यासाठी घटना आढाव्याचा खटाटोप करण्यात येतो आहे, असा सत्ताधाऱ्यांच्या विरोधकांचा आक्षेप आहे, तर देशावर आलेली सर्वांगीण अवकळा दूर करण्यात स्वारस्य नसलेल्या विरोधकांचा हा आपमतलबी कांगावा आहे अशी भूमिका घटना-कार्यवाही मूल्यांकनाचे समर्थक मांडीत आहेत.

या आरोप-प्रत्यारोपांमुळे सामान्य लोक जर संभ्रमित झाले असतील तर ते समजण्यासारखे आहे. परंतु सुजाण सामाजिक-राजकीय कार्यकर्ते जर या विषयाची उपेक्षा करू लागले किंवा वादातील कोणतीतरी एक बाजू उथळ आक्रस्ताळेपणातून मांडू लागले, तर देशाचे भवितव्य कलंकित होईल अशी चिंता वाटल्यामुळे मराठवाड्यातील उदगीर येथील निवृत्त प्राचार्य डॉ. ना.य.डोळे यांनी कार्यकर्त्यांसाठी व जिज्ञासू नागरिकांसाठी घटना-फेरतपासणीसंबंधी 'भारतीय राज्यघटना-पुनरावलोकन' ही सुबोध व अभ्यासपूर्ण पुस्तिका लिहिली आहे.

पुनरावलोकनासाठी नेमण्यात आलेल्या राष्ट्रीय आयोगाचे, अध्यक्षांसकट ११ सदस्य आहेत. अध्यक्ष व बहुसंख्य सदस्य महिना एक रुपया पगार स्वीकारणार आहेत. या सदस्यांना सल्ला देण्यासाठी दहा समित्या नेमण्यात आल्या आहेत. या

समित्यांच्या अध्यक्षांचे वेतन महिना रु. ३० हजार, बैठकीच्या दिवशी दररोज भत्ता रु. १ हजार आणि सरकारी निवासस्थान अशा अल्पशा (!) सुविधा असून, पगारी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी युक्त असे सचिवालय या संपूर्ण आयोगाला एक वर्षभर मदत करणार आहेत. राष्ट्रीय आयोगाची स्थापना १ फेब्रुवारी २००० रोजी झाली आणि कामकाजाची पहिली बैठक २३ मार्च रोजी भरविण्यात आली. आयोगाच्या ११ सदस्यांमध्ये फक्त एक महिला असून, म.गांधींची नात असलेल्या या महिलेने भाजप हा पक्ष धर्मनिरपेक्षतावादी आहे अशी ग्वाही पूर्वीच देऊन ठेवलेली आहे. 'बहुसंख्याकांच्या विरुद्ध असणे म्हणजे सेक्युलर असणे हा अर्थ बरोबर नाही' अशी मुलाखत पी.टी.आय. वृत्तसंस्थेला ३१ ऑक्टोबर १९९४ रोजी देणारे माजी सरन्यायाधीश, श्री वेंकटचलय्या हे 'नि:स्पृह, नि:पक्षपाती' वगैरे असल्यामुळे त्यांची आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली आहे हे नजरेआड करून चालण्यासारखे नाही. बहुसंख्याकांच्या विरुद्ध असणे म्हणजे सेक्युलर असणे अशी विकृत मांडणी फक्त हिंदुत्व परिवार करीत असतो. मग वरील खुलासा कोणाच्या मांडणीकडे लक्ष ठेवून न्यायमूर्तींनी केला होता?

आपली सध्याची राज्यघटना कशी तयार झाली याचा संक्षिप्त तपशील या पुस्तिकेतील एका प्रकरणात देण्यात आला आहे. त्याच्याशी तुलना केली म्हणजे आजची पुनरावलोकन समिती लोकसभेत तिच्या नेमणुकीबाबत चर्चा न करता कशी घिसाडघाईने नेमली गेली आहे याची वाचकांना कल्पना येईल.

ही घिसाडघाई कशासाठी केली जाते आहे याची आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय अशी दुहेरी पार्श्वभूमी समजावून घेतली पाहिजे. १९९० सालापासून जे आर्थिक धोरण आपल्या देशात स्वीकारण्यात आले त्याचे दुष्परिणाम हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहेत. त्याविरुद्ध असंतोष लोकांच्या मनात निर्माण होऊ लागला आहे. या असंतोषाला जर धार आली तर आर्थिक धोरण बदलण्याकरिता सरकारवर दबाव येईल याची परकीय भांडवल गुंतवणूकदारांना सतत चिंता वाटत असते. म्हणून त्यांना स्थिर सरकार हवे आहे. सध्याच्या सत्ताधारी सरकारने परकीय भांडवल गुंतवणुकीला अनिर्बंध मुभा दिलेली असल्यामुळे, त्यांच्या हितरक्षणाकरिता स्थिर सरकारची हमी देणारी तरतूद घटनेत घालण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच आपल्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव येऊ देण्याला अधिकात अधिक अडथळे निर्माण करणे हे या घटना पुनरावलोकनामागील एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. भाजप या पक्षाला निर्विवाद बहुमत नसल्यामुळे, सध्याच्या युतीमधील पक्ष आपल्याविरुद्ध केव्हा जातील याची भाजपला खात्री नसल्यामुळे त्यांना आपल्या स्थैर्याबद्दल शाश्वती वाटत नाही. ही शाश्वती निर्माण करण्यासाठी 'स्थिर सरकारच्या' गरजेवर भर देण्यात येतो आहे आणि अशी शिफारस जर सध्याच्या तज्ज्ञ समितीकडून मिळाली तर ते भाजपला हवे आहे.

सध्याची आर्थिक दुरवस्था दूर करून आर्थिक-सामाजिक प्रगती वेगवान बनविणे हे दुसरे उद्दिष्ट सांगण्यात येत आहे. फुटीर शक्तींचा बंदोबस्त करणे हे तिसरे उद्दिष्ट

आहे. लोकशाही राजवट संसदीय पद्धतीची असावी की अध्यक्षीय पद्धतीची असावी याचाही खल व्हावा अशी अपेक्षा आहे. या व इतर उद्दिष्टांची मांडणी करून लेखकाने काही महत्त्वाचे प्रश्न वाचकांच्या विचारासाठी मांडले आहेत.

पाच वर्षे पराभवाची धास्तीच उरणार नाही असे आश्वासन खासदार मंत्र्यांना मिळाले, तर ते अधिक कार्यक्षम बनतील, की कामचुकार खासदार-आमदारांचे सध्याचे दुर्वर्तन हे सध्याच्या घटनेतील तरतुदींमुळे होते आहे, की त्याला काही अन्य कारणे आहेत? देशातील आर्थिक अवनती ही घटनेतील तरतुदींमुळे झाली आहे का? लोकप्रतिनिधी सध्या जे विकत घेतले जातात ते काय घटनेतील तरतुदींमुळे? क्रिकेटसकट सर्वत्र जो भ्रष्टाचार बोकाळला आहे तो काय ५० वर्षांपूर्वी बनविण्यात आलेल्या घटनेमुळे? प्रादेशिक पक्ष हे फुटीरतेचा परिपोष करतात असे भाजप म्हणत आलेला आहे. असे जर असेल तर अशा पक्षांशी युती कशासाठी करण्यात आली आहे? स्थिरतेच्या नावाखाली एकदा का सर्व खासदारांना पाच वर्षे बिनविरोध राज्य करिता येईल असे आश्वासन मिळाले की पंतप्रधानांच्या इशाऱ्याने चालण्याची प्रवृत्ती त्यांच्यातील बहुसंख्य खासदारांमध्ये वाढण्याची शक्यता आहे. आणि मग भाजपला आपला त्रिसूत्री कार्यक्रम (राम मंदिर, ३७०वे कलम, समान नागरी कायदा) पार पाडण्यास पाठिंबा मिळविता येईल, ही शक्यता नाकारता येईल का? म्हणूनच स्थैर्य अधिक महत्त्वाचे की सरकारने लोकांना जबाबदार असणे अधिक महत्त्वाचे याचा सर्व नागरिकांनी कसोशीने विचार करावयास नको काय?

संपूर्ण घटनेचा फेरविचार करणे वेगळे आणि घटनेत दुरुस्त्या सुचविणे वेगळे. गेल्या ५० वर्षांचा अनुभव लक्षात घेऊन, लोकहित लक्षात घेऊन, मूलभूत हक्कांसकट घटनेत काही दुरुस्त्या सुचविल्या तर आक्षेपार्ह काही नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या घटनेला हात लावला गेला तर त्यांचे हात कलम करण्यात येतील अशी घोषणा करणे सर्वथैव अयोग्य आहे - असा योग्य इशारा या पुस्तिकेच्या लेखकाने दिला आहे. सध्या असलेल्या घटनेचे रक्षण करावयाचे म्हणजे कोणत्या आशयाचे रक्षण करावयाचे, कोणत्या आशयाचा विचारपूर्वक फेरविचार करावयाचा याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

घटना पुनरावलोकनाबद्दल अल्पसंख्याक, दलित, पुरोगामी यांच्या मनात शंका निर्माण होण्याला आधार काय आहे याचे पुराव्यासहित विवेचन या लहानशा ६४ पानांच्या पुस्तिकेत करण्यात आले आहे हे या पुस्तिकेचे उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. पुनरावलोकनाला हरकत का घेता, असा भाबडा प्रश्न विचारणाऱ्या उदारमतवाद्यांना यात चोख उत्तर देण्यात आले आहे. हिटलर-मुसोलिनी सारखे दुष्ट हुकूमशहा घटनेचा उपयोग करूनच राज्यावर आले आणि नंतर त्यांनी घटना पायदळी तुडवली याचा विसर पडू न देता या पुनरावलोकनाची निर्भीडपणे समीक्षा करावी असे आवाहन डॉ. ना. य. डोळे यांनी केले आहे.

सडेतोड प्रस्तावना असलेली, संयमशील समारोप असलेली, मधून-मधून रास्त अभिनिवेश असलेली, सर्व कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरणारी ही पुस्तिका एक रास्त प्रश्न विचारते : पुनरावलोकन घटनेचे करण्याची गरज आहे की घटनेतील उद्दिष्टे अंमलात आणण्याबाबत कुचराई करणाऱ्या सर्वांची?

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, ऑक्टोबर २०००)

❑

निर्दय सरकारने नागरिकांवर केलेला निर्घृण आघात

ही घटना मध्ययुगाला ज्ञात असलेल्या भीषण अत्याचारांची नाही. १९८० ते ८२ च्या दरम्यान घडलेल्या हत्याकांडाची, अपहरणाची, बलात्कारांची, अनन्वित यातना देणाऱ्या आघातांची ही सत्यकथा आहे. जाणीवपूर्वकपणे योजलेले आणि बेगुमानपणे घडवून आणलेले ते एक दुष्कृत्य आहे. डोळे उघडे ठेवून बघणाऱ्यांना, त्यात जागतिक बँक आणि अमेरिकन आंतरराष्ट्रीय विकास बँक यांच्या 'औदार्याचा' नमुना दिसेल. कान उघडे ठेवून ऐकणारांना ग्वाटेमाला देशातील निर्दय सरकारचे निर्घृण आघात ऐकू येतील.

अमेरिका खंडाच्या मध्यभागी, ग्वाटेमाला या नावाचा एक लहानसा देश आहे. १९५४ साली, तेथील लोकसत्ताक सरकार उधळून टाकण्यात आले. अमेरिकेच्या शस्त्रास्त्रे व आर्थिक मदत यासकट सर्वतोपरी प्रोत्साहनाने तेथे लष्करी राजवट स्थापन करण्यात आली. जवळजवळ पन्नास वर्षे या राजवटीचे थैमान त्या देशात चालू होते.

१९७५ साली, ग्वाटेमाला राष्ट्रीय वीज प्राधिकरणाने चिशॉय नदीवर धरण बांधून एक वीज निर्मिती प्रकल्प उभारणीचा निर्णय घेतला. या प्राधिकरणाचे संक्षिप्त नाव इन्डे (INDE) असे आहे. 'मध्य अमेरिकेतील सर्वात मोठी मानवी करामत' असा या प्रकल्पाचा डांगोरा पिटण्यात आला. पन्नास किलोमीटर लांबीचा जलाशय निर्माण होणाऱ्या या प्रकल्पातून ३४४५ लोक विस्थापित होणार होते. त्यापैकी सुमारे ८०० लोक हे इ.स.पूर्व ३०० ते ९०० पर्यंत नांदणाऱ्या सुप्रसिद्ध माया संस्कृतीतील आदिवासींचे वंशज होते. मुख्यत: अमेरिकन आंतरराष्ट्रीय विकास बँक आणि जागतिक बँक यांनी दिलेल्या कर्जातून हा प्रकल्प उभारण्यात आला. प्रकल्प उभारणीचा खर्च २७ कोटी डॉलर्स असेल असा अंदाज बांधण्यात आला. त्यापैकी सुमारे ३९% कर्जाचा वाटा आंतरराष्ट्रीय विकास बँकेचा आणि सुमारे २७% कर्जाचा वाटा जागतिक बँकेचा असा करार करण्यात आला.

धरण बांधावयास सुरुवात करण्यापूर्वी आवश्यक तेवढे सर्वांगीण सर्वेक्षणही करण्यात आले नाही आणि नियोजित विस्थापितांशी विचारविनिमयही करण्यात आला नाही.

चिशॉय नदीच्या काठी रिओ-नेग्रो या नावाचे एक लहान गाव आहे. माया-आची या नावाने ओळखले जाणारे, वर उल्लेखलेल्या माया संस्कृतीचे वंशज, या गावात राहून पारंपरिक मर्यादित सुखाच्या कल्पना उराशी बाळगून, शेकडो वर्षे शांतपणे उदरनिर्वाह करीत आलेले आहेत. हे गाव धरणाच्या जलाशयात बुडणार होते. परंतु धरणाच्या कामाला सुरूवात झाल्यापासून सुमारे दोन वर्षांपर्यंत होऊ घातलेल्या विस्थापनाची आणि नियोजित 'पुनर्वसनाची' कल्पना या कॅथालिक (ख्रिश्चन) पंथात धर्मांतरित झालेल्या आदिवासींना देण्यात आली नाही. धरणाच्या या टापूत अचानकपणे आणीबाणी लादण्यात आली आणि प्रकल्प उभारणीचे करार-मदार आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेले असल्यामुळे रिओ-नेग्रोवासीयांना स्थलांतर करावे लागेल असे निक्षून बजावण्यात आले.

साहजिकच, या जबरदस्तीने लादण्यात आलेल्या विस्थापनाला माया-आची लोकांनी जोमाने, परंतु शांततामय मार्गाने विरोध केला. पुनर्वसनासाठी सुचविण्यात आलेल्या पॅकक्स या गावातील ओसाड-रेताड जमीन आणि निवासाची सोय पाहून तर विरोधाची तीव्रता वाढत गेली. बहुसंख्य बिगर माया-आची विस्थापितांनी, लादण्यात आलेले पुनर्वसन नाइलाजाने स्वीकारले. त्यामुळे सैन्य, पोलीस दल व अन्य शासनयंत्रणेने दोन विस्थापित घटकांमध्ये बेबनाव निर्माण करण्याकरिता बिगर आदिवासींना आणि पॅकक्स गावातील अन्य रहिवाशांना चिथावणी दिली, इतकेच नव्हे तर शस्त्रास्त्रे वापरण्याचे प्रशिक्षणही दिले.

या घटना घडत होत्या त्या काळात देशातील जुलमी लष्करी राजवटीविरुद्ध गनिमी पद्धतीने लढून, ती राजवट हटविण्याकरीता नागरिकांच्या क्रांतिकारी सेना संघटित होऊ लागल्या होत्या. रिओ-नेग्रो गावामध्ये, न्याय्य हक्क प्रस्थापनेसाठी आणि नुकसान भरपाई मागण्यासाठी 'कमिटी फॉर कॉम्पेसिनो युनिटी' (सी.यू.सी.) या नावाची समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीशी संपर्क साधून, व्याख्याने-शिबिरांच्या द्वारे गनिमी क्रांतिकारकांनी माया-आची विस्थापितांना विरोध चालू ठेवण्याची स्फूर्ती दिली आणि स्वतःचा निर्धारयुक्त पाठिंबा व्यक्त केला. विस्थापित लोक गनिमांना सामील झाले नाहीत, परंतु विरोध चालू ठेवण्याला लागणारे नैतिक बळ क्षीण न होण्याला या पाठिंब्यामुळे मदत झाली.

गनिमांशी संपर्क ठेवतात, ही सबब पुढे करून सैन्य व पोलीस दलाच्या साहाय्याने विस्थापितांवर दडपशाही करण्याचा निर्णय ग्वाटेमाला राजवटीने घेतला.

● ५ मार्च १९८० : धरणाजवळील पुएबलो विएजो नावाच्या परिसरात रिओ-नेग्रोमधील दोन रहिवासी गेले होते. तेथे कामगारांसाठी असलेल्या उपाहारगृहातून या दोघांनी शेंगा (वाटाणे) चोरल्या असा आरोप ठेवून दोन सैनिक व एका लष्करी पोलीस अधिकाऱ्याने त्यांचा पाठलाग सुरू केला. आपला पाठलाग करण्यात येतो आहे अशी आरोळी आपल्या गावी परतल्याबरोबर या दोघांनी दिली. गावकरी गोळा

झाले, पाठलाग करणाऱ्यांना त्यांनी घेराव घातला आणि जवळच्या देवालयाकडे त्यांना नेण्यात आले. एका संतप्त व बहुधा दारूने धुंद असलेल्या गावकऱ्याने पोलीस अधिकाऱ्याला तडाखा लगावला. या अधिकाऱ्याने ताबडतोब गोळीबार करून सातजणांना ठार मारले. त्याबरोबर तीव्र प्रतिक्रिया उमटली. गावकऱ्यांनी दगडांचा वर्षाव करून व सुरे फेकून त्या अधिकाऱ्याला ठार मारले. (दुसऱ्या एका वृत्तांतानुसार हा अधिकारी पळत सुटला आणि जवळच्या नदीत पडून बुडाला). एक सैनिक निसटून पळाला आणि दुसऱ्याला लोकांनी सोडून दिले. तेव्हापासून सैनिक या गावात वारंवार जाऊन, अकारण घरांच्या झडत्या घेऊन लोकांना सतावू लागले.

● जुलै १९८० : पर्यायी जमीन, रोख रक्कम इत्यादीबाबत पुनर्वसनाचा जो करार विस्थापितांशी केला गेला होता, त्याचे कागदपत्र घेऊन, सी.यू.सी. समितीचे दोन प्रतिनिधी 'इन्डे'च्या (प्राधिकरणाच्या) अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी, धरणाच्या जागी गेले, सैन्याचे अधिकारी तेथे होतेच. या दोघा प्रतिनिधींचे अपहरण करून ते गनिमी सेनेचे पाईक आहेत असा खोटा आरोप करून, त्यांच्या जवळील कागदपत्र नष्ट करण्यात आले. एक आठवड्यानंतर हालहाल करून मारण्यात आलेले त्यांचे मृतदेह लोकांना दिसले.

● १३ फेब्रुवारी १९८२ : रिओ-नेग्रोच्या शेजारी शोकोक नावाचे गाव आहे. ऑक्टोबर १९८० ते सप्टेंबर १९८१च्या दरम्यान या गावातही सैन्याने धुडगूस घातला. कापणीच्या हंगामात शेंगदाणे वेचणाऱ्या १८ शोकोकवासीयांची कत्तल करण्यात आली. याच सुमारास गनिमी क्रांतिकारकांनी शोकोकच्या बाजारपेठेला आग लावली आणि पाच लोकांना ठार मारले. रिओ-नेग्रोच्या लोकांनी गनिमांशी संगनमत करून ही आग लावली, असा आरोप सैन्याने ठेवला. त्याबरोबर शोकोकचे ग्रामस्थ बिथरले. सैन्याचे आपल्यावरील हल्ले थांबावेत याकरिता त्यांनी सैन्याशी हातमिळवणी केली आणि शेजारच्या गावकऱ्यांशी सामना सुरु केला. शोकोकमध्ये सशस्त्र पोलीस दल उभारण्यात आले. ७ फेब्रुवारी रोजी रिओ नेग्रोतील १५० लोकांना शोकोकमध्ये बोलावण्यात आले. तेथे त्यांच्यावर बाजारपेठेला आग लावण्याचा आरोप ठेवण्यात आला. ती बाजारपेठ या गावकऱ्यांनाही उपयोगी पडणारी असल्यामुळे, आग लावण्यामागील कोणताच हेतू त्यांच्यावर सिद्ध करता आला नाही. केवळ त्रास देण्याकरिता त्यांच्याजवळील राष्ट्रीय ओळखपत्रे जप्त करण्यात आली. एक आठवड्याने परत येऊन ती त्यांनी परत न्यावीत असे फर्मावण्यात आले. एक आठवड्याने म्हणजे १३ फेब्रुवारी रोजी, ७४ लोक (५५ पुरुष, १९ बायका) ओळखपत्रे परत आणण्यासाठी गेले. त्या सर्वांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले.

● १३ मार्च १९८२ : सकाळी सहा वाजता १२ सैनिक आणि शोकोकमध्ये प्रशिक्षण घेतलेले १५ पोलीस रिओ-नेग्रो या गावात घुसले. घरा-घराची झडती घेण्यात आली. एका वृद्ध विस्थापिताशिवाय घरात कोणीही पुरुष नव्हते. ते सर्व

आजूबाजूच्या डोंगरात जाऊन लपले होते. सर्व बायका, मुले व डोंगरांमधील पुरुष गनीम आहेत असा आरोप ठेवण्यात आला. घराघरातील चीजवस्तू ताब्यात घेण्यात आल्या. घरातील अन्नपदार्थ वापरून सैनिक-पोलिसांनी न्याहरी केली. प्रथम बायकांना त्यांच्याबरोबर नृत्य करण्यास भाग पाडण्यात आले, नंतर त्यांच्यातील युवतींवर बलात्कार करण्यात आले. ही हिडीस वागणूक एवढ्यापुरती मर्यादित राहिली नाही. गरोदर बायकांसकट सर्व बायका-मुलांना एका सभेसाठी जमावे लागेल असे फर्मावण्यात आले. सुमारे तीन किलोमीटर उंचीच्या टेकडीवरील पॅकोशोम नावाच्या गावी ७० बायका, १०७ मुले आणि १ वृद्ध पुरुष मिळून १७८ जणांना फरपटत जावे लागले. वृद्धाला पोत्यात बांधून कड्यापासून ढकलून देण्यात आले. काहींना झाडा-वर टांगून काठ्या-सुऱ्यांनी ठार मारण्यात आले. तर काही जणींवर बंदुकीच्या गोळ्या मारण्यात आल्या. कित्येक मुलांना दगडांवर डोकी आपटून त्यांचे प्राण घेण्यात आले. गनिमांशी काहीही संबंध नसलेल्या या १७८ विस्थापित 'दहशतवादी गनिमां'ना अशा रीतीने 'धडा' शिकविण्यात आला.

● १४ मे १९८२ : मार्च १९८० पासून सुरू झालेल्या हत्याकांडाने भयभीत झालेले रिओ नेग्रोतील विस्थापित ते गाव सोडून सुमारे आठ किलोमीटर अंतरावरील सलामा आणि चिशॉय नदीच्या संगमापाशी असलेल्या एका गावात राहावयास गेले. 'इन्डे'च्या एका ट्रकमधून सैनिक आणि पोलिसांनी याही गावी जाऊन ८४ जणांची कत्तल केली आणि १५ बायकांचे अपहरण केले. रिओ नेग्रो गावाची आठवणसुद्धा विस्थापितांच्या मनात राहू नये म्हणून त्या संपूर्ण गावाला आग लावून ते बेचिराख करण्यात आले. हे गाव पुढे धरणाच्या जलाशयात बुडाले.

● १३ सप्टेंबर १९८२ : ॲग्वा फ्रिया नावाच्या गावी ९२ विस्थापितांना एका घरात डांबण्यात आले. मशीनगन्सचा मारा करून यातील ३५ मुलांसकट सर्वांना ठार मारल्यानंतर ते घर पेटवून देण्यात आले.

माया-आची विस्थापितांपैकी निम्मी लोकसंख्या ठार मारून 'विकासाच्या आड येणारा काटा उखडून टाकण्यात आला!'

वीज प्रकल्पासाठी कर्ज देणाऱ्या दोनही बँकांना या क्रूर कृत्यांची हकीकत माहीत असूनही त्यांनी त्याकडे कानाडोळा केला. एवढेच नव्हे तर १९८२-८३ मध्ये तो वीज प्रकल्प पुरा करण्याकरिता अधिक कर्ज देण्यात आले.

एवढे दुष्कृत्य करून काय साधले? वीजनिर्मितीची क्षमता जी घोषित करण्यात आली होती त्याच्या जेमतेम ७० टक्क्यांइतकीच वीज निर्मिती होते आहे (प्रकल्प पूर्ण झाल्याला १५ वर्षे लोटली असली तरी). प्रकल्पाचा खर्च २७ कोटी डॉलर्स असेल असा अंदाज देण्यात आला होता. प्रत्यक्षात तो खर्च १ अब्ज २० कोटी डॉलर्सच्या घरात गेला आहे. धरणाजवळील टेकड्यांवरून धरणाच्या जलाशयात सतत पाणी साठते आहे. वीज निर्मितीच्या टरबाईन्स सतत बिघडत आहेत. प्रकल्पाचे

आयुर्मान २०० वर्षे असेल असा अंदाज जागतिक बँकेने वर्तविला होता. पुनर्मूल्यांकनानंतर या प्रकल्पातून फक्त सुमारे २० वर्षे वीजनिर्मिती होऊ शकेल असे आढळून आले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने पुरस्कृत केलेल्या समितीने वरील सर्व करूण कहाणीची सत्यता पडताळून पाहिली आहे.

'इन्डे'च्या अध्यक्षांनी हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या आतबट्ट्याचा व्यवहार झाला असून तो हातात घ्यावयास नको होता अशी जाहीर कबुली १९८७ साली दिली असून, जागतिक बँकेने १९९१ साली अध्यक्षांचा हा अभिप्राय योग्य असल्याचे मान्य केले आहे!

(आंदोलन, नोव्हेंबर २०००)

❑

युद्धज्वराने ग्रासलेली अमेरिका आणि इराकचे भवितव्य

आज साऱ्या जगाचे लक्ष जर कोणत्या एका घटनेकडे केंद्रित झालेले असेल तर ते म्हणजे, अमेरिका या बलाढ्य शक्तीने इराक विरुद्ध घोषित केलेल्या युद्धाकडे.

इराक : अल्प परिचय

अल् जम्हुरिया अल्-इराकिया या मूळ अरबी नावाने स्वत:ची ओळख करून देणारा इराक हा देश औपचारिक राज्यघटनेनुसार स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र आहे. महाराष्ट्राच्या दीडपटीपेक्षा थोडे कमी क्षेत्रफळ असलेल्या या देशाची लोकसंख्या मात्र सन २००० मध्ये फक्त सुमारे २ कोटी, ३१ लक्ष, १० हजार एवढी होती.

उत्तरेस तुर्कस्तान, पूर्वेस इराण, पश्चिमेस सिरिया आणि जॉर्डन आणि दक्षिणेस कुवेत आणि सौदी अरेबिया यांनी वेढलेल्या या देशाला प्राचीन कालखंडात मेसापोटेमिया असे नाव होते. भारतातील मोहेंजदारोहरप्पा संस्कृतीशी देवाण-घेवाण असलेली ती एक महासंस्कृती (सिव्हिलिझेशन) होती असे इतिहासकारांनी नमूद केले आहे. इराक (म्हणजे सुदृढ मुळे असलेला भूप्रदेश) असे त्याचे नाव इसवी सनाच्या सातव्या शतकात पडले. त्याच सुमारास इस्लाम धर्माचा प्रभाव या देशावर पडू लागला.

सध्या सुमारे ९० टक्के लोकांचा धर्म इस्लाम हा असून, शिया व सुनी या दोन पंथात लोकसंख्या विभागलेली आहे. संख्येच्या दृष्टीने शियापंथीय थोडे अधिक (२ टक्क्याने अधिक) आहेत, परंतु राजकीय वर्चस्व सुनीपंथीयांचे आहे. ख्रिस्ती, तुर्की, ज्यू हे अत्यल्प/अल्पसंख्याक या देशात असले तरी सुमारे १४ टक्के लोक हे या देशातील प्रमुख अल्पसंख्याक असून त्यांचा धर्म सुनीपंथीय इस्लाम हाच आहे. आदिवासींसदृश जीवन जगणाऱ्या या लोकसमूहाचे नाव कुर्द किंवा कुरदिश असे असून, त्यांची एकूण जीवनसरणी व भाषा अरबीपेक्षा वेगळी आहे. डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या या लोकांवर सतत अन्याय होत असतो, म्हणून जवळजवळ स्वयंनिर्णयाच्या दर्जाची स्वायत्तता, हा समाजघटक सतत मागत असतो. त्यांची रीतसर शांततापूर्ण आंदोलने, हुकुमशाही पद्धतीने राज्यकारभार चालविणारे इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसेन

व त्यांच्याविरुद्ध शब्द उच्चारण्याचे धैर्य नसलेले त्यांचे मंत्रिमंडळ, अत्यंत निर्घृणपणे, विषारी वायू, जंतू इत्यादी संहारक शस्त्रांचा उपयोग करून दडपून टाकीत असतात.

एकेकाळी बलाढ्य असलेल्या ऑटोमान साम्राज्याचा १५३४ पासून इराक हा घटक होता. पहिल्या महायुद्धाच्या कालखंडात हे साम्राज्य विघटित झाल्यावर, १९१६ मध्ये या देशावर ब्रिटिशांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. परंतु अवघ्या १८ वर्षांत म्हणजे १९३२ मध्ये ब्रिटिशांशी अविचल निष्ठा ठेवण्याच्या अटीवर राजेशाहीची राजवट असलेल्या या देशाला स्वातंत्र्य बहाल करण्यात आले.

सद्दाम हुसेन राजवट

१९५८ पासून १९७९ पर्यंत वेगवेगळे लष्करी उठाव झाल्यानंतर, रेव्होल्यूशनरी कमांड कौन्सिल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका लष्करी संघटनेचे उपाध्यक्ष, सद्दाम हुसेन हे १६ जुलै १९७९ रोजी या संघटनेचे आणि त्याचबरोबर इराक या देशाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या राजकीय पक्षाचे नाव बाथ पक्ष, म्हणजे नव्या जाणीवा रुजविणारा अथवा प्रबोधन करणारा पक्ष असे आहे. एकीकडे जबरदस्त दडपशाही आणि दुसरीकडे इराकचे आधुनिकीकरण करण्याचे धोरण सद्दाम हुसेन यांनी अंगीकारले. दडपशाहीला विरोध करणाऱ्या कम्युनिस्ट व अन्य शेकडो नागरिक व लष्करी अधिकाऱ्यांना फाशी देण्यात आले. सद्दाम हुसेन यांना ठार मारण्याचे अनेक प्रयत्न अयशस्वी झाले.

इराकचे आधुनिकीकरण

इराकच्या आधुनिकीकरणाला १९८० पासून अधिक गती प्राप्त झाली असली तरी त्याचा आरंभ अल्पकाळ टिकत राहणाऱ्या आधीच्या लष्करी राजवटींपासून झाला होता. १९५८ पासून जमीन सुधारणा व जमीन वाटपाचे धोरण आखण्यात आल्यामुळे सरंजामशाहीवर आधारलेली अर्थव्यवस्था निष्प्रभ होत गेली. एरवी शेतीप्रधान असलेल्या इराकची आधुनिक युगातील समृद्धी या देशाच्या भूगर्भात असलेल्या विपुल खनिज तेलाच्या साठ्यावर अवलंबून आहे. तेल निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून भांडवल गुंतवणूक करून कारखाने उभारण्यात आले आहेत. १९७१ मध्ये जगातील तेल साठ्यांपैकी फक्त सहा टक्के साठा इराकमध्ये होता. अमेरिकन सरकारच्या ऊर्जा खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार आज जगातील तेलाचा सर्वात अधिक साठा सौदी अरेबियाच्या खालोखाल इराकमध्ये आहे. दुसऱ्या शब्दांत या साठ्याची कल्पना द्यावयाची झाली तर असे म्हणता येईल की, इराकमध्ये ११२ अब्ज पिंपे (बॅरल) इतके तेल निश्चितपणे उपलब्ध आहे आणि २२० अब्ज पिंपे भरेल इतके तेल भूगर्भातून उत्खनन केल्यावर उपलब्ध होईल असा अंदाज आहे. खजुराची निर्यात हे तेलाच्या खालोखाल उत्पन्नाचे दुसरे महत्त्वाचे साधन आहे.

आजच्या इराकमध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण ५८ टक्के आहे. १९६४ मध्ये बँका व विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. इस्लाम धर्मानुसार व्यक्तीने व्याजयुक्त कर्ज देणे अथवा घेणे वर्ज्य मानले जाते. म्हणून ज्या बँकांना व्याजविरहित कर्ज व्यक्तींना द्यावयाचे असेल त्यांना तशी मुभा देण्यात आली आहे.

इराकच्या आधुनिकीकरणामुळे तेथील लोकांचे जीवनमान काहीसे सुधारले. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व शिक्षण विनाशुल्क दिले जाते. आरोग्य सेवासुद्धा विनामूल्य उपलब्ध आहे. बरेच कायदे व न्यायव्यवस्था आधुनिक पाश्चात्य पद्धतीची आहे. पारंपरिक शरियत कायद्याला अद्याप असलेले स्थान गौण आहे. इराकने अफगाणिस्तानमधील तालिबान राजवटीला पाठिंबा दिला नव्हता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. या बदललेल्या परिस्थितीमुळे शिया-सुनी हा पंथभेद असला तरी दोनही पंथांतील लोक सद्दाम हुसेन यांची जुलमी राजवट पसंत नसली तरी राष्ट्रीय झेंड्याखाली एकजुटीने उभे राहतात. स्वत: कट्टर धर्मनिष्ठ नसले तरी लोकांच्या धर्मभावनेचा अनुनय करण्याकरिता सद्दाम हुसेन यांनी राष्ट्रध्वजावर 'अल्ला हो अकबर' (परमेश्वर श्रेष्ठ आहे) हे घोषवाक्य नोंदविले आहे. शियापंथीय नेत्यांना राज्यसत्तेत फारच अपुरा वाटा असल्यामुळे ते आपल्या पंथानुयायांना सद्दाम हुसेन यांच्याविरुद्ध भडकवीत असतात. 'द सुप्रीम कौन्सिल फॉर द इस्लामिक रेव्होल्यूशन' असे शिया-पंथीय संघटनेचे नाव असून, या संघटनेला एकीकडे अमेरिका तर दुसरीकडे शियापंथीय इराण आर्थिक व अन्य पाठबळ देत असतात.

सद्दाम हुसेन यांची वाढती महत्त्वाकांक्षा

सद्दाम हुसेन हे अंशत: कर्तबगार नेते आहेत. परंतु बहुतांशी ते एक महत्त्वाकांक्षी लष्करशहा आहेत. आपली कर्तबगारी अधिकाधिक लोकाभिमुख धोरणे आखण्याचे दिशेने वळविण्याचे ऐवजी, आपल्या देशाची जरब सर्वत्र निर्माण करण्याची स्वप्ने ते बाळगू लागले. सत्ता हस्तगत करून आपली राजवट स्थिरावल्याबरोबर एका वर्षाच्या आत, इराणमध्ये स्थापन झालेल्या सनातनी शियापंथीय खोमेनी राजवटीने आपला प्रदेश बळकावला आहे, अशी निराधार सबब जाहीर करून, १९८० मध्ये इराकने इराणवर हल्ला चढविला. इराणचा पूर्वीचा पंतप्रधान मोसादेक याने १९५३ मध्ये ब्रिटिश व अमेरिकन तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले होते आणि इराणच्या अमेरिकन धार्जिण्या राजाला पदच्युत करून, १९७९ मध्ये स्थापन झालेली खोमेनी राजवटसुद्धा अमेरिकेशी फटकून वागत असल्यामुळे अमेरिकेचा इराणवर रोष होताच. इराणला युद्धात हतबल करण्यासाठी अमेरिकेने इराकला रासायनिक व जैविक अतिसंहारक शस्त्रांसकट अनेक शस्त्रास्त्रांचा साठा विकला. खोमेनी राजवटीने आपली कट्टर धार्मिक सत्ता दृढ करण्यासाठी आपल्या मुख्यत: कम्युनिस्ट व इतर सर्व विरोधकांना ठार मारण्याचे सत्र सुरू केले. तत्कालीन सोविएत युनियनचा प्रभाव आपल्या देशवासीयांवर

पडू नये म्हणून इराण अमेरिकेप्रमाणेच सोविएत युनियनने सुद्धा इराकला शस्त्रास्त्रे काही एका प्रमाणात विकली. केवळ व्यापारी नफा मिळविण्याकरिता अमेरिकेने (विशेषत: त्या देशातील खासगी कंपन्यांनी) व सोविएत युनियनने इराणला सुद्धा काही एका प्रमाणात शस्त्रे विकली! आठ वर्षेपर्यंत चाललेल्या घनघोर युद्धात कोणाचाच जय झाला नाही. परंतु जागतिक राष्ट्र संघटनेच्या मध्यस्थीने इराकला युद्ध थांबविणे भाग पडले.

इराकचा कुवेतवर हल्ला

भरपूर मनुष्यहानी झालेली असूनसुद्धा इराणविरुद्धच्या निर्णयशून्य युद्धानंतर सद्दाम हुसेन यांची महत्त्वाकांक्षा संपुष्टात आली नाही. या युद्धानंतर लगेच दोन वर्षांनी म्हणजे १९९० मध्ये इराकने आपल्या दक्षिणेकडील कुवेतवर हल्ला चढविला. तेलाचे उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांच्या संघटनेने (ओपेक) तेलाची किंमत जागतिक बाजारपेठेत घसरू नये व त्यातून आपला नफा घटू नये याकरिता तेलाचे उत्पादन ज्या-त्या देशाने, ठरवून दिलेल्या हिश्श्यानुसार मर्यादित ठेवावे असा निर्णय घेतला होता. कुवेत, आपली निर्यात वाढविण्याकरिता ठरविण्यात आलेल्या वाट्यापेक्षा अधिक उत्पादन करीत आहे, अशी सबब हल्ला चढविण्याकरिता इराकने पुढे केली. कुवेत हा एकेकाळी इराकचा अविभाज्य भाग होता आणि आपल्या देशातील काही तेल कुवेत स्वत:च्या पाईपलाईनकडे वळवीत आहे, अशाही दोन सबबी हल्ला चढविण्याकरीता पुढे करण्यात आल्या.

अमेरिकेची असमर्थनीय घुसखोरी

इराक-कुवेतमधील वाद मिटविण्याकरीता संयुक्त राष्ट्र संघाची मध्यस्थी हाच योग्य मार्ग होता. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक व लष्करीदृष्ट्या वरचढ झालेल्या अमेरिकेचे वर्चस्व दुर्दैवाने या संघटनेवर प्रस्थापित झाले होते. समाजसत्तावादाचा पुरस्कार करणारे सोविएत युनियन हे राष्ट्र विविध कारणांमुळे १९९० सालपर्यंत विघटित व कमकुवत झाले होते. त्यामुळे अमेरिका हे राष्ट्र अधिक शिरजोर बनले. अमेरिकन तेल व अन्य कंपन्यांची प्रचंड प्रमाणावरील आर्थिक गुंतवणूक कुवेतमध्ये झालेली आहे. इराक प्रभावी झाल्यास युरोप व अमेरिकेतील तेल कंपन्यांचे मध्य-पूर्व आशियामधील तेल-समृद्ध देशांवरील नियंत्रण संपुष्टात येईल आणि त्यांना तेलाचे चढत जाणारे भाव स्वीकारणे भाग पडेल अशी धास्ती दाखवून, अमेरिकेने या देशांचा इराकविरुद्ध युद्ध करण्यासाठी पाठिंबा मिळविला. ४३ दिवसपर्यंत सुमारे ८८ हजार ५०० टनस् इतक्या बॉम्बचा भडिमार करून, इराकचा पराभव करण्यात अमेरिकेने यश संपादन केले. निष्प्रभ बनलेला सोविएत युनियन युद्ध करण्याविरुद्ध खलिते धाडण्यापलीकडे काही करू शकला नाही.

इराकची सर्वतोपरी नाकेबंदी

इराकचा केवळ युद्धात पराभव करून अमेरिका स्वस्थ बसली नाही. इराकला पूर्णतया नेस्तनाबूत करण्याकरीता युरोप व अन्य अनेक देशांच्या पाठिंब्याने इराकविरुद्ध संपूर्ण बहिष्काराचे शस्त्र उपसण्यात आले. इराकच्या बहुतेक सर्व आयात-निर्यातीवर बंदी घालण्यात आली. औषधे व अन्नधान्य यांचाही पुरवठा इराकला होत नाही. गेली दहा वर्षे हा बहिष्कार चालू आहे. युनिसेफ या जागतिक राष्ट्र संघटनेच्या शाखेच्या १९९५ च्या अहवालानुसार या कालावधीत कुपोषण व औषधांचा तुटवडा यामुळे इराकमधील सुमारे ५ लाख ६७ हजार बालके मरण पावली आहेत. बालकांसकट एकूण मृत्यूंची संख्या सुमारे १५ लाखापर्यंत जाऊन पोहोचली आहे. २००२ सालच्या अखेरीस तर जलद गतीने चालणाऱ्या बोटींची आयात करण्यास किंवा हवामानाची समीक्षा करण्यास (युद्धात वापरण्यासाठी नव्हे) लागणाऱ्या रडारची आयात करण्याससुद्धा बंदी घालण्यात आली आहे.

इराकजवळ असलेल्या सर्व धोकादायक शस्त्रास्त्रांची तपासणी करून ती त्या देशाला नष्ट करावयास लावण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने गेली दहा वर्षे अनेक तपासणी पथके (इन्स्पेक्शन टीमस्) येथे जाऊन आली आहेत. ३८४५ तपासनीसांच्या २७६ संघांनी (टीम्स्‌नी) इराकमधील ३,९१२ ठिकाणी जाऊन सर्व प्रकारच्या संहारक शस्त्रास्त्रांचा शोध घेतला. या तपासनीसांपैकी काहीजण अमेरिका व इस्रायलच्या वतीने हेरगिरी करीत असल्याचा आरोप इराकने केला व त्यांना तपसाणी करू दिली नाही. यात वास्तविक आक्षेपार्ह काहीही नव्हते. इराकमधील शस्त्रनिर्मितीत व अन्य वैज्ञानिक संशोधनात व्यग्र असणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेण्या-देण्यासही इराकने प्रथम घेतलेली हरकत मागे घेतली. हे शास्त्रज्ञ राजकीय दबावाखाली असल्यामुळे ते मोकळेपणाने बोलत नसतील, त्यामुळे त्यांच्या मुलाखती इराकबाहेरील देशात जाऊन घेण्याची परवानगी तपासनीसांनी मागितली. हा त्या शास्त्रज्ञांचा अपमान आहे असे कारण सांगून इराकने ती परवानगी नाकारली. तपासनीसांच्या अहवालानुसार अमेरिकेला भीती वाटावी अशी कोणतीही संहारक शस्त्रास्त्रे इराकजवळ नाहीत व जी काही थोडी बहुत होती ती त्या देशाने नष्ट केली असल्याचे निष्पन्न झाले. वास्तविक या अहवालानंतर इराकवरील बहिष्कार उठवावयास हवा होता.

अमेरिकेचे आज जगभर निदान १७ युद्धतळ आहेत. अमेरिकेने क्षेपणास्त्रविरोधी करार (अॅण्टी बॅलिस्टिक मिसाईल ट्रीटी) रद्द करून घेण्यात यश मिळविले आहे. दुर्दैवाने चीन व आजच्या रशियाने अमेरिकेला हा करार रद्द करून घेण्यापासून रोखले नाही. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीचे खटले चालविण्याकरीता कोर्ट अस्तित्वात आहे. परंतु केवळ दांडगाईच्या जोरावर अमेरिकेने या कोर्टाला मान्यता देण्यास नकार दिला आहे.

इराकविरुद्ध पुन्हा कुरापत कशासाठी?

११ सप्टेंबर २००१ रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेन्टॅगॉन या इमारती पाडण्याचे अत्यंत बेजबाबदार, खेदजनक व निषेधार्ह असे अचाट धाडस इस्लामधर्मीय दहशतवाद्यांनी दाखविले. त्यावेळी दिवसानुदिवस शिरजोर व बेमुर्वतखोर बनलेल्या अमेरिकन सरकारला जबरदस्त धक्का बसला. अमेरिकेनेच सोविएत युनियनविरुद्ध कारवाया करण्यासाठी परिपुष्ट केलेला, ११ सप्टेंबर रोजी इमारती पाडणाऱ्या दहशतवाद्यांचा म्होरक्या, ओसामा बिन लादेन, अफगाणिस्तान विरुद्ध युद्ध करूनही आणि पाकिस्तानवर दबाव आणूनही अद्याप सापडलेला नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष, जॉर्ज बुश यांना आपली नामुष्की झाकण्यासाठी व अमेरिकेतील जनतेचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी काहीतरी उपाय करणे भाग होते. म्हणून इराक हा बिन लादेनच्या अल्-कायदा या संघटनेला पाठिंबा देतो आहे त्यामुळे बिन लादेनला शोधणे कठीण जाते आहे असे निमित्त करून सप्टेंबर २००२ पासून त्यांनी इराकविरुद्ध पुन्हा मोहीम उघडली आहे.

इराकने अद्याप आपली धोकादायक शस्त्रास्त्रे नष्ट केलेली नाहीत, म्हणून पुन्हा तपासणी करावी व इराकला अंतिम इशारा द्यावा असा ठराव सुरक्षा समितीत नोव्हेंबर २००२ मध्ये सर्व मताने मंजूर करण्यात अमेरिकेला यश आले. गेले दोन महिने तपासनीस पुन्हा इराकमध्ये जाऊन आले व २७ जानेवारी २००३ रोजी त्यांनी दिलेल्या अहवालात इराकजवळ अण्वस्त्रे नाहीत, अन्य धोकादायक शस्त्रास्त्रे ते नष्ट करीत आहेत, म्हणून युद्ध न करता पुरेशी मदत द्यावी अशी नोंद केली आहे.

अमेरिकेला ओसरत चाललेला पाठिंबा

अमेरिकेला युद्ध करण्यास निमित्त सापडत नसल्यामुळे तेथील राज्यकर्ते अस्वस्थ झाले आहेत. अमेरिकेला आतापर्यंत मिळत गेलेला पाठिंबा ओसरत जाण्याला वेगवेगळी कारणे आहेत. मलेशिया, चीन, व्हिएतनाम, इंडोनेशिया, मॉरिशस व भारत यासारख्या देशांचे इराकमधील तेल उत्खननासाठी व तेलातील वाट्यासाठी इराकशी करार झालेले आहेत. युद्ध झाल्यास हे सर्व करार रद्दबातल ठरतील आणि अमेरिकेचे इराक व त्यापाठोपाठ अन्य तेलसाठा असलेल्या देशांवर वर्चस्व प्रस्थापित होईल म्हणून या देशांचा विरोध आहे.

युरोपियन राष्ट्रांमधील तेल कंपन्यांना युद्धानंतर अमेरिकेच्या ताब्यात मध्य-आशियातील तेल गेले तर आपले नफे फार मोठ्या प्रमाणावर घसरतील म्हणून या कंपन्यांचा प्रभाव असलेली सरकारे अमेरिकेला अधिक बलिष्ठ करण्यास अनुकूल नाहीत. युद्धाला त्यांचा व चीन, रशियासारख्या राष्ट्रांचा विरोध आहे तो मुख्यत: या कारणासाठी. फ्रान्स, जर्मनीसारख्या देशात इस्लामधर्मीय अल्पसंख्याकांचे प्रमाण दुर्लक्ष करण्याइतके थोडे नाही. तुलनेने कमी वेतनात हे अल्पसंख्य लोक कनिष्ठ

दर्जाची मानली गेलेली कामे करण्यास तयार असतात. इराकसारख्या इस्लामधर्मीय देशाविरुद्ध जरूर नसताना आक्रमक भूमिका घेण्यात स्वारस्य नसण्याचे हे एक दुय्यम महत्त्वाचे कारण आहे.

अमेरिकेने युद्ध करण्यासाठी इतर कारणे पुढे केली आहेत ती वरील संभाव्य विरोध लक्षात घेऊनच केली आहेत. इराक, इराण, उत्तर कोरिया यासारखी राष्ट्रे, ही बदमाष (रोग स्टेटस्) राष्ट्रे आहेत. आणि जगात लोकशाही, स्वातंत्र्य ही सर्वश्रेष्ठ मूल्ये जतन करण्यासाठी वरील देशांवर त्यांचे सामर्थ्य वाढण्याच्या आतच हल्ला केला पाहिजे, संयुक्त राष्ट्र संघाने कोणताही निर्णय घेण्याची वाट पाहण्याचे कारण नाही अशीही भूमिका अमेरिकेने मांडली आहे. इराकविरुद्ध युद्ध करता आले नाही तर निदान सद्दाम हुसेन यांना पदच्युत करावे असाही प्रस्ताव पुढे मांडण्यात येतो आहे. कुवेत, इराणनंतर इराक सौदी अरेबियावर हल्ला करण्याची शक्यता आहे अशी धास्ती सौदी अरेबियाच्या राजघराण्याला दाखवून सौदी अरेबियाचा पाठिंबा अमेरिकेने मिळवला आहे. टर्कीला प्रचंड प्रमाणात कर्ज व अनुदान देण्याचा झालेला करार टर्कीने जर अमेरिकेला पाठिंबा दिला नाही तर रद्द करावा लागेल अशी धमकी देऊन टर्कीचा पाठिंबा मिळवला आहे.

जगातील हरएक देशातील जनता युद्धामुळे ओढवणाऱ्या संकटांची जाणीव ठेवून त्याविरुद्ध लढण्यासाठी युद्ध सुरू होण्यापूर्वीच रस्त्यावर उतरली आहे. खुद्द अमेरिकेत न्यूयॉर्क वॉशिंग्टनसकट शेकडो शहरात युद्धविरोधी प्रचंड संख्येची निदर्शने होत आहेत. अमेरिकेच्या माजी सैनिकांनी 'यांत्रिकपणे आज्ञा पाळण्याचे ऐवजी सद्‌सद्‌विवेक बुद्धीला स्मरून आज्ञा पाळा' असे आवाहन आपल्या सध्या नोकरीत असलेल्या सैनिक बांधवांना केले आहे. इंग्लंडमध्ये सत्ताधारी मजूर पक्षाच्या १२५ खासदारांनी युद्धाला जाहीरपणे विरोध केला आहे. लंडनमधील प्रचंड निदर्शनांमुळे वरवर धिटाईने अमेरिकेला पाठिंबा देणारे पंतप्रधान टोनी ब्लेअर आतून हबकले आहेत.

सद्दाम हुसेन यांची राजवट जुलमी असली तरी ती पाडण्याचा अधिकार अमेरिकेला पोचत नाही हे भारतीय नागरिकांनी रोखठोकपणे बजावलेच पाहिजे. कुवेतमध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क अद्याप नाही. लोकशाहीच्या बाजूने उभे राहण्याचा टेंभा मिरविणारी अमेरिका कुवेतला पाठिंबा का देते? एका अमेरिकन खासदाराने स्पष्ट शब्दांत कारण सांगितले होते, ''तेथे गाजरे उगवतात म्हणून नव्हे तर तेल उत्पन्न होते म्हणून!''

(मिळून साऱ्याजणी, एप्रिल २००३)

❑

हिरोशिमा-नागासाकीचा विध्वंस
काही निवडक तपशील

साठ वर्षांपूर्वीची घटना

दुसऱ्या महायुद्धात ६१ देश आणि जगातील तत्कालीन लोकसंख्येपैकी सुमारे ८० टक्के लोक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सामील झाले होते. या युद्धाचा शेवट फॅसिस्ट शक्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युद्धपिपासू, निर्दय, अमानुष शक्तींचा पराभव होण्यात झाला, याचे सहर्ष स्वागत सर्वत्र करण्यात आले; परंतु बरोबर ६० वर्षांपूर्वी या यशाला काळिमा फासणारी, मानवातील माणुसकीचा ऱ्हास दर्शविणारी एक हृदयद्रावक घटना घडली.

६ ऑगस्ट १९४५ रोजी जपानी वेळेनुसार सकाळी ८.१५ वाजता आणि ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०२ मिनिटांनी अनुक्रमे हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर, अमेरिकन विमानांनी अणुबॉम्ब टाकून ती शहरे बेचिराख करून टाकली. ही घटना जरी आता साऱ्या जगाला माहीत असली तरी ६० वर्षांनंतर त्यातील काही तपशील अनेकांच्या स्मरणातून लुप्त झाले असतील. म्हणून फारच थोड्या निवडक तपशीलांची संक्षिप्त नोंद या टिपणात करण्यात येत आहे.

अणुबॉम्बनी केलेला विध्वंस : हिरोशिमा

दोनही शहरांत झालेल्या मनुष्यहानी व अन्य विध्वंसाचे जे अंदाज बांधण्यात आले त्यात तफावत आढळते. जपानने स्वीकारलेली आकडेवारी या टिपणात ग्राह्य धरली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या कृश, सडपातळ शरीरयष्टीला अनुसरून हिरोशिमावर टाकण्यात आलेल्या बॉम्बला 'लिटल बॉय' असे टोपण नाव देण्यात आले होते. युरेनियम २३५ चा समावेश असलेल्या या अणुबॉम्बची लांबी तीन मीटर होती तर वजन ३,६०० किलोग्रॅम इतके होते. बॉम्ब जमिनीपासून ५८० मीटर उंचीवरून टाकण्यात आला. त्याच्या स्फोटातून बाहेर पडलेली उष्णता दशलक्ष अंश सेंटिग्रेडच्या कितीतरी पटीने अधिक होती. सुमारे १३ चौरस किलोमीटर इतके क्षेत्र

जळून भस्मसात झाले. शहरात त्या वेळेस असलेल्या लाकडी व काँक्रीट मिळून सुमारे ७६,००० इमारतींपैकी, ६२ टक्के पूर्णपणे नष्ट झाल्या. या बॉम्ब हल्ल्यातून ज्या इमारती पूर्णपणे वाचल्या अशांची संख्या ८ टक्के होती. बॉम्ब टाकला गेला त्या सुमारास हिरोशिमाची लोकसंख्या सुमारे साडेतीन लाख इतकी होती. बॉम्ब पडल्याबरोबर आणि तेव्हापासून सुमारे वर्षभरात मरण पावलेल्या सामान्य नागरिकांची संख्या १ लाख, १८ हजार, ६६१ इतकी होती तर लष्करातील मरण पावलेल्यांची संख्या २० हजारांच्या आसपास होती. किरणोत्सर्ग व जखमा यांनी त्या सुमारास मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या सुमारे २ हजार होती. साठ वर्षे लोटली असली तरी किरणोत्सर्ग व अन्य दुर्धर रोगातून मरण पावत असलेल्या, १९४५ नंतरच्या पुढील पिढ्यांतील लोकांची संख्या अद्याप संपुष्टात आलेली नाही. हिरोशिमात नेमके काय घडले आहे, ते जपानला म्हणजे त्या देशाची राजधानी असलेल्या टोक्योला, अणुबॉम्ब पडल्यानंतर १६ तासांनी, वॉशिंग्टन येथील अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयातून (व्हाईट हाऊसमधून), बॉम्बफेकीचे निवेदन प्रसिद्ध करण्यात आले तेव्हा समजले!

नागासाकी

इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्या धिप्पाड शरीर बांध्याला अनुसरून, नागासाकीवर टाकण्यात आलेल्या अणुबॉम्बला 'फॅट मॅन' असे टोपणनाव दिले गेले होते. हिरोशिमावर टाकण्यात आलेल्या 'लिटल बॉय'पेक्षा प्लुटोनियम २३९ युक्त 'फॅट मॅन'ची शक्ती अधिक जबरदस्त होती. केवळ नागासाकीच्या डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांनी युक्त अशा विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे, हिरोशिमापेक्षा येथील हानी थोडी कमी झाली. वास्तविक पाहता हिरोशिमात घडलेले भीषण परिणाम पाहून, जपान ताबडतोब शरणागती पत्करणाच होता. मग तीन दिवसांनी लगेच दुसरा अणुबॉम्ब टाकण्याची काय गरज होती? विश्वसनीय वाटणार नाही, असे एक सत्य त्यामागे दडलेले होते, हे आता उघडकीला आलेले आहे. हिरोशिमावरील बॉम्ब युरेनियम २३५ युक्त होता. प्लुटोनियम २३९ युक्त बॉम्ब किती बलशाली असू शकतो, याचा प्रयोगसिद्ध पुरावा हाती यावा याकरिता, क्रौर्याची परिसीमा जपानमध्ये गाठण्यात आली. रुझवेल्ट यांच्यानंतर अध्यक्ष झालेल्या हॅरी ट्रुमन यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधाऱ्यांनी त्यात धन्यता मानली!

पाचशे मीटर उंचीवरून टाकण्यात आलेल्या 'फॅट मॅनची' लांबी साडेतीन मीटरपेक्षा थोडी कमी होती. ४,०५० किलोग्रॅम वजन असलेला हा बॉम्ब जमिनीपासून ५०० मीटर उंचीवरून टाकण्यात आला. हिरोशिमापेक्षा सुमारे निम्मे म्हणजे ६.७ चौरस किलोमीटर क्षेत्र जळून खाक झाले. शहरातील सुमारे ५१ हजार इमारतींपैकी २२.७ टक्के इमारती पूर्णपणे जमीनदोस्त झाल्या. ३६.१ टक्के इमारती पूर्णपणे वाचल्या. नागासाकीची त्या वेळची लोकसंख्या सुमारे २ लाख ७० हजार इतकी होती. वर्षभरात

७३ हजार ८८४ मृत्युमुखी पडलेले होते आणि ७४ हजार ९०९ जायबंदी झालेले होते. बॉम्बहल्ल्याचा परिणाम म्हणून अद्याप मरण पावत असलेल्यांच्या संख्येपुढे पूर्णविराम केव्हा पडेल, याची वाट जपानी लोक शोकाकुल मनाने पाहत आहेत.

६ ऑगस्ट २००४ रोजी हिरोशिमात व्यक्त करण्यात आलेल्या अंदाजानुसार त्या वर्षांपर्यंत दोनही शहरांत मिळून अणुबॉम्बच्या परिणामातून मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या दोन लाख, सदतीस हजार बासष्ट होती. किरणोत्सर्गाने बाधा झाल्यामुळे अनेक दुर्धर व्याधींना तोंड देत असलेल्या लोकांची संख्या त्याच वर्षापर्यंत दोन लाख सत्तर हजार होती. किरणोत्सर्ग बाधित लोकांना 'हिबाकुशा' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे.

युद्धातील नैतिकता

एकदा युद्ध सुरू झाले की प्रतिपक्षाचा पराभव करण्याकरिता सर्वात प्रभावी वाटेल तो मार्ग वापरावा, युद्धात प्रत्यक्ष सामील नसलेल्या सामान्य नागरिकांची हत्या करावी की नाही अशा आशयाची चर्चा व्यर्थ आहे, अशी एक भूमिका काही जणांकडून मांडली जाते. कोणतीही समस्या सोडविण्याकरिता किंवा आपले सर्वंकष वर्चस्व प्रस्थापित करून दुसऱ्याला अंकित करण्याकरिता, युद्ध करणे हेच प्रगल्भ मानवाच्या नैतिक आचरणाशी विसंगत आहे, म्हणून आटोकाट प्रयत्न करून युद्ध टाळावे, हा आदर्शही मानवासमोर ठेवला जातो. कोणत्याही एका संकुचित स्वार्थ जोपासणाऱ्या अविचारी व निर्घृण शक्तीने युद्ध अथवा संघर्ष लादलेच तरी त्याचा शस्त्राने पराभव करण्याचा प्रयत्न न करता, आपल्याला पटलेली न्याय्य बाजू सातत्याने मांडावी आणि आत्मक्लेशाने प्रतिस्पर्ध्याचे (तो शत्रू असला तरी) मन जिंकावे, यातच मानवाचे उज्ज्वल भवितव्य सामावलेले आहे, असे भावनिक आवाहन येशू ख्रिस्त आणि महात्मा गांधी यांनी जगाला केले होते. हृदयशून्य शत्रूचे मन आत्मक्लेशाने जिंकता येणार नाही, मानवी जीवनाला पोषक अशी आदर्श मूल्ये पायदळी तुडविणाऱ्यांचाच त्यात विजय होईल आणि नैतिक जीवनाचे आदर्श मांडणारे कोणी शिल्लकच राहणार नाही, असा प्रतिवाद अमूर्त पातळीवरील उदात्त आवाहन करणाऱ्यांशी, त्यांच्याबद्दल आदर बाळगूनही केला जातो. अन्याय, अनीती लादणाऱ्यांचे, शस्त्रसंन्यास घेऊन नव्हे तर परिणामकारकपणे पारिपत्य करणे हेच व्यवहार्य, अपरिहार्य आणि नैतिकतेला धरून आहे, असा निष्कर्ष वरील प्रतिवाद करणारे, त्यांना पटलेले सुसाध्य मानवी हित डोळ्यासमोर ठेवून मांडीत असतात. आज तरी या चौथ्या वैचारिक मांडणीला जगात सर्वसाधारणपणे मान्यता आहे, असे दिसते.

चौथी भूमिका ग्राह्य धरली तरी, अन्यायी प्रतिपक्षाचा पराभव करतानासुद्धा कोणतेच नीती-नियम पाळू नयेत, असे मानता येईल का? प्राचीन काळी, सूर्यास्तानंतर पुढील सूर्योदयापर्यंत युद्ध थांबवावे किंवा मागून वार करू नयेत, अशा स्वरूपाचे संकेत

पाळले जात असत. आधुनिक काळात, विषारी वायू अथवा जंतूंचा फैलाव करून, शत्रूचे सैन्य अथवा सामान्य नागरिक मारू नयेत, एवढेच नव्हे तर युद्धकैद्यांना कशी वागणूक द्यावी यावर आंतरराष्ट्रीय पातळीवर करारनामे झाले आहेत. युद्ध टाळण्याची सर्वात आदर्श भूमिका सध्या जरी घेता आली नाही तरी मानवाचा नैतिक ऱ्हास कोठेतरी आटोक्यात राहावा, सर्वनाश रोखावा, ही या आंतरराष्ट्रीय पातळीवरील ठराव व करारनामे यांमागील भूमिका होती व आहे.

जपानमधील अणुबॉम्बवृष्टी ही आधुनिक कालखंडात, जगात तत्त्वत: मान्यता पावलेल्या नीतीनियमांचा भंग करणारी घटना आहे, हे युद्धकाळात गोपनीय ठरविण्यात आलेल्या दस्तऐवजांच्या प्रकटीकरणानंतर आता सिद्ध झाले आहे.

अनैतिकतेची पार्श्वभूमी

१६ जुलै १९४५, म्हणजे हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकण्यात आला, त्याच्या तीन आठवडे आधी, न्यू मेक्सिकोमधील, अलामोगॉर्डोच्या वाळवंटात अणुबॉम्बची चाचणी घेण्यात आली होती. त्याचे भयानक अक्राळ-विक्राळ स्वरूप त्याच वेळेस शास्त्रज्ञांच्या आणि अमेरिकन सत्ताधाऱ्यांच्या लक्षात आले होते. या चाचणी प्रकल्पाचा प्रमुख शास्त्रज्ञ-संचालक रॉबर्ट ओपनहायमर याला बॉम्बचा स्फोट बघताना भगवद्‌गीतेतील अकराव्या अध्यायातील दोन श्लोकांची आठवण झाली होती. त्या श्लोकांचा मराठी अनुवाद खालीलप्रमाणे :

श्लोक १२ : श्रीकृष्णाने स्वत:च्या रूपाचे (परमेश्वराचे केलेले वर्णन) : ''आकाशात सहस्त्र सूर्यांची प्रभा जर एकाच वेळी प्रकट होईल तर ती प्रभा त्या महात्म्याच्या प्रभेच्या सारखी होईल.''

श्लोक ३२ : आपण कोण आहोत याची श्रीकृष्णाने दिलेली ग्वाही : ''मी लोकांचा क्षय करणारा असा, अतिशय मोठे रूप धारण करणारा काळ (मृत्यू) आहे. येथे मी लोकांचा संहार करण्यासाठी प्रवृत्त झालो आहे.''

७ मे १९४५ रोजी जर्मनीने शरणागती स्वीकारली होती. फेब्रुवारी ४ ते ११ या आठवड्यात याल्टा येथे झालेल्या शिखर परिषदेत, स्तालिनने युद्धपूर्व जपानशी असलेल्या अनाक्रमणाचा करार फॅसिस्ट जपानचा पराभव करण्याकरिता रद्दबातल ठरवून जपान विरुद्धच्या युद्धात सहभागी होण्यास मान्यता दिली होती. जपानचा पराभव अटळ होता हे उघड दिसत असताना, इतका प्रलयंकारी बॉम्ब टाकणे, हे कोणत्या नैतिक तत्त्वात बसत होते?

जर्मनीचा पराभव झाल्यानंतर आणि अणुबॉम्बची चाचणी झाल्यानंतर २४ जुलै १९४५ रोजी जर्मनीतील पॉट्सडॅम येथे शिखर परिषद झाली होती. १२ एप्रिल १९४५ रोजी रुझवेल्ट यांचा मृत्यू झालेला असल्यामुळे, या शिखर परिषदेला अमेरिकेचे नवे अध्यक्ष हॅरी ट्रुमन उपस्थित होते. अणुबॉम्बची कल्पना देण्याच्याऐवजी 'विध्वंसनाची

अपार शक्ती असलेले एक नवे शस्त्र अमेरिकेपाशी आहे', एवढीच माहिती पुरवून, ट्रुमनने स्तालिनला या संहारक बॉम्बची माहिती देण्याचे मुद्दामच टाळले. सोविएत युनियनचे सैन्य जपानपर्यंत पोहोचण्याच्या आत अमेरिकेला जपानमध्ये वर्चस्व प्रस्थापित करता यावे, हा कुटिल उद्देश युद्धातील मित्रराष्ट्राशीसुद्धा बॉम्बविषयी गुप्तता राखण्यात होता.

१६ जून १९४५ रोजी अमेरिकेतील शिकागो विद्यापीठातील ७ शास्त्रज्ञांनी एक अहवाल तयार केला होता. त्याला 'फ्रँक रिपोर्ट' असे म्हणतात. तोपर्यंत संयुक्त राष्ट्र संघ अस्तित्वात आलेला होता. या संघाच्या सर्व सभासद-प्रतिनिधींना अणुबॉम्बच्या चाचणीचा प्रयोग प्रत्यक्ष दाखवावा, अशी शिफारस या अहवालात केलेली आहे. या अहवालाकडे व त्यातील शिफारशींकडे दुर्लक्ष करण्यात आले.

जपानच्या शरणागतीचा अवधी नजीक आला असताना, कोणताही इशारा न देता असा बॉम्ब टाकणे हे, 'अमेरिका हे एक थोर मानवतावादी राष्ट्र आहे', या अमेरिकेच्या दाव्याशी विसंगत आहे, असे अमेरिकन नौदलाचे उपसचिव (अंडरसेक्रेटरी) रॅल्फ बार्ड यांनी २७ जून १९४५ रोजी लेखी कळविले होते.

अणुसंशोधनातील एक श्रेष्ठ शास्त्रज्ञ झिलार्ड यांनी अमेरिकेच्या अध्यक्षांना ३ जुलै १९४५ रोजी पत्र लिहून 'अणुबॉम्ब हे अतिशय निर्दयपणे शहरांचा नायनाट करण्याचे साधन आहे. युद्धाच्या चालू टप्प्यात अशा बॉम्बचा उपयोग करण्यात येणार नाही, असे अमेरिकेने जाहीर करावे.' असे कळविले होते. लगेच दुसऱ्या दिवशी आपल्या शास्त्रज्ञ सहकाऱ्यांना पत्र लिहून शास्त्रज्ञांनी हा बॉम्ब वापरण्याबाबत आपली नैतिक भूमिका जाहीर करावी, असे कळविले होते. या पत्राचा अतिशय चांगला परिणाम झाला. प्रथम १८ व नंतर ६७ शास्त्रज्ञांनी बॉम्ब-विरोधी भूमिका घेतली. त्यातील काहींनी निदान या बॉम्बचे परिणाम नीट समजावून सांगावेत, त्याच्या परिणामांचे प्रत्यक्ष दर्शन (शत्रूलाही) घडवून आणावे, त्यापूर्वी हा बॉम्ब वापरू नये, असे आपले मत नोंदविले होते.

अणुबॉम्बची चाचणी १६ जुलै रोजी घेण्यात आली होती. त्या जागेपासून ३२ किलोमीटर अंतरावर बॉम्बपासून निर्माण झालेली उष्णता जाणवली होती, अनाच्छादित त्वचेवरील त्याचे परिणामही दिसले होते, असे त्या चाचणी प्रकल्पात सहभागी असणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांनी नोंदवून ठेवले आहे.

२५ जुलै १९४५ रोजी अध्यक्ष ट्रुमन यांनी आपल्या रोजनिशीसारख्या नोंदवहीत अणुबॉम्ब फक्त लष्करी केंद्रावर व सैन्यात, नौदलात समाविष्ट असणाऱ्यांवरच टाकावा, महिला व मुलांना लक्ष्य बनवू नये, असे नोंदविले आहे; परंतु त्याच दिवशी बॉम्ब टाकण्यासंबंधीच्या आज्ञापत्रावर जी सही केली आहे, त्यात त्यांनी सामान्य नागरिकांना लक्ष्य बनवू नये, असे कोठेही नोंदविलेले नाही! दोनही शहरे संपूर्णतया बेचिराख केली जावीत, असाच त्याचा अर्थ विमानातून बॉम्ब टाकणाऱ्या शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि लष्करी

सहकाऱ्यांनी लावला!

अणुबॉम्ब टाकण्याची गरज नसण्याला पोषक असे पुरावे वरील पुराव्यांपेक्षा अजून पुष्कळ उपलब्ध आहेत. या संक्षिप्त लेखात त्यांचा ऊहापोह करण्यात आलेला नाही. दिलेल्या निवडक पुराव्यांची सत्यासत्यता वाचकांना आवश्यक वाटल्यास पडताळून पाहता यावी याकरिता तारीखवार नोंद वर देण्यात आली आहे.

साठ वर्षांपूर्वी जी विकृत मनोवृत्ती अमेरिकन सत्ताधाऱ्यांनी दाखविली त्याचाच वारसा आजचे सत्ताधारी पुढे चालवित आहेत. जगाचे पोलीस बनण्याचा अनाहूत मक्ता त्यांनी स्वत:कडे घेतला आहे. व्हिएतनाम, लॅटिन अमेरिका, युगोस्लाविया, इराक अशा कितीतरी ठिकाणी मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना आजच्या सत्ताधाऱ्यांच्या पुढाकाराने, आशीर्वादाने आणि प्रत्यक्ष सहभागाने होत आहेत. आज चालू असलेल्या घडामोडींचा हिरोशिमा स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात सहभागी होताना जर आपल्याला विसर पडला, अनेक आक्रमणांविरुद्ध, अन्यायांविरुद्ध निर्धाराने उभे राहण्याचा निर्णय जर जगातील सर्व जनतेने घेतला नाही तर दु:खाश्रू ढाळण्यापलीकडे काही साधणार नाही, अशीच दु:खे सहन करावी लागण्याची पुनरावृत्ती ओढवणार नाही, अशी ग्वाहीसुद्धा देता येणार नाही.

जगातील अण्वस्त्रांसहित सर्व मानव संहारक शस्त्रास्त्रे नष्ट झालीच पाहिजेत, अशी मागणी करण्याचा आणि त्या मागणीमागे कृतिशील बळ उभारण्याचा आजचा दिवस आहे.

(मिळून साऱ्याजणी, ऑगस्ट २००५)

❑

'ऑपरेशन ग्रीन हंट' कशासाठी?

लोकसभेच्या आणि तीन विधानसभांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. निवडणुका, हा लोकशाहीवर अधिष्ठित असलेल्या राज्यव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असला, तरी व्यापक, सुदृढ व निकोप लोकशाहीचा तो एकमेव निकष असू शकत नाही. यावर जगात बहुतांशी एकमत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने संमत केलेल्या मानवी हक्कांच्या सनदेची अधिकात अधिक अंमलबजावणी ज्या देशात होत असते, त्या देशातील लोकशाही अधिकात अधिक निर्दोष आहे, असे मानणे रास्त ठरेल.

लोकशाहीची वरील व्यापक कसोटी लक्षात घेतल्यास, भारतीय लोकशाहीत अद्याप किती उणीवा शिल्लक आहेत, यावर वेळोवेळी पुष्कळ विचारमंथन झालेले आहे. तथापि, देशातील विविध राज्यात विविध कारणांकरिता व्यक्त होणाऱ्या असंतोषाची दखल घेतल्यास, कोणत्याही सत्तारूढ सरकारला या उणिवा भरून काढण्यात अद्याप यश आलेले नाही, हे म्हणणे क्रमप्राप्त ठरते.

या संक्षिप्त लेखात छत्तीसगड राज्यातील गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत आहे. भारतातील अनेक आदिवासी प्रदेश निसर्गसंपत्तीने, विशेषत: खनिज संपत्तीने समृद्ध आहेत. मध्यप्रदेश व छत्तीसगडमधील काही जिल्ह्यांत मिळून भारतातील १५ ते २० टक्के कोळशाच्या व लोखंडाच खाणी आहेत आणि ८ ते १० टक्के चुनखडी व बॉक्साईटच्या खाणी आहेत. २८ प्रकारची खनिजे केवळ छत्तीसगडमध्ये आहेत. गेली काही वर्षे ही खनिज संपत्ती, त्या भोवतालची जमीन, जंगल संपत्ती वा पाणी यावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारतीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या करीत आहेत. या सर्व साधनांचा कब्जा घेतल्याने या मागासलेल्या प्रदेशाचा विकास साध्य करता येईल, असे घोषित करण्यात आले. या भूप्रदेशात मुख्यत: वास्तव्य करणाऱ्या आदिवासी व अन्य कनिष्ठ वर्गातील रहिवाशांचे जीवनमान सर्वांगाने उंचावण्याच्या दृष्टीने जर योजना आखून त्या अमलात आणल्या गेल्या असत्या तर विकास हे मुख्य उद्दिष्ट आहे हे सिद्ध झाले असते. प्रत्यक्षात मात्र आदिवासींसकट हजारो रहिवाशांना धाकदपटशा, फसवणूक, लाचलुचपत इत्यादी विविध गैरमार्गांचा अवलंब करून विस्थापित करण्याचा

सपाटा सुरू करण्यात आला. ही होणारी अवहेलना अखेर असह्य झाल्यामुळे आदिवासी संघर्ष करण्यासाठी उभे राहिले. त्यातील काही लढ्यांचे (सर्व नव्हे) नेतृत्व नक्षलवादी किंवा माओवाद्यांकडे आहे. जीवन सर्वतोपरी उद्ध्वस्त करणाऱ्या सर्व कारवायांना राज्य, केंद्र सरकार यांनी मिळून वेळीच पायबंद घातला असता तर लढ्यांचे स्वरूप अति तीव्र बनले नसते.

परंतु खनिजसंपत्तीच्या विक्रीतून केंद्र सरकारला मिळत असलेल्या मिळकतीमुळे असो अथवा विस्थापनामुळे निर्माण होत असलेल्या असंतोषाचा पुरेसा अंदाज न आल्यामुळे असो किंवा कंपन्या, इतर हितसंबंधी घटक आणि विविध पातळ्यांवरील सरकारी अधिकारी यांच्या परस्परसंबंधातील भ्रष्टाचारामुळे असो, दोन्ही पातळींवरील राज्यकर्त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या वाताहतीकडे काणाडोळा केल्यामुळे ते हिंसक मार्गाचा अवलंब करण्यास प्रवृत्त झाले असे दिसते. खनिज संपत्तीच्या विक्रीतून सरकारला रास्त दराने फायदा होत होता असेही नाही हे केवळ एक उदाहरण घेतले तरी लक्षात येईल. लोहमातीचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दर टनास २२० डॉलर असा भाव आहे. सरकारला मात्र दर टनामागे फक्त अर्धा डॉलर रॉयल्टी दिली जाते!

वाढत जाणारा लोकक्षोभ आटोक्यात आणता येत नाही हे पाहून छत्तीसगड सरकारने २००५ मध्ये एक अजब प्रयोग सुरू केला. या प्रयोगाचे नाव सलवा जुडूम असे आहे. आदिवासींमध्ये यादवी युद्ध सुरू करण्यास प्रोत्साहन देणे असे या प्रयोगाचे वास्तव स्वरूप आहे. आदिवासींमधील काही जणांना प्रलोभने देऊन व काही जणांना वेतन देऊन, त्यांची सशस्त्र दले उभारण्यात आली. सलवा जुडूम म्हणजे शांति सेना असून, राज्यातील हिंसाचाराला आळा घालण्यासाठी ही सेना उभारण्यात आली आहे असे प्रसृत करण्यात आले. विस्थापित करण्यात येत असलेल्या आदिवासींना सरकारने उभारलेल्या, रास्त सोयी सुविधांचा अभाव असलेल्या छावण्यांमध्ये नेऊन डांबण्याची कामगिरी या सलवा जुडूम पथकांवर सोपविण्यात आली.

सरकारी पोलिस यंत्रणा व नव्याने उभारण्यात आलेली सशस्त्र 'शांती पथके' यांनी मिळून दक्षिण छत्तीसगडमधील दांतेवाडा जिल्हा व त्या भोवतालचा परिसर यातील सुमारे ६५० खेड्यांमधून गेल्या चार वर्षांत आदिवासींना जबरदस्तीने उठवून सरकारी छावण्यात डांबून ठेवण्यात 'यश' मिळविले आहे. खेड्यातील ज्या रहिवाशांनी छावण्यात जाण्यास नकार दिला, त्यांना नक्षलवादी असे ठरविण्यात आले आणि त्यांना शरण आणण्यासाठी जबरदस्ती वाढविण्यात आली. छावण्यांमध्ये मिळणारी वागणूक सहन न झाल्यामुळे, अखेर संत्रस्त होऊन हजारो छावणीवासीयांनी ओरिसा, आंध्रप्रदेश व काही थोड्या प्रमाणात महाराष्ट्रातसुद्धा स्थलांतर केले आहे. मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्याची कबुली खुद्द राज्य सरकारनेच दिली आहे.

सलोख्याच्या मार्गाने प्रश्न सोडवावयाचा नाही असा खेदजनक निर्णय सरकारी पातळीवर घेण्यात आला आहे असे दिसते. त्यामुळे असा मार्ग वापरून सेवा करणाऱ्या

संस्थासुद्धा सरकारच्या अविचारी रोषाच्या बळी ठरत आहेत. वनवासी चेतना आश्रम या नावाची महात्मा गांधींच्या विचारप्रणालीपासून प्रेरणा घेणारी एक संस्था गेली अनेक वर्षे आदिवासींची सेवा करण्यामध्ये मग्न आहे. शिक्षण, वैद्यकीय सेवा असे विविधांगी कार्य ही संस्था करीत आलेली आहे. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार विस्थापित होणाऱ्या आदिवासींचे पुनर्वसन करण्याचे कार्य या संस्थेने हाती घेतले. ज्यांच्यावर बलात्कारासकट अनेक जुलूम होत होते अथवा रास्त पुराव्याअभावी अटक होत होती अशांना न्याय मिळवून देण्याकरिता न्यायालयात खटले दाखल करण्याकरिता या संस्थेने मदत केली. आश्रमाने केलेल्या या 'गुन्ह्याबद्दल' आश्रमाने आपले कार्य अनधिकृत जागेवर बांधलेल्या कार्यालयातून चालविले आहे अशी सबब पुढे करून तो आश्रम बुलडोझरने पोलिसांकरवी उद्‌ध्वस्त करण्यात आला आहे. कार्यालयाची जागा अधिकृत आहे किंवा नाही, यावरील वाद न्यायप्रविष्ट असताना आश्रम उद्‌ध्वस्त करण्याची कारवाई कशी काय करण्यात आली?

पब्लिक सिक्युरिटी ॲक्टसारखे कायदे वापरून, शेकडोंची करण्यात आलेली अटक, पोलिस यंत्रणा, निमलष्करी दले, सशस्त्र सलवा जुडूम पथके अशा विविध दमन यंत्रणांकरवी करण्यात आलेल्या कारवाईतून छत्तीसगडमधील असंतोष शमविणे अद्याप शक्य झालेले नाही. 'ऑपरेशन ग्रीन हंट' या नावाने आक्रमक मोहीम सुरू करण्याचा केंद्र व राज्य सरकारचा विचार आहे. खासगी कंपन्यांच्या बेबंदशाहीवर सुयोग्य नियंत्रण ठेवण्याऐवजी आक्रमक पवित्रा धारण करण्याने असंतोष संपुष्टात येईल की अधिक भडकेल याचा विचार सरकारने करायला हवा.

(सकाळ, ३० ऑक्टोबर २००९)

❑

धर्म, जातिव्यवस्था

धर्मनिरपेक्षता आणि शासनसंस्था

धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा इतिहास

धर्मनिरपेक्ष शासन हे धर्मनिरपेक्षता या व्यापक संकल्पनेचे अविभाज्य अंग आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविहीनता नव्हे किंवा धर्मविरोधही नव्हे, धर्माचा तिरस्काराने उच्छेद करणे हे तर निश्चितच नव्हे.

धर्मनिरपेक्ष शासनाचा तीन अंगांनी ऊहापोह केला जातो. धर्म आणि व्यक्ती यांचा संबंध, शासनसंस्था आणि व्यक्ती यांचा संबंध, आणि शासनसंस्था आणि धर्म यांचा संबंध कोणत्या स्वरूपाचा असावा याची सुस्पष्ट मांडणी या विवेचनात अंतर्भूत केलेली असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला धर्मनिष्ठेचे आणि धर्मप्रसाराचे अथवा कोणताही धर्म न मानण्याचे स्वातंत्र्य असावे, शासनसंस्था आणि व्यक्ती, म्हणजेच त्या-त्या देशातील नागरिक, यांचा संबंध त्या त्या नागरिकाच्या धर्मनिष्ठेवर अवलंबून असता कामा नये, आणि शासनसंस्थेने कोणत्याही एका धर्मावर निष्ठा व्यक्त करू नये, त्या धर्माचा प्रसारही करू नये, अथवा त्या धर्माच्या तत्त्वमीमांसेत अगर व्यवहारात हस्तक्षेपही करू नये असा या विवेचनातील सारभूत निष्कर्ष आहे.

विवेचनातील विशुद्ध आशय वरीलप्रमाणे जरी असला तरी शासनाने धर्माच्या कोणत्याही तात्त्विक अथवा नैतिक घटकाविषयी भूमिका घेऊ नये अथवा जनतेच्या हिताशी सुसंगत असा हस्तक्षेप करू नये असा प्रत्यक्षात त्याचा अर्थ होतो असे नाही आणि म्हणूनच देश-काल-परिस्थितीनुसार या संकल्पनेची व्याख्या बदलते. त्यात काटेकोरपणा असू शकत नाही असे आढळते. उदाहरणार्थ एखाद्या धर्मानुसार कर्ज देणे अथवा त्यावर व्याज घेणे हे पापमय आणि म्हणूनच निषिद्ध कृत्य आहे असे समजले जात असेल. परंतु तो धर्म मानणारे बरेच लोक संबंधित देशात आहेत त्या कारणाकरिता बँक, आयुर्विमा महामंडळ किंवा अन्य वित्तीय संस्थांच्या कर्ज देण्याच्या व्यवहाराला धर्मात हस्तक्षेप होईल म्हणून शासनसंस्थेने उत्तेजन न देणे किंवा बंदी घालणे हे प्रत्यक्षात घडत नसते; किंवा दुसऱ्या एखाद्या धर्मानुसार अस्पृश्यता पाळणे, सती जाणे, नरबली देणे, देवदासीचा व्यवसाय करणे हे इष्टकर्तव्य असू शकेल. परंतु समता, न्याय, व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा या आधुनिक मूल्यांशी वरील

आचार जर विसंगत असेल तर शासनसंस्थेने हस्तक्षेप करणे व या प्रथा कायद्याने बंद पाडणे हे धर्मनिरपेक्षतेच्या वर उल्लेखिलेल्या विशुद्ध आशयाशी विसंगत असू शकेल; परंतु धर्माची अधिसत्ता ही मानवाच्या ऐहिक जीवनावर नसावी या तत्त्वाशी शासनसंस्थेचा हस्तक्षेप सुसंगत असतो हे लक्षात घ्यावयास हवे.

अन्य एका उदाहरणावरून धर्मनिरपेक्ष शासनाच्या एका तत्त्वाला बाधा कशी येऊ शकते हे लक्षात येईल. शासनसंस्थेचा व्यवहार हा त्या देशातील लोकांच्या नागरिकत्वाशी केवळ संबंधित असला पाहिजे, ते नागरिक कोणत्या धर्माचे आहेत याच्याशी त्या व्यवहाराचा संबंध असता कामा नये या तत्त्वाचा वर उल्लेख आलेलाच आहे. इंग्लंड हा देश बहुतांशी धर्मनिरपेक्ष आहे असे मानले जाते. परंतु सलमान रश्दी यांचे 'सटॅनिक व्हर्सिस' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि इराणच्या आयतोल्ला खोमेनी यांनी सुपारी देऊन पुस्तकाच्या लेखकाची हत्या करण्यात यावी असा हुकूमनामा काढला तेव्हा इंग्लंडमध्ये एक अनपेक्षित पेचप्रसंग निर्माण झाला. त्या पुस्तकामुळे जर धर्माची किंवा धर्मसंस्थापकांची बदनामी होत असेल तर अशा बदनामीबद्दल लेखकावर खटला भरण्याची तरतूद इंग्लंडमधील एका कायद्यानुसार आहे. म्हणून इंग्लंडमधील धर्मभावना दुखावलेल्या नागरिकांनी खोमेनींचा फतवा फेटाळून लावावा आणि लेखकावर रीतसर खटला भरून कोर्टाचा जो निर्णय मिळेल तो मान्य करावा अशी इंग्लंड सरकारच्या गृहखात्याची भूमिका होती आणि ही भूमिका इंग्लंडमधील काही सुशिक्षित, प्रतिष्ठित मुसलमानांना पटवून देण्यात गृहखात्याला यश आले. त्यानुसार काही प्रतिष्ठित मुसलमान वकिलांचा सल्ला घेण्यासाठी गेले. बदनामीविषयक सदरहू कायद्याची तपासणी ज्या वेळेस वकिलांनी केली त्यावेळेस अनेक वर्षांपूर्वी करण्यात आलेला हा कायदा ख्रिश्चन धर्मीयांपुरताच मर्यादित आहे, म्हणजे ख्रिश्चन धर्माची अथवा त्याच्या संस्थापकांची, त्या धर्माशी निकटपणे संबंधित अशा मान्यवरांची बदनामी झालेली आहे असे जर एका किंवा अधिक नागरिकांना वाटत असेल तर त्या कायद्यानुसार खटला भरता येईल असे आढळून आले. ख्रिश्चन धर्मीयांव्यतिरिक्त अन्य धर्मीयांशी या कायद्यामुळे पक्षपात होतो आहे हे लक्षात घेऊन एका मजूरपक्षीय खासदाराने या कायद्यात दुरुस्ती करण्यात यावी असे प्रतिपादन करणारे एक विधेयक इंग्लंडच्या लोकसभेला सादर केले आहे.

शासनसंस्था आणि धर्मसंस्था यांत एक अभेद्य भिंत उभारलेली असणे (impassable wall between the Church and the State) हे धर्मनिरपेक्ष शासनाचे एक महत्त्वपूर्ण लक्षण आहे हे अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष थॉमस जेफर्सन यांचे विधान सुप्रसिद्ध आहे. अमेरिकेमध्ये ते बहुतांशी पाळले जाते हेही खरे आहे. परंतु भारतात जर अशी भिंत उभारली आणि धर्माधिष्ठित तत्त्वाला आणि आचरणाला शासनाने जर कोणत्याही आव्हान दिले नाही तर धर्मोद्भूत विषमता जशीच्या तशी चालू ठेवावी लागेल. अमेरिकेत धर्मामध्ये जवळ जवळ हस्तक्षेप न करण्याचे तत्त्व अमलात आणणे

जे शक्य आहे ते भारतात का शक्य नाही हे समजावून घेण्याकरिता धर्मनिरपेक्षता या तत्त्वाचा विकास कसा होत गेला हे समजावून घेणे उचित ठरेल.

धर्मनिरपेक्षतेची कल्पना सर्वात प्रथम येशू ख्रिस्ताने दिलेल्या एका प्रवचनात बीजरूपाने आढळते. त्या काळातील रोमन सत्ताधीशांना सीझर असे म्हणत असत. अशा एका सीझरने आपल्या प्रजाननांवर जो कर बसविला त्याला काही लोकांचा विरोध होता. आपला असंतोष व्यक्त करण्याकरिता ते येशू ख्रिस्ताकडे आले. त्या वेळेस त्यांना उद्देशून आपला संदेश देताना येशू ख्रिस्ताने सांगितले की कर लादणे हा सीझरचा (सत्ताधीशाचा) अधिकार आहे. देवाचा दूत या नात्याने आपण देवाचा दरबार चालवितो. या दरबारात पारमार्थिक जीवनातील प्रश्नांबद्दल निवाडा करिता येईल, परंतु सीझरच्या कक्षेतील अधिकारात ईश्वराला हस्तक्षेप करता येणार नाही. या प्रवचनावरून ऐहिक जीवनात धर्माला आपले वर्चस्व प्रस्थापित करिता येणार नाही असा निर्णय ख्रिस्ताने दिला असे मानण्यात येते. येशू ख्रिस्ताचा हा आदेश त्यांच्या अनुयायांनी पुढे मानला नाही.

ख्रिस्ताच्या या उपदेशाला जे महत्त्व दिले जाते ते यासाठी की तत्पूर्वी अस्तित्वात असलेल्या ग्रीक नगरराज्यांमध्ये आणि पुढे रोमन आधिपत्याखालील प्रदेशांमध्येसुद्धा तत्कालीन धर्म आणि ऐहिक जीवन ही एकमेकांशी घट्टपणे निगडित झालेली होती. ग्रीक नगरराज्यांची नावेसुद्धा कोणत्या ना कोणत्या तरी दैवतावरून दिली जात असत आणि या राज्यांचा विस्तार त्या-त्या दैवताच्या मंदिराभोवतालच्या प्रदेशात होत असे. उदाहरणार्थ ॲथेन्स या राज्याचे नाव ॲथीना या देवतेवरून, ॲपोलोनिया हे नाव अपोलो या देवावरून तर पॅसिडोनिया हे नाव पॉसिडियन या देवावरून पडले होते. सत्ताधीशांचा जो धर्म तोच धर्म त्या-त्या राज्यातील प्रजाजनांचा असे आणि या सत्ताधीशांचे हुकूम जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करीत असत. राज्यकारभार सुद्धा धर्ममंदिरातील आसनावरूनच चालत असे.

ख्रिश्चन धर्माचा उदय व प्रसार जसजसा होऊ लागला तसतसे ख्रिश्चन धर्माचे अनुयायी रोमन सत्ताधीशांचा धर्म व त्यांच्या वागणुकीच्या नैतिक अधिष्ठानाला विरोध करू लागले. या विद्रोही ख्रिश्चनांचा अनन्वित छळ रोमन सत्ताधीशांनी केला. कोणाच्याही धार्मिक निष्ठेवर सत्ताधाऱ्यांनी अतिक्रमण करू नये. कारण धर्माची अधिसत्ता ही मनुष्य आणि परमेश्वर यांच्या संबंधांपुरती मर्यादित आहे असे येशू ख्रिस्त सांगत होता. मनुष्य आणि शासनसंस्था यांचे संबंध हे सत्ताधाऱ्यांच्या कक्षेत येतात म्हणून धर्मसंस्थेने आपली मर्यादा ओळखून सत्ताधाऱ्यांच्या क्षेत्रात पाऊल टाकू नये. सत्तेचे असे विभाजन केल्यास, मनुष्याला आपले तात्कालिक अथवा दैनंदिन जीवनातील ध्येय आणि परमेश्वराशी संबंधित असलेले शाश्वत ध्येय सुसंवादीपणे गाठता येईल हाच आशय येशू ख्रिस्ताच्या प्रवचनातून व्यक्त होतो. सत्ताधीश हाच परमेश्वर म्हणून जीवनाच्या सर्व अंगांवर सत्ता गाजविण्याचा त्याला अधिकार आहे, या रोमन सम्राटांच्या कल्पनेला

हादरा देणारे हे प्रवचन असल्यामुळे धर्मनिरपेक्षता या संकल्पनेच्या विवेचनात त्याला महत्त्व देण्यात येते.

येशू ख्रिस्ताचा वरील संदेश पुढे ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेल्या राजेसम्राटांनी पाळला नाही. इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या अखेरीस धर्मगुरू (पोप) जिलेसिअस यांनी दोन सत्ताक्षेत्रांचा हा सिद्धांत पुन्हा मांडला. त्याला ''दोन तलवारींचा सिद्धांत'' असे म्हणतात. परंतु येशू ख्रिस्ताच्या प्रवचनातील संदेशाप्रमाणेच या सिद्धांताचीही उपेक्षा झाली. याचे मुख्य कारण म्हणजे एका बाजूला ख्रिश्चन धर्माचा प्रसार हा चर्च या धर्मपीठाच्या माध्यमातून होऊ लागला. दुसऱ्या बाजूला पूर्वीच्या रोमन राजांचा ख्रिस्त धर्माला विरोध होता तो पुढे राहिला नाही. अंतर्गत बजबजपुरीने रोमन साम्राज्य पोखरले गेले. ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीतील प्रभावाने आणि स्वतंत्रपणेसुद्धा रोमन साम्राज्यशाहीतील गुलामांनी बंड करण्यास प्रारंभ केला. यामुळेही ते साम्राज्य खिळखिळे झाले. अखेर रोमन सम्राटांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. प्रचंड सत्ता हातामध्ये केंद्रित झालेले रोमन कॅथलिक चर्च म्हणजेच ते चालविणारे धर्मगुरू आणि राजे यांचे एकमेकांत संगनमत झाले. राजांच्या उन्मत्त, बेगुमान कारभाराला धर्मगुरूंनी पाठिंबा दिला तर राजांनी चर्चला जमीनजुमला, जडजवाहीर इत्यादी संपत्ती दान करून चर्चची ऐहिक संपन्नता प्रचंड प्रमाणात वाढविली. धर्मगुरूंच्या बेबंदशाहीला विरोध करणाऱ्यांवर अमानुष दडपशाही करण्याची कामगिरी राजांनी म्हणजेच शासनसंस्थेने पार पाडली. राजाच्या विरोधकांना राजा करू इच्छित असलेल्या शिक्षेला धार्मिक अधिष्ठान मिळावे म्हणून धर्मगुरूंनी राजाच्या वतीने न्यायाधीशाची कामगिरी बजावली. दोनही क्षेत्रातील सत्ताधाऱ्यांनी सामान्य जनतेवर अनेक प्रकारचे जुलूम केले. इतिहासाची ही वाटचाल देशोदेशी कमी-अधिक फरकाने १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत अशीच चालू राहिली.

अधूनमधून एखादा धर्मगुरू किंवा एखादा राजा ''दोन तलवारींच्या'' सिद्धांताची आठवण करून देत असे. परंतु त्यांचे आवाहन परिस्थितीत बदल घडवून आणण्याइतके प्रभावी ठरत नसे. १४ व्या शतकात इटलीमध्ये पादुआ येथील मार्सिग्लिओ नावाच्या एका लेखकाने, मानवी हक्क हे धर्मनिष्ठेवर अवलंबून नसतात आणि म्हणून कोणाचीही कोणतीही धर्मनिष्ठा असो त्या निष्ठेबद्दल तो शिक्षेस पात्र ठरू शकत नाही या व तदनुषंगिक मुद्यांचे विवरण मोठ्या ठाशीवपणे केले. परंतु अशा वैचारिक प्रतिपादनांपेक्षा १४ व्या शतकापासून तो अठराव्या शतकापर्यंत युरोप खंडामध्ये ज्या अनेक घटना घडल्या त्यातून सारा समाज ढवळून निघाला आणि मानवाच्या ऐहिक जीवनाला अग्रस्थान प्राप्त होऊन धर्मसंस्थेचा आणि धर्माधिष्ठित विचारांचा पगडा क्षीण होत गेला. ही प्रक्रिया कशी घडत गेली हे समजण्याकरिता प्रमुख घटना व आंदोलनांचा संक्षिप्त परामर्श घेणे आवश्यक आहे.

मार्को पोलो, इब्न बुट्टा, कॅप्टन कुक, कोलंबस, वॉस्को द गामा व अशा इतर अनेक साहसी पर्यटकांनी युरोपाबाहेरील भूखंडांचा, तेथील रहिवाशांचा, तेथील धर्मांचा

व ज्ञानभांडाराचा परिचय आपल्या देशबांधवांना या कालखंडात करून दिला. युरोपकेंद्री संकुचित दृष्टीला आत्मपरीक्षण करावयास लावणारी ही महत्त्वपूर्ण घटना होती.

राजसत्ता आणि धर्मसत्ता यांच्या जुलमाखाली भरडल्या गेलेल्या जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊ लागला तसतसे हा असंतोष व्यक्त करणारे, लोकांमध्ये नव्या जाणिवा निर्माण करणारे नवे नेतृत्व निर्माण झाले. प्रबोधनाचा कालखंड, मानवतावादाचा कालखंड, धर्मसुधारणेचा कालखंड आणि ज्ञानवृद्धीचा-सुसंस्कृतीचा कालखंड अशा चार टप्प्यांमधून युरोपमधील विचारविश्व घुसळून निघाले. प्राचीन ग्रीक वाङ्मयाचा - वैचारिक आणि ललित - अशा दोन्ही वाङ्मयांचा, तसेच ख्रिस्ती धर्मापूर्वीच्या धर्मसंकल्पनांचा नव्याने अभ्यास सुरू झाला. मानव समाजाचा अभ्यास करणे हे मानवी प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक असून हा अभ्यास मानवकेंद्रीच असला पाहिजे, तो ईश्वरकेंद्री ठेवल्याने मानवसमाजाच्या स्थितीगतीचे ज्ञान प्राप्त होणार नाही यावर मानवतावादाचा आग्रही पुरस्कार करणाऱ्या सर थॉमस मोर, कॉलेट, इरॅस्मस इत्यादी लेखकांनी भर दिला. ख्रिश्चन धर्मातील कर्मठपणावर, धर्मगुरूंच्या भ्रष्टाचारावर, धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या ढोंगावर प्रहार करणारे लेखक निर्माण झाले. त्यामुळे रोमन कॅथलिक चर्चच्या निरंकुश सत्तेला जबरदस्त धक्का बसला. धर्मग्रंथांचा अर्थ लावण्याचा हक्क धर्मगुरूंपुरताच मर्यादित नाही असा खणखणीत इशारा देऊन मार्टिन ल्यूथर या जर्मन धर्मसुधारकाने आपले ९५ कलमी निवेदन विटेनबर्ग चर्चच्या दरवाजावर १५१७ साली जाऊन चिकटविले. रोमन कॅथलिक चर्च आता एकसंघ राहिले नाही. प्रथम प्रोटेस्टंट व त्यानंतर अनेक लहानमोठे पंथोपपंथ निर्माण झाले. राजे आणि धर्मगुरू यांच्यातील सत्तास्पर्धाही तीव्र झाली. नव्याने निर्माण झालेल्या पंथोपपंथांच्या अनुयायांमध्ये घनघोर युद्धेही झाली. वेगवेगळ्या धर्ममतांना स्वातंत्र्य देणे राजसत्तेला भाग पडले आणि त्यातून एकसंध धर्मसत्ता आणि निरंकुश राजसत्ता यांच्यातील संगनमतही कालांतराने नष्ट झाले. हे संगनमत नष्ट झाल्यामुळे शिक्षण, प्रशासन, आर्थिक व्यवहार, न्यायदान या व अशा ऐहिक बाबींवर असलेले धर्मसत्तेचे वर्चस्व जवळजवळ नष्ट झाले.

धाडसी प्रवाशांनी शोधून काढलेल्या नव्या देशवासीयांशी युरोपातील विविध राष्ट्रांचा व्यापार सुरू झाला. हा व्यापार विविध धर्मीयांशी असल्यामुळे तो जर सुरळीतपणे चालावयाचा असेल तर धर्मापेक्षा आर्थिक व्यवहाराला अधिक महत्त्व देणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे या कालखंडात धार्मिक सहिष्णुतेवरही भर देण्यात येऊ लागला. व्यापार वाढू लागला तसतशी शहरेही वाढू लागली. व्यापारातून धनसंचय होऊ लागल्यामुळे जमिनीची मालकी हे संपत्तीचे एकमेव साधन उरले नाही. व्यापाऱ्यांचे समाजातील स्थान व प्रतिष्ठा वाढू लागली. सरंजामदारांच्या आधिपत्याखालील स्वायत्त जहागिरी कोलमडू लागल्या. व्यापारातील धनसंचयातून गुंतवणुकीसाठी आवश्यक असणारे भांडवल निर्माण झाले आणि यातूनच औद्योगिकीकरण वेगाने होऊ लागले. कंपन्या व

बँका स्थापन होऊ लागल्या तसतसा या सर्व व्यवहारांत निमग्न असलेला समाजातील एक वर्ग उदयाला आला. लवकरच उद्योगपतींच्या या वर्गाला प्रतिष्ठाही प्राप्त झाली. गरजा मर्यादित ठेवणे, काटकसर करणे हा धर्माचा, साधु-संतांचा उपदेश मागे पडू लागला आणि ऐहिक सुबत्ता, उच्चतर राहणीमान, ऐषआराम, वैयक्तिक स्पर्धेतून व्यक्तीने उन्नती साधून प्रतिष्ठा प्राप्त करून घेणे या मूल्यांची जोपासना होऊ लागली. थोडक्यात म्हणजे पारलौकिक जीवनातील अज्ञात सुखापेक्षा या पृथ्वीतलावरील ऐहिक जीवनात सुख-समृद्धी प्राप्त करून घेण्याचे ध्येय उपेक्षणीय नाही एवढेच नव्हे, तर ते समर्थनीय आहे हा मतप्रवाह मोठ्या जोमाने पुढे सरसावला.

ऐहिक जीवन धर्माच्या वर्चस्वापासून मुक्त करणे, म्हणजेच ते धर्मनिरपेक्ष बनविणे, या विचारप्रवाहाला गती प्राप्त करून देणारा अखेरचा पैलू म्हणजे विविध क्षेत्रात झालेले वैज्ञानिक व तांत्रिक संशोधन हा होय. न्यूटन, लाइब्जित्स यांनी गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. गिलबर्ट व फ्रँकलिन यांनी विद्युत्‌निर्मिती व लोहचुंबकत्वाचे सिद्धांत मांडले. ल्यूबेनहोएक आणि ज्यू यांनी सूक्ष्मदर्शक यंत्र तर गॅलिलिओ व हर्षल यांनी दुर्बीण जगासमोर आणली. हार्वे व मॅलपिगी यांनी रक्ताभिसरणाची प्रक्रिया शोधून काढली. शरीरशास्त्राच्या ज्ञानात भर टाकली. डार्विनच्याही आधी ट्रेम्ब्लाये आणि बफन यांनी उत्क्रांतीच्या सिद्धांताचे ठोकताळे मांडले.

या संशोधनात अजून अनेक नावांची आणि विषयांची भर घालता येईल. परंतु या सर्व संशोधनाने जी मुख्य कामगिरी बजावली ती ही की पृथ्वी सपाट आहे यासारखे धर्मग्रंथांनी धरलेले आग्रह कोसळून पडले. विश्वाचे गूढ हळूहळू उकलता येते, निसर्गाचे नियम समजावून घेता येतात आणि मानवी जीवन हे सर्वस्वी पराधीन अथवा ईश्वराधीन न राहता मनुष्य त्याला दिशा देऊ शकतो हे हळूहळू लोकांना पटू लागले. रॉजर व फ्रान्सिस बेकन, डेकार्ट, बॉईल, फ्रँकलिन, लोमोनोसोव्ह यांसारख्या तत्त्वज्ञांनी व वैज्ञानिकांनी प्रयोगसिद्ध ज्ञानावर भर दिल्यामुळे, ज्ञान हे मुख्यत: साक्षात्काराचे फलित असते किंवा कित्येक वरकरणी न उमगणाऱ्या नैसर्गिक घटना या चमत्कारांचा किंवा ईश्वरी कोपाचा आविष्कार असतात यावरील लोकांचा विश्वास पूर्णतया नष्ट झाला नाही तरी बऱ्याच अंशाने कमी होऊ लागला. या सर्व संशोधनातून मानवाचे तंत्रज्ञानही समृद्ध झाले. नवे नवे धातू उपलब्ध झाले. स्वस्त इंधनाचा शोध लागला, शेती करण्याच्या पद्धतीत सुधारणा झाली, कष्ट कमी करणारी यंत्रे निर्माण झाली, सुखावह गृहरचना होऊ लागली, थोडक्यात म्हणजे धर्मसंस्थेला जे शेकडो वर्षांत साधले नाही ते विज्ञान-तंत्रज्ञानाने साध्य करून दाखविले. याचाच परिणाम म्हणून मानवाने निर्माण केलेल्या धर्मसंस्था, विवाहसंस्था, न्यायसंस्था यांसारख्या संस्थांचे विश्लेषण करण्यास व त्यांमध्ये सुधारणा सुचविण्यास भय वाटेनासे झाले.

लोकांचा धर्मावरचा किंवा ईश्वरावरचा विश्वास संपूर्णतया नष्ट झाला असे नाही, परंतु त्याला आव्हान देणारा वस्तुवादाचा किंवा जडवादाचा सिद्धांत जर कोणी मांडला

तर जाचक शिक्षा देण्याची प्रथा बंद पडली. ते विचार ऐकून घेण्याची प्रवृत्ती लोकांच्यात दृढ होऊ लागली .

प्रत्यक्ष जीवनात धर्मनिरपेक्ष ऐहिक जीवनाला हळूहळू मान्यता कशी मिळत गेली हे आपण वर पाहिले. या संपूर्ण प्रक्रियेची आणि त्यातून निघणाऱ्या सिद्धांताची व्यवस्थित मांडणी पहिल्या प्रथम जर कोणी केली असेल तर ती १८४६ साली हॉलयोक यांनी 'प्रिन्सिपल्स ऑफ सेक्युलॅरिझम' आणि 'द ऑरिजन ॲण्ड द नेचर ऑफ सेक्युलरिझम' या ग्रंथांतून केली.

माणसाने कोणते शिक्षण घ्यावे, ते किती काळ घ्यावे, कपडे कोणते घालावेत, आहार कोणता घ्यावा, रोगनिदान व त्यावरील उपचार कसे करावेत हे धर्माने ठरवू नये, तर वैज्ञानिक संशोधनाच्या प्रकाशात विवेकबुद्धीने याबाबतचे निर्णय वैयक्तिक पातळीवर व सामाजिक पातळीवर घेण्यात यावेत हे धर्मनिरपेक्षतेच्या व्यापक संकल्पनेत अभिप्रेत असते. अधिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीने असे म्हणता येईल की माणसाने गोमांस अगर डुकराचे मांस खावे की नाही हे धर्माने ठरवू नये तर व्यक्तीने आपल्या आवडी-निवडीनुसार किंवा वैद्यकीय सल्ल्यानुसार निर्णय घ्यावा. दाढी ठेवण्याचे, बुरखा घेण्याचे अगर डोक्यावर पदर घेण्याचे बंधन धर्माने घालू नये. याचाच पुढील निष्कर्ष असा की मनुष्यसमाजाचे नीतिनियमसुद्धा त्या-त्या समाजानेच विवेकबुद्धीने ठरवावेत व कालपरत्वे त्यात योग्य वाटतील ते बदलही करावेत.

धर्मनिरपेक्षतेची ही व्यापक संकल्पना एकदा मान्य झाल्यानंतर इंग्लंडसारख्या एखाद्या देशात अँग्लिकन चर्च या धर्मसंस्थेला सरकारी मान्यता असली तरी तिचा इतर धर्मीयांच्या धर्मस्वातंत्र्यावर अथवा तेथील लोकांच्या ऐहिक जीवनावर दु:सह परिणाम होत नाही. राजेशाही नष्ट झालेल्या देशात राजाला जे स्थान तेच ऐहिक जीवनावरील प्रभाव नष्ट झालेल्या अँग्लिकन चर्चला इंग्लंडमध्ये आहे असे आढळते.

वरील सर्व विवेचनावरून हे लक्षात येईल की धर्मसुधारणा, प्रबोधन, वैज्ञानिक, संशोधन अशा विविध टप्प्यांतून गेलेल्या देशांमध्ये धर्माचे ऐहिक जीवनावरील अनन्यसाधारण वर्चस्व क्षीण किंवा नष्ट झालेले आहे. अशा देशांमध्ये शासनसंस्थेने धर्मसंस्थेच्या कारभारामध्ये हस्तक्षेप करू नये ही अपेक्षा रास्त ठरते. परंतु ज्या देशांमध्ये धर्माचे व त्यातील अनिष्ट पैलूंचे वर्चस्व अद्याप नष्ट झालेले नाही त्या देशांमध्ये धर्मसुधारणेची जबाबदारी शासनसंस्थेने घेतल्यास ते लोकहितविरोधी ठरत नाही आणि म्हणून व्यक्तीच्या धर्मस्वातंत्र्यावर गदा न आणता शासनसंस्थेने धर्मसंस्थेच्या अनिष्ट व्यवहारांत हस्तक्षेप करणे समर्थनीय ठरते.

(आजचा सुधारक, सप्टेंबर १९९६)

❑

सोवियत युनियनमधील धर्मस्वातंत्र्य

जुलै-ऑगस्ट १९९६ च्या 'आजचा सुधारक'च्या अंकात प्रा. सत्यरंजन साठे यांचा 'धर्मनिरपेक्षता आणि सर्वोच्च न्यायालय' असे शीर्षक असलेला एक चांगला लेख प्रसिद्ध झाला आहे. परंतु त्यामध्ये 'रशियामध्ये व्यक्तीला धर्माबाबतचे स्वातंत्र्यच नाकारले गेले', असे एक विधान पान १४२ वर करण्यात आले आहे. उजव्या विचारसरणीच्या नियतकालिकांमधून अथवा ग्रंथांमधून करण्यात आलेला पूर्वग्रहदूषित अपप्रचार जर बाजूला ठेवला तर काय आढळते?

१) १९८८ सालच्या आकडेवारीनुसार खालील विविध धर्म व धर्मपंथीयांची मिळून वीस हजार प्रार्थना अथवा उपासना मंदिरे सो.युनियनमध्ये अस्तित्वात होती : रशियन ऑर्थोडॉक्स, रोमन कॅथलिक, लूथरेन, ओल्ड बिलीव्हर्स, बॅप्टिस्टस्, सेव्हन्थ डे अॅडव्हेन्‌टिस्टस्, मोलोकन्स, सिनेगॉगस्, मशिदी, बौद्ध देवालये.

२) वरीलपैकी रशियन ऑर्थोडॉक्स चर्च हा पंथ सर्वात अधिक सनातनी. परंतु या पंथाचे सुद्धा १६०० विद्यार्थी त्यावर्षी अस्तित्वात होते. तसेच या पंथाचे आध्यात्मिक दर्शन घडविणारी मासिके व वार्षिकेही पूर्वीपासून अस्तित्वात होती. इतर धर्मपंथीयांना हेच स्वातंत्र्य उपलब्ध होते. धर्माच्या नावाखाली अघोरी अनाचार व आर्थिक शोषण करण्याला मात्र बंदी होती.

३) लिथुएनिया या परगण्यातील एका शहरात चर्चमधील घंटानादाने गोंगाट होतो ही सबब पुढे करून तेथील स्थानिक सत्ताधाऱ्यांनी या घंटानादावर बंदी घातली. दुसऱ्या एका जिल्ह्यात एका रुग्णालयात मृत्युशय्येवर असलेल्या एका रुग्णाला आपल्या धर्मगुरूला (प्रीस्टला) बोलावून ख्रिश्चन परंपरेनुसार (पापक्षालनासाठी) अखेरचा कबुलीजबाब (कन्फेशन) देण्याची इच्छा होती. रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी याला हरकत घेतली. ही दोनही प्रकरणे न्यायालयात दाखल झाली तेव्हा भाविकांना घंटानादाचा अधिकार बहाल करण्यात आला. तसेच कबुलीजबाब देण्याचा आणि तो स्वीकारण्याचा अधिकार मान्य करण्यात आला आणि धर्माचरणाच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या अधिकाऱ्यांना नियमानुसार शिक्षा देण्यात आली.

४) कोणाही व्यक्तीस स्वत:च्या गुणवत्तेनुसार उच्च पदावर पोहोचण्याकरिता त्याचे धर्माचरण आड येत नसे. एकच उदाहरण घ्यावयाचे झाले तर व्हॅलेन्टिन् व्हॉयनो यासेनेटस्की (१८७७-१९६१) याचे घेता येईल. हा एक सो.युनियनमधील नामवंत सर्जन होता. एका मोठ्या रुग्णालयाचा तो सर्वश्रेष्ठ अधिकारी होता आणि त्याच्या कर्तबगारीबद्दल त्याला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाले होते. परंतु स्वदेशातील क्रीमिया या प्रदेशाचा आर्चबिशप या नात्याने धर्माचरण करण्याचे त्याचे स्वातंत्र्य अबाधित राहिले होते.

५) आपापल्या धर्मपंथानुसार उपक्रम-उत्सव करण्याकरिता, तसेच प्रार्थना-मंदिरांचा खर्च चालविण्याकरिता, धर्मानुयायांकडून देणग्या गोळा करण्याचे स्वातंत्र्य त्या-त्या धर्मपीठांना होते एवढेच नव्हे तर या देणगीरूपाने जमा करण्यात आलेल्या रकमांवर सोविएत सरकार कर बसवीत नसे.

६) विवाहबद्ध होण्याकरिता युवक-युवतींना नियोजित खात्याकडे अर्ज करून विवाहाची नोंदणी करावी लागत असे, आणि हे नोंदणी केलेले विवाहच कायदेशीर मानले जात असत. परंतु या विवाहांना धार्मिक अधिष्ठान मिळविण्याकरिता चर्चमध्ये जाऊन धर्मगुरूच्या साक्षीने विवाहबद्ध होण्याची मुभा होती. दरवर्षी फार मोठ्या संख्येने (काही वर्षी तर बहुसंख्य) विवाह चर्चमध्ये जाऊन नोंदविले जात असत. व्यक्तिगत पातळीवर धर्माचरणाचे स्वातंत्र्य असल्याखेरीज हे घडणे शक्य आहे काय?

७) ज्यू धर्मपरंपरेप्रमाणे प्रार्थना मंदिरामध्ये (सिनॅगॉगमध्ये) स्त्री व पुरुषांना एकाच ठिकाणी एकत्रितपणे प्रार्थना करण्यास अथवा प्रवचन ऐकण्यास मज्जाव आहे. भेदभाव सुस्पष्टपणे व्यक्त करणारे वेगळे स्थान स्त्रियांसाठी राखून ठेवलेले असते. विषमताधिष्ठित स्त्री-पुरुष भेद सार्वजनिक जीवनातून निपटून काढण्याकरिता व स्त्रियांचे विशिष्ट स्थान लक्षात घेऊन, त्यांना काही रास्त सोयी व सुविधा पुरविण्याकरिता सो.युनियनमध्ये कायदे करण्यात आले व प्रथा पाडण्यात आल्या. त्यामुळेच देशातील एकूण शास्त्रज्ञांपैकी ४० टक्के, एकूण औद्योगिक तंत्रज्ञांपैकी (इंडिस्ट्रिअल इंजिनिअर्सपैकी) ५० टक्के आणि शिक्षक व डॉक्टर्सपैकी बहुसंख्य या स्त्रिया होत्या हे लक्षात घेण्यासारखे आहे. परंतु सिनॅगॉगमध्ये असणारा भेदभाव कायद्याने रद्द करण्यात आला नाही. तो धर्मांतर्गत सुधारणा घडवून आणण्याचा धर्मानुयायांचा प्रश्न मानण्यात आला.

८) विश्वशांतीचा पुरस्कार व त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे हे धर्माचे एक उज्ज्वल ध्येय मानण्यात येते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील धर्मपरिषदांच्या वतीने जागतिक शांतता या ध्येयाचा प्रसार करण्यासाठी, अणुशक्तीचा विध्वंसक उपयोग करण्याला विरोध करण्यासाठी सो.युनियनच्या प्रशासनाने धर्मपरिषदांच्या कार्याला भरघोस उत्तेजन दिले. या ध्येयासाठी आवश्यक ते राजकीय पातळीवरील प्रयत्न वेगळ्या व्यासपीठांवर चालू ठेवण्यात आले.

९) दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हरएक कुटुंबाला रोज आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या अथवा स्नेह्यांच्या मृत्यूच्या, जबर जखमी झाल्याच्या, अथवा बेपत्ता झाल्याच्या बातम्या ऐकाव्या लागत असत. दु:खाने विव्हळ झालेल्या मनांना ईश्वरावरील श्रद्धेने दिलासा मिळत असे. जनतेच्या पराक्रमाने शत्रूचे निर्दालन होईल आणि परमेश्वर कृपेने चिरस्थायी शांतता प्रस्थापित होऊन, असे दारुण दु:ख आपल्या वाट्याला पुन्हा कधी येणार नाही अशी आशा अनेकांना वाटत असे. प्रार्थना मंदिरात जाऊन ईश्वराची प्रार्थना करण्याची ओढ हजारो लोकांच्या मनात उत्पन्न झाली. जडवाद व निरीश्वरवादावर कणखर निष्ठा असणाऱ्या स्टॅलिनने, लोकांची मानसिक स्थिती लक्षात घेऊन, अनेक नवीन चर्चेस बांधण्यास त्या कालखंडांत अनुकूलता दाखविली.

वस्तुस्थितीचे दर्शन घडविणारी वरील सर्व उदाहरणे सो.युनियनमध्ये व्यक्तीला धर्मस्वातंत्र्य नव्हते या विधानाला पोषक ठरत नाहीत. सो.युनियनमधील क्रांतीचा आणि त्यानंतरच्या कालखंडाचा अनेक लेखकांनी लिहिलेला इतिहास थोडा काळजीपूर्वक वाचला तर त्या देशातील धर्मासंबंधीची भूमिका अधिक सम्यकृपणे समजू शकेल.

१९१७ ते सुमारे १९२५ पर्यंतचा कालखंड हा सो.युनियनमध्ये घडलेल्या क्रांतीचा आणि त्यानंतर हातात घेण्यात आलेल्या आर्थिक पुनर्रचनेच्या प्रारंभाचा कालखंड होता. समाजसत्तावादी समाजरचनेचे ध्येय उद्घोषित करणाऱ्या क्रांतीला, आणि तद्नंतरच्या आर्थिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमाला, रशियन ऑर्थोडॉक्स चर्च व इस्लामधर्मीय मौलवी यांनी कसून विरोध केला होता. सरंजामशाहीवर आघात करण्याकरिता क्रांतीनंतर स्थापन झालेल्या सरकारने अनेक सरंजामदारांच्या खासगी जमिनी जशा जप्त केल्या तशाच वरील धर्मसंस्थांच्या व त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या जमिनीही जप्त केल्या. त्यामुळे वरील धर्मांच्या पदाधिकाऱ्यांनी धर्माच्या नव्हे तर आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता क्रांतीला केवळ विरोध केला नाही, तर प्रतिक्रांतिकारकांशी संगनमत करून सो.क्रांतीचा पराभव करण्यासाठी करण्यात आलेल्या कारवायांमध्येही सक्रिय भाग घेतला.

धर्ममार्तण्डांच्या कुटिल कारस्थानांना प्रतिक्रिया म्हणून काही क्रांतिकारकांच्या मनात धर्मविरोधी तीव्र भावना निर्माण झाली आणि त्या झपाटलेल्या मन:स्थितीत काही धर्ममंदिरे जमीनदोस्त केली गेली आणि काही धर्मगुरूंचा नि:पात करण्यात आला. प्रतिक्रांतिकारकांचा पाडाव करण्यात क्रांतिकारकांना यश आले आहे हे दिसल्यानंतर वर्चस्व स्थापन करण्यात आपली स्वप्ने इतिहासजमा झाली आहेत हे अनेक धर्मगुरूंच्या लक्षात आले आणि त्यानंतर सोवियत सरकारच्या प्रगतिकारक धोरणांना विरोध करण्याचा आडमुठेपणा त्यांनी सोडून दिला. त्याबरोबर स्थिरावलेल्या सोवियत शासनाने धर्मविरोधाचे धोरण ठेवले नाही. लोकांच्या जीवनातील असुरक्षितता जसजशी विलयाला जाईल तसतशी धर्माचा आधार घेण्याची गरज लोकांना भासणार

नाही या तात्त्विक सिद्धांताचे भान अधिक जाणीवपूर्वक ठेवण्यात येऊ लागले. परंतु त्याचबरोबर लोकांच्यात नव्या जाणिवा निर्माण करण्याचीही (प्रबोधनाची) गरज होती. ती जबाबदारी क्रांतीनंतर प्रभावी झालेल्या कम्युनिस्ट पक्षावर सोपविण्यात आली.

कम्युनिस्ट पक्षाने वैज्ञानिक दृष्टी रुजविण्याची, जडवादाची आणि निरीश्वरवादाची वैचारिक मोहीम धूमधडाक्याने सुरू केली. धर्मसंस्थांची दुष्कृत्ये लोकांसमोर मांडली. धर्माच्या नावाखाली होणारी अघोरी कृत्ये बंद पाडली. मुसलमान समाजातील स्त्रियांना शिक्षण घेण्यास आणि चेहऱ्यावरील बुरखा काढण्यास प्रवृत्त करून, धर्माधिष्ठित अन्यायावर निर्भीडपणे प्रहार करण्यात आले. या सबंध प्रक्रियेत अधून-मधून अतिरेकही झाले. विचार-मोहिमेला कित्येकदा उथळ प्रचाराचे स्वरूपही आले. या झंझावाती जन-जागरणांतून लोकांच्या मनातील धर्मभावना क्षीण झाली. असे असूनही साऱ्या समाजाच्या मनातून धर्मभावना पार विरून गेली असे झाले नाही.

संकटाच्या वेळी धर्माची (ईश्वराची) आठवण अद्यापही लोकांना होत असते. गेल्या काही वर्षांत येल्त्सिनच्या कारकीर्दीत पूर्वीच्या सो.युनियनचा सर्वांगाने ऱ्हास सुरू झाला आहे. आणि म्हणूनच एका बाजूने गुंडांच्या टोळ्या रस्त्यात गस्त घालीत आहेत तर दुसऱ्या बाजूने या अरिष्टातून नवी वाट काढण्यासाठी अनेक लोक धर्माचा आधार मिळेल अशी आशा बाळगत आहेत.

सो.युनियनमध्ये राजकीय हक्कांची अवाजवी, असमर्थनीय आणि म्हणूनच निषेधार्ह गळचेपी झाली हे एक कटु सत्य आहे. परंतु साम्राज्यवादी देशांनी क्रांती दडपून टाकण्यासाठी केलेली कट-कारस्थाने व आक्रमणे, लेनिनवर १९१८ साली झालेला प्राणघातक हल्ला, देशातील जमीनदारांनी नियमानुसार सरकारला धान्याची लेव्ही देण्याचे ऐवजी कृत्रिम टंचाई निर्माण करून भाववाढ करण्याकरिता पिकलेल्या धान्याच्या जाळून टाकलेल्या राशीच्या राशी, स्टॅलिनचे आक्रमक व्यक्तिमत्त्व, अशा विविध घटकांचे समालोचन केल्याखेरीज राजकीय हक्कांच्या पायमल्लीचे विवेचन केल्यास, संपूर्ण वास्तवाचे आकलन पुरेशा प्रमाणात होणार नाही. असे विवेचन स्वतंत्रपणे जरूर करता येईल. परंतु धर्मस्वातंत्र्याबाबतच्या धोरणाशी, धर्मसंस्थांच्या अनैतिक कारभारावर घालण्यात आलेल्या बंधनांशी त्याची गल्लत करता कामा नये.

सारांश सो.युनियनमध्ये अंमलात आणल्या गेलेल्या धोरणांच्या गुण-दोषांची, यशापयशाची चर्चा सावधानतेने केल्याखेरीज तेथील संपूर्ण प्रक्रियेचे सम्यक आकलन होणार नाही. विचारवंतांकडून तरी अशा साक्षेपी दृष्टीची अपेक्षा ठेवणे गैर ठरेल काय?

(आजचा सुधारक, ऑक्टोबर १९९६)

❑

पुरोगामी जमातवाद

'मिळून साऱ्याजणी' च्या अंकातील 'पुरोगामी जमातवाद' या लेखाचा वाचकांच्या मनावर ठसा कसा उमटतो यावर, त्याच्यावर होणारी प्रतिक्रिया अवलंबून आहे. हा लेख मुसलमानांना लक्ष्य बनवून लिहिला आहे का पुरोगाम्यांना लक्ष्य बनविण्यात आले आहे असा संभ्रम कदाचित पडू शकेल. परंतु लेख थोडा अधिक काळजीपूर्वक वाचल्यास गेल्या सुमारे १०-१२ वर्षांत उजव्या प्रतिगामी हिंदुत्ववादी शक्तींची जी सरशी सतत होत आहे, त्याबद्दल चिंता वाटत असल्यामुळे हे यश त्यांना का मिळत असावे याबद्दल लेखिका, सुजाता देशमुख हिच्या मनात प्रश्न निर्माण झाला आणि त्याचे निदान एक महत्त्वाचे कारण, पुरोगामी पक्ष, संघटना, व्यक्ती, हिंदु-मुस्लिम प्रश्नाबाबत एकतर्फी, दुराग्रही भूमिका घेतात हे असावे असे तिला वाटले. हे व्यक्त करण्याकरिता हा लेख लिहिला आहे असे आढळून येईल. स्वत:च्या मनात निर्माण झालेली विवंचना काहीशा प्रकर्षाने मांडण्याकरिता लेखाला 'भारतातील हिंदू-मुस्लिम समस्या' किंवा 'मुसलमानांचा धर्मांधतावाद' अशी किंवा अशा स्वरूपाची शीर्षके देण्याचेऐवजी, पुरोगाम्यांना डिवचणारे, काहीसे प्रक्षोभक वाटणारे 'पुरोगामी जमातवाद' असे शीर्षक दिले गेले असावे असे दिसते.

लेखातील तपशीलांबाबत विवेचन करण्यापूर्वी एका महत्त्वाच्या मुद्याची दखल घेणे आवश्यक आहे. पुरोगाम्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेतून, त्यांची जी मूलभूत दृष्टी व्यक्त होते त्याची नोंद लेखात कोठेच घेतलेली नाही. निदान चार उदाहरणे लक्षात घेण्यासारखी निश्चितच आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१) 'सकाळ' या दैनिकामध्ये 'मुल्क प्रस्त' (म्हणजे राष्ट्रवादी) या टोपण नावाने समाजवादी परिवारातील नामवंत पुरोगामी लेखक, यदुनाथ थत्ते लेख लिहीत असत. मुसलमान समाजातील राजकीय अथवा धार्मिक नेत्यांनी केलेल्या वक्तव्यांबाबत अथवा योजलेल्या उपक्रमांबाबत प्रतिकूल भाष्य या लेखांमधून अनेकदा करण्यात येत असे.

२) केरळ राज्यामध्ये व्यभिचाराचा आरोप असलेल्या एका मुस्लिम महिलेला

सार्वजनिक ठिकाणी फटक्याची शिक्षा मुस्लिम धर्ममार्तण्डांकडून जाहीरपणे सुनावण्यात आली होती. या स्त्रीच्या अंगाला हातसुद्धा लावू दिला जाणार नाही, कम्युनिस्ट पक्ष निर्धारपूर्वक तिच्या पाठीशी उभा राहील आणि धर्मांध शक्तींना मागे रेटील असे पत्रक कम्युनिस्ट पक्षाचे श्रेष्ठ नेते कॉ.नंबुद्रीपाद यांनी काढले. त्या स्त्रीला संरक्षण करण्याची कम्युनिस्ट पक्षाने केलेली जय्यत तयारी पाहून, तिच्यावर कोणतीही कारवाई करण्याला मुस्लिम समाजापैकी कोणीही धजावले नाही. त्यानंतर लवकरच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मा.कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला बहुमत मिळाले.

३) १९९३ च्या मे महिन्यामध्ये पुण्यातील समाजविज्ञान अकादमीने 'समान नागरी कायदा' या विषयावर एक चर्चा शिबिर घेतले होते. या चर्चा शिबिराचा समारोप करताना भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नेते कॉ.गोविंदराव पानसरे यांनी जी मांडणी केली त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे -

अल्पसंख्याकांचा अनुनय ही परिवर्तनवाद्यांची अंगभूत भूमिका राहिली आहे असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, ''बहुसंख्याकांचा जातीयवाद अधिक भयंकर आणि अल्पसंख्याकांचा जातीयवाद कमी भयंकर असे समजले जाते, याबाबतही भूमिका अधिक स्पष्टपणे मांडली गेली पाहिजे, बचावात्मक पवित्रा उपयोगी पडणार नाही. आक्रमक भूमिकाच घेण्याची गरज आहे.'' (दै.सकाळ : ७.५.९३)

४) बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर देशातील १६ राज्यात दंगे झाले, त्यात सुमारे २००० लोक मृत्युमुखी पडले. ज्या एका महत्त्वाच्या राज्यात दंगल होण्याची बरीच शक्यता होती, त्या पश्चिम बंगालमध्ये तेथील डाव्या आघाडीच्या सरकारने जी भक्कम भूमिका घेतली आणि संभाव्य दंगा रोखण्याची कसोशीने तयारी केली त्यामुळे राज्यात दंगे झाले नाहीत.

ही, किंवा अशा तऱ्हेची उदाहरणे जर सुजाता देशमुख यांनी मांडली असती तर पुरोगाम्यांची मूलभूत भूमिका वाचकांच्या लक्षात आली असती, आणि तरीही पुरोगाम्यांच्या धोरणात त्रुटी कोणती आहे याचा विचार पुरोगाम्यांसकट सर्व वाचकांनी कदाचित अधिक वस्तुनिष्ठपणे केला असता. लिहिलेला लेख हा पुरोगाम्यांची निंदा-नालस्ती करण्याकरिता लिहिलेला नसून, त्यांच्याविषयी वाटणाऱ्या मैत्रीच्या भावनेतून लिहिलेला आहे असे मानण्याला नि:संदिग्ध पुरावा निर्माण झाला असता.

मूलभूत दृष्टी ही सर्व धर्मांधतावादाशी मुकाबला करण्याची असताना लोकमानसात ती तशा स्वरूपात का रुजली नाही? पुरोगाम्यांविरुद्ध, विशेषत: कम्युनिस्टांविरुद्ध होणाऱ्या अपप्रचारामुळे तसे घडले, असे मानणे संयुक्तिक ठरेल का? कम्युनिस्ट पक्षाने हिंदू-मुस्लिम प्रश्नांव्यतिरिक्त इतर दोन महत्त्वाच्या प्रश्नांबाबत जी भूमिका घेतली त्याचा अगदी संक्षिप्त परामर्श घेतल्याने वरील प्रश्नांचे उत्तर मिळू शकेल.

प्रथम जे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे ते हे, की मूलभूत धोरणाची प्रचिती लोकांना कसोटीच्या किंवा महत्त्वाच्या प्रसंगी अनेकदा यावी लागते. ती जर आली नाही तर

लोक त्या धोरणाविषयी साशंक होऊ लागतात. मीरत कटाचा आणि कानपूर कटाचा खटला या दोनही वेळी, ब्रिटिश राजवट उलथून टाकण्याचा तो कट आहे, असा आरोप ठेवून कम्युनिस्टांना कमी-अधिक मुदतीच्या तुरुंगवासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या. १९४६ साली नौदलाच्या विद्रोही संघर्षाला कम्युनिस्टांनी हिरिरीने सक्रिय पाठिंबा दिला होता. तरीही लोकांच्या मनात कम्युनिस्ट हे राष्ट्रीय-स्वातंत्र्य-द्रोही आहेत अशी प्रतिमा रुजली. याचे मुख्य कारण, म.गांधींना भांडवलदारांचा किंवा नेताजी सुभाषचंद्र बोस यांना जपान्यांचा हस्तक म्हणणे, तिरंगी झेंडा पायदळी तुडवणे, १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाला विरोध करणे, 'रुसकी लढाई हमारी लढाई' अशा घोषणा देणे, १९४७ मधील स्वातंत्र्यप्राप्तीची 'ये आझादी झूटी है' अशी संभावना करणे हे होते. या धोरणाचे आत्मपरीक्षण व आत्मटीका सर्व घटना होऊन गेल्यानंतर कम्युनिस्टांनी केली आहे.

जातिव्यवस्था व तिचा घृणास्पद घटक असलेली अस्पृश्यता याला असलेला प्रखर विरोध कम्युनिस्ट पक्षाने १९३० साली संमत केलेल्या ठरावात पुरेशा सुस्पष्टपणे व्यक्त केला आहे. बहुसंख्य लोकांच्या हा ठराव आता लक्ष्यात नसेल, म्हणून त्यातील फक्त शेवटचा परिच्छेद खाली उद्‌धृत करीत आहे :

''गुलामगिरीचे, जातिव्यवस्थेचे आणि (सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी) विविध रुपातील जातीय विषमतेचे समूळ निर्दालन करण्यासाठी भारताच्या कम्युनिस्ट पक्षाचा लढा आहे. देशातील अस्पृश्य कष्टकरी व इतर सर्व कष्टकरी यांच्यात पूर्ण वा निरपवाद समता निर्माण करण्याकरिता भारताचा कम्युनिस्ट पक्ष लढा देतो.''

प्रश्न निर्माण होतो तो हा की पूर्वास्पृश्य समाजाला, कम्युनिस्टांना अस्पृश्यतेसकट जातिसमस्येविषयी फारशी आस्था वाटत नाही असे का वाटत राहिले? याचे उत्तर पुन्हा हेच आहे की नुसती मूलभूत भूमिका असून भागत नाही. कामगारांच्या जातीय जाणिवा बदलण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणे, कापड गिरण्यांमधील मज्जाव असलेल्या विशिष्ट खात्यात दलितांना प्रवेश मिळावा यासाठी परिणामकारक आग्रह धरणे, राखीव जागांचे जोमाने रक्षण करणे, डॉ.आंबेडकरांचे प्रभावी कर्तृत्व लोकांसमोर सातत्याने आणणे, खेडोपाडी होणारी दलितांची अवहेलना त्यांच्यावर होणारे हल्ले आणि त्यांच्या स्त्रियांवर होणारे बलात्कार, याविरुद्ध प्रत्यक्ष संघर्षात उतरणे, या सर्व बाबतीत कम्युनिस्ट व समाजवादी लक्षणीय कामगिरी बजावू शकले नाहीत, असे दोघेही पुरोगामी आता प्रांजलपणे मान्य करतात.

वरील दोन प्रश्नांबाबत संक्षिप्त आढावा घेण्यामागील हेतू विषयांतर करणे हा नाही. भारतामधील हिंदू-मुसलमान संबंध या तिसऱ्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत सुद्धा पुरोगाम्यांनी थोडे आत्मपरीक्षण करावे, या लेखिकेच्या अपेक्षेत काही गैर आहे असे दिसत नाही, याकडे लक्ष वेधणे हा त्यामागील हेतू आहे. 'आपल्या देशातल्या हिंदू-मुस्लिम संबंधांचा प्रश्न अलीकडच्या काळात अगदी ऐरणीवर आलेला आहे.' असे विधान जरी लेखिकेने

केले असले (पान ४०), तरी त्या लेखात मुख्यत: अलीकडच्या काळातील अतिरेक्यांच्या कारवायांवर दहशतवादी दुष्कृत्यांवर भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम समाजावर ज्या नेत्यांचा मुख्यत: प्रभाव पडला, त्याने त्यांच्या मांडणीबाबत पुरोगाम्यांनी घेतलेल्या भूमिकेविषयी लेखात उल्लेख आलेला नाही. परंतु पुरोगाम्यांनी त्या वेळेस घेतलेली भूमिका जर अगदी थोडक्यात लक्षात घेतली तर त्या (चुकीच्या) भूमिकेशीच प्राय: सुसंगत अशी त्यांची भूमिका आतापर्यंत आहे असे आढळून येईल, म्हणून त्या भूमिकेवर थोडक्यात दृष्टिक्षेप टाकणे गरजेचे आहे.

१९३५ च्या कायद्यानुसार, १९३७ साली निवडणुका झाल्या आणि भारतात त्यावेळी अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या प्रांतांमध्ये काँग्रेसची राजवट अस्तित्वात आली. या राजवटी फक्त दोन वर्षे टिकल्या कारण १९३९ साली ब्रिटिशांच्या धोरणाला विरोध दर्शविण्यासाठी, काँग्रेस मंत्रिमंडळानी सर्वत्र राजीनामा दिला. या दोन वर्षांच्या कालावधीत मुसलमान समाजावर कोणताही खास अन्याय झालेला नसून सुद्धा बॅ.जिना यांनी राजीनाम्याचा दिवस हा मुसलमानांनी मुक्त दिन (Day of Deliverance) म्हणून पाळावा असे फर्मान काढले आणि त्याला मुसलमानांनी फार मोठ्या प्रमाणावर अनुकूल प्रतिसाद दिला. एकसंध राष्ट्रात मुसलमानांचे हिंदूंशी सलोख्याचे संबंध कधीही राहणे शक्य नाही, ही जी त्या फर्मानामागील विचारधारा होती, त्याची औपचारिक मांडणी मुस्लिम लीगने १९४० साली केलेल्या पाकिस्तानच्या मागणीच्या ठरावात करण्यात आली. मुसलमानांसाठी स्वतंत्र राष्ट्राची कल्पना कवी इक्बाल यांनी १९३० साली प्रतिपादन केलेली होती. पाकिस्तान हा शब्द मात्र त्याच दशकाच्या प्रारंभी ख्वाजा अब्दुल रहीम यांनी पहिल्या प्रथम वापरला. या कल्पनेमागची वैचारिक बैठक १९४२ साली जिनांनी अधिक सुस्पष्टपणे खालील शब्दांत व्यक्त केली :

"The difference between Hindus and Muslims is deep rooted and ineradicable. We are a nation with our own distinctive culture and civilisation, language and literature, art and architecture, names and nomenclature, customs and calendar, history and traditions, aptitudes and ambitions."

जिनांच्या आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांच्या या द्विराष्ट्रवादावर कठोर हल्ला करण्यात आणि सामान्य मुसलमानांना त्यापासून परावृत्त करण्यात काँग्रेस व सर्व पुरोगामी अयशस्वी ठरले. १९४४ साली, म.गांधींची सुटका झाल्यानंतर, ते सद्‌हेतूने व उदार मनाने जिनांना त्यांच्या घरी जाऊन, सलोखा स्थापन करावा व दुही टाळावी अशी विनंती करण्याकरिता १४ वेळा भेटले. या भेटीतून ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या फूट पाडण्याच्या राजकीय नीतीचा पराभव होईल अशा समजुतीने पुरोगामी या भेटीकडे आशाळभूतपणे बघत बसले!

वर्गीय परिभाषेत राजकीय विश्लेषण मांडणाऱ्या पुरोगाम्यांना अलग राष्ट्राच्या

मागणीला पाठिंबा कोणाचा आहे हे विस्ताराने समजावून सांगता आले असते. हिंदूंशी स्पर्धा टाळून, वेगळी बाजारपेठ मिळेल या आशेने व्यापारी व उद्योगपती होण्याची आकांक्षा बाळगणारे काही मुस्लिम वेगळ्या राष्ट्रात आपल्याला आपले हित साधता येईल असे समजत होते. काँग्रेसचे काही नेते जमीनदारी नष्ट करण्याची भाषा बोलत होते, म्हणून पाकिस्तान वेगळे राष्ट्र झाल्यास ते संकट टळेल असे मुस्लिम जमीनदारांना वाटत होते. वेगळ्या राष्ट्राच्या शासन यंत्रणेत आपल्याला उच्च पदे मिळतील अशी आशा मुस्लिम सुशिक्षित मध्यमवर्गातील एका घटकाला वाटत होती. तर मुस्लिम परंपरेतील सांस्कृतिक उन्नती वेगळे होण्यानेच साधता येईल असे दुसऱ्या एका घटकाला पटत होते. पारंपरिक मुस्लिम धर्ममार्तण्डांना, वेगळ्या राष्ट्रात आपले वर्चस्व अधिक प्रभावीपणे प्रस्थापित करिता येईल असा भरवसा वाटत होता. मुस्लिम लोकांना भडकवून हिंदूंच्या 'जुलमातून' मुक्त झाल्यावर, त्यांना वेगळ्या राष्ट्रात सुबत्ता प्राप्त होईल असे निराधार आश्वासन देत होते. वर उल्लेखिलेल्या आपमतलबी वर्ग-गटांचा, त्यांच्या समाजद्रोही नेत्यांचा कुटिल डाव उघडकीला आणून त्यावर प्रखर प्रहार करण्याऐवजी, पुरोगामी, 'राम-रहीम-भाऊ-भाऊ' हीच गांधीवाद्यांची घोषणा मुख्यत: आळवीत बसले. शेवटी 'प्रत्यक्ष कृतीची' हाक देऊन (direct action day) कत्तली घडवून आणून देशाचे विभाजन करण्यात, धर्माशी कसलीही बांधिलकी नसलेले जिना यशस्वी झाले.

हिंदुत्ववाद्यांच्या संकुचित, आधुनिक मूल्यांशी विसंगत अशा आक्रमक राष्ट्रवादावर, अनेक विषयांवरील त्यांच्या विपर्यस्त मांडणीवर व प्रक्षोभक निराधार प्रचारावर, पुरोगाम्यांनी निकराचा हल्ला चढविला ते योग्यच होते आणि आजही ते योग्यच आहे. परंतु स्वातंत्र्यापूर्वीच्या आपल्या धोरणांचा फेरविचार करून, देशातील मुसलमान नेत्यांच्या व संस्था-संघटनांच्या वक्तव्यांवर व कारवायांवर, तसेच पाकिस्तान स्थापन झाल्यानंतर सुद्धा सतत कुरघोडी करणाऱ्या तेथील नेत्यांवर, त्यांच्या विविध कारस्थानांवर जर पुरोगाम्यांनी सतत आघात केले तर सर्व धर्मांधतावाद्यांविरुद्ध तत्त्वनिष्ठ भूमिका घेणारी स्वतंत्र शक्ती या नात्याने लोक त्यांना पाठिंबा देण्याची शक्यता वाढू शकेल. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर सुद्धा सुमारे ४० वर्षे हिंदुत्ववाद्यांचे सामर्थ्य वाढू शकले नाही हे विसरता कामा नये. परंतु, पुरोगामी, उदारमतवादी, काँग्रेससारखे डावे लोकशाहीवादी हे बहुतेक सर्वच पक्ष-संघटना-व्यक्ती एकतर्फी भूमिका घेत असल्याचे लोकांना आढळले, त्यावेळेस काही एक कारण नसताना बाबरी मशीद उध्वस्त करण्याच्या दुष्कृत्यांना सुद्धा ते प्रत्यक्षाप्रत्यक्ष पाठिंबा देण्यास प्रवृत्त झाले. लोकशाही-समता-संस्कृती या विषयावरील त्यांच्या प्रतिगामी विचारसरणीकडे दुर्लक्ष करून त्यांना मोठ्या संख्येने लोकांनी निवडून दिले. या खेदजनक सत्याकडे पुरोगाम्यांनी अधिक डोळसपणे बघणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तेलंगणच्या लढ्याच्या काळात तेथील कम्युनिस्ट जसे जमीनदारांच्या अन्यायाविरुद्ध लढले तसे, निजामाच्या

पाठिंब्याने थैमान घालणाऱ्या रझाकारांशीसुद्धा जोमाने लढले. 'दंग्यांशी लढा, मुसलमानांशी लढू नका.' अशी घोषणा जर ते देत बसले असते तर आपल्या लढ्याच्या क्षेत्रातील रझाकारांना नामोहरम करण्यात त्यांना यश आले नसते. हीच परंपरा पुढे यावी असे सुजाता देशमुखांच्या लेखातील मुख्य आवाहन आहे असे दिसते.

या लेखाचा मुख्य हेतू सुजाताच्या प्रत्येक विधानाचे विवेचन करणे हा नाही. त्यामुळे फक्त काही विधानांबद्दल भाष्य नोंदवित आहे. श्रीकृष्ण आयोगाने तपशीलवार माहिती गोळा करून त्यावर बाबरी मशीद जमीनदोस्त करण्यात आल्यानंतर व मुंबईतील दंगलीनंतर त्याला प्रत्युत्तर म्हणून बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले, असा निष्कर्ष काढला आहे. 'बाबरी मशीद पाडली गेली नसती तरीही मुंबईतले बॉम्बस्फोट त्या काळात घडले असते,' असे विधान कोणत्या विश्वसनीय आधारावर विसंबून केले आहे, त्याचा आधार देणे आवश्यक आहे. आय.एस्.आय. अथवा अन्य परदेशस्थ व्यक्ती-संघटनांच्या कारवाया किंवा खोट्या नोटांची पुडकी कोणत्याही मार्गाने आपल्या देशात आणणे याचा तीव्र निषेध नोंदविणे आवश्यक आहे हे खरे. परंतु अशी सर्व कारस्थाने उघडकीला आणण्याइतपत आपली पोलीस व लष्करी दले सक्षम आहेतसे दिसते. पाकिस्तानने भारतावर लादलेल्या सर्व युद्धात पाकिस्तानचा दारुण पराभव झालेला आहे. असे असताना भारतातल्या सर्वसामान्य हिंदू नागरिकांत असुरक्षिततेची आणि भीतीची भावना निर्माण होते असे वाटण्याचे कारण काय ते लेखात स्पष्ट झालेले नाही. अल्जीरिया, ट्युनिशिया, बॉस्निया, लेबेनॉन, पॅलेस्टाईन या देशांमध्ये मुसलमानांना जी वागणूक सहन करावी लागली, त्यामुळे चर्चेस पाडणे हे समर्थनीय नसले तरी अंशत: तरी समजण्यासारखे आहे. परंतु हिंदुंच्या समाजव्यवस्थेतील जुलमामुळे मुख्यत: येथील लोकांनी ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्म स्वीकारला. त्यामुळे हिंदू आक्रमक दलांनी ख्रिश्चनांची चर्चेस पाडणे, मालमत्ता नष्ट करणे, त्यांच्यावर प्राणघातक हल्ले करणे, स्त्रियांचे अपहरण करणे, अथवा बलात्कार करणे याचा अधिक तीव्रपणे निषेध करणे संयुक्तिक आहे असेच मानावे लागेल. सुशिक्षित मराठी युवकांना नोकऱ्या मिळत नाहीत या कारणाकरिता उडप्यांची उपाहारगृहे लुटण्याचा 'पराक्रम' याच हिंदु धर्माभिमान्यांनी केला होता हे विसरून चालण्यासारखे नाही. काश्मिरमधील अतिरेक्यांचा निषेध करणे रास्त असले तरी १९७७ साल वगळून त्या राज्यात एकही खुली निवडणूक झाली नाही, तेथे ओतण्यात आलेला प्रचंड प्रमाणावरील पैसा सामान्य माणसापर्यंत पोहोचलाच नाही, तेथील असंतोषाची महत्त्वाची कारणे आहेत, याकडे पुरोगाम्यांनी लक्ष वेधले तर त्यात काही आक्षेपार्ह आहे असे म्हणता येणार नाही. जागतिक पातळीवर हिंदू अल्पसंख्य असले (शीख, जैन, ज्यू, बहाई, कोणताच धर्म नसलेले, असे कितीतरी अल्पसंख्य जगात आहेत.) तरी फक्त दोन देशांत केंद्रित झालेले आहेत. मुसलमान हे विघटित सोविएत युनियनमधील मुसलमान धरून, ३९ देशांत विभागलेले आहेत, आणि ते आपापसात लढत असतातच. (इराक-

इराण, पाकिस्तान-बांगलादेश इ.) त्यामुळे अल्पसंख्याकांचे हे 'सत्य' मांडून नेमके काय साधावायचे आहे ते लेखात स्पष्ट झालेले नाही. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर युद्ध लादले तर त्याचा प्रतिकार राष्ट्र या नात्यानेच करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु दहशतवादी मुकाबला हा लोकशाही - न्याय - सहिष्णुता या तत्त्वांना अनुलक्षून निर्धाराने करावयास हवा.

सुजाता देशमुख यांच्या लेखामध्ये पुरोगाम्यांवर आगपाखड करण्यात आली असली, त्यांचे प्रत्येक विधान जरी पटले नाही तरी त्यामुळे अस्वस्थ किंवा संतप्त होऊन काही साधेल असे नाही. अद्याप न सुटलेल्या हिंदू-मुस्लिम प्रश्नावर पुरोगाम्यांनी आपण आतापर्यंत घेतलेल्या भूमिकांचा आढावा घेणे आवश्यक आहे किंवा नाही याचे वस्तुनिष्ठपणे समीक्षण करणे हेच अधिक हितावह ठरेल. हिंदुत्ववाद्यांकडे झुकत चाललेले लोकमत रोखण्यासाठी याची नितांत गरज आहे.

(मिळून साऱ्याजणी, दिवाळी २००१)

❑

राखीव जागा : चाकोरीबाहेरील सखोल चर्चा

● ''भारतात आज दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या २६ कोटींच्या घरात गेली आहे. दारिद्र्य हा देशातील सर्वात लक्षणीय शत्रू आहे.'' राष्ट्रपती अब्दुल कलाम, हैद्राबाद येथील भाषण दि. ६ जून २००३.

● ''देशातील ८ कोटी ७० लाख मुलांचे फटाके, काच, गालिचे अशा धोकादायक उद्योगांसकट विविध उद्योगांत जबरदस्त शोषण होते आहे'' रुपाल, न्यायाधीश सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली.

● अधिकृत आकेडवारीनुसार

१. सध्या देशात असलेली लोकसंख्या लक्षात घेता, दरवर्षी युवा पिढीसाठी एक कोट इतका रोजगार निर्माण करावा लागणार आहे.

२. भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५६ वर्षे झाली असली तरी अद्याप देशातील प्रौढ लोकसंख्येपैकी ५४ टक्के लोक निरक्षर आहेत.

राखीव जागांविषयी उलट-सुलट चर्चा करिताना वरील वास्तव लक्षात घेतल्याशिवाय विषयाची मांडणी अर्थपूर्ण होत नाही. राखीव जागांच्या निर्मितीचा इतिहास सांगून, अथवा प्रगत जातींवर नुसती आग पाखडून मूलभूत समस्या सुटत नाही. म्हणून राखीव जागांना पाठिंबा देत असताना, विस्मरण होता कामा नये असे जे मुद्दे आहेत ते कोणते?

मर्यादित नोकऱ्या हजारो लोकांच्यात जर वाटावयाच्या असतील, तर सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या शबल घटकांना संधी मिळावी याकरिता ज्या न्यायाधिष्ठित तत्त्वाचा पुरस्कार करावा लागतो, त्या तत्त्वाचेच नाव राखीव जागा असे आहे. म्हणूनच अशा घटकांसाठी राखीव जागा ठेवणे क्रमप्राप्त ठरते. परंतु राखीव जागा कायम ठेवल्या जाव्यात अशी त्यात अपेक्षा नसते.

स्वातंत्र्यलढा चालू असताना नेत्यांनी जी वचने दिली होती ती लक्षात घेता, आपल्या देशाची प्रगती झपाट्याने होईल, आणि त्याबरोबर राखीव जागांची गरज स्वातंत्र्य मिळाल्यापासून सुमारे दहा वर्षांत संपेल अशी अपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर

यांनी व्यक्त केली होती. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्ताभिलाषा, संपत्ती संचय, बेसुमार काळाबाजार व भ्रष्टाचार, अकार्यक्षम राज्यकारभार यातच बहुसंख्य नेते मश्गुल होऊन बसले हा इतिहास आता सर्वज्ञात झाला आहे.

नोकऱ्यात राखीव जागा ठेवणे योग्य असले, तरी उच्च शिक्षणासकट सर्व शिक्षणासाठी देशांतील सर्वांना निरपवादपणे, कोणताही अडसर न ठेवता, संधी असली पाहिजे, मग त्याकरिता सर्व सुविधांसहित शिक्षण संस्था तीन पाळ्यांमध्ये (शिफ्टस्‌मध्ये) चालवाव्या लागल्या तरी चालेल, असे डॉ.राममनोहर लोहिया यांनी मांडून ठेवले आहे. परंतु शिक्षणावर अत्यल्प खर्च सतत करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी मुबलक जागा ठेवण्याची तरतूद केली नाही. जागा मर्यादित असल्यामुळे, दलित व अन्य मागासवर्गीयांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी याकरिता राखीव जागा ठेवणे न्यायाला धरून व त्यामुळे आवश्यक होते.

खुंटित विकासाचा वासाहतिक वारसा असल्यामुळे, भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेच, नागरिकांचा रोजगाराचा हक्क हा राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीत समाविष्ट करणे शक्य नव्हते हे खरे आहे. परंतु गेल्या १६ वर्षांत या महत्त्वपूर्ण हक्काला मूलभूत हक्काचे स्थान देणे कधीही शक्य नव्हते असे मात्र निश्चितच म्हणता येणार नाही. परंतु तथाकथित उदारमतवादी काँग्रेस आणि 'विकास व लोकपुरुषांच्या' खांद्यावर उभे असणारे प्रचलित सत्ताधारी या दोघांनाही रोजगार निर्मितीची जबाबदारी टाळावयाची असल्यामुळे, या हक्काकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले. रोजगार निर्मितीची जबाबदारी टाळावयाची असल्यामुळे, विविध समाज घटकात सतत बेबनाव चालू ठेवण्यातच या दोन्ही प्रकारच्या सत्ताधाऱ्यांना स्वारस्य आहे. इतर मागासवर्गीय जातींपैकी तुलनेने कनिष्ठ अशा जातींमध्ये जसजसे शिक्षण वाढेल व जागृती निर्माण होईल, तसतसा तुलनेने वरिष्ठ व प्रबल जातींविरुद्ध त्यांच्या मनामध्ये आज असलेला असंतोष अधिक तीव्र होत जाईल. याचे कारण इतर मागासवर्गीयांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागांपैकी बहुसंख्य जागा वरिष्ठ जातीयांनी 'बळकावल्या' आहेत असे कनिष्ठ जातींना दिसेल व वाटू लागेल. आज महाराष्ट्रामध्ये दलित जातींपैकी मातंग समाजामध्ये बुद्ध व बुद्ध न झालेल्या महारांविरुद्ध रोष उत्पन्न झाला आहे हे सर्वश्रुतच आहे.

आज देशामध्ये सुमारे २५ लाख लघुउद्योग 'आजारी' म्हणजेच रोजगार निर्मिती करण्यास अपात्र ठरले आहेत. मोठे उद्योग आपल्या असलेल्या कामगार कर्मचाऱ्यांना मुदतपूर्व ऐच्छिक निवृत्ती घेण्यास प्रवृत्त करून, नवीन रोजगार निर्मिती रोखून ठेवीत आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग मोडीत काढण्याचा सपाटा चालूच आहे. सरकारी खात्यात रिकाम्या जागा न भरण्याचे आदेश निघत आहेत. रोजगार निर्मितीच्या या दयनीय अवस्थेपासून लोकांचे लक्ष विचलित करण्याकरिता इतर मागासवर्गीय जातींच्या संख्येत वाढ करणे, किंवा प्रगत जातींकरिता काही जागा राखून ठेवणे असे प्रस्ताव पुढे सरकविण्यात येत आहेत.

दलित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय यांच्याकरिता असलेल्या राखीव जागांमध्ये कपात न करिता, प्रगत जातीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काही जागा राखून ठेवणे जर शक्य असेल, तर त्यामुळे काही बिघडेल असे नव्हे. त्याकरिता घटनादुरुस्ती करावी लागली तरी ते फार दुरापास्त आहे असे नाही. सर्वोच्च न्यायालयाने राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये हा दिलेला निर्णय बंधनकारक आदेशाच्या स्वरूपाचा नाही. महाराष्ट्रात ही शिफारस पाळली जाते असे नाही. दक्षिणेतील इतर राज्यांत तर त्या शिफारसींकडे रीतसर दुर्लक्ष करण्यात येते आहे.

महत्त्वाचा मुद्दा आहे तो हा की, सर्व पातळीवरील सर्व राखीव जागा जरी भरल्या गेल्या तरी सर्व समाजघटकांमध्ये, विशेषत: मागासवर्गीयांमध्ये बेकारांची संख्या प्रचंड प्रमाणावर शिल्लक राहणारच आहे. समाजविन्मुख नव्या आर्थिक धोरणामुळे या संख्येत वाढ होणार आहे. राखीव जागांमधून निर्माण होणारा मध्यमवर्ग आपल्या समाजापासून तुटून, स्वार्थांध व सत्तांध होण्याचीच लक्षणे दिसत आहेत. राखीव जागांमुळे फक्त मर्यादित लोकांना काहीसाच फायदा होणार असला तरी त्याला विरोध करता कामा नये. सध्याच्या सत्ताधाऱ्यांना राखीव जागांबाबतची वावटळ का उठवून द्यावीशी वाटली असावी त्याचा नीट विचार करणे आवश्यक आहे.

रथयात्रेच्या आक्रमक जल्लोषात सामील होऊन, बाबरी मशिदीच्या विध्वंसनानंतर राममंदिर उभारण्याकरिता देशातील १६ राज्यांमध्ये सुमारे २ हजार लोकांच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्यानंतर हिंदुत्व परिवाराला सत्ता काबीज करता आली. परंतु २४ पक्षांच्या पाठिंब्याने राज्यकारभार चालविणे अपरिहार्य ठरल्यामुळे राममंदिर उभारण्याचे स्वप्न पुढे ढकलावे लागले. सत्तेमध्ये नसताना 'आझाद काश्मीरवर तोफा रोखा' अशी गर्जना करणाऱ्या वक्तृत्ववीर नेत्यांना विमानाचे अपहरण झाले तेव्हा दहशतवाद्यांसमोर शरण जाणे भाग पडले. कारगीलला सुरूवातीला थप्पड बसली ती वेगळीच. पोखरण येथे स्फोट करून युद्धज्वर पेटवला असताना सुद्धा खुद्द लोकसभा चालू असताना मंत्री आणि खासदार यांचे प्राण धोक्यात आले. गुजराथमधील हत्याकांडानंतर झालेल्या निवडणुकीत मिळालेल्या यशाची लाट सर्वत्र झेपावत जाईल अशी आरोळी ठोकणाऱ्यांचा आवाज, थोड्याच अवधीत हिमाचल प्रदेशातील निवडणुकींच्या निकालांनी बंद पडला. कोणतेही सबळ कारण नसताना ख्रिश्चनांची हत्या व मालमत्तेचे विध्वंसन करूनही ख्रिश्चनांचे 'शुद्धीकरण' करून त्यांना 'पवित्र व सहिष्णू' हिंदुत्व परिवारात सामील करून घेता आले नाही. निवडणुका जवळ येत असल्यामुळे, हे सारे अपयश भरून काढण्याकरिता काही पावले उचलणे आवश्यक होऊन बसले. ती मौलिक पावले कोणती?

कल्याणच्या मुसलमान सुभेदाराची सून ताब्यात आली असताना तिला सन्मानाने परत पाठविणाऱ्या शिवाजी महाराजांवरील सत्य अथवा दंत कथेवर टिप्पणी करताना, 'त्यापेक्षा महाराजांनी तिला एखाद्या (हिंदू) सरदाराला देऊन टाकावयास हवे होते'

अशी खास हिंदुत्वाधिष्ठित नीती सांगणाऱ्या, डॉ. आंबेडकरांच्या बुद्ध धर्म स्वीकृतीवर भाष्य करताना, शंभर पाय असलेल्या गोमेचा एक पाय तुटल्याने काही बिघडत नाही अशा आशयाची प्रतिक्रिया देणाऱ्या वीर सावरकरांचे तैलचित्र लोकसभेच्या मध्यवर्ती सभागृहात लावण्यात आले. पुढील निवडणूक जाहीरनामा हा भारतीय विकासाच्या आराखड्याचा असेल अशी घोषणा करण्यात आली आहे. १५ वर्षांखालील बालकांच्या कल्याणासाठी स्वायत्त आयोग नेमण्याची घोषणा, काश्मीरचे प्रादेशिक विभाजन, प्रगत जातींकरीता राखीव जागा किंवा इतर मागासवर्गीयांच्या संख्येत वाढ व नद्या जोडण्याचा प्रकल्प ही याच मालिकेतील यशाभिलाषी पावले आहेत. ही धूळफेक सहन करावयाची की काही अन्य विचार करावयाचा?

सर्व श्रमजीवी व बुद्धिजीवी समाजघटकांनी आमूलाग्र समाज परिवर्तनाच्या संघर्षात एकजुटीने सामील होणे आणि स्वार्थाला दुय्यम स्थान देणारा नवा मानव निर्माण करणे यातच सर्वांचे हित आहे. या सत्याची जाणीव सर्व विचारी भारतीयांना लवकर होईल अशी आशा बाळगण्यास २१ मे, २००३ रोजी झालेल्या देशातील सुमारे चार कोटी लोकांच्या संपाने आधार दिला आहे. परंतु या संपाची दखल महाराष्ट्रातील कोणत्याही महत्त्वाच्या पुरोगामी नियतकालिकांनी घेतलेली नाही हे खेदजनक सत्यही दृष्टिआड करून चालण्यासारखे नाही.

(अप्रकाशित लेख, जून २००३)

❑



क्युबावर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांमुळे क्युबाला धान्य इत्यादी पुण्यातून पाठविण्यासाठीच्या मोहिमेच्या वेळचे छायाचित्र. क्युबाच्या भारतातील वकील सोनिया दिआस लारा ह्यांच्या सोबत डावीकडून, कॉ. सुरेश मोहिते, कॉ. अजित अभ्यंकर, रा. प. नेने, दत्ता देसाई.



एका कार्यक्रमात रा. प. नेने आणि भाई वैद्य.



पुरोगामी पक्ष–संघटना आयोजित शिवजयंती – एकता उत्सवात डावीकडून रा. प. नेने, कॉ. पवार, ताहेरभाई पूनावाला, कॉ. अजित अभ्यंकर, कॉ. शिंदे, कॉ. चव्हाण.




प्रोग्रेसिव्ह मुस्लिम फोरम व मुस्लिम सत्यशोधक युवामंच आयोजित वक्तृत्व स्पर्धेत भाषण करताना रा. प. नेने, डावीकडून प्रा. शमसुद्दीन तांबोळी, सय्यदभाई, डॉ. श्रीराम लागू.



एस्. एफ्. आयच्या २००३ मधील राज्य अधिवेशनामध्ये भाषण करताना रा. प. नेने, डावीकडून शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. द. ना. धनागरे, एस्. एफ्. आयचे तत्कालीन अध्यक्ष उमाकांत राठोड.



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रभाकर मानकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमात डावीकडून कॉ. सदाशिव भट, रा. प. नेने, कॉ. सतीश चव्हाण.



लोकसांस्कृतिक मंचाच्या पंजाब
नॅशनल बँकेतील कार्यक्रमात रा. प. नेने.



रा. प. नेने. ह्यांच्या ऐंशीव्या वाढदिवस समारंभात ताहेरभाईंच्या
हस्ते नेन्यांचा सन्मान केला तो प्रसंग.
(डावीकडून शैलेश डिखळे, अच्युत बोरगावकर.)

स्त्री-प्रश्न

महिलांचा राजकारणातील सहभाग

१९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जगभर पाळण्यात आले. त्यानंतर दशकभर स्त्री-दमनाच्या हरएक पैलूंकडे व स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यांकडे लक्ष वेधण्यात आले. चार आंतरराष्ट्रीय परिषदांमधून देशोदेशींच्या परिस्थितीचा ढोबळ मानाने आढावा घेण्यात आला आणि विविध पातळ्यांवर आवश्यक असणाऱ्या कृतींचा ऊहापोह करण्यात आला. एवढी व्यापक चर्चा आणि आंदोलने झाली असूनही काही देशात महिलांना काही हक्क देण्याकरिता काही कायदे झाले असूनसुद्धा बहुसंख्य महिलांच्या परिस्थितीत बहुतांश देशात लक्षणीय फरक पडलेला नाही. केवळ भारताचेच उदाहरण घ्यायचे झाले तर देशात आज फक्त ३९.१९ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. स्त्रियांचे पुरुषांशी प्रमाण दर १००० पुरुषांमागे ९२७ स्त्रिया असे आहे. इंग्लंडमध्ये हेच प्रमाण १०६० स्त्रिया तर अमेरिकेत १०३३ स्त्रिया असे आहे. सरकारी आकडेवारीप्रमाणे भारतात दर ५६ मिनिटात एका तरी स्त्रीवर बलात्कार होत असतो, दर १ तास ४२ मिनिटाला हुंडाबळी घडत असतो तर दर २६ मिनिटाला विनयभंग होत असतो. महाराष्ट्रासारख्या तुलनेने प्रगत राज्यात अनेक बालविवाह होत असूनही गेल्या दहा वर्षांत बालविवाह प्रतिबंधक कायद्याखाली फक्त एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विविध देशांतील कमी-अधिक उद्वेगजनक परिस्थिती व काही देशातील तुलनेने उल्हासवर्धक परिस्थिती लक्षात घेऊन १९९५ साली बीजिंग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. सामाजिक व राजकीय समस्यांबाबत प्रामुख्याने जेथे निर्णय घेतले जातात व त्या निर्णयांवर अधिष्ठित असे जे कायदे केले जातात अशा दर एका देशातील (काही अपवाद वगळून) प्रातिनिधिक संस्थांमध्ये म्हणजेच त्या-त्या देशातील लोकसभा-राज्यसभांमध्ये महिलांचे प्रमाण कमी असते याची जाणीव बीजिंग परिषदेला होती. परंतु त्याबाबत अधिकृत पाहणीच्या आधारे निष्पन्न झालेली नेमकी आकडेवारी त्या वेळेस उपलब्ध नव्हती. स्त्रियांचे प्रमाण या प्रातिनिधिक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढविता आले तर केवळ स्त्रियांना न्याय प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल एवढेच नव्हे तर सर्व

निर्णयप्रक्रियांमध्ये स्त्रियांचा सहभाग जर वाढला तर लोकशाही बलवत्तर करण्याच्या दृष्टीने ते एक अत्यावश्यक इष्ट पाऊल ठरेल असा निर्णय बीजिंग परिषदेत घेण्यात आला. प्रातिनिधिक संस्थांमध्ये महिलांचे प्रमाण वाढवून घेण्याचे प्रयत्न त्वरित करण्याबाबतही एकमत झाले. आवश्यक ती पाहणी झाल्यानंतर जो अहवाल तयार होईल तो पायाभूत मानून त्यावर चर्चा करण्याकरिता एक आंतरराष्ट्रीय परिषद (चर्चासत्र) भारतात दिल्ली येथे घेण्याची जबाबदारी भारतीय प्रतिनिधींनी स्वीकारली.

वरील निर्णयानुसार जागतिक राष्ट्र संघटनेच्या सहकार्याने कार्य करणाऱ्या आंतरदेशीय लोकप्रतिनिधी संघटनेने (इंटरपार्लमेंटरी युनियनने) १८६ देशांची पाहणी करून एक अहवाल तयार केला, हा अहवाल सरोजिनी नायडू यांच्या जन्मदिनाच्या दिवशी १३ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आला आणि त्याच दिवशी नियोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे (चर्चासत्राचे) उद्घाटन राष्ट्रपती श्री. शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले.

या अहवालाचे शीर्षक 'राजकीय प्रक्रियेमध्ये स्त्री-पुरुषांचा समान सहभाग' (टुवर्डस् पार्टनरशिप बिटवीन मेन अँड विमेन इन पॉलिटिक्स) असे आहे. स्त्री-पुरुषांमध्ये अवाजवी व अव्यवहार्य सामना याच्याऐवजी दोघांच्या समंजस सहकार्याने अर्थपूर्ण लोकशाही यावर भर देणारे हे शीर्षक आहे. त्यामुळे या परिषदेत केवळ स्त्रियांनी भाग घेतला नव्हता. भारतासकट ७८ देशातील १२१ पुरुष व ११९ महिला दिल्ली येथील या परिषदेला अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या व्यतिरिक्त अनेक स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी आणि अन्य निमंत्रितही निरीक्षक म्हणून सहभागी झाले होते.

अहवालाचे शीर्षक सामंजस्यावर भर देणारे असले तरी विविध देशातील वस्तुस्थिती मांडताना त्यात सत्य लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला नाही. संयुक्त राष्ट्र संघ व मानवी हक्कांची जागतिक सनद (युनिव्हर्सल डेक्लरेशन ऑफ ह्यूमन राईटस्) या दोघांनी प्रत्येक देशातील प्रत्येक व्यक्तीस आपापल्या देशांच्या शासकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क आहे याला निःसंदिग्ध मान्यता दिलेली असूनही असंख्य प्रगत व अप्रगत अशा दोनही प्रकारच्या देशांमध्ये स्त्रियांचा सहभाग किती अल्प प्रमाणात आहे यावर लख्ख प्रकाश या अहवालात टाकण्यात आला आहे.

अहवालातील काही निवडक निष्कर्षांवरून वस्तुस्थितीची कल्पना येऊ शकेल.

- ज्या १८६ देशांचा समावेश या अहवालात आहे त्या सर्व देशांच्या लोकप्रतिनिधी सभागृहांची सरासरी जर काढली तर त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण फक्त ११.७ टक्के आहे. १९८८ साली हेच प्रमाण १४.८ टक्के होते म्हणजे पुढील कालखंडात सुधारणा होण्याच्या ऐवजी ऱ्हासच झाला आहे.
- भारतातील लोकसभेमध्ये स्त्रियांचे प्रमाण ७.२ टक्के आहे.
- अमेरिकेसारख्या लोकशाहीवर अधिष्ठित असलेल्या प्रगत देशातसुद्धा तेथील

लोकप्रतिनिधी सभागृहामध्ये स्त्रियांचे प्रमाण फक्त ११.७ टक्के होते. १९९५ च्या निवडणुकीनंतरसुद्धा फरक पडलेला नाही. तेथील आपल्या लोकसभेसदृश हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज्च्या एकूण ४३५ सदस्यांपैकी फक्त ५१ स्त्रिया आहेत आणि आपल्या राज्यसभेसदृश सेनेटमध्ये १०० सदस्यांमध्ये फक्त ९ स्त्रिया आहेत.

● लोकशाहीची जननी म्हणून संबोधिल्या गेलेल्या इंग्लंडमधील लोकसभेमध्ये स्त्रियांचे प्रमाण फक्त ९.५ टक्के आहे, तर समता, बंधुता, स्वतंत्रता या तीन ध्येयांचा जयघोष करून १७८९ साली क्रांती घडवून आणणाऱ्या फ्रान्स या देशातील लोकसभेमध्ये स्त्रियांचे आजसुद्धा प्रमाण फक्त ६.४ टक्के आहे. (फ्रेंच राज्यक्रांतीला १५६ वर्षे उलटून जाईपर्यंत फ्रान्सच्या लोकसभेमध्ये एकही स्त्रीप्रतिनिधी नव्हती.)

● चीन, क्युबा किंवा उत्तर कोरिया यासारख्या मर्यादित राजकीय लोकशाही असलेल्या देशांमधील लोकसभांमध्ये स्त्रियांचे प्रमाण सुमारे २० टक्के आहे.

● भूतान, कॉमोरोस, जिबौटी, कुवेत, युनायटेड अरब एमिरेटस्, पापुआ न्यू गिनी यासारख्या देशांमध्ये तेथील लोकसभांमध्ये एकही स्त्रीप्रतिनिधी नाही. एवढेच नव्हे तर यातील काही देशात स्त्रियांना मतदानाचा व निवडणुकीला उभे राहण्याचा हक्क नाकारण्यात आला आहे.

● या सर्व परिस्थितीशी तुलना करता, नॉर्डिक देश असे ज्यांना म्हणतात त्या नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, फिनलंड, नेदरलंडस् या सारख्या देशांनी स्पृहणीय प्रगती केली असल्याचे आढळते. स्वीडनमधील लोकसभेमध्ये स्त्रियांचे प्रमाण ४०.४ टक्के आहे आणि तेथील मंत्रिमंडळात स्त्रियांचे प्रमाण ५० टक्के आहे. यातील इतर नॉर्डिक देशांमध्ये स्त्री खासदारांचे प्रमाण ३० ते ३६ टक्के आहे. परंतु हे सर्व आज स्वागतार्ह असले, तरी विसरता कामा नये ते हे की, स्वीडनची पहिली लोकसभा १४३५ साली स्थापन झाली; स्त्रियांना त्यात प्रवेश मिळण्यास मात्र त्यानंतर ४८६ वर्षे वाट पाहावी लागली. आईसलंड या देशात १८४५ साली लोकसभा स्थापन झाली; स्त्रियांना त्यात प्रवेश १९२२ साली म्हणजे ७७ वर्षांनी मिळाला.

● लोकप्रतिनिधी गृहांमध्ये महिलांसाठी विशिष्ट प्रमाणात जागा राखून ठेवण्याचा कायदा सध्या अर्जेंटिना, बेलजम, ब्राझिल, उत्तर कोरिया, नेपाळ व फिलिपाईन्स या सहा देशांत आहे. भारतात ही तरतूद करण्याचा कायदा अद्याप भिजत पडला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या आजच्या लोकसभेत एकूण ४५० खासदारांपैकी महिला ११० आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे.

दिल्लीमध्ये उद्घाटनाच्या सत्रापासून पाच दिवस चाललेल्या परिषदेत (चर्चासत्रात) तीन प्रमुख विषयांवर चर्चा झाली. प्रसारमाध्यमांमधून स्त्रीची रेखाटण्यात येणारी प्रतिमा, निवडणुकांसहित राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेले स्त्रियांचे प्रशिक्षण आणि निवडणुकीतील प्रचार मोहिमेसाठी स्त्रियांना आवश्यक असणारा निधी या तीन विषयांवर झालेल्या चर्चेतील मतैक्य व मतभेद लक्षात घेऊन,

शेवटच्या सत्रानंतर साधारणतः सर्व मान्य होईल असा पुढील कृती कार्यक्रम सुचविण्यात आला. तो लोकसभेचे सभापती आणि या संपूर्ण परिषदेचे अध्यक्ष श्री.पी.ए. संगमा यांनी सर्वांसमोर सादर केला आणि परिषदेचा समारोप पंतप्रधान श्री.देवेगौडा यांच्या हस्ते करण्यात आला.

इतक्या महत्त्वपूर्ण परिषदेला आपल्या देशातील वर्तमानपत्रांनी फारच थोडी प्रसिद्धी दिली, प्रमुख वर्तमानपत्रांनी या परिषदेला पहिल्या पानावर अथवा अन्यत्र, लक्षवेधी स्थान दिले नाही याबद्दल परिषदेला आलेल्या काही प्रतिनिधींनी खेद व्यक्त केला. जी अपुरी प्रसिद्धी मिळाली तीसुद्धा मुख्यतः इंग्रजी वर्तमानपत्रांतून मिळाली. अन्य सुप्रसिद्ध नियतकालिकांमधून अद्याप या परिषदेवर लेख आलेले नाहीत हेही एक बोलके सत्य आहे. या परिषदेत सहभागी होणाऱ्या अधिकृत प्रतिनिधींमध्ये निम्मे पुरुष असूनही (किंबहुना स्त्रियांपेक्षा दोन पुरुषच अधिक होते) असे का घडले असावे? वर्तमानपत्रांमध्ये अद्याप पुरुषांचे वर्चस्व फार मोठ्या प्रमाणावर आहे आणि त्यांची मानसिकता पुरेशी बदललेली नाही हेच त्याचे कारण असावे अशी शंका परिषदेमध्ये व्यक्त करण्यात आली. प्रसारमाध्यमे आता स्त्रियांना स्थान देऊ लागली असली तरी त्यांचे शारीरिक सौंदर्य व खासगी जीवन यावरच फार मोठ्या प्रमाणावर भर दिला जातो. पुरुषसत्ताक समाजाने ठरविलेल्या त्यांच्या पारंपरिक गुणवत्तेचेच कौतुक प्रामुख्याने होत असते. आधुनिक सामाजिक जीवनात स्त्रियांनी दाखविलेल्या कर्तबगारीला पुरेशी प्रसिद्धी दिली जात नाही आणि म्हणून केवळ लोकसभेत नव्हे तर निर्णयप्रक्रिया जेथे जेथे होते अशा शिक्षणसंस्था, वित्तसंस्था, न्यायसंस्था, प्रसारमाध्यमे अशा सर्व संस्थांमध्ये स्त्रियांचे प्रमाण बरेच वाढल्याखेरीज स्त्रियांची अवहेलना संपुष्टात येणार नाही असे आग्रहपूर्वक मांडण्यात आले. एवढे सगळे घडले तरी स्त्रियांना आपला ठसा उमटविण्याकरता निर्धारपूर्वक पावले आत्मविश्वासाने टाकावी लागतील याकडे स्वीडनच्या महिला प्रतिनिधींनी लक्ष वेधले. स्वीडनच्या लोकसभेच्या एकूण ३४९ सदस्यांपैकी १५४ महिला आहेत. महिलाच्या सोज्वळ स्वभाव वैशिष्ट्याचे, प्रामाणिकपणे निष्ठापूर्वक काम करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीचे पुरुष कौतुक करीत असतात. परंतु अनेक धोरणे ठरविताना आक्रमकतेने स्त्रियांना नामोहरम करण्याचा, त्यांच्या सहकार्याला गौण स्थान देण्याचा प्रयत्न कसा केला जातो याचे वर्णन त्यांनी केले आणि त्यांना पुरून उरण्याची कठीण जबाबदारी स्त्रिया पार पाडू शकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विविध प्रश्नांच्या बाबतीत निर्णयप्रक्रियेत परिणामकारकपणे सहभागी होण्यासाठी स्त्रियांचे प्रशिक्षण मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज आहे यावर परिषदेत कोणाचेही मतभेद नव्हते. भारतासारख्या देशात सध्याच्या लोकसभेतील तीन स्त्रिया निरक्षर आहेत. औपचारिक शिक्षण व राजकीय सामाजिक विविध पैलूंचे शिक्षण असे शिक्षणाचे दोन्ही स्वरूप लक्षात घेऊन ज्या-त्या देशात, गरज लक्षात घेऊन निधी उभारावा

लागेल. राजकीय-सामाजिक जागृतीच्या प्रशिक्षणाकरिता वर उल्लेखिलेल्या अहवालातील १८६ देशांकरिता सुमारे ३० कोटी डॉलर इतका निधी सुरूवातीला उभारावा लागेल असा अंदाज इंग्लंडच्या महिला प्रतिनिधींनी व्यक्त केला. आठ जेट लढाऊ विमानांच्या उत्पादनांकरिता लागणाऱ्या खर्चाइतकी ही रक्कम आहे. महत्त्व लढाऊ विमानांच्या निर्मितीला द्यायचे की महिलांच्या प्रशिक्षणाला द्यायचे असा सवाल त्यांनी या विषयावरील चर्चासत्रात विचारला. इंग्लंडच्या लोकसभेमध्ये सुमारे ३०० महिला निवडून गेल्या पाहिजेत याकरिता एका अमेरिकन व ब्रिटिश पुरुष पत्रकारांच्या मदतीने त्या कसोशीने कसा प्रयत्न करीत आहेत याची हकीकत त्यांनी परिषदेला सांगितली.

निवडणूक लढविण्याकरिता लागणारा निधी उभारण्याकरिता महिलांना किती अवघड जाते व त्यावर उपाय काय असावेत यावरसुद्धा तपशीलवार चर्चा होऊन अनेक सूचना पुढे आल्या. सर्व देशातील सर्व राजकीय पक्षांच्या उदासीनतेवर टीका करण्यात आली. १८६ देशांचा सर्वेक्षण अहवाल तयार करताना या सर्व देशांमधील सुमारे एक हजार राजकीय पक्षांची सुद्धा पाहणी करण्यात आली होती. यातील बहुतेक सर्व पक्षात महिला सभासदांची संख्या फारच कमी आहे आणि पदाधिकाऱ्यांची संख्या तर अत्यल्प आहे असे आढळून आले. राजकीय पक्षांनी स्त्री-सभासदांची आणि पदाधिकाऱ्यांची संख्या विशेष प्रयत्न करून वाढविली तरच निवडणुकीकरिता एकूण उमेदवारांपैकी निदान १/३ उमेदवार उभे करण्याची व एकूण निवडणूक निधीपैकी निदान १/३ निधी स्त्रियांना देण्याची प्रवृत्ती त्यांच्यात वाढण्याची शक्यता आहे असे आवर्जून मांडण्यात आले. सरकारने निवडणूक निधी उभारावा आणि जो पक्ष अधिक महिला उमेदवारांची नावे निवडणुकीकरिता सुचवील त्यांना त्या प्रमाणात अधिक निधी अथवा अल्प व्याजदराने कर्जाऊ रक्कम देण्यात यावी अशाही सूचना मांडण्यात आल्या.

परिषदेत कोणतेही ठराव मंजूर करण्यात आले नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे परिषदेत सर्व प्रश्नांवर एकमत झाले असे नाही. लोकप्रतिनिधी संस्थांमध्ये विशिष्ट प्रमाणात महिलांकरिता राखीव जागा असाव्यात का यावर पुष्कळ मतभेद होते. ज्या देशात महिलांना प्राथमिक स्वरूपाचेसुद्धा राजकीय हक्क नाहीत अशा देशातील, त्या ध्येयाकरिता कार्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांना सुद्धा परिषदेत सहभागी होण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. अशा प्रतिनिधींना ठोस ठरावांचा पाठपुरावा करणे अद्याप कठीण आहे. त्यांना अशा परिषदांना उपस्थित राहणेही कठीण जाईल याची जाणीव ठेवण्यात आली. अखेरीस परिषदेचे सर्वसामान्य मानस व्यक्त करणारे व स्त्री-पुरुष समानतेचा पुढील टप्पा गाठण्याकरिता शिफारसी करणारे विस्तृत निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. या शिफारसी सर्व सत्रांत झालेल्या चर्चेवर आधारलेल्या असल्यामुळे आणि चर्चेचा संक्षिप्त सारांश वर दिलेला असल्यामुळे शिफारशींची पुनर्मांडणी या लहानशा टिपणात

टाळण्यात येत आहे.

परिषदेचे समारोपात्मक भाषण करताना पंतप्रधान देवेगौडा यांनी मानवी हक्कांची जागतिक सनद मंजूर होण्यापूर्वी भारताने महिलांना मतदानाचा व निवडणूक लढविण्याचा अधिकार घटनेनुसार दिला आहे याकडे सर्व प्रतिनिधींचे लक्ष वेधले. आज भारतात स्थानिक स्वराज्य पातळीवर दहा लाख निवडून आलेल्या महिला कार्यरत आहेत असेही ठाशीवपणे त्यांनी सांगितले.

जागृत भारतीय महिलांना प्रश्न पडला आहे तो हा की याच धोरणांशी सुसंगत राहून भारतीय लोकसभेत व विधानसभांमध्ये महिलांसाठी १/३ जागा राखून ठेवण्यासाठी पंतप्रधान कसोशीने प्रयत्न करून आवश्यक ती घटना-दुरुस्ती विनाविलंब करतील काय? परिषदेने संमत केलेल्या शिफारशी केवळ कागदोपत्री न ठेवता त्या अंमलात आणण्याच्या दृष्टीने निर्धारपूर्वक पावले उचलतील काय?

(मिळून साऱ्याजणी, एप्रिल १९९७)

❑

महिलांसाठी राखीव जागा

१९९६ च्या निवडणुका लढविताना देशातील सर्व प्रमुख उजव्या व डाव्या पक्षांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखून ठेवण्याकरिता आवश्यक ती कायदेशीर तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते. निवडणुकांनंतर सध्याचे नवे सरकार प्रस्थापित झाल्याला १६ महिने झाले तरी अद्याप आवश्यक ती तरतूद करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात नाहीत ही खेदजनक वस्तुस्थिती आहे. सत्तारुढ सरकारमधील घटक पक्षांनी आपल्या राज्यकारभाराचे मूलभूत धोरण ठरविण्याकरिता एका किमान समान कार्यक्रमाचा आराखडाही तयार केला आहे व त्यात देशातील शेतमजुरांना किमान न्याय आणि महिलांसाठी राखीव जागा या दोनही धोरणांना महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आलेले असूनही याबाबतची दोनही विधेयके लोकसभेत संमत करून घेण्यात दिरंगाई होत आहे. अगदी अलीकडे, म्हणजे सप्टेंबर महिन्यात, पंतप्रधान गुजराल यांनी महिलांसाठी राखीव जागांबाबत विधेयकाचा प्रस्ताव लोकसभेला सादर करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्याच पक्षाच्या (जनता दल) अध्यक्षांनी कर्कश कोलाहल करून, या प्रस्तावाला विरोध केला. याच्या उलट, हे विधेयक जर लोकसभेत संमत होणार नसेल, तर पंतप्रधानांनी देऊ केलेले मंत्रिपद नाकारण्याचा निर्णय कॉ.गीता मुखर्जी यांनी घेतला. महिलांसाठी राखीव जागा ठेवण्याचे समर्थक आणि विरोधक यांचे युक्तिवाद समजावून घेण्यापूर्वी मुळातच अशी तरतूद करण्याची गरज का निर्माण झाली हे समजावून घेणे आवश्यक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्याला ५० वर्षे झाली. या कालावधीत हर एक बाबतीत महिलांची स्थिती काय आहे हे केवळ सरकारी आकडेवारीवर भिस्त ठेवून तपासले तरी आज अस्तित्वात असलेल्या विदारक परिस्थितीची कल्पना येऊ शकेल.

१. स्त्री-पुरुष प्रमाण

१९९१ च्या जनगणनेनुसार दर एक हजार पुरुषामागे, स्त्रियांची संख्या ९२९ होती. म्हणजे स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा ३ कोटी, १० लाखांनी कमी होती. याचे एक

महत्त्वाचे कारण असे की, देशात जे बालमृत्यू (५ वर्षे वयाच्या आतील मृत्यू) होत असतात, त्यामध्ये बालिकांच्या मृत्यूचे प्रमाण बालकांपेक्षा सुमारे दहा टक्क्यांनी जास्त असते.

२. निरक्षरता

भारतातील स्त्रियांपैकी ६०.६ टक्के स्त्रिया अद्यापही (१९९१) निरक्षर आहेत.

३. रोजगार

(अ) देशातील मिळकतीचे काम करणाऱ्या महिलांपैकी ९६ टक्के महिला या शेतीसकट अन्य असंघटित क्षेत्रात काम करतात म्हणजे फक्त ४ टक्के स्त्रिया संघटित क्षेत्रात काम करतात.

(ब) संघटित क्षेत्रात रोजगार उपलब्ध असलेल्या स्त्री-पुरुषांमध्ये स्त्रियांचे प्रमाण फक्त १४ टक्के आहे.

(क) खासगी व सरकारी मिळून असणाऱ्या उच्च अधिकाऱ्यांपैकी स्त्रिया फक्त २.३ टक्के आहेत.

(ड) ३१ डिसेंबर १९९० रोजी, मॅट्रिक व त्यापेक्षा अधिक शिक्षण घेतलेल्या व रोजगार मिळविण्यासाठी रोजगार विनिमय केंद्रांवर नाव नोंदविणाऱ्या स्त्रियांची संख्या ४५ लाख ४० हजार होती.

४. हिंसा व अत्याचार

(अ) भारतात दर ४७ व्या मिनिटाला एक बलात्कार होत असतो. १९९० साली जे एकूण ९८६३ बलात्कार नोंदविले गेले, त्यापैकी १/३ बलात्कार हे १८ वर्षांच्या आत वय असलेल्या मुलींवर केले गेले. या १/३ मुलींपैकी २०९० मुली या १०-१६ या वयोगटातल्या होत्या, तर ३९४ मुलींचे वय १० वर्षांपेक्षाही कमी होते.

(ब) दर ४४ व्या मिनिटाला एका स्त्रीचे अपहरण करण्यात येते.

(क) दर २७ व्या मिनिटाला एक विनयभंग होत असतो.

(ड) दर दिवसाची हुंडाबळींची संख्या १७ असते.

(इ) १९९४ साली, महिलांच्या संदर्भात नोंदविण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या ८२,८१८ होती.

(ई) १९८८ साली भारताच्या खुद्द राजधानीत (दिल्ली येथे) स्त्रियांविरुद्ध वेगवेगळे गुन्हे करणाऱ्या १९८ लोकांना अटक करण्यात आली. यांपैकी शिक्षा फक्त ४ जणांना झाली. याच राजधानीत १९९० साली हुंडाबळींची संख्या १२७ होती. शिक्षा फक्त एकालाच झाली.

६) आकडेवारीचा विस्तार शक्यतो मर्यादित असावा म्हणून विधानसभांमधील स्त्री-पुरुष आमदारांचे प्रमाण या लेखात देण्यात आलेले नाही. या लोकप्रतिनिधी सभागृहांमध्ये सुद्धा महिलांचे प्रमाण फारच कमी आहे एवढे नोंदविले तरी पुरण्यासारखे आहे.

वरील मर्यादित आकडेवारीवरून (अजून बरीच उपलब्ध आहे) गेल्या ५० वर्षांत महिलांच्या परिस्थितीत अगदी नगण्य फरक पडला आहे हे लक्षात येईल. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत महिलांची प्रगती अतिशय मंदगतीने होणे अपरिहार्य आहे हे लक्षात आल्यावर, स्त्रियांच्या सबलीकरणाचा सिद्धांत स्त्री-मुक्ती चळवळीने जोमाने मांडावयास सुरुवात केली. जगभर ही मांडणी मोठ्या प्रभावीपणे करण्यात आली. देशातील लोकप्रतिनिधी सभागृहांमध्ये देशातील हरएक समस्यांवर चर्चा होऊन निर्णय होत असतात आणि त्यानुसार कायदे होत असतात म्हणून या सभागृहांमध्ये महिलांचे प्रमाण वाढविणे हा सबलीकरणाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल यावर बीजिंग येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत भर देण्यात आला. महिलांचे प्रमाण या सभागृहांमध्ये किती असावे? तर्काला धरून उत्तर द्यावयाचे झाले तर महिलांचे लोकसंख्येत जे प्रमाण असते त्याच प्रमाणात म्हणजे ५० टक्के इतके हे प्रमाण असावे, यात न पटण्यासारखे काहीही असू शकत नाही. परंतु पुरुषवर्चस्ववाद्यांचा जगभर असलेला आक्रमक पवित्रा, वर्षानुवर्षे घडत आलेल्या मानसिकतेतून, उदारमतवादी पुरुषांची सुद्धा सतत डळमळण्याची प्रवृत्ती, आणि शतकानुशतके जोपासण्यात आलेल्या न्यूनगंडाच्या भावनेतून स्त्रियांमधील आत्मविश्वासाची शबलता लक्षात घेता ५० टक्क्यांचे ध्येय गाठणे सहजसाध्य नाही. महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणा एका उडीत क्वचितच होत असतात. म्हणून, महिला कल्याणविषयक समस्यांमध्ये लक्ष घालणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या एका समितीने एका मोठ्या स्त्री-पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत या विषयावर चर्चा घडवून आणली. कोणत्याही बाबतीत परिणामकारक प्रभाव घडवून आणण्याकरिता आवश्यक असलेले प्रमाण (critical mass) हे सुमारे ३० टक्के असते. हे लक्षात घेऊन व सुधारणेचा सध्याचा टप्पा लक्षात घेऊन, लोकप्रतिनिधी सभागृहांमध्ये स्त्रियांचे प्रमाण तूर्त निदान ३० टक्के असावे अशी शिफारस या आंतरराष्ट्रीय परिषदेने केली आणि सर्व राष्ट्रांनी त्या दिशेने प्रयत्न त्वरेने करावेत असे सुचविले. ३० टक्के म्हणजेच सुमारे एक तृतीयांश हे प्रमाण जे भारतातील प्रमुख राजकीय पक्षांनी निदान तत्त्वत: स्वीकारले त्याची पार्श्वभूमी ही अशी आहे.

वास्तविक पाहता, भारतातील राजकीय पक्षांनी निवडणुकीला उमदेवार उभे करताना १/३ तिकिटे महिलांना दिली असती, त्याकरिता आवश्यक ते प्रशिक्षण आपापल्या पक्षातील महिलांना देण्याची व्यवस्था केली असती, तर महिलांकरिता राखीव मतदारसंघ ठेवण्याची गरजच पडली नसती. परंतु आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात निवडून आल्यावर १/३ आरक्षणाची ग्वाही देणाऱ्या सर्व पक्षांनी १९९६ ची निवडणूक लढविताना, आपापल्या पक्षाच्या एकूण उमेदवारांपैकी महिलांचे प्रमाण किती ठेवले हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

पक्ष	उभे केलेले एकूण उमेदवार	एकूण पैकी महिला
काँग्रेस (इं)	५३०	४९ (९.६%)
भाजप	४७७	२३ (४.८%)
जनता दल	२२०	११ (५%)
सोशलिस्ट पक्ष	६४	३ (४.७%)
मार्क्सवादी कम्यु.पक्ष	७७	५ (६.५%)
भारतीय कम्यु.पक्ष	४३	४ (९.३%)

१९९६ च्या या निवडणुकीमध्ये राजकीय पक्षांचे व स्वतंत्रपणे एकूण १४,२७४ उमेदवार उभे होते. या सर्व उमेदवारांमध्ये महिलांचे प्रमाण ३.३ टक्के होते.

महिलांसाठी राखीव मतदार संघ ठेवल्याखेरीज लोकप्रतिनिधी सभागृहांमधील महिलांचे प्रमाण वाढणे हे किती दुरापास्त आहे हे वरील विवेचनावरून लक्षात येईल.

निर्णयप्रक्रियेत महिलांना सामील करून घेण्याची मागणी आज जरी प्रकर्षाने पुढे येत असली तरी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील त्याची पूर्वपीठिका संक्षिप्तपणे लक्षात घेणे येथे उचित ठरेल.

भारतीय स्वातंत्र्य लढा लढविला जात असताना त्यात आरंभापासून दोन तट पडलेले होते. या लढ्याचा आशय प्राधान्याने राजकीय असावा, म्हणजे परकीय वर्चस्वापासून मुक्त होऊन स्वकीय राज्य स्थापन करणे या ध्येयावर लक्ष केंद्रित करावे असा आग्रह धरणारा एक घटक होता. केवळ परकीयांच्या जुलमापासून बंधमुक्तता नव्हे तर समाजांतर्गत असलेल्या बहु-आयामी जुलमापासून, विषमतेपासून, कालबाह्य रुढींपासून मुक्तता मागणारा, व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, लोकशाही या आधुनिक मूल्यांशी सुसंगत अशा समाजरचनेची उभारणी करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवणारा आशय स्वातंत्र्यलढ्यात असावा असे मानणारा दुसरा घटक होता. पहिल्या घटकाची सरशी झाली, दुसऱ्या घटकाला मिळालेले अनुयायी तुलनेने कमी होते हे जरी खरे असले, तरी या दुसऱ्या घटकाचा वैचारिक-भावनिक प्रभाव लक्षणीय होता हेही तितकेच खरे आहे. या प्रभावामुळेच अनेक सामाजिक समस्यांना वाचा तरी निदान या काळात फुटली. स्त्रियांच्या दारुण स्थितीकडे लक्ष वेधण्याची कामगिरी याच दुसऱ्या उदारमतवादी विचारप्रवाहाने पार पाडली. सती-प्रथा, बालिकाहत्या यासारख्या अघोरी रूढींविरुद्ध तर त्यांनी आवाज उठवलाच, परंतु बालविवाह बंदी, पुनर्विवाहास अनुमती, स्त्रियांना शिक्षण, वैवाहित जीवनात त्यांना कायद्याने प्रतिष्ठा देणे, त्यांना मालमत्तेत रीतसर वाटा देणे, मतदानाचा हक्क देणे, या मागण्यांवरही स्वातंत्र्यलढ्यात सामाजिक आशय समाविष्ट करू पाहणाऱ्या या समाजसुधारकांनी भर दिला. स्त्रियांनीच स्वत: जागृत होऊन, स्त्री-दमनाचे अनेकविध पैलू रोखठोकपणे समाजासमोर मांडून आत्मबलाने

आपले व्यक्तिमत्त्व प्रकट करून, आपले भवितव्य घडविण्यासाठी आंदोलन उभारण्याचे युग अद्याप सुरू झाले नव्हते.

१९१७-१८ सालापर्यंत, भारतीय प्रशासनात (राज्यकारभारात) भारतीयांना प्रतिनिधित्व असावे अशी मागणी करण्यापर्यंतचा टप्पा भारतीय स्वातंत्र्यलढ्याने गाठला होता. याला प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने, या अपेक्षित प्रतिनिधित्वाचा तपशील व राज्यकारभाराविषयी अन्य काही सुधारणा सुचविण्याकरिता ब्रिटिश सरकारने १९१९ साली मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड समितीची नेमणूक केली. ज्या ज्या समाजघटकांना आपल्याला प्रतिनिधित्व मिळावे असे वाटत होते, अशांची अनेक शिष्टमंडळे आपापले निवेदन देण्यासाठी या समितीला जाऊन भेटली. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही राज्यकारभारात प्रतिनिधित्व मिळावे अशा मागणीचे निवेदन देण्याकरिता सुप्रसिद्ध नेत्या सरोजिनी नायडू आणि तत्कालीन स्त्री-मुक्ती चळवळीत इंग्लंडमध्ये सहभागी होणाऱ्या मार्गरिट कझिन्स, या अन्य काही महिलांचे लहानसे शिष्टमंडळ घेऊन मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड समितीला भेटल्या. निर्णयप्रक्रियेत महिलांना समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी या भारतीय शिष्टमंडळाने पहिल्या प्रथम ७८ वर्षांपूर्वी केली हे लक्षात घेण्याजोगे आहे. या कालखंडापर्यंत खुद्द इंग्लंडमध्ये आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्कसुद्धा प्राप्त झाला नव्हता. त्यामुळे भारतीय महिला शिष्टमंडळाची मागणी ब्रिटिश सरकार मूर्खपणाची आहे असे ठरवील हे अपेक्षितच होते. त्याच सुमारास नेमण्यात आलेल्या दुसऱ्या एका समितीने (साऊथबरो समितीने), 'ज्या देशात अद्याप स्त्रियांना बुरखा घेण्याची सक्ती केली जाते आणि स्त्री-शिक्षणाला मज्जाव केला जातो, त्या देशात स्त्रियांना मतदानाचा हक्क देणे हे अपरिपक्वपणाचे ठरेल.' असा शेरा मारला होता. परंतु मागणी धुडकावून लावण्याचे ऐवजी, भारतीयांचे प्रतिनिधित्व असलेल्या प्रांतिक विधिमंडळांनी याबाबत योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा असा निर्णय ब्रिटिश सरकारने दिला. या निर्णयात धूर्तपणा होता तो या दृष्टीने, की मागासलेल्या भारतातील, विधिमंडळातील मागासलेले सदस्य स्त्रियांची मागणी मान्य करणार नाहीत असे ब्रिटिश सरकारला वाटत होते आणि तसे झाल्यास रोष भारतीयांनाच ओढवून घ्यावा लागेल, आपणावर ठपका येणार नाही, असा कयास सरकारने बांधला होता. परंतु हा अंदाज सपशेल चुकला.

पहिल्या महायुद्धानंतर भारताच्या राजकीय पटलावर म.गांधींनी आपले पाय रोवण्यास सुरवात केली होती. राजकीय आंदोलनात सामाजिक आशय अनुस्यूत करण्यात, त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण सामंजस्यलक्षी शैलीने प्रोत्साहन दिले. भारतीयांचा एकूण मानसिक पिंड बदलण्यात, स्त्रियांविषयीचा रूढीग्रस्त दृष्टिकोन अंशतः बदलण्यात, म.गांधींचा वाटा स्पृहणीय आहे यात शंका नाही. व्यापक दृष्टिकोनावर अधिष्ठित असलेल्या, म.गांधीप्रणीत आंदोलनांमुळे, प्रांतिक विधिमंडळांनी मालमत्तादार, कर भरण्याची क्षमता असलेल्या, सुशिक्षित महिलांचा मत देण्याचा आणि निवडून

येण्याचा अधिकार मान्य करून ब्रिटिशांचा धूर्त डाव यशस्वी होऊ दिला नाही. सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा हक्क जसा तो अद्याप पुरुषांना मिळाला नव्हता, तसा स्त्रियांनाही मिळाला नव्हता, परंतु १९२१ च्या सुधारणा विधेयकानुसार मध्यवर्ती ब्रिटिश सरकारला मर्यादित स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने निवडणुकीबाबतचे वरील हक्क देणे भाग पडले.

म.गांधींनी स्त्री-शक्तीवर, राजकारण व समाजकारण यातील त्यांच्या सहभागावर जो भर दिला, त्यामागील त्यांचा दृष्टिकोन हा त्यांच्या सर्व जीवनव्यापी अहिंसा व सत्य या तत्त्वांशी अविरोधी असा दृष्टिकोन होता. आक्रमकपणा किंवा बळाधीनता यासारख्या पुरुषांच्या अवगुणांशी स्पर्धा करून, ते अवगुण आपल्या अंगी रुजविण्याची ईर्षा स्त्रियांनी बाळगू नये; उलट आपल्या उपस्थितीने व सहभागाने आंदोलन व एकूण मानवी जीवन मानुषतेच्या उच्च पातळीवर नेण्याचा प्रयत्न स्त्रियांनी करावा, आणि असे कार्य करीत असतानाच स्त्रियांमधील न्यूनगंड वितळून जाईल अशी म.गांधींची धारणा होती. म.गांधींच्या प्रेरणेतून, हजारो स्त्रियांनी सर्व प्रकारच्या खस्ता सहन करीत स्वातंत्र्य-लढ्यात भाग घेतला. सरोजिनी नायडू या १९२५ साली काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. हंसा मेहता, सरलादेवी चौधुराणी, सुचेता कृपलानी, कमलादेवी चट्टोपाध्याय, विजयालक्ष्मी पंडित, तारकेश्वरी सिन्हा, अरुणा असफअल्ली यांनी राजकीय जीवनावर आपला ठसा उमटविला.

१९२९ साली, डोवेजर राणी, आमेन शहा, चितंबर या महिलांच्या नेतृत्वाखाली, एक लहानसे शिष्टमंडळ सायमन कमिशन या ब्रिटिश सरकारने नियुक्त केलेल्या एका आयोगाला जाऊन भेटले. 'बायकांजवळ मालमत्ता कोठून असणार? त्या भाडे कोठून देणार? आयकर कोठून भरणार? वास्तवाचे भान ठेवून, मालमत्ताधारी पुरुषांना आणि सर्व साक्षर स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यात यावा,' अशी ठोस मागणी खडे सवाल विचारून, या शिष्टमंडळाने केली. (त्यावेळी, भारतात तीन टक्क्यांपेक्षा थोड्या कमी स्त्रिया साक्षर होत्या हे लक्षात घेणे आवाश्यक आहे.) निवडणुकीत स्त्रियांना भाग घेता यावा याकरिता, त्यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवण्यात याव्यात अशी मागणीही या शिष्टमंडळाने केली.

१९३१ साली लंडन येथे भरलेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी नेमणुकीच्या द्वारे दोन स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्यात आले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत, बेगम शहा नवाझ यांनी राखीव जागांना विरोध केला होता तर श्रीमती सुब्बरयन यांनी राखीव जागा ठेवल्याखेरीज स्त्रियांना निवडणुकीत सहभागी होणे कठीण जाईल अशी आपली भूमिका मांडली होती.

स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह यापुढे वेगवेगळ्या व्यासपीठांवरून व्यक्त होऊ लागला. १९३० साली विविध स्त्री-प्रतिनिधींच्या सभेत, स्त्रियांना सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा हक्क देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. ब्रिटिश सरकारने ही मागणी फेटाळून लावली. परंतु १९३१ साली कराची येथील काँग्रेसच्या अधिवेशनात या मागणीला,

स्त्री-पुरुषांच्या समान प्रतिष्ठेला हार्दिक पाठिंबा ठरावाद्वारे व्यक्त करण्यात आला.

या काळात वेगवेगळ्या महिला संस्था-संघटनांनी स्त्रियांसाठी राखीव जागांची मागणीही उचलून धरली. यापैकी विमेन्स इंडिया असोसिएशनने महिलांसाठी प्रांतिक विधिमंडळात २० टक्के राखीव जागांची मागणी केली. मान्यताप्राप्त स्त्री-संघटनांनी सुचविलेल्या नावांमधून, निवडून आलेल्या विधिमंडळ सदस्यांनी (म्हणजे केवळ पुरुषांनी!) या वीस राखीव महिलांची निवड करून, त्यांना विधिमंडळाचे सदस्यत्व देण्यात यावे, अशी या मागणीची मर्यादा होती हे लक्षात घ्यावयास हवे.

१९३०-३१ सालानंतर मात्र राखीव जागांची मागणी करण्याचे उद्दिष्ट मागे पडले एवढेच नव्हे तर त्याविरुद्ध सूर उमटू लागला. याचे मुख्य कारण म्हणजे १९३२ साली ब्रिटिशांनी भारतातील निवडणुकांकरिता विभक्त मतदार संघाचा प्रस्ताव पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजाची धर्म-जातीयनिहाय छकले पाडण्याच्या या कुटिल धोरणाला स्वातंत्र्य-आंदोलनाने विरोध केला. पूर्वास्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघ ठेवलेले पाहून तर म.गांधी व्यथित झाले. या विभक्त मतदारसंघाला विरोध करण्यासाठी त्यांनी बंदिस्त अवस्थेत असताना सुद्धा प्राणांतिक उपोषण सुरू केले. त्याबरोबर देशातील सबंध वातावरण बदलले. कोणत्याही समाजघटकासाठी वेगळे मतदारसंघ राखून ठेवण्यात दुहीची बीजे पेरलेली आहेत, त्यातून केवळ आपापसातील तणाव वाढत जातील आणि राज्यकर्त्या ब्रिटिशांना निर्विघ्नपणे राज्य करता येईल असे भारतीय नेत्यांना आणि राजकीयदृष्ट्या जागृत जनतेला वाटू लागले. अशा रीतीने राखीव जागांविरुद्धचे वातावरण तापू लागल्यामुळे, ऑल इंडिया विमेन्स कौन्सिल, नॅशनल कौन्सिल फॉर विमेन इन इंडिया, वुमेन्स इंडिया असोसिएशन या व अशा अन्य महिला संघटनांनी राखीव जागांच्या मागणीला विरोध करण्यास सुरूवात केली. प्रतिनिधी सभागृहांमध्ये नेमणूक करण्याच्या प्रथेलाही त्यांनी विरोध केला आणि संयुक्त मतदार संघात, सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या मागणीचा पुरस्कार करणारी मोहीम सुरू करण्यात आली.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांच्या हक्कांसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांना, आंदोलनातील चढ-उतारांचा, त्यातील मर्यादांचा वर मांडण्यात आलेला संक्षिप्त इतिहास पाहिल्यानंतर आज राखीव जागांची मागणी पुढे सरसावताना दिसते आहे, त्यात निदान संधीसाधूपणा आहे असे मानण्याला आधार आहे असे दिसत नाही.

स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडातील वर विशद केलेला वारसा पुढे नेण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात झपाट्याने पावले उचलणे आवश्यक होते. परंतु सत्ताधारी काँग्रेसने या वारशाची उपेक्षा केली. १९५७ साली काँग्रेसने महिलांना निवडणुकीत १५% जागा देण्याची घोषणा केली परंतु प्रत्यक्षात ती घोषणा कागदावरच राहिली.

१९७४-७५ साली, भारतातील स्त्रियांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन उणिवांवर प्रकाशझोत टाकणारा आणि सुधारणा सुचवणारा सरकारी पुरस्काराने, परंतु अकरा

स्वतंत्र सदस्यांच्या समितीने तयार केलेला अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. राखीव जागा ठेवण्याबाबत नियुक्त ११ सदस्यांनी नव्याने चर्चा केली. या चर्चेची निष्पत्ती खालीलप्रमाणे होती :

२ सदस्यांनी राखीव जागांना विरोध केला.

२ सदस्यांनी स्थानिक पातळीपासून लोकसभेपर्यंत राखीव जागा असाव्यात अशी भूमिका मांडली.

७ सदस्यांनी फक्त स्थानिक पातळीवर राखीव जागा असाव्यात असे मतप्रदर्शन केले.

त्यानंतर लवकरच समाजकल्याण व स्त्रीहित रक्षणासाठी असलेल्या मध्यवर्ती सरकारच्या मंत्रालयाच्या वतीने एक खलिता (निबंध) प्रसृत करण्यात आला. त्यात राखीव जागांना नि:संदिग्ध विरोध व्यक्त करून पुढील शिफारशी करण्यात आल्या.

अ) निवडणूक प्रक्रियेत अधिक सहभाग घेण्यासाठी स्त्रियांना उत्तेजन देणे.

आ) विशिष्ट समस्यांवर अधिष्ठित आंदोलनांना उत्तेजन देणे.

इ) समतेच्या व्यापक लढ्यात सहभागी होण्याकरता उत्तेजन देणे.

पुढील काही वर्षे राखीव जागांची मागणी थंडावली होती. परंतु १९८८ साली काहीशा अचानकपणे पंतप्रधान राजीव गांधींच्या कारकीर्दीत स्त्रियांसाठी व्यापक व दूरगामी उद्दिष्टे मांडणारी एक योजना प्रसिद्ध करण्यात आली. त्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेत ३० टक्के जागा राखीव ठेवण्याची शिफारस करण्यात आली. त्यानंतर १९९२-९३ साली आवश्यक ती ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती होऊन, २४ एप्रिल १९९३ पासून ३३ टक्के जागा ग्रामीण व नागरी स्थानिक पातळीवर महिलांसाठी राखून ठेवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरूवात करण्यात आली.

वरील सर्व विवेचनावरून, राखीव जागांची मागणी किती टक्केटोणपे खात तग धरून राहिलेली आहे हे वाचकांच्या लक्षात येईल. सध्या जो राखीव जागांचा प्रस्ताव पुढे येतो आहे, त्यात राखीव जागा महिलांसाठी कायमच्या ठेवाव्यात अशी भूमिका घेण्यात आलेली नाही. तीन निवडणुकांपुरती म्हणजेच १५ वर्षांपुरती कालमर्यादा तूर्त घालण्यात यावी, असे या तरतुदीचा तपशीलवार विचार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लोकसभेच्या खास निवड समितीने सुचविले आहे. या कालावधीत स्त्रियांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी राजकीय पक्ष विशेष काळजीपूर्वक मनापासून प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे. असे असूनही राखीव जागांना विरोध मतलबी व समंजस व्यक्तींकडून सुद्धा जो होतो आहे त्याची कारणे लक्षात घेणे आवश्यक आहे. ती कारणे पुढीलप्रमाणे :

१. ज्या मतदार संघात विरोधकांचा प्रभाव असेल तो स्त्रियांसाठी राखीव ठेवला जाण्याची शक्यता.

२. मतदार संघ जर राखीव केला तर पत्नी, बहीण इत्यादींना निवडणुकीसाठी उभे केले जाईल. म्हणजे स्त्रियांना स्वतंत्रपणे आपल्या मतानुसार लोकसभेतील चर्चेच्या वेळी भूमिका घेणे कठीण जाईल. शिवाय, त्या मतदार संघाचा राखीव हा दर्जा संपुष्टात आला की पुरुषांना (नवरे, भाऊ इ.) त्या मतदारसंघातून निवडणूक लढविता येईल.

३. निवडणुकीच्या राजकारणात गुंतल्याने, आंदोलनातून स्त्रियांना जे गेल्या काही वर्षांत साध्य करता आले, ते लोकसभेत बोलघेवडेपणा करून साध्य होईल का? आंदोलनांची धार बोथट करण्याकरिता काही मागण्या सत्ताधारी करीत असतात. राखीव जागांची मागणी मान्य झाल्याने लोकसभेच्या व्यासपीठावर आक्रोश करण्याची संधी स्त्रियांना मिळेल. परंतु त्यांचे प्रश्न कसे सुटतील?

४. राखीव जागा ठेवल्याने महिला दुर्बल आहेत याला मान्यता दिल्यासारखे होईल. ती मान्यता का द्यावी?

५. अल्पसंख्याकांना संरक्षण मिळावे, म्हणून राखीव जागा ठेवण्याची प्रथा कदाचित संयुक्तिक असेल. परंतु लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ५०% असताना, त्या अल्पसंख्याक कशा ठरू शकतील? स्वत:च्या संघटित शक्तीवर त्यांना आपली उद्दिष्टे साध्य करणे का शक्य होत नाही?

६. देशातील सध्याची स्थिती लक्षात घेता, केवळ उच्चवर्णीय व सधन महिला राखीव जागांचा फायदा घेतील. ते जर टाळावयाचे असेल तर, स्त्रियांमधील इतर मागासवर्गीय जातींकरिता पोट-राखीव जागा ठेवल्या पाहिजेत.

७. राखीव जागा एकदा ठेवल्या की त्या चालू ठेवण्यातच हितसंबंध अडकतात, असे इतर राखीव जागांच्या अनुभवातून लक्षात आले आहे. १५ वर्षांनंतर महिलांसाठी राखीव जागा ठेवल्या जाणार नाहीत याची शाश्वती काय?

८. स्त्रियांच्या काही खास समस्या आहेत हे खरे असेल. परंतु राखीव जागा ठेवल्याने, स्त्रियांची केवळ आपल्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची संकुचित दृष्टी बलवत्तर होईल. लोकसभेत देशातील सबंध समाजाच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करावयाचे असते.

९. स्त्रिया हा एकसंध समाजघटक नाही. जात, वर्ग, विचारसरणी यात तो विभागलेला आहे. हिंदुत्व परिवारातील किंवा मुस्लिम मूलतत्त्ववादी स्त्रिया राखीव जागांवर मोठ्या प्रमाणात निवडून आल्या तर अश्लील पोस्टर्स किंवा पब्स् यांना त्या कदाचित विरोध करतील. परंतु सती-प्रथा, मालमत्तेतील हक्क, आर्थिक स्वावलंबन, जागतिक शांतता, धर्मनिरपेक्ष सामाजिक व्यवहार या विषयांवर त्यांची विचारसरणी धारण करणारे पुरुष जी भूमिका घेतील त्यापेक्षा काही वेगळी भूमिका घेण्याचे धैर्य त्या दाखवू शकतील का?

१०. चिठ्ठ्या टाकून, दर वेळेस राखीव मतदार संघ ठरविण्याची तरतूद विधेयकात येणार आहे. मतदार संघ जर सारखे बदलत राहिले, तर लोकप्रतिनिधींना मतदार

संघाची जोपासना करता येणार नाही.

११. राखीव जागांमुळे, महिला महिलांविरुद्ध लढत राहतील. पुरुष-वर्चस्वाविरुद्ध संघर्ष करण्याचे त्यांचे उद्दिष्ट मागे पडेल.

प्रमुख आक्षेपांची नोंद वर करण्यात आली आहे. 'स्त्रिया जर लोकसभेत जाऊ लागल्या तर स्वयंपाक कोण करील?' अशा थिल्लर आक्षेपांचा समावेश या नोंदणीत करण्यात आलेला नाही.

राखीव जागांच्या समर्थकांची भूमिका आत्मसात करणे हेही तितकेच महत्त्वाचे असल्यामुळे, त्याची नोंद घेऊन हा लेख समाप्त करणे उचित ठरेल.

१) राखीव जागा पुरेशा कालावधीपर्यंत ठेवून, राजकारणात सहभागी होण्याची स्त्रियांना संधी व प्रोत्साहन दिल्याने, स्त्री-पुरुषांमधील पारंपरिक श्रमविभागणी (स्त्रिया=घर=कुटुंब, पुरुष=अर्थार्जन, बौद्धिक पातळीवरील कामगिरी, सामाजिक संपर्क इ.) नष्ट होण्यास मदत होईल.

२) स्त्रिया नेतृत्वाच्या ठिकाणी जाऊन पोहोचू लागल्या म्हणजे त्यांच्याकडे बघण्याचा पुरुषांचा अनुग्रहात्मक दृष्टिकोन (condescending attitude) बदलेल.

३) बलात्कार, कुटुंबातील आक्रमकता किंवा हिंसा, नववधूची हत्या या व्यक्तिगत दुराचाराच्या घटना नाहीत, तर स्त्री-पुरुषसंबंधांच्या सत्तेतील असमतोलाचा तो परिणाम आहे, हा मुद्दा महिला आंदोलनाने प्रकर्षाने पुढे आणला. राजकीय सत्तेत सहभागी होण्याने अशा महत्त्वपूर्ण मुद्यांकडे साऱ्या देशाचे लक्ष वेधण्याची व परिणामकारक उपाय सुचविण्याची, संसदेबाहेर चालू असणाऱ्या आंदोलनांना बळ देण्याची संधी स्त्रियांना मिळेल आणि त्यातून साऱ्या समाजाचे, विशेषत: पुरुषांचे सामाजिक भान वाढीला लागण्याची शक्यता वाढेल.

४) स्वत: शोषित असल्यामुळे, इतर दुर्बल घटकांबद्दल सहानुभूती बाळगून, त्यांच्या समस्या अधिक प्रकर्षाने पुढे आणण्याची कामगिरी महिला खासदार बजावू शकतील.

५) स्त्रियांमधील उपजत प्रवृत्तींमुळे, निसर्गाकडे, नैसर्गिक संपत्तीकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा सृजनशील निर्मितीचा असेल, सत्ता संपादनातून घातक नाश करण्याचा नसेल. त्यामुळे देशातील विकासाबद्दलचा विचारव्यूह अधिक लोकाभिमुख असण्याची शक्यता वाढेल.

६) आरक्षण हे दर वेळेस फिरते ठेवण्यात येणार असल्यामुळे विरोधकांना मतदारसंघ हेतुत: राखीव ठेवण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

७) महिलांसाठी राखीव जागा नसताना, पुरुषांनी आपले भाऊ, जावई व अन्य पुरुष नातेवाईकांना निवडणुका लढविण्याला प्रोत्साहन दिलेले आहे. त्याऐवजी जर स्त्री नातेवाईंकाना संधी मिळाली तर त्या कायमच कठपुतळी बनून राहतील असे मानण्याचे कारण नाही.

८) राखीव जागा ठेवण्याचे उद्दिष्ट स्त्रियांवर दुर्बलतेचा ठपका ठेवणे हे नाही.

वर्षानुवर्षे स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाचे परिमार्जन पुरुषवर्चस्व असलेल्या समाजव्यवस्थेत सहजासहजी होत नाही हे जगभर आढळून आले आहे. स्त्रियांच्या अंगी असलेले सुप्त सामर्थ्य प्रकट करण्याची संधी काही काळ राखीव जागा ठेवल्याने त्यांना मिळेल.

९) ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत राखीव जागा ठेवल्याने, नजीकच्या काळात नवे नेतृत्व पुढे येईल. सधन व उच्चवर्णीयांची मक्तेदारी फार काळ टिकण्याची शक्यता त्यामुळे कमी होईल. आज अस्तित्वात असलेल्या लोकसभेमध्ये सुमारे २८० खासदार हे इतर मागासवर्गीय आहेत. इतर मागासवर्गीयांकरिता राखीव जागा नसतानाही जर एवढ्या मोठ्या संख्येने इतर मागासवर्गीय निवडून येऊ शकतात, तर राखीव पोट-जागा ठेवल्या नाहीत तरी इतर मागासवर्गीय महिला का निवडून येणार नाहीत?

१०) जी विचारसरणी पुरुषांमध्ये प्रभावी असेल तीच विचारसरणी जर स्त्रियांमध्येही प्रभावी असेल व ती समाजहितकारक नसेल तर जो धोका पुरुष निवडून येण्याने आहे तोच धोका स्त्रिया निवडून येण्याने आहे हे खरे आहे परंतु ही विचारसरणी ज्यांना मान्य नसेल त्यांनी या शक्तींचा पराभव करण्याकरिता (मग ते पुरुष असोत अगर स्त्रिया असोत) झटणे एवढाच उपाय लोकशाहीत असू शकतो.

११) मतदार संघ फिरता ठेवल्यामुळे ठराविक एका व्यक्तीला मतदार संघाची जोपासना करता येणार नाही हे खरे आहे. परंतु व्यक्तीपेक्षा विचारसरणी, धोरण व उपक्रम यांना प्राधान्य देण्याचे शिक्षण त्यातून मतदारांना मिळेल व लोकशाहीत तेच अधिक योग्य आहे.

१२) लोकप्रतिनिधी सभागृहांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ज्या देशात ३० टक्के किंवा त्याहून अधिक आहे अशा नॉर्डिक देशांमध्ये लोककल्याणकारी योजना पुष्कळ प्रभावीपणे अंमलात आणल्या गेल्या आहेत असे आढळते. राजकीय सत्तेत स्त्रियांच्या सहभागाचा हा दृश्य परिणाम असताना, केवळ आपमतलबीपणातून अथवा अज्ञानातून स्त्रियांना संधी आपल्या देशात नाकारणाऱ्यांविरुद्ध प्रचंड मोहीम उभारणे अगत्याचे आहे.

स्त्रियांना न्याय देणारा अलीकडच्या काळातील कोणताही कायदा (बलात्कारविरोधी कायदा, हुंडाविरोधी कायदा, गर्भजलपरीक्षेविरुद्ध कायदा, पोटगीची रक्कम वाढवून देण्याची व ती मिळवण्यातील अडचणी दूर करणारी तरतूद) सहजासहजी, दिरंगाई न करता संमत करण्यात आला नाही असे आढळते. मुस्लिम महिलांवर अन्याय करणारे पोटगीविरुद्ध विधेयक मात्र तडकाफडकी मंजूर करण्यात आले.

महिलांकरिता राखीव जागा ठेवण्यासाठी आवश्यक घटनादुरुस्ती करून घेण्याकरिता महिला संघटनांनी व त्यांना पाठिंबा देणाऱ्यांनी स्वस्थ बसून चालणार नाही.

(मिळून साऱ्याजणी, दिवाळी १९९७)

❑

बीजिंगची आंतरराष्ट्रीय महिला परिषद

या शतकातील किंबहुना या सहस्त्रकातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना म्हणजे स्त्री-पुरूष समतेची चर्चा जितक्या जोमाने जागतिक पातळीवर झाली, तितकी यापूर्वी कधीही झाली नव्हती.

जगातील स्त्रियांच्या समस्यांकडे लक्ष वेधणारी पहिली आंतरराष्ट्रीय परिषद मेक्सिकोमध्ये १९७५ मध्ये झाली. १९७६ ते ८५ हे महिलांचे दशक संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आदेशावरून जगातील अनेक देशात पाळले गेले. त्यानंतर दोन आंतरराष्ट्रीय परिषदा झाल्या. परंतु या सर्व विचारमंथनाचा परमोच्च बिंदू जर कोणता असेल तर तो म्हणजे १९९५ साली सप्टेंबर महिन्यात चीनमधील बीजिंग या शहरात भरविण्यात आलेली चौथी आंतरराष्ट्रीय महिला परिषद.

जगातील स्त्रियांवर होणारा बहुआयामी जुलूम आणि या जुलमातून मुक्त होण्याकरिता, स्त्रियांचे हक्क व्यापक प्रमाणावर मांडून, प्रत्यक्ष कृतीची शिफारस करणारी, कालक्रमाने ही जरी चौथी आंतरराष्ट्रीय परिषद असली, तरी व्यापकतेच्या दृष्टीने ती पहिलीच आंतरराष्ट्रीय परिषद होती, अशी नोंद इतिहासाने घेतली आहे. १८९ देशांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते.

स्त्रियांची प्रगती होण्याच्या दृष्टीने आणि पुरूषांच्या बरोबरीने त्यांना समाजात स्थान मिळण्याचे दृष्टीने ज्या १२ मुद्यांकडे या परिषदेत लक्ष वेधण्यात आले ते मुद्दे पुढीलप्रमाणे :

१) स्त्रिया आणि दारिद्र्य,

२) स्त्रियांचे शिक्षण व प्रशिक्षण,

३) स्त्रिया व आरोग्य,

४) स्त्रियांवर हिंसा व अत्याचार,

५) युद्धग्रस्त प्रदेशात स्त्रियांची अवहेलना,

६) अर्थव्यवस्था व स्त्रिया,

७) स्त्रियांचा सत्तेतील आणि निर्णयप्रक्रियेतील वाटा,

८) स्त्रियांच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेली संस्थात्मक संरचना,

९) मानवी हक्क आणि स्त्रिया,

१०) प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया,

११) पर्यावरण आणि स्त्रिया,

१२) बालिकांच्या समस्या.

या मुद्यांना अनुलक्षून जगात जे वेगवेगळे आढावे अथवा सर्वेक्षणे घेण्यात आली आहेत, त्यातून केवळ अप्रगत देशात नव्हे तर प्रगत देशातसुद्धा स्त्रियांना काय सोसावे लागते आहे ते पुढे आले आहे. काही निवडक निष्कर्षांकडे जरी नजर टाकली तरी प्रगतीचा अजून केवढा मोठा टप्पा गाठावयाचा आहे हे लक्षात येते.

● जगातील १० लाखापेक्षा अधिक बालिका दरवर्षी केवळ त्यांची होणारी हेळसांड आणि कुपोषण याने मृत्युमुखी पडत असतात.

● जगातील जवळजवळ ९ कोटी २० लाख नागरी विभागात राहाणाऱ्या महिलांना सुरक्षित पाण्याचा पुरवठा उपलब्ध नाही.

● जगातील सुमारे १ अब्ज ३० कोटी अत्यंत दारिद्र्यग्रस्त लोकांपैकी ७० टक्के या महिला आहेत.

● जगातील निर्वासित व विस्थापित लोकसंख्येमध्ये स्त्रिया व मुलांचे मिळून प्रमाण ७५ टक्के आहे.

● विकसनशील देशांत बाळंतपणात होणारे स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण २५ ते ४० बाळंतपणामागे १ असे आहे, तर प्रगत देशात हेच प्रमाणात ३००० मागे एक असे आहे.

● १९८७ साली कॅनडा या देशात स्त्रियांचे जे खून झाले त्यातील ६२ टक्के खून हे त्या स्त्रियांच्या नवऱ्यांनी केले होते.

● अमेरिकेत मोटारीचा अपघात अथवा बलात्कार याने जेवढ्या स्त्रिया जखमी होत असतात त्यापेक्षा अधिक स्त्रिया घरात होणाऱ्या मारपीटीने जखमी होत असतात.

● जगातील सर्व लोकप्रतिनिधी सभागृहांची पाहाणी केली असता, त्यात सरासरी स्त्रियांचे प्रमाण १९७५ साली ६.८ टक्के होते, १९८७ साली ९.७ टक्के, तर १९९३ साली अवघे ८.८ टक्के एवढेच होते. लोकसभेमध्ये महिलांचे प्रमाण ३० टक्के असणारे फक्त ३ देश आहेत.

● आहे याच मंदगतीने जर प्रगती होत राहिली तर ज्येष्ठ व्यवस्थापकीय पदावर पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना पोहोचण्यास ४७५ वर्षे लागतील.

स्त्रियांची दारूण परिस्थिती लक्षात घेऊन, विकसित देशांनी आपापल्या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी ०.७ टक्के इतकी रक्कम दर वर्षी स्त्रियांच्या विकासासाठी द्यावी असे आवाहन करण्यात आले. दर ५ वर्षांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर परिषद भरवून प्रगतीचा आढावा घेण्यात यावा असे ठरले. या वर्षी जूनमध्ये घेण्यात आलेल्या आढाव्यात

०.७ टक्के ही रक्कम देण्यात कुचराई होते आहे असे आढळून आले.

बीजिंग परिषदेने अनेक समस्यांकडे परखडपणे लक्ष वेधले हे त्या परिषदेचे यश असले तरी सुधारणा घडवून आणण्याकरिता जे विविध उपक्रम सुचविण्यात आले, त्याची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन फारच थोड्या देशांनी दिले, या खेदजनक वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. १०० पेक्षा अधिक देशांनी नेमके असे कोणतेही आश्वासन दिले नाही.

या परिषदेत सहभागी झालेल्या जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी स्त्रियांनी स्वयंरोजगार निर्माण करून दारिद्र्यमुक्त व्हावे असे आवाहन केले व त्याकरिता २० कोटी डॉलर्स कर्जाऊ रक्कम देण्याचे आश्वासन दिले परंतु अनेक महिला प्रतिनिधींनी हे उथळ औदार्य धुडकावून लावले. कर्जाच्या जाळ्यात अडकण्यापेक्षा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्णयप्रक्रियेत स्त्रियांना स्थान मिळाल्यास, आर्थिकदृष्ट्या समर्थ होण्यास त्या अनेक धोरणे व उपक्रम सुचवू शकतील असे त्यांनी निक्षून सांगितले.

स्त्रियांच्या लैंगिक अधिकारांसकट अनेक विवाद्य विषयांवर या परिषदेत खडाजंगी चर्चा झाली. मतभेदही पुष्कळ झाले. कृतीच्या जाहीरनाम्याचा मसुदा तयार करण्याकरिता अनेक तडजोडी कराव्या लागल्या. समता, सकस प्रगती आणि जागतिक शांतता यावर सर्वसाधारण मतैक्य होते आणि म्हणूनच उद्‌घाटनाच्या सत्रात, मेक्सिको येथील पहिल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या प्रमुख कार्यवाह हेल्वी सिपिला यांनी आपल्या भाषणात जागतिक शांततेच्या प्रस्थापनेकरिता स्त्रियांच्या कार्यावर भर दिला, तेव्हा जेवढा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला तेवढा अन्य कोणत्या सत्रात झाला नाही.

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, ऑगस्ट २०००)

❑

स्पर्धा विश्वसुंदरी निवडण्याची

सुश्मिता सेन आणि ऐश्वर्या राय या दोन युवतींची नावं भारतातील बहुसंख्य सुशिक्षितांना आणि बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निमशिक्षितांनासुद्धा, सध्या परिचयाची झाली आहेत. अवघ्या सुमारे सहा महिन्यांच्या अवधीत या दोन भारतीय युवतींपैकी प्रत्येकीच्या शिरावर एक एक मुकुट ठेवण्यात आला. एका मुकुटाचं नाव 'विश्व मुकुट' आणि दुसऱ्याचं नाव होतं 'दुनिया मुकुट'. हा मुकुट सर्वव्यापी निरंकुश सत्ता उपभोगण्याचा अधिकार बहाल करण्याकरता या युवतींच्या मस्तकांवर ठेवण्यात आलेला नव्हता. हा राजमुकुट नव्हता; त्याचं नाव आहे सौंदर्यमुकुट.

हा मुकुट आपल्या डोक्यावर चढावा अशी महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या अनेक देशांतील तरुण रूपवान मुली एका नियोजित देशात जमतात. सुश्मिता सेन फिलिपाईन्समध्ये गेली होती, तर ऐश्वर्या राय दक्षिण आफ्रिकेमध्ये. तेथे जवळजवळ पारदर्शक असणारी, प्रचंड किमतीची वस्त्रं धारण करून, हरएक प्रकारच्या सौंदर्यप्रसाधनांनी आपलं शरीर खुलवून, एक एक तरुणी एका भव्य व्यासपीठावर अलगद पावलं टाकत येते. आपली अंगयष्टी चहूबाजूंनी ती जमलेल्या तेथील प्रेक्षकांना आणि दूरदर्शनच्या माध्यमातून साऱ्या जगाला दाखवते. आपल्या शरीराच्या प्रत्येक अवयवाचा 'डौल' सर्व प्रेक्षकांना दिसावा म्हणून पुन्हा एकवार पोहोताना घालण्याचा पोशाख (स्विमिंग सूट) घालून ती अलगद पावलांनी येऊन चहूबाजूंनी आपलं दर्शन घडवते. नेमण्यात आलेले परीक्षक - यात स्त्री व पुरुष दोघंही असतात - तिचं अंग न्याहाळून झाल्यावर तिला काही प्रश्न विचारतात आणि ही प्रश्नोत्तरं संपल्यावर जगातील सर्वात सुंदर स्त्री कोण याबद्दलचा आपला निर्णय जाहीर करतात. या यशस्वी रूपवतीच्या डोक्यावर मुकुट चढवला जातो.

अशी आहे ही सौंदर्यस्पर्धा! पण तिला एक प्रतिष्ठित नाव देण्याची प्रथा अलीकडच्या काळात पडली आहे. व्यक्तिमत्व स्पर्धा असं एक भारदस्त नाव या स्पर्धेला दिलं जातं. ही धूळफेक का करावी लागते हे समजावून घेण्याकरता या सौंदर्यस्पर्धांवर ऐतिहासिक दृष्टिक्षेप टाकणं आवश्यक आहे.

जागतिक पातळीवरील या स्पर्धेत अवघ्या सहा महिन्यांच्या कालावधीत दोन भारतीय महिलांची निवड झाली हा केवळ योगायोग असेल का? की त्यामागे काही योजना असण्याची शक्यता आहे? 'ताऱ्यांना चकित करून सोडणारं तेज', 'भारतीय संस्कृतीचा वारसा देशोदेशी पोहोचवण्याची क्षमता असणाऱ्या देदीप्यमान देशदूत' असं कौतुक रकाने भरभरून वर्तमानपत्रात येऊन गेलं. लक्षवेधक मथळे, भपकेदार फोटो. सामान्य भारतीयांच्या मनात वरील प्रश्न निर्माण होण्याकरता अवसर तरी कुठे होता? परंतु बेफाट आतषबाजी थोडी ओसरल्यावर, लोकांच्या मनात काही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचं उत्तर शोधण्याकरतासुद्धा सौंदर्यस्पर्धांचा संक्षिप्त आढावा घेणं उद्‌बोधक ठरेल.

सौंदर्यस्पर्धा असं अगदी ढोबळ मानाने ज्याला नाव देता येईल, त्याची सुरूवात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेमध्ये झाली. ख्रिश्चन धर्मीयांच्या एका पंथात ईस्टर या सणापूर्वी दीर्घ काळ, दिवसा उपोषण करण्याची प्रथा होती. या तपस्येनंतर एक जल्लोषजत्रा भरत असे. या उत्सवात जे युवक-युवती भाग घेत असत त्यांच्यामध्ये कोण कोणापेक्षा अधिक उठावदार दिसतो/दिसते, यावर अकृत्रिमपणे, खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा होत असे. दिखाऊपणाचा हव्यास थोड्याफार प्रमाणात यात असायचा. आपल्याकडे लक्ष वेधण्याची स्टंटबाजीही थोड्या प्रमाणात असायची. परंतु अवाजवी पारंपरिक बंधनातून स्वत:ला मुक्त करून घेण्याची ती एक प्रकारची धिटाई आहे असं बऱ्याच तरुण-तरुणींना वाटत असे, आणि म्हणून कोणत्याही प्रकारचा धंदेवाईकपणा नसलेल्या या स्पर्धेत ते आनंदमग्न होत असत. वृद्ध पिढीला हा खेळ थोडा खटकला तरी त्याला तीव्र विरोध करण्याला कोणी प्रवृत्त होत नसे.

या स्पर्धेच्या परंपरेचा धागा पकडून, पुढे अमेरिकेतील समुद्र अथवा नदी-किनाऱ्यावरील हौशी पर्यटकांमध्ये अशाच स्पर्धा होऊ लागल्या. परंतु या स्पर्धांमध्ये सुद्धा जवळजवळ अनावृत शरीराचं प्रदर्शन जगासमोर करून, संपत्तिग्रस्त बनण्याची इर्षा नसे.

परंतु स्पर्धेवर अधिष्ठित असलेली आधुनिक युगातली भांडवलशाही जसजशी गतिमान होऊ लागली तसतसा स्पर्धा या जीवनमूल्याचा आशय बदलला. अधिकात अधिक धनसंचय हा व्यक्तिगत उन्नतीचा अत्यंत महत्त्वपूर्ण मानदंड ठरला. बहुतेक सर्व जीवनव्यहार हे पैशाच्या हिशेबात मांडण्यात येऊ लागले. याचीच परिणती म्हणून, स्त्रीदेहाचा बाजार मांडून त्यातून जर अधिक नफा मिळवता येत असेल, तर मानवाला न शोभणारा तो असंस्कृतपणा आहे असं बहुतेकांना वाटेनासं झालं किंवा जर वाटलंच तर त्याकडे डोळेझाक करण्यात आली. उत्पादित वस्तूंच्या विक्रीची संख्या वाढावी, तसंच वेगवेगळ्या तऱ्हेच्या पोशाखात, लक्ष वेधून घेता येईल अशा स्थितीत उभं राहणं, बसणं, पहुडणं, या व्यवसायाला 'कमर्शिअल मॉडेलिंग' (व्यापारवृद्धि-आसन) असं प्रतिष्ठित नाव देण्यात आलं. त्यामुळे अनेक सुशिक्षित, सुसंस्कृत लोकांच्या

मनातील किंतू जवळपास वितळून गेला.

अशा या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर सध्या प्रचलित असलेल्या सौंदर्यस्पर्धेचा जन्म झाला. ७ सप्टेंबर १९२१ रोजी न्यू जर्सीमधील अटलांटिक सिटी या ठिकाणी पहिली 'मिस् अमेरिका' या नावाची सौंदर्यस्पर्धा घेण्यात आली. अटलांटिक सिटीमध्ये एक पर्यटन केंद्र आहे. या केंद्राच्या जोपासनेचे व त्यातून उत्पन्न मिळवण्याचे हक्क खासगी जमीनधारकांकडे आहेत. त्यावर्षी, पर्यटनाचा सर्वसामान्यत: ठरलेला कालावधी अधिक काळपर्यंत वाढवून घ्यावा असं या पर्यटन केंद्राच्या मालकांच्या मनात आलं. अमेरिकेतील सर्वात सुंदर स्त्री निवडण्याचा कार्यक्रम जर योजण्यात आला तर आलेले पर्यटक अधिक काळ थांबतील आणि नवे मोठ्या संख्येने येतील असा अंदाज त्यांनी बांधला. मात्र ही स्पर्धा योजून ती पार पाडण्याची जबाबदारी अन्य व्यक्तींनी उचलली. योग्य जागा ताब्यात घेऊन, तेथे मोठं व्यासपीठ उभारणं, प्रेक्षकांची सर्व दृष्टीने सोय करणं, देशातील युवतींना या स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त करणं, पुरस्काराची मोठी रक्कम जमवणं, परीक्षकांची निवड करून त्यांना प्रचंड रकमेचं मानधन देणं, वृत्तपत्रांना या स्पर्धेला प्रसिद्धी देण्याकरता प्रवृत्त करणं. या करता अवाढव्य रकमेची भांडवल गुंतवणूक करणं क्रमप्राप्त होतं. काही राष्ट्रव्यापी व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी या खर्चाचा वाटा उचलावा या करता त्यांच्या समोर सौंदर्यस्पर्धेच्या कार्यक्रमाचा प्रस्ताव मांडण्यात आला. खुद्द कार्यक्रमाच्या ठिकाणी या कंपन्यांना आपल्या उत्पादित वस्तूंची जाहिरात करण्यास उत्तम संधी मिळणार होती. शिवाय जी अमेरिकन सुंदरी सर्वात सुंदर असल्याचा निर्णय जाहीर होईल, तिला तिच्या नियोजित पुरस्कार-रकमेव्यतिरिक्त 'मिस अमेरिका'च्या संयोजकांकरवी मोठ्या रकमा देऊन स्पर्धेच्या खर्चाचा भार उचलणाऱ्या कंपन्यांच्या वस्तूंची जाहिरात करण्याकरता करारनामा करून भाग पाडणं शक्य होणार होतं. म्हणून कोळ्यांची जाळी बनवणाऱ्या कंपन्यांपासून तो स्त्री-पुरुषांची अंतरवस्त्रं उत्पादन करणाऱ्या कंपन्यांपर्यंत आणि विविध खाद्यपदार्थ, ब्लेडस्, आकर्षक कपडे इत्यादी वस्तू बाजारात विक्रीसाठी आणणाऱ्या कंपन्यांपासून तो क्रूझ क्षेपणास्त्रांची बाह्य आच्छादने निर्माण करणाऱ्या कंपन्यांपर्यंत अनेक अजस्त्र कंपन्यांनी ही स्पर्धा दरवर्षी पुरस्कृत करण्याची तयारी मोठ्या आनंदाने दर्शवली. बिअॅट्रिस फूडस्, जिलेट एसमार्क इंक, अेविस, स्विफ्ट, प्लेटेक्स अंडर गार्मेंटस्, वेलमॅन डायनॅमिक्स, अशा काही निवडक मशहूर कंपन्यांची नावं येथे वानगीदाखल दिली म्हणजे केवढ्या मोठ्या रकमांची उधळपट्टी या स्पर्धांतून होत असेल, संयोजकांना किती अफाट फायदा मिळत असेल, आणि सुंदरींच्या खात्यात किती रकमांचे ढीग जमा होत असतील याची कल्पना येऊ शकेल.

या 'मिस् अमेरिका' सौंदर्यस्पर्धेतून साध्य काय झालं? पर्यटन व्यवसाय करणाऱ्या जमीन मालकांना अधिक नफा मिळाला. ह्या स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारणाऱ्या उद्योजकांना अफाट पैसा मिळाला. स्पर्धेच्या खर्चाचा वाटा उचलणाऱ्या खासगी

कंपन्यांना आपल्या वस्तूंची तुफान जाहिरात करता आली आणि त्यातून विक्री वाढवता आली. खर्चाचा वाटा न उचलणाऱ्या कंपन्यांनीसुद्धा या व तिच्याबरोबर स्पर्धेत भाग घेणाऱ्या, परंतु पुरस्कार न मिळालेल्या काही निवडक सुंदरींना आपापल्या जाहिरातीत नाचवून विक्री व नफ्यात वाढ करून घेतली. आणि ही स्पर्धा दरवर्षी घेण्यात येऊ लागली, तसतसं स्त्रीचं अनन्यसाधारण वैशिष्ट्य सौंदर्य-जोपासनेत आहे असं अनेक स्त्रियांना वाटू लागलं. याचा एक ओंगळ परिणाम असा झाला की 'सौंदर्याचं' विच्छेदन करण्यास सुरुवात झाली. सौंदर्याचं एक संश्लिष्ट स्वरूप असतं आणि त्याचा आस्वाद लोक घेत असतात. त्यात आक्षेपार्हही काही नाही. मोगरा किंवा गुलाबाचं फूल पाहून त्याच्या सौंदर्यावर आपण लुब्ध होतो. या सौंदर्याचा आस्वाद घेत असताना त्या फुलाची एक एक पाकळी, देठ, पराग असं पृथक्करण करण्यात येत नाही. स्त्रीच्या सौंदर्याची स्पर्धा सुरू झाल्यानंतर मात्र सौंदर्याच्या एकेका घटकाची चर्चा सुरू झाली आणि त्याची परिमाणं ठरवून देण्यात येऊ लागली. कपाळ किती रूंद असावं? डोळ्यात चमक असावी, पण ती संथ-मृदू असावी. चेहरा मऊ-मुलायम सॅटिनसारखा असावा. गालातील अथवा खांद्यांमधली खळी विशिष्ट अंशाची असावी. स्तनांचा आकार किती असावा? वजन किती असावं? कमर किती निमुळती असावी? मांड्यांचा आणि पोटऱ्यांचा सांधा अलगदपणे विशिष्ट ठिकाणी जुळतो आहे का? अशी तपशीलवार मांडणी आणि शिफारस करण्याची प्रथा सुरू झाली. या परिणामांना अनुलक्षून नसेल त्या साऱ्या उणिवा समजावयाच्या. आणि त्या भरून काढण्याकरता पावडर, क्रीम, सुगंधी फवारे, भुवया अथवा पापण्या प्रसाधनं, ओष्ठभूषा, केशभूषा याकरिता विशिष्ट द्रव्यं, एवढंच काय, तर कोणत्या हॉरमोन्सची इंजेक्शन्स् घ्यावीत या करता, वेगवेगळ्या शिफारशी कधी गोंडस भाषेत, तर कधी आक्रमक शैलीत सादर करणाऱ्या अनेक कंपन्या पुढे सरसावल्या. उंची-उंची कपडे बनवणाऱ्या कंपन्यांनी आपलं घोडं पुढे दामटलं. पाठ उघडी दिसावी म्हणून, छाती उघडी दिसावी म्हणून, गळ्याखालची हाडं जरा उठून दिसत असतील तर ती झाकली जावीत म्हणून, अशी वेगवेगळ्या स्वरूपाची डिझाइन्स व फॅशन्सची कोष्टकं मांडणाऱ्या व्यावसायिकांनी आपले खिसे भरून घेतले. थोडक्यात सांगायचं तर स्त्री ही स्त्री राहिली नाही. तो एक मांसाचा गोळा बनला अणि त्याला मन मानेल तसा आकार देणाऱ्यांनी आपापला स्वार्थ यथेच्छपणे साधला. पुरुषांच्या वैषयिक नजरा सुखावल्या. ज्या स्त्रिया सौंदर्याच्या कसोटीला उतरू शकत नसत त्या दिमाखदार दिसण्याकरता अनेक कृत्रिम साधनं अवाजवी प्रमाणात वापरू लागल्या आणि त्यातून पुरुषांची मर्जी संपादन करण्यात धन्यता मानू लागल्या. सुंदरींच्या माध्यमातून करण्यात आलेल्या जाहिरातीतून मोठी वर्तमानपत्रं व नियतकालिकं यांच्या मिळकतीत भर पडत गेली. त्यामुळे आपण लोकशिक्षण व समाजोन्नती करत असल्याचा दावा करणाऱ्या, लोकशाही जोपासनेच्या या 'चवथ्या आधारस्तंभाने' सौंदर्यस्पर्धांना आणि निकालांती घोषित करण्यात आलेल्या सुंदरींना

प्रचंड प्रमाणावर प्रसिद्धी दिली.

अमेरिकेत १९२१ साली सुरू झालेली सौंदर्यस्पर्धा अमेरिकेपुरती मर्यादित का राहिली नाही? तीस वर्षांपर्यंत ही स्पर्धा अमेरिकेपुरतीच मर्यादित राहिली होती. 'मिस् अमेरिका' या स्पर्धेत भाग घेणाऱ्या काही युवती स्पर्धेतील एक वेळचं दर्शन घडवण्या-करिता जो बेदिंग अथवा स्विमिंग सूट वापरत असत त्याचे जे निर्माते होते त्या कंपनीचं नाव होतं 'पॅसिफिक नीटिंग मिल्स'. ह्या बेदिंग सूटचं बाजारपेठेतील नाव (व शिक्का) कॅटेलिना सूट असं होतं. स्पर्धेतील सर्व सुंदरींचे फोटो काढण्यात येत असत. ज्या सुंदरी कॅटेलिना स्विमिंग सूटस् वापरत असत त्यांची छायाचित्रं आपणास देण्यात यावी अशी विनंती १९५१ साली पॅसिफिक नीटिंग मिल्स्ने 'मिस् अमेरिका' स्पर्धेच्या संयोजकांना केली. संयोजकांनी (संयोजन-उद्योजकांनी) छायाचित्रं देण्यास नकार दिला. याच्या निषेधार्थ पॅसिफिक नीटिंग मिल्सने दुसरी सौंदर्यस्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. ही दुसरी स्पर्धा दुसऱ्या एखाद्या नावानं चालवणं क्रमप्राप्त होतं आणि कंपनीला ती स्वतःच्या नावानं चालवावयाची नसल्यामुळे दुसरा एक संयोजक-उद्योजक धुंडाळणंही आवश्यक होतं. म्हणून कॅलिफोर्नियामधील लाँग बीच येथील नगरपालिकेशी या कंपनीने संपर्क साधला आणि स्पर्धेचे हक्क स्वतःकडे ठेवून, नगरपालिकेनी ही स्पर्धा आयोजित करावी, त्यातून मिळणारा अवाढव्य नफाही नगरपालिकेने घ्यावा, अशी विनंती नगरपालिकेला करण्यात आली. या स्पर्धेची व्याप्ती देशाच्या सीमा ओलांडून जगभर पसरावी म्हणून या स्पर्धेला 'मिस युनिव्हर्स' (केवळ अमेरिकन सुंदरी नव्हे तर विश्वसुंदरी) असं नाव देण्यात आलं. १९५१ ते १९५५ पर्यंत ही दुसरी स्पर्धा कॅलिफोर्निया येथे चालू होती आणि तिचा बोलबाला देशाबाहेरही होऊ लागला होता. १९५५ साली कैसर रॉथ नावाच्या एका कंपनीने पॅसिफिक नीटिंग मिल्स् ही कंपनी विकत घेतली. 'मिस् युनिव्हर्स' ही स्पर्धा अधिक गाजावाजा करून, अधिक झगझगीत करण्याचा निर्णय या कंपनीने घेतला. नगरपालिकेपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करून स्पर्धेचा दिमाख कोण वाढवू शकेल याचा अंदाज बांधण्यात आला. 'एरिअल' ही कपडे धुण्याची पावडर भारतातील अनेक शहरवासीयांना परिचयाची आहे. या पावडरीचे उत्पादन करणाऱ्या 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल' या कंपनीचं (ही कंपनी इतर अनेक वस्तूंचं उत्पादन करते) जाळं जगभर पसरलं आहे आणि साहजिकच या कंपनीची भांडवल गुंतवणुकीची क्षमता जबरदस्त आहे. म्हणून 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल' कंपनीशी संपर्क साधण्यात आला. या कंपनीने स्पर्धेचे हक्क न मागता स्पर्धेचा संपूर्ण खर्च करण्याची तयारी दर्शवली. अट फक्त एवढीच होती की स्पर्धा कॅलिफोर्नियातून उठवून अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील मिआमी येथे घेण्यात यावी. 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल' ही स्पर्धा पुरस्कृत करणार हे समजल्यावर, स्पर्धा दणकेबाज होणार, अभूतपूर्व लखलखाट, हरएक प्रकारची करमणूक, आणि देशोदेशींच्या सुंदरी आपल्याला बघायला मिळणार या आनंदाने

मियामीवासी लोक धुंद झाले. स्पर्धेचं यजमानपद आपल्या शहराला हमखास मिळावं या करता मियामी शहराने जागा वापरण्याचं भाडं मागण्याऐवजी आपण होऊन संयोजक-उद्योजकांना तीन लाख डॉलर रोख रक्कम देण्याचं आश्वासन दिलं! स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व सुंदरींचा थाटात राहण्या-खाण्याचा खर्च, गावातील त्यांचा हिंडण्या-फिरण्याचा खर्च व त्यांच्याकरता चार-दोन पाठराखीणींचा ('शेपरन्स'चा) सर्व खर्चही मियामी शहराने दिला!

एक लक्षात घेण्याजोगं आहे ते हे की ज्या कंपनीकडे 'मिस् युनिव्हर्स'चे हक्क असतील ती कंपनी जर दुसऱ्या कंपनीने विकत घेतली तर स्पर्धेचे हक्क या नव्या कंपनीकडे जात असत. कैसर रॉथ ही कंपनी पुढे 'गॉलर्न वेस्टर्न' या कंपनीने विकत घेतली व गॉलर्न वेस्टर्नचं 'पॅरॅमाऊंट फिल्मस्' असं नामांतर झालं. स्पर्धेचे हक्क आता या नवीन कंपनीकडे आले. पुढे १९८७ साली पॅरॅमाऊंट फिल्मस्ने 'मॅडिसन स्क्वेअर गार्डन्स' या नावाची नवी कंपनी सुरू केली. स्पर्धेचे हक्क हिला बहाल केलेले असल्यामुळे ती कंपनी पुढे 'व्हिएकॉम' कंपनीला, व 'व्हिएकॉम' कंपनी जेव्हा 'इंटरनॅशनल टेलिव्हिजन ॲण्ड टेलिग्राफ, शेरॅटॉन ॲण्ड केबल व्हिजन' या कंपनीला विकली गेली तेव्हा हक्कांचं हस्तांतर होत गेलं. 'इंटर नॅशनल टेलिव्हिजन...'शी झालेला विक्री व्यवहार हा सर्वात अलीकडचा म्हणजे ऑगस्ट १९९४ सालातील असल्यामुळे विश्वसुंदरी स्पर्धेचे अधिकार सध्या या कंपनीकडे आहेत आणि 'मिस युनिव्हर्स इनकॉर्पोरेटेड' या कंपनीतर्फे (संयोजक-उद्योजक) स्पर्धा चालवली जाते. हा सर्व तपशील देण्यातला उद्देश हा आहे की सौंदर्यस्पर्धा हा एक पैसे कमावण्याचा अस्सल इरसाल धंदा असून, गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व यापैकी कशाचीही कसोटी तपासण्याशी त्याचा सुतराम संबंध नाही.

वर वापरलेला 'इरसाल' हा शब्द काही वाचकांना कदाचित खटकेल म्हणून एक खुलासा करणं आवश्यक आहे. 'मिस् युनिव्हर्स'चे हक्क जिच्याकडे सध्या आहेत ती 'इंटरनॅशनल टेलिव्हिजन' बहुराष्ट्रीय कंपनी, तिच्या नावावरून अभिप्रेत असलेला उद्योग फक्त करते असं नाही. आदर-सत्कार-पाहुणचार याची चोख व्यवस्था करण्याकरता कंत्राटं घेणं, तंत्रज्ञान व तदनुषंगिक उद्योगांची उभारणी करण्याकरता सल्ला देणं, विमा व्यवसाय व अन्य अनेक उद्योग तर ही कंपनी करतेच, परंतु अमेरिकेतील लास वेगास येथे लवकरच ७५ कोटी डॉलर्स इतकी भांडवल गुंतवणूक करून एक प्रतिष्ठित जुगाराचा अड्डा (कॅसिनो) सुरू करण्याचा संकल्प तिने सोडला आहे. अशा या बहुविध उद्योगांची जाहिरात करण्याकारिता मोहक स्मित करणारी, लवचीक अवयवांनी जाहिरातीच्या पडद्यावर विषयलोलुप अंगविक्षेप करणारी जर विश्वातून निवडलेली खास एक, आणि मुकुट थोडक्याने हुकलेल्या इतर काही सुंदरी असतील तर करोडो रुपयांचा नफा मिळणार याची निर्विवाद शाश्वती! अशा या सुंदरी जगभर हिंडून कंपनीने शोधत बसण्यापेक्षा सौंदर्यस्पर्धांचा खास उद्योग करणाऱ्या

'मिस् युनिव्हर्स इनकॉर्पोरेटेड' (एम.यू.आय.) या कंपनीकडे जर ते काम सोपवलं तर ते अधिक सोयीचं. असा आहे हा सरळ सहज समजण्यासारखा हिशेब.

एम.यू.आय. ही कंपनी केवळ जगप्रसिद्ध 'मिस् युनिव्हर्स'ही स्पर्धा चालवते असं नाही. देश पातळीवर ती 'मिस् यु.एस्.ए.' ('मिस् अमेरिका'पेक्षा वेगळी), 'मिस् टीन्स्, यु.एस्.ए.' (यौवनाच्या उंबरठ्याच्या थोड्या अलीकडील मुली) अशा स्पर्धाही तुलनेने लहान कंपन्या किंवा व्यापार मंडळांकरता चालवत असते. एम.यू.आय.च्या मिळकतीचे स्रोत तरी कोणते? एकूण मिळकतीपैकी ४९% रक्कम ही 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल' सारखी एक कंपनी किंवा काही कंपन्यांच्या समूहाकडून येत असते. ज्या देशात ही स्पर्धा आयोजित केली जाते त्यातील काही देश किंवा देशापुरती स्पर्धा मर्यादित असेल तर देशातील प्रदेश अथवा शहर, स्पर्धेचा 'मान' आपल्याला मिळाला म्हणून एम्.यू.आय.ला भरघोस रक्कम देत असतात. सुंदरींची देखभाल व कडक सुरक्षा व्यवस्था महिनाभर ठेवण्याचा, तसंच प्रेक्षकांच्या सोयी-सुविधांचा खर्च (एम.यू.आय. सांगेल तेवढा) काहीजण करतात. स्पर्धेच्या जागेवर ज्या अनेक जाहिराती केल्या जातात त्याचं उत्पन्न एम.यू.आय. ला असतंच. शिवाय खासगी टी.व्ही.केंद्र, व्हिडिओ इत्यादींना कार्यक्रम प्रदर्शित करण्याकरता एम.यू.आय.ला फी द्यावी लागते. निवडून आलेली विश्वसुंदरी एम.यू.आयच्या कडक बंधनात एक वर्षभर असते. कंपनीच्या परवानगीशिवाय तिला कुठेही बोलता, फिरता येत नाही. अगदी स्वच्छतागृह अगर स्नानगृहापर्यंत जातानासुद्धा कंपनीने नेमलेली पाठराखीण (शेपरन्) बरोबर असते. कंपनी सांगेल तिथे तिथे (फक्त तिथे) जाहिरातीकरता उभं राहावयाचं - वर्तमानपत्र - मासिक असो, पोस्टर असो, पडदा असो अगर साबणासारख्या वस्तूचं कागदी वेष्टन असो. या कामगिरीबद्दल विश्वसुंदरीचा मुकुट डोक्यावर चढल्यावर मिळणारी रक्कम व कंपन्यांनी 'प्रेमाने' दिलेल्या अनेक भेटवस्तूंव्यतिरिक्त विश्वसुंदरीला वर्षभराचा पगार म्हणून ५० हजार डॉलर्स मिळतात. ती ज्या कंपनीची जाहिरात करते, त्या कंपन्यांकडून मिळणाऱ्या रकमेपैकी २० टक्के वाटा तिचा आणि ८० टक्के वाटा एम.यू.आय. या स्पर्धा संयोजक उद्योजकांचा. सर्व खर्च वजा जाता दरवर्षी एम.यू.आय.ला जो निव्वळ नफा मिळतो तो सुमारे निदान दहा लाख डॉलर्स असतो असा अंदाज बांधण्यात आलेला आहे. हा केवळ 'मिस् युनिव्हर्स' या स्पर्धेतून मिळणारा निव्वळ नफा आहे हे लक्षात ठेवावयास हवं.

शाळेपासून तो विद्यापीठापर्यंत आणि लहान रस्त्यांवरील दुकानांपासून ते मोठ्या शहरातील बाजारपेठांपर्यंत अमेरिकेत अशा स्पर्धांना ऊत आला आहे. याशिवाय लहान मुलांना उपयुक्त अशा वस्तूंचा खप वाढवण्यात (औषधं, खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ) ज्या कंपन्या अथवा वस्तू-वितरकांना स्वारस्य असतं, ते बालक-बालिका स्पर्धा आयोजित करत असतात. चाचणी स्पर्धा, उपांत्य स्पर्धा आणि अंतिम स्पर्धा असे स्पर्धांचे टप्पेही असतात. या स्पर्धांमधून पैशाची उधळपट्टी तर होतेच शिवाय

स्पर्धेत भाग घेणाऱ्या आणि त्यांच्या यशापयशाबद्दल उत्कंठा असणाऱ्यांच्या मनावरही पुष्कळ ताण पडतो. ज्यांना टोमॅटो अथवा त्यापासून बनणारे सॉस, केच-अप् अथवा सूप खपवायचं असतं ते 'मिस् पिंकी टोमॅटो' किंवा ज्यांना साधे अथवा खारे दाणे खपवायचे असतील ते 'मिस् पी-नट' अशा हास्यास्पद स्पर्धाही आयोजित करतात. अमेरिकेत दरवर्षी अशा सर्व तऱ्हेच्या स्पर्धांची बेरीज केली तर त्यांची संख्या सात लाखांपेक्षा अधिक भरेल.

'मिस् युनिव्हर्स' ही स्पर्धा स्थापन झाल्याबरोबर तिने 'मिस् अमेरिका'ला मागे टाकून आंतरराष्ट्रीय पातळी गाठली आहे व प्रतिसादही मोठा आहे हे पाहून, त्याच वर्षी म्हणजे १९५१ साली इंग्लंडमधील एरिक मोर्ले आणि त्यांच्या पत्नी ज्युलिआ यांच्या मनात अशीच सौंदर्यस्पर्धा आपण सुरू करावी असं आलं. 'मिस् युनिव्हर्स' पेक्षा काहीतरी वेगळं नाव देणं तर आवश्यक होतं, परंतु त्याची आंतरराष्ट्रीय व्याप्तीही त्यांना प्रकट करायची होती. म्हणून या स्पर्धेला 'मिस् वर्ल्ड' असं नाव देण्यात आलं. मोर्ले पती-पत्नींनी ही स्पर्धा चालवण्याकरता जी कंपनी स्थापन केली ती पहिली ३२ वर्षं म्हणजे १९८३ पर्यंत प्रायव्हेट लिमिटेड कंपनी होती. मोर्ले पती-पत्नींची गुंतवणूक ५५% होती तर इतरांची ४१% होती. १९८३ साली ही कंपनी पब्लिक लिमिटेड झाली आणि वर्षभरात त्यात चाळीस लाख पौंडांची गुंतवणूक झाली. यापैकी ५१.६८% गुंतवणूक पती-पत्नी संस्थापकांची आणि उरलेली गुंतवणूक इतर भागधारकांची. ही स्पर्धा लंडनमधील रॉयल अ‍ॅलबर्ट हॉलमध्ये घेण्यात येत असे. स्पर्धा चालवण्याचा एकूण ढाचा जवळ जवळ 'मिस् युनिव्हर्स'सारखाच असल्यामुळे, एका मर्यादित लेखात अधिक तपशील न देणं उचित ठरेल अशी अपेक्षा आहे. फरक होता तो दोन बाबतीत.

'मिस् वर्ल्ड' स्पर्धेच्या आरंभीच्या काही वर्षांत स्पर्धेत भाग घेणाऱ्या युवतींनी 'स्विमिंग सूट' घालून येऊन आपलं सौंदर्यदर्शन घडवू नये अशी अपेक्षा (अट) होती कारण इंग्लंडमधील लोकांना ते रुचण्यासारखं नव्हतं. परंतु लोकांच्या नीती-कल्पना बदलू लागण्याची चिन्हं दिसल्याबरोबर ही अट काढून घेण्यात आली. दोन्ही स्पर्धांमध्ये सुरुवातीच्या काळात युरोप, अमेरिकेतील सुंदरींनाच स्पर्धेत भाग घेण्यास वाव मिळत असे. आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका या देशातील सौंदर्य निकृष्ट प्रतीचं आहे असे मानण्यात येत असे. 'मिस् वर्ल्ड' या स्पर्धेमध्ये अंतिम स्पर्धेसाठी निवड करण्यापूर्वी जी चाचणी परीक्षा होत असे त्यात, वर्ण, वंश व विशिष्ट शारीरिक बांधा पाहून निवड केली जात असे.

सौंदर्याबद्दलची पूर्वग्रहदूषित कल्पना 'मिस् युनिव्हर्स' व 'मिस् वर्ल्ड' या स्पर्धांच्या संयोजक-उद्योजकांना बदलणं भाग का पडलं? ज्या कंपन्या या स्पर्धांच्या खर्चाचा वाटा उचलत असत त्यांना आपले नफे टिकवण्याकरता व वाढवण्याकरता बाजारपेठेचा विस्तार करणं क्रमप्राप्त होतं. आशिया-आफ्रिका देशातील बाजारपेठांवर आपलं वर्चस्व प्रस्थापित करण्याकरता त्यांनी या देशांमधूनसुद्धा यापुढे स्पर्धा घेण्यात यावी असा

आग्रह धरला. स्पर्धा एकदा युरोप-अमेरिकेच्या बाहेरही हलल्यावर, या 'स्थितीशील, अप्रगत, औदासीन्यग्रस्त' देशांमधील 'गूढ, विस्मयकारक, शीतल पण तरतरीत, भारून टाकणाऱ्या' सौंदर्याची प्रचिती पाश्चात्त्यांना येऊ लागली. आणि मग, कधी कधी तर, ज्या देशातील बाजारपेठ कंपन्यांना हवी असेल, मग ती सौंदर्यप्रसाधनांच्या विक्रीकरता असो, पर्यटन केंद्र विकसित करण्याचं कंत्राट मिळावं म्हणून असो, मौल्यवान खडेखरेदीचं आकर्षण निर्माण करण्याकरता असो अथवा अत्याधुनिक बंदुकीच्या गोळ्या त्या देशातील कायदा-सुव्यवस्था टिकवणं व संरक्षणसिद्धता वाढवणं या करता कशा आवश्यक आहेत हे पटवून देण्याकरता असो, त्या देशातील सुंदरीच्या डोक्यावर सौंदर्य मुकुट चढवावा अशा प्रत्यक्षाप्रत्यक्ष सूचनाही नि:स्पृहतेला दुय्यम स्थान देणाऱ्या परीक्षकांना देण्यात येऊ लागल्या. यातील बरेच परीक्षक बरेच वेळा आशिया-आफ्रिका-लॅटिन अमेरिका खंडातील असतात, परीक्षा मंडळावर स्त्रियांची नेमणूकही होत असते याची खेदपूर्वक नोंद घेतली पाहिजे.

ऐश्वर्या रायचं मस्तक सौंदर्य मुकुटाने सुशोभित करणाऱ्या 'मिस् वर्ल्ड' या स्पर्धेचा निकाल फिरवण्याबाबत अपकीर्ती 'मिस् युनिव्हर्स'पेक्षा थोडी अधिक आहे. 'मिस् युनिव्हर्स'च्या स्पर्धेत घडलेली फक्त एक-दोन उदाहरणं जरी लक्षात घेतली तरी 'मिस् वर्ल्ड'च्या स्पर्धेत काय घडत असेल याची कल्पना येईल.

काही वर्षांपूर्वी 'मिस् युनिव्हर्स'च्या स्पर्धेत, परीक्षकांनी स्पर्धेला आलेली स्वीडनमधील सुंदरी मुकुट धारण करण्यास पात्र ठरवली होती. परंतु स्पर्धेच्या खर्चाचा अधिकात अधिक वाटा उचलणाऱ्या कंपन्यांना ग्रेनाडा या देशात पर्यटकांसाठी शानदार हॉटेल बांधण्याच्या प्रकल्पाचं कंत्राट मिळवायचं होतं म्हणून त्यांनी आपलं वजन खर्च करून आतल्या आत कारवाया करून निकाल फिरवला आणि ग्रेनाडाच्या युवतीला 'सौंदर्य-सम्राज्ञी' चा बहुमान देण्यास संयोजक-उद्योजकांना (म्हणजे वर उल्लेख केलेल्या एम्.यू.आय. कंपनीला) भाग पाडलं. स्वीडनच्या युवतीला दुसरा नंबर देऊन परीक्षकांच्या मूळच्या निकालावर बोळा फिरवला गेला, परंतु पुढे हा गैरप्रकार उघडकीला आला. स्वीडनची युवती निराश झाली पण तिला काही करता आलं नाही. १९६४ साली 'मिस् युनिव्हर्स' हा बहुमान ज्या सुंदरीला बहाल करण्यात आला तिला तो मिळण्याची शक्यता कोणालाही वाटत नव्हती. परीक्षकांपैकी एकजण उमराव घराण्यातील बडं प्रस्थ होतं. 'बहुमान' मिळालेल्या सुंदरीने निकालाच्या आदल्या रात्री, या महाशयांना खास सोबत दिली होती, म्हणून इतर परीक्षकांची तोंडं बंद ठेवण्याची तजवीज करण्यात आली आणि बराच खालचा क्रमांक मिळालेली ही युवती 'विश्वसुंदरी' बनली. १९८० साली 'मिस् वर्ल्ड'च्या स्पर्धेत पश्चिम जर्मनीतील गॅब्रिएला ब्रूम मुकुटधारी बनली. परंतु आपल्याला आलेले विपरीत अनुभव लक्षात घेऊन आणि या स्पर्धेचं बाजारी स्वरूप पाहून, 'बहुमान' मिळाल्यापासून १८ तासांत, तिने मिळालेला मुकुट, पुरस्काराची रोख रक्कम ५० हजार डॉलर्स आणि पुढील काळात विविध

वस्तूंची जाहिरात, पडद्यावर दर्शन घडवून आणण्याकरता मान्य करण्यात आलेल्या रकमा, ही सर्व मिळकत परत करून टाकली. 'सौंदर्या'च्या बाजारात उभं राहण्याला तिनं नकार दिला.

'मिस् एशिया' या नावाची अशीच एक स्पर्धा चालते. त्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी भारतातील 'फेमिना' या मासिकाने स्वत:च्या 'मिस् इंडिया' या स्पर्धेतून पुरस्कारलेली युवती गेली होती. कंपन्यांचे प्रतिनिधी, परीक्षक, इतर बडी धेंडं एकेका मुलीचा उपभोग घेण्यासाठी वाटच पाहत असतात असा आपला अनुभव स्पर्धेतून परत आल्यावर तिनं नोंदवला आहे.

जागतिक पातळीवर आणि देशापुरत्या मर्यादित अशा अनेक स्पर्धा चालत असतात. सौंदर्य स्पर्धांबद्दल लोकांमध्ये नापसंती वाढते आहे, विशेषत: जागरूक महिला आणि १९८४ सालापासून पुरुषसुद्धा निषेध निदर्शनात सहभागी होऊ लागले आहेत. हे पाहून सौंदर्य-स्पर्धा या व्यक्तिमत्त्व स्पर्धा असतात असा दावा मांडण्यास संयोजक-उद्योजकांनी सुरुवात केली. अंगप्रदर्शन झाल्यानंतर स्पर्धकांना एक-दोन प्रश्न परीक्षक विचारू लागले. या प्रश्नांच्या उत्तरांना काही गुण (मार्क्स) राखून ठेवण्यात आल्यामुळे ही व्यक्तिमत्त्व स्पर्धा आहे असं लोकांच्या गळी उतरवता येईल असा कयास बांधण्यात आला. त्याबरोबरच उत्तरांचे साचेबंद नमुनेही ठरू लागले. 'पुढील आयुष्यातील तुमचे ध्येय काय असेल?' असा प्रश्न जर विचारलेला असेल तर अप्रगत देशातील मुलींनी 'दारिद्र्य निर्मूलन', 'समाजोन्नती' अशा स्वरूपाची उत्तरं देण्याकरता स्पर्धाकांक्षी मुलींना प्रशिक्षण देण्यात येऊ लागलं. युरोप, अमेरिका किंवा तत्सम प्रगत देशातील युवती असेल तर तिनं 'जागतिक शांतता' अथवा 'पर्यावरण रक्षणाच्या कार्याला वाहून घेणं' या स्वरूपाचं उत्तर चांगले गुण मिळवण्यास पात्र ठरू लागले. १९९२ च्या बँकॉक येथे भरलेल्या 'मिस् युनिव्हर्स' या स्पर्धेला भारतातून मधु सप्रे गेली होती. 'तुझ्या देशाचं नेतृत्व करण्याची संधी जर तुला मिळाली तर तू काय करशील?' असा प्रश्न तिला विचारण्यात आला. 'मी एक स्पोर्टस् स्टेडियम बांधीन' असं उत्तर तिनं दिलं. हे उत्तर प्रामाणिक असेलही, पण ते 'समर्पक' नव्हतं. १९९३ साली मेक्सिको येथे भरलेल्या याच स्पर्धेला नम्रता शिरोडकर गेली होती. 'पुढल्या जन्मात आपण कोण व्हावं असं तुला वाटतं?' या प्रश्नाचं उत्तर देताना, 'पण माझा पुनर्जन्मावर विश्वासच नाही' असं नम्रता म्हणाली. तिनं जर चांगलं प्रशिक्षण घेतलं असतं तर तिनं 'सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी किंवा मदर टेरेसा' असं 'समर्पक' उत्तर दिलं असतं!

भारतात जो सौंदर्यस्पर्धांचा प्रवेश झाला तो स्वातंत्र्योत्तर काळातील दुसऱ्या दशकात आला. लहान-मोठ्या अनेक अशा स्पर्धा आपल्या देशात होत असतात. १९७६ साली अशा निदान १३७ स्पर्धा झाल्याचं आढळून आलं होतं. 'सनसिल्क' शॅम्पूने आयोजित केलेली 'मिस् सनसिल्क' ही स्पर्धा नुकतीच म्हणजे गेल्या महिन्याच्या अखेरीस बंगलोर येथे घेण्यात आली. 'मिस् झीरॉक्स कॉपी', 'मिस् शिवाजी बिडी',

'मिस् ॲण्टिसेप्टिक', 'मिस् नेव्ही क्वीन' अशी मासलेवाईक नावं काही स्पर्धांची होती. कोल्हापूर येथील महिलांच्या अंतर्वस्त्रांचं उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्र ट्रेडिंग कॉर्पोरेशनने 'मिली ब्युटी कॉम्पिटिशन' या नावाची स्पर्धा आयोजित केली होती. परंतु भारतात गाजावाजा असणाऱ्या दोन प्रमुख स्पर्धा आहेत. एकीचं नाव आहे 'मिस् इंडिया'. ही स्पर्धा स्त्रीसंपादक असलेल्या, स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायांना एरवी वाचा फोडणाऱ्या 'फेमिना' या मासिकाच्या वतीने चालवण्यात येते. या स्पर्धेचा खर्च 'बॉम्बे डाइंग' किंवा 'गिरीसन्स'सारख्या कापड, कपडे इत्यादींचे उत्पादन करणाऱ्या, तसेच हरएक प्रकारची सौंदर्य प्रसाधनं निर्माण करणाऱ्या कंपन्या करत असतात. दुसरी स्पर्धा ही सुद्धा 'मिस् इंडिया' या नावानेच ओळखली जाते. आणि ती 'इव्हस् वीकली' या साप्ताहिकाच्या वतीने चालवण्यात येते. याचे आश्रयदाते 'ऑरके मिल्स्'सारखे दुसरे एक कापड उत्पादक आणि अन्य कंपन्या असतात. ८ मार्च हा जगभर गाजणारा 'स्त्री-मुक्ती' दिन. हे साप्ताहिक स्त्री-समतेचा पुरस्कारही करत असतं. परंतु दहा वर्षांपूर्वी या साप्ताहिकाने आपण ज्या मूल्यांचा पुरस्कार करत असतो त्याकडे बेधडकपणे दुर्लक्ष करून, खुद्द ८ मार्च रोजी दिल्लीला सौंदर्यस्पर्धा घेतली! 'मिस् युनिव्हर्स', 'मिस् टीनएज इंटरकौंटिनेंटल', 'मिस् इंडिया', 'मिस् ॲम्बर ऑफ द वर्ल्ड' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांना भारतीय युवतींना निवडून पाठवण्याची जबाबदारी (ठेका) 'फेमिना' घेत असते, तर 'मिस् युनिव्हर्स' आणि 'मिस् इंटरनॅशनल' करता निवड 'ईव्हस् वीकली' करत असते.

खुद्द या सर्व स्पर्धांमुळे व त्यांच्यामुळे सर्वसामान्य 'सुखवस्तू' स्त्रियांच्या सौंदर्यविषयक कल्पना ज्या घडत गेल्या त्यातून सौंदर्यप्रसाधनं निर्माण करणाऱ्यांची विक्री प्रचंड प्रमाणात वाढली. १९८१ साली अशा सर्व प्रसाधनांची एकूण विक्री सुमारे रु. १०० कोटी इतकी झाली. ही बाजारपेठ पाहून मुख्यत: वनस्पतियुक्त किंवा आयुर्वेदिक औषधं उत्पादन करणाऱ्या 'डाबर'सारख्या कंपन्या किंवा संगणकाच्या उत्पादन-वितरणाच्या व्यवसायात मुख्यत: लक्ष घालणाऱ्या 'रॉस मुरारका' सारख्या कंपन्या आता परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांशी करार करून उंची सौंदर्य प्रसाधनं उत्पादन करण्याच्या व्यवसायात शिरू पाहत आहेत. एवढी किफायतशीर बाजारपेठ असल्यावर बेनेटन, पिअर कार्डिन, लाक्टोज, वुडलँडस् यासारख्या कंपन्यांच्या तोंडाला पाणी सुटणार नाही तर काय होईल? आणि म्हणून, अवघ्या सहा महिन्याच्या अवधीत दोन भारतीय सुंदरींचं जगभर कौतुक झाल्यामुळे भारतीयांवर जी भुरळ पडली आहे, तो एक योगायोग असेल की योजनाबद्ध धोरण असेल, याचा सर्व भारतीयांनी विचार करावयास हवा.

या स्पर्धांना आजपर्यंत कुठे विरोध झाला नाही असं नाही. १९७० साली लंडनमध्ये स्त्री-मुक्ती आंदोलन कार्यकर्त्यांनी 'मिस् वर्ल्ड' स्पर्धेच्या ठिकाणी जाऊन, स्पर्धकांवर आटा उधळला, काहींनी शाई फेकली तर काहींनी धूर निर्माण करणारी नळकांडी

भिरकावली. १९६८ साली अमेरिकेतील 'मिस् अमेरिका' स्पर्धेविरुद्ध निदर्शनं झाली. निदर्शकांनी घोषणेच्या आवाजात ठणकावलं, ''लक्षात ठेवा, 'मिस् अमेरिका' स्पर्धेतून रेव्हलॉन कंपनी नफा मिळवते. ही कंपनी युद्धासाठी बंदुकीच्या गोळ्यांचं बाह्य वेष्टन बनवते. आज रात्री स्पर्धेत कोण जिंकणार आहे, यापेक्षा स्त्री-मुक्ती, कृष्णवर्णीयांची मुक्ती आणि लढत असणाऱ्या व्हिएतनामी जनतेची मुक्ती यासाठी चाललेल्या संघर्षाला कितीतरी अधिक महत्त्व आहे.'' दुसऱ्या एका निदर्शनाच्या वेळी स्त्रीच्या अनावृत देहाचं मोठं चित्र हातात घेऊन कार्यकर्त्या चालल्या होत्या. एकेका अवयवावर शब्द उठावदारपणे लिहिलेले होते : 'हे ढुंगण', 'या मांड्या', 'या बरगड्या'. स्त्रीकडे बघण्याची पुरुषाची दृष्टी कशी आहे याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या चित्राद्वारे करण्यात आला. आरंभी या निदर्शनांमध्ये ४-५ स्त्रिया असायच्या. त्यांची संख्या हजारापर्यंत वाढत गेली. निषेध व्यक्त करण्याचे पथ-नाट्ये, गाणी, विक्षिप्त दिसणारे पोषाख, भरमसाट उंच टाचांचे बूट, असे अनेक प्रकार हाताळले गेले. काहींनी आपल्या पोषाखावर 'मिस् युजड्' (उपभोगिता) अशी अक्षरं लटकावली. काहींनी 'मिस् स्टीक' (मांसाचा तुकडा) असं लेबल लावलं आणि आवाहन केलं, 'परीक्षकांनो, मूल्यांकन मांसाच्या गोळ्याचं करा, स्त्रियांचं नव्हे!' काही विश्वसुंदरी किंवा दुनियासुंदरींनी पुढे पश्चात्ताप झाल्यावर आपापले मुकुट व मिळालेली रक्कम परत केल्याचीही उदाहरणं आहेत. १९६६ साली 'मिस् वर्ल्ड'मध्ये यश प्राप्त करून घेणारी रिटा फारिया हिने नऊ महिन्यातच आपला 'बहुमान' परत केला. कोकाकोलाच्या जाहिरातीकरता लघुपटामध्ये या पेयाचं गुणवर्णन करणाऱ्या एका भारतीय युवतीला तिच्या शरीराची तुलना कोकाकोलाच्या बाटलीशी केली जाते आहे असं आढळल्यावर धक्का बसला. तिने या बाजारी जगाला राम राम ठोकला आणि स्त्री-मुक्तीच्या चळवळीत दिल्लीमध्ये ती हिरिरीने भाग घेऊ लागली. 'फॅशन मॉडेल' म्हणून प्रसिद्ध असलेल्या किटू गिडवानी यांनी सौंदर्यस्पर्धांचं वर्णन जत्रेतील गुरांचा बाजार असं केलं आहे.

असा प्रखर विरोध असूनही सौंदर्यस्पर्धांची लाट ओसरलेली नाही. यावरून अद्यापही हा विरोध किती क्षीण पडतो आहे हे लक्षात येईल.

१९९७ किंवा ९९ साली 'मिस् युनिव्हर्स' ही स्पर्धा भारतात घडवून आणण्याचे मनसुबे रचले जात आहेत. अर्थात भारतीय कंपन्यांच्या हार्दिक पाठिंब्याने सुश्मिता सेन व ऐश्वर्या राय ज्या देशात जाऊन सौंदर्यसम्राज्ञी बनून आल्या त्या देशातही स्पर्धांच्या ठिकाणी निदर्शनं झालीच होती. त्यापेक्षा प्रखर निदर्शनं करून, भारतात या स्पर्धांना प्रवेश बंद करण्याची तयारी आत्तापासूनच आपल्याला करता येईल काय?

लेखातील माहितीकरता प्रमुख आधारभूत साहित्य

१. ब्युटी कॉन्टेस्टस् - संपादक-प्रकाशक : बिल्ड डॉक्युमेंटेशन सेंटर, मुंबई - १९८५

२. ब्युटी कॉन्टेस्टस् : अॅन अगली बिझनेस, लीना मथायस्, फ्री प्रेस जर्नल, जून १८, १९८६

३. दी व्हायटल स्टॅटिस्टिक्स गेम, मेनका शिवदासानी 'दि इंडिपेंडन्ट' : १४ मार्च १९९२

४. कॅशिंग इन-ऑन ए कॉव्हेटेड क्राऊन, राजू दुबे दि इकॉनॉमिक्स टाइम्स, २३ सप्टेंबर १९९४

५. 'सण्डे' साप्ताहिक - ४ ते १० डिसेंबर १९९४

(मिळून साऱ्याजणी, एप्रिल १९९५)

❑

व्यक्तिचित्रे

प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी
समाजाभिमुख निर्भीड शास्त्रज्ञ

''तुम्ही वेगवेगळ्या विषयात एवढे संशोधन करता; परंतु तुमचे नाव ज्या प्रमाणात माहीत पाहिजे त्या प्रमाणात ते लोकांना माहीत नाही,'' असे काहीशा खिन्नपणे प्रा.कोसंबींना जर कोणी म्हटले तर ते त्याला सांगत, ''माझ्या नावाला प्रसिद्धी देण्याची तसदी उगाच घेऊ नका. मी माझ्या आयुष्यात जर काही उपयुक्त अगर मौल्यवान संशोधनपर लिखाण केले असेल तर त्या लिखाणाच्या द्वारा ते टिकून राहील.'' या उद्‌गारात रुढार्थानुसार प्रसिद्धीपराङ्मुखता नव्हती किंवा दर्पोक्तीही नव्हती. ती एक जीवननिष्ठा होती.

एक एक अलग घटना घेतली तर तिच्या घडणीत व्यक्तीला महत्त्वाचे स्थान असूही शकेल; परंतु इतिहासाचा व्यापक अर्थ जर समजावून घेतला तर त्यात व्यक्तीला स्थान दुय्यमच असते. मानवी ज्ञानाच्या विकासाचे समालोचन केले तर त्यातही हेच आढळते. अनेक व्यक्तींचे अनुभव, तपस्या, प्रतिभाविलास यांतूनच ज्ञानाची निष्पत्ती होत असते. आणि या सर्व प्रक्रियेत सामान्य लोकांचा वाटा फार मोठा असतो. याचा विसर पडला म्हणजे व्यक्तिमहात्म्य वाढविण्याची प्रवृत्ती प्रबळ होत जाते. किंबहुना सामान्य माणसे श्रम करून जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन करतात, म्हणूनच शास्त्रज्ञ, कलावंत अथवा विद्वान आपापल्या कार्यात काहीशा अलिप्तपणे मग्न होऊ शकतात. याची जाणीव प्रा.कोसंबींनी सतत बाळगली होती. ही जाणीव असणारे आधुनिक जगात फारच थोडे लोक, त्यातून आपल्या देशात फारच कमी. आणि म्हणून चटपट निबंध अथवा प्रबंध सादर करून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवणाऱ्या बहुसंख्य विद्वानांशी त्यांचे कधी पटले नाही. प्रा.कोसंबी या विद्वानांशी तुटकपणे वागले, आणि या विद्वानांनी कोसंबींकडे दुर्लक्ष केले. तरीही प्रा.कोसंबीनी आपले कार्य एककल्लीपणे चालूच ठेवले.

अमेरिकेतील शिक्षण

प्रा.कोसंबी यांचा मूळ आवडीचा विषय म्हणजे गणित. बालवयात ते पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये (रमणबागेत) शिकले. लवकरच, म्हणजे वयाच्या अकराव्या

वर्षी, त्यांचे नाव अमेरिकेतील शिक्षणाची उत्कृष्ट परंपरा असलेल्या केंब्रिज ग्रामर स्कूलमध्ये आणि त्यानंतर हार्वर्ड विद्यापीठात दाखल करण्यात आले. पाली भाषेतील एक तज्ज्ञ आणि बुद्धधर्माचे अभ्यासक या नात्याने त्यांचे वडील श्री.धर्मानंद कोसंबी यांची कीर्ती त्या सुमारास भारताबाहेरही पसरली होती. अमेरिकेतील विद्यापीठात व्याख्याने देण्याकरिता त्यांना निमंत्रण देण्यात आले होते. त्याच वेळेस, आपल्या एकुलत्या एका मुलाच्या उत्तम शिक्षणाची सोय श्री.धर्मानंद कोसंबी यांनी केली. या विद्यापीठात शिकत असताना विद्यार्थी कोसंबी हे अगदी साधेपणाने राहत असत. ते केवळ आर्थिकदृष्ट्या उच्च राहणी परवडण्यासारखी नव्हती म्हणून नव्हे. प्राचीन भारतातील, म.गांधींची शिकवण मुलाच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न श्री. धर्मानंद कोसंबी यांनी केला होता.

१९१८ ते १९२९ या अमेरिकेतील वास्तव्याच्या काळात विद्यार्थी कोसंबी यांच्या खोलीत म.गांधी यांची तसबीर सतत लावलेली असे. शिक्षणात सदैव अत्युच्च श्रेणी मिळत असल्यामुळे, त्यांना शिष्यवृत्त्या हमखास मिळत असत. परंतु तरीही सुट्टीमध्ये, दूध-डेअरीमध्ये दुधाच्या जड बादल्या काही अंतरावर वाहून नेण्याचे काम, किंवा अन्यत्र अशीच कष्टदायी कामे करून ते आपल्या मिळकतीत भर टाकीत असत. आणि त्यातून विविध भाषांत, विविध विषयांवरील पुस्तके विकत घेऊन, घरगुती ग्रंथालय समृद्ध करीत असत. गणित विषयाचा चार वर्षांचा शिक्षणक्रम त्यांनी दोन वर्षांतच पुरा केला, आणि उरलेल्या वेळात ते इतर विषयांचा अभ्यास करू लागले. त्यात अनेक भाषा शिकून घेण्याचा छंद त्यांना लागला. फ्रेंच, जर्मन, लॅटिन, ग्रीक इ. भाषा ते नुसते शिकलेच नाहीत, तर त्या भाषांतील अभिजात वाङ्‌मय ते वाचू लागले.

सहसा नेहमी 'ए' ही उच्च श्रेणी मिळविणाऱ्या कोसंबींना एकदा तीन विषयांत 'ए' व एका विषयात 'बी' ही श्रेणी मिळाली. त्यांच्या वडिलांना हा 'ऱ्हास' सहन झाला नाही. त्यांनी लगेच मुलाला पत्र पाठविले की अभ्यासाकडे दुर्लक्ष करून असा वेळ वाया घालवायचा असेल, तर हिंदुस्थानात परत आलेले बरे. कोसंबी हे पत्र वाचून अस्वस्थ झाले. ते इटालियन भाषा शिकू लागले. इटालियन भाषेतील चार ग्रंथांच्या संक्षिप्त आवृत्त्या अभ्यासाकरिता नेमलेल्या होत्या. त्यातील कोणत्याही दोन ग्रंथांचा अभ्यास परीक्षेकरिता आवश्यक होता. कोसंबींनी चारही ग्रंथांच्या मूळ संपूर्ण आवृत्तींचा सखोल अभ्यास केला, आणि ते परीक्षेला बसले. त्यांना 'ए +' ही सर्वात उच्च श्रेणी मिळाली. आपण शिकवलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला ही श्रेणी तोपर्यंत कधी मिळालेली नव्हती, असा शेरा त्यांच्या प्राध्यापकांनी लिहिला. तो कोसंबींनी आपल्या वडिलांकडे पाठवून दिला, तेव्हा कोठे दोघा पिता-पुत्रांचे मन शांत झाले. 'फाय बीटा कॅपा' या नावाने प्रसिद्ध असलेला बहुमान मिळत असतो तोही प्रा. कोसंबींनी मिळविला होता. व्यायाम, पोहणे, बंदुकीने नेमबाजी करणे, यातही त्यांनी प्रावीण्य मिळविले होते. परंतु प्रा.बिरकॉफ या जगप्रसिद्ध गणिततज्ज्ञाच्या हाताखाली मिळालेले गणित या विषयाचे

शिक्षण, आणि पदार्थ-विज्ञान व इतर अनेक विषयांचा अभ्यास व चिंतन यातून प्राप्त झालेली प्रखर वैज्ञानिक दृष्टी, ही अमेरिकेतील शिक्षणामधून मिळालेली सर्वात मौल्यवान देणगी होती असे प्रा. कोसंबी मानत असत.

अध्यापन व संशोधन

शिक्षण पुरे झाल्यावर 'पुढे काय?' हा कोणत्याही तरुणासमोर उभा राहणारा प्रश्न कोसंबींच्या पुढेही होताच. शिक्षण अथवा संशोधन क्षेत्रात किंवा अन्यत्र कोठेही चांगली, मोठ्या पगाराची नोकरी अमेरिकेत मिळविणे, तो आर्थिक मंदीचा काळ असूनही, त्यांच्यासारख्या असामान्य बुद्धिमान युवकाला काहीच कठीण नव्हते. परंतु महात्माजींच्या त्यागी जीवनाचा आदर्श त्यांच्यासमोर होता. नुकत्याच आत्मसात केलेल्या मार्क्सवादी विचारसरणीमुळे, सामान्य श्रमिक जनतेच्या सुखदु:खांशी समरस होऊन, सर्वांगीण परिवर्तनाच्या प्रक्रियेतील आपला वाटा आपण उचलला पाहिजे याची जाणीवही त्यांना त्याच वेळेस झाली होती. त्यामुळे मित्र व शिक्षकांचा त्यांनी निरोप घेतला आणि भारतात परतून बनारस हिंदू विद्यापीठात ते गणित हा विषय शिकवू लागले.

गणित व पदार्थविज्ञान या दोन्हीही विषयांना स्पर्श करणारा असा त्यांचा पहिला संशोधनात्मक निबंध १९३० साली प्रसिद्ध झाला. तेव्हापासून पुढील नऊ वर्षे भारतीय व परदेशीय सखोल अभ्यासाला व संशोधनात्मक लिखाणाला वाहिलेल्या नियतकालिकांतून मुख्यत: गणित व संख्याशास्त्र या विषयांवर त्यांचे सुमारे २२ संशोधनात्मक निबंध प्रसिद्ध झाले. बनारस हिंदू विद्यापीठानंतर, अलिगढ मुस्लिम विद्यापीठ आणि त्यानंतर १९३३ पासून पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये ते शिकवीत असत. याच काळात ते खांद्यावर खादी टाकून तिचा प्रसार व विक्रीही करत असत. ते शिकवत असताना त्यांच्या बुद्धीचे वैभव त्यांच्या बुद्धिमान विद्यार्थ्यांना लक्षात येत असे, परंतु परीक्षेला उपयुक्त असे मर्यादित ज्ञान बांधेसूदपणे वारंवार घोटून देण्याची त्यांची पद्धत नसल्यामुळे ते विद्यार्थीप्रिय शिक्षक असे कधीच झाले नाहीत.

१९३९ सालापासून त्यांनी समाजशास्त्रांतर्गत विविध विषयांवर लिखाण करण्यास सुरवात केली. यातील काही लेख फर्ग्युसन कॉलेजच्या मासिकात प्रसिद्ध झाले आहेत. काही त्या काळच्या कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत व बरेच लेख अथवा निबंध भारतीय व परदेशी ज्ञानसंपन्न नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आढळतात. सर्व लिखाण प्रभावी शैलीने, इंग्रजीतून लिहिलेले आहे. कोणत्याच लेखात भारतीय परंपरेतील सर्वांना सांभाळून घेण्याची गोलमाल प्रवृत्ती नाही. शास्त्रीय लिखाणात असला भोंगळपणा व ऐसपैसपणा चालणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. सडेतोडपणाशी त्यांनी कधी तडजोड केली नाही.

खात्री पटणारा पुरावा आपल्यापाशी असल्याखेरीज उथळ कल्पनेवर आधारलेले विधान करावयाचे नाही यावर त्यांचा कटाक्ष असे. वाचन तर अफाट होते. या सर्व

गुणांमुळे त्यांच्या लिखाणामध्ये स्वतंत्र बुद्धीची चमक जागोजागी दिसून येते. त्यांच्या या सर्व लेखांचे समग्र खंड प्रसिद्ध होणे अत्यावश्यक आहे. त्यांचा परामर्श घेण्याची अवघड कामगिरी त्यानंतरच करता येणे शक्य होईल. या परिचयात्मक लेखात त्यांची मुख्य कामगिरी कोणती याचाच थोडक्यात उल्लेख करणे उचित ठरेल.

इतिहास संशोधन

नाणक-शास्त्राच्या अभ्यासातून, भारतीय इतिहास-मीमांसेकडे ते वळले. हजारो प्राचीन भारतीय नाण्यांचे सूक्ष्म काट्यावर वजन करून, त्यात झालेली झीज किती याचा अंदाज त्यांनी संख्याशास्त्रातील सिद्धांताचा उपयोग करून बांधला. त्यावरून त्यांनी या नाण्यांचा कालनिर्णय दिला. ही कामगिरी करणारे भारतातील ते पहिलेच शास्त्रज्ञ होते. नाण्यांचा काळ ठरला तरी नाणी पाडणारे हे राजे होते तरी कोण याचे कुतूहल त्यांना वाटू लागले, म्हणून ते इतिहासाकडे वळले. लिखित वाङ्मयातून काय आढळते ते तपासण्याकरिता त्यांनी संस्कृतचा अभ्यास केला. त्यावेळेस त्यांना असे आढळून आले की एखाद्या घटनेची कोणतीही तारीख अथवा सन दुसऱ्या ग्रंथातील तारखेशी अथवा सनाशी जुळत नाही. पुराण, महाकाव्य इ. ग्रंथांमध्ये तत्कालीन वास्तवाच्या वर्णनापेक्षा भारुडच जास्त आढळते. भर्तृहरीच्या श्लोकांचा अभ्यास करण्यास त्यांनी सुरुवात केली तेव्हा शेकडो भेद असलेले श्लोक देशभर पसरलेले त्यांना आढळले. म्हणून भर्तृहरीच्या निश्चित श्लोकांची एक आवृत्ती संपादन करण्याचे कामी त्यांना पाच वर्षे घालवावी लागली. हे सर्व करीत असतानाच भर्तृहरीच्या बैराग्य शतकाबद्दल लोकांच्या मनात असलेल्या कल्पना चुकीच्या आहेत असे दिसल्यामुळे, भर्तृहरीचे वैराग्य म्हणजे पलायनवाद, मनोदौर्बल्य व नैराश्य आहे असे सिद्ध करणारा एक परखड निबंध लिहून, विद्वान संस्कृतज्ज्ञांमध्ये त्यांनी खळबळ उडवून दिली.

परंतु त्यांनी या कालावधीत घेतलेला मुख्य निर्णय म्हणजे भारतीय इतिहासाची मांडणी राजे-राण्यांच्या सनावळ्या देऊन अगर युद्धांच्या रम्य कथा सांगून होण्यासारखी नाही. लिखित वाङ्मयातील बेमालूम विसंगती, संदिग्धता, कालनिर्देशासंबंधीचा गलथानपणा, इत्यादी पाहून मार्क्सने तर भारत या देशाला इतिहास म्हणून काही आहे किंवा काय याबद्दलच शंका घेतली आहे. परंतु इतिहासाची व्यापक व्याख्या करून, भारतीय समाज कसा विकसित होत गेला हे पहावयाचे ठरविल्यास अगदीच निराश होण्याचे कारण नाही असे प्रा.कोसंबींना वाटू लागले.

उत्पादनाची साधने आणि तदनुषंगिक सामाजिक संबंध यांच्यात क्रमश: होणाऱ्या परिवर्तनाची कालानुक्रमे मांडणी करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे इतिहास अशी मार्क्सच्या व्याख्येवरच आधारलेली व्याख्या कोसंबींनी केली. त्याबरोबरच भारतीय इतिहास-मीमांसेकरिता राजे-राण्यांचे महत्त्व कमी होऊन वेगळ्याच प्रश्नांना अग्रक्रम आला. भारतातील मोहेंजोदारो संस्कृतीचा पराभव का झाला? भारतात नांगराने शेती करणारा

सुरुवात केव्हा केली? लोखंडाचा वापर केव्हा सुरू झाला असावा? यज्ञसंस्थेचा उगम कशात आहे? बुद्ध धर्मासारखा उदात्त धर्म या देशातून नाहीसा कसा झाला? ग्रीस व रोममध्ये गुलामगिरीवर आधारलेली उत्पादनपद्धती ज्याप्रमाणे निर्माण झाली, तशी ती भारतात का निर्माण झाली नाही? भारतीय ग्रामरचनेची वैशिष्ट्ये कोणती? तेथील सरंजामशाहीचे स्वरूप काय होते? अशा अनेकविध प्रश्नांची उत्तरे शोधण्यात प्रा.कोसंबींना स्वारस्य वाटू लागले. याकरता मुख्य आधारभूत साधने अवगत करण्याकरता त्यांनी पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र इ. शास्त्रांचा सखोल अभ्यास केला. खेडोपाडी हिंडून लोकांच्या रुढी, देव-देवतांची उपासना, व्रत-वैकल्यांचे अवशेष यांची माहिती गोळा केली. लेण्या काळजीपूर्वक बघितल्या. सूक्ष्म अश्मायुधे गोळा केली. या सर्व साधनांकरवी मिळणारी माहिती आणि लिखित वाङ्मयातील माहिती याची तुलना केली आणि मगच आपले निष्कर्ष विविध संशोधनात्मक निबंधांतून मांडले 'इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडियन हिस्टरी', 'मिथ अँड रिॲलिटी' (मराठीत अनुवादित : पुराणकथा आणि वास्तवता), 'एक्झास्परेटिंग एसेज', 'द कल्चर अँड सिव्हिलायझेशन ऑफ एन्शंट इंडिया' या त्यांच्या ग्रंथातून यातील बरेच निष्कर्ष आपणास वाचावयास मिळतात. परंतु हे सर्व ग्रंथ व त्यातील आशय काळजीपूर्वक आत्मसात करण्याकरता बरेच परिश्रम घ्यावयास हवेत.

हे सर्व लिखाण करीत असताना गणित या विषयाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले असे नाही. त्यावरील संशोधन चालूच होते. त्यातील कामगिरीबद्दल, १९३४ साली रामानुजन पारितोषिक, आणि १९४७ साली भाभा पारितोषिक त्यांना मिळाले होते. १९४७ ते १९६२ पर्यंत ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या मुंबई येथील प्रख्यात संशोधनसंस्थेमध्ये गणित विषय शिकवत व संशोधन करत असत. याच कालावधीत ते अमेरिका, रशिया, इंग्लंड, रुमानिया, चीन या देशांत त्या-त्या देशांच्या निमंत्रणांवरून जाऊन आले आणि तेथे आईनस्टाईन, टॉलस्टॉय, बर्नाल, ज्यो क्यूरी, चौ-एन्-लाय यासारख्या विख्यात व्यक्तींशी त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली, विद्यापीठांतून व्याख्यानेही दिली. जगात कोणतेही प्रश्न महायुद्धे करून सोडवू नयेत, यावर त्यांचा दृढ विश्वास होता. या मताच्या प्रसाराकरिता झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांतून त्यांनी भाग घेतला होता आणि भारतात वेगवेगळ्या ठिकाणी या विषयावर व्याख्याने दिली होती. अनुवंशशास्त्रामध्ये संख्याशास्त्राच्या साहाय्याने त्यांनी मांडलेला सिद्धांत 'कोसंबी सिद्धांत' म्हणून प्रसिद्ध आहे.

अशा या चतुरस्र बुद्धीच्या थोर शास्त्रज्ञाला वयाच्या अवघ्या ५९ व्या वर्षी, २९ जून १९६६ रोजी मृत्यूने गाठले. त्यांचे संशोधनात्मक कार्य अजून कितीतरी वर्षे अभ्यासूंना मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

(तात्पर्य, जुलै १९७८)

❑

मार्शल टिटो

१२३ देशांचे प्रतिनिधी त्याच्या अंत्ययात्रेला हजर होते. समाजसत्तावादाच्या स्थापनेसाठी आणि निर्घृण नाझी शत्रूचे निर्दालन करण्यासाठी प्राणपणाने लढणाऱ्या या वीरपुरुषाला शोकाकुल अंत:करणाने अखेरचा प्रणाम करण्यासाठी, जगातील कम्युनिस्ट पक्षांचे आणि अन्य कामगार पक्षांचे शंभरपेक्षा अधिक प्रतिनिधी आले होते. जागतिक शांततेसाठी अविरत प्रयत्न करणाऱ्या या मुत्सद्याला, जागतिक सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहून आपली प्रगती साधणाऱ्या, नवस्वतंत्र देशाची स्वतंत्र शक्ती उभारण्यासाठी धडपड करणाऱ्या या कुशल संघटकाला, आपल्या राष्ट्राची घडण स्वतंत्र प्रेरणेने घडविण्यासाठी धोके पत्करणाऱ्या या धैर्यशाली नेत्याला, मानवंदना करण्यासाठी ३२ राष्ट्राध्यक्ष, २२ पंतप्रधान, ४ राजे आणि ५ राजपुत्रसुद्धा आपल्या बरोबरच्या छोट्या-मोठ्या शिष्टमंडळांसह हजर होते. प्रमुख देशांपैकी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर तेवढे स्वत: आले नाहीत. त्यांनी आपल्या आईला देशाचे प्रतिनिधी म्हणून पाठविले. त्या अनुपस्थितीबद्दल त्यांच्यावर खुद्द त्यांच्या देशात व युरोपातील काही देशांत खूप टीका झाली.

बालपण

अवघी दोन कोटी वीस लाख लोकसंख्या असलेल्या छोट्या देशाला एवढा मोठा मान मिळवून देणाऱ्या जोसिप बॉज टिटोचा जन्म ७ मे १८९२ रोजी एका शेतकरी कुटुंबात, कुमरोवेक नावाच्या लहानशा खेड्यात झाला. या कुटुंबाला १५ मुले झाली. त्यापैकी टिटो हे सातवे अपत्य. घरात सांपत्तिक स्थिती बेताबातीची. वडील दारूडे, बालपणाची मौज अथवा आनंद उपभोगण्यास टिटोला संधीच नव्हती. १५ मुलांपैकी ७ जगली. परंतु १० एकर जमिनीतून मिळणारे उत्पन्न या कुटुंबाला पुरण्याइतके नव्हते. म्हणून टिटोला त्याच्या आजोळी पाठविण्यात आले. तेथे त्याला उपाशी रहावे लागले नाही. परंतु शेतावरची कामे करणे, पाणी आणणे, गुरे सांभाळणे, आजोबांसोबत जंगलात जाऊन स्वत:साठी व विक्रीसाठी कोळसा बनविणे अशा तऱ्हेचे पुष्कळ कष्ट

करावे लागत असत. वयाच्या आठव्या वर्षी तो पुन्हा आई-वडिलांकडे राहावयास आला. त्याचे घराणे कॅथलिक पंथाचे होते. आईची धार्मिक श्रद्धा अपार होती. मुलावर मात्र त्याचा फारसा परिणाम झाला नाही. धर्मगुरूने त्याच्यावर केलेल्या एका धार्मिक संस्काराकरिता त्याला दक्षिणा देण्यासाठी आईने जोसिपला पैसे दिले. त्यातील काही रक्कम जोसिपने धर्मगुरूला नेऊन दिली, उरलेली स्वत:च उडवून टाकली. या पापाबद्दल परमेश्वर जबरदस्त शिक्षा करील असे त्याचे मित्र त्याला म्हणाले. परंतु टिटोला या भीतीचे फारसे काहीच वाटले नाही. धर्मगुरू शेतकऱ्यांकडून थंडीच्या दिवसात जबरदस्तीने धान्य कसे वसूल करीत ते त्याने पाहिले होते आणि या घटनांचा पुढील आयुष्यात आठवणी सांगताना टिटो उल्लेख करीत असे. चर्चमधील प्रार्थनेच्या वेळी दिवाबत्ती करणे, विधीला आवश्यक असणारे पाणी अथवा अन्य पदार्थ धर्मगुरूला आणून देणे इत्यादी कामांकरिता त्याची नेमणूक झाली होती. ही नेमणूक हासुद्धा एक लहानसा मान समजला जात असे. त्याकरता विशिष्ट अंगरखा व पोषाख घालावा लागत असे. प्रार्थना संपल्यावर हा पोषाख उतरवून ठेवण्यास टिटो फार वेळ लावतो व अजागळपणा करतो या सबबीवर धर्मगुरूने एकदा त्याच्या तोंडात मारली होती. याबद्दल राग आल्याने टिटोने ते मानाचे स्थान तात्काळ सोडून दिले. प्राथमिक शिक्षण कसेबसे झाल्यानंतर टिटोला शाळा सोडावी लागली. पंधरा वर्षांचा होईपर्यंत किरकोळ नोकरी वगळल्यास, त्याने घरी व घरच्या शेतात कायापालट केले. पंधराव्या वर्षी तो नोकरी शोधण्याकरिता आपले गाव सोडून एका लहानशा शहरात आला.

नोकरीसाठीची धडपड

प्रथम एका चहाच्या रेस्टॉरंटमध्ये हरकाम्या नोकराचे काम केल्यानंतर, एका कुलपांचे उत्पादन व दुरुस्ती करणाऱ्या मालकाकडे तो शिकाऊ कामगार म्हणून लागला. तेथे कामावर असताना एकदा एका यंत्रावर देखरेख ठेवण्याचे काम त्याच्यावर सोपवण्यात आले होते. मालक बाहेर गेला आहे असे पाहून टिटोने आपल्या सवंगड्यांना गोळा केले आणि त्यांना शेरलॉक होम्सच्या रहस्यकथा तो वाचून दाखवू लागला. जरा वेळाने मालक तेथे आला व त्याने टिटोला पकडले. तेवढ्यात ज्या यंत्राकडे टिटोने लक्ष ठेवावयास पाहिजे होते ते मोडले. त्याच्या मालकाने टिटोच्या तोंडात भडकावून दिली. टिटोला अतिशय राग आला, परंतु चूक त्याची असल्यामुळे तो ओशाळला होता. तो तेथून जो निसटला तो एका विटांच्या कारखान्यात जाऊन लपून राहिला. मालकाने पोलीसांना कळविले तेव्हा त्यांनी या मुलाला हुडकून काढले आणि त्याला तुरूंगात नेऊन गजाआड कोंडून टाकले. मालकाला दया आली. तो टिटोला तुरूंगात जेवण पाठवीत असे. टिटोवर जर खटला भरला गेला असता तर त्याला तांत्रिक शिक्षण पुरे करता आले नसते. मालकाने खटला काढून घेण्याची व्यवस्था केली. त्यामुळे टिटो लवकर सुटला आणि ठरलेल्या तीन वर्षांच्या अवधीत त्याने आपले

तांत्रिक शिक्षण पुरे केले.

हे शिक्षण घेत असतानाच टिटोला औद्योगिक कामगारांच्या लढ्याची माहिती होऊ लागली होती. त्याचे त्याला आकर्षणही वाटू लागले होते. त्यावेळेस युगोस्लाव्हिया हा स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आला नव्हता. तो प्रदेश ऑस्ट्रो-हंगेरियन राज्याचाच भाग म्हणून गणला जात असे. ऑस्ट्रियन सोशल डेमोक्रॅटिक मूव्हमेंट नावाची एक संघटना त्याकाळी कामगारांच्यात काम करीत असे. या संघटनेने मार्क्सवादी तत्त्वप्रणालीचा स्वीकार केला होता, त्यामुळे जागतिक कामगारांच्या एकजुटीचा पुरस्कार तिच्याकरवी होत असे. या संघटनेच्या कार्यकर्त्यांशी टिटोचा परिचय झाला. समाजसत्तावादाचा प्रसार करणारे 'स्वतंत्र वाणी' (फ्री वर्ड) या नावाचे वर्तमानपत्र तो लिहू लागला.

ऑस्ट्रो-हंगेरियन राज्यात विभिन्न भाषा बोलणारे, आपली स्वतंत्र सांस्कृतिक व सामाजिक परंपरा सांगणारे, असमतोल आर्थिक विकास झालेले, सर्ब, क्रोट, स्लोव्हेनीज्, माग्यार, जर्मन, ऑस्ट्रियन व इतर अनेक लोकसमूह होते. त्यांच्यात एकमेकात तणाव निर्माण होण्यास त्या काळी सुरुवात झाली होती. काही जण फुटून स्वतंत्र होण्याची भाषा बोलू लागले होते. परंतु आंतरराष्ट्रीय कामगारांच्या एकजुटीच्या घोषणा ऐकत बसणाऱ्या टिटोला, आपण क्रोट प्रदेशातील असल्यामुळे, देशांतर्गत चालू झालेल्या वादात क्रोट लोकांची बाजू घेऊन काही करावे असे कधीही वाटले नाही. कदाचित त्याला ते सयुक्तिकपणाचे होईल असे वाटले असावे.

युनियनमध्ये शिरकाव

तांत्रिक शिक्षण पुरे झाले तेव्हा टिटो अठरा वर्षांचा होता. आपल्या एका मित्राच्या मदतीने त्याने नोकरी मिळविली आणि मेटल वर्कर्स युनियनचा तो सभासदही झाला. युनियनचा सभासद झाल्याबद्दल त्याला फार मोठा अभिमान वाटला. युनियनचा सभासद झाल्यावर दोन वर्षांनी सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे सभासदही होता येत असे. अशा एकूण उल्हासित मन:स्थितीत असताना त्याने आपल्या गावी जाऊन आई-वडिलांना भेटून येण्याचे ठरवले. खेड्याच्या संकुचित क्षेत्राच्या बाहेर पडणे म्हणजे माणसाला आपली उन्नती करून घेता येते असेही आपल्या गाववाल्यांना सांगावेसे त्याला वाटत होते. जरा ऐटीत गावाला जावे अशा विचाराने त्याने एक नवा सूट विकत घेतला. परंतु घेतल्यापासून अगदी थोड्या अवधीत, तो रहात असलेल्या त्याच्या खोलीतून नवा सूट चोरीला गेला. निराश अंत:करणाने त्याने एक दुसरा वापरलेला (सेकंड हँड) सूट स्वस्त किंमतीला विकत घेतला. अशा परिस्थितीत जरा दिमाखाने गावी परत जाण्याची आकांक्षा त्याला पुरी करता आली नाही. सुमारे दोन महिने घरी काढल्यानंतर टिटो पुन्हा काम शोधण्यासाठी बाहेर पडला. नोकरी मिळविणे सोपे नव्हते. वेगवेगळ्या गावी तो हिंडला, खिशात पैसे नसले म्हणजे बर्फातून, डोंगर-पहाडातून जमेल तसे जो[illegible]

घेत तो मैलच्या मैल चालत जात असे. काम नसले की त्यांच्या युनियनकडून त्याला पोटापुरता भत्ता मिळत असे. युनियनच्या सभासदत्वाची वर्गणीसुद्धा तो कित्येकदा भरू शकत नसे. परंतु काम मिळाल्याबरोबर वर्गणीची राहिलेली सर्व बाकी तो अगदी न चुकता भरत असे. सायकलच्या किंवा मोटार दुरूस्तीच्या दुकानापासून ते जरा बऱ्या मेटल फॅक्टरीपर्यंत नानाविध कामे त्याने कधी कमी तर कधी बरे वेतन स्वीकारून केली. १९१३ मध्ये वयाच्या एकविसाव्या वर्षी सक्तीची लष्करभरती करण्याच्या देशाच्या नियमानुसार त्याला लष्करात दाखल व्हावे लागले.

लष्करातील अनुभव

तो सक्तीचे लष्करी शिक्षण घेत असतानाच १९१४ साली पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले. टिटोला युद्धात आघाडीवर रशियाशी लढण्यासाठी पाठविण्यात आले. तो एव्हाना नॉन-कमिशन्ड ऑफिसर या सैन्यातील एका लहानशा हुद्यावर जाऊन पोहोचला होता. तेथे लढत असताना एका शत्रू सैनिकाने त्याच्या पाठीत भाला मारला. त्यामुळे टिटोला जबर जखम झाली. त्याबरोबर त्याला अटक करून रूग्णालयात नेण्यात आले. १३ महिने तो अंथरूणाला खिळून होता. त्यानंतर जरा बरा झाल्यावर युद्धकैद्यांच्या छावणीत त्याला हलविण्यात आले. या कैद्यांना अधूनमधून रेडक्रॉस संघटनेमार्फत अन्नाची पाकिटे मिळत असत. परंतु कैद्यांवर देखरेख ठेवणारे अधिकारी ती पाकिटे कित्येकदा मधल्यामधे लुबाडीत असत. टिटोने याबद्दल तक्रार करणारे पत्र रेडक्रॉस संघटनेला पाठविले. याचा सूड घेण्याची संधी आपल्याला कधीतरी मिळेल म्हणून रशियन अधिकारी वाट पाहात होते. ऑफिसर असल्यामुळे आपल्या छावणीतील सैनिकांकडे सर्वसाधारण लक्ष ठेवण्याची जबाबदारी टिटोवर सोपविली गेली होती. आपल्या कैदीबंधूंना कामाचा फार ताण पडू नये म्हणून त्यांच्या कामाची जी नोंदवही रशियन अधिकारी ठेवीत असत त्यात टिटो गुप्तपणे बदल करीत असे. कैद्यांच्या कामाबद्दल अनुकूल मत होईल अशा दृष्टीने हे बदल केलेले असत. एका रशियन अधिकाऱ्याच्या हे एकदा लक्षात आले, तेव्हा त्याने टिटोला एका बंदिस्त कोठडीत टाकले आणि तीन शिपाई पाठवून त्याला चाबकाचे तीस फटके मारण्यात आले.

याच सुमारास समाजसत्तावादी क्रांतीची धामधूम रशियात सुरू झाली होती. रशियाचा राजा झार याला सत्तेवरून खाली खेचून कामगारसत्ता स्थापन करण्याच्या घोषणा लोक देऊ लागले होते. कैद्यांच्या छावणीत असताना टिटोला वाचनाची संधी मिळत असे. एका बोल्शेविक कार्यकर्त्याशीही त्याची ओळख झाली होती. त्याच्या मदतीने टिटो आपल्या छावणीतून पळाला आणि रशियाच्या राजधानीत आला. तेथे त्याने क्रांतिकारकांची निदर्शने पाहिली. झारचे पोलीस बंदुकीतून गोळ्यांचा वर्षाव करीत, त्यातून तो कसाबसा बचावला. तेवढ्यात त्याच्या बोल्शेविक मित्राला अटक

झाली, म्हणून टिटोने फिनलंडला पळून जायचे ठरविले. परंतु वाटेतच पळून जाणारा टिटो हा क्रांतिकारक बोल्शेविक आहे अशा संशयाखाली त्याला अटक झाली आणि झारच्या अनन्वित जुलमाचे प्रतीक असलेल्या पीटर पॉल या किल्ल्यातील, उंदरांचा सुळसुळाट असलेल्या एका कोठडीत त्याला डांबून ठेवण्यात आले.

तेथे तीन आठवडे काढल्यावर, त्याने आपण पळून गेलेला युद्धकैदी असल्याचे कबूल केले. त्याबरोबर त्याची पुन्हा कैद्यांच्या छावणीकडे रवानगी करण्यात आली. गाडीतून जात असताना एका स्टेशनवर, 'चहा करण्यासाठी जरा पाणी घेऊन येतो' असे आपल्या बरोबरच्या पोलीस गार्डाला सांगून तो उतरला आणि गार्डाचा डोळा चुकवून पळून गेला. तोपर्यंत १९१७ मधील ८ नोव्हेंबर उजाडला होता. रशियन क्रांती यशस्वी झाली होती. परंतु कामगारांची सत्ता पूर्णत्वाने प्रस्थापित झाली नव्हती. देशात सर्वत्र गोंधळ होता. टिटो निसटून ज्या गावी आला त्या गावातील बोल्शेविक पहारेकऱ्यांनी त्याला हटकले. आपण युद्धकैदी आहोत असे टिटोने सांगताच, 'आता कैदी कोणी नाही. सारे लोक स्वतंत्र झाले आहेत. तुम्हीही आता पलीकडच्या जत्रा भरते त्या मैदानात जा आणि तेथे असलेल्या आंतरराष्ट्रीय रेड गार्डच्या तुकडीत सामील व्हा.' असे पहारेकऱ्यांनी त्याला सांगितले. टिटो त्या तुकडीत सामील झाला. त्यानंतर सुमारे दोन वर्षे इतस्तत: भटकत, मिळेल ते काम करीत, टिटो रशियात राहिला. कैद्यांच्या छावणीतून मागे पळून गेला असताना एका रशियन मुलीने त्याची काही दिवसांकरता राहण्याची व्यवस्था केली होती. या मुलीला हुडकून टिटोने तिच्याशी लग्न केले आणि तो आपल्या गावी परत आला. तोपर्यंत ऑस्ट्रो-हंगेरियन राज्य विघटित झाले होते. युगोस्लाव्हिया नावाचे नवे राष्ट्र निर्माण झाले होते. त्यांचे जन्मगाव याच राष्ट्रात होते.

कम्युनिस्ट कामाची सुरूवात

युगोस्लाव्हियात आल्यावर टिटोने अनेक नोकऱ्या केल्या. जेथे असेल तेथे तो कामगार संघटनांत काम करीत असे, अन्यायाविरुद्ध भाषणे देत असे. राजकीय वाङ्मयाचा प्रसार करीत असे आणि या 'प्रक्षोभक' कामगिरीबद्दल त्याला कामावरून काढून टाकले गेले की तो दुसरी नोकरी बघत असे. तो युगोस्लाव्हियाच्या कम्युनिस्ट पक्षाचा सभासदही झाला होता, पण अद्याप नेतृत्वाचे स्थान त्याला मिळाले नव्हते. ट्रेड युनियनच्या क्षेत्रात मात्र एका गावातील मेटल कामगार युनियनचा तो सेक्रेटरी झाला होता.

टिटोच्या कामाचा वेग वाढू लागला तसतशी पोलिसांची करडी नजरही त्याच्याकडे वळली. पोलीस त्याला आता कम्युनिस्ट म्हणून ओळखू लागले होते. कम्युनिस्ट पक्ष सरकारी हुकमानुसार बेकायदेशीर ठरविण्यात आला होता. १९२७ मध्ये टिटोने आपला पहिला लेख 'संघटित कामगार' नावाच्या एका ट्रेड युनियनच्या नियतकालिकात

लिहिला होता. त्यात भांडवलशाही व्यवस्थेवर निर्भीडपणे हल्ला चढविला होता आणि त्याविरुद्ध संघटितपणे लढण्याचे आवाहन केले होते. टिटोविरुद्ध वेगवेगळे आरोप ठेवून पोलिसांनी त्याला अटक केली. इतर सहा कार्यकर्त्यांबरोबर हातकड्या अडकवून त्याला तुरुंगात नेण्यात आले. परंतु चार महिने झाले तरी रीतसर आरोपपत्र दाखल करून कोर्टात खटला उभा राहिना. तुरुंगातील वागणूक व जेवणही निकृष्ट होते म्हणून याचा निषेध करण्याकरिता टिटोने उपोषण सुरू केले. उपोषणाला पाच दिवस झाल्यावर मॅजिस्ट्रेटने त्याची भेट घेतली आणि लवकरच खटला सुरू करून सात महिन्यांची शिक्षा दिली. वरच्या कोर्टात न्याय मागण्याची मुभाही त्याला देण्यात आली व तो निकाल लागेपर्यंत त्याला तुरुंगातून मुक्त करण्यात यावे असा हुकूम उदारमतवादी असलेल्या व पुढे कम्युनिस्ट बनलेल्या या मॅजिस्ट्रेटने दिला. हायकोर्टात ही शिक्षा दोन महिन्यांनी कमी करण्यात आली.

परंतु निकाल लागावयाच्या आतच टिटो भूमिगत झाला होता. मूळचे नाव जोसिप ब्रॉज असलेल्या या क्रांतिकारकाने भूमिगत असताना जी वेगवेगळी नावे धारण केली त्यातीलच टिटो हे एक नाव होते आणि तेच नाव त्याच्या पुढील सबंध आयुष्यात रूढ झाले. या भूमिगत काळात युगोस्लाव्हियाची आर्थिक स्थिती बिकट होत होती. देशांतर्गत भिन्न भाषिक-सांस्कृतिक लोकांचे तणाव वाढत होते. या प्रश्नाबाबत नेमकी कोणती भूमिका घ्यावी याबाबत कम्युनिस्ट पक्षातील मतभेद विकोपाला गेले होते. टिटो मात्र संप-लढे, सभा-निदर्शने संघटित करण्यात दंग होता. पोलिसांच्या तावडीत सापडू नये म्हणून धाडसी कृत्ये करावी लागत.

एक गाजलेला खटला

टिटो खरा प्रसिद्धीच्या झोतात आला तो ऑगस्ट १९२८ मध्ये, त्याला अटक होऊन जो खटला भरण्यात आला त्यावेळेस. प्रथम तीन महिने तुरुंगात ठेवून त्याच्याकडून कबुलीजबाब मिळविण्याकरिता रक्त ओकेपर्यंत त्याला बेदम मारण्यात आले. परंतु टिटोने कोणतीही माहिती देण्यास साफ नकार दिला. कोर्टात शेवटी खटला उभा राहिला. तेव्हा तो ऐकण्यासाठी लोकांची, विशेषत: तरुण-तरुणींची गर्दी उसळली होती. राज्य उलथून टाकण्याचा कट करीत असल्याचा टिटोवर आरोप ठेवण्यात आला. टिटोने आपण बेकायदेशीर कम्युनिस्ट पक्षाचा सभासद असल्याचे आणि कामगारांवर होणाऱ्या अन्यायांना वाचा फोडण्यासाठी खटपट करीत असल्याचे मान्य केले. परंतु भांडवलदारी कोर्टाचा न्याय देण्याचा अधिकार त्याने झुगारून दिला. ज्या कायद्यानुसार त्याला आरोपी ठरविण्यात आले तो कायदा जनतेने संमत केलेला नसल्यामुळे तो कायदाही आपण मानीत नसल्याचे त्याने सांगितले. आपण कम्युनिस्ट का झालो हे टिटो सांगू लागला तेव्हा मॅजिस्ट्रेटने त्याला पुढे बोलण्यास बंदी केली, तेव्हा टिटो गरजला, 'यावरून हे राज्य पोलिसांचे राज्य आहे हेच सिद्ध होते. कम्युनिस्ट

पक्ष चिरायू होवो, कम्युनिस्ट इंटरनॅशनल चिरायू होवो, सोविएत क्रांती चिरायू होवो.' टिटोला पाच वर्षांची शिक्षा झाली आणि बेड्या ठोकून त्याची रवानगी तुरूंगात करण्यात आली. १९३३ साली वास्तविक तो सुटावयाचा, परंतु १९२७ साली हायकोर्टाने त्याला एका महिन्याची शिक्षा दिली होती. ती न भोगताच टिटो भूमिगत झाला होता. त्याची त्याला आठवण करून देण्यात आली आणि ती शिक्षाही त्याला आता सहा वर्षांनंतर भोगावी लागली.

१९२८ किंवा त्याच्याही आधीपासून सुरू झालेल्या जागतिक मंदीच्या तडाख्यापासून युगोस्लाव्हियाची सुटका होणे शक्यच नव्हते. त्यातून मार्ग काढता न आल्यामुळे युगोस्लाव्हियाचा राजा अॅलेक्झांडर याने जुलमी पाश अधिक घट्टपणे आवळण्यास सुरूवात केली. याला प्रखरपणे प्रतिकार करणाऱ्या अनेक कम्युनिस्टांचे हत्याकांड त्या काळात झाले. १२ मार्च १९३४ रोजी टिटो सुटला तेव्हा तो ४२ वर्षांचा झाला होता. पुढील अकरा महिने पोलिसांना चुकवीत त्याने पुष्कळ राजकीय कार्य केले. तुरूंगात गुप्तपणे वाङ्मय मिळवून भरपूर वाचन करून त्याने आपल्या विचाराची तात्त्विक बैठक पक्की केली होती. वेगवेगळ्या पक्षबैठकांतून व परिषदांतून तो आता हिरिरीने भाग घेत होता. देशात परिषद घेणे कठीण असेल तर ती ऑस्ट्रिया किंवा झेकोस्लोवाकियातील एखाद्या गावी घेतली जात असे. भूमिगत अवस्थेत विविध धोक्यांना तोंड देत तो तिथे जात असे.

युगोस्लाव कम्युनिस्ट पक्षातील कार्य

या त्याच्या कर्तबगारीमुळे मॉस्को येथे जगातील कम्युनिस्ट क्रांतिकारकांना मार्गदर्शन करण्यासाठी स्थापन झालेल्या कॉमिनटर्न या संस्थेत बाल्कन देशातील क्रांतिकारकांना मार्गदर्शन करण्याच्या विभागात त्याची नेमणूक झाली. तेथेही त्याने मन लावून काम केले व डिमित्राव् सारख्या प्रमुख जागतिक कीर्तीच्या कम्युनिस्ट नेत्याचा विश्वास संपादन केला. सुमारे एक वर्षाने टिटो युगोस्लाव्हियाला परत आला त्या वेळेस युगोस्लाव पक्षाच्या संमतीने त्याची गोर्किक या जनरल सेक्रेटरीच्या हाताखाली संघटक सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली होती.

त्यावेळेस युगोस्लाव्हियाच्या कम्युनिस्ट पक्षातील शिस्त फारच ढिली झाली होती. निष्फळ वादविवाद जास्त होत. त्यामुळे काम सुरळीतपणे चालत नव्हते. देशातील अतोनात दडपशाहीमुळे पक्षसभासदांची संख्याही रोडावली होती. पक्षाची व्यवस्थितपणे उभारणी करण्याची जबाबदारी टिटोवर सोपविण्यात आली. दुसरीही एक मोठी जबाबदारी त्याला पार पाडावयाची होती. स्पेनमध्ये फ्रँकोच्या जुलमी राजवटीविरुद्ध तेथील जनतेने युद्ध सुरु केले होते. या युद्धात भाग घेण्यासाठी युरोपमधून स्वयंसेवकाची नोंद करून त्यांना युद्ध आघाडीवर पाठविण्याकरिता मदत करावयाची होती. दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता टिटोने नेहमीप्रमाणे अविश्रांत धडपड केली. जनरल

सेक्रेटरी गोर्किक याच्या हातून मात्र स्वयंसेवकाची एक मोठी तुकडी पाठविण्याची तयारी करताना एक मोठी चूक झाली, त्यामुळे अनेक स्वयंसेवक निघण्यापूर्वीच पकडले गेले.

युगोस्लाव कम्युनिस्ट पक्षाला दैनंदिन धोरण ठरविण्याच्या बाबतीत गोर्किकने केलेल्या सूचनाही चुकत गेल्या. या चुका जाणूनबुजून झाल्या असे नाही परंतु तसा संशय मात्र त्याच्याबद्दल कॉमिनटर्नना त्यावेळेस आला. त्याला मॉस्कोला बोलाविले गेले आणि इतर अनेक संशयित कार्यकर्त्यांप्रमाणे त्याचा अंत केला गेला असावा असे मानले जाते. यानंतर सुमारे दोन वर्षांनी मॉस्कोला जाऊन आल्यानंतर म्हणजे १९३९ मध्ये टिटो युगोस्लाव कम्युनिस्ट पक्षाचा जनरल सेक्रेटरी झाला. त्या स्थानावर पोहोचल्यानंतर टिटोने कम्युनिस्ट पक्षाची वाढ तर केलीच परंतु त्या पक्षाचे कॉमिनटर्नवर म्हणजे पर्यायाने सोवियत रशियावर असलेले आर्थिक अवलंबन जवळजवळ संपुष्टात आणले. या सबंध काळामध्ये कॉमिनटर्नचे व सोवियत युनियनचे धोरण त्याला अधूनमधून खटकत असे, परंतु शंका-कुशंका व्यक्त न करता तो ठरलेले धोरण निष्ठेने अंमलात आणीत असे.

१९३८ साली दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागले होते. देशात ऐक्य नसेल तर फॅसिस्ट इटली किंवा नाझी जर्मनीच्या संभाव्य आक्रमणांना तोंड देता येणार नाही हे टिटोला दिसत होते. भिन्न भिन्न भाषिक गटांमध्ये बेबनाव असल्यामुळे आणि राज्यकर्ता प्रिन्स पॉल हा संघराज्यात्मक एकजुटीपेक्षा केंद्रसत्तेच्या निरंकुश प्राबल्यावर भर देत असल्यामुळे तसेच एकूण लोकशाही हक्कांवरही बऱ्याच मर्यादा असल्यामुळे एकजुटीला योग्य असे वातावरण देशात नव्हते. टिटोने प्रथम कम्युनिस्ट पक्षात राष्ट्रव्यापी पातळीवर भक्कम एकजूट घडवून आणण्याकरिता चळवळीतून तावून सुलाखून निघालेल्या कार्यकर्त्यांची, पक्षावर अद्यापही बंदी असल्यामुळे एक गुप्त परिषद सुमारे वर्षभर कसून तयारी करून १९४० मध्ये घेतली. ती परिषद फारच यशस्वी झाली आणि टिटोचे नेतृत्व निर्विवादपणे प्रस्थापित झाले.

१ एप्रिल १९४१ रोजी जर्मनीने युगोस्लाव्हियावर हल्ला चढविला. एका आठवड्याच्या आत दहा हजार लोक मारले गेले. १५ एप्रिल रोजी राजा आणि त्याचे सरकार देश सोडून पळून गेले. १७ एप्रिल रोजी युगोस्लाव्हियाचे दहा तुकडे केले गेले आणि ते जर्मनी, इटली, हंगेरी, बल्गेरिया, अल्बेनिया इ. देशांमध्ये वाटले गेले. टिटोने लोकांना सशस्त्र बनवून प्रतिकाराची तयारी करण्यास सुरूवात केली. परंतु त्याच्यासमोर एक अडचण होती. १९३९ साली सोव्हिएत रशियाचा जर्मनीशी अनाक्रमणाचा करार झालेला असल्यामुळे चालू असलेले युद्ध हे साम्राज्यवाद्यांचे आपापसातील युद्ध आहे असे मानावयाचे असे कॉमिनटर्नच्या आदेशानुसार जगातील साऱ्या कम्युनिस्टांचे धोरण होते. म्हणून रशियाच्या मित्रराष्ट्रांविरूद्ध उठाव करण्याचे धोरण अंमलात आणावयाचे की नाही याबद्दल कम्युनिस्ट पक्षात वैचारिक गोंधळ होता. परंतु आता

नाही तरी लवकरच सशस्त्र युद्ध करावे लागेल अशी खात्री असल्यामुळे टिटोने त्या दृष्टीने जय्यत तयारी करण्याचे काम चालू ठेवले. २२ जून १९४१ रोजी जर्मनीने रशियावर हल्ला चढविला. आता जर्मनीविरुद्ध प्राणपणाने लढावयाचे की नाही याबद्दल शंका राहिली नाही. टिटोने केलेल्या तयारीचा उपयोग झाला. देशात जागोजागी गनिमी युद्ध सुरू झाले. टिटोने याचे मार्गदर्शन मोठ्या कौशल्याने केले. स्वत: लढताना तो जखमी झाला, परंतु डगमगला नाही. थोडीबहुत इंग्रजांकडून मिळालेली शस्त्रास्त्रांची मदत व पुढे १९४४ साली रशियन सैन्य आले तेव्हा झालेली मदत वगळता, हे युद्ध युगोस्लाव्हियातील जनतेनेच लढविले. ३६५ गनिमी तुकड्या देशभर शत्रूला हैराण करीत असत. या तुकड्यांचे प्रतिनिधित्व करणारे ३६५ रंगीत झेंडे टिटोच्या अंत्ययात्रेत अग्रभागी फडकत होते.

युद्धातील यशस्वी कामगिरीमुळे टिटोचा आत्मविश्वास वाढला होता. युद्धाच्या अखेरच्या टप्प्यात त्याचे चर्चिलशी इटलीमध्ये व स्टॅलिनशी रशियामध्ये स्वतंत्रपणे संभाषण झाले होते. शूर गनिमांचा धाडसी नेता एवढेच स्थान त्याला नको होते तर युद्धोत्तर काळात युगोस्लाव्हियाचे सरकार स्थापन करून लोकसत्ताक राज्य चालविण्याची आकांक्षा बाळगणारा लोकप्रिय नेता असे आपले स्थान गृहीत धरून तो या जागतिक कीर्तीच्या नेत्यांशी बोलला होता.

८ मे १९८० रोजी झालेल्या टिटोच्या मृत्युनंतर त्याच्या कामगिरीसंबंधी जे लेख आपल्याकडील वृत्तपत्रात, नियतकालिकांतून आले त्यात टिटोच्या युद्धपूर्व आयुष्याबद्दल फारशी माहिती आली नाही. म्हणून या लेखात ती दिली आहे. कम्युनिस्ट पक्षाची बांधणी करीत असताना पक्षात झालेले वादविवाद, दुसऱ्या महायुद्धात लढत असताना मिशॅलोविक सारख्या स्वदेशातील फितुरांशीही त्याला झुंज का व किती द्यावी लागली, या व इतर अनेक घटनांचा तपशील स्वतंत्र लेखातच देता येणे शक्य आहे.

राष्ट्राध्यक्ष टिटो

दुसऱ्या महायुद्धानंतर सहा भाषिक राज्यांच्या एकसंध युगोस्लाव्हिया राष्ट्राचा टिटो पंतप्रधान झाला. त्याच्या देशात त्याचे नाव सर्वतोमुखी झाले असले तरीही जगाला त्याचे नाव फारसे माहीत झाले नव्हते. २८ जून १९४८ साली कॉमिन्फॉर्म या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेतून टिटोची (युगोस्लाव्हियाची) हकालपट्टी करण्यात आली आहे असे जाहीर केले गेले, तेव्हा साऱ्या जगाचे लक्ष टिटोकडे गेले. टिटोने सोविएत रशियाच्या संघराज्यात सामील होण्यास नकार दिला होता. ग्रीसमध्ये लढत असलेल्या क्रांतिकारक कम्युनिस्ट गनिमांना, रशियाला न विचारता, टिटोने शस्त्रास्त्रांसह सर्वतोपरी मदत देण्याचे धोरण अवलंबिले होते. युद्धानंतर ग्रीसवर ब्रिटिशांचे वर्चस्व राहू देण्यास स्टॅलिनने संमती दिलेली असल्यामुळे त्याला ग्रीसमध्ये या घटकेला

क्रांती घडवून आणण्यात स्वारस्य वाटत नव्हते.

देशाची आर्थिक पुनर्रचना करताना रशियन तंत्रज्ञांची मदत टिटो घेत होता. परंतु त्यांनी युगोस्लाव नेत्यांच्या सल्ल्यानुसारच आपली कामगिरी पार पाडली पाहिजे अशी टिटोची भूमिका होती. इतर बारीकसारीक मतभेद अनेक होते. शेवटी टिटोने कळविले की 'समाजसत्तावाद स्थापन झालेल्या सोविएत युनियनबद्दल आमच्या मनात कितीही प्रेम असले तरी स्वत:च्या देशावर कोणाचेही कमी प्रेम असणे शक्य नाही.' टिटोने ही भूमिका घेण्यात खूपच धोका पत्करला होता. जगातल्या कम्युनिस्टांचा पाठिंबा मिळण्याची शक्यता नाही हे त्याला माहीत होते. अमेरिकेने युरोपातील देशांना युद्धानंतर त्यांच्या आर्थिक पुनर्रचनेसाठी 'मार्शल योजना' या नावाखाली देऊ केलेली मदत अमेरिकेचे वर्चस्व येऊ नये म्हणून ती स्वीकारण्याचे त्याने नाकारले होते. आता मागितली तर मदत मिळेल की नाही याबद्दल शंका होती. परंतु स्वत:च्या व युगोस्लाव जनतेच्या बेडर वृत्तीवर विश्वास ठेवून त्याने आपल्या देशाची स्वतंत्रपणे उभारणी करण्याचा निश्चय केला. कम्युनिस्ट जगतात फूट पडल्यामुळे अमेरिकन साम्राज्यवाद्यांना अर्थातच अतिशय आनंद झाला. त्यांनी टिटोला प्रचंड प्रमाणात कर्ज व मदत दिली. एकूण सुमारे १३० कोटी डॉलर्स इतका कर्जाचा बोजा आज युगोस्लाव्हियावर आहे.

समाजसत्तावादाचा मार्ग आपण सोडलेला नाही. असा युगोस्लाव नेत्यांचा दावा आहे. परंतु सर्व उत्पादनाच्या साधनांचे त्यांनी अद्याप राष्ट्रीयीकरण केलेले नाही. ज्या त्या कारखान्यात कामगारांनी उत्पादनाबाबत, तंत्राबाबत व अन्य प्रश्नांबाबत चर्चा करून निर्णय घ्यावयाचे आणि सर्व कारखान्यातील अथवा संयुक्तपणे चालणाऱ्या वेगवेगळ्या शेतीप्रकल्पातील या निर्णयप्रक्रियेवर कम्युनिस्ट पक्षाने देखरेख ठेवून सुसूत्रीकरणाचे कार्य सतत करायचे अशा या पद्धतीला समाजसत्तावादी (लोकाधिष्ठित) स्वयंनिर्णयात्मक व्यवस्थापन पद्धती (सिस्टिम् ऑफ सोशॅलिस्ट सेल्फ मॅनेजमेंट) असे नाव देण्यात आले आहे. या पद्धतीमुळे आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होते आणि प्रयोग करत करत लोकशाही जीवनपद्धती राबविण्यात पोषक वातावरण तयार होते असे युगोस्लाव्हियाचे नेते आग्रहपूर्वक सांगत असतात. परंतु युगोस्लाव्हियातील वाढती महागाई व बेकारी, घटत चाललेला आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वर उल्लेखलेल्या कर्जाच्या बोजाकडे लक्ष देऊन या पद्धतीतून समाजसत्तावाद खरोखर आणता येईल का असा प्रश्न जगातील सर्व कम्युनिस्ट विचारत असतात. चीन तर टिटोला 'दुरूस्तीवादी' ही शिवी देत असतो. परंतु इतर कम्युनिस्ट राष्ट्रांकडून आज टिटोवर हिरिरीने कडवट टीका केली जात नाही. १९७२ साली रशियाने टिटोला निमंत्रण देऊन 'ऑर्डर ऑफ लेनिन' हा सर्वोच्च मान दिला व त्याचा गौरव केला.

कोणताही दबाव येऊ न देता, नव-स्वतंत्र देशांनी जागतिक सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहून आपापल्या देशाची प्रगती साधावी या धोरणाचा प्रभावी पुरस्कार पं. नेहरू व नासर यांच्याशी सल्लामसलत करून टिटोने १९५६ पासून अखेरपर्यंत

केला. विविध जागतिक प्रश्नांवर स्वतंत्रपणे मतप्रदर्शन करून जागतिक तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला. बड्या राष्ट्रांनी या नेत्यांचे म्हणणे ऐकले असे नाही, परंतु आज नसले तरी भविष्य काळात या अलिप्ततावादी राष्ट्रांचे सामर्थ्य वाढू शकेल असा विश्वास निर्माण करण्याचे कार्य या धोरणातून झाले आहे असे दिसते.

वैयक्तिक जीवनात राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर, टिटो विलासी बनला असा त्याच्यावर आरोप आहे. त्याच्या स्वतःच्या प्रवासासाठी एक निळी आगगाडी राखून ठेवलेली होती. अनेक बंगले व काही भपकेबाज मोटारी त्याच्याकरिता राखून ठेवलेल्या होत्या. तो वृत्तीने उद्दाम व गर्विष्ठ बनला होता. आपल्या मृत्यूपर्यंत राष्ट्राध्यक्षपद आपणाकडेच रहावे अशी तरतूद त्याने देशाच्या राज्यघटनेत करून ठेवली होती. परंतु १९४५ पर्यंत त्याने आपले जीवन अत्यंत खडतरपणाने घालविले. दुसऱ्या महायुद्धात जखमी झालेला तो एकमेव सरसेनापती होता. श्रमजीवी लोकांचे जीवनमान त्याच्या कारकीर्दीतच प्रथम उंचावले. कधी नव्हती एवढी एकजूट त्याने आपल्या देशात घडवून आणली. त्याच्या या अचाट कर्तबगारीमुळेच त्याच्या कृतज्ञ देशबांधवांनी त्याच्या वैयक्तिक उणीवांकडे दुर्लक्ष केले आहे असे दिसते.

(तात्पर्य, जून १९८०)

❑

कार्ल मार्क्स : युगप्रवर्तक महापुरुष

त्याच्या मृत्यूनंतर कार्ल हिनरिक मार्क्सला आदरांजली अर्पण करण्याकरिता लंडनमधील स्मशानभूमीवर फक्त १३ लोक हजर होते. परंतु, त्याचा परममित्र आणि लेखन सहकारी फ्रेड्रिक एंगल्स याने याच ठिकाणी केलेल्या भाषणात त्याच दिवशी वर्तविले होते की लवकरच काळ असा येईल की ज्यावेळेस जगातील हजारो लोक या युगप्रवर्तक महापुरुषास प्रेमाने मानवंदना करतील आणि नवसमाज निर्मितीची प्रेरणा घेतील.

१९९० सालापर्यंत या क्रांतिकारक तत्त्ववेत्त्याच्या विचारसरणीवर अधिष्ठित असलेल्या राजवटींमध्ये जगातील सुमारे निम्मी लोकसंख्या समाविष्ट झालेली होती. आज यातील बऱ्याच राजवटी, त्यांच्या कारभारातील काही त्रुटींमुळे कोसळून पडल्या आहेत. परंतु मार्क्सच्या वैचारिक विश्वाचा प्रभाव **अद्यापही जगभर क्षीण झालेला नाही.**

युरोपमधील श्रमिकांच्या **संघर्षांशी संपर्क न सोडता, सुमारे चाळीस वर्षे अखंड** ज्ञानसाधना करून, मार्क्सने वि**श्वचिंतनाच्या एका नव्या** विचारव्यूहाची **उभारणी केली.** पन्नास खंडांत समाविष्ट होण्या**इत**के लिखाण, त्याने त्याचा जिवलग मित्र फ्रेड्रिक एंगल्स् याच्या सहकार्याने केले.

श्रममूल्य, समाजसत्तावाद आणि द्वंद्वात्मक स्वयंगतिक वस्तुवाद (डायलेक्टिकल मटीरिॲलिजम्) या तीन प्रमेयांवर अधिष्ठित असा समग्र सिद्धांत मार्क्सने मांडला. समाजाच्या स्थिती-गतीचे विवेचन करून, मानवाच्या उज्ज्वल भवितव्याकडे लक्ष वेधणारा हा सिद्धांत, जगातील सर्व श्रमिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास समर्थ आहे.

संघर्ष हीच मानवी प्रगतीची प्रेरक शक्ती असून, पुराव्यानिशी सिद्ध होणारा आजपर्यंतचा समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. या वर्गसंघर्षात आणि आजपर्यंत जगात झालेल्या क्रांत्यांमध्ये श्रमिक वर्गांचा पाठिंबा मिळवून, शोषण करणारे वर्ग सत्ताधारी झाले. परंतु भांडवलशाहीच्या युगात, आत्मभान प्राप्त झालेले श्रमिक वर्ग ही व्यवस्था मोडून, स्वत:च सत्ताधारी बनतील. सहकारावर आधारलेले, श्रेष्ठ

मूल्यांची जोपासना करणारे श्रेयपूर्ण जीवन ते जगू लागतील आणि त्याच वेळेस मानवाचा खरा इतिहास सुरू होईल.

हे वास्तवदर्शी स्वप्न जगासमोर ठेवण्यासाठी, अहोरात्र अभ्यास आणि चिंतन करितांना सत्त्वहरण करणारे अनेक प्रसंग त्याच्या जीवनात आले. स्वत:च्या व अन्य देशातून होणारी हद्दपारी, अठराविश्वे दारिद्र्य, कर्ज घेतलेल्या सावकारांकडून होणारी अवहेलना, तीन वेळा अपत्यवियोग, वेदनाग्रस्त करणारी दुखणी, या सर्व दिव्यातून, मार्क्स आणि त्याची एकनिष्ठ, सोशिक पत्नी जेनी यांना धीर-गंभीर वृत्तीने जावे लागले.

मार्क्सचे स्वप्न जागतिक पातळीवर अद्याप साकार झालेले नाही. ते साकार होऊ शकेल अशी आशाच केवळ नव्हे तर पुरेसा विश्वास बाळगण्याकरिता, त्याने तात्त्विक आधार दिला. लक्षात ठेवावयास पाहिजे ते हे की मार्क्स हा प्रेषित नव्हता, अंतर्ज्ञानी 'सिद्धपुरूषही' नव्हता. आधुनिक जगातील विविध समस्यांचे आव्हान स्वीकारून, त्यावर मात करण्याकरिता मार्ग शोधून, त्या मार्गावर पाय रोवणारा तो एक नम्र वैज्ञानिक होता.

पर्यावरणनाशाच्या रास्त भीतीने आज चिंताग्रस्त झालेल्यांना मार्क्सने आपल्या 'भांडवल' या सर्वश्रेष्ठ ग्रंथातील तिसऱ्या खंडात दिलेला खालील इषारा उद्‌बोधक वाटल्याशिवाय राहणार नाही.

''आजच्यापेक्षा जास्त चांगली आर्थिक व्यवस्था असणाऱ्या भविष्यातील (समाजसत्तावादी) समाजातल्या माणसांच्या दृष्टीने पाहाता, पृथ्वीगोलावर एकेकट्या व्यक्तीची मालकी असणे हे तितकेच मूर्खपणाचे वाटेल जितके आज आपल्याला एक माणूस दुसऱ्या माणसाच्या मालकीचा असणे हे वाटते. एकेकटी व्यक्ती तर सोडाच, पण एखादा संपूर्ण समाज, एखादे राष्ट्र किंवा जगात आज नांदणारी सर्व राष्ट्रे मिळून होणारा मानव समाजसुद्धा पृथ्वीचा मालक नाही. तो फक्त वहिवाटदार आहे. त्याला फक्त भोगवट्याचा हक्क आहे आणि एखाद्या एकत्र कुटुंबाच्या प्रमुखाप्रमाणे त्यानेही पृथ्वी अधिक चांगल्या अवस्थेत येणाऱ्या पिढ्यांना सुपूर्द केली पाहिजे.''

'भांडवल'च्या पहिल्या खंडातील एका उताऱ्यामध्ये, भांडवलशाही निसर्गाचा विध्वंस कसा करते याचे विदारक चित्र रेखाटण्यात आले आहे. मार्क्सच्या दूरदृष्टीचे प्रत्यंतर आणून देणाऱ्या या उताऱ्यातील खालील वाक्ये भांडवलशाहीतील विकास प्रक्रियेवर प्रकाश टाकतात.

''काही थोड्या काळापुरता जमिनीची उत्पादकता वाढविणारा हा विकास म्हणजे, भूमीच्या निर्मितीक्षमतेचे चिरकालीन स्रोत कायमचे आटवून टाकण्याकडे वाटचाल असते ... थोडक्यात भांडवलशाहीमध्ये तंत्रज्ञानाचा विकास केला जातो व समाजातल्या विखुरलेल्या उत्पादन प्रक्रियांना सुसंघटित केले जाते. पण यासाठी सर्व समृद्धीचे जे मूळ स्रोत, भूमी आणि श्रमिक, त्यांचाच नाश केला जातो.''

भांडवलशाही व्यवस्थेचे सम्यक आकलन करून घेतल्याखेरीज पर्यावरण

विध्वंसनासकट अनेक सामाजिक व्याधींचे निदान करणे हे दुरापास्त आहे हे सुमारे १२५ वर्षांपूर्वी रसरशीत शैलीत सुस्पष्टपणे मांडणाऱ्या मार्क्सचे विचार आजही टवटवीत वाटतात, ते त्यातील वैज्ञानिक दृष्टीमुळे.

जागतिकीकरणाच्या गदारोळात चक्रावून गेलेले आजचे श्रमिक आणि विचारवंत मार्क्सच्या समृद्ध विचारधनाकडे पुन्हा एकदा आकर्षित होतील की अनेक थोतांडांच्या भ्रमजालात अडकून विलयाला जातील, ते चालू शतक संपण्यापूर्वीच दिसेल.

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, ऑगस्ट २०००)

❑

नोबेल पुरस्कारविजेती : शिरीन इबादी

दिग्गजांना मागे सारून

११ ऑक्टोबर २००३ रोजी, इराण वगळून, जगात सर्वत्र एक बातमी झळकली - इराणमधील पहिल्या व्यक्तीला आणि इस्लामधर्मीय पहिल्या महिलेला जगात अतिशय प्रतिष्ठित मानण्यात येत असलेला नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला आहे! इराकमध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे सुरू झालेल्या युद्धाला, रोमन कॅथलिकपंथीय सर्वश्रेष्ठ मानण्यात येत असलेला धर्मगुरू पोप जॉन पॉल (दुसरा) याने विरोध केला होता. त्याची प्रदीर्घ कारकीर्द, जागतिक शांततेचा वेळोवेळी त्याने केलेला पुरस्कार आणि त्याच्या संभाव्य मृत्यूची पहिली घंटा वाजली आहे हेसुद्धा लक्षात घेऊन, त्याला २००३ चा नोबेल शांतता पुरस्कार मिळेल, अशी शक्यता वर्तविली जात होती. झेकोस्लोव्हाकियाचे माजी राष्ट्राध्यक्ष, नाटककार व झेकोस्लोव्हाकियातील राजकीय हक्कांच्या गळचेपीविरुद्ध लढणारे वाकलाव् हावेल यांनी जगातील हरेक ताणतणाव कमी करण्याकरिता व शांतता प्रस्थापित करण्यासाठी कसोशीने व सचोटीने प्रयत्न केले होते. ते या जगप्रसिद्ध पुरस्काराचे मानकरी या वर्षी ठरतील, अशीही शक्यता मानली जात होती. दोन्हीही अंदाज चुकीचे ठरले. इतर १६५ नावेसुद्धा सुचविली गेली होती. परंतु सर्व नावे बाजूला सारली गेली. तीन महिला आणि दोन पुरुष यांचा समावेश असलेल्या पुरस्कार निवड समितीचे नॉर्वेजिअन अध्यक्ष, ओले डॅनबोल्ट, पुरस्कार जाहीर झाल्यावर म्हणाले, ''मुस्लिम जगतात अभिमान वाटावा अशा एका मुस्लिम महिलेला पुरस्कार देताना मला आनंद होतो आहे.'' दोन दिग्गजांना मागे सारून, हा सन्मान मिळविणाऱ्या, वय वर्षे ५६ असणाऱ्या शिरीन इबादीला, तिच्या वयोवृद्ध आईला आणि व्यवसायाने आर्किटेक्ट असलेल्या जायद तवासोलियन या तिच्या पतीला आनंद झाला असला, तरी हा आनंद तिच्या मातृभूमीतील इतर फारच थोड्यांना व्यक्त करता येणे शक्य होते.

इराणमधील प्रतिक्रिया

पुरस्काराची बातमी समजल्यावर इराणमधील धर्मांधतावादी बेचैन झाले, काही जण प्रक्षुब्धही झाले. मानवी हक्कांच्या प्रस्थापनेसाठी आपल्या देशात आवाज उठविणाऱ्या शिरीनला आंतरराष्ट्रीय पातळीवरचा पुरस्कार मिळाल्यामुळे, आपण मंद गतीने सुधारणेच्या दृष्टीने टाकत असलेल्या पावलांना अडसर निर्माण होईल की काय अशी धास्ती सध्या सत्तारूढ असलेल्या सौम्य सुधारणावाद्यांना वाटते आहे. बातमीला कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त न करता, बराच काळ त्यांनी मौन धारण केले. इराणमधील दूरदर्शनने, पुरस्काराची बातमी हाती आली असूनही, त्या दिवशी क्रीडावृत्त, न्यूझीलंडमध्ये सुदैवाने टळलेल्या एका विमान अपघाताचे वृत्त इत्यादी बातम्यांना अग्रक्रम देऊन, नोबेल पुरस्काराचा ओझरता उल्लेख अखेरच्या बातमीत केला. अवघ्या राजकीय-सामाजिक-आर्थिक विचारसरणीच्या वृत्तपत्रांनी शिरीन इबादी पाश्चात्त्यांशी संधान बांधून, धर्मगुरूंचे अवमूल्यन करते आहे असा तिच्यावर आरोप केला आणि पाश्चात्त्य देश आपली उद्दिष्टे साध्य करण्याकरिता, इराणवर दबाव आणण्याकरिता, मानवी हक्कांचा (गैरलागू) मुद्दा हा पुरस्कार देऊन पुढे सरकवीत आहेत असे भाष्यही नोंदविले. अखेर शिरीनचे अभिनंदन जगभर होते आहे हे पाहून आणि धर्मांधतावाद्यांपेक्षा आपली प्रतिमा थोडी उजळ आहे हे सिद्ध करण्याकरिता इराणचे अध्यक्ष महंमद खातामी यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला, परंतु ते मिळाले याला फार महत्त्व देऊ नये व आपल्या विरोधकांना फायदा घेऊ देऊ नये असा इशारेवजा संदेशही दिला.

अशा या दहशतीच्या वातावरणात, शिरीनचे खुल्या दिलाने आणि धिटाईने अभिनंदन करणारे इराणमध्ये थोडेच लोक निघाले असतील तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. 'शार्क' या सुधारणावादी दैनिकात लिखाण करणारे अली मोझामी या नावाने एक स्तंभलेखक आपली प्रतिक्रिया देताना म्हणाले, ''हा पुरस्कार म्हणजे जगाला आक्रोश ऐकू येतो आहे, याचेच ते लक्षण आहे.'' ही बातमी ऐकल्यापासून बायका जरा धीट होऊ लागल्या आहेत, असा अनुभवही काही नवऱ्यांना आला.

इतकी खळबळ स्वत:च्या देशात निर्माण करणाऱ्या शिरीन इबादीचे नाव, तिच्या नावाने लहानमोठी अकरा पुस्तके असूनही आणि त्यातील दोन पुस्तकांचे इंग्रजी अनुवाद झाले असूनही, ऑक्टोबर २००३ पूर्वी जगाला फारसे माहीत नव्हते.

व्यक्तिमत्त्व व कार्य : राजेशाहीची राजवट

शिरीन या पर्शियन भाषेतील शब्दाचा अर्थ गोड असा आहे. परंतु आयुष्यातील गेली २४ वर्षे कटु अनुभवांना निर्भयपणे तोंड देण्यातच तिला घालवावी लागली आहेत. कायदा या विषयात पदवी संपादन केल्यानंतर, तिने ज्या तेहरान विद्यापीठातून ही पदवी मिळविली तेथेच ती शिकवू लागली. इराणमध्ये त्या वेळेस राजेशाहीची

राजवट चालू होती. शहा नावाचा बादशहा राजकीय हक्कांची पायमल्ली अतिशय निर्घृणपणे करीत असे. परंतु काही सामाजिक सुधारणांना पाठिंबा देण्यास तो अनुकूल होता. पाश्चात्त्य जीवनशैलीशी जुळते-मिळते असे देशाचे आधुनिकीकरण करणे हे त्याच्या राजवटीचे घोषवाक्य होते. इस्लाम धर्मातील काही बंधने त्याने शिथिल केली. महिलांना मतदानाचा हक्क मिळाला. बहुपत्नीकत्वाची मुभा रद्दबातल ठरविण्यात आली. समतेला अधिक पोषक ठरणारे घटस्फोटाचे कायदे करण्यात आले. पोषाखावरील बंधने शिल्लक राहिली नाहीत. शहा बादशाहाच्या राजवटीतच तेहरानच्या न्यायालयात पहिली महिला न्यायाधीश म्हणून शिरीनची नेमणूक होणे शक्य झाले. ही कारकीर्द १९७५ ते ७९ एवढी पाचच वर्षे टिकली. या साऱ्या कालखंडात राजकारणापासून ती अलिप्त राहिली.

आयातोल्ला खोमेनीची राजवट

शहाच्या राजकीय जुलमाविरुद्ध सर्वत्र असंतोष पसरला. त्याच्या अमेरिकाधार्जिण्या आर्थिक व परराष्ट्रीय धोरणामुळे देशातील धनाढ्य व गरीब यांच्यातील दरी वाढत गेली. लोक प्रचंड निदर्शने करीत रस्त्यावर आले. दुसऱ्या बाजूला धर्ममार्तंड व अन्य धर्मांध लोक शहाच्या सामाजिक सुधारणांच्या धोरणांविरुद्ध प्रक्षुब्ध झाले होते. अराजक सदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शहाला जीव वाचविण्याकरिता देशातून पलायन करून अमेरिकेत आश्रिताचे जीवन जगावे लागले. इराणमध्ये निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याकरिता, राजेशाहीच्या राजवटीत, देश सोडून फ्रान्समध्ये विस्थापितांचे जीवन जगणारा आयातोल्ला खोमेनी, महिलांना प्रतिष्ठा व समता यासकट अनेक आश्वासने देऊन १९७९ मध्ये पुढे सरसावला. लोकांना तो त्राता आहे असे वाटू लागले. या सत्तांतराला 'क्रांती' असे नाव देण्यात आले.

आयुष्यात पहिल्या प्रथम राजकीय भूमिका घेऊन, खोमेनी राजवटीला शिरीन इबादीने जाहीरपणे पाठिंबा व्यक्त केला. परंतु अल्पावधीतच खोमेनीशाही ही स्त्रीद्वेष्ट्यांची प्रतिक्रांती असल्याचे प्रत्यंतर तिला व तिच्या देशवासीयांना आले.

सत्ता हस्तगत झाल्याबरोबर, म्हणजे १९७९ साली, स्त्रिया या फार 'भावनावश' असल्यामुळे, न्यायाधीश या पदावर काम करण्याची त्यांची योग्यता नाही. असा निर्णय या इस्लामधर्माधिष्ठित प्रजासत्ताक राजवटीने (इस्लामिक रिपब्लिक) घेतला. न्यायाधीश या पदावरून शिरीनचे उच्चाटन करण्यात आले आणि 'विधी साहाय्यक' (लीगल असिस्टंट) अशा एका अगदी कनिष्ठ पदावर तिची नेमणूक करण्यात आली. 'विद्यापीठाच्या कुलगुरूची बदली इमारतीतील लिफ्ट चालविणाऱ्या कर्मचाऱ्याच्या जागी करण्यासारखेच हे आहे.', असे आपल्या पदावनतीचे वर्णन तिने एकदा केले होते. या कनिष्ठ पदावर पाच वर्षे नाईलाजाने काम केल्यानंतर तिने ही नोकरी सोडली आणि वकिलीचा व्यवसाय स्वतंत्रपणे सुरू केला. अनेक कंपन्यांची कायदेशीर सल्लागार

म्हणून जबाबदारी स्वीकारीत असतानाच तिने लिखाणास प्रारंभ केला. खोमेनीच्या जाचाला कंटाळून व घाबरून अनेक सुशिक्षित लोक देश सोडून गेले. शिरीनने मात्र देशातच राहून कार्य करण्याचा निर्णय घेतला.

मानवी हक्कांचे संरक्षण

वकिलीचा व्यवसाय करीत असतानाच, मानवी हक्कांच्या प्रस्थापनेसाठी - विशेषत: महिला व मुला-मुलींच्या हक्कासाठी - आवाज उठविण्यास तिने सुरूवात केली. बालहक्क संरक्षण समिती स्थापन करून, ती जोमाने चालविण्यातही ती कार्यरत असते. प्रस्थापित शिया पंथापेक्षा वेगळी भूमिका मांडणारा बहाई या नावाचा एक इस्लाम धर्मपंथ आहे. सत्तारूढ शासन त्यांना सुरक्षित जीवन जगू देत नाही. बहाई पंथाचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे, असा आग्रह शिरीन करीत असते.

प्रस्थापित शासनाच्या जुलमाविरुद्ध विद्रोह करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांचे वकीलपत्र घेऊन, त्यांच्या बाजूने न्यायालयात उभे राहून, त्यांना आरोपमुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात शिरीनने वाखाणण्यासारखे धैर्य दाखविले आहे. हल्ल्यांच्या, खुनांच्या धमक्यांमुळेसुद्धा ती डगमगली नाही. १९९८ साली, सत्तारूढ सरकारच्या सी. आय. डी. खात्याच्या प्रोत्साहनाने, चार विद्रोही बुद्धिजीवी नागरिकांचे एका हत्याकांड पथकाकरवी खून करण्यात आले. त्यापैकी दारिश्य व परवाने फौरूहार या दांपत्याचा त्यांच्या घरी जाऊन, बेछूटपणे सुऱ्याने भोसकून जीव घेण्यात आला. शिरीनने या दांपत्याच्या मुलीच्या वतीने मारेकऱ्यांना हुडकून काढण्याकरिता खटला दाखल केला. शिरीनला पाठिंबा देणाऱ्या एका सुधारणावादी वृत्तपत्राने, सत्तारूढ सरकारच्या एका खात्यानेच खुनाचे कट-कारस्थान रचले असल्याचा आरोप प्रसिद्ध केला. या वृत्तपत्राचा प्रकाशक साएद हजारिअन याच्यावर २००० साली, तेहरानच्या रस्त्यावरून तो जात असताना, मोटारसायकलवरून भरधाव येणाऱ्या बंदूकधाऱ्यांनी गोळ्या झाडल्या. मानेत गोळी घुसल्याने त्याला जबर जखम झाली पण तो वाचला. शिरीन व या झुंजार प्रकाशकाच्या अथक प्रयत्नांमुळे सी. आय. डी. खात्यातील काही जणांना अटक झाली आणि खुनाच्या कटात सामील झाल्याबद्दल त्यांना शिक्षा ठोठावण्यात आली.

वरील खटल्याच्या आधी एक वर्ष, म्हणजे १९९७ साली, शिरीनने दुसऱ्या एका खळबळजनक घटनेसंबंधात वकीलपत्र स्वीकारले होते. एरिथन गोलशानी या एका नऊ वर्षांच्या मुलीचा तिचे वडील आणि सख्खा भाऊ या दोघांनी मिळून खून केला होता. मुलीच्या सख्ख्या आईच्या वतीने शिरीन न्यायालयात उभी राहिली. इराणमधील प्रचलित कायद्यानुसार, स्वत:च्या अपत्याच्या खुनाबद्दल वडिलांना अटक करून शिक्षा ठोठावण्यास बंदी आहे. शिरीनने हा अमानुष कायदा रद्द करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात तिला यश आले नाही, परंतु सावत्र भावाला अटक करून शिक्षा ठोठावण्यात आली. कायद्याविरुद्ध जनमत जागरूक करण्याकरिता, ज्यांचा या कायद्याला विरोध

असेल, त्यांनी रस्त्यावर येऊन पांढऱ्या फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करून आपला विरोध प्रकट करावा असे आवाहन तिने केले. तिच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सबंध रस्ता फुलांच्या पाकळ्यांनी भरून गेला.

१९९९ साली तेहरान विद्यापीठात विद्यार्थ्यांनी काही रास्त हक्कांकरिता आंदोलन उभारले. विद्यार्थ्यांना अटक झाली आणि आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाला तेव्हा पुन्हा विद्यार्थ्यांच्या बाजूने शिरीन कोर्टात उभी राहिली.

सन २००० साली, इराणमध्ये लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी अनेक नागरिकांनी शांततापूर्ण निदर्शने केली. या निदर्शकांवर हल्ले करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे पुराव्यासकट तिने प्रसिद्ध केली. हल्ले करणाऱ्या पथकातील एका सदस्याने दिलेल्या कबुलीजबाबाची टेप तिने वितरित केली. या आरोपाखाली शिरीनला अटक करण्यात आली. तीन आठवडे बंदिस्त करून ठेवल्यानंतर, तिला पंधरा महिन्यांची तुरूंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. तिची लोकप्रियता वाढू लागली. अखेर, तुरूंगवासाची शिक्षा स्थगित करून, दोनशे डॉलर दंड भरून सुटका करून घेण्याची मुभा तिला मिळाली, परंतु पाच वर्षे वकिलीचा व्यवसाय बंद करण्याचा हुकूम तिच्यावर बजावण्यात आला.

तुरूंगात असताना तिला एकांतवासाची शिक्षा होती. त्या दिवसांचे वर्णन पुढे तिने एका लेखात केले आहे. त्यात ती म्हणते, (तुरूंगात असताना) ''मी एक वाक्य आठवण्याचा प्रयत्न करीत होते. 'यातना भोगण्याकरिता आम्ही जन्माला आलेलो नाही.' हे विधान नेमके कोणाचे आहे. ते आता मला आठवत नाही. तुरूंगातील सिमेंटच्या भिंतीवर चमच्याच्या एका टोकाने, खेदयुक्त क्रोधाने मी एक वाक्य कोरीत होते. 'तिसऱ्या जगात आमचा जन्म झालेला असल्याने, यातना भोगण्यासाठीच आमचा जन्म आहे - स्थळ (अवकाश) आणि काळ यांनी ते आमच्यावर लादलेले आहे. म्हणून संथपणे सामोरे जाणे याशिवाय गत्यंतर नाही.'

संथपणे न्यायासनाच्या व्यासपीठावर उभे राहून निर्भयपणे लढण्याचे कार्य शिरीन सातत्याने करतेच आहे. मानवी हक्कांसाठी सातत्याने झगडणाऱ्यांसाठी नॉर्वे या देशात असलेले 'रॅफतो प्राईज' या नावाने ओळखले जाणारे पारितोषिक तिला २००१ साली देण्यात आले होते. त्यामुळे हुरळून न जाता, ती अधिक जोमाने आपले शांततापूर्ण मार्गाने न्याय मिळविण्याचे कार्य करू लागली. नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतर, या विनयशील वीरांगनेसमोर एक नवे आव्हान उभे राहिले आहे आणि ते तिने स्वीकारले आहे. काही महिन्यांपूर्वी झारा काझेमी या एका कॅनडातील नागरिकाशी विवाह केलेल्या महिलेचा तुरूंगात असताना खून करण्यात आला होता. फोटो-पत्रकारिता करणाऱ्या या महिलेचा मुलगा स्टीफन याच्या वतीने शिरीन खटला लढविणार आहे.

धर्मनिरपेक्षतेवर भर देणारी, वकिलीचा व्यवसाय करणारी, (मेहरंगीझ कार पूर्वी शिरीनबरोबर काम करीत असे.) सुस्पष्टपणे बोलणारी, प्रकाशन व्यवसायात आलेली,

महिलांच्या समस्यांवर पुस्तके प्रसिद्ध करणारी, शाल्हा लहीदजी ही दुसरी एक सहकारी होती. महिलांच्या हक्कांचा जोमाने पुरस्कार करणाऱ्या 'तीन शिलेदार' असा त्यांचा नावलौकिक झाला होता. प्रकाशिकेवर दबाव आणून, तिचे तोंड बंद करण्यात आले आहे. कार या वर उल्लेखलेल्या वकिलीणबाई अमेरिकेत जाऊन सुखाने जीवन कंठीत आहेत. सहकारी साथ सोडून गेल्या, तरी शिरीनची जिद्द मावळली नाही. नव्या निर्माण होतील याची तिला खात्री आहे.

खटले चालविण्याव्यतिरिक्त देशात असलेले कायदे-विशेषत: महिला व बालकांविषयी असलेले कायदे बदलून घेण्यासाठी, नवे कायदे करण्याचा आग्रह धरण्यासाठी मोहिमा आखून त्यात सामील होण्यात शिरीन बराच काळ व्यग्र असते. ती स्वत:ला स्त्रीवादी म्हणवून घेण्यास तयार नसते. स्त्रियांवरील अन्यायासकट समाजातील अनेक समस्यांचा समग्रपणे विचार करून, त्या सोडविल्या पाहिजेत ही भूमिका स्वीकारणे तिला अधिक योग्य वाटते.

विवाहाचे बंधन अल्पकाळ असणे (कायमचे नव्हे) हे इस्लाम धर्मपरंपरेशी सुसंगत आहे. धर्ममार्तंडांचा या परंपरेला पाठिंबा आहे. स्त्रियांच्या सबलीकरणाकरिता ही परंपरा स्वागतार्ह आहे असे स्त्रीवादी महिला व संघटनासुद्धा म्हणू लागल्या. शिरीन इबादीने या मांडणीला प्रखर विरोध केला. असले विवाह म्हणजे केवळ वेश्याव्यवसाय आहे. चारित्र्य व प्रतिष्ठा यांना मूठमाती देणाऱ्या या प्रथेत स्वागतार्ह असे काहीच नाही अशी तिची भूमिका आहे.

कार्यामागची वैचारिक बैठक

शिरीन इबादी कुंपणावर उभी राहून, वारा येईल तशी पाठ फिरवणारी संधिसाधू सुधारक नाही. लोकांचे-विशेषत: महिलांचे हित कशात आहे याचा साकल्याने विचार करून, आक्रस्तळेपणा टाळून, कोणाच्याही धर्मभावना न दुखविता, लोकमत अनुकूल करून घेण्याकरिता, आडमुठ्या विरोधकांच्या जुलमाला शरण न जाता हिंमतीने मार्गक्रमण करणे यावर विश्वास ठेवणारी, नेतेबाजीचा हव्यास नसणारी ही एक उदारमतवादी कार्यकर्ती आहे. ती धर्मनिष्ठ आहे, परंतु धर्मग्रंथांचा, पोथ्यांचा, आधुनिक मूल्यांशी सुसंगत असा अर्थ लावता येणे शक्य आहे व तसा प्रयत्न करावा असे प्रतिपादन ती करीत असते. असा अर्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास लोकशाही, कायद्यासमोर सर्व नागरिकांना समता, धार्मिक स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता या आधुनिक मूल्यांशी इस्लाम धर्म मूलत: विसंगत नाही असा दावाही ती करीत असते. या तिच्या वैचारिक-भावनिक बैठकीमुळे, सध्याची सर्वव्यापी विषमताधिष्ठित समाजव्यवस्था मोडून, समाजरचनेत आमूलाग्र बदल घडवून आणून, समाजाभिमुख, व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित नवीन जीवनसरणी अमलात आणण्याचे ध्येय उराशी बाळगणेही कमी क्रांतिकारक नाही हे उघड आहे.

परंपरेने प्रस्थापित झालेल्या धर्मातील अथवा रूढीतील विसंगती निदर्शनास आणून देण्यात तिला धास्ती वाटत नाही. उदाहरणार्थ, एखाद्या भावी पित्याने आपल्या पत्नीला गर्भपात करण्यास मदत केली तर तो कडक शिक्षेस, मृत्यूदंडाससुद्धा पात्र ठरतो. परंतु कोणत्याही कारणामुळे गर्भपात घडवून आणण्यात अपयश आले, तर जन्मलेल्या बालकाचा चौदाव्या वर्षी खून करण्यास पित्याला मुभा आहे! या हत्येकरिता फक्त किरकोळ दंड भरावा लागतो. दुसऱ्या एका धर्ममान्य प्रथेनुसार नऊ वर्षाच्या मुलीवर आणि पंधरा वर्षाच्या मुलावर ते प्रौढ आहेत असे समजून आरोपपत्र ठेवण्याला प्रत्यवाय नाही, परंतु या मुला-मुलींना ते प्रौढ नसल्यामुळे प्रवास करण्याकरता माता-पित्यांची परवानगी घेणे सक्तीचे आहे! माता-पित्यांच्या संमतीने होणारा बालविवाह हा माणुसकीशून्य आहे. इस्लाम धर्माच्या मूळ मानवतावादी प्रेरणेशी तो सुसंगत आहे काय? अनेक शोधनिबंध लिहून, शिरीनने असे अनेक प्रश्न उपस्थित केले.

वैचारिक वादविवाद, मोहिमा या सर्व प्रक्रियेतून अधिक धिटाईने लिहिणारे लेखक पुढे आले. मोशेन कादिवार या धर्मपंडिताने (मजताहिदाने) इस्लाम धर्माची मूळ प्रेरणा काहीही असली तरी कालौघात त्याचे काय झाले हे तपासून पाहिले पाहिजे. अशी मांडणी निर्भीडपणाने केली. शरिया या विधी संग्रहानुसार समाजात कितीतरी भेदाभेद मानण्यास संमती दिली आहे हे त्याने दाखवून दिले. उदा. गुलाम आणि स्वतंत्र नागरिक, स्त्री-पुरुष, इस्लाम धर्मावर विश्वास ठेवणारा आणि न ठेवणारा (काफर), शिया-सुनी, धर्मगुरू व सामान्य व्यक्ती इत्यादी असे भेद हे मूलभूत मानवी हक्कांशी विसंगत आहेत. इराणने मानवी हक्कांच्या सनदेला मान्यता दिली असताना शरिया कायदे ग्राह्य कसे धरता येतील, असा प्रश्नही त्याने उपस्थित केला.

शिरीन इबादीने आपल्या वर्तणुकीतून कालबाह्य प्रथा पाळावयाच्या नाहीत असे ठरविले. इराणमध्ये असताना, केस झाकण्याकरिता बायकांनी जो मानेवर पट्टा बांधावयाचा असतो तो ती बांधीत नाही. रूढीनुसार बंधनकारक असणारा पोषाखही ती घालतेच असे नाही. पॅरिसमध्ये असताना तर ती लिपस्टिकही लावते. नोबेल पुरस्कार तिला जाहीर झाला तेव्हा ती पॅरिसमध्येच होती. पर्वताचे सर्वोच्च शिखर गाठण्याचे उद्दिष्ट जरूर ठेवावे, परंतु लोकमत अनुकूल बनेपर्यंत टेकड्या चढत राहावे, असा दृष्टिकोन ठेवणारा तिच्या मनाचा पिंड आहे.

बादशहा शहाच्या राजवटीत महिलांना मिळालेले हक्क खोमेनी राजवटीने रद्द केले आहेत त्याची जाणीव ठेवून तिला कार्य करावे लागते. स्त्रियांना न्याय देण्यासाठी शीघ्र गतीने निश्चित पावले उचलण्याची गरज सध्याचे राष्ट्राध्यक्ष महंमद खातामी यांना आत्मसात करता आलेली नसली तरी त्यांचा कल सुधारणा घडवून आणण्याकडेच असेल, अशी आशा बाळगून ती त्यांना पाठिंबा देण्यासाठी निवडणूक प्रचार-मोहिमेत १९९७ साली आस्थेने सामील झाली होती. तिच्या अपेक्षा अल्पांशानेसुद्धा पुऱ्या झाल्या नाहीत. परंतु निराशा हा शब्द तिच्या शब्दकोशात नाही.

अजून दूरचा पल्ला गाठावयाचा आहे

बलात्कार करू पाहणाऱ्या एका पुरुषाला एका बाईने ठार मारले. तिला फाशीची शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशाने 'तिने घातलेला पोशाख बलात्काराला निमंत्रण देणारा ठरला' असे निकालपत्रात नोंदवून ठेवले आहे!

बहुपत्नीकत्वाची पद्धत रद्द ठरविण्यात आली होती. ती पुन्हा कायदेशीर ठरविण्यात आली आहे. स्त्रीला घटस्फोट नवऱ्याची परवानगी असल्याशिवाय मिळत नाही. व्यभिचाराचा आरोप असलेल्या स्त्रीला दगडाने ठेचून मारण्याला कायदेशीर संमती आहे. बायकांनी रस्त्यात सायकल चालविण्यावरही बंदी घालण्यात आली होती. तीव्र आंदोलनामुळेच ही बंदी उठविण्यात आली. पुरुषांनीच चरितार्थासाठी बाहेर काम करावे, महिलांनी घरात राहून बालसंगोपन करावे असा उपदेश धर्मगुरूंकरवी सतत करण्यात येत असतो. बाजारहाट करण्याकरितासुद्धा नवऱ्याच्या परवानगीशिवाय बायकांनी बाहेर पडू नये असा सल्लाही काही धर्मगुरू आपल्या प्रवचनांतून देत असतात. महंमद पैगंबरांची मुलगी फतीमा झाराचे एक वाक्य स्त्रियांना सतत ऐकविले जात असते - 'नातेवाईकांव्यतिरिक्त अन्य कोणा पुरुषाकडे स्त्रीने कधी पाहू नये आणि आपल्याला दिसू देऊ नये.'

एखाद्या अपघातात स्त्री जर जखमी झाली तर तिला द्यावयाची नुकसानभरपाई ही जखमी पुरुषाच्या रकमेच्या निम्मी असावी लागते. मुलींच्या लग्नासाठी ९ हे वय ठरविण्यात आले होते. बऱ्याच वादविवादानंतर आता १३ हे वय योग्य ठरविण्यात आले आहे. विवाहित महिलांना मेहेर नावाची रक्कम नवऱ्याकडून मिळण्याची प्रथा आहे. ती रक्कम आता महागाईच्या निर्देश अंकाशी जोडण्यात आली आहे. पालकत्वाचा म्हणजेच मुलांवर हक्क सांगण्याचा अधिकार फक्त वडिलांना आहे, मातेला नाही.

इराणमधील महिलांवर होणाऱ्या अन्यायाची वरील यादी परिपूर्ण नाही. शिरीन इबादी आणि तिच्या सहकाऱ्यांना आपले उद्दिष्ट गाठण्याकरिता किती लांबचा पल्ला अद्याप गाठावयाचा आहे याची कल्पना वरील अपुऱ्या यादीवरून येईल. हा पल्ला गाठण्याकरिता तिला मिळालेला १३ लाख डॉलरचा पुरस्कार कितीसा पुरणार आहे? इराणच्या लोकसभेत महिलांची संख्या फक्त ११ आहे. त्यांतील बहुतेक महिला सरकारधार्जिण्या आहेत. पुढील निवडणुकीत अस्सल सुधारणावादी महिला निवडून आणण्याकरिता प्रयत्न करावयाचे असतील, तर निवडणुकीचा खर्च थोडा नाही.

तिच्या बहुमोल कामगिरीची दखल, तिला १० डिसेंबर २००३ रोजी (जागतिक मानवी हक्क दिन) पुरस्कार देताना जे सन्मानपत्र दिले गेले, त्यातील शेवटच्या खालील वाक्यात मोजक्या शब्दांत घेण्यात आली आहे.

''या धैर्यधुरंधर महिलेने आपला व्यवसाय दक्षतापूर्वक, सचोटीने, जिवाची सुरक्षितता धोक्यात घालून, धमक्यांची तमा न बाळगता केलेला आहे.''

(मिळून साऱ्याजणी, जानेवारी २००४)

❑

नोबेल शांती पुरस्कार मिळवणाऱ्या स्त्रिया

रिगोबेरटा मेन्चू – जन्म : ९ जानेवारी १९५९

१९९२ चा नोबेल शांतता पुरस्कार मिळविणाऱ्या रिगोबेरटा मेन्चू या ग्वाटेमाला देशातील आदिवासी महिलेचे बालपण शेतीत काबाडकष्ट करण्यात, किंवा मोठमोठ्या मळ्यांत कॉफीच्या बिया वेचण्यात गेले. पुरातन माया संस्कृतीची क्विच शाखा (क्विच भाषा बोलणारा लोकसमूह) आणि रोमन कॅथलिक धर्म असे दुहेरी संस्कार तिच्यावर झाले.

लहान वयातच, सामाजिक सुधारणा आणि महिलांच्या हक्कांसाठी होत असलेल्या आंदोलनात ती सहभागी होऊ लागली. ग्वाटेमाला देशातील जुलमी सत्ताधारी आणि लब्धप्रतिष्ठितांचा या आंदोलनांना तीव्र विरोध होता. मध्य अमेरिकेत वसलेल्या सुमारे सव्वा दोन कोटी लोकसंख्या असलेल्या या लहानशा देशाचा आधुनिक कालखंडातील इतिहास हा निर्दय हुकूमशाही राजवटींचा, कट कारस्थानांचा, जनआंदोलनांवर अमानुष दडपशाही करण्याचा आहे. भूमिगत राहून, प्रखर लढा देऊन एक डाव्या विचारसरणीची राजवट १९४४ साली स्थापन झाली. जमीन सुधारणेसकट अन्य मूलभूत सुधारणा करण्याचा धडाका या राजवटीने सुरु केला. त्याबरोबर या देशापलीकडेच असलेले अमेरिकन साम्राज्यवादी अस्वस्थ झाले. सी. आय. ए. या गुप्तहेर संघटनेमार्फत ग्वाटेमालातील उजव्या विचारसरणीच्या शक्तींना प्रोत्साहन देऊन, शस्त्रास्त्रे व आर्थिक बळ मोठ्या प्रमाणावर पुरवून, डाव्यांची राजवट १९५४ साली उलथून टाकण्यात ते यशस्वी झाले आणि त्यानंतर पुन्हा सुमारे १९९७ पर्यंत हजारो विरोधकांच्या कत्तली करून, बेगुमानपणे राज्य करणाऱ्या लष्करशहांच्या पाठिंब्याने सत्ताधीश बनले.

पुन्हा एकवार उफाळलेल्या भूमिगत लढ्यांमध्ये रिगोबेरटाचे वडील, व्हिसेन्ट हे सामील झाले. या आंदोलकांनी मळयाच्या एका धनाढय मालकाला पकडून फाशी दिले होते, त्यात व्हिसेन्ट हे सहभागी झाले होते, असा आरोप ठेवून त्यांना अटक करण्यात आली आणि अटकेत असताना त्यांना तीव्र यातना होतील अशी वागणूक देण्यात आली. सुटका झाल्यावर, नव्यानेच स्थापन झालेल्या सी. यु. सी. या नावाच्या

एका किसान संघटनेत ते कार्य करू लागले.

वरील राजकीय पार्श्वभूमीवरून, रिगोबेरटा ही कोणत्या वातावरणात वाढत होती हे लक्षात येईल. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी म्हणजे १९७९ मध्ये, किसान संघटनेचे सभासदत्व तिनेही स्वीकारले. त्याच्या पुढच्याच वर्षी सुरक्षा दलाने तिच्या वडिलांना पकडून ठार मारले. त्याच्या पाठोपाठ तिच्या आईला पकडून अनन्वित हाल व बलात्कार करून ठार मारण्यात आले. मृत्युदंडापासून तिचा भाऊही सुटला नाही.

सारे दुःख सहन करीत ही आदिवासी युवती किसान संघटनेत जोमाने कार्य करू लागली. जनसंपर्क मोठ्या प्रमाणावर साधण्याकरिता स्व-भाषेशिवाय देशातील अन्य आदिवासी समूहांच्या काही भाषा व स्पॅनिश ही राष्ट्रपातळीवर मान्यता पावलेली भाषा ती शिकली. १९८० साली, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या संपात तिने हिरिरीने भाग घेतला, आणि १९८१ साली मे दिनाच्या दिवशी राजधानीत झालेल्या प्रचंड निदर्शनात तिने स्वतःला झोकून दिले. एवढया थोड्या अवधीत ती आता साधी कार्यकर्ती राहिलेली नव्हती. तिला नेतृत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. 31st January Popular Front या एका झुंजार राजकीय संघटनेच्या वतीने आदिवासी शेतकऱ्यांना लष्करशाही राजवटीच्या जुलमाविरूद्ध प्रखर संघर्ष करण्यास प्रवृत्त करण्याची जबाबदारी तिने स्वीकारली.

रिगोबेरटाला उघडपणे कार्य करणे यापुढे शक्य नव्हते. तिच्या प्रत्येक हालचालीवर पोलिसांची सक्त नजर होती. त्या सुमारास हजारो ग्वाटेमालावासीयांनी मेक्सिको या देशात स्थलांतर करण्याचे ठरविले. लढा चालू ठेवण्याचा निश्चय करून रिगोबेरटाने सुद्धा मेक्सिकोत पाऊल टाकले. एकीकडे सी. यु. सी. च्या राष्ट्रीय पातळीवरील सुसूत्रीकरण समितीवर १९८६ साली तिला स्थान देण्यात आले होतेच. शिवाय मेक्सिकोमध्ये The United Representation of the Guatemalan Opposition ही नवीन संघटना स्थापन करून, ग्वाटेमाला व मेक्सिकोमधील आदिवासी शेतकऱ्यांनी आपापल्या देशातील दडपशाहीविरुद्ध संयुक्तपणे लढण्याचा निर्णय घेतला. १९८७ साली, 'व्हेन द माऊंटन्स ट्रम्बल', (When the Mountains Tremble) या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली. एके काळी समृद्ध असलेल्या माया संस्कृतीच्या वंशजांची आजची शोचनीय स्थिती आणि त्यांचा चालू असलेला संघर्ष यांची हृदयभेदक कहाणी विशद करणाऱ्या या चित्रपटात निवेदिकेचे काम रिगोबेरटाने केले आहे.

कोलंबसने अमेरिकेचा शोध प्रथम लावल्याला १९९२ साली ५०० वर्षे पूर्ण झाली म्हणून अमेरिकेत मोठे सभारंभ आयोजित करण्यात आले. अमेरिकेचा प्रथम शोध कोलंबसने नव्हे तर अमेरिका-लॅटिन अमेरिकेचा प्रथम शोध कोलंबसच्याही आधी तेथील आदिवासींनी लावलेला आहे, म्हणून कोलंबसला नसते श्रेय देऊ नये अशी भूमिका अमेरिका खंडातील आदिवासींनी मांडली होती. युरोपमधील लोकांना अमेरिका खंडाचा परिचय कोलंबसने पहिल्या प्रथम करून दिला असेल, परंतु त्या

खंडाचा शोध कोलंबसने लावला असे म्हणणे हा सत्यापलाप आहे, म्हणून सर्व आदिवासींनी निदर्शने करून समारंभावर बहिष्कार घालण्याचे ठरविले होते. मेक्सिकोमध्ये सान मारकोज या गावी निदर्शने करण्यात इतर सहकाऱ्यांबरोबर रिगोबेरटाने पुढाकार घेतला होता.

१९८३ साली, आपल्या लढ्यांचे आणि जीवनचरित्राचे तिने केलेले निवेदन, एलिझाबेथ बर्गोस देब्रेने शब्दांकित केले आहे. १२ भाषांमध्ये त्याचे अनुवाद झाले आहेत. तिलाा नोबेल शांतता पुरस्कार १९९२ साली देण्यात आला. १९९६ साली International Goodwill Ambassador असा किताब देऊन 'युनेस्को' या जागतिक राष्ट्रसंघटनेच्या शाखेकडून तिचा सत्कार करण्यात आला.

ग्वाटेमालामधील सध्याची राजवट पूर्वीसारखी जुलमी नाही. परंतु रिगोबेरटाच्या सुरक्षिततेची हमी तिला अद्याप मिळालेली नाही. खुनाच्या धमक्या येतच असतात. अधूनमधून धोका पत्करून ती स्वदेशी जात असली, तरी मेक्सिकोत राहून लढा चालू ठेवणे हेच तिला अद्यापही करावे लागणार आहे.

माइरीड कॉरिगन मॅग्वॅअर – जन्म : २७ जानेवारी १९४४

आज वय ६० असलेल्या माइरीड या महिलेला, तिच्या वयाच्या बत्तीसाव्या वर्षी म्हणजे सन १९७६ साली नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार तिच्यात आणि तिची सहकारी बेटी विल्यम्स या दोघींच्यात वाटून देण्यात आला.

ज्या ज्या देशात ब्रिटिशांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले, त्या बहुसंख्य वासाहतिक देशांमध्ये देशाची फाळणी घडवून आणण्याचे कुटिल चातुर्य या साम्राज्यवादी सत्ताधीशांनी दाखविले आहे. आयर्लंड हा देश त्याला अपवाद नाही. त्या देशातील रोमन कॅथलिक व प्रॉटेस्टंट या दोन खिश्चनधर्मीय पंथांमध्ये बेबनाव घडवून आणून, १९२० साली आजच्या उत्तर व दक्षिण अशा दोन तुकड्यांत आयर्लंडचे विभाजन करण्यात आले. उत्तर आयर्लंडमध्ये प्रॉटेस्टंटांची संख्या ५८% आहे तर रोमन कॅथलिकांची संख्या ४२% आहे. दक्षिण आयर्लंडमध्ये प्रॉटेस्टंट ५%, तर कॅथलिक ९५% आहेत. दक्षिण आयर्लंड हा विभाजनविरोधी, अखंड आयर्लंडवादी असल्यामुळे, दोन धर्मपंथीयांमध्ये तेढ असून अल्पसंख्याक प्रॉटेस्टंट हे ब्रिटिश वर्चस्वाच्या विरोधी असले तरी रोमन कॅथलिकांचे वर्चस्व त्यांना नको आहे. या सर्व तणावांमुळे उत्तर आयर्लंडमधील परिस्थिती अतिशय स्फोटक बनत गेली. या दोनही पंथीयांकडून एकीकडे ब्रिटिश वर्चस्वाविरुद्ध तर दुसरीकडे आपापसात, १९२० सालापासून तो १९९८ पर्यंत सशस्त्र झगड्यासकट तीव्र संघर्ष चालू ठेवला गेला होता. १९६९ ते १९९८ या ३० वर्षांच्या दरम्यान ब्रिटिशांच्या दडपशाहीतून आणि आपापसातील यादवीतून ३४०० पेक्षा अधिक लोक (नागरिक व पोलीस मिळून) ठार मारले गेले आहेत. सतत घडणारे बॉम्बस्फोट, आगी, दहशतवाद्यांनी केलेल्या हत्या अशा सर्व

भीषण अशांततेमुळे उत्तर आयर्लंडमधील लोक त्रस्त व चिंतातूर झाले होते.

पाच भाऊ आणि दोन बहिणी अशा एकूण सात भावंडांच्या रोमन कॅथलिक कुटुंबात वाढलेल्या माइरीडने आपले कॉलेज शिक्षण कधीही पुरे केले नाही. तिचे वडील घरोघरी जाऊन, घरांतील खिडक्या घासूनपुसून स्वच्छ करून देणारे कंत्राटदार होते. तिची आई गृहकृत्यदक्ष मध्यमवर्गीय गृहिणी होती. मुळात ब्रिटिश असलेले हे कुटुंब, उत्तर आयर्लंडची राजधानी बेलफास्ट येथे राहत असे. माइरीडने शॉर्टहँड टायपिस्ट म्हणून प्रावीण्य मिळविले आणि वयाच्या सोळाव्या वर्षापासून ती नोकरी करू लागली. तिला सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे काही कॅथलिक संघटनांच्या माध्यमातून ती कार्य करू लागली. अपंग असलेल्या बाल व कुमार वयोगटातील मुलांसाठी संस्था स्थापन करून त्यांना सर्वतोपरी मदत करणे, तुरूंगात जाऊन तेथील कैद्यांचे हक्क रक्षण करणे व त्यांना सुधारण्यासाठी मदत करणे अशा कार्यात ती मग्न झाली. राजकीय स्वरूपाच्या कार्यात ती ओढली गेली ती कुटुंबात घडलेल्या एका अपघातामुळे.

१९७६ साली बेलफास्टमधील रस्त्याच्या एका कोपऱ्यावर 'लष्करी संरक्षक दला'तील एका सैनिकाने, आयरिश रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या डॅनी लेनन नावाच्या एका कार्यकर्त्याची बंदुकीच्या गोळीने हत्या केली. गोळी लागल्याबरोबर लेननची मोटारकार रस्त्यावरील फूटपाथवर भरकटत गेली. या फूटपाथवरून माइरीडची बहीण अॅन आणि तिचे दोन मुलगे व एक मुलगी चालत होती. मोटारीचा जबरदस्त धक्का लागून तीनही मुले मरण पावली आणि अॅनला गंभीर जखम झाली. तीनही मुलांच्या मृत्यूच्या धक्क्यातून अॅन कधीही सावरली नाही. वारंवार आजारी पडत राहून, १९८० साली तिने जगाचा कायमचा निरोप घेतला.

बहीण व भाच्यांच्या मृत्यूने तीव्र दुःखी झालेल्या माइरीडने आयर्लंडमध्ये शांतता प्रस्थापनेच्या कार्याला वाहून घेण्याचा निश्चय केला. १९७६ पासून शांतता प्रस्थापनेच्या कार्याला आयर्लंडमध्ये सुरूवात झाली होती. 'कम्युनिटी ऑफ पीस पीपल' या नावाची एक संघटना श्रीमती बेटी विल्यम्स, श्री. कैरन मॅक्केओन व माइरीड या तिघांनी मिळून १४ ऑगस्ट १९७६ रोजी स्थापन केली. दहशतवाद संपुष्टात आणून, न्याय्य हक्कांकरिता केवळ शांततापूर्ण मार्गाने संघर्ष करण्याचे उद्दिष्ट या संघटनेने घोषित केले. माइरीडने आपले मेव्हणे (अॅनचा विधुर झालेला पती) जॅकी मॅग्वॅअर याच्याशी १९८१ साली विवाह केला आणि हजारो लोकांना संघटित करून, शांतता प्रस्थापनेच्या कार्यात ती जोमाने उतरली. एकीकडे दोन मुलांची आई बनून त्यांना वाढवीत असताना लेख लिहून, भाषणे करून दर आठवड्याला वेगवेगळ्या ठिकाणी 'शांतता मोर्चे' काढणे हेच तिचे जीवन बनले. हा 'गुळमुळीत मार्ग' पसंत नसलेल्या अनेकांनी तिची कुचेष्टा केली, तिचे प्रयत्न हसण्यावारी नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या सर्व प्रकारच्या अवहेलनेला तिने शांतपणे प्रतिक्रिया दिल्यावर लाखो

लोक या 'शांति मोर्चा'त सामील होऊ लागले. ब्रिटिश नागरिकांनी तिच्या कार्याला पाठिंबा दिला. 'शांततेची वाट आपल्या हृदयातच सामावलेली आहे, आपण सर्वांच्या हृदयांनाच आवाहन करू या', ही तिची आर्त हाक आयर्लंड व इंग्लंडमध्ये दूरवर पोहोचली आणि ब्रिटिशांच्या दडपशाहीला विरोध करण्याकरिता व पंथीय बेबनाव मिटविण्याकरिता अनेक जण त्या दोनही देशांच्या रस्त्यांवर उतरले.

१९७६ साली माइरीड व तिची सहकारी बेटी विल्यम्स या दोघींना मिळून नोबेल शांतता पुरस्कार मिळाल्यावर त्यांचे कार्य थंडावले नाही. आयर्लंडमधील रोमन कॅथलिक हा जर एका फुटपाथवरून चालत असेल, तर प्रॉटेस्टंट हा समोरच्या दुसऱ्या फुटपाथवरून चालतो असे तेथील वैरभावनेचे वर्णन केले जाते. माइरीड व तिच्या संघटनेने यावर एक मार्ग काढला. युरोपमधल्या अनेक देशांमध्ये शिबिरे आयोजित करून दोनही ख्रिश्चनपंथीय युवकांना या शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन करून शांततेचा चिरस्थायी मार्ग चोखाळणे, सूडभावना गाडून टाकणे हेच कसे हितावह आहे ते या शिबिरार्थींना पटवून देण्यात आले. अखेर १९९८ साली 'गुड फ्रायडे' हा सणाचा दिवस उजाडला. एकमेकांशी वैर असलेले सर्व घटक एकत्र जमले आणि शांततापूर्ण मार्गाने सर्व समस्या सोडविण्याच्या करारनाम्यावर सह्या झाल्या.

'आक्रमकतेचा, सूडाचा, हिंसेचा, युद्धाचा मार्ग कधीही बंद होणे शक्य नाही असे आपण का म्हणावे? गुलामगिरीवर आधारित समाजव्यवस्था आपण संपुष्टात आणली ना? मग शांततेचा मार्ग स्वीकारणारा समाज आपण निर्माण करू शकणार नाही, असे मानण्याचे कारण काय?' हा प्रश्न अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधून माइरीड विचारीत आलेली आहे.

मानवी हक्क प्रस्थापनेसाठी अविरतपणे लढणाऱ्या म्यानमार या देशातील ऑंग सान सू क्यी वर तेथील सत्ताधाऱ्यांनी घातलेली बंदी उठवावी अशी मागणी करण्याकरता १९९३ साली इतर सहा नोबेल पुरस्कार विजेत्यांबरोबर माइरीड म्यानमारमध्ये जावयास निघाली. थायलंडच्या सरहद्दीपर्यंत पोहोचल्यावर, म्यानमार सरकारने त्या सर्वांना आपल्या देशात प्रवेश करण्याकरता मनाई केली, म्हणून अखेर पत्रकार परिषदेत त्यांनी आपला निषेध नोंदविला.

नोबेल पुरस्काराव्यतिरिक्त इतर अनेक पुरस्कार माइरीडला मिळाले आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचा पुरस्कार म्हणजे जागतिक राष्ट्रीय संघटनेने दिलेला 'जगातील कर्तबगार स्त्रियांसाठीचा पुरस्कार.'

(मिळून साऱ्याजणी, सप्टेंबर २००४)

❑

रोझा लक्झेंबर्ग
एक अद्वितीय क्रांतिकारक विदुषी

बालपण व शालेय शिक्षण

रोझाचा जन्म ५ मार्च १८७९ रोजी पोलंडमधल्या झामोस्क या गावी झाला. पोलंड हा त्या वेळी स्वतंत्र देश नव्हता. रशियाच्या वर्चस्वाखालचा तो एक अविभाज्य घटक होता. तीन भाऊ आणि दोन बहिणी मिळून पाच भावंडांचे हे यहुदी (ज्यू) धर्मीय कुटुंब फार श्रीमंत नसले तरी सुखवस्तू होते. सर्व भावंडांत रोझा ही सर्वांत लहान मुलगी होती. जर्मनीत शिक्षण घेतलेले वडील लाकडाचा व्यापार करीत असत. तिच्या सुशिक्षित आईला अव्वल दर्जाचे वाङ्मय वाचण्याची फार गोडी होती. घरातील संवाद हा पोलिश व जर्मन या दोनही भाषांतून चालत असे. रोझाने तर पुढे रशियन भाषेवरही प्रभुत्व मिळविले.

रोझा अडीच वर्षांची असताना हे कुटुंब वॉरसाला राहण्यास गेले. ती पाच वर्षांची असताना तिच्या कमरेच्या खाली एक दुखणे निर्माण झाले. ताप येऊ लागला. तो हाडाचा क्षयरोग असल्याचे चुकीचे निदान करण्यात आले आणि त्यानुसार चालू करण्यात आलेल्या उपचारांमुळे तिला एक वर्ष अंथरूणात खिळून राहावे लागले. यातून कायमचे अंशत: अपंगत्व निर्माण झाले असूनही, त्याच वर्षी ती वाचा-लिहावयास शिकली. आपण जे शिकलो ते इतरांनाही शिकवावे, असे इतक्या लहान वयापासून तिला वाटू लागल्यामुळे, घरातील नोकरांना तिने आपले विद्यार्थी बनण्याचा आग्रह धरला.

ज्यू धर्मीयांविरुद्ध त्या काळी उघडउघड भेदभाव केला जात असे, इतकेच नव्हे तर ख्रिश्चनधर्मीयांच्या मनात त्यांच्याविषयी कमालीचा तिटकारा होता. रशियन प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मुलांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या वॉरसामधील सर्वोत्कृष्ट शाळेत रोझाला प्रवेश मिळणे या ज्यूद्वेष्ट्या वातावरणामुळे अशक्य होते. दुसऱ्या दर्जाच्या मुलींच्या शाळेत भेदभाव असूनही रोझाला प्रवेश मिळाला. शाळा व पुढे कॉलेजमधील संपूर्ण शिक्षणात, सतत उत्तम श्रेणी मिळवीत १८८७ मध्ये ती पदवी परीक्षेत उत्तीर्ण झाली. सुवर्णपदक मिळविण्यासही ती पात्र ठरली. रशियन भाषा शिकणे

सक्तीचे केले जात असे याविरुद्ध पोलिश विद्यार्थी व एकूण पोलिश नागरिकांच्या मनात असंतोष होता. त्याविरुद्ध अधूनमधून व्यक्त होणाऱ्या उद्रेकात विद्यार्थ्यांबरोबर रोझा सहभागी होत असे. विद्यालयातील वरिष्ठांशी ती नेहमी वाद घालत असे, विद्रोह करीत असे या सबबीवर तिला जाहीर झालेले सुवर्णपदक प्रत्यक्षात देण्यात आले नाही.

ज्युलिअस वुल्फ हे प्राध्यापक झुरिच विद्यापीठातील राज्यार्थशास्त्र (Political Economy) या विभागाचे प्रमुख होते. रोझा आपल्या या प्राध्यपकांना प्रश्नांचा व तिला पटलेल्या मुद्यांचा भडिमार करून भंडावून सोडत असे. कांद्याचे पापुद्रे सोलावे, तसे या पठडीतील विद्वान लोक सामाजिक वास्तवाच्या गाभ्याला स्पर्श न करता नुसती शुष्क चिकित्सा करतात असा तिचा आक्षेप असे. प्राध्यापकांबद्दल जबरदस्त दरारा बाळगण्याचा तो काळ होता. रोझाला आदर होता, पण ती दरारा मानत नसे. आपल्या या अतिशय बुद्धिमान विद्यार्थिनीच्या सडेतोडपणाबद्दल अपमान न मानता, प्रा. ज्युलिअस वुल्फ यांनी आत्मचरित्रात तिच्याबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत.

सार्वजनिक जीवनास प्रारंभ

शाळा-कॉलेजात शिक्षण घेत असतानाच, रशियातील जुलमी राजेशाहीच्या-झारशाहीच्या राजवटीविरुद्ध लढणाऱ्या क्रांतिकारक गटाशी-संघटनांशी, विशेषत: नरोद्‌निक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या, भूमिगत राहून कार्य करणाऱ्या दहशतवादी घटकाशी, तसेच 'प्रोलेटारिएट पार्टी' (सर्वहारा वर्गाचा पक्ष) या तत्सम कार्य करणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांशी तिचा परिचय झाला आणि त्यांच्या आंदोलनात ती सहभागी होऊ लागली. पदवी संपादन केल्यानंतर दोन वर्षे घरी राहून तिने ते राजकीय कार्य चालू ठेवले. पोलिसांच्या नजरेतून ती सुटणे यापुढे कधी शक्यच नव्हते. धोकादायक ठरविण्यात आलेल्या राजकीय कार्यकर्त्यांना त्या काळी कठोर सक्तमजुरीची शिक्षा देऊन, रशियातील सायबेरियाच्या तुरुंगात हद्दपार करण्यात येत असे. त्या तुरुंगाला 'क्रांतिकारकांचे विद्यापीठ' असे नाव क्रांतिकारकांनी दिले होते. १८८९ पर्यंत रोझाला अटक होण्याची लक्षणे दिसू लागली. सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून तिने पोलंड सोडून पुढील उच्च शिक्षणासाठी पश्चिम युरोपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला.

चतुराईने देशांतर

पोलिसांची नजर चुकवून, स्वत:च्या देशातून निसटणे दुरापास्त होते. प्रोलेटारिएट पार्टीचा एक कार्यकर्ता मार्टिन कासप्रझाक यांच्या सल्ल्याने देशांतर करण्याकरिता एक निमित्त सादर करण्याचे ठरले. सरहद्दीवरील एका खेड्यात, मार्टिन एका कॅथलिकपंथीय धर्मगुरुला जाऊन भेटला. एका ज्यू युवतीचे एका ख्रिश्चन युवकावर प्रेम असून, त्याच्याशी लग्न सुरळीतपणे पार पडावे याकरता तिला धर्मांतर करून

ख्रिश्चन धर्म स्वीकारावयाचा आहे असे त्याने धर्मगुरूला सांगितले. पोलंडमध्ये राहून तिने ख्रिश्चन धर्म स्वीकारला तर तिच्या आई-वडिलांचा तीव्र विरोध होईल म्हणून तिने परदेशी जाणे हितावह ठरेल असे त्याने धर्मगुरूला पटवून त्याची सहानुभूती मिळविली. धर्मगुरूचा पाठिंबा मिळविण्याकरिता आवश्यक असणारा कौशल्यपूर्ण अभिनय रोझाने चोखपणे केला होता. त्यानंतर मार्टिनने एका शेतकऱ्याला गाठले व त्याच्या संमतीने त्याच्या गाडीत पेंढ्याच्या ढिगाऱ्याखाली रोझाला लपविण्यात आले. साध्या शेतकऱ्याचा कोणालाही संशय न आल्यामुळे रोझा सुखरूपपणे पोलंडची सरहद्द ओलांडू शकली.

उच्च शिक्षण व मार्क्सवादाचा प्रभाव

१८८९ च्या अखेरीस रोझा झुरिचला (स्वित्झर्लंड) पोहोचली. झुरिच विद्यापीठात नाव नोंदवून ती गणित व निसर्ग शास्त्रांतर्गत विषयांचा अभ्यास करू लागली. लवकरच तिने कायदा या विषयात प्रभुत्व मिळविण्याचे ठरविले. त्यानंतर ती राज्यशास्त्र या विषयाकडे वळली. १८९७ मध्ये तिने 'पोलंडचा औद्योगिक विकास' या विषयावर प्रबंध लिहून पीएच. डी. संपादन केली. झुरिचमधील नऊ वर्षांच्या वास्तव्यात ती केवळ उच्च शिक्षण घेण्यात मग्न राहिली नाही. झुरिच हे त्या काळी, विविध क्रांतिकारकांना - विशेषत: रशियन क्रांतिकारकांना - देशांतर करून घेऊन राहण्यास मुभा देणारे एक महत्त्वाचे केंद्र होते. हे स्थलांतरित कार्यकर्ते आणि विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनी आपापल्या देशात स्वातंत्र्य व समता स्थापन करण्याच्या ध्येयवादाने झपाटलेले होते. ते स्वतंत्र वसाहतीत एकत्र राहत असत. स्त्री-पुरुष समता कटाक्षाने पाळली जात असे. एकमेकांशी संबंध ठेवण्यात स्वैराचारविरहित मोकळेपणा होता, किंबुहना कठोर नैतिक शिस्त पाळण्याची प्रवृत्ती होती, असेसुद्धा म्हणता येईल. चर्चेच्या विषयांना मर्यादा नव्हती. तत्त्वज्ञान, विज्ञान, आर्थिक समस्या, राजकीय दहशतवादाची फलनिष्पत्ती, लोकशाही समाजवादी आंदोलनातील यशापयश, रशियन वर्चस्वापासून पोलंडचे स्वातंत्र्य, टॉलस्टॉय, एमिल झोला यांच्यासारख्या अनेक नामांकित लेखकांचं वाङ्मय व त्यांच्या निर्मितीची सामाजिक-राजकीय पार्श्वभूमी, स्त्री-मुक्तीचा आशय या व अशा अनेक विषयांवर तावातावाने वाद झडत असत. दारूच्या धुंदीत कोणीही नसे, भरपूर चहा आणि सिगरेट यांपासून मात्र फारसे कोणी अलिप्त नव्हते. यांच्यातील कित्येक जणांनी पुढे तुरुंगातील यमयातना सोसल्या आणि लादण्यात आलेला मृत्यू हसतमुखाने स्वीकारला.

प्लेखानॉव हा प्रसिद्ध रशियन विचारवंत-क्रांतिकारक आणि ॲक्सेलरॉड हा रशियन समाजवादी पक्षाचा एक नेता हे ज्या वेळी झुरिचला होते त्यांच्या संपर्कात आल्यावर रोझाने मार्क्सवादी विचारप्रणालीचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला. क्रांतिकारकांच्या आपापसातील स्पर्धा, गटबाजी, हेवेदावे यापैकी कशातही स्वत:ला

गुंतवून न घेता, विषमताविरोधी संघर्षासाठी योजण्यात आलेल्या उपक्रमात ती न थकता सामील होऊ लागली. अपंगत्वामुळे थोडे लंगडत चालावे लागत असे. पण घेतलेल्या जबाबदाऱ्या निर्वेधपणे पार पाडण्याचा दृढनिश्चय तिने कधी ढळू दिला नाही. पोलंडमधील राजकीय प्रक्रियेत तिने आस्थेने लक्ष घातले. १८९२ साली पोलिश समाजवादी पक्षाच्या स्थापनेत तिने इतर सहकाऱ्यांबरोबर पुढाकार घेतला.

लिओ जॉगिचिस् : १५ वर्षे अविवाहित पती, आजन्म प्रियकर

रोझा झुरिचला आल्यापासून सुमारे वर्षभरातच तिचे जीवन समृद्ध करणारी एक घटना म्हणजे तिचा लिओ जॉगिचिस् या एका ज्यूधर्मीय युवकाशी झालेला घनिष्ठ परिचय. पोलंडप्रमाणेच रशियाचा अविभाज्य घटक असलेला लिथुएनिया या प्रदेशातून हा उमदा, बुद्धिमान, जहाल प्रवृत्तीचा राजकीय कार्यकर्ता १८९० मध्ये भूमिगत राहून कार्य करण्यासाठी झुरिचला आला. श्रीमंत घराण्यात वाढलेल्या लिओला शालेय जीवनात असतानाच राजकीय कार्य करावेसे वाटू लागले म्हणून त्याने शिक्षण अर्धवट सोडून दिले; लिथुएनियात कामगारवर्गाचे आंदोलन पहिल्याप्रथम उभारून, त्याला क्रांतिकारक वळण देण्याचे श्रेय त्याच्याकडे जाते. भूमिगत कार्य करण्यात तरबेज असणारा, काटेकोर शिस्त पाळणारा तो एक कर्तबगार संघटक तर होताच, पण अभ्यासू व वादविवादकुशल असल्यामुळे अनुयायांवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडत असे. १८८८ व ८९ मध्ये त्याला दोनदा अटक होऊन अल्प मुदतीची शिक्षा झाली. दर वेळच्या सुटकेनंतर त्याच्यावर पोलिसांची सक्त नजर असे, हे लक्षात आल्यावर त्याने देशांतर करावयाचे ठरविले. रोझाप्रमाणेच त्याने गाडीत लपून देशाची सरहद्द ओलांडली व तो झुरिचला पोहोचला. त्याचा प्रवास अधिक खडतर झाला याचे कारण पेंढ्याऐवजी त्याला मातीच्या ढिगाऱ्याखाली सरहद्द ओलांडीपर्यंत लपून राहावे लागले.

लिओ जॉगिचिस्च्या अंगी जसे गुण होते, त्याचप्रमाणे सतत आपले वर्चस्व सर्वांवर लादण्याचा प्रयत्न करणे हा दुर्गुणही होता. झुरिचला पोहोचल्यावर प्लेखानॉवशी विचारविनिमय करून दोघांच्या सहकार्याने एक राजकीय-वैचारिक नियतकालिक चालविण्याकरिता करारनामा करण्याचे लिओने ठरविले. प्रत्यक्षात मात्र सहकार्याने चालविण्याऐवजी नियतकालिक स्वत:च्या तंत्राने (मार्गदर्शनाने) चालविण्याचा अट्टाहास त्याने धरला. प्लेखानॉवसारख्या सर्व दृष्टीने ज्येष्ठ असलेल्या तत्त्वचिंतक नेत्याला ते मान्य करणे शक्यच नव्हते. म्हणून, तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार नियतकालिक सुरू करण्याची कल्पना बारगळली. त्याचबरोबर लिओने रशियन क्रांतीऐवजी पोलंडच्या स्वातंत्र्य लढ्यात लक्ष घालण्याचे ठरविले आणि त्याच वेळी त्याची रोझाशी ओळख झाली. लवकरच ओळखीचे रूपांतर दृढमैत्रीत झाले.

१५ वर्षांपर्यंत रोझा व लिओ औपचारिक विवाह न करता पति-पत्नी म्हणून

राहिले. परंतु लिओचा पदोपदी डोकावणारा वरचढपणा, त्याचा काहीसा रूक्ष स्वभाव, क्रांतिकार्यापुढे भावनात्मक सहजीवनाला प्रकर्षाने दुय्यम स्थान देण्याचा त्याचा मानसिक पिंड, अतीव मितभाषीपणे कामकाज करण्याची पद्धत हे सारे रोझाला फार काळ मानवण्यासारखे नव्हते. म्हणून १५ वर्षांनंतर एकत्र राहणे त्यांना जमले नाही. फारकत झाली तरी एकमेकांत कटुता येऊ न देण्याचे श्रेय दोघांकडे जाते अशी नोंद त्यांच्या समकालीन सहकाऱ्यांनी केली आहे. रोझाचे मोठेपण लिओ पूर्णतया जाणून होता. भावनिक जीवनात दुरावा निर्माण झाला असूनही, लिओने त्याचे तिच्याबद्दलचे असलेले मूल्यांकन बदलले नाही. कटाक्षाने प्रसिद्धीपराङ्मुख राहून रात्रंदिवस ध्येयधुंद राहणाऱ्या लिओबद्दलची आपुलकी रोझाच्या मनातही शेवटपर्यंत कायम राहिली. संप, लढे असोत अथवा सभा-मोर्चे-शिबिरे असोत लढ्यांच्या व्यूहरचनेबाबत, परिस्थितीच्या तात्त्विक आकलनाबाबत अधूनमधून मतभेद झाले ते हिरिरीने मांडले, तरी दोघांनी एकमेकांची राजकीय साथ कधी सोडली नाही.

राजकीय प्रशिक्षण आणि मतभेदांचा काळ

झुरिचमध्ये घालवलेली नऊ वर्षे हा केवळ तिच्या औपचारिक उच्च शिक्षणाचा काळ नव्हता तर राजकीय प्रशिक्षणाचे धडे गिरविण्याचाही तो काळ होता. पोलंड व रशियामध्ये चालू असलेल्या लढ्यांमध्ये अनेक तात्त्विक प्रश्न निर्माण झाले आणि त्यापैकी बहुतेक महत्त्वाच्या प्रश्नांवरील चर्चेत भाग घेऊन रोझाने आपली भूमिका मांडली. स्त्री-मुक्तीच्या लढ्याकरिता स्त्रियांना संघटित करून त्यात तिने अधिक लक्ष घालावे असे तिला सुचविण्यात आले पण ते तिने नाकारले. स्त्रिया या अन्य कोणत्या प्रश्नांत लक्ष घालण्यात आणि अभ्यासपूर्ण वैचारिक भूमिका मांडण्यात असमर्थ असतात, अशी एक अप्रत्यक्षपणे व्यक्त होणारी मानसिकता त्या सूचनेमागे होती - ती तिला अर्थातच मान्य नव्हती. म्हणून व्यापक लोकशाही व समाजसत्तावादाच्या सर्व लढ्यांत आपली स्वत:ची वैचारिक भूमिका मांडून पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होण्याचा, त्यात खस्ता सहन करण्याचा व धोके पत्करण्याचा निर्णय तिने घेतला. पक्षाच्या परिषदेत पोलंडचा इतिहास व तत्कालीन सामाजिक-आर्थिक परिस्थिती यावर तिने एक विस्तृत अहवाल सादर केला. वैयक्तिक दहशतवादाऐवजी जनतेच्या आधुनिक उठावावर भर देताना, कामगारांचे लढे हे केवळ आर्थिक मागण्यांपुरते मर्यादित ठेवता कामा नये हे तिने अधोरेखित केले. उदारमतवादी सुधारणावादावर भिस्त ठेवून भागणार नाही, समग्रलक्ष्यी दृष्टी ठेवून सत्तांतर घडवून आणले पाहिजे, हे अनेक व्याख्यानांमधून व लेखांमधून तिने दमदार शैलीत मांडले. यातील बरेच विचार तत्कालीन दिग्गज नेत्यांच्या विचारांशी जुळणारे नव्हते. त्यांच्या दबावाखाली ती नमली नाही. पोलंडच्या स्वातंत्र्यलढ्याला तिने विरोध केला याचे कारण तो लढा जर भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाला (तशीच लक्षणे त्या वेळेस

दिसत होती) तर मिळालेले स्वातंत्र्य हे शोषणयुक्त समाजातील मर्यादित स्वातंत्र्य असेल आणि म्हणून समाजसत्तावादाचे स्वप्न साकार करू शकणाऱ्यांनी अशा स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देऊ नये, असा तिचा आग्रह होता. इतिहासाचे टप्पे लोकांची व्यवस्थित तयारी केल्याशिवाय घिसाडघाईने ओलांडता येत नाहीत, लोकांच्या आकांक्षा लक्षात घेऊनच लढ्यांची व्यूहरचना करावी लागते अशी तितकीच आग्रही भूमिका लेनिनसारख्या तत्कालीन श्रेष्ठ नेत्याचीही होती. लेनिनशीसुद्धा तिने वाद चालूच ठेवला. वर उल्लेखलेल्या पक्ष-परिषदेतील अहवालानंतर रोझाने पोलंडचा प्रदीर्घ इतिहास लिहिण्याचे ठरविले. पहिल्या महायुद्धाच्या वेळी तुरूंगात असताना तिने तो लिहून पुरा केला. पण आंदोलनांच्या रणधुमाळीत ते हस्तलिखित कोठे हरवले ते कोणालाच सांगता आले नाही, असे तिच्या चरित्रकारांनी खेदयुक्तपणे नोंदविले आहे. त्यातील काही पाने फक्त शिल्लक आहेत.

औपचारिक पत्नी अल्पावधीपुरती!

या सगळ्या वादांमधून बाहेर पडून, मोठ्या चळवळीत सामील व्हावे असे या सुमारास म्हणजे १८९७ च्या सुमारास रोझाला वाटू लागले होते. जर्मनीमध्ये मोठी खळबळ त्या वेळेस चालू होती. रोझाने जर्मनीला जाण्याचे ठरविले. ती जर्मन नागरिक नसल्यामुळे तिथे तिला कार्याला अवसर मिळणार नाही, पोलीस तिला हद्दपार करतील ही धास्ती होतीच. परंतु एकदा ध्येय ठरले की मार्ग शोधून काढावयाचाच अशी तिची खंबीर वृत्ती होती. तिने एका जर्मन नागरिकाशी तात्पुरता विवाह करून जर्मन नागरिकत्व स्वीकारण्याचा निर्णय घेतला! तिच्या एका ओळखीच्या जर्मन गृहस्थाच्या मुलाशी लग्न करण्याची मागणी तिने सादर केली. १८९७ च्या एप्रिलमध्ये जर्मनीत येऊन नोंदणी कार्यालयात जाऊन तिने गुस्ताव न्यूबेकशी नोंदणी लग्न नोंदविले आणि त्याबरोबर नागरिकत्व प्राप्त करून घेण्यास ती पात्र ठरली. नोंदणी कार्यालयातून बाहेर आल्याबरोबर दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला! पाच वर्षांनंतर दोघांनी घटस्फोट घेतला, तोपर्यंत नागरिकत्व मिळालेले होतेच! जर्मनीत आल्यावर ती ज्यू आहे असे कळल्यावर तिला घर मिळणे किती मुश्किलीचे गेले याचे विनोदी वर्णन तिने एका पत्रात केले आहे. १८९८ साली ती बर्लिनला राहू लागली, तेव्हा तिच्या बरोबरीने कार्य करण्याकरिता तिचा जीवनसाथी लिओ जॉगिचिस्सुद्धा बर्लिनमध्ये येऊन धडकला.

जर्मनीतील संघर्षमय जीवन

सोशल डेमोक्रॅटिक पार्टी हा त्या वेळी जर्मनीतील सर्वात बलाढ्य पक्ष होता. रोझाचे वादविवाद आता या पक्षाच्या मातब्बर नेत्यांशी व विचारवंतांशी सुरू झाले. अल्पकाळ ती पॅरिसमध्ये राहण्यास गेली होती ते वगळता, सुमारे बावीस वर्षे ती जर्मनीत राहिली. मुळात ती पोलिश असली तरी तिची स्मृती जर्मन म्हणून जतन

करण्यात आलेली आहे. मुख्यत: याच कालावधीत तिने लिखाण केलेले आहे. Accumulation of Capital हा तिचा अभ्यासपूर्ण विवाद्य ग्रंथ व काही पुस्तिका वगळता तिचे उपलब्ध लेख जवळजवळ सातशे आहेत.

जर्मनी देश व एकूण जर्मन लोक (सरकारी वगळून) रोझाला कधी फारसे आवडले नाहीत. पारंपरिक मूल्यांचा पगडा जर्मन मनावर फार होता. स्त्री म्हणून, परदेशी म्हणून, ज्यू म्हणून, 'भांडखोर' म्हणून तिला नेहमी दुय्यम स्थान देण्यात येत असे. तिची विद्वत्ता मनात किंतू बाळगूनच स्वीकारली जात असे. जर्मन लोकशाही समाजवादी पक्षानेसुद्धा, तिने स्त्री-संघटनेत लक्ष घालावे असे तिला सुचविले. सतत वाद घेणाऱ्या या महिलेला स्त्री-संघटनेच्या कार्यात अडकवून ठेवले म्हणजे आपल्याशी बरोबरीच्या नात्याने ती वाद घेणार नाही असा एक प्रकारचा आपमतलबीपणा पक्षनेत्यांच्या मनात होता. रोझाने, तिच्या स्वभावाला अनुसरून नेत्यांची सूचना स्वीकारली नाही. या संपूर्ण कालावधीत वैचारिक संघर्ष करताना तिला पुष्कळ मानसिक ताण सहन करावा लागला. याचे कारण तिच्यावर केवळ समाजसत्तावादविरोधी प्रतिगामी सत्ताधारी व त्यांच्या वैचारिक मुखंडांनी प्रखर हल्ला चढविला असे नाही, तर एरवी स्वत:ला समाजवादी म्हणविणाऱ्यांनीही तिच्यावर वैचारिक तोफा डागल्या. तिच्या काही वैचारिक विश्लेषणाविषयी व निष्कर्षांविषयी मतभेद असूनही, लेनिन हा त्या काळातील रशियन क्रांतीचा एकमेव श्रेष्ठ नेता असा होता की, ज्याने रोझाची समाजकारणवादावरील अस्सल निष्ठा ओळखली होती आणि तिचा वैचारिक पल्ला तो जाणून होता, म्हणूनच तिच्या विरोधकांना त्याने एकदा खडसावून बजावले होते की, ''गरूडाची भरारी कधी थोडी खालावली तरी परसातील कोंबड्यांनी कलकलाट करण्याचे कारण नाही.''

रोझाचे राजकीय विचार

पक्षांतर्गत व समाजात लोकशाही कसोशीने पाळली गेली पाहिजे यावर तिने आग्रहपूर्ण भर दिला. इतर अनेक समाजवाद्यांनी रशियन (बोल्शेविक) क्रांतीला विरोध केला, तसा तिने केला नाही. मानव समाजाच्या प्रगतीतील तो एक महत्त्वाचा टप्पा आहे असे तिने आवर्जून सांगितले परंतु लेनिनच्या पक्षशिस्तीविषयीच्या विचारधारेची (डेमोक्रॅटिक सेंट्रॅलिझम्) तिला धास्ती वाटत असे. पक्षांतर्गत लोकशाहीचा संकोच त्यामुळे होईल असे तिला वाटत असे.

जर्मन व युरोपमधील अन्य कामगारांचा पाठिंबा असल्याखेरीज रशियन क्रांती यशस्वी होणार नाही असे तिला वाटत असे. ट्रॉट्स्की या रशियन क्रांतीच्या एका प्रभावी नेत्यालासुद्धा हे मान्य होते. परंतु लेनिनचा आत्मविश्वास अधिक प्रभावी ठरला आणि सर्व विरोधांना तोंड देऊन रशियन क्रांती पुढील सुमारे सत्तर वर्षे टिकली.

रोझाचा अधिक विश्वास जनतेच्या उत्स्फूर्त उठावांवर होता. परिस्थिती परिपक्व झाली, म्हणजे लोकांच्यात विद्रोह निर्माण होतो, त्यांना फक्त परिस्थितीचे सम्यक

विश्लेषण करून मार्गदर्शन करावे लागते अशी रोझाची ठाम समजूत होती. आंदोलनाच्या अग्रभागी सुसंघटित, शिस्तबद्ध पक्ष असावा लागतो. त्याने जर तात्कालिक व दूरगामी पल्ल्याची धोरणे आखली नाहीत तर अराजक निर्माण होऊन, क्रांतीचा पराभव होतो हे पक्षात काम करीत असूनही रोझाला मनापासून कधी पटले नाही.

पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा रोझाने त्याला कसून विरोध केला. परंतु समाजवाद्यांनी (सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने) धरसोड करीत, शेवटी युद्धाला व जर्मनीच्या सहभागाला पाठिंबा दिला तेव्हा रोझाने त्यांच्यावर जबरदस्त हल्ला चढविला. त्या पक्षाबरोबर फारकत घेऊन तिने आपल्या सहकाऱ्यांबरोबर स्पार्टाकिस लीग हा पक्ष स्थापन केला. हा पक्षच पुढे जर्मनीचा कम्युनिस्ट पक्ष म्हणून मान्यता पावला.

वर्गशत्रूने लादलेल्या हिंसक हल्ल्यांना तितक्याच शस्त्रसज्ज तयारीने सामोरे जावे लागते हे रोझाला मान्य होते, तरीपण रशियन क्रांतीच्या वेळी झालेल्या अतिरिक्त हिंसेविषयी तिने चिंता व्यक्त केली होती.

रोझाचे बलिदान

पहिल्या महायुद्धातील पराभवानंतर जर्मनीची स्थिती अतिशय बिकट झाली होती. आधीची कामगार चळवळ कोलमडून पडली होती. प्रतिगाम्यांच्या हातात सत्ता गेली. आर्थिक परिस्थिती फारच खालावली होती. उद्रेक व्यक्त होत होता. डाव्या चळवळीत निवडणुकांच्या मार्गाने सत्तांतर घडवून आणावे की होऊ घातलेल्या निवडणुकांवर व त्यातून निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय संसदेवर बहिष्कार टाकावा यावर तीव्र मतभेद होते. बहुमत प्रथम बहिष्कारवाद्यांच्या बाजूने होते. परंतु रोझाचे प्रभावी भाषण आणि लिओ जॉगचिस्‌चे संघटनात्मक कौशल्य यातून आक्रस्ताळेपणाने पावले उचलू नयेत, संसदेतला लढा आणि रस्त्यावरचा लढा बरोबरीने चालू ठेवावा या रोझा-लिओच्या मांडणीला पाठिंबा मिळू लागला. त्याबरोबर सत्ताधाऱ्यांनी 'स्पार्टाकिस लीग' आणि त्यांच्या नेत्यांना नेस्तनाबूत करण्याचा निर्णय घेतला.

जर्मन राष्ट्राध्यक्ष ईबर्ट यांनी सैन्याधिकाऱ्यांशी बोलणी करून 'स्पार्टाकिस लीग'वर हल्ला चढविण्याचा हुकुम २९ डिसेंबर १९१९ रोजी दिला. या पक्षाच्या परिषदेचे उद्‌घाटन त्या दिवशी होणार होते. या सैन्यदलात अनुभवी निवृत्त सैन्याधिकाऱ्यांचा भरणा करण्यात आला होता. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या रोझाला असलेला विरोध लक्षात घेऊन, त्यांना तिच्याविरुद्ध रान उठविण्याला उत्तेजन देण्यात आले होते. ती कामगिरी खोटेनाटे आरोप करून त्यांनी चोखपणे पार पाडली. लायबनेक्ट, कार्ल राडेक अशा नेत्यांचा अंत करण्याकरिता मोठमोठ्या रकमांची बक्षिसे ॲण्टी बोल्शेविक लीगसारख्या संघटना, काही भांडवलदार व खुद्द सरकारने जाहीर केली.

बर्लिनमध्ये त्या सुमारास स्फोटक स्थिती निर्माण झाली होती. काहींना काहीतरी रास्त निमित्त शोधून वेगवेगळ्या नेत्यांचे ऐकून लोक रस्त्यावर येऊन प्रखर निदर्शने

करीत होते, लढत होते. रोझा या लढ्यात सामील झाली आणि तिने एक ज्वलंत आवाहन केले. ''प्रतिगाम्यांना नि:शस्त्र करा, लोकांना सशस्त्र करा. महत्त्वाची सत्तास्थाने काबीज करू, क्रांतीची वेळ जवळ आली आहे. तत्परतेने कार्य करावयास उतरा!'' खरे पाहता रोझा वर्षानुवर्षांच्या लढ्याने थकली होती. एकदम बेशुद्ध पडण्याचे प्रमाण वाढू लागले. डॉक्टरांचा सल्ला घेणे, थोडी विश्रांती घेणे या सर्व सूचना तिने साफ धुडकावून लावल्या.

रोझा संपादक असलेल्या एका दैनिकाच्या कचेरीवर प्रतिगामी सैन्यदलांनी हल्ला चढविला. सैनिकांची अधिक कुमक आल्यावर सर्व जण कचेरीच्या बाहेर पडले. रोझा सैनिकांसमोर उभी राहिली. बेकारीमुळे ते सैन्यात दाखल झाले असतील, पण त्यांचे हित कामगारांशी द्रोह करण्यात नाही असे आवाहन तिने त्या सैनिकांना केले. सहकाऱ्यांनी तिला अक्षरश: खेचून दूर केले. धोका हा शब्द तिच्या शब्दकोशातच नव्हता. तिला एका डॉक्टरांच्या घरात काही काळ लपवून ठेवण्यात आले. मुख्य नेत्यांनी काही काळ बर्लिन सोडून जावे असा निरोप लिओनं त्याला अटक झाल्याबरोबर पाठविला. लोक संघर्षात उतरलेले असताना बर्लिन न सोडण्याचा निर्णय तिने कळविला. एकामागून एक घरे बदलत ती बर्लिनमध्येच राहिली. बर्लिनच्या नैऋत्येला असलेल्या एका शहरात ती राहावयास गेली. आता तिला पकडून देण्याकरिताही मोठे बक्षीस (एक लाख मार्क्स) जाहीर करण्यात आले.

१५ जानेवारी १९१९ चा दिवस उजाडला. रात्री नऊच्या सुमारास सैन्यदलाने लायबनेक्ट, रोझा आणि विल्हेम पाईक यांना अटक केली. लायबनेक्ट व रोझाने प्रथम आपली नावे लपविली. परंतु लायबनेक्टच्या हेरगिरी करणाऱ्या एका मित्राने दोघांची खरी नावे सांगितली. बंदुकीच्या दस्त्याने लायबनेक्टच्या डोक्यावर घाव घालण्यात आले. त्याने जखम बांधावयास बँडेज मागितले. ते नाकारण्यात आले. रोझाला सैन्यदलाच्या कचेरीत नेऊन तिच्यावर अपशब्दांचा भडिमार करण्यात आला. त्यानंतर बंदुकीच्या दस्त्याने तिच्याही मेंदूवर दोन घाव घालण्यात आले आणि ती बेशुद्धावस्थेत असताना तिला मोटारीत घालून बाहेर नेऊन गोळ्या मारण्यात आल्या आणि तिचे शव एका नाल्यात फेकून देण्यात आले. खून जानेवारीत झाला. तिच्या शवाचा शोध मे महिन्यात लागला! लायबनेक्टलाही गोळ्या मारून अनोळखी इसमाचे प्रेत असे सांगून एका स्मशानात भिरकावून देण्यात आले. लिओ जॉगिचिस्चा खूनही तितक्याच निर्घृणपणे १० मार्च १९१९ रोजी केला गेला.

आपल्या ध्येयाकरिता प्राण पणाला लावणारी ही अद्वितीय महिला! 'गाऊ त्यांना आरती' असे नुसते म्हणून भागेल का?

टीप : रोझा लक्झेंबर्गच्या जीवनकार्याचा विस्तृत तपशील J.P. Nettl याने लिहिलेल्या द्विखंडात्मक चरित्रात आहे. तिच्या जीवनावर १९८६ साली एक चित्रपट

निघाला आहे, दिग्दर्शक - मागरिटा व्हॉन ट्रॉटा. रोझाचे अस्सल व्यक्तिमत्त्व या चित्रपटातून व्यक्त होत नाही, असे भाष्य स्त्रीवाद्यांनी या चित्रपटावर नोंदविले आहे.

(मिळून साऱ्याजणी, दिवाळी २००४)

❑

प्रा. वांगारा माथाई
नोबेल शांतता पुरस्कार विजेती २००४

गौरव उद्‌गार

''शांतता व सुयोग्य जीवनमानाच्या प्रस्थापनेसाठी कार्यरत असणाऱ्या आफ्रिका खंडातील ज्या सर्वोत्तम शक्ती आहेत त्यांचा मथाई हा एक बुलंद आवाज आहे. शाश्वत विकास लोकशाही आणि शांतता यासाठी झगडणाऱ्या आफ्रिका जनतेचा ती एक स्फूर्तीस्रोत आहे.''

नोबेल शांतता पुरस्कार देणाऱ्या पाच सदस्य (तीन महिला दोन पुरुष) समितीने, या पुरस्कारास पात्र ठरलेल्या आफ्रिका खंडातील या पहिल्या महिलेचा, डिसेंबर २००४ मध्ये १० लाख ३६ हजार डॉलर्स, सुवर्णपदक व मानपत्र देताना वरील शब्दांत गौरव केलेला आहे.

कालसापेक्ष निर्णय

कोणतीही संस्था, शासनयंत्रणा अथवा व्यक्ती महत्त्वपूर्ण समस्यांचे बाबतीत कालसापेक्ष असा निर्णय घेत असेल तरच तिच्यात जिवंतपणा राहतो आणि तत्कालीन सामाजिक गरजेची परिपूर्ती अशा निर्णयातून होत असते.

१८९६ मध्ये, आपल्या मृत्यूपत्रान्वये पुरस्कार प्रस्थापित करणाऱ्या स्वीडनमधील धनाढ्य कारखानदार आल्फ्रेड नोबेल याने, शांतता पुरस्कार कोणाला देण्यात यावा याबद्दल आपली शिफारस पुढील शब्दात व्यक्त केली होती :

''राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये बंधुभाव प्रस्थापित करणे, खडे सैन्य संपुष्टात आणणे अथवा त्याची संख्या कमी करणे आणि जागतिक शांतता प्रस्थापनेच्या मोहिमेसाठी परिषदा भरविणे, यासाठी ज्याने सर्वांत अधिक व सर्वोत्तम कार्य केले असेल, अशा व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात यावा.''

परंतु नोबेल पुरस्कार समितीने आल्फ्रेड नोबेल यांच्या मृत्युपत्रातील परिच्छेदाचा शब्दशः अर्थ लावला नाही. नैसर्गिक संपत्तीचा कब्जा मिळविण्यासाठी (लाकूड, पाणी, तेल अन्य खनिज पदार्थ) जी युद्धे होत असतात. त्याविरुद्ध अथक कार्य करणारी,

पर्यावरण रक्षण हा कळीचा प्रश्न मानून, त्याचे जतन-संवर्धन करण्यासाठी संघटित प्रयत्न सातत्याने करणारी, आवश्यक तेथे संघर्ष करणारी व्यक्ती अगर संस्था या पुरस्कारास पात्र ठरू शकते, असा निर्णय गेल्यावर्षी घेण्यात आला. त्याचप्रमाणे मानवी हक्कांसाठी झगडणाऱ्या व्यक्ती अगर संस्थांचा असाच सन्मान करण्यात यावा, असा निर्णय त्याच्या आधीच्या वर्षी म्हणजे २००३ मध्ये घेण्यात आला. म्हणूनच अनेक स्पर्धकांना बाजूला सारून गेल्या दोन वर्षात, इराणची ॲडव्होकेट शिरीन इबादी आणि केनियाची प्रा. वांगारा माथाई या दोन महिलांना जगात सर्वश्रेष्ठ मानण्यात येत असलेला पुरस्कार देता येणे शक्य झाले.

माथाईला पुरस्कार मिळाला त्यावर्षी (२००४ मध्ये) १९४ स्पर्धकांचे नामांकन करण्यात आले होते. इराक व पॅलेस्टाईन या दोन प्रदेशात लवकर संपुष्टात येण्याची चिन्हे दिसत नसलेले घनघोर संग्राम चालू होते. तेथे शांतता प्रस्थापनेसाठी कोणीतरी कार्य करणाऱ्या प्रकाशाच्या झोतात नसणाऱ्या व्यक्ती-संस्था असतील आणि ते नोबेल शांतता पुरस्काराचे मानकरी ठरतील, असा कयास बांधण्यात आला होता; परंतु याकरिता भरीव कार्य करणारे, पुरस्कारासाठी निवड करणाऱ्या समितीला कोणीही आढळले नाही. आण्विक घटकांच्या प्रसाराविरुद्ध कार्यरत असणारे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा कार्यालय व त्याचे संचालक महंमद एलूबारादेई यांच्या नावाला अनुक्रम मिळण्याची शक्यता होती. पूर्वीच्या सोवियत् युनियन (आत्ताचा रशिया) मधील आण्विक शस्त्रास्त्रांच्या राशी नष्ट करणे अथवा बहुतांशी नियंत्रित करणे याकरिता अनेक उपक्रम अमेरिकेतील लोकसभेचे (सेनेटचे) दोन सभासद सॅमनुन आणि रिचर्ड लुगर हे गेली काही वर्षे सुचवीत आले आहेत. त्यांच्या नावांचा पुरस्कारासाठी प्रामुख्याने विचार होईल, असा अंदाजही बांधण्यात आला होता. नोबेल पुरस्कार समितीने या सर्व अंदाजांकडे पाठ फिरविली. त्यांचे लक्ष गेले ते आफ्रिका खंडातील केनिया नावाच्या एका लहान देशात सुमारे २५ वर्षांच्या कालावधीत हजारो महिलांना संघटित करून, ३ कोटी झाडे लावून, पर्यावरणाचे रक्षण करण्याची किमया करून दाखविणाऱ्या वांगारा माथाईकडे.

केनियाकडे लक्ष जाण्याची पार्श्वभूमी

१३ प्रमुख आदिवासी जमातींचे वास्तव्य असलेल्या केनियाची, सन २००० मध्ये जागतिक राष्ट्र संघटनेने अंदाज व्यक्त केलेली लोकसंख्या सुमारे ३ कोटी ३४ लक्ष होती. १८९५ पासून १९६२ पर्यंत हा देशही एक ब्रिटिश वर्चस्वाखालील वसाहत होती. वसाहत हा दर्जा जरी संपुष्टात आला तरी १९९७ पर्यंत तेथे लोकशाही रूजली नाही. राष्ट्राध्यक्ष व प्रमुख नेता जोमो केन्याटा यांच्या १९७८ मध्ये झालेल्या मृत्यूनंतर लवकरच उपराष्ट्राध्यक्ष डॅनिअल टी. आरप मोई याने सत्ता हस्तगत केली. त्याच्या २४ वर्षांच्या जुलमी राजवटीखाली केनियातील लोक भरडले गेले. वासाहतिक

वारसा निपटून टाकण्यात तर नाहीच; पण त्याचे ओझे हलके करण्यात सुद्धा सत्ताधाऱ्यांना यश आले नाही.

भ्रष्टाचार व दारिद्र्यग्रस्त असलेल्या या देशात 'एड्स' ही दुर्धर व्याधी फैलावते आहे. नदीच्या पाणी वाटपावरून दोन जमातीत युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत आहे. तणाव अजूनही धगधगतो आहे. शासकीय कारभारातील अंदाधुंदी लक्षणीय आहे. थाटाच्या इमारती अथवा आधुनिक कारखाने बांधण्याकरिता जंगलतोड प्रचंड प्रमाणावर झाली आहे. दर १०० झाडे तोडली जातात त्याच्या मागे फक्त ९ झाडांसाठी बीजारोपण केले जाते, असे १९८९ मध्ये जागतिक राष्ट्र संघटनेने केलेल्या पाहणीत आढळून आले होते. जमिनीची धूप, पाण्याचे प्रदूषण, वाळवंटीकरण, जनावरांसाठी पाला-पाचोळा-गवताचा तुटवडा, सरपणासाठी करावी लागणारी लांब-लांब अंतरांची पायपीट हे सर्व दुष्परिणाम जंगलतोडीमुळे लोकांना भोगावे लागत आहेत.

जागतिक पातळीवर पर्यावरण

जागतिक पातळीवरील आकडेवारीकडे नजर टाकल्यास भेडसावून टाकणारे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. गेल्या सुमारे ५५ वर्षांत लागवडीकरिता योग्य जमिनीची जगात २५ टक्के इतकी घट झाली आहे. २०५० मध्ये जगाची लोकसंख्या सुमारे ९ अब्ज होईल, असा अंदाज तज्ज्ञांनी मांडला आहे. आज ५० देशातील १ अब्ज लोकांना दररोज पाण्याचा तीव्र तुटवडा जाणवतो आहे. २०२५ सालापर्यंत जगातील दोन तृतीयांश लोकांना कमी-अधिक पाणी तुटवड्याच्या समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. १९८० ते १९९५ या १५ वर्षांच्या कालावधीत विकसनशील देशात १८ कोटी हेक्टर जमिनीवरील जंगल नष्ट झाले आहे. १९५० ते १९८७ या ३७ वर्षांत ४ कोटी ३० लाख हेक्टर जमिनीचे वाळवंटीकरण झाले आहे. १९९७ मध्ये इंडोनेशिया या देशातील शेतजमिनीवरची पिके, बहुराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्यांनी स्वतःच्या विस्तारासाठी जाळून टाकली. त्यातून जंगलात आग पसरली. आगीच्या धुरामुळे जायबंदी, रोगग्रस्त व मरण पावलेल्या देशवासीयांची लोकसंख्या सुमारे २ कोटीच्या आसपास होती. वरील सर्व आकडेवारी २००० सालच्या वसुंधरा शिखर परिषदेत सादर करण्यात आली.

या संकटांना तोंड देण्याकरिता आफ्रिका-आशिया खंडातील लोक युरोपकडे स्थलांतर करावयास लागतील, याची धास्ती युरोपमधील सत्ताधाऱ्यांना सतत वाटते. पर्यावरणाचे रक्षण करण्यात अहोरात्र मग्न असणाऱ्या वांगारा माथाईबद्दलची आपुलकी अंशत: तरी या धास्तीतूनच निर्माण झाली आहे. युरोपियन राष्ट्रांच्या आपमतलबीपणाकडे दुर्लक्ष करणे रास्त ठरणार नसले तरी वांगाराच्या कार्याचे मोल फार मोठे आहे, यात शंका नाही.

मामा-सिटी-स्वहिली भाषा : वृक्षमाता जीवन कार्य

केनियातील महिलांचे सरासरी वयोमान ५३ आहे. गेली ३० वर्षे पायाला भिंगरी लावल्यासारखे कार्य करीत असूनही वांगारा माथाईने १ एप्रिल २००४ रोजी ६४ या वयाचा टप्पा गाठला आहे. निएरी या लहानशा खेड्यात किकूयू जमातीतील कनिष्ठ मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात तिचा जन्म झाला. टेकडीवर पळत जाऊन घरगुती वापरासाठी लागणारं पाणी व सरपण आणण्याची जबाबदारी तिला बालवयातच स्वीकारावी लागली. लहानपणापासून शिक्षणाची गोडी असल्यामुळे याबाबत तिची हेळसांड झाली नाही. अमेरिकेतील कॅनसस व पिटस्बर्ग येथे सहा वर्षे राहून जीवशास्त्र या विषयात तिने पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण पुरे केले. पुढील अभ्यास जर्मनीत व केनियाची राजधानी नैरोबी येथे करून १९७१ मध्ये तिने नैरोबी विद्यापीठातून पीएच. डी. ही पदवी संपादन केली. पूर्व व मध्य आफ्रिकेमध्ये पीएच. डी. पदवी संपादन करणारी ती पहिली महिला आहे. त्यानंतर त्याच विद्यापीठात ती पशू-शरीरशास्त्र हा विषय शिकवू लागली. त्याच विषयाच्या विद्या शाखेत ती प्रथम प्रमुख व त्यानंतर उपप्राध्यापिकाही (असोसिएट प्रोफेसर) झाली. इतक्या उच्च पदावर पोहोचणारीसुद्धा ती पहिलीच महिला होती. प्राध्यापिका म्हणून काम करीत असतानाच केनियातील 'नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन'च्या कार्यात १९७६ पासून ती लक्ष घालू लागली आणि १९८१-८७ या कालावधीत त्या संघटनेचे अध्यक्षपदही तिने भूषविले. या संघटनेत कार्य करू लागण्याच्याही आधी १९७० मध्ये, तिचा राजकारणात भाग घेणारा पती लोकसभेच्या निवडणुकीला उभा होता. त्या वेळेस मतदारसंघात हिंडून गरिबांसाठी कार्य करण्यास तिने प्रारंभ केलेला होता. हे सर्व कार्य करीत असतानाच तिला जशी देशबांधवांची गरिबी दिसली. तशीच जंगलतोडीमुळे उजाड होत चाललेली जमीनही तिला दिसली. पाणी व सरपणासाठी स्त्रियांना करावी लागणारी वणवण तिच्या नजरेतून सुटणे शक्यच नव्हते.

एकीकडे स्त्रियांना वृक्ष लावण्यासाठी संघटित करीत असताना दुसरीकडे राष्ट्राध्यक्ष मोईच्या जुलमी राजवटीविरुद्ध राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठी चालू असलेल्या संघर्षात ती सहभागी झाली. तुरुंगवास, लाठीमार, हक्क प्रस्थापनेसाठी करावा लागणारा उपवास यापैकी कोणत्याही हालअपेष्टांमुळे ती खचली नाही, राजधानी नैरोबी येथील एका उद्यानाजवळ तिने स्वातंत्र्य (आंदोलने) कोपरा स्थापन केला आणि शेकडो महिलांना या आंदोलनात सामील होण्यास प्रोत्साहन दिले.

वृक्षारोपणासाठी १९७७ मध्ये तिने सुरू केलेल्या मोहिमेला 'दी ग्रीन बेल्ट मूव्हमेंट' असे नाव देण्यात आले आहे. बियांचा संग्रह करणे, योग्य ऋतुत त्या वापरणे, विहिरी खोदणे, स्त्रियांस शिक्षण घेण्यास व आरोग्य रक्षण करण्यास प्रवृत्त करणे, कुपोषणापासून बालकांना व स्त्रियांना वाचविणे, एवढ्यापुरती ही मोहीम मर्यादित नाही. मानवी जीवनाविषयी समग्रदृष्टी ठेवून चिरस्थायी विकास साधणारे ते एक तरल

अमूर्त पातळीवरील स्वप्नरंजन नसून आजच्या काळात अपरिहार्य ठरलेले ते एक सुसाध्य ध्येय आहे. एवढंच नव्हे तर त्या ध्येयसिद्धीसाठी तो एक विनातडजोड करावा लागणारा जबरदस्त संघर्ष आहे.

आपली मोहीम व संघर्ष सामान्य अशिक्षित महिलांना समजावून सांगण्याकरिता तिने धर्माधिष्ठित मिथ्य कथेचा उपयोग केला. बायबल या धर्मग्रंथानुसार परमेश्वराने सोमवार ते शुक्रवार या दरम्यान पृथ्वी या ग्रहाची निर्मिती केली. त्यानंतर शनिवारी त्याने मानवाची निर्मिती केली. या कथेचा आधार घेऊन माथाई महिलांना म्हणाली, ''मानवाची निर्मिती जर मंगळवारी झाली असती तर बुधवारी त्याचा अंत झाला असता; कारण मानवाला जगण्याकरिता आवश्यक असणारा निसर्ग (पर्यावरण) तोपर्यंत निर्माण झाला नसता. म्हणून आपण निसर्ग वाचविला पाहिजे, तो समृद्ध केला पाहिजे. त्याशिवाय मनुष्य समाजाला जगता येणार नाही.''

माथाईने केवळ उपदेश केला असता, स्वत:ला संघर्षात झोकून दिले नसते तर सबंध केनियात सुमारे ५० हजार रोपवाटिका आणि ३ कोटी झाडे उभी राहिलीच नसती. स्वत:च्या घराच्या मागील अंगणात जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी (५ जून) ९ झाडे लावून तिने या मोहिमेला सुरूवात केली. केनियातील हजारो महिलांना (एका अंदाजाप्रमाणे ८० हजार महिलांना) वृक्ष लागवड प्रकल्पातून रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या, त्यांचे व त्यांच्या बालकांचे कुपोषण थांबविणाऱ्या, या पर्यावरण संरक्षण अग्रणीला 'वृक्षमाता' ही आपुलकी व्यक्त करणारी 'पदवी' महिलांनी स्वयंस्फूर्तपणे दिली आहे.

गाजलेले दोन संघर्ष

१९८० पासूनच्या दशकातील उत्तरार्धात, नैरोबीतील उहूरू नावाच्या सर्वात प्रमुख उद्यानाच्या मध्यभागी, ६० मजल्यांची व्यापार संकुलासहित एक टोलेजंग इमारत उभारण्याला सरकारने संमती दिली. या इमारतीच्या बांधणीला सुमारे २० कोटी डॉलर्स इतका खर्च अपेक्षित होता. स्वत: राष्ट्राध्यक्षांसकट अनेक देशी-विदेशी कंपन्यांचे हितसंबंध यात गुंतलेले होते. माथाई आपल्या अनुयायांबरोबर या इमारत उभारणीच्या विरोधात उभी राहिली. हीच रक्कम दारिद्र्य निवारणासाठी वापरणे संयुक्तिक ठरेल, अशी आग्रहपूर्ण मांडणी तिने केली.

विकासाच्या आड येणारी 'देशद्रोही' अशी तिची बदनामी राष्ट्राध्यक्षांनी तर केलीच, शिवाय लोकसभा व वृत्तपत्रांतून तिची असभ्यपणे नालस्ती करण्यात आली. तिच्या नोकरीवरून तिला २४ तासांची सूचना देऊन बडतर्फ करण्यात आले. घरावर पोलिसांची धाड पडली. अनेक महिलांची धरपकड झाली. मारहाण करण्यात आली तरी आंदोलन हटत नाहीसे पाहून परदेशी गुंतवणूकदारांनी या प्रकल्पातून आपले अंग काढून घेतले. उहूरू उद्यानातील आक्रमण रोखण्यात हे आंदोलन यशस्वी झाले.

सन २००० मध्ये काबारू जंगलात, जंगल तोडून इमारती बांधण्याकरिता बांधकाम व्यावसायिक जंगलात शिरले. पुन्हा महिला संघटित झाल्या. पोलिसांच्या लाठी हल्ल्यात डोक्याला जखम झाल्यामुळे माथाई बेशुद्ध पडली. रूग्णालयातील बिछान्यावरून तिने मानवी हक्कांसाठी झगडणाऱ्या 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल' या संस्थेला पत्र लिहिले. या संस्थेने आंदोलकांना मिळत असलेल्या बेकायदेशीर निर्घृण वागणुकीला जगभर प्रसिद्धी देण्याची व्यवस्था केली. जंगल शाबूत राहिले.

महिलांच्या अवहेलनेकडे लक्ष वेधण्याकरिता माथाईने एकदा विवस्त्र महिलांची एक मिरवणूकही काढली होती.

आज ग्रीन बेल्ट मूव्हमेंट चालू ठेवण्याकरिता आफ्रिकेतील विविध देशांत निदान चाळीस नेते निर्धाराने उभे राहिले आहेत.

सध्या केनिया सरकार पूर्वीपेक्षा वीस पटीने झाडे लावण्याच्या योजना अंमलात आणीत आहे. जंगलतोड गरिबांमुळे होत असते, हा आरोप माथाईने दमदारपणे संधी मिळेल त्या त्या वेळेस व त्या त्या ठिकाणी खोडून काढला आहे. लोकांना दारिद्र्यग्रस्त बनविणारे सरकार व धनाढ्य लोकच जंगलतोड होत असते त्याला जबाबदार आहेत. विषमतेचे बळी असणारे नव्हे तर त्यांना बळी देणारे गुन्हेगार आहेत, असे ती सर्वत्र ठासून सांगत असते. वृक्षमातेच्या कर्तबगारीची वार्ता तिला नोबेल पुरस्कार मिळण्यापूर्वीच सर्वत्र पसरू लागली होती. अमेरिका व जगातील अन्य विद्यापीठे व संस्थांकडून तिला व्याख्यानांकरिता अनेक निमंत्रणे मिळाली आहेत.

१९९५ मध्ये ती बीजिंग येथील चौथ्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेला हजर होती. त्या वेळेस तिची अमेरिकेतील एक मैत्रीण व कार्यकर्ती बेला ॲबझुग हिच्या सहकार्याने, स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराविरुद्ध एक हजार स्त्रियांचा मोर्चा संघटित करण्यामध्ये तिने पुढाकार घेतला होता. सर्व स्त्रियांनी काळा पोषाख घातला होता. केवळ कृष्णवर्णीय आहे म्हणून काळा पोषाख घालावयाचा नाही, असा निर्णय घेऊन तिने लखलखीत पिवळा पोषाख घालून सर्वांचे लक्ष वेधले होते.

राजकारणातही कर्तबगारी

अनेक स्वयंसेवी संस्था अथवा अपक्ष संघटना, राजकीय प्रक्रियेत सहभागी होणे, हे व्यर्थ मानीत असतात. आपली उद्दिष्टे साध्य करण्याकरिता राजकीय प्रक्रियेतही सहभागी होऊन आपला प्रभाव पाडणे इष्ट आहे, असे वांगारा माथाई मानीत असल्यामुळे १९९७ मध्ये अनेकांच्या आग्रहामुळे तिने राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचे ठरविले. त्याच्या आधी १९९२ मध्येही तिला आग्रह करण्यात आला होता, परंतु दुभंगलेल्या विरोधी पक्षांमध्ये एकजूट घडवून आणणे हे अधिक महत्त्वाचे, असे ठरवून तिने त्यात अधिक लक्ष घालण्याचा निर्णय घेतला. एकजूट घडवून आणण्यात तिला यश आले नाही. त्यामुळे जुलमी राजवट चालविणारे अध्यक्षपदाच्या निवडणुकीत

पुन्हा निवडून आले, १९९७ मध्ये केनियाच्या लिबरल पार्टीने अध्यक्षपदासाठी व लोकसभेच्या सदस्यत्वासाठी तिला पाठिंबा देण्याचे ठरविले. निवडणुकीची तारीख अगदी जवळ आल्यावर तिला न कळविताच लिबरल पार्टीने अध्यक्षपदाचा (उमेदवारीचा) पाठिंबा काढून घेतला. तिने अनेक प्रश्नात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले असूनही ती फक्त पर्यावरण रक्षण एवढ्या एकाच प्रश्नावर लक्ष केंद्रित करेल, अशी धास्ती काहींना वाटत होती. झालेल्या गोंधळात लोकसभेच्या उमेदवारीबाबतही संभ्रम उत्पन्न झाला आणि निवडणुकीत तिला पराभव पत्करावा लागला. ती थोडी खिन्न झाली; परंतु लहान-मोठे संघर्ष चालू ठेवण्याच्या सातत्यात तिने खंड पडू दिला नाही. २००२ मध्ये लोकसभेसाठी ती पुन्हा उभी राहिली आणि ९८% मते मिळवून ती निवडून आली. या वेळेस कर्दनकाळ मोईचा पराभव झाला आणि उदारमतवादी म्वाई किबाबी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत यशस्वी झाले. किबाबीच्या मंत्रिमंडळात, पर्यावरण निसर्गसंपत्ती आणि वनजीवन या खात्याच्या उपमंत्रिपदाची जबाबदारी २००३ पासून सांभाळण्यात, वांगारा माथाई व्यग्र आहे.

१९९८ पासून माथाईची एक अतिशय महत्त्वपूर्ण मोहीम म्हणजे सर्व गरीब देशांची (विशेषत: आफ्रिका खंडातील देशांची) आंतरराष्ट्रीय पातळीवरील कर्जे रद्द करून टाकण्याची मागणी. २००० सालापर्यंत सर्व कर्जे माफ करण्यात यावीत, अशी तिची अपेक्षा होती. अजून ते साधलेले नव्हते तरी बहुतांशी यश मिळण्याची लक्षणे नुकत्याच झालेल्या सधन देशांच्या परिषदेतील निवेदनावरून दिसत आहेत.

अद्वितीय यश

पर्यावरणाच्या समस्येकडे जगाचे लक्ष प्रकर्षाने वेधण्याचे कार्य जगातील तीन महिलांनी केले आहे. अमेरिकेतील रॅशेल कार्सन, जर्मनीतील पेट्रा केली आणि केनियातील वांगारा माथाई, भारतातील वंदना शिवा आणि मेधा पाटकर, ही नावेसुद्धा आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचली आहेत, परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवरील नोबेल पुरस्कारासकट ३५ पेक्षा अधिक प्रतिष्ठित पुरस्कार मिळविणारी, अनेक विद्यापीठांकडून डॉक्टरेट हा सन्मान मिळविणारी, डझनपेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय संस्था-संघटनांची पदाधिकारी अथवा सन्माननीय सदस्य असणारी, जगभर व्याख्याने देत फिरणारी, "The Green Belt Movement :"Sharing The Approach And Experience' या पुस्तकाची लेखिका एकमेवाद्वितीय आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही आणि अशी ग्वाही देण्यास भरपूर पुरावा उपलब्ध आहे.

(मिळून साऱ्याजणी, मार्च २००५)

❑

पर्यायी नोबेल पुरस्कार विजेती पेट्रा करीन केली

(२९ नोव्हेंबर १९४७ ते १ ऑक्टोबर १९९२)

पर्यावरण दिन

संयुक्त राष्ट्र संघटनेने १५ डिसेंबर १९७२ रोजी संमत केलेल्या ठरावानुसार, दर वर्षी ५ जून रोजी जगातील सर्व राष्ट्रांनी 'पर्यावरण दिन' पाळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. जगातील मनुष्यवस्तीचा परिसर आणि पर्यावरण यांच्या सद्यःकालीन परिस्थितीचा व्यापक आढावा घेऊन, पृथ्वीचे सौंदर्य व उपयुक्तता टिकविण्याकरिता उपाययोजना सुचविण्याची गरज निर्माण झाली होती. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने १९७२ मध्ये पहिली आंतरराष्ट्रीय परिषद स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरविण्यात आली होती. ५ जून हा परिषदेच्या उद्‌घाटनाचा दिवस होता, म्हणून हीच तारीख सर्व राष्ट्रांनी पर्यावरण रक्षणाची जाणीव लोकमानसात दर वर्षी राबविण्याकरिता स्वीकारली.

स्टॉकहोम परिषदेनंतर वीस वर्षांनी, म्हणजे १९९२ मध्ये ब्राझिलमधील रिओ डी जॅनेरिओ येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत, पर्यावरण रक्षण, संवर्धन आणि शाश्वत विकास यात समन्यायी संतुलन राखण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. अद्याप, जगातील सर्व नसल्या तरी निदान शंभर देशात हा दिन पाळण्यात येतो.

खुले मेळावे, सायकल फेऱ्या, शिक्षणसंस्थांमधून निबंध स्पर्धा अथवा पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, पृथ्वीचे भवितव्य उज्ज्वल ठेवण्याचा संदेश देणारे संगीतमय जलसे (याला 'हरित जलसे' असेही म्हणण्याची प्रथा आहे) या व अशा विविध मार्गांनी हा दिन साजरा केला जातो.

पर्यायी नोबेल पुरस्कार : पार्श्वभूमी

पर्यावरणाचा ऱ्हास व मानवी जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा संयुक्त राष्ट्रसंघाने संमत केलेल्या ठरावाच्या आधीपासून होऊ लागली होती. १९६२ मध्ये, रॅशल कार्सन या महिला वैज्ञानिकेचे 'नि:शब्द वसंतऋतू' (Silent Spring) हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर सर्वत्र, विशेषत: अमेरिकेत मोठी खळबळ उसळली. कीटकनाशकांच्या

अतिरिक्त फवारणीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचे विवेचन तिने केले असल्यामुळे या रसायनांचे उत्पादन करणाऱ्या कारखानदारांनी तिच्यावर बेछूट हल्ला चढविला. काही शास्त्रज्ञही यात सामील झाले. 'निसर्गपूजेचा पिसाटासारखा प्रचार करणारी मानसिक संतुलन बिघडलेली अविवाहित महिला', अशा असभ्य शब्दात तिची नालस्ती करण्यात आली; परंतु प्रकाशनाच्या जवळजवळ पहिल्याच वर्षात तिच्या पुस्तकाच्या अडीच लाख प्रती जगभर खपल्या. वैज्ञानिकांसकट अनेक विचारवंत तिचा गौरव करू लागले.

नोबेल पुरस्कार समितीला पत्र

पुढील दहा वर्षांच्या अवधीत, पर्यावरण रक्षण हा विषय ऐरणीवर आला आहे हे लक्षात घेऊन, जेकब व्हॉन उएक्सकुल या स्वीडन व जर्मनी या दोनही देशांचे नागरिकत्व स्वीकारलेल्या लेखक प्राध्यापकाने, प्रस्थापित नोबेल पुरस्कार समितीला एक पत्र लिहिले. जेकब हा युरोपियन संसदेचा निवडून आलेला एक प्रतिष्ठित सदस्य होता. सध्या तो अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचा संस्थापक किंवा पदाधिकारी आहे. पोस्टाचे दुर्मिळ स्टॅम्प जमविणे (फिलॅटेलिस्ट) हा त्याचा छंद होता. पुरस्कार देण्याकरिता जे विषय विसाव्या शतकाच्या प्रारंभी ठरविण्यात आले होते (पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वैद्यक अथवा जीवशास्त्र, वाङ्मय व जागतिक शांतता) त्यात आता भर घालण्याची वेळ आली आहे, याची दखल घेऊन पर्यावरण रक्षण, संशोधन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी भरीव कार्य करणाऱ्यांनाही हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार देण्यात यावा, असे आवाहन त्याने नोबेल पुरस्कार समितीला केले. त्याकरिता लागणारा भरघोस निधी उभारण्याकरिता पुढाकार घेऊन सहकार्य करण्याचे आश्वासनही त्याने दिले; परंतु नोबेल पुरस्कार समितीने या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद देण्यास नकार दिला.

पर्यायी पुरस्काराची स्थापना : १९८०

आपला पहिला प्रयत्न असफल ठरला, त्यामुळे हताश न होता, जेकब उएक्सुकलने आपण दिलेल्या आश्वासानुसार कालोचित नवीन विषयांकरिता पुरस्कारांसाठी स्वत: निधी उभारण्याचे ठरविले. स्वत:जवळील पोस्टाचे दुर्मिळ स्टॅम्प विकून, त्याने सुमारे दहा लाख डॉलर उभे केले. लवकरच त्यात अनेक व्यक्तींनी भर घातली. त्यामुळे या रकमेवरील व्याजातून पुरस्कारांसाठी मोठी रक्कम दर वर्षी उपलब्ध असते.

पाणी, हवा, माती यांचे होणारे प्रदूषण रोखणे, आरोग्य रक्षण व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे, विकासाच्या धोरणाला नवी दृष्टी देणे, अल्पसंख्याकांना आधार व संरक्षण देणे, केवळ राजकीय हक्क नव्हे तर सर्व मानवी हक्कांच्या प्रस्थापनेसाठी सातत्याने कार्य करणे, लोकांमधील दैन्य व दारिद्र्य हटविण्यासाठी झटणे, अणुयुद्धासारख्या भीषण युद्धांना विरोध करण्यासाठी मोहीम उभारणे, हे व असे विषय पुरस्कारांसाठी पात्र ठरविण्यात आले आहेत. ज्या व्यक्ती अथवा संस्था या विषयांच्या

अनुषंगाने कार्य करत असतील, त्यापैकी सर्वश्रेष्ठ कार्य करणाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो.

या पुरस्काराचे 'सम्यक जीवनसरणी पुरस्कार' (Right Livelihood Award) असे घोषित नाव आहे. आयुष्यातील आपला नियोजित व्यवसाय सचोटीने पार पाडणे, समाजातील इतर व्यक्ती व निसर्ग यांचा मान राखणे, पृथ्वीवरील साधनसंपत्तीचा केवळ सुयोग्य वाटा मिळविण्यात समाधान मानणे, आपल्या कार्यमग्नतेतून होणाऱ्या परिणामांची जबाबदारी स्वीकारणे, हा 'सम्यक जीवनसरणी' या संकल्पनेचा, प्राचीन काळापासून सर्वसामान्यपणे मान्य करण्यात आलेला गाभा आहे.

या पुरस्काराची स्थापना १९८० मध्ये झाली. त्याला 'पर्यायी नोबेल पुरस्कार' असे म्हणण्याची प्रथा पडली आहे. एकूण चार पुरस्कार दिले जातात. त्यातील एक पुरस्कार पुष्कळदा सन्मानार्थ दिला जातो. ज्यांना तातडीची आर्थिक गरज नाही; परंतु ज्यांचे कार्य लक्षणीय आहे, अशांना हा पुरस्कार दिला जातो. गेल्या वर्षी हा पुरस्कार भारतातील स्वामी अग्निवेश आणि श्री. अजगरअली इंजिनिअर यांना देण्यात आला. उरलेले तीन पुरस्कार आर्थिक रकमेच्या स्वरूपात दिले जातात. स्वीडिश क्रोनर व अमेरिकन डॉलर यांचा विनिमय दर लक्षात घेता, सध्या पुरस्काराची रक्कम सुमारे २ लाख ६० हजार डॉलर आहे. व्यक्तीला अथवा संघटनेला - संस्थेला मिळालेल्या रकमेचा विनियोग केवळ कार्याकरिताच व्हावा, अशी अपेक्षा असते. प्रस्थापित नोबेल पुरस्कार ज्या दिवशी घोषित करण्याची प्रथा आहे त्याच्या आदल्या दिवशी, स्वीडनमधील संसदेत हे पर्यायी पुरस्कार घोषित केले जातात. वास्तविक, या पुरस्काराचा निधी व त्यातून मिळणारे उत्पन्न हे इतकी वर्ष करमुक्त ठरविण्यात आले होते; परंतु हा पुरस्कार केवळ विधायक कार्य करणाऱ्यांना दिला जात नाही तर प्रखर आंदोलने उभारणाऱ्यांनाही दिला जातो, या सबबीखाली, करमुक्तीची सवलत काढून घेण्यात यावी, अशी प्रचारमोहिम या पुरस्काराविरुद्ध गेल्या वर्षीपासून सुरू झाली आहे.

स्थापन झाल्यापासून २५ वर्षांत, ४४ देशांतील १०० व्यक्ती अथवा संस्थांना हा पर्यायी नोबेल पुरस्कार मिळालेला आहे. गेल्या वर्षी प्रस्थापित नोबेल पुरस्कार आफ्रिका खंडातील वांगारा माथाईला मिळाला. तिच्या कार्याची दखल कितीतरी आधी घेऊन, १९८४ मध्ये तिला पर्यायी नोबेल पुरस्कार देण्यात आला होता, असे पर्यायी नोबेल पुरस्कार प्रतिष्ठान अभिमानाने सांगत असते. भारतातील नऊ पर्यायी पुरस्कार मानकऱ्यांमध्ये वंदना शिवा, मेधा पाटकर व इला भट यांचा समावेश आहे.

पेट्रा केलीला पुरस्कार

१९८२ चा पर्यायी नोबेल पुरस्कार 'पेट्रा केली' या जर्मन महिलेला देण्यात आला. अवघे ४५ वर्षे आयुष्य लाभलेल्या या अभ्यासू, झुंजार महिलेने, चार मुख्य उद्दिष्टे

साध्य करण्यासाठी आपले सारे प्रौढ वयातील आयुष्य व्यतीत केले. पर्यावरण रक्षण, जागतिक शांतता, सर्व मानवी हक्कांचा पुरस्कार व त्यांची कार्यवाही आणि स्त्री-मुक्ती (स्त्रीवाद) हे परस्परावलंबी घटक असून, त्यांचा विचार सुटे-सुटेपणाने करता कामा नये, अशी तिची आग्रहपूर्ण; पण संयमशील मांडणी होती. मानवी जीवन सर्वांगाने संपन्न करण्याकरिता जी आंदोलने उभारावयाची, त्यातील संघर्षांचे स्वरूप सविनय कायदेभंग असे असावे, त्यात निग्रह असावा; हेही ती अधोरेखित करीत असे.

राजकारण म्हणजे काय? प्रेम (आपुलकी) जे बलवत्तर करते तेच राजकारण. पृथ्वी या अवकाशयानावर एकजुटीची भावना जे रूजविते त्यालाच राजकारण म्हणावे. क्लेश, व्यथा हेच ज्यांच्या वाट्याला आजपर्यंत आले आहे, त्या जगातील लोकांना विनाशाच्या वाटेवर ढकलून देणाऱ्या सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या हातातून लोकांनी एकजूट उभारून सत्ता हस्तगत केली पाहिजे; परंतु ही सत्ता दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्याकरिता नव्हे तर सर्वांनी मिळून ती उपभोगणे, हे सत्ता संपादनाचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे.

प्रसिद्ध शास्त्रज्ञ आईनस्टाईन हा एकदा म्हणाला होता की, 'अणूच्या विभाजनामुळे, जगात सर्व काही बदलले, माणसाची मानसिक प्रवृत्ती मात्र बदलली नाही.' हे आईनस्टाईनचे वाक्य उद्धृत करून, मानसिक पिंड बदलण्याचे कार्य आपल्याला करावयाचे आहे, तो एक महान प्रयास आहे, यावर पेट्राने आपल्या भाषणात व लिखाणात भर दिला आहे.

पृथ्वीशी मानवाने गैरवर्तणूक केली आहे. हा ढळलेला तोल, पृथ्वीबरोबर (सहृदयतेने) राहून, आता सावरला पाहिजे. ऊर्जा असो अगर तंत्रज्ञान असो, त्यांचा उपयोग आक्रमकतेने केला नाही तरच अहंकारी पुरुष वर्चस्वावर मात करता येईल.

जे जे संपूर्णतया अनिष्ट असेल, ते थोड्या प्रमाणावर असले तरी चालेल, असे आपण कधीही म्हणता कामा नये. थोडासा कॅन्सर, थोडेसे कुपोषण, थोडासा मृत्यू चालेल, असे आपण म्हणतो का? त्याचप्रमाणे थोडासा अन्याय, थोड्याशा वेदना अथवा यातना चालतील, थोडेसे शिसे, प्रदूषण किंवा क्षकिरणोत्सर्ग चालेल, असे म्हणता कामा नये. जे संपूर्णतया अनिष्ट असते, त्याची एक सुरक्षितता पातळी असते, असे मानता कामा नये.

पेट्रा केलीचे हे विचारविश्व अकस्मात केव्हा तरी मोहरले नाही. तिच्या कार्यानुभवातून आणि चिंतनातून ते हळूहळू विकसित होत गेले. म्हणूनच तिच्या असामान्य जीवन-चरित्र व कार्यावर दृष्टिक्षेप टाकणे रास्त ठरेल. विसाव्या शतकात प्रभावी ठरलेल्या जगातील एक हजार व्यक्तींपैकी एक, अशी तिची नोंद 'टाइम्स् ऑफ लंडन' या जगप्रसिद्ध दैनिकाने केली आहे.

शिक्षण व सामाजिक – राजकीय कार्यास प्रारंभ

पेट्राचा जन्म २९ नोव्हेंबर १९५७ रोजी जर्मनीतील गुन्झबर्ग या गावी झाला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत तिचे शिक्षण जर्मनीतच झाले. तिचे वडील वृत्तीने बेपर्वा होते. तिच्या आईचे त्यांच्याशी न जमल्यामुळे, तिने जॉन केली नावाच्या एका अमेरिकन सैन्याधिकाऱ्याशी दुसरे लग्न केले आणि १९५९ मध्ये पेट्राला बरोबर घेऊन ती अमेरिकेत राहावयास गेली. शालेय व पुढील शिक्षणात पेट्रा बुद्धिमान विद्यार्थिनी म्हणून तर चमकलीच, परंतु अवांतर कार्यक्रमांमध्ये ती उत्साहाने भाग घेत असे आणि यश मिळवीत असे. शाळेत शिकत असताना, कृष्णवर्णीयांच्या प्रगतीसाठी असलेल्या विविध उपक्रमांमध्ये ती सहभागी होत असे आणि वंशभेद, वर्णभेद असे कोणतेही विषमताधिष्ठित भेद न मानता ती कृष्णवर्णीयांना आपुलकीने मदत करीत असे. त्याच वयात असताना 'प्रचलित प्रश्न किंवा समस्या' या विषयावरील रेडिओ कार्यक्रमातही ती सहभागी होत असे.

राज्यशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध आणि जागतिक राजकारण, या विषयात वॉशिंग्टनमधील अमेरिकन विद्यापीठात पदवीपूर्व उच्च शिक्षण घेऊन ती बी. ए. झाली. १९७१ मध्ये ॲमस्टरडॅम विद्यापीठाच्या युरोपियन इन्स्टिट्यूटमधून तिने एम. ए. ही पदवी संपादन केली. या संपूर्ण कालावधीत सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी चालू असलेल्या आंदोलनात ती सतत सामील होत असे. तद्देशीय व आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता कार्य करीत असताना तिने १९६६ मध्ये एक आंतरराष्ट्रीय सप्ताह साजरा करण्याचा उपक्रम यशस्वी करून दाखविला. दरवर्षी हा सप्ताह अद्यापही साजरा केला जातो.

पेट्राचे कार्यक्षेत्र वाढू लागले होते. युद्धविरोध, अण्वस्त्रबंदी आणि स्त्रीवादी आंदोलनांमध्ये, सभा-परिषदांमध्येही ती यापुढे सहभागी होऊ लागली. मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनिअर) या कृष्णवर्णीय नेत्याच्या आंदोलनाचा तिच्या मनावर प्रभाव पडला. आंदोलने शांततापूर्ण मार्गानेच चालविली पाहिजेत, या निष्कर्षापर्यंत ती येऊन पोचली.

राजकीय क्षेत्रात पाऊल टाकण्याच्या दृष्टीने, रॉबर्ट केनेडींच्या अध्यक्षीय निवडणुकीत स्वयंसेवक या नात्याने तिने जोमाने कार्य केले. केनेडींची हत्या झाल्यानंतर ह्यूबर्ट हंम्रेच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत तिने तितक्याच जोमाने मदत केली आणि त्याच्या कार्यालयातील बरेच कामही तत्परतेने सांभाळले. अवघ्या बाविसाव्या वर्षी तिचे कार्य इतके लक्षवेधी ठरले की तिला अनेक नागरिकांकडून राजकीय विषयांवर पत्रे येऊ लागली. कित्येक पत्रातून तर युरोपमधील विविध समस्यांबाबत तिचे मत अथवा सल्ला विचारला जात असे. पोप असो, दलाई लामा असो किंवा अन्य कोणी प्रख्यात व्यक्ती असो, पेट्राला काही विचारावे किंवा लिहावे असे वाटले तर तडक ती त्यांना लिहीत असे आणि बहुतेक वेळा तिच्या पत्रांना उत्तर मिळत असे.

मायदेशी परत : झपाटलेले जीवन

सुमारे बारा वर्षे अमेरिकेत राहिल्यानंतर ती स्वदेशी परतली आणि तेव्हापासून तिचे जे झंझावती जीवन सुरू झाले ते तिच्या कानशिलात बंदुकीची गोळी घुसून तिचा अंत होईपर्यंत अविरतपणे चालू राहिले.

'पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेणारी संस्था' या नावाची एक संस्था जर्मनीत होती. या संस्थेच्या कार्यात १९७२ मध्ये पेट्रा लक्ष घालू लागली. त्याच वर्षापासून १९८३ सालापर्यंत चरितार्थासाठी आणि कामाची आवड म्हणून, युरोपियन देशवासीयांच्या आर्थिक आणि सामाजिक समितीवर तिने एक अधिकारपद स्वीकारले. या पदावर असताना युरोपचे राजकारण, श्रमिकांचे प्रश्न, स्त्रिया व अन्य सामाजिक समस्या, पर्यावरण, आरोग्य, ग्राहकांच्या मागण्या व गरजा, अशा विविध विषयांचे तिला आकलन झाले. अशा प्रश्नांना प्रत्यक्ष भिडताना पुष्कळ अनुभवही आला.

१९७० मध्ये पेट्राची सावत्र बहीण रोस ही वयाच्या दहाव्या वर्षी डोळ्याच्या कॅन्सरने मरण पावली होती. मुलांच्या कॅन्सरवरील संशोधनाला पाठिंबा देण्यासाठी १९७३ मध्ये, वयोवृद्ध आजीच्या मदतीने पेट्राने ग्रेस पेट्रीशिया केलीचे नाव देऊन, एक संस्था स्थापन केली. स्थापनेपासून मृत्यूपर्यंत तिने या संस्थेचे अध्यक्षपद सांभाळले. भोवतालच्या वातावरणाचा, विशेषत: आण्विक उद्योगांच्या परिणामांचा आणि कॅन्सरचा अन्योन्य संबंध असेल तर संशोधनातून ते निष्कर्ष मांडले जावेत, हा या संशोधनाला पाठिंबा देण्याचा मुख्य उद्देश आहे. या संस्थेचे कार्य युरोपभर चालू आहे. ती स्वत:, तिची आजी व अन्य दोन सहकाऱ्यांबरोबर रूग्णालयातील कॅन्सर दालनांमध्ये जाऊन, कॅन्सर झालेल्या मुलांना मानसिक आधार देण्याचे कामही विनावेतन करण्याची प्रथा तिने पाडली. 'बालक ग्रह' (Children's Planet) असे नाव देऊन तिने दुसराही एक आरोग्य प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पानुसार एका सामाजिक-मानसिक आरोग्य केंद्रावर, दीर्घकालीन, दुर्धर दुखण्याने ग्रासलेल्या मुलांची देखभाल करण्यात येते.

एकीकडे वरील सर्व कामांचा व्याप सांभाळत असताना १९७२ मध्ये जर्मनीचे अध्यक्ष विली ब्रॅन्ट यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्षाचे (सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे) सभासदत्व स्वीकारून ती कार्य करू लागली. पुढील सात-आठ वर्षांत तिने अणुवीज प्रकल्पाविरुद्ध निदर्शने करणे, हिरोशिमा, नागासाकी, ऑस्ट्रेलिया येथील निमंत्रणे स्वीकारून भाषणे देणे, यात स्वत:ला झोकून दिले. तात्त्विक मुद्यांवर तडजोड करण्यास तिचा सतत विरोध असे. म्हणून विली ब्रॅन्टनंतर हेल्युट स्मिटच्या संरक्षण विषयक धोरणांना आणि वीजनिर्मिती व त्याचा अतिरिक्त उपभोग या योजनांना, पक्षाच्या मूळ धोरणाशी हे सारे विसंगत असल्यामुळे तिने विरोध केला आणि १९७९ मध्ये राजीनामा दिला. विविध पर्यावरण-रक्षणवादी संस्था-संघटनांना एका छत्राखाली आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या बी. बी. यू. या संस्थेची ती त्या काळी एक महत्त्वाची प्रवक्ती असल्यामुळे, पक्षनिष्ठेपेक्षा तत्त्वनिष्ठेला तिने अग्रक्रम दिला. त्यामुळे तिला

आयुष्यात लौकिक किंवा ऐहिक लाभ फारसा कधी मिळाला नाही. तरी तिची नैतिक उंची वाखाणली गेली.

ग्रीन पार्टीची स्थापना

पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर, पेट्राने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले. १९७९ मध्ये ग्रीन पार्टी या नावाचा पक्ष स्थापन करण्यात तिने अनेक व्यक्ती, संघटना, गट यांना बरोबर घेऊन खूप परिश्रमपूर्वक पुढाकार घेतला. १९८० ते ८२ या दरम्यान ती पक्षाच्या अकरा सदस्यांच्या कार्यकारिणीची केवळ प्रवक्ती झाली नाही तर अध्यक्षपदाची जबाबदारीही तिच्यावर सोपविण्यात आली. राजकीय पक्षाचे अध्यक्षपद भूषविणारी जर्मनीतील ती पहिली महिला ठरली.

ग्रीन पक्ष हा कसा असावा, याबद्दल तिच्या मनात एक साकारक्षम स्वप्न होते. पर्यावरण रक्षण-संवर्धनाविषयी आस्था बाळगून, लोकशाही व शांततामय मार्गांवर दृढ विश्वास ठेवून, अण्वस्त्र व युद्धविरोधी भूमिका घेऊन, तळागाळातल्या लोकांचे हित डोळ्यासमोर ठेवून, संसदीय व संसदबाह्य कार्य करणाऱ्यांची हा पक्ष ही एक आघाडी असावी, असा संकल्प सहकाऱ्यांबरोबर ठेवून, जर्मनीतील पुढील धकाधकीच्या राजकीय क्षेत्रात ती उतरली.

पक्ष स्थापना झाल्याबरोबर १९७९ मध्ये ग्रीन पार्टीने युरोपीय संसदेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. निवडणुकीसाठी नेमण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीमध्ये पेट्राला साहजिकच अग्रगण्य स्थान होते. या निवडणुकीत ग्रीन पार्टीला पराभव पत्करावा लागला; परंतु पर्यावरण समस्या युरोपभर गाजविण्यात पक्षाला यश आले.

या पराभवानंतर देशांतर्गत कार्य अधिक जोमाने करून, जर्मनीतील संसदीय निवडणूक लढविण्याचा निर्णय पक्षाने घेतला. १९८० च्या नोव्हेंबर महिन्यात जर्मनीने पर्शिंग 2 व क्रूझ क्षेपणास्त्रे आपल्या भूमीवर ठेवण्याचा निर्णय घेतला. सह्यांची मोहीम हातात घेऊन, या क्षेपणास्त्रांना तीव्र विरोध करण्याचा निर्णय पेट्राने घेतला. त्याकरिता जे आवाहन तयार करण्यात आले त्याला 'क्रेफेल्डर अॅपेल' असे म्हणतात. सुमारे ५० लाख सह्या मिळविण्यात या मोहिमेला यश आले. 'नाटो' या पश्चिम युरोप व अमेरिका या राष्ट्रांनी उभारलेल्या लष्करी दलातील मेजर जनरल गर्ट बॅस्टिअन नावाचा एक प्रमुख सेनाधिकारी, क्षेपणास्त्र मांडणीला विरोध करून सह्यांच्या मोहिमेत सामील झाला. पेट्रापेक्षा वयाने चोवीस वर्षांनी मोठा असलेला हा सेनाधिकारी आणि पेट्रा यांची घनिष्ट मैत्री या आंदोलनात झाली. खरे म्हणजे आपली पत्नी व मुलगी यांच्यापासून अलिप्त राहून, गर्ट पेट्राच्या प्रेमात पडला आणि हे विवाहित जोडपे अखेरपर्यंत, म्हणजे पुढील बारा वर्षे आपले नियोजित कार्य अखंडपणे करीत राहिले.

भाषणे, व्याख्याने, लेख, निदर्शने, सह्यांची मोहीम यापैकी कशानेही आक्रमक युद्ध पिपासूंना रोखण्यात यश मिळत नाही हे पाहून पेट्राने गर्ट बॅस्टिअनच्या सहकार्याने

आणखी एक नेत्रदीपक कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले. दुसऱ्या महायुद्धाला जबाबदार असणाऱ्या युद्ध गुन्हेगारांवर, युद्ध समाप्तीनंतर ज्या शहरात खटले दाखल करण्यात आले होते, त्या न्युरैबर्ग शहरातच १९८३ मध्ये हा कार्यक्रम योजण्यात आला. त्यानुसार एका 'युद्ध गुन्हे लवादाची' (War Crimes Tribunal) नेमणूक केली असल्याचे जाहीर करण्यात आले. आण्विक व अन्य महाविध्वंसक शस्त्रे बाळगणे, हा एक अत्यंत घोर गुन्हा आहे, असा प्रस्ताव मांडून अशी शस्त्रे बाळगणाऱ्या, मुख्यत: अमेरिका व रशिया (पूर्वीचा सोवियत युनियन) आणि त्याचबरोबर इंग्लंड, फ्रान्स व चीन या देशांचा तीव्र निषेत नोंदविण्यात आला. ५० वक्ते आणि २ हजार लोक, या लवादाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी झाले होते.

१९८२-८३ मध्ये पेट्रा ज्या युरोपीय देशांच्या समितीवर सवेतन काम करीत होती, त्यातून तिने एक वर्षाची विनावेतन रजा घेतली. त्यामुळे तिचे हे वर्ष भरगच्च कार्यक्रमात गेले. अमेरिकेत युद्ध तळ असतील तेथे अनेक ठिकाणी जाऊन, त्या तळांना घेराव घालणे, खुद्द अमेरिकेत जाऊन निदर्शने करणे आणि युद्ध व अण्वस्त्र बंदीवर भर देणे, नाटो व वॉर्सा या लष्करी दहशत निर्माण करणाऱ्या करारांना विरोध करणे, त्या वेळच्या पूर्व बर्लिन व मॉस्कोला जाऊन निदर्शने व मानवी हक्कांचा पुरस्कार करणे, अशा कितीतरी उपक्रमात ती सहकाऱ्यांबरोबर अग्रेसर होती. या राष्ट्रांतील समाजाने सुरक्षिततेकरिता शस्त्रास्त्रांवर भिस्त ठेवण्यापेक्षा, सामाजिक जाणीव प्रगल्भ व संवेदनशील करण्याचा कटाक्षाने आग्रह धरावा व त्यानुसार वर्तन करावे ('सोशल डिफेन्स') असे ती वारंवार सांगत असे. पुढे १९८४ मध्ये, या मुद्यावर व्यापक चर्चा करून निर्णय मांडण्याकरिता तिने तज्ज्ञांची एक आंतरराष्ट्रीय परिषदही भरविली होती. कधी अटक सहन करीत तर कधी जर्मन कोर्टाने तिला व गर्ट बॅस्टिअनला ठोठावलेले जबरदस्त 'दंड' भरीत, कोणाचाही आधार न घेता, तिने आपला संघर्ष चालू ठेवला. जर्मनी, दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेष करणाऱ्या सरकारशी आर्थिक संबंध ठेवीत असे, याचा विरोध करण्याकरिता ती सहकाऱ्यांबरोबर प्रिटोरिआला गेली. तेथील जर्मन दूतावासात ४८ तास ती सहकाऱ्यांबरोबर ठाण मांडून बसली! निषेध नोंदवूनच ती स्वदेशी परतली.

जर्मनीतील संसदीय निवडणुका

वर उल्लेखलेल्या कार्यक्रमांचा धूमधडाका चालू असताना, जर्मनीतील राष्ट्रीय संसदेची निवडणूक लढविण्याची तयारी ग्रीन पार्टी करीत होती. नवीन असूनही, स्थानिक व प्रादेशिक पातळीवरील निवडणुकांत पक्षाला थोडेसे यश मिळण्यास सुरूवात झाली होती; परंतु पक्षाचे ध्येय-धोरण देशभर पोहोचण्याकरिता संसदीय निवडणुकीत लक्षवेधी यश मिळविण्याची गरज होती. पेट्राने जी रजा घेतली होती ती मुख्यत: १९८३ सालच्या संसदीय निवडणुकीच्या प्रचार मोहिमेकरता. निवडणुकीकरता

योजण्यात आलेल्या ४५० सभांतील बहुतेक सर्व सभांमध्ये पेट्राचे भाषण झाले. एकूण ४९८ संसद सदस्यांपैकी ग्रीन पार्टीचे २८ सदस्य निवडून आले. एकूण २१ लाख, ६४ हजार, ९८८ मतदारांनी ग्रीन पार्टीला मते दिली. या यशाचे मोठे श्रेय पेट्रालाच दिले जाते. निवडून आलेल्या सदस्यांचे नेतृत्व करण्याचा मान इतर दोन सहकाऱ्यांबरोबर तिला मिळाला. यानंतर झालेल्या १९८७ च्या निवडणुकीत ग्रीन पार्टीला अधिक यश मिळाले. दोन्ही संसदांच्या परराष्ट्रीय धोरण व इतर काही उपसमित्यांमध्ये सल्ला देण्याकरता तिची नेमणूक करण्यात आली होती. जर्मनीचे विभाजन संपुष्टात आल्यानंतर १९९० मध्ये झालेल्या संयुक्त जर्मनीच्या निवडणुकीत पश्चिम जर्मनीतील ग्रीन पार्टीचा पराभव झाला; परंतु पूर्व जर्मनीतील ग्रीन पार्टीचे ८ उमेदवार निवडून आले.

क्रांती झाल्यानंतर चीनने तिबेटमध्ये आक्रमण केले होते, असे पाश्चात्त्य देशांसकट जगातील अनेक लोकांचे मत आहे. पेट्रा केलीचेही तसेच मत असल्यामुळे, तिबेटी जनतेचे हक्क पायदळी तुडविले गेले याबद्दल तिने अनेक ठिकाणी परिषदा घेऊन व्यथा व्यक्त केली. जर्मन संसदेत तिबेटी जनतेबद्दल सहानुभूती व्यक्त करून, तिला पाठिंबा देऊन, चीनचा निषेध करणारा ठराव पेट्राने मांडला. ग्रीन पक्षाला एरवी विरोध करणाऱ्या सर्व संसद सदस्यांनी या ठरावाला ताबडतोब पाठिंबा दिला! दलाई लामांच्या राजवटीत तिबेटी जनतेच्या हक्कांची काय परिस्थिती होती, याचा वस्तुनिष्ठ विचार पेट्रा का करू शकली नाही, हे समजणे कठीण आहे. दलाई लामाशी तिची मैत्री पुढे आयुष्यभर टिकली. एवढेच नव्हे तर दलाई लामाने स्वत: प्रस्थापित केलेला एक पुरस्कारही तिला दिला आहे.

पेट्राची सर्व मते कोणाला पटोत अगर न पटोत, तिला पटलेली ही मते ती आढेवेढे न ठेवता सुस्पष्टपणे मांडीत असे. रोष ओढवून घ्यावा लागला तरी त्याची फिकीर ती करीत नसे. ग्रीन पार्टी संसदीय राजकारणात उतरल्यानंतर पक्षातील अनेक सहकारी तत्त्वच्युत होऊ लागले, अनेक तडजोडी करून स्वार्थ साधू लागले. याचे तिला दु:ख झाले; परंतु त्यांच्यावर टीका करण्यास तिने मागे-पुढे पाहिले नाही. ऑस्कर लाफॉन्टेन नावाच्या एका सहकाऱ्याने अर्थमंत्रिपद स्वीकारले. कोळशावर चालणारे, फार मोठ्या प्रमाणावर प्रदूषण करणारे दोन वीज प्रकल्प (पॉवर प्लान्टस्) त्याने भारतात निर्यात केले. ग्रीन पक्षाच्या दबावामुळे हे प्रकल्प जर्मनीत बंद करण्यात आले होते. १९९१ मध्ये पर्यावरणवाद्यांनी मेक्सिकोमध्ये आयोजित केलेल्या परिषदेत, पेट्राने आपल्या पूर्वीच्या सहकाऱ्यांचा नि:संदिग्ध शब्दात निषेध केला.

खून की आत्महत्या?

पाश्चिमात्य देशात लोकशाही असल्यामुळे तेथील जीवन अधिक सुरक्षित असते, असे मानण्याची एक प्रथा आहे. पेट्रा केलीसारख्या प्रख्यात महिलेला लागलेली प्राणघातक गोळी आणि १८ दिवस त्याचा कोणालाही पत्ता न लागणे, हे सुरक्षिततेचे

लक्षण आहे काय? असा प्रश्न तिच्या मित्रपरिवाराला पडला आहे. घटनाक्रम एखाद्या रहस्यकथेसारखा आहे; परंतु ती घटना काल्पनिक नसून काही दुवे निखळलेल्या सत्यकथेसारखी आहे.

ग्रीन पार्टीतील अनेक सहकाऱ्यांनी ध्येयाशी प्रतारणा केल्यामुळे पेट्रा १९९२ मध्ये एका प्रकारच्या मानसिक तणावात वावरत होती. अनेक वर्षे अविश्रांतपणे केलेल्या कामाचा ताणही जाणवण्याइतका वाढला होता. त्याच वर्षाच्या वसंतऋतुत, तिचा घनिष्ट मित्र (प्रियकर) तिच्यासाठी केळी आणण्याकरता बाहेर गेला असताना, रस्ता ओलांडताना एका टॅक्सीची धडक बसून त्याच्या गुडघ्यांना बराच मार लागला होता. शस्त्रक्रिया करणे अपरिहार्य होते. या अपघाताचाही पेट्राच्या मनावर परिणाम झाला होता. या सर्व परिस्थितीमुळे तिचे मन जरी थोडे उदास झाले असले तरी तिचा स्वभाव हार खाण्यचा कधीही नव्हता, अशी साक्ष तिला ओळखणारे सगळे देत असत. ''मृत्यू कसा यावासा वाटतो?'' असा प्रश्न एका पत्रकाराने एकदा विचारला असता, ''एकटीला मरावेसे वाटत नाही.'' असे उत्तर तिने दिले होते. १९ ऑक्टोबर १९९२ पूर्वी सुमारे तीन आठवडे तिची फारशी कोणाशी गाठभेट झालेली नव्हती. तिला तिच्या कार्यामुळे इतके महत्त्व प्राप्त झाले होते की दर आठवड्याला सुमारे २०० पत्रे येत असत आणि त्यातील बहुतेक पत्रांना ती प्रतिसाद देत असे.

गर्ट बॅस्टिअन, हा दुसऱ्या महायुद्धात नाझींच्या बाजूने लढला होता. युद्धानंतर त्याने व्यापारात लक्ष घालण्याचा प्रयत्न केला; पण त्यात तो अयशस्वी ठरला. १९५६ मध्ये तो पुन्हा सैन्यात नोकरी करू लागला. उजव्या विचारसरणीचाच पगडा त्याच्यावर होता; परंतु हळूहळू त्याची मते बदलत गेली आणि जर्मनीने क्षेपणास्त्रे आपल्या भूमीवर ठेवण्याचे ठरविल्यावर लष्करातून राजीनामा देऊन तो बाहेर पडला आणि ग्रीन पार्टीबरोबर विशेषत: पेट्राच्या सान्निध्यात राहून तो तिला हरतऱ्हेची मदत करीत कार्य करत राहिला. ग्रीन पक्षाने तत्त्वच्युती केल्यानंतर त्याने त्या पक्षाचा राजीनामा दिला.

१ ऑक्टोबर १९९२ रोजी 'किरणोत्सर्गाचे जगातील बळी' या विषयावर बर्लिनमध्ये एक परिषद होती. त्यात सहभागी होण्यासाठी गर्ट व पेट्रा गेले होते. परिषद आटोपून संध्याकाळी उशीरा दोघे बॉन या शहरातील आपल्या घरी परत आले. थकवा वाटल्यामुळे, प्रवासाचे कपडेसुद्धा न बदलता पेट्रा आपल्या झोपावयाच्या खोलीत जाऊन लगेच झोपली. गर्ट आपल्या अभ्यासिकेत बसून इलेक्ट्रिक टाईपरायटरवर आपल्या वकिलाला एका किरकोळ प्रश्नासंबंधी पत्र टाईप करीत बसला, असे उपलब्ध असलेल्या पत्रातील पहिल्या दहा ओळींवरून दिसते. पत्रावर टाईप केलेली तारीख १ ऑक्टोबर अशी आहे. टाईप करताना एक शब्द आल्यावर तो पुरा टाईप न करता तसाच अर्धवट सोडून देण्यात आलेला आहे. त्यानंतर नेमके काय घडले, याचा अद्याप पत्ता लागलेला नाही.

१९ ऑक्टोबर म्हणजे १८ दिवस कोणाशीही भेट झालेली नाही, असे आढळल्यावर

पेट्राची आजी आणि गर्टची पत्नी (गर्टने घटस्फोट घेतलेला नव्हता) या दोघांची चौकशी करण्यासाठी बॉन येथील त्यांच्या घरी गेले. रखवालदाराला बरोबर घेऊन रात्रौ ९.३० वाजता घरात प्रवेश केल्यावर जे दृश्य दिसले ते पाहून रखवालदाराने पोलिसांना बोलावून आणले. सडून दुर्गंधी येत असलेल्या दोन मृतदेहांची ओळख पटण्यास थोडा वेळ लागला. गर्टच्या कपाळात बंदुकीची गोळी घुसून तो मरण पावला होता. पेट्राच्या मृतदेहावरून तिच्या डाव्या कानशिलात गोळी घुसली असल्याचे आढळले. वैद्यकीय अहवालात पेट्राला झोपेत असतानाच जवळून गोळी मारण्यात आलेली आहे, अशी नोंद आहे. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून बातमी झळकल्यानंतर अनेकांना जबरदस्त धक्का बसला आणि अनेक तर्क मांडण्यात आले.

काय झाले असावे? दोघांनी ठरवून आत्महत्या केली असेल का? गर्टने पेट्राचा खून करून मग आत्महत्या केली असेल का? तिसरा कोणी तरी घरात घुसून त्याने दोन्ही खून केले असतील का? आत्महत्या अथवा खून या मागचे कारण काय असावे? पुरावे सादर करण्यास सुरुवात होणे अपरिहार्य होते.

दोघेही १ ऑक्टोबरला बर्लिनला गेले होते तेव्हा गर्टने ज्येष्ठ नागरिकांकरिता (त्याचे वय ६९ होते) मिळणारा एक वर्ष अवधीचा रेल्वे पास काढलेला होता. मृत्यूच्या आदल्या महिन्यात, पेट्राचे 'आंद्रे साखाराव' यांच्या नावे असलेल्या एक लाख डॉलरच्या पुरस्कारासाठी नामांकन झाले होते. ते मिळाल्यास मानवी हक्कांच्या पुरस्कारासाठी ती एक केंद्र सुरु करणार होती. तिच्या नामांकनाला पाठिंबा द्यावा, असे पत्र गर्टने आपल्या एका मित्राला लिहिले होते. तर मग लगेच एक महिन्यात गर्ट पेट्राचा खून कशाला करील?

मृत्यू झाला त्या घरातील पुरावे काहीसे परस्पर विरोधी होते. घरात या दोघांव्यतिरिक्त अन्य कोणाच्या हाताच्या बोटांचे ठसे अथवा अन्य तत्सम खुणा आढळल्या नाहीत. आत्महत्या असली तरी दोघांनी किंवा एकाने काहीतरी निवेदन लिहून ठेवले असते. घरातील इलेक्ट्रिक टाईपरायटर १८ दिवस झाले तरी चालू होता. घरातील धोक्याचा इशारा देणारी घंटा बंद करण्यात आली होती. प्रवेशद्वाराच्या जमिनीवर किल्ल्या पडल्या होत्या. घराच्या गच्चीवरील दरवाजा उघडा होता. टाईप करत असलेला शब्द अर्धवट सोडून गर्ट अभ्यासिका सोडून वरच्या मजल्यावर गेला तो कोणाची चाहूल लागली म्हणून गेला असेल का? आत्महत्या कपाळात गोळी मारून सहसा कोणी करत नाही. मारेकऱ्याने ती गोळी मारली असेल का? बंदुकीच्या गोळ्या गर्टच्या शेजारी पडलेल्या बंदुकीनेच मारल्या गेल्या होत्या. त्या बंदुकीतून एका वेळेस दोनच गोळ्या मारता येतात. तिसरा कोणी मारेकरी ही बंदूक कशाला वापरील? गर्टच्या हातावर गनपावडर होती. त्याने स्वत: आत्महत्या करण्याचा निर्णय निराशेच्या झटक्यातून केला; परंतु आपल्याशिवाय पेट्राने जगू नये म्हणून पेट्राला गोळी मारून मग स्वत:ला मारावी असा निर्णय त्याने कशावरून घेतला नसेल? झटापटीच्या

कोणत्याही खुणा पेट्राच्या खोलीत किंवा गर्टचा मृतदेह होता तिथे दिसत नव्हत्या. पेट्राच्या शेजारी एक उघडे पडलेले पुस्तक आणि तिचा वाचण्याचा चष्मा होता.

जर्मन पोलिसांनी हा खून नसून आत्महत्त्या किंवा पेट्राचा खून व गर्टची आत्महत्या असल्याचा निष्कर्ष अवघ्या २४ तासात काढला आणि पुढील अधिक काही चौकशी करण्याची गरज नाही, असा निर्णय दिला. गर्टच्या हातावरील गनपावडर कोणीतरी पेरली असण्याच्या शक्यतेचा ते विचारही करावयास तयार नाहीत.

खून झाला असेल तर कोणी केला असेल? यावरही काही तर्क मांडण्यात आले आहेत. अण्वस्त्र निर्मितीला पाठिंबा देणारे असू शकतील, नाझी शक्ती - ज्या अधूनमधून जर्मनीत डोके वर काढीत असतात, त्यापैकीही कोणी असू शकेल. बर्लिन परिषदेहून परत येताना, ज्यू हत्याकांडाच्या स्मारकापाशी आदरांजली अर्पण करण्याकरिता गर्ट व पेट्रा थांबले होते. गर्टने जर्मनीत पुन्हा एकदा अतिरिक्त राष्ट्रवाद उफाळून येत आहे याबद्दल इशारा देणारी पत्रे वर्तमानपत्रात लिहिली होती. चीनविरुद्ध तिबेटच्या बाजूने पेट्राने भूमिका घेतली म्हणून चिनी गुंडांनी खून केला असेल, असाही संशय काहींनी व्यक्त केला आहे.

पेट्रा केली पुरस्कार

पेट्रा केलीने केलेल्या संपूर्ण कार्याचा परिचय एका लहानशा लेखात करून देणे अशक्य आहे. तिने लिहिलेले पाच ग्रंथ, लेख, दिलेल्या मुलाखती यांचा परिचय करून देण्याकरिता सुद्धा एक लेख अपुरा पडेल. जिला पर्यायी नोबेल पुरस्कारासारखा श्रेष्ठ आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. तिच्याच नावाने तिच्या मृत्यूनंतर एक आंतरराष्ट्रीय पुरस्कार स्थापन करण्यात आला, यातच तिच्या महत्त्वपूर्ण कार्यांचे मूल्यांकन नोंदविण्यात आले आहे. 'पेट्रा केली पुरस्कार' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे वितरण १९९८ पासून सुरू झाले.

आपल्या कार्याबद्दल तिने स्वत: एकदा केलेले मूल्यमापनही लक्षात ठेवण्यासारखे आहे. एका जर्मन वृत्तपत्राला मुलाखत देताना तिने एका ग्रीक मिथ्यकथेचा संदर्भ दिला होता. सिसिफसला मिळालेल्या एका शापानुसार, त्याने एक मोठा दगड, एका टेकडीवर ढकलत नेण्याची आज्ञा त्याला करण्यात आली होती. दगड वर नेला की तो खाली घरंगळत येत असे, तो पुन्हा वर चढवावा लागे. कधी तरी तो दगड वर स्थिरावेल, असा विश्वास बाळगून कार्य करीत राहावयाचे असे या मिथ्यकथेचा संदर्भ देऊन पेट्राने सुचविले होते.

'दोनही बाजूंनी तेवत राहणारी मेणबत्ती' असे तिचे वर्णन एका पत्रकाराने केले आहे.

(मिळून साऱ्याजणी, जून २००५)

❑

क्रांतिकारक भगतसिंगाचे 'प्रेमप्रकरण!'

२८ सप्टेंबर २००६ ते २८ सप्टेंबर २००७ हे वर्ष शहीद भगतसिंग या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका देशभक्ताचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून देशभर कमीअधिक प्रमाणात साजरे केले गेले. सर्वात अधिक उपक्रम पंजाब, महाराष्ट्र व बंगालमध्ये आयोजित करण्यात आले होते. हौतात्म्य हसतमुखाने स्वीकारण्याचे बाबतीत भगतसिंगाच्या बरोबर २३ मार्च १९३१ रोजी फासाच्या तक्तावर चढलेले राजगुरू व सुखदेव तसूभरही मागे सरकले नाहीत. फरक होता तो हा की भगतसिंग हा दृढनिश्चयी व त्यागी तर होताच पण मुख्यत: अधिक अभ्यासू व चिंतनशील होता. राजकारण असो की वैयक्तिक जीवन असो, त्याचे चित्त विवेकनिष्ठेला प्राधान्य देण्याकडे अधिक झुकलेले असे.

किशोरवयात असतानाच जीवन देशकार्यासाठी समर्पित करण्याचा निर्णय भगतसिंगने घेतला होता. संपूर्ण जीवनच जर राजकीय धकाधकीत घालवायचे असेल तर त्यात वैवाहिक जीवन हे व्यत्यय ठरण्याची शक्यता आहे असे समजून त्याने अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला होता. परंतु पारंपरिक रीतीरिवाजानुसार त्याच्या वडिलांनी मुलाचे लग्न १६-१७ व्या वर्षीच करून देण्याचे ठरविले. ते मुलगी पाहून, ठरवूनही आले. भगतसिंग त्यावेळेस लाहोरला लाला लजपतराय यांनी स्थापन केलेल्या कॉलेजमध्ये शिकत होता. वडिलांनी पत्र लिहून लग्नासाठी काही दिवसांकरीता त्याने गावी परत यावे असे कळविले. वडिलांबद्दल पूर्ण आदर असूनही भगतसिंगने आपला अविवाहित राहण्याचा निर्णय ढळू दिला नाही. उत्तरादाखल त्याने कळविले की, ''माझे जीवन मी उच्च आदर्शासाठी समर्पित केले आहे. त्यामुळे मला सांसारिक सुख आणि तज्ञन्य ऐष व आराम यांचे आकर्षण नाही. आपल्याला आठवत असेल की मी लहान असताना माझ्या उपनयन संस्काराच्या वेळी आजोबांनी असे सांगितले होते की ते मला देशकार्यासाठी समर्पित करीत आहेत. म्हणून मी त्यांची प्रतिज्ञा पूर्ण करीत आहे. मला आशा आहे की आपण मला माफ कराल.''

अशा एका दृढनिश्चयी युवकाच्या आयुष्यात एखादे 'प्रेमप्रकरण' उद्‌भवेल याची

शक्यता कितपत विश्वसनीय मानावयाची? स्त्री आणि पुरुष यांच्यात जरा कोठे आपुलकी निर्माण झाली, वागुणकीत मोकळेपणा, मग तो संयमपूर्ण असला तरी, वैषयिक प्रेम अथवा शारीरिक संबंध यापेक्षा वेगळे काही नाते असू शकते, निकोप, नितळ मैत्री असू शकते यावर जीर्ण परंपरांचा प्रभाव ज्यांच्या मनावर असतो, त्यांचा विश्वास असूच शकत नाही, असे सर्वसामान्यपणे आढळून येते. भगतसिंगांनाही त्यांच्या आयुष्यात अशाच एका प्रेमप्रकरणाच्या 'संशयकल्लोळाला' सामोरे जावे लागले.

हुतात्मा भगवती चरण व्होरा यांच्या पत्नी दुर्गादेवी (त्यांना दुर्गाभाभी म्हणत असत) आणि भगतसिंगांचे सहकारी श्री. शिव वर्मा यांनी या 'प्रेमप्रकरणा' बाबतचा खुलासा नोंदविला आहे.

सायमन कमिशनला विरोध करण्यासाठी निघालेल्या मोर्च्यात ज्येष्ठ नेते लाला लजपतराय सामील झाले होते. मोर्च्यात सुमारे ५ हजार लोक जोरदार घोषणा देत होते. लाहोरचे पोलीस प्रमुख जे.ए.स्कॉट बंदोबस्तासाठी हजर होते. पोलिसांनी लोकांवर लाठीहल्ला सुरू केला व मागे परतण्याचा हुकूम दिला. लोकांनी जागेवरून हलू नये असे लाला लजपतराय यांनी आवाहन केल्यामुळे संतप्त झालेल्या स्कॉटने लालाजींवर जोरदार लाठीहल्ला चढवून त्यांना रक्तबंबाळ केले. लालाजी त्यातून आजारी पडले आणि लवकरच (सुमारे १ महिन्यात) मरण पावले. भगतसिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांनी याचा बदला घेण्याकरीता स्कॉटला ठार मारण्याचे ठरविले. लाठीहल्ल्याच्या ठिकाणी सँडर्स नावाचा एक पोलीस अधिकारीही हजर होता. मध्यवर्ती कार्यालयातून स्कॉट बाहेर पडला की त्याच्यावर गोळ्या झाडावयाच्या असे ठरले होते. १७ डिसेंबर १९२८ ही तारीख ठरविण्यात आली होती. ठरल्या दिवशी ठरल्या वेळी सगळे जमले. प्रत्यक्ष गोळ्या झाडण्याची जबाबदारी भगतसिंग आणि राजगुरू यांच्यावर सोपविण्यात आली होती. स्कॉट बाहेर पडत असल्याचा इशारा जयगोपाळ देणार होता. दुपारचे सुमारे साडेचार वाजले होते. एक गोरा पोलीस अधिकारी कार्यालयातून बाहेर पडला. तो स्कॉट आहे असे समजून जयगोपाळने इशारा दिला. प्रथम राजगुरूने व त्याच्या पाठोपाठ भगतसिंगने गोळ्या झाडल्या. ठार मारलेला अधिकारी हा स्कॉट नसून सँडर्स आहे हे जवळून पाहिल्यावर लक्षात आले. स्कॉटला जरी मारता आले नसले तरी लाला लजपत राय यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल इंग्रज अधिकाऱ्याला मारून सूड घेण्याचे मुख्य उद्दिष्ट साध्य झाले होते. आता लाहोरहून निसटून जाण्याची तयारी करावयाची होती.

ही जबाबदारी मुख्यत: सुखदेवची होती. चंद्रशेखर आझाद यांनी साधूचा वेश परिधान करून मथुरेकडे जावयाचे असे ठरले. सर्वजण प्रथम संघटनेच्या गुप्त ठेवण्यात आलेल्या मुख्य कार्यालयात जमले. रात्री १० वाजल्यानंतर सर्वजण दुसऱ्या एका गुप्त राखण्यात आलेल्या मुक्कामी हलले. त्या कचेरीत ते दोन दिवस राहिले. त्यानंतर म्हणजे १९ डिसेंबर १९२८ रोजी सुखदेव दुर्गाभाभींच्या घरी रात्री जाऊन पोहोचले.

त्यांचे पती भगवती चरण व्होरा हे कलकत्त्याला काँग्रेसच्या अधिवेशनासाठी गेलेले असल्यामुळे त्या घरी त्यांच्या लहान बालकासह एकट्याच होत्या. एका 'धोकादायक' व्यक्तीच्या सोबतीने कलकत्त्याला जावे लागणार आहे. वाटेत कदाचित पोलिसांचा गोळीबारही होईल, तरीही साथ देण्याची तयारी आहे ना असे विचारताच भाभींनी मोठ्या प्रसन्नतेने तयारी दर्शविली. कोणाच्याबरोबर प्रवास करावा लागणार आहे ते सुखदेवने त्या भेटीत सांगितले नाही. भाभींच्या घरावरही दिवसभर पोलिसांचा पहारा असावयाचा. ते कडक थंडीचे दिवस होते. रात्री सुमारे १० वाजल्यानंतर पोलीस पहारा अगदी शिथिल होत असे. म्हणून रात्री ११ च्या सुमारास भगतसिंग व राजगुरूंना बरोबर घेऊन सुखदेव भाभींच्या घरी येऊन पोहोचला. भगतसिंगने तुळतुळीत दाढी केली होती आणि डोक्यावर सध्या सर्व परिचित असलेली फेल्ट हॅट घातलेली होती. भगतसिंगने स्मित करून संभाषण सुरू केल्यानंतरच भाभींनी त्याला ओळखले. भाभींनी भगतसिंगाची पत्नी म्हणून बालकाला कडेवर घेऊन आणि राजगुरूने या कुटुंबाचा नोकर म्हणून कलकत्त्यापर्यंतचा प्रवास रेल्वेने करावयाचा असे ठरले. स्वत: भगतसिंग याने आय.सी.एस्. अधिकाऱ्याच्या थाटात वावरायचे असेही ठरले. दुर्गाभाभी या एक अतिशय प्रेमळ, धैर्यशील कार्यकर्त्या होत्या आणि त्या सर्वांशीच आपुलकीने वागत असत. भगतसिंगकडे त्यांचा थोडा अधिक ओढा होता. त्या दोघांच्या वयामध्ये अगदी थोड्या दिवसांचे अंतर होते. म्हणून भाभींच्या वाढदिवसाच्या दिवशी ती दोघे दोघांचा मिळून एकच वाढदिवस साजरा करीत असत. भगवतीचरण व्होरा यांना हे सर्व माहीत असूनही, त्यांनी त्याबाबत कोणताही आक्षेप कधीही घेतला नाही. भगतसिंगांची पत्नी या नात्याचा मुखवटा घेऊन कलकत्त्यापर्यंतचा प्रवास भाभींनी केला हे पाहून ते म्हणाले होते, ''तुझ्या योग्यतेची जाणीव आजपर्यंत मला कधी झाली नव्हती.'' कलकत्त्याला जाण्याच्या प्रवासात आपली ओळख पोलिसांना पटू नये म्हणून या तिघांनी कानपूरमधील एका हॉटेलात एक दिवस मुक्काम केला आणि दुसरी गाडी पकडून ते कलकत्त्याला गेले. कानपूरहून भाभींनी आपल्या पतीला आपण आपल्या भावाबरोबर कलकत्त्याला येत आहोत अशा मजकुराची तार केली होती. आपल्या पत्नीला भाऊ नसल्यामुळे भगवती चरण व्होरा तार वाचून बुचकळ्यात पडले होते. परंतु भगतसिंगांना पाहिल्यावर त्यांना वाटत असलेला अचंबा दूर झाला.

भाभींनी पत्नी या नात्याने भगतसिंगबरोबर प्रवास केला आहे ही बातमी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्यात पसरली आणि अफवांची कुजबूज सुरू झाली. त्या दोघांचे प्रेमप्रकरण आहे असा बोलबाला मुख्यत: सुखदेव राज नावाच्या एका बेजबाबदार कार्यकर्त्याने सुरू केला. अशा बातम्यांवर अनेकांचा चटकन विश्वास बसतो. नीट चौकशी न करता कित्येकदा लेखी विधाने करण्याचीही काहींची प्रवृत्ती असते. विष्णू प्रभाकर आणि राजेंद्र कीश्वर यांनी लिहिलेल्या पुस्तकात अशी निराधार विधाने केली आहेत. असेंब्ली हॉलमध्ये बॉम्ब टाकण्याबाबत कार्यकर्त्यांच्यात चर्चा चालू होती त्यावेळेस भगतसिंगने

ही जबाबदारी स्वीकारण्यात पुढाकार घ्यावा असे सुखदेवचे मत होते. परंतु आरंभी भगतसिंगचे नाव पुढे येत नव्हते आणि आपणहून पुढाकार घेणे भगतसिंगला प्रशस्त वाटले नसेल तर त्याचा स्वभाव लक्षात घेता ते समजण्यासारखे आहे. परंतु भगतसिंगला मुद्दाम खिजवण्याकरीता सुखदेव त्याला म्हणाला होता, ''का, प्रेमप्रकरणामुळे ही जबाबदारी स्वीकारण्याचे टाळतो आहेस की काय?'' पुढे तुरुंगात असताना सुखदेव आपल्या सह बंदीवानांना म्हणाला होता, ''भगतसिंगने बॉम्ब टाकण्याचे बाबतीत पुढाकार घ्यावा असे मला वाटत होते म्हणूनच त्याला खिजवण्याकरीता हा टोमणा मी मारला होता.''

असे आहे हे बहुतांशी कमी ज्ञात असलेले भगतसिंगाचे 'प्रेमप्रकरण'. दुर्गाभाभी व शिव वर्मा यांनी दिलेल्या मुलाखतींमध्ये प्रेमप्रकरणात काहीही तथ्य नसल्याचे नमूद केले आहे.

प्रेमप्रकरणात जरी तथ्य नसले तरी भगतसिंग हे चिंतनशील असल्यामुळे त्यांनी प्रेमभावनेविषयी अवघ्या तेविसाव्या वर्षी व्यक्त केलेले विचार वाचकांना मननीय वाटतील असे वाटते. त्यांचे सहकारी सुखदेव यांना त्यांनी तुरूंगातून लिहिलेल्या पत्रातील खालील उतारे त्यांच्या प्रगल्भतेची साक्ष पटवून देतात.

''मी ठामपणे असे सांगू शकतो की आशा-आकांक्षांनी भरलेल्या जीवनातील समस्त रंगांनी मी ओतप्रोत भरलेलो आहे, पण वेळ येताच मी सारे काही समर्पित करीन. बलिदानाचा खरा अर्थ हाच आहे. तो जर माणूस असेल तर या गोष्टी त्याच्या जीवनात अडसर निर्माण करू शकत नाहीत. लवकरच तुला याचा पुरावा मिळेल. कुणाच्याही आयुष्याचा विचार करताना प्रेम हे कुण्या माणसाला साहाय्यकारी झाले आहे का, याचा विचार व्हायला हवा. याचे उत्तर मी आज देतो, हो (साहाय्यकारी झाले आहे.) तो मॅझिनी होता! तू नक्कीच वाचले असशील की त्याचे पहिले अयशस्वी बंड, मनाला चिरडून टाकणाऱ्या पराभवाचे दु:ख आणि दिवंगत सहकाऱ्यांच्या आठवणी, हे सर्व तो सहन करू शकत नव्हता. कदाचित तो वेडा झाला असता वा त्याने आत्महत्याच केला असती. पण प्रेयसीच्या एका पत्राने तो इतरांएवढाच नव्हे, तर त्यांच्याहीपेक्षा अधिक कणखर झाला.

प्रेमाच्या नैतिक पातळीबाबत मी असे म्हणेन की ही स्वत: एक भावनाच आहे, त्यापेक्षा अधिक काही नाही आणि ती पशुवृत्ती नाही, तर मधुर मानवी भावना आहे. प्रेम हे जर खरे प्रेम असेल तर ते सदैव माणसाचे व्यक्तित्व उदात्त करते. ते कधीच अध:पतन करत नाही.

चित्रपटात जसे त्या मुलींना सतत पशुवृत्तीच्या हातातले बाहुले म्हणून दाखवले जाते तसे या तरुणींना (प्रेयसींना) आपण कधीच वेड्या म्हणू शकत नाही. खरे प्रेम कधीही निर्माण केले जाऊ शकत नाही. ते आपोआप उमलते, कधी? हे मात्र कोणीही सांगू शकत नाही.

माझे असे म्हणणे आहे की तरुण-तरुणी एकमेकांवर प्रेम करू शकतात आणि आपल्या प्रेमाच्या आधारे ते आपल्या आवेशपूर्ण इच्छांच्या पलीकडे जाऊ शकतात. आपले पावित्र्य कायम ठेवून राहू शकतात.

मला इथे हे स्पष्ट करावयाचे आहे की प्रेमाला जेव्हा मी मनाची दुर्बलता म्हटले होते ते कुठलीही सामान्य व्यक्ती ज्या बौद्धिक पातळीवर विचार करते अशा व्यक्तीला समोर ठेवून म्हटले नव्हते. पण मनुष्य जेव्हा प्रेम, तिरस्कार आणि इतर सर्व भावनांवर नियंत्रण मिळवेल तेव्हा ती सर्वात उच्च अशी आदर्श अवस्था असेल, जेव्हा माणूस केलेल्या कृतीआधारे आपली बाजू ठरवेल. एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीविषयी वाटणाऱ्या प्रेमाबाबतीत मी जी टीका केली आहे, ती एका उच्च आदर्श अवस्थेच्या संदर्भात. माणसामध्ये प्रेमाची एक प्रगाढ भावना असायलाच हवी, मात्र तिला एका व्यक्तीपुरती मर्यादित न ठेवता, त्याने ती सर्वव्यापी बनवायला हवी.''

(संदर्भ : भगतसिंह के संपूर्ण दस्तावेज, संपादक : प्रा. चमनलाल, पृष्ठ १७७-७८, अनुवादक : दत्ता देसाई)

आपण वाचत असलेल्या पुस्तकातील टिपणे नोंदविण्याची सवय भगतसिंगला होती. चार्ल्स डिकन्सच्या 'पिकविक पेपर्स'मधील खालील वाक्य त्याने नोंदविले आहे :

प्रेम : 'मानवाचा सगळ्यात मनोहारी आणि क्षम्य असा दुर्बळपणा.'

ऑप्टन सिंक्लेअरच्या 'ऑईल' या कादंबरीतील टिपलेले एक वाक्य :

प्रेम आणि प्रणय : 'प्रणय हा जरी प्रामाणिक प्रेमाचा आणि उत्कट भावनांचा परिपाक असला तरी तो करणे हे लाजिरवाणे आणि अनैतिक आहे, या परंपरेचा पगडा आपल्या तरुण लोकांवर आहे, ही किती दु:खाची बाब आहे!'

(पुरुष उवाच, २००७)

❑

श्रेष्ठ मूल्यांसाठी बलिदान

जगातील साऱ्या लोकसमूहांमधील कलह मिटावेत, प्रेमाधिष्ठित स्नेहपूर्ण जीवन जगण्यातच सार्थक मानावे किंवा अशा आशयाचे आग्रहाने प्रतिपादन करणाऱ्या, वेळप्रसंगी यातना सहन करणाऱ्या किंवा बलिदान देणाऱ्या जगातील व्यक्तींची संख्या फार मोठी नाही.

अशाच एका श्रेष्ठ भारतीय व्यक्तीचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर या गावी झाला. मोहनदास करमचंद गांधी या नावाचे बालक पुढे कधी काळी, केवळ स्वदेशीयांच्याच नव्हे तर साऱ्या मानव जातीच्या कल्याणाचा विचार करणारा महात्मा बनेल आणि कधी राहुटीसारख्या आश्रमात राहून, तर कधी झोपडपट्टीत राहून, कधी बिर्लाभवनसारख्या भव्य प्रासादात राहून, तर कधी तुरूंगात राहून, अत्यल्प वस्त्रांनी स्वतःचे अंग झाकून, कधी एखाद्या महारोग्याशी, तर कधी इंग्लंडच्या जॉर्ज बादशहाशी हस्तांदोलन करीत, अनाक्रमक प्रवृत्तीने न्याय प्रस्थापनेसाठी संघर्षांचे अभिनव तंत्र शोधून काढील, असे वाटण्याजोगे कोणतेही गुण त्याच्या बालवयात कोणाच्याही दृष्टोत्पत्तीस आले नव्हते.

वयाच्या २४ व्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी गेलेला हा युवक, राजकीय संघर्षात अनपेक्षितपणे ओढला गेला. गोऱ्या सत्ताधाऱ्यांच्या वर्णवर्चस्वाच्या गुर्मीतून तेथील भारतीय कामगारांना मिळत असलेल्या निर्घृण वागणुकीचे दर्शन गांधींना घडले. अन्य व्यावसायिकांचीही योग्य प्रतिष्ठा राखली जात नसे. कर लादण्यातही बेगुमानपणा होता, स्वतः श्री. गांधीनाही वेळोवेळी अपमान सहन करावे लागले. या सर्व परिस्थितीतून अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची ज्योत त्यांच्या मनात पेटली. आता प्रश्न होता तो लोकांना संघटित करण्याचा आणि संघर्षाचे स्वरूप ठरविण्याचा. गांधी त्या वेळी नाताळ येथे राहत होते. भारतीय मजुरांना रास्त हक्क मिळावेत या करिता मोहीम उभारण्याकरिता १८९४ साली 'नाताळ इंडियन काँग्रेस'ची स्थापना करण्यात गांधींनी पुढाकार घेतला.

या कालखंडात वाचन करीत असताना गांधींवर तीन लेखक-विचारवंतांचा प्रभाव

पडला. त्यापैकी विख्यात रशियन लेखक, काउंट लिओ टॉलस्टॉय हा जागतिक शांतता आणि अन्यायाविरुद्ध अनाक्रमक प्रतिकाराचा (passive resistence) पुरस्कर्ता होता. जॉन रस्किन हा इंग्रज लेखक (निबंधकार) युद्धाला विरोध करण्यासाठी स्त्रियांनी हाताच्या दंडावर काळी फीत बांधून, रस्त्यावर येऊन मिरवणुका काढाव्यात, असे आवाहन करीत असे. राजकीय-सामाजिक जीवनात स्त्रियांनी सहभागी व्हावे, म्हणजे वैयक्तिक व सामाजिक जीवनाची नैतिक उंची वाढेल या मतांचाही तो पुरस्कर्ता होता. हेन्री डेव्हिड थोरो या अमेरिकन तज्ज्ञ - लेखकाने अन्याय व जुलमाविरुद्ध सविनय कायदेभंग (civil disobedience) करणे हे लोकशाहीशी सुसंगत आहे या मताचे विस्तृत विवेचन केले होते. कुराण व भगवद्‌गीता हे ग्रंथही गांधींनी वाचले होते. परंतु वर उल्लेखलेल्या तीन लेखकांचा गांधींच्या मनावर खोल परिणाम झाला. तीनही लेखक परदेशी असूनही परकीय विचारप्रणालीचे दलाल किंवा प्रचारक अशी हेटाळणी गांधींची कोणी कधी केली नाही. याचे कारण काय असावे?

तीनही थोर लेखकांच्या वैचारिक मांडणीचे मर्म गांधींनी आत्मसात केले होते. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, स्वत: धर्मनिष्ठ असूनही, सार्वजनिक ऐहिक व्यवहारातील धर्मनिरपेक्षता, सामाजिक क्षमता, स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याकरिता प्रोत्साहन, परमेश्वरावर निष्ठा पण दैवाधीनतेला विरोध या आधुनिक युगाशी सुसंगत अशा मूल्यांचा स्वीकार व पुरस्कार गांधींनी केला; परंतु व्हिटॅमिन्सच्या गोळ्या खाण्याच्या ऐवजी गांधी बकरीचे दूध पीत असत. डॉ. गिल्डर किंवा डॉ. सुशीला नायर यांच्यासारख्या पाश्चात्त्य वैद्यकशास्त्रातील डॉक्टरांचा सल्ला ते घेत असले तरी अनेक दुखण्यांवर आयुर्वेदाच्या परंपरेतील शरीराच्या अवयवांवर माती लिंपनाचा उपचार ते करून पाहत असत. सूतकताई, ग्रामसफाई, अस्पृश्यता निवारण असे अनेक उपक्रम स्वत: हातात घेऊन अस्पृश्यांना त्याची अंमलबजावणी करण्यास ते उद्युक्त करीत असत. धर्मसंस्थापनेचे उद्दिष्ट, प्रेमभावना लोकमानसात रूजविणे हे असते, म्हणून धर्माचारण विद्वेष पेटविण्यावर अधिष्ठित असता कामा नये याकडे लक्ष वेधण्याकरिता आपल्या दैनंदिन सार्थ प्राथनेत त्यांनी ईश्वर आणि अल्ला यांना समान स्थान दिले आणि जगन्नियंत्याने सर्वांना सन्मती द्यावी अशी त्याची आराधना त्यांनी केली. आपले कार्य व विचारधारणेचे मुखपत्र त्यांनी इंग्रजीतून चालविले असले, तरी भारतातील विभिन्न भाषीय लोकांमध्ये राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण व्हावी याकरिता हिंदी भाषा प्रसृत करण्यावर त्यांनी भर दिला.

दक्षिण आफ्रिकेत वीस वर्षे वेगवेगळ्या अन्यायविरुद्ध संघर्ष उभारण्यात गांधी मग्न होते. या सर्व संघर्षातून संपूर्ण यश प्राप्त झाले असे नाही; परंतु ध्येयापासून विचलित न होता, निर्भयपणे, दृढ निश्चयाने पण अनाक्रमकपणे संघर्ष चालू ठेवल्यास त्या करिता आवश्यक असलेली सोशिकता उरात बाळगल्यास, टप्प्या-टप्प्याने यश हस्तगत करता येते, असा विश्वास तेथील भारतीयांच्या मनात निर्माण करून १९१४

साली गांधी भारतात परत आले.

आपले राजकीय गुरू नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी भारतभर दौरा करून भारतीय समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. परकीय राजकीय वर्चस्वापासून मुक्तता एवढेच करून भागणार नाही, तर आर्थिक-सामाजिक विषमता, धर्माधिष्ठित विद्वेष, यासुद्धा फार मोठ्या दारूण समस्या आहेत, म्हणून व्यापक समाजप्रबोधनाची आणि सर्वांगीण पुनरुत्थानाची गरज आहे, हे त्यांच्या लक्षात आले.

चंपारणमधील जंगल कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी उभारलेल्या सत्याग्रहापासून तो इंग्रज राज्यकर्त्यांना 'छोडो भारत' हा इशारा देऊन, प्रज्वलित केलेल्या आंदोलनापर्यंत आणि हिंदू-मुस्लिम दंगे थांबावेत याकरिता कोलकत्ता आणि दिल्ली येथे स्वातंत्र्योत्तर काळात केलेल्या उपोषणांपर्यंत म. गांधींच्या नेतृत्वाखाली झालेले संघर्ष हे केवळ राजकीय आघाडीपुरते मर्यादित नव्हते. म. गांधींचे समग्र वाङ्मय १०० खंडांत समाविष्ट झालेले आहे, त्यात हर एक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी मांडलेले विचार आणि सुचविलेले उपक्रम यांचे दर्शन घडते. यातील सगळे विचार पुष्कळ लोकांना पटतीलच असे नाही; परंतु आत्मक्लेषातून विरोधकांचे मन जिंकण्याचे प्रयोग करू पाहणाऱ्या या अनन्यसाधारण नेत्याचे विविध समस्यांबाबतचे भान किती व्यापक होते हे लक्षात येते. आयुष्यात १७ वेळा त्यांनी उपोषण केले. १९४४ साली, आगाखान पॅलेस येथील बंदिवासातून सुटून आल्यानंतर ते महंमद अली जिना यांना त्यांच्या घरी जाऊन १४ वेळा भेटले. देशाच्या फाळणीचा आग्रह त्यांनी धरू नये याकरिता त्यांचे मन वळविण्याचा म. गांधींनी परोपरीने प्रयत्न केला; परंतु त्यांना यश प्राप्त झाले नाही. अखेर, हिंदू व मुसलमान मिळून सुमारे ७ ते ८ लाख लोकांना स्थलांतर करणे भाग पडले आणि दोनही देशांना आपापले स्वातंत्र्य दु:खमय वातावरणातील जल्लोषाने स्वीकारावे लागले.

भारतीयांचे मन दु:खाने ग्रस्त असतानाच पुण्यातील एका दैनिकाच्या युवक संपादकाचे आणि हिंदू महासभा या नावाच्या पक्षाच्या क्रोधांध कार्यकर्त्याचे मन मात्र सूड भावनेने पछाडलेले होते. भारताच्या फाळणीला एकट्या म. गांधींनी मुसलमानांशी अनुसरलेल्या लांगुलचालनाचे धोरण जबाबदार आहे असे त्याला वाटले. मुळात मुसलमान परदेशातून आक्रमण करून या देशात आले होते. जातिव्यवस्थाधिष्ठित सामाजिक जुलमातून मुक्त होण्याकरिता अनेकांनी स्वधर्मत्याग करून, तुलनेने सामाजिक समता अधिक असलेला इस्लाम धर्म स्वीकारला होता. अस्तित्वात असलेल्या सत्ताधाऱ्यांचे लांगुलचालन केल्यास सरकार दरबारी व अन्यत्र राज्यकारभारात उच्चपदस्थ होता येईल या आशेनेही अनेकांनी धर्मांतर केले होते. अशा या परदेशी-स्वदेशी मुसलमानांनी मिळून या देशावर सुमारे ७०० वर्षे राज्य केले. ते म. गांधींच्या 'लांगुलचालनाच्या' धोरणामुळे नव्हे हे लक्षात घेण्याइतके इतिहासाचे भान नथुराम गोडसे या नावाच्या त्या युवकाला आले नाही. त्या राजवटीतील

जुलमाविरुद्ध शिवाजीमहाराज किंवा राणाप्रताप लढले होते; परंतु १८५७ च्या ब्रिटिश विरोधी उठावात बहादुरशा जाफर या दिल्लीच्या सिंहासनावरील बादशहाला नेतृत्व देण्यात आले होते. या वास्तवाकडेही दुर्लक्ष करण्यात आले. इंग्रजांपूर्वी भारताचे राज्यकर्ते आपण होतो ही मुसलमानांच्या मनातील भावना सतत चेतवीत ठेवण्याची कुटिल कारवाई इंग्रज राज्यकर्त्यांनी चालू ठेवली होती.

लखनौ करार या नावाने ओळखला जाणारा सुप्रसिद्ध करार करून लो. टिळकांनी मुसलमान नेत्यांच्या मनात असलेली फुटिरतेची भावना लयाला जावी याकरिता प्रयत्न केला होता.

इंग्रज राज्यकर्त्यांच्या मनात प्रेमाची भावना जागृत करून ते करीत असलेल्या अन्यायाकडे सर्वांचे लक्ष वेधावे आणि भारताला स्वातंत्र्य देण्याने ही प्रेमभावना दोघांच्या मनात वृद्धिंगत होईल हे इंग्रजांना पटवून देण्याचे कार्य म. गांधी करीत होते. शस्त्रबळाने मिळविलेल्या स्वातंत्र्याने दोघांच्याही मनात कटुता शिल्लक राहील आणि जगातील सारी कटुता विरून जावयास हवी असेल, तर संयम आणि सौहार्द यांचीच जोपासना उपकारक ठरेल यावर म. गांधींचा दृढ विश्वास होता. हे लांगुलचालन नव्हते. ती व्यापक, उदात्त भावना होती. याच तत्त्वाला अनुसरून, बहुसंख्य हिंदू असलेल्या भारतात मुसलमानांना सुरक्षितता वाटावी याकरिता म. गांधी अनेक तडजोडी करावयास तयार होते. अमूर्त पातळीवर, एकतर्फीपणे उच्च नैतिक तत्त्वे प्रसृत करण्याचा प्रयत्न केला, तर त्यात सद्‌भावना असली, तरी त्याला अनुकूल प्रतिसाद प्रतिपक्षाकडून मिळण्याची शक्यता कितपत आहे असा प्रश्न जर कोणाच्या मनात आला तर तो चर्चेचा विषय ठरू शकतो; परंतु देशाची फाळणी टाळण्यात म. गांधींना अपयश आले. या करिता त्या शांतिदूताच्या छातीत पिस्तुलाच्या गोळ्या झाडण्याची दुर्बुद्धी गोडसेच्या मनात निर्माण झाली याचे कोणतेही समर्थन कधीही होऊ शकत नाही.

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या सुमारे एक महिना आधी, ११ जुलै १९४७ रोजी, ब्रह्मदेशचे (म्यानमारचे) पंतप्रधान, उ. ऑंग सान आणि त्यांचे सहकारी यांची गोळ्या मारून हत्या करण्यात आली होती. गोडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हा मार्ग स्वीकारण्याकरिता हे एक पूरक कारण ठरले असावे.

३० जानेवारी १९४८ ची ती संध्याकाळ होती. दिल्लीत असताना सहसा नेहमी म. गांधी बिर्ला भवनमध्ये राहत असत. रोज संध्याकाळी पाच वाजण्याच्या जरा आधी ते त्यांच्या नित्याच्या सायंप्रार्थनेसाठी बाहेर पडत असत. सहसा ते काटेकोरपणे वेळ पाळत असत; परंतु त्या दिवशी बिर्ला भवनमधून बाहेर पडण्याला थोडा उशीर झाला. पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्यातील राज्यकारभारातील धोरणांविषयी मतभेद वाढू लागले होते. म. गांधी ते मिटविण्याचा प्रयत्न करीत होते. आधी ठरल्याप्रमाणे सरदार पटेल गांधींना भेटण्यासाठी आले होते. चर्चा थोडी लांबली म्हणून म. गांधींना प्रार्थनेसाठी बाहेर पडण्याला थोडा उशीर झाला. याच महिन्यात दिल्लीतील दंगे

थांबावेत याकरिता सहा दिवस त्यांनी उपोषण केले होते. फाळणी झाली त्या वेळेस दोनही देशांनी जी एकमेकांना लेखी आश्वासने दिली होती त्यात भारताने पाकिस्तानला रु. ५५ कोटी देण्याचे आश्वासन दिले होते; परंतु पाकिस्तानने काश्मीरचा कब्जा मिळविण्याकरिता लष्करी कारवाई केल्यामुळे, आक्रमण मागे घेईतोपर्यंत उरलेली रक्कम देण्याचे भारत सरकारने तहकूब केले होते; परंतु फाळणीच्या वेळी दिलेले आश्वासन पाळावे अशी म. गांधींची भूमिका होती. भारताने दिलेले वचन आणि पाकिस्तानने केलेले आक्रमण यांची गल्लत करू नये असा सल्ला त्यांनी दिला. उपोषणानंतर दंगेही थांबले आणि भारत सरकारने तहकुबी मागे घेऊन रु. ५५ कोटी देण्याचे मान्य केले. प्रदीर्घ काळ देशसेवा करून आणि नुकतेच उपोषण करून ७८ वर्षांचे म. गांधी थकलेले होते. त्यांच्या उपोषणानंतर २० जानेवारी १९४८ रोजी त्यांच्या सायंप्रार्थनेच्या परिसरात बॉम्ब फेकून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला होता; पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. तरीही खास आपल्यासाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था ठेवू नये असे गांधींनी बजावले.

प्रार्थनेला जाण्यासाठी थोडा उशीर झाला असल्यामुळे, म. गांधी थोडे संत्रस्त झाले होते. मनू आणि आभा या दोन महिला नातेवाईकांच्या खांद्यावर हात ठेवून प्रार्थना मंडपाच्या दिशेने ते चालू लागले. प्रार्थनेला सुमारे ५०० लोक जमले होते. गांधींनी लोकांना नमस्कार केला. तेवढ्यात मनूच्या बाजूने खाकी जाकीट आणि हिरवा स्वेटर घातलेला एक इसम झपाट्याने पुढे सरसावला. म. गांधींच्या पाया पडण्यासाठी हा मनुष्य पुढे सरसावला असावा असे तिला वाटले. ''गांधींजींना प्रार्थनेला जाण्यासाठी आधीच उशीर झाला आहे, का उगाच त्यांना त्रास देता, भाऊ?'' मनूने विचारले. तेवढ्यात एका मागून एक तीन गोळ्या ३७ वर्षांच्या नथुराम गोडसेने स्वयंचलित पिस्तुलातून झाडल्या. एक गोळी नाभीजवळ आणि दोन छातीत घुसल्या. नमस्कारासाठी हात जोडलेल्या स्थितीत राष्ट्रपिता म. गांधी खाली कोसळले. मनूच्या मांडीवर डोके ठेवले गेले; तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती.

म. गांधींची छाती मारेकऱ्याने विदीर्ण केली असेल; परंतु भारतासकट जगातील हजारो लोकांच्या हृदयावर त्यांचे कोरले गेलेले नाव वर्षानुवर्षे कधी गंजणार नाही. संयुक्त राष्ट्रसंघाने दरवर्षी म. गांधी जयंती हा दिवस अहिंसादिन म्हणून जगभर पाळण्यात यावा असा निर्णय घेतला आहे. हा त्यांच्या स्मृतीच्या अजरामरतेचा पुरावा आहे. नोबेल शांतता पुरस्कार हा म. गांधींना केव्हाच द्यावयास हवा होता. तो त्यांना दिला गेला नाही; परंतु युद्धखोर किसिंजरला दिला गेला. आंतरराष्ट्रीय पुरस्कार हे राजकीय निर्णयांनी कित्येकदा किती डागाळलेले असतात याचा हा पुरावा आहे.

रास्त हक्क प्रस्थापनेसाठी आणि अन्याय निवारण्यासाठी म. गांधींच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या संघर्षाला मदनलाल गांधी यांनी सदाग्रह असे नाव सुचविले होते, (सद् + आग्रह). आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला पटलेल्या सत्याचा

तो आग्रह असला पाहिजे. हे सुस्पष्ट असावे म्हणून म. गांधींनी थोडी दुरुस्ती करून 'सत्याग्रह' असे नाव सुचविले. याचा उल्लेख म. गांधींनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे. 'सत्याग्रह' या नावात तंत्र आणि तात्विक बैठक या दोन्हींचा समावेश आहे. सत्याग्रहाची शताब्दी गेले वर्षभर साजरी करण्यात आली. ती केवळ भारतापुरती मर्यादित नव्हती. जगभर त्याला प्रसिद्धी मिळाली. म. गांधींची स्मृती चिरंतन राहील याचा हा दुसरा पुरावा आहे.

म. गांधीच्या काही विचारांशी मतभेद असले तरी श्रेष्ठ मूल्ये रूजविण्यासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या या थोर नेत्यासमोर नतमस्तक होऊनच ते व्यक्त करावेसे वाटतील. या लेखात त्यांच्या जीवनकार्याची जमेची बाजू मांडली आहे.

मार्टिन ल्यूथर किंग (ज्यूनिअर)

मानवाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी श्रेष्ठ मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या थोर व्यक्तींची यादी फार मोठी नाही याचा उल्लेख या लेखाच्या सुरूवातीला आलाच आहे. या यादीत मानाचे स्थान असणारा दुसरा एक महापुरुष म्हणजे अमेरिकेतील कृष्णवर्णीय नेता, मार्टिन ल्यूथर किंग (ज्यूनिअर).

अनेक देशातील परंपरा, त्या त्या देशातील काही अमानुष अथवा दुष्ट प्रथांमुळे डागाळलेल्या असतात. अस्पृश्यता हा जसा भारतीय परंपरेवरील कलंक आहे, तसा वर्णद्वेष हा अमेरिकेची परंपरा विद्रुप करणारा घटक आहे. या दुष्ट प्रथा मोडून काढून त्या गाडून टाकण्यासाठी झटणाऱ्यांना आपल्या प्राणाचे मोल द्यावे लागले आहे.

वर्णद्वेषाचे विष निष्प्रभ करून टाकण्यासाठी सातत्याने शांततापूर्ण मार्गाने झगडणारा, वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षी मृत्यूमुखी पडलेला मार्टिन ल्यूथर किंग (ज्यूनिअर) हा असाच एक अमेरिकेतील ध्येयासक्त कृष्णवर्णीय ख्रिश्चन धर्मगुरू (पॅस्टर) होता. त्याचा जन्म १५ जानेवारी १९२९ रोजी, अॅटलांटा शहरात झाला. त्याचे वडील ख्रिश्चन धर्मातील अॅपटिस्ट पंथाचे धर्मगुरू (पॅस्टर) होते. मुळात मायकेल हे ठेवलेले नाव बदलून वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी आपल्या मुलाचे नाव मार्टिन असे ठेवले. वयाच्या २६ व्या वर्षी मार्टिन हा अलाबामामध्ये अॅपटिस्ट धर्मगुरू (पॅस्टर) या पदापर्यंत जाऊन पोहोचला.

या लोकाभिमुख, संवेदनशील धर्मगुरूने चर्चमध्ये प्रार्थना म्हणणे अथवा प्रवचने करणे; यापुरते आपले कार्यक्षेत्र मर्यादित ठेवले नाही. अस्सल ईश्वरभक्ती ही लोकसेवेशिवाय परिपूर्ण असू शकत नाही ही येशू ख्रिस्ताची शिकवण मनापासून आचरणात आणण्याचे त्याने ठरविले. विरोधकाचे मन आत्मक्लेषाने आणि प्रेमाने निर्धारपूर्वक शांततामय मार्गाचा अवलंब करून जिंकावे या म. गांधींच्या विचारधारणेचा किंगच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. कृष्णवर्णीयांना अमेरिकेत हरएक बाबतीत मिळत असलेल्या अन्याय्य व निर्घृण वागणुकीविरुद्ध गौरवर्णीयांविषयी निर्वैर

भावना मनात बाळगून आंदोलन करावे असा सल्ला अनेक सभा व परिषदांमधून त्याने कृष्णवर्णीयांना दिला. बसमधून प्रवास करताना होणाऱ्या भेदभावाविरुद्ध आवाज उठविणे असो, सर्व स्तरांवर मतदानाचे हक्क निर्वेधपणाने मिळावेत या मागणीकरिता काढण्यात येणारे मोर्चे असोत, अल्प खर्चात शिक्षण, अथवा नोकऱ्यांचे हक्क प्रस्थापित करून घेण्याकरिता धरणे धरून बसणे असो, मार्टिन ल्यूथर किंग या सर्व आंदोलनांच्या अग्रभागी उभा राहात असे. अनेक कृष्णवर्णीय नेत्यांना किंगच्या मार्गाने गेल्यास चळवळीची धार बोथट होते असे वाटत असे. राक्षस किंवा पिशाच्च यांच्यासारख्या हृदयशून्य शक्तींचे मन कसे जिंकता येईल असा सवाल करून ते किंगचा निषेध करीत असत. किंगचे मार्ग जर परिणामकारक नसतील, त्याची धास्ती जर सरकारला किंवा वर्णद्वेष करणाऱ्या आक्रमक, हिंसक घटकांना वाटत नसेल, तर मग त्यांना अटक का होते? त्यांच्या घरावर बॉम्ब का फेकले जातात? त्यांच्यावर खुनी हल्ले का चढविले जातात? त्यांना पकडून ठार मारणाऱ्यांना मोठी मोठी रोख रकमांची बक्षिसे का जाहीर केली जातात? अमेरिकेतील गुप्तहेर संघटना (F. B. I.) त्यांचा सतत पाठलाग करून सतावीत का असते? या प्रश्नांची उत्तरे किंगच्या 'जहाल' कृष्णवर्णीय विरोधकांना देता येत नसत.

हा नेता आपल्याला आपल्या उज्ज्वल भविष्याचे ध्येय गाठण्यास प्रवृत्त करण्यासाठी, स्वत: त्यागमय, कष्टाचे जीवन जगत निर्भयपणे उभा आहे यावर हजारो लोकांचा विश्वास बसू लागला. बहुसंख्य जरी नसले तरी अनेक गौरवर्णीयांना आपल्या हातून आपल्या देशबांधवांवर घोर अन्याय होतो आहे याची जाणीव झाली. तोपर्यंत १९६८ साल उजाडले होते. गौरवर्णीय आणि कृष्णवर्णीय अशा दोन्हीही समाज घटकांतील गरिबांचा प्रचंड संयुक्त मोर्चा वॉशिंग्टनमध्ये न्यावयाची तयारी करण्यास मार्टिन ल्यूथर किंगने सुरुवात केली होती. मोर्चा मे महिन्यात निघावयाचा होता. 'गरिबी हटवा' ही मोर्च्याची मुख्य घोषणा असणार होती.

एकीकडे वॉशिंग्टन मोर्च्याची तयारी चालू असताना एप्रिल महिन्यात किंगचा एक स्नेही रेव्हरंड सॅम्युअल उर्फ बिली काईल्स याचा एक निरोप किंगला घेऊन पोहोचला. टेनेसीमधील मेम्फिस या गावी तेथील सफाई कामगारांचा तेथील महानगरपालिकेशी काही मागण्यांच्या अनुषंगाने वाद सुरु झाला होता. कामगार संपावर जाणार होते. किंगने ताबडतोब मेम्फिसला येऊन या संपलढ्यात लक्ष घालावे असे आवाहन काईल्स या स्नेह्याने किंगला केले होते. मित्राच्या विनंतीला मान देऊन, वॉशिंग्टन मोर्च्याची तयारी थोडी थोपवून किंग ताबडतोब ३ एप्रिल रोजी मेम्फिसला येऊन धडकला. मेम्फिसला पोहोचल्यावर तेथील एका देवालयात त्याने एक प्रभावी भाषण दिले. आपण आपले नियोजित ध्येय निश्चित गाठू ('आश्वासित भूमीपर्यंत निश्चित पोहोचू') असा दृढ विश्वास व्यक्त करून 'म्हणून आज मी अगदी आनंदात आहे' असे तो म्हणाला होता. परंतु दुर्दैवाने हा आनंद जेमतेम एक दिवस टिकणारा होता.

मेम्फिसमधील लॉरेन मोटेल नावाच्या एका लहान हॉटेलमध्ये किंग उतरला होता. त्याच्याच खोलीत, त्याच्या अनेक मानवी हक्क प्रस्थापनेच्या आंदोलनात सहभागी असलेला त्याचा मित्र रेव्हरंड रॅल्फ ॲबरनाथी हाही उतरला होता. किंग आपल्या खोलीत रात्रभर काम करीत बसला होता. म्हणून तो दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत झोपून राहिला. झोपून उठल्यावर किंग आपला सहकारी - सचिव अँड्रू यंग याच्याशी चर्चा करीत बसला. सफाई कामगारांना पाठिंबा देण्यासाठी मिरवणूक काढण्यावर बंदी घालण्यात आली होती. या बंदीविरुद्ध कोर्टात युक्तिवाद मांडण्यासाठी अँड्रू यंग गेला होता. त्याची सारी हकिगत तो किंगला सांगत होता. तोपर्यंत सुमारे ५.०० वाजले होते. त्यानंतर काय घडले ते लक्षात घेण्याकरिता लॉरेन मोटेलच्या शेजारी असलेल्या एका बोर्डिंग हाऊसमध्ये (लॉजमध्ये) साधारणत: याच कालावधीत काय चालले होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

किंग उतरला होता त्या लॉरेन मोटेलच्या शेजारी जरा पलीकडे बेसी ब्रुअर या नावाचे एक बोर्डिंग हाऊस (लॉज) होते. ४ एप्रिल रोजी दुपारी या लॉजमध्ये एका खोलीमध्ये जॉन विलर्ड असे नाव सांगणारा एक माणूस उतरला. त्या गचाळ खोलीत मंद प्रकाश होता. या खोलीतून बघितल्यावर, शेजारच्या मोटेलमधील किंगची खोली अर्धवट दिसत होती. म्हणून जॉन विलर्ड त्या लॉजच्या स्नानगृहात गेला. तेथून किंगची खोली अगदी पुरेशा प्रमाणात स्पष्ट दिसत होती. या बाथरूममध्ये विलर्ड बराच वेळ थांबून राहिला होता. म्हणून लॉजमधले इतर प्रवासी तक्रार करीत होते.

अँड्रू यंग या आपल्या सचिवाशी संभाषण संपल्यानंतर किंग आणि त्याचा मित्र ॲबरनाथी आपल्या खोलीत कपडे बदलण्यासाठी गेले. सफाई कामगारांच्या लढ्यात किंगने लक्ष घालावे असे आवाहन करणारा किंगचा मित्र काईल्सने किंग आणि ॲबरनाथी यांना जेवणाचे निमंत्रण दिले होते. त्या दोघांना नेण्यासाठी काईल्स ५.३० वाजता मोटेलमध्ये आला. किंग आणि काईल्स थोडा वेळ खोलीबाहेरच्या गच्चीत उभे राहिले. तेवढ्यात खाली उभ्या असलेल्या मोटारीचा ड्रायव्हर किंगला म्हणाला, ''बाहेर थंडी आहे, ओव्हरकोट घातलात तर बरे होईल.'' किंगने ॲबरनाथीकडे खोलीच्या दिशेने वळून त्याला ओव्हरकोट आणण्याची विनंती केली. काईल्स जिना उतरून खाली जात होता. तेवढ्यात एक मोठा फटाका फुटल्याचा आवाज येतो तसा भासणारा आवाज आला. क्षणार्धात सगळ्यांच्या लक्षात आले की तो आवाज फटाक्याचा नव्हता. मार्टिन ल्यूथर किंग गच्चीमध्ये कोसळून पडला होता. त्याच्या जबड्यात घुसलेली बंदुकीची गोळी पाठीच्या मणक्यातून प्रवास करीत खांद्यावर येऊन धडकली होती. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या किंगची नाडी अँड्रू यंगने तपासण्याचा प्रयत्न केला; परंतु आशेला जागा नसल्याचे त्याच्या लक्षात आले. झपाट्याने त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्याची व्यवस्था ॲबरनाथीने केली. सायंकाळी ७.०५ वाजता डॉक्टरांनी येऊन सांगितले की, त्याच्या मेंदूलाही इजा पोहोचली आहे, आपल्यातून तो गेला आहे.

दु:खद बातमी पसरल्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. वर्णद्वेष्ट्या गोऱ्यांनी आनंद व्यक्त केला. 'बरे झाले, तो आता त्याच्या (नीच) वंशाचा (निग्रो) झाला.'

जहाल कृष्णवर्णीय नेते म्हणाले, ''आम्ही म्हणत होतो तसेच झाले. चेरी-पाय हा पदार्थ जितका अमेरिकन आहे, तितकीच हिंसा ही अमेरिकन आहे.''

कृष्णवर्णीय जनतेने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. पाच दिवसापर्यंत १०० शहरांत दंगे उसळले. निदान ३९ लोक दंग्यात मरण पावले. वॉशिंग्टनमध्ये खुद्द व्हाईट हाऊसच्या शेजारी अनेक इमारती आगीत भस्मसात झाल्या. लुटालूटही प्रचंड प्रमाणात झाली. अमेरिकेत २०० वर्षांत इतका हलकल्लोळ उडाला नव्हता असा अंदाज बांधण्यात आला आहे.

जेम्स अर्ल रे हा किंगचा मारेकरी आहे असे धरून त्याला ९९ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली; परंतु नेमका मारेकरी कोण यावरील अमेरिकेतील चर्चा अद्याप संपुष्टात आलेली नाही. वेगवेगळे पुरावे आणि करण्यात आलेले युक्तिवाद मांडण्याकरिता मोठा लेख लिहावा लागेल.

श्रेष्ठ मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी मार्टिन ल्यूथर किंग ज्यूनिअरला आपला प्राण गमवावा लागला. १९६४ साली म्हणजे हौतात्म्याच्या आधी चार वर्षे त्यांना नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला होता. अमेरिकेने व्हिएतनामशी केलेल्या युद्धाचा किंगने नि:संदिग्ध शब्दात निषेध केलेला असूनही हा पुरस्कार त्यांना मिळू शकला ही स्वागतार्ह घटना आहे हे निश्चित, असे नोंदवावे लागेल. जहाल, आक्रमक नेत्यांपेक्षा निष्ठावान संयमशील नेता बरा हे लोकमानसात ठसविण्याकरिता सुद्धा युरोप-अमेरिकन सत्ताधारकांचा कल पाहून नोबेल शांतता पुरस्कार दिला गेला असेल ही शक्यतासुद्धा नाकारता येईलच असे नाही.

(मिळून साऱ्याजणी, दिवाळी २००७)

❑

Prof. D. D. Kosambi

- A Centenary Tribute

Prof. D. D. Kosambi was the son of Dharmanand Kosambi. He was born in 1907 at Goa. His father was a great Buddhist scholar. Kosambi did his schooling in New English School in Pune. He was extremely fond of his mother. In 1918 Mr. Dharmanand Kosambi was invited by Harvard University in America to edit a Buddhist work for the Harvard Oriental Series. Mr. Kosambi decided to carry his son Damodar along with him. Damodar Kosambi had his schooling in America and he graduated from America. He joined Boy Scout movement and secured several prizes for his participation in its activities. He became an expert in mathematics as he worked under a world famous mathematician Professor J. W. Bircauf. He developed interest in literature and he learnt Greek, Latin, French and German languages and read classical literature of these languages. He did vast reading during his college days. Like renaissance intellectuals, he wanted to become versatile by acquiring knowledge from different fields. Kosambi secured first class with distinction, but he could not pursue his post graduate studies because in 1929 and 1930 America was adversely affected by Great Depression. He could not get scholarship, hence he decided to return to India.

Kosambi started his career as a teacher in Banaras Hindu University. He was appointed as lecturer in mathematics. He decided to leave Banaras Hindu University and join Aligarh Muslim University as there was a group of young mathematicians at Aligarh. Kosmabi started publishing his research papers on mathematics. At Aligarh, he started research in mathematics but slowly his colleagues left the University. Professor Kosambi decided to leave Aligarh University and he got a job at Fergusson College Pune.

He settled down in Pune and continued his research in mathematics. Along with mathematics, he started taking keen interest in research in

the field of Sanskrit language and Indology. He edited 'Shataktrayi' written by a great Sanskrit poet Bhartrihari. He wrote an erudite article on the quality of renunciation in poetry of Bhartrihari. He also edited 'Subhashita Ratna Kosha' along with Prof. Gokhale and wrote a thought provoking introduc-tion to it. He wrote a couple of articles on ancient Indian history He was simultaneously pursuing research in science and indology but differences of opinion developed with the management of Fergusson College and Kosambi left Fergusson College to join the newly established Tata Institute of Fundamental Research, Bombay.

He became a senior colleague of Dr. Homi Bhabha. Kosambi carried out research in mathematics, statistics, tensor analysis and prime numbers and path geometry. In biology, he made a significant contribution by developing Kosambi formula regarding genetics. The Kosambi formula became world famous. Kosambi taught mathematics in Fergusson College for 13 years and from 1946 onwards he worked for 16 years at Tata Institute of Funda-mental Research as Professor of mathematics. Due to differences developed with Dr. Homi J. Bhabba, Kosambi decided to leave Tata Institute of Fundamental Research in 1962.

He was offered CSIR fellowship in 1964 for the term of 5 years but unfortunately he passed away in June 1966. Earlier, he was awarded the Ramanujan Memorial Prize (1934) and a Special Bhabha Prize (1947). He was a UNESCO Fellow to the USA and UK, a visiting Professor at Chicago University, a guest of the Institute of Advanced Study at Princeton University, and was invited by the Soviet Academy of Sciences as well as the Academia Sinica in Beijing. He made substantial original contribution to various fields of knowledge, including mathematics and statistics, history, numismatics and Indology.

Shunning the limelight of publicity (and ignoring painful arthritis from which he suffered for several years), Prof. Kosambi combined profound erudition with extensive fieldwork to establish that the history of India can be written with a reasonable level of accuracy despite the paucity of adequate and reliable written records, by making a creative use of the analytical method of Dialectical Materialism. However, while using this method, Prof. Kosambi had warned that 'the adoption of Marx's thesis does not mean a blind repetition of all his conclusions (and even less, those of the official Party-line Marxists) at all times.' He expressed disagreement with Karl Marx who had said that Indian society has no history at all, at least no known history. What we call its history is but the history of successive intruders, who founded their empires

on the passive basis of that unresisting and unchanging (village) society.

Versatility, without sacrificing a sense of detail, enabled Prof. Kosambi to raise pertinent questions and offer thought-provoking answers. Defining history as 'the presentation in chronological order of successive developments in the means and relations of production,' he sought answers to several questions, some of which are listed below.

When and where did the iron plough come to be exten-sively used in India?

Why could India avoid chattel slavery which was pre-dominant in Greece and Rome during a certain period?

What was the significance of the transformation of tribal society into caste-based society?

What relation did commodity-exchange crops like coconut (which, incidentally, is not indigenous) have to communal and private land-holdings?

What are the characteristics of feudalism in India?

What are the factors which led to the rise and decline of Buddhism in India?

Can the class basis of Sanskrit literature be depicted with a sense of genuine objectivity?

Why is India still a land of long survivals, such as the Mesolithic sites or the reverence shown to Stone Age gods by almost all classes in present day society?

These questions were raised by Prof. Kosambi and through out his life he tried to find answers to them.

Prof. D. D. Kosambi was a committed Marxist and he applied the Marxist methodology to study Indian history For him the development in the mode of production and relations of production was more important than victories in the wars. He was of the opinion that the history of the Indian society is the history of the progress from food gathering society to food producing society. Establishment of agrarian village economy provided stability to Indian society. He did not approve Marxist concept of Asiatic mode of production and pointed out that Indian society charted out a different path of development.

Another important contribution of Kosambi was his concept of fieldwork. He was of the opinion that present-day Indian society contains a large number of tribal elements which still follow practices of Stone Age civilization. The temples, village gods' memorial stones, tombs and so called sacred places carry the marks of history and it is the responsibility of the historian to correctly read different historical

narratives in it. In India, the written historical sources are very few and they are not authen-tically dated. Therefore, the student of history has to go out in the field to find out evidences. Indian culture is known for its ability of synthesis. There is a continuous process of synthesis of different traditions and in a village a particular deity represents that tradition. The temple of Hari-Har symbolizes unity of Shankar and Vishnu. Unity of gods is sought to unify their worshippers. Different village matriarchical deities were made acceptable to the people by calling them incarnation of Parvati consort of Shiva. Shankar and Ganesha were two deities which were liberally used to incorporate primitive religious practices into Hinduism. In Indian society women still practice some of the Stone Age practices. For example on the fifth day of the child's birth the stone urn is kept in cradle and worshipped. In the fieldwork we get a lot of information about much cultural practices. Kosambi creatively used different field visits to collect lot of historical evidences to reconstruct social history of ancient India.

Kosambi was a public intellectual and like his father he took keen interest in different social movements. He was close to Mahatma Gandhi and he decided to wear Khadi. When he was at Benares he used to sell Khaddar and other Swadeshi products. He used to load Khadi in the handcart and along with students hawked it in the market. Such was his patriotism. He was closely associated with Indian Communist movement and he provided medical aid to the wounded workers and soldiers who took part in the Naval revolt of 1946. He gave shelter to freedom fighters in 1942. Kosambi took part in world peace movement and almost for 10 years, he propagated the cause of peace all over the world. He was opposed to use of atomic energy because he was of the opinion that nations wanted atomic energy to manufacture atom bombs. He said that there was no full-proof guarantee that there would not be radiation from the atomic plants. He held that radiation would adversely affect the health of coming generations. Prof. Kosambi advocated use of solar energy which was available in Asia in plenty. He also supported construction of small dams with help of local resources and local support as he thought that big dams were not useful. He advocated use of gobar gas to solve problems of rural energy.

Kosambi had edited three critical editions of 'Shataktrayi' of Bhartrihari, 'Subhashitratnakosh' of Vidyakar and 'Avimarak' of Bhasa. These are considered as landmarks in textual criticism. He wrote four books in English and 127 research papers in science, indology and history. Kosambi was interested in carrying out research in the following

areas. He wanted to study the peasant movements in contemporary India with special reference to movements in Tebhaga in Bengal, Telangana in A.P. and PratiSarkar movement in Satara. Two, he wanted to study the myth of Shiralshet in Maharashtra. Three, he wanted to write a book on historical Krishna. He sought to collect information about myths, cultural practices, religious congregations and stories of gods and godesses and record them. He wanted to preserve the oral traditions of Indian people. But due to his untimely death he could not complete these projects.

Patiently weighing thousands of coins of the ancient and medieval period and using statistical methods. Prof. Kosambi transformed Numismatics into an exact science. His large collection of microliths and engraved megaliths, added to which was his discovery of a Brahmi inscription at Karle, constitute a significant contribution to Archaeology He completely changed our understanding of Indian history.

Prof. Kosambi's formula for chromosome distance known as the 'Kosambi Theorem' is well recognized in classical Genetics. His work in Mathematics -papers on Prime Numbers, Path-Geometry (his own term), and other topics, as also his contribution to theoretical and applied statistics have enriched these subjects significantly. As one who was keen on solving the problems of developing countries, Prof. Kosambi had emphasized that in a country like India where the sun shines brightly for almost two thirds of year, it would be far more beneficial to concentrate on conducting research on solar energy than blindly following the West and spending lavishly on developing atomic energy.

As a socio-politically conscious citizen, Prof. Kosambi also wrote on contemporary problems, including the consequences of research in Science and Technology in a class ridden society He was an uncompromising, fearless campaigner for world peace. He helped people in 1961 when Pune city was adversely affected by floods. He helped people injured in Communal riots and personally moved in the riot affected areas to propagate Communal harmony in the society. He used to hold study classes for students.

He tried to give answers to many questions in his following books, and more than 127 research papers contributed to national and international academic journals, over a period of more than three decades. But they do certainly indicate a departure from the conventional presentation of history.

He passed away in his sleep at the relatively early age of almost 59, on 29 June 1966.

Prof. Kosambi's writings -

1) An Introduction to the Study of Indian History (1956)

2) Exasperating Essays: Exercises in the Dialectical Method (1957)

3) Subhashitaratnakosha of Vidyakara : The Oldest Discov-ered Sanskrit Anthology, co-edited with Prof.V.V. Gokhale (1957)

4) Myth and Reality: Studies in the Formation of Indian Cul-ture (1962)

5) The Culture and Civilzation of Ancient India in Historical Outline (1965)

6) The Avimaraka of Bhasa (with Prof. J. L. Mason, 1969)

7) Indian Numismatics (1981)

8) Science, Society and Peace (1986)

9) D. D. Kosambi on History and Society: Problems of Inter-pretation (1985)

10) Combined Methods in Indology and Other Writings (2002) editd by B. D. Chattopadhyay.

(Unpublished)

❑

इतर लेख

पोलंडमधील संप
कामगारांचा विजय झाला; समाजसत्तावादाचे काय झाले?

१७ डिसेंबर १९७९ : ''स्मारक उभारण्याची आपली मागणी या सरकारने मान्य करून अंमलात आणली नाही तर पुढच्या वर्षी आपल्यापैकी प्रत्येकजण आपल्याला पेलवेल तेवढे, अधिकात अधिक वजनाचे दगड-विटांचे ओझे घेऊन येईल आणि आपले स्मारक येथे उभारू.'' पोलंडमधील गडान्सक बंदरावर जमलेल्या सुमारे ५ हजार गोदी कामगारांच्या सभेत एका सडपातळ बांध्याच्या, भुरे केस असलेल्या, मध्यम वयाच्या मिशाळ कामगार पुढाऱ्याने हे शब्द उच्चारताच टाळ्यांचा गडगडाट झाला. या पुढाऱ्याचे नाव लेख् वॉलेन्सा. कोण हा वॉलेन्सा? कसले स्मारक? ते उभारण्याबाबत सरकार चालढकल का करीत होते? वॉलेन्सा भाषणाकरता आला तो सुद्धा भूमिगत पद्धतीने. पोलीस आपले कुत्रे घेऊन वॉलेन्साचा शोध अख्ख्या बंदरावर घेत होते. कामगारांनी आपल्या घरी त्याला आश्रय दिला आणि १७ डिसेंबर या स्मृतिदिनाच्या दिवशी वॉलेन्सा जो प्रकट झाला तो एकदम जाहीर सभेतच. दहा वर्षांपूर्वी पोलंडमधील कामगारांनी धान्य व मांस पदार्थाच्या भाववाढीविरुद्ध रस्त्यावर येऊन उग्र निदर्शने केली होती, त्या वेळेस १७ डिसेंबर १९७० रोजी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात सुमारे ५५ कामगार मृत्यूमुखी पडल्यामुळे त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले होते. या कामगारांचा स्मृतिदिन कधी प्रकटपणे, तर कधी अप्रकटपणे पाळण्याची प्रथा पोलंडमध्ये बऱ्याच ठिकाणी रूढ झाली होती. या कामगारांचे स्मारक सरकारी खर्चाने उभारण्यात यावे अशी मागणी पोलंडमधील कामगार दर स्मृतिदिनाच्या दिवशी करीत आले आहेत. नुकताच ऑगस्ट महिन्यामध्ये अठरा दिवसांचा संप जो पोलंडमध्ये झाला त्यातील २१ प्रमुख मागण्यांपैकी या हुतात्मा कामगारांचे स्मारक उभारण्यात यावे ही एक आग्रहाची मागणी होती. पोलंडमधील या वेळचा संप हा केवळ आर्थिक मागण्या मिळवण्याकरिता नव्हता. या जगभर चर्चा चाललेल्या संपाचे आजचे स्वरूप समजावून घेण्याकरिता गेल्या तीन-चार दशकातील घडामोडींवर दृष्टिक्षेप टाकला पाहिजे.

पार्श्वभूमी (धर्माचे वर्चस्व व पुनर्रचनेचे आव्हान)

युरोपातील समाजसत्तावादी देशांपैकी सोव्हिएत रशियाच्या खालोखाल पोलंड हा भौगोलिक विस्ताराच्या दृष्टीने सर्वात मोठा देश आहे. १९७९ मधील त्याची लोकसंख्या सुमारे ३ कोटी ४४ लाख होती. दुसऱ्या महायुद्धात मनुष्यहानीसकट सर्व बाबतीत अतोनात नुकसान सहन करून होरपळून निघालेल्या या देशातील लोक स्वातंत्र्य-रक्षणाच्या प्रेरणेने इतके धुंद झाले होते की केवळ सामान्य लोकच नव्हे तर सैन्यातील छोटे-मोठे अधिकारीसुद्धा अन्य सामुग्रीच्या अभावी राक्षसी जर्मन फॅसिस्टांच्या रणगाड्यांशी वेळप्रसंगी भाले-तलवारीने लढले आणि मेले! रोजच्या रोज घरोघरी सग्यासोयऱ्यांच्या, मित्रमैत्रिणींच्या, जायबंदी झाल्याच्या अगर मृत्यूमुखी पडल्याच्या बातम्या येत असत, लोकांचे धैर्य खचले नाही. परंतु दु:खाची दाट छाया पसरली. जीवनाचा अर्थ कित्येक लोकांना कळेनासा झाला. माणूस माणसाच्या गळ्याचा घोट घेताना पाहून हजारो मने विदीर्ण झाली. आलेले संकट टाळण्याकरिता आणि दु:खाची तीव्रता कमी करण्याकरता प्रार्थना मंदिरात जाऊन परमेश्वराची आराधना करून मन:शांती मिळविण्याचा प्रयत्न लोक करू लागले. पोलंडमध्ये पूर्वीपासूनच असलेला चर्चचा, धर्मसंस्थेचा प्रभाव वाढीस लागला. युद्ध जिंकण्याकरिता दर पैपावलीची गरज असतानासुद्धा लोकांच्या जबरदस्त मागणीमुळे या काळात अनेक ठिकाणी सरकारला चर्चबांधणीचा अनुत्पादक खर्च करावा लागला. धर्मसुधारणेच्या झंझावातातून युरोपातील अनेक देश गेले होते. परंतु सनातन कॅथॉलिक धर्माच्या वर्चस्वापासून पोलंड हा देश कधी मुक्त झाला नाही. युद्धकाळात हे वर्चस्व कमी होण्याला कोणतीच संधी प्राप्त झाली नाही. रशियन मुक्तिसेना येऊन पोलंडमध्ये थैमान घालणाऱ्या फॅसिस्टांचा निर्णायक पराभव करीपर्यंत तेथील जनतेला आशा-निराशेच्या फेऱ्यातून वारंवार जावे लागत होते. परंतु त्यानंतर युद्धात तावून सुलाखून निघालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली नवे राज्य स्थापन झाले. पोलंडला समाजोन्मुख संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगण्याची संधी आता निर्माण झाली होती. परंतु त्याकरता देशातील समाजरचनेचा आणि विचार-विश्वाचा जाणीवपूर्वक कायापालट करण्याची गरज होती. राज्यकर्त्या कम्युनिस्ट पक्षाला ते एक महत्त्वाचे आव्हान होते.

युद्धात बेचिराख होऊन निघालेल्या कोणत्याही देशाची आर्थिक घडी पार विस्कटलेली असते. पोलंडसारख्या निसर्ग व खनिज संपत्ती विपुल असलेल्या परंतु अपुरे औद्योगिकरण झालेल्या शेतीप्रधान देशाची अवस्था तर फारच बिकट होती. समाजवादाचा मार्ग पत्करल्यामुळे युद्धात संपन्न बनलेल्या साम्राज्यवादी देशांकडून मदत मिळणे दुरापास्त होते. दोन कोटींच्यावर मनुष्यहानी झालेल्या व अन्य राष्ट्रीय संपत्तीचेही प्रचंड नुकसान झालेल्या सोव्हिएत रशियासारख्या मित्र राष्ट्रांकडून पुरेशी मदत नजीकच्या काळात मिळणेही कठीणच होते. युद्धोत्तर पहिल्या काही वर्षांत शीतयुद्धाचे वातावरण साम्राज्यवादी राष्ट्रांनी तेवत ठेवल्यामुळे, जी भांडवल गुंतवणूक

आर्थिक विकासाकरता आवश्यक होती त्याचा मोठा हिस्सा संरक्षणाची तरतूद करण्याकरता म्हणजेच लष्कर व युद्धसामग्रीकरता खर्च करणे सर्वच समाजसत्तावादी देशांना क्रमप्राप्त होते. या सर्व परिस्थितीवर मात करण्याचे दृष्टीने पोलंडमध्ये शेतीची खाजगी मालमत्ता क्रमाक्रमाने बहुतांशी नष्ट करून त्या जागी सहकारी तत्त्वावर व जमेल तेथे सामुदायिक मालकीची व्यवस्था प्रस्थापित करून, शेतीव्यवस्थेची नव्याने उभारणी करणे आवश्यक होते. सर्वंकष आर्थिक नियोजनही तातडीने हातात घेणे जरूरीचे होते. पूर्वपरंपरेने चालत आलेल्या आत्यंतिक व्यक्तिवादाला संक्षेप देणे, श्रमजीवी वर्गाच्या घटकांमधील अंतर्विरोध बोथट करून कालांतराने तो नष्ट करणे, समाजविकासासाठी घातक स्पर्धेच्या ऐवजी निकोप सहकाराचे मूल्य लोकमानसात रूजविणे आणि या नवसमाजनिर्मितीच्या आड येणाऱ्या हितसंबंधी वर्गांचा निर्धारपूर्वक पराभव करून त्यांना नैतिक आधार देणाऱ्या धर्मसंस्थेसारख्या प्रबळ सत्ताकेंद्रांना सतत लोकसंपर्क साधून प्रभावी प्रचारयंत्रणेच्या द्वारा हतबल करून टाकणे हेही सारे कार्य अगदी निकडीचे होते. ही प्रचंड जबाबदारी पार पाडण्यात पोलंडमधील राज्यकर्त्या कम्युनिस्ट पक्षाला गेल्या ३५ वर्षांत लक्षणीय यश आले नाही असे दिसते. ऑगस्टमधील संपाची मूळ बीजे यातच असल्यामुळे, ही पार्श्वभूमी काहीशा विस्ताराने दिली आहे.

आर्थिक परिस्थिती

पोलंडमध्ये सर्वस्पर्शी आर्थिक नियोजनाला सुरूवातच मुळी १९६१ साली करण्यात आली. म्हणजे सत्ता हातात असल्यापासून पहिली सोळा वर्षे पोलंडमध्ये मिश्र अर्थव्यवस्थाच चालू होती. १९६२ साली, लागवडीखाली असलेल्या जमिनींपैकी फक्त १ टक्का जमीन सामुदायिक शेतीव्यवस्थेच्या कक्षेत मोडत होती. १२ टक्के जमिनीवर सरकारची संपूर्ण मालकी होती. उपलब्ध आकडेवारीनुसार गेल्या वर्षापर्यंत लागवडीखालील जमिनींपैकी सुमारे ८० टक्के जमीन ही खाजगी मालकीची होती. पाच हेक्टरपर्यंत जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ६३ टक्के होते. हे शेतकरी धरून १० हेक्टरपर्यंत जमीनधारकांची संख्या ८९ टक्के होती. म्हणजे आपल्याकडील बिहारप्रमाणे प्रचंड क्षेत्र थोड्या जमीनदारांच्या हातात केंद्रित झालेले नाही, परंतु खासगी मालकीच्या लहान तुकड्यांवर, सरकारची मदत मुबलक असूनही भरघोस उत्पन्न निघत नाही. सामुदायिक अथवा सहकारी पद्धतीने मोठ्या प्रमाणावर शेती करण्यात चर्चचा आणि त्याच्या प्रभावाखाली अद्याप असलेल्या सुमारे ८० टक्के कॅथॉलिक लोकांचा विरोध होण्याची शक्यता असल्यामुळे सरकारने आरंभापासूनच खासगी शेतीवर सामाजिक मालकी न प्रस्थापित करण्याचे अतिसावध धोरण स्वीकारले. या धोरणात टप्प्या-टप्प्याने बदल करण्याचे धैर्य दाखविले नाही. उलट १९५६ साली अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे लोकांनी निषेध व्यक्त करण्याकरता निदर्शने केली. त्यावेळेस ज्या काय थोड्या प्रमाणात सामुदायिक शेतीच्या प्रयोगाला सुरूवात केली

होती त्याचा विस्तार संपूर्णपणे स्थगित करीत असल्याचे जाहीर केले.

सोविएत रशियातील नियोजनाशी तुलना केली म्हणजे फरक सहज लक्षात येईल. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सोविएत रशियातील ६१.५ टक्के जमिनीवर सामाजिक मालकी प्रस्थापित झालेली होती (सहकारी अथवा सामुदायिक शेती). दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस म्हणजे १९६७ पर्यंत ९३ टक्के जमीन सामाजिक नियंत्रणाच्या कक्षेत समाविष्ट झालेली होती. पोलंडमधील धोरणाचा परिणाम असा झाला की एकीकडे शेतीचे व जोडधंदा म्हणून चालत असलेल्या दूध-दुभत्याचे अथवा मांसाहारी पदार्थांचे उत्पादन पुरेशा प्रमाणात वाढत नसतानासुद्धा असंतोष टाळण्याकरिता शेतकऱ्यांना दरवर्षी भाववाढ तर द्यावी लागली आणि दुसरीकडे या भाववाढीमुळे धान्य, मांस इ. पदार्थांची वाढणारी किंमत जर शहरातील कामगार व मध्यमवर्ग यांना द्यावी लागली तर त्यांच्या संघटित विरोधाला तोंड द्यावे लागेल म्हणून हे पदार्थ सरकारी तिजोरीतून पैसा भरून सतत सवलतीच्या दरात विकण्याचे धोरण वर्षानुवर्षे चालू ठेवण्यात आले. या पदार्थांचे भाव कमी ठेवण्याकरिता त्यांच्या अर्थसंकल्पातील ३० ते ४० टक्के रक्कम पोलंडमधील सरकारला दरवर्षी खर्च करावी लागते. मांसाहारी पदार्थांचा विशेष तुटवडा जाणवण्याचे कारण म्हणजे उत्पादनातील बराच मोठा हिस्सा (सुमारे दीड लाख टन) परदेशी चलन मिळविण्याकरिता निर्यात करावा लागतो. हे परदेशी चलन वापरून अमेरिकेसारख्या देशातून वर्षाला जवळ जवळ ३० ते ३५ कोटी रुपयांचे अन्नधान्य आयात केले जाते आणि औद्योगिकरणाकरिता लागणारी यंत्रसामुग्रीही विकत घेतली जाते. अशा रीतीने पोलंडचे परदेशावरचे अवलंबन दिवसेन्‌दिवस वाढत गेले. देशाची विकासाची गती मात्र गरजेच्या मानाने अपुरीच पडली. शेतकरी आणि कामगार यांच्या संयुक्त हिताची जपणूक करण्यात आली नाही. ज्या त्या घटकाने सरकारवर दडपण आणून केवळ स्वत:च्या हिताचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. प्रश्न सोडवणे कठीण जाऊ लागल्यामुळे सरकारी मंत्र्यांमध्ये व अधिकाऱ्यांमध्ये कोणत्याही बाबतीत व्यक्त होणाऱ्या विरोधी मतप्रवाहांची मुस्कटदाबी करण्याची प्रवृत्ती बळावली.

राजकीय घडामोडी

कम्युनिस्ट पक्षामध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया जर परस्परांच्या विचारविनिमयावर अधिष्ठित असती, कार्यकर्त्यांचा जनतासंपर्क घनिष्ठ असता, तर एकीकडे लोकमानसाचा कानोसा घेता घेता दुसरीकडे समाजसत्तावादाच्या उभारणीकरिता इष्ट तो आधार त्याला देण्याचे कार्य करून समस्या सोडविण्याचा मार्ग काढणे शक्य झाले असते. परंतु ते न जमल्यामुळे १९५६ साली भाववाढीविरुद्ध झालेल्या लोकक्षोभाला सरकारला आणि पक्षाला तोंड द्यावे लागले. या रास्त लोकक्षोभाचा फायदा घेऊन, चर्चनेही आपले घोडे पुढे दामटले आणि अधिक चर्च बांधण्याच्या,

शिक्षणक्रमात धार्मिक शिक्षणाला स्थान देण्याच्या, स्वत:च्या वाङ्मय प्रसाराच्या आणि देशाच्या लोकसभेमध्ये प्रतिनिधित्व मिळविण्याच्या सवलती मिळविल्या. तात्कालिक वादळ शमले परंतु सरकारच्या मूलभूत धोरणात फारसा फरक पडला नाही. कामगारांच्या त्यांनीच निवडलेल्या समित्या स्थापन करून त्यांच्याशी विचारविनिमय करण्याचे आश्वासन पक्षनेता गोमुल्का याने दिले होते. परंतु या समित्या नामधारीच राहिल्या. लोकाभिमुख स्वातंत्र्याची जोपासना कटाक्षाने केली गेली नाही. म्हणून अनिर्बंध आविष्कार स्वातंत्र्याची मागणी लेखक, विद्यार्थी, यांच्याकडून जोरात पुढे आली. त्यांनी कम्युनिस्ट राजवटीला वरकरणी पाठिंबा दिला. परंतु ती बलवत्तर करण्याकरता लोकमत अनुकूल बनविण्याच्या कामापासून ते अलिप्त राहिले. सरकारच्या विविध क्षेत्रातील धोरणांवर ते टीका करीत राहिले. काहींनी सरकार व पक्षातील लोकशाहीवर हल्ला चढवला तर काहींनी 'या देशात कामगारवर्गांची अधिसत्ता नसून अज्ञानी (मूर्ख) धेंडांची हुकूमशाही आहे.' अशी गर्जना केली. यातील काहींना अटक होऊन शिक्षा झाली. या व अन्य प्रकारच्या पक्षश्रेष्ठींच्या विरुद्ध १९६८ च्या सुमारास निदर्शने झाली.

१९७० मध्ये पुन्हा एकदा भाववाढीविरुद्ध निदर्शने झाली. भाववाढ होऊ देण्यात म्हणजे विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे किंमती वाढू नयेत म्हणून सरकार देत असलेली सवलत थोडीशी कमी करण्यात, पोलंडचे राज्यकर्ते नेहमीच चुकीचे धोरण आखीत असत असे नाही. अशा परिस्थितीत ते धोरण अपरिहार्यही बनावयाचे. परंतु त्या धोरणाला पाठिंबा मिळविण्याकरिता कामगारांचा विश्वास संपादन करणे आवश्यक होते. परंतु पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे विविध प्रश्नांच्या बाबतीत वैचारिक पातळीवर अविरतपणे जागृती करण्याचे कामी पक्षाचे दुर्लक्ष झाल्यामुळे, दर वेळी तीव्र प्रतिक्रियांना तोंड देऊन भयभीत अवस्थेत सरकारला आपले धोरण मागे घ्यावे लागले. १९७० साली झालेल्या निदर्शनात जो गोळीबार झाला त्यात सुमारे ५५ कामगार प्राणास मुकले. या कामगारांचे स्मारक उभारू देण्यास सरकार या वर्षीच्या जुलै महिन्यापर्यंत तयार नव्हते. कम्युनिस्ट पक्षाचा पुढारी गोमुल्का याला आपले स्थान गमवावे लागले. गायरेक् हा खाणकामगारांचा नेता पक्षप्रमुख बनला. याचे वडील, आजोबा आणि चुलते खाणीतील अपघातात मरण पावले होते. स्वभावातील गोडव्यामुळे व एकूणच सहिष्णु प्रवृत्तीमुळे तो त्याच्या स्थानिक पातळीवरील कामाच्या क्षेत्रात लोकप्रिय होता. लवकरच तो देशभर लोकप्रिय झाला. ५५ कामगारांचे स्मारक उभारू देण्यास त्याचाही विरोध होता. परंतु पोलंडचे औद्योगिकीकरण व आधुनिकीकरण झपाट्याने करून कामगारांचे जीवनमान उंचावण्यात त्याला पहिल्या काही वर्षांत यश आल्यामुळे, स्मारकाची मागणी अटीतटीने पुढे रेटण्यात आली नाही.

१९७० च्या उठावामुळे गोमुल्काला जसे पदच्युत व्हावे लागले तसे ज्या गडान्सक बंदरात हा उठाव घडवून आणण्यात ज्या लेख् वॉलेन्सा या, त्या वेळी २७ वय

असलेल्या, तरुण वीज कामगाराने पुढाकार घेतला होता त्याला आपली नोकरी गमवावी लागली होती. गोमुल्काची लोकप्रियता विरून गेली होती. वॉलेन्साची लोकप्रियता वाढू लागली होती. पुढील दहा वर्षं त्याने ३-४ ठिकाणी नोकऱ्या केल्या. तो जाई तेथे कामगारांना संघटित करीत असे आणि त्यांच्या समस्या पुढे रेटीत असे. मात्र त्याला व्यापक दृष्टी आली होती असे नाही. त्याने कामगार वर्गाचे तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला होता असेही दिसत नाही. कम्युनिस्ट पक्षानेही त्याच्याशी संपर्क साधून त्याच्या विचारसरणीला पक्षहिताच्या व कामगारवर्गाच्या हिताच्या दृष्टीने वळण लावण्याचा काही प्रयत्न केल्याचेही दिसत नाही. सध्या सहा मुले असलेला हा कामगार नेता कट्टर कॅथॉलिक पंथाचा असण्यात अभिमान बाळगतो. सरकारी खर्चाने स्मारक होईल तोपर्यंत गडान्सक बंदरात सध्या उभारण्यात आलेले कामगार हुतात्म्यांचे स्मारक हे धर्मप्रतीकच आहे. तेथे कामगाराचा पुतळा नाही किंवा स्तंभावर उभारलेला विळा-हातोडा नाही. ख्रिश्चन धर्माचे प्रतीक असलेला लाकडी क्रूसच तेथे उभारण्यात आला आहे!

संपाला कारणीभूत परिस्थिती

गायरेक या नव्या नेत्याचे धोरण जर यशस्वी झाले असते तर वॉलेन्सा जगातील वर्तमानपत्रातून दोन महिन्यांपूर्वी झळकला तसा कधी झळकलाही नसता. पोलंडमध्ये समाजसत्तावादाच्या आग्रहापेक्षा सुद्धा सर्वांशी सहिष्णुतेचे धोरणच सातत्याने पुढे सरकत आहे हे पाहून पाश्चात्य राष्ट्रांना पोलंडला कर्ज वगैरे सारखी मदत देऊन, आपल्या भांडवलदारी देशांच्या गोटात जरी खेचता आले नाही तरी जगातील इतर समाजसत्तावादी राष्ट्रांपासून अलग पाडण्यात स्वारस्य वाटत होते. पाश्चात्य देशातील कर्जाच्या साहाय्याने औद्योगिकरण करून निर्यातीच्या बळावर देश संपन्न करता येईल असे गायरेकला वाटत होते. म्हणून पाश्चात्य राष्ट्रे, अमेरिका व जागतिक जाळे असलेल्या बँका यांच्याकडून पोलंडने प्रचंड प्रमाणावर कर्जे घेतली. कारखाने उभारून उत्पादित मालाच्या किंमती वाजवीपेक्षा कमी ठेवल्या आणि कामगारांच्या हातात पैसा खेळू लागल्यावर त्यांना स्वत:च्या देशात अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसलेल्या चैनीच्या वस्तूंचे आकर्षण वाटू लागले. या वस्तू डॉलरसारखे परदेशी चलन देऊनच मिळू शकतात म्हणून काळ्या बाजारात डॉलर मिळविण्याची प्रवृत्ती पुष्कळच पसरली. कामगारांच्या देश-परिस्थितीसापेक्ष नसलेल्या कृत्रिम गरजा यात विरोध उत्पन्न होऊ लागला. काहीशा सुस्तावलेल्या कामगारांनी आणि कारखान्यांच्या व्यवस्थापकांनी अपेक्षित उत्पादन वाढ करण्यात कुचराई केली. त्यामुळे निर्यातीकरिता आवश्यक त्या प्रमाणात व आवश्यक त्या दर्जाचे उत्पादन अनेक कारखान्यातून झाले नाही. कर्जाचे डोंगर तर वाढत होते. व्याजासहित कर्जांचे हप्ते देण्यात अडचणी येऊ लागल्या म्हणून अधिक कर्ज काढण्यात आले. आज पोलंडच्या कर्जाची रक्कम दोन हजार

कोटी डॉलर्सच्या घरात जाऊन पोहोचली आहे. उत्पादित माल निर्यातीकरिता कमी पडतच होता. त्यात पुन्हा १९७४ सालच्या सुमारास युरोपात सौम्य मंदीची लाट आल्यामुळे उपलब्ध असलेल्या मालालाही बाजारपेठ मिळेना. सोविएत रशियात काही वस्तू विकता आल्या असत्या, परंतु तसेच विशेष कारण असल्याशिवाय या वस्तूंची किंमत रशिया डॉलर या चलनात कसा देईल? कर्जफेडीकरिता रशियन नाणे घेऊन काय उपयोग? अशा मोठ्या पेचात गायरेक आणि त्याच्या देशाचे सरकार सापडले.

कारखान्यातील उत्पादित वस्तू विकता येत नसतील तर निदान मांसाहारी पदार्थांची निर्यात वाढवून तरी कर्जफेडीचा वायदा पुरा करण्याचा प्रयत्न करावा असे पोलंडने ठरविले. शेतकऱ्यांना भाव कमी देऊन चालणार नव्हते, कारण तसे केल्यास खासगी शेतकऱ्यांनी उत्पादन वाढू दिले नसते. गेल्या पाच वर्षांत कामगारांना पगारवाढ दिली आहे तेव्हा आता किंमती थोड्या वाढविल्या तर कामगारांची मागणी थोडी कमी होईल, ते संतप्त होणार नाहीत आणि देशातील मागणी कमी झाल्यामुळे मिळणारे पदार्थ निर्यात करता येतील असे सरकारला वाटले. म्हणून १९७६ साली कॉफी, चहा व अन्नधान्य हे वगळून बाकी सर्व खाद्य पदार्थांच्या किंमती सरकारने ३९ ते ७० टक्क्यांनी वाढविल्या. देशाची परिस्थिती लक्षात घेण्याचे शिक्षण न मिळालेल्या कामगारांनी नेहमीप्रमाणे तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी रेल्वेचे रूळ उखडले आणि घोषणा देत ते रस्त्यावर आले. सरकारला माघार घ्यावी लागली. किंमती नियोजित वाढीपेक्षा निम्म्यानेच वाढविण्यात आल्या.

संप

चार वर्षांचा काळ लोटला. १९८० चा जुलै उजाडला. या वर्षीचा व्याजासहित कर्जफेडीचा हप्ता ७०० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक असल्याचे सरकारच्या लक्षात आले. भाववाढ करून देशांतर्गत मागणी कमी करून निर्यात वाढविण्याचा प्रयत्न करणे हाच नेहमीचा उपाय सरकारजवळ होता. म्हणून अव्वल दर्जाच्या मांसाहारी पदार्थांची किंमत ३० टक्क्यांपासून ९० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली. सरासरी या पदार्थांची भाववाढ ४० टक्क्यांनी करण्यात आली होती. १९५६ पासून परंपरा असलेले कामगार भडकले. धडाधड सर्वत्र संप सुरू झाले. सरकारने एकेका कारखान्यात वाटाघाटी करून १५ ते २० टक्क्यांपर्यंत पगारवाढ दिली; पण या वेळेस भाव कमी करण्यास स्पष्टपणे नकार दिला. या वाढीव पगाराचा उपयोग कामगार मांस घेण्यापेक्षा काळ्या बाजारात डॉलर घेऊन चैनीच्या वस्तू घेण्याकरिता करतील अशी आशा सरकारला वाटत असावी असा काहींचा तर्क आहे. पोलिश कामगारांचा सरासरी पगार रु. १३०० ते १५०० पर्यंत आहे. भाववाढ झालेल्या मांसाची किंमत सुमारे रु. ७२ प्रति किलो इतकी आहे. कामगाराला पगारवाढ दिली असल्यामुळे मांसाहारी पदार्थांची मागणी फारशी कमी होण्याची शक्यता नाही, असा इतर काही तज्ज्ञांचा अंदाज आहे.

यावर्षी वादळ व अतोनात झालेल्या पावसामुळे ४३ लाख एकर जमिनीवरील पिकांची हानी झाली आहे. एक तृतियांश पीक हाती लागणार नाही असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे भाववाढ केवळ मांसाची नाही तर धान्याचीही लवकरच होईल अशी जवळजवळ खात्री पोलंडमधील लोकांना वाटते आहे. त्यामुळे आत्तापासूनच जोरदार विरोध करणे श्रेयस्कर असेही अनेकांना वाटले.

हा जोरदार विरोध गडान्सक येथील गोदी कामगारांनी ऑगस्ट महिन्यात व्यक्त केला. त्यांची पहिली प्रतिक्रिया भाववाढीविरुद्ध झाली नाही. १९७० च्या संपात भाग घेतलेल्या एका वयस्कर कामगार महिलेला, ती कामगार संघटनेच्या द्वारा लोकांच्यात बेदिली उत्पन्न करते या आरोपावरून तिला व तिच्याबरोबर इतर दोघांना कामावरून काढून टाकण्यात आले. म्हणून मूलत: तेथे ठिणगी पडली. तिला व इतरांना कामावर परत येण्याची मागणी करण्यात आली. तोपर्यंत इतर कामगारांना पगारवाढ मिळत असल्याच्या बातम्या या बंदर कामगारांपर्यंत पोहोचल्याच होत्या. या कामगारांनी अनधिकृतपणे एक संप समिती स्थापन केली आणि तेथे बहुतेक सर्व १६००० कामगार चर्चेसाठी जमले. त्यांनी वॉलेन्सा या आपल्या लाडक्या नेत्याला संपाची व वाटाघाटीची सूत्रे हातात घेण्यास सांगितले. या चर्चेतून मागण्या केवळ पगारवाढीपुरत्या मर्यादित राहू नयेत असे ठरले. एका मागून एक मागण्यांची यादी तयार करण्यात आली. कामगारांना आपले म्हणणे मांडण्याकरिता सुरक्षितता वाटली पाहिजे म्हणून केवळ पक्ष नियंत्रित कामगार संघटना न ठेवता स्वतंत्र स्वयंशासित संघटनांची परवानगी असावी, संप करण्याचा कायदेशीर हक्क असावा आणि संपाला साहाय्य करणाऱ्या सर्वांना कामावरून काढून न टाकण्याचे अथवा अन्य त्रास न होण्याचे आश्वासन देण्यात यावे, इत्यादी मागण्यांचा यादीत समावेश करण्यात आला. कोणतेही निर्बंध न घालता लेखनस्वातंत्र्य असावे, सर्व राजबंद्यांना मुक्त करण्यात यावे, चर्चमधील रविवारी होणारी प्रार्थना व धर्मगुरूंचे व्याख्यान रेडिओ व टेलिव्हिजनवर प्रक्षेपित करण्यात यावे, या मागण्याही पुढे आल्या.

१९५६ पासून पोलंडमध्ये धुमसत असलेला असंतोष योग्य आर्थिक व राजकीय धोरण घेऊन शमविण्यात पोलंडच्या सरकारला व कम्युनिस्ट पक्षाला यश न आल्यामुळे समाजसत्तावादी समाजरचनेस सुरूंग लावण्याची शक्यता असलेल्या मागण्याही कामगारांनी केल्या आणि सरकारला त्या मान्य करण्यास भाग पाडले असे दिसते. पेन्शनच्या रचनेमध्ये वाढ, सेवानिवृत्तीचे वय कमी करणे, मांसाहारी पदार्थ रेशनिंग करून वाटणे, अनियंत्रित दरात वस्तू मिळण्याची दुकाने रद्द करणे, याही आर्थिक व सामाजिक मागण्या होत्या. रु. ३०० ते ४०० पर्यंत पगारवाढीची मागणी होतीच. आज पोलंडमध्ये बाळंतपणाची रजा पहिल्या मुलाचे वेळेस १६ आठवडे व पुढील मुलांच्या वेळेस १८ आठवडे मंजूर असताना, मूल १४ वर्षांचे होईतोपर्यंत ते आजारी पडल्यास त्याच्या शुश्रुषेसाठी वर्षातून ३० दिवसाची पगारी रजा असताना सुद्धा,

त्याचा अपुरेपणा कामगारांना जाणवला (!) आणि त्यांनी बाळंतपणाची रजा तीन वर्षांची असावी त्यात पहिल्या वर्षी पूर्ण पगार असावा अशीही मागणी करून पाहिली! परंतु वाटाघाटीत ती फेटाळण्यात आली आणि कामगारांनी तिचा फेरउच्चार केला नाही.

बऱ्याच मागण्या सरकारने मान्य केल्या. कामगारांनी स्वतंत्र संघटनांच्या द्वारा राजकीय सत्ताकेंद्रे उभी करणार नाही असे आश्वासन दिले आहे; कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व मान्य केले आहे. समाजसत्तावादी राजवट अबाधित ठेवण्याचे अभिवचन त्यांनी दिले. जगातील विविध देशांमध्ये साम्राज्यवादी देशांनी लष्करी तळ ठोकलेले असल्यामुळे व नाटोसारखी लष्करी मदतीच्या कराराची संघटना केलेली असल्यामुळे समाजसत्तावादी देशांना वॉरसॉ करार करावा लागला. या वस्तुस्थितीचे भान ठेवून त्या करारातून बाहेर पडण्याची मागणी न करण्याचे अभिवचनही कामगारांनी दिले आहे.

काही प्रश्न

समाजसत्तावादी देशातील हा अपूर्ण संप तडजोड होऊन संपुष्टात आला. सोविएत युनियनला हस्तक्षेप करण्याची गरज पडली नाही याबद्दल अनेक सुस्कारा सोडीत आहेत. परंतु ही गरज का पडली नाही? हा संप कामगारांनी स्वयंस्फूर्तीने केला होता. अमेरिकन गोदी कामगारांनी पोलीश कामगारांना आर्थिक मदत देऊ केली असली, पोलंडला अन्नधान्य घेऊन जाणाऱ्या जहाजामध्ये धान्याची पोती भरण्यास त्यांनी नकार दिला असला, अध्यक्ष कार्टर यांनी पोलीश कामगारांचे जाहीर अभिनंदन केले असले तरी या पैकी कोणीही संपाला प्रत्यक्ष चिथावणी देऊन आक्रमक हालचाली केल्या नव्हत्या. कामगारांचा संप शांतपणे चालविण्यात आला आणि पोलीश सरकारने तो संप मिटविण्याकरिता कोणालाही प्रत्यक्ष मदत मागितली नव्हती. पोलंडला आर्थिक मदतीची काय गरज आहे हे लक्षात घेऊन रशियाने १०० कोटी डॉलर्स (डॉलर या चलनात) पोलंडला देण्याचे मान्य केले आहे. जर्मन व अमेरिकन बँक अथवा सरकार यांनी देऊ केलेल्या कर्जाची रकाने भरून वर्णने सर्वत्र आली आहेत. पण रशियन कर्जाला कोपऱ्यात कोठेतरी निवडक नियतकालिकांनीच स्थान दिले आहे!

पोलंडच्या कामगारांचा जय झाला आहे हे निश्चित, पण या जयातून समाजसत्तावादाचा वृक्ष वाढीस लागेल की काही मागण्या वाळवीचे रूप धारण करून हा वृक्ष पोखरून काढतील? गायरेक या खाण कामगाराचे नेतृत्व संपले. कॉनिया या शेतकरी कुटुंबातील नव्या नेत्याच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या हातून झालेल्या चुका भरून काढण्यात यश येईल का? आजच काही भाकित करणे कठीण आहे.

पोलंडमधील राज्यकर्ते व कामगार घडलेल्या घटनांपासून त्यांना योग्य वाटेल तो निष्कर्ष काढतीलच. समाजवादी देशांवर सतत आक्षेप घेणाऱ्यांचा दुटप्पीपणा

कसा उघडा पडतो हेही आपण समजावून घेतले पाहिजे. त्या देशांचा कारभार जर सुरळीतपणे चालला असेल, तेथे कोठे तीव्र असंतोष जर व्यक्त होत नसेल, तर तेथे सर्व बाबतीत मुस्कटदाबी होत असते म्हणून असंतोष व्यक्त होत नाही असा आक्षेप व्यक्त केला जातो! जोपर्यंत जगातील बहुसंख्य मोठ्या देशातून भांडवलशाहीचे उच्चाटन होत नाही तोपर्यंत जगातील नैसर्गिक संपत्ती, अन्य साधनसामग्री व त्यातून उत्पादित होणाऱ्या वस्तू याची मालकी व वाटप विषमच असणार. लोकसंख्येच्या प्रमाणात जर एखाद्या देशात साधनसामग्री नसेल तर त्याच्या विकासक्रमात समस्याही निर्माण होणारच. समाजसत्तावादी देश याला अपवाद कसे असू शकतील? त्या समस्या सोडविण्याच्या कामी देशातील नेतृत्व जर अधूनमधून असमर्थ ठरले तर असंतोषाचा आविष्कार होणे हेही अपरिहार्य आहे. हा असंतोष समजावून घेऊन, समाजवादावरची निष्ठा ढिली होऊ न देता, ज्याने-त्याने आपापल्या देशात समाजसत्तावाद स्थापन करण्याच्या प्रयत्नातूनच या दुटप्पी आक्षेपवंतांना चोख उत्तर मिळेल.

(तात्पर्य, ऑक्टोबर १९८०)

❑

बेकार तरुणांच्या हृदयातल्या आगीने पेटले इंग्लंड!

राजनारायण किंवा मधु लिमये यांच्यासारख्यांच्या दंग्या-आरोळ्यांनी गाजणारी लोकसभा जगाच्या पाठीवर एकच आहे असे नाही. एक आठवड्यापूर्वी आदर्श लोकशाही म्हणून गाजत असलेल्या इंग्लंडच्या लोकसभेत एक खासदार तावातावाने उठला आणि 'बेअकली बया! बेअकली बया!' असे खुद्द देशाच्या पंतप्रधान थॅचरबाईला उद्देशून ओरडला. मजूरपक्षाच्या इतर खासदारांनीही बाके आपटून, आरडाओरडा करून खूपच धमाल उडवून दिली. लोकमानसातील तीव्र असंतोष उद्धट पंतप्रधानांच्या कानावर घालण्याची चोख कामगिरी मजूरपक्षीय लोकप्रतिनिधी बजावत होते. तेवढ्यात लोकसभागृहाच्या गच्चीतून एका तरुणाने उडी मारली आणि बारा इंची सुरा पाजळीत 'त्या मॅगी थॅचरला हात दाखविलाच पाहिजे.' अशी आरोळी देत तो पंतप्रधानांच्या दिशेने धावून गेला. बऱ्याच खासदारांनी त्याला अडवले नसते तर जगात एक भलतीच सनसनाटी बातमी कदाचित झळकली असती. इंग्लंडमध्ये ही अशांतता कशी व का पसरली? या परिस्थितीच्या आड दडलेली कारणे कोणती?

ब्रिटिश साम्राज्याचा सूर्य कधी मावळणार नाही हा भ्रम एकेकाळी सर्वत्र प्रसृत करण्यात आला होता. तसाच ब्रिटन या देशातील लोक इतके शिस्तप्रिय, सुजाण व संयमशील आहेत की 'कायदा व सुव्यवस्था' यांचा भंग तेथे कधीही होणे अशक्य आहे असा भ्रम अनेकांच्या मनात दृढ होऊन बसला होता. परंतु शुक्रवारी तीन जुलै रोजी लंडनजवळील साऊथ हॉल परिसरात जी दंगल उसळली, ती पेटत पेटत ब्रिटनमधल्या विसापेक्षा अधिक शहरात पसरली आणि दोन आठवड्यांपेक्षा अधिक काळ लोटला असूनही ती अद्याप शमलेली नाही. लिव्हरपूल, मँचेस्टर, बर्मिंगहॅम, एल्स्‌मिअर पोर्ट, हल्‌, ब्रिक्स्टन, चेस्टर, नॉटिंगहॅम यासारखी मोठमोठी औद्योगिक शहरे व बंदरे लोकक्षोभाच्या झंझावातात सापडली आहेत.

वांशिक दंगलीचा वणवा

साऊथ हॉलच्या आणि पूर्व लंडनच्या परिसरात दोन आणि लिव्हरपूलजवळील टॉक्सटेथ या गावी एक असे एकूण तीन प्रसंग घडले. एका सुप्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये नृत्य व संगीत जल्लोषाचा कार्यक्रम चालू होता. त्यात आशिया खंडातले, मुख्यत: भारत, पाकिस्तान व वेस्टइंडिजमधले कृष्णवर्णीय लोक प्रेक्षक म्हणून सहभागी झालेले होते. वेळ रात्रीची होती. अचानकपणे बस, मोटारी भरून काही गोरे लोक तेथे आले. डोक्याची चंपी करून स्वस्तिक चिन्हांकित पोषाख घालून फॅसिझमच्या व वर्णद्वेषाच्या घोषणा देणाऱ्या या लोकांना 'स्किनहेडस्' असे म्हणतात. तेथे असलेल्या प्रेक्षकांशी धसमुसळेपणा करून, अप्रतिष्ठित भाषा वापरून थोडा वेळ तो संगीत जल्लोष त्यांनी पाहिला आणि लगेच बाहेर पडून त्यांनी शेजारची दुकाने, घरे लुटावयास, काचेची तावदाने फोडण्यास, नासधूस करण्यास, आगी लावण्यास आणि कृष्णवर्णीयांना शिवीगाळ करण्यास सुरूवात केली.

गेली अनेक वर्षे गोऱ्या लोकांची उद्दाम, भेदभाव दर्शवणारी वागणूक सहन करून आशिया, आफ्रिका खंडातील, काळे व तपकिरी वर्णाचे लोक उद्विग्न व संतप्त झालेले आहेत. त्यांच्यातील युवकांनी तर जन्मापासून आजपावेतो आपले आयुष्य इंग्लंडमध्येच घालवले आहे. यातील कित्येक लोक या देशातील राहणीमानाशी तुलना करता दारिद्र्याने गांजलेले आहेत. ते ज्या शाळांतून शिकतात त्यापैकी काही शाळांमधील शिक्षक त्यांच्याबद्दल अधिक्षेपात्मक उद्‌गार काढून त्यांना हिणकस वागणूक देत असतात. वांशिक भेदभावाविरुद्ध कायदा असूनही त्यांना कित्येकदा राहण्यास भाड्याने घर मिळणे अवघड किंवा अशक्य असते. म्हणून गलिच्छ वस्त्यांमधील कोंदट घरांतून त्यांना रहावे लागते. वर्णद्वेषी संघटना अथवा इनॉक पॉवेलसारख्या एकेकाळी मंत्री असलेल्या व्यक्ती यांच्या आक्रमक गुंडगिरीपासून अथवा दंगलीला उघडउघड प्रोत्साहन देणाऱ्या प्रचार माध्यमांपासून अल्पसंख्याक लोकांना संरक्षण देण्याऐवजी पोलीस या सर्व कृत्यांकडे कानाडोळा करतात. कधी कोठे दंगल झाली तर गोऱ्या गुंडांना अटक करण्याऐवजी नि:पक्षपातीपणाचा बहाणा करण्याकरता हल्लेखोरांपैकी काहींना आणि हल्ल्यांचे लक्ष्य बनलेल्या अल्पसंख्याक कृष्णवर्णीय नागरिकांना अशा दोघांनाही अटक करतात आणि त्यातील गोऱ्या लोकांना सौम्य वागणूक देतात. इंग्लंडमधील काही न्यायाधीश वर्णभेदग्रस्त असल्यामुळे कायद्यातील कलमांचा अर्थ गोऱ्या लोकांना अनुकूल ठरेल अशा तऱ्हेने शाब्दिक ओढाताण करून लावतात व त्यामुळे कोर्टात जाऊन न्याय मागणे हेही तेथील अल्पसंख्याक कृष्णवर्णीयांना अवघड झाले आहे.

वरील सर्व कारणांमुळे कृष्णवर्णीय युवकांनी संघटित बळावर आत्मसंरक्षण करावयाचे ठरवले तर त्यात वावगे ते काय? स्किनहेडस्च्या हल्ल्याची बातमी पसरताच असे युवक गोळा झाले आणि त्यांनी प्रतिहल्ला सुरू केला. दंग्यांच्या ठिकाणी पोलीस आल्यावर स्किनहेडस् त्यांचा आश्रय घेऊन त्यांच्या मागे लपू लागले. त्यांना ताबडतोब

अटक होत नाही हे पाहून कृष्णवर्णीयांनी या वेळेस पोलिसांना चांगलाच धडा शिकवला. पोलिसांना प्रसाद देण्याची संधी गरीब गोऱ्या लोकांनाही हवी होती. म्हणून तेही दगडविटांचा वापर करण्यात सामील झाले. अनेक पोलीस जखमी झाले. आपल्या वसाहतीतील लोकांवर लाठ्या-गोळ्या चालविणाऱ्या 'सभ्य' इंग्रज साम्राज्यवाद्यांनी स्वत:च्या देशातील पोलिसांना दंडुक्याव्यतिरिक्त कोणतेही शस्त्र हातात न घेण्याची प्रथा पाडली आहे. त्यामुळे पोलिसांवर दगडविटांचा वर्षाव होत असताना ते मोठी कुमक येईतोपर्यंत काही करू शकले नाहीत.

वॉल्थॅमस्टो नावाच्या लंडनच्या पूर्वेकडील एका गावात खान या नावाचे कुटुंब रहात होते. त्यांच्या घरापुढे त्यांनी लावून ठेवलेल्या टपालपेटीत काही पिसाट गोऱ्या गुंडांनी एक बॉम्ब ठेवला. त्याबरोबर त्या घराला आग लागली. स्वत: खान कसेबसे निसटून बचावले. परंतु त्यांची पत्नी व तीन लहान मुले आगीत सापडून मरण पावली. ही बातमी पसरताच आशियाई लोक अधिकच भडकले. मरण पावलेल्यांची अंत्ययात्रा काढताना लोकांनी संरक्षण न देणाऱ्या पोलिसांविरुद्ध पुन्हा त्वेष व्यक्त केला.

तिसरा प्रसंग घडला, लिव्हरपूल या शहराजवळच्या टॉक्सटेथ या गावी. एक पाकिस्तानी युवक मोटारसायकलवरून चालला होता. ही मोटारसायकल चोरीची आहे, या संशयाने पोलिसांनी त्याला बेड्या घालून अटक केली आणि आपल्या गाडीमध्ये डांबून टाकले. ही बातमीसुद्धा सर्वत्र वेगाने पसरली. त्याबरोबर अनेक आशियाई तरुण संतापून रस्त्यावर आले. वेस्टइंडिजमधील युवकही त्यांच्या मदतीला आले. पोलिसांशी तीव्र वाद चालू होता. या सर्व गडबडीत अटक झालेल्या युवकाने पोलिसांचा डोळा चुकवून गाडीतून उडी मारली आणि तो लोकांच्यात येऊन मिसळला. या पलायनाच्या कामाला वेस्टइंडिजमधल्या दोन तरुणांनी मदत केली अशा समजुतीने पोलिसांनी या तरुणांना अटक केली. लोकांचा राग अनावर झाला. त्यांनी पोलिसांच्या गाड्यांना आग लावली आणि हातात येईल ती वस्तू घेऊन ते पोलिसांवर भिरकावू लागले.

काही गोरे तरुण मधे पडून ही दंगल आणि पोलिसांशी चाललेली वादावादी थांबवण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांना यश आले नाही. उलट एकामागून एक दर दिवशी दंगल वाढायला लागली. या वार्ता टी. व्ही. वर पाहणाऱ्या व ऐकणाऱ्या गोऱ्या तरुणांना स्वस्थ बसवेना. तेही रस्त्यावर आल्यावर लिव्हरपूल शहराला युद्धभूमीचे स्वरूप आले. जाळपोळ, लुटालुट करून त्यांनी अक्षरश: हैदोस घातला. इंग्लंडच्या इतिहासात पहिल्या प्रथम अश्रुधुराच्या नळकांड्या फुटल्या. लोक त्या रात्रीपुरते पांगले परंतु दुसऱ्या दिवसापासून लंडनसकट अनेक शहरे या दंगलींच्या वणव्यात सापडली. वयस्कर महिला, दहा-दहा वर्षांची मुले व मुली रेफ्रिजरेटर, उंची फर्निचर, खाद्यपदार्थ, किराणा माल आणि हरएक वस्तू लुटून हसतमुखाने रस्त्यातून जाऊ लागली. पोलिसांवर मोठ्या शिताफीने बॉम्ब व दगडही टाकू लागली. इंग्लंडचे राज्यकर्ते

व मध्यमवयीन किंवा वृद्ध पिढीतील लोक भांबावून गेले. आपले साम्राज्य गेले, अग्रेसर औद्योगिक राष्ट्र म्हणून प्रतिष्ठा गेली. व्यापारातही पिछेहाट झाली हे सर्व काही नाईलाजाने का होईना पण सहन करण्यासारखे आहे. परंतु आपल्या समाजव्यवस्थेची नीटस घडी बिघडली हे कसे सहन करावयाचे? गोरे विरुद्ध काळे अशी दंगल १९८३ पासून हळूहळू वाढत जात होती तोपर्यंत राज्यकर्त्यांच्या डोळ्यांवरची झोप उडाली नव्हती. आता 'आपल्याच देशातील तरुण आपल्याच पोलिसांना पिटून काढतो, श्रीमंतांची घरे, त्यांचे ऐषारामी क्लब, त्यांची थाटामाटाची दुकाने यांना आगी लावतो अथवा लुटतो. गोरे आणि काळे यांची एकजूट झाली तर आपली राजवट कायमची भस्मसात होईल या भीतीने राज्यकर्ता हुजूर पक्ष आणि त्यांचे आश्रयदाते त्रस्त झाले आहेत.

'बॉंब नको, नोकऱ्या द्या'

गेली कित्येक वर्षे जरी बऱ्याच गोऱ्या ब्रिटिश लोकांच्या मनात अल्पसंख्याक काळ्या लोकांविषयी प्रच्छन्न अगर उघड तुच्छतेची भावना असली तरी त्यांच्यात एकजूट घडवून आणणारी परिस्थिती गेल्या काही वर्षांत, विशेषत: गेल्या दोन-तीन वर्षांत, निर्माण झाली आहे. सत्ताधारी हुजूर पक्षातील सर्वात प्रतिगामी गटाचा विजय दोन वर्षांपूर्वी इंग्लंडमधील निवडणुकीत झाला. मागरिट थॅचर पंतप्रधान झाल्या. धनाढ्य लोकांवरील कर कमी करायचे आणि लोककल्याणकारक योजनांवर गेली कित्येक वर्षे चालू असलेला सरकारी खर्च कमी करून टाकायचा असे धोरण त्यांनी जाहीर केले आणि त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीलाही सुरूवात केली. शालांत परीक्षा पास होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध व्यवसायात शिकाऊ कामगार म्हणून (ॲप्रेंटिस) मर्यादित वेतनावर काम मिळण्याची असलेली योजनाही जवळजवळ बंद करण्यात आली.

या सर्व धोरणांचा परिणाम म्हणजे आज इंग्लंडमध्ये वाढत असलेली बेकारी. आज सुमारे ५ कोटी ६० लाख लोकसंख्या असलेल्या इंग्लंडमध्ये रोजगार विनिमय केंद्रावर नोंदवलेल्या आकडेवारीनुसार २५ लाख ५८ हजार लोक बेकार आहेत. इंग्लंडमधल्या ट्रेड युनियन्सनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार नोंदवलेल्या व न नोंदवलेल्या अशा एकूण बेकारांची संख्या सुमारे ३७ लाख ७३ हजार आहे. याचा अर्थ असा की ज्यांना नोकऱ्या पाहिजे आहेत अशा वयोगटातील सुदृढ लोकसंख्येपैकी अकरा टक्क्यांपेक्षा अधिक लोक आज बेकार आहेत. या बेकारीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी इंग्लंडमधल्या कामगार संघटनांनी एक प्रतीकात्मक कार्यक्रम योजला होता. त्यानुसार मे दिनाच्या दिवशी ५०० कामगार लिव्हरपूलपासून सुरूवात करून लंडनपर्यंत पायी चालत गेले. वाटेत जागोजागी सभा घेत घेत २७ मे रोजी लंडनमधील लोकसभेपर्यंत पोचून त्यांनी आपले निवेदन सादर केले आणि दीड लाख लोकांच्या

प्रचंड सभेला 'बॉंब नको, नोकऱ्या द्या' अशा घोषणा देऊन सत्ताधारी पक्षाच्या आक्रमक युद्धखोर धोरणावर अप्रत्यक्षपणे हल्ला चढवला. इंग्लंडमध्ये वाढत असलेल्या बेकारीची झळ तेथील भारतीयांसकट कृष्णवर्णीयांना सर्वात अधिक पोचते. आज इंग्लंडमध्ये सुमारे सहा लाख भारतीय आहेत. बेकारीचा प्रश्न गोऱ्या तरुणांनाही अस्वस्थ करून टाकत आहे. कॉमनवेल्थमधील सर्व देश व पाकिस्तान मिळून बिगर-गोऱ्या लोकांची १९७८ मधील संख्या सुमारे १९ लाख आहे. म्हणजे ब्रिटनच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ३.५ टक्के आहे. यापैकी भारतीयांची संख्या सुमारे ६ लाख आहे.

गेले दोन-तीन आठवडे इंग्लंडमध्ये झालेल्या धुमाकुळीचे मुख्य कारण ही वाढती बेकारी आहे. थॅचरबाईंनी मात्र हा गुंड-मवाल्यांचा हैदोसधुल्ला होता असे बेजबाबदार उद्‌गार काढले आहेत. दंग्यांचा बंदोबस्त करण्याकरता वेगळा कायदा करून, वेगळी न्यायालये त्याकरता स्थापन करण्याचा विचार त्या करत आहेत. पोलिसांना अधिक अधिकार देऊन, त्यांना निदान प्लॅस्टिक गोळ्या, अश्रुधूर उडवण्याची व दंग्यांमध्ये कडक कारवाई करण्याची मोकळीक देऊन 'कायदा व सुव्यवस्था' पुन्हा प्रस्थापित करण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. दंग्यात भाग घेणाऱ्या युवक-युवतींच्या आई-वडिलांना जबाबदार धरून त्यांच्याकडून दंडवसुलीची तरतूदही कायद्याने करण्याची भाषा बोलली जात आहे.

या दडपशाहीतून बेकारी व दारिद्र्य नष्ट होईल का? की मँचेस्टर शहरातील मुख्यत: युवक ज्याप्रमाणे तेथील पोलीस जथ्यावर सुमारे दोन आठवड्यांपूर्वी चालून गेले आणि 'हाणा, पोलिसांना ठार करा' अशा घोषणा त्यांनी दिल्या तशाच घोषणा देशभर दुमदुमू लागतील?

(तात्पर्य, ऑगस्ट १९८१)

❑

जगातील पाणीतुटवड्याची समस्या

सन २००३ हे पिण्याच्या पाण्याचे वर्ष असे मानून जगातील सर्व देशांनी यात लक्ष घालावे असा निर्णय संयुक्त राष्ट्रसंघाने घेतला आहे. सुरक्षित पिण्याचे पाणी ज्यांना मिळत नाही किंवा मिळण्याची शक्यता असली, तरी ते घेण्याची ऐपत नाही अशा जगातील लोकांची संख्या २०१५ सालपर्यंत निम्म्याने तरी कमी करावयाची असा निर्णय संयुक्त राष्ट्र संघाने सन २००० मध्ये भरलेल्या आमसभेत घेतला होता. सन २००२ साली आफ्रिकेतील जोहॅन्सबर्ग येथे भरलेल्या जागतिक शिखर परिषदेत वरील निर्णय पुन्हा एकवार घोषित करण्यात आला.

आज जगात जो एकूण पाण्याचा साठा आहे, त्यापैकी फक्त अर्धा टक्का पाणी (काही तज्ज्ञांच्या मते, त्याहूनही थोडे कमी) हे शुद्धीकरण करून पिण्याच्या योग्यतेचे आहे. जगातील सुमारे १ अब्ज, २० कोटी लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळू शकत नाही. आज दररोज सुमारे ६ हजार लोक (मुख्यत: ५ वर्षांच्या आतील मुले) ही पाण्याशी निगडित अशा दुखण्याने मरण पावत आहेत. संयुक्त राष्ट्र संघ व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध आयोग अथवा समित्यांनी दिलेल्या वरील आकडेवारीवरून पाण्याची समस्या ही किती बिकट बनत चालली आहे हे लक्षात येईल.

पाण्याची गरज ही केवळ मानव व पशु-पक्षी यांची तहान भागविण्याकरिता नाही. शेती-उत्पादन आणि त्यातून जगातील लोकसंख्येला पुरेल इतकी अन्नधान्याची निर्मिती, जैविक विविधतेची जोपासना, आरोग्यरक्षण, स्वच्छतेसाठी धुलाई, वीजनिर्मिती-उद्योग (कारखाने), पर्यावरणाचे संतुलन अशी विविध उद्दिष्टे साध्य करण्याकरिता पाण्याची गरज असते.

सजीव निर्जीव सृष्टीचा पाणी हा महत्त्वपूर्ण आधार आहे, असे असूनही १९७२ पासून पर्यावरण, लोकसंख्या, अन्न, महिला, लोकवस्त्या व निर्वासित, वाळवंटीकरण, ऊर्जास्रोत अशा विविध विषयांवर एकापेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या परिषदा झाल्या. परंतु १९७७ साली मार डेल प्लाटा येथे झालेली 'पाणी' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद वगळता, ही समस्या अतिशय गंभीर असूनही,

जवळजवळ उपेक्षितच राहिली. या परिषदेने जगातील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेची व वाटपाची लक्षणीय दखल घेतली असे म्हणता येईल. जगातील मोठ्या नद्यांपैकी (उदा. जॉर्डन, टायग्रिस, युफ्रेटिस, नाईल, डॅन्यूब) दोन तृतीयांश नद्या या केवळ एका देशाच्या सरहद्दीतून नव्हे तर विविध देशांतून वाहत असतात. या नद्यांतील पाण्याचा सहकार्यावर आधारित उपयोग कसा करावा, पाण्याचा तुटवडा असेल त्या प्रदेशात पाणी पुरविण्याकरिता यंत्रणा व आवश्यक तो मोठा निधी उभारून त्याचा विनियोग कसा करावा या दोनही मुद्यांकडे मात्र वर उल्लेखिलेल्या १९७७ च्या परिषदेत व पुढील सुमारे वीस वर्षे दुर्लक्ष झाले. त्यामुळे समस्या अधिक बिकट होत गेली. १९९० पासून २००३ पर्यंत दिल्ली येथे १९९० साली भरलेल्या परिषदेसकट ११ मोठ्या आंतरराष्ट्रीय परिषदा झाल्या. वेगवेगळ्या बिनसरकारी आयोगांनी अथवा गटांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर पाण्याच्या विविध पैलूंची चर्चा केली. एवढा सारा ऊहापोह झाला असूनसुद्धा, संयुक्त राष्ट्रसंघाने जो निष्कर्षात्मक अंदाज व्यक्त केला आहे तो चिंताजनक आहे. या अंदाजानुसार सन २०२५ पर्यंत जगाची लोकसंख्या सुमारे ८ अब्जाच्या घरात जाईल. त्याचबरोबर स्वच्छ पिण्याचे पाणी ज्यांना तोपर्यंतसुद्धा मिळणार नाही अशांची संख्या आजच्या १ अब्ज, २० कोटींवरून ५ अब्जांपर्यंत जाऊन पोहोचेल.

लोकसंख्यावाढीचा दर पुढल्या काही दशकात थोडासा जरी कमी झाला तरीसुद्धा पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार आहे याची कारणे लक्षात घेतली पाहिजेत.

आज जगातील सुमारे ५८ टक्के लोक शहरात राहत आहेत. नागरीकरणाचे हे प्रमाण दिवसेन्‌दिवस वाढत जाणार आहे. पाण्याचा अपव्यय हा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवला तरी शहरी विभागाला पाण्याची गरज (आरोग्यरक्षण, विष्ठा-विसर्जन व अन्य साफसफाई, उद्याने, उपाहारगृहे, उद्योग) अधिक प्रमाणात लागणार आहे. लक्षात घेणे आवश्यक आहे ते हे की, शहरातसुद्धा तुलनेने सधन व अधिक सधन घटकांना, जास्त पाणी स्वस्त दरात मिळते, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकडे दुर्लक्ष केले जाते, त्यामुळे त्यांना पुष्कळच कमी पाणी मिळते. भारताच्या राजधानीचे म्हणजे दिल्लीचे उदाहरण बोलके आहे. दिल्लीतील बकाल वस्त्या आणि झोपडपट्ट्या मिळून सुमारे २७०० वस्त्यांना नळातून स्वच्छ पाणी मिळत नाही. याच शहरातील उच्चस्तरीय लोकांना बंद पाइपलाइनमधून मिळणाऱ्या पाण्याकरिता दर घनमीटरमागे फक्त रु. १.६० पै. भरावे लागतात. हा दर पाणी पुरवण्याकरिता लागणाऱ्या खर्चाच्या फक्त दहा टक्के आहे. मिळणाऱ्या पाण्यातील सुमारे ३० टक्के पाणी संडाससफाईकरिता वापरले जाते. (फ्लश टॉयलेट सिस्टिम)

युरोप खंडातील देशांपैकी फ्रान्स हा शेतीचे सर्वात अधिक क्षेत्र असलेला देश आहे. तेथे कीटक-नाशके व रासायनिक खतांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे, शेतीतून झिरपणारे सांडपाणी प्रदूषित झाले आहे. फ्रान्समधील लोकसभेने

नेमलेल्या एका तज्ज्ञ समितीने, संपूर्ण देशातील किमान एक टक्का जमीन स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने राखून ठेवली पाहिजे अशी शिफारस केली आहे, नाहीतर फार मोठ्या लोकसंख्येला शुद्ध पाण्याचा तुटवडा जाणवेल अशी साधार भीती व्यक्त केली आहे.

अमेरिकेमध्ये, तेथील अतिरिक्त विलासाधीन जीवनसरणीनुसार व अपव्ययामुळेसुद्धा दिवसाला दरडोई १३०० गॅलन पाणी वापरले जाते. विकसनशील देशांतील दरडोई सरासरीपेक्षा हे प्रमाण ६० पट अधिक आहे. अमेरिकेने पाण्याचा वापर करण्यात जर संयम ठेवला नाही तर त्या देशातील दहा मोठ्या नद्यांचे पाणी कसे आटत जाईल, अविवेकी पाणी प्रकल्पातून हजारो मासे कसे मरत जातील आणि त्यामुळे अन्नाचे एक महत्त्वाचे साधन कसे फार मोठ्या प्रमाणावर कमी होईल, याकडे लक्ष वेधणारा एक विस्तृत अहवाल, 'अमेरिकन रिव्हर्स' या निसर्गरक्षणात स्वारस्य असणाऱ्या संघटनेने, सरकारला सुयोग्य विचार करण्यास प्रवृत्त करण्यासाठी, देशासमोर मांडला.

चीन या देशाने उद्योगीकरणाचा वेग अल्पावधीत फार मोठ्या प्रमाणावर वाढविल्यामुळे, तेथील अनेक विहिरी, तलाव, झरे आटले आहेत. काही अंदाजांनुसार अनेक नद्यांतील सुमारे ८० टक्के पाणी प्रदूषित झाले आहे. शुद्धीकरणासाठी आवश्यक असलेले भांडवल पुरेशा प्रमाणात गुंतविण्याची क्षमता मर्यादित असल्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. केवळ पिण्याकरिता नव्हे, तर शेतीकरिताही पाणी कमी पडल्यामुळे आणि शिवाय दुष्काळ पडल्यामुळे, चीनला २००० ते २००१ च्या दरम्यान अमेरिकेहून ५ लाख टन गहू आयात करावा लागला. एक टन धान्याची किंमत ही एक हजार टन शुद्ध पाण्याइतकी असते हे लक्षात घेतले म्हणजे चीनला एका अर्थाने किती पाणी आयात करावे लागेल याची कल्पना येऊ शकेल.

भारतातील चेरापुंजीमध्ये ऑगस्ट १८६० ते जुलै १८६१ या दरम्यान १०४२ इंच पाऊस पडला होता. हा जगातील उच्चांक म्हणून नोंदविला गेला आहे. परंतु जंगलतोडीमुळे आता तेथे या उच्चांकाच्या सुमारे एक-तृतीयांश पाऊस दरवर्षी पडतो. चेरापुंजीच्या जवळ अगदी थोड्या अंतरावर एक सिमेंटचा कारखाना सुमारे २० वर्षांपूर्वी उभारला गेला. त्या शहराची लोकसंख्या १९६० साली ७ हजार होती. ती आता १५ पटीने वाढली आहे. पाण्याचा तुटवडा आणि दूषित पाणी या दुहेरी परिस्थितीला तेथील नागरिकांना तोंड द्यावे लागते आहे.

एकूण भारतातील परिस्थिती यापेक्षा कितीतरी अधिक गंभीर होणार आहे. १९५५ साली दरसाल दरडोई ५२७७ घनमीटर पिण्यालायक पाणी उपलब्ध होते. १९९० साली ही उपलब्धता निम्म्यापेक्षाही थोड्या कमी पातळीवर जाऊन पोहोचली. २०२५ सालपर्यंत दरवर्षी दरडोई फक्त १००० घनमीटर पाणी मिळण्याची शक्यता आहे. ही पातळी धोक्याची पातळी आहे असे मानले जाते. दरडोई आकडेवारीवरून वाटपातील

विषमता झाकली जाते. सधनांना मिळणारे विपुल प्रमाण आणि निर्धनांना मिळणारे अत्यल्प प्रमाण याची ती सरासरी असते. सधनांना मिळणाऱ्या विपुल प्रमाणामुळे ते बेफिकीर राहिले तरी गरिबांना पाण्यासाठी किती तडफडावे लागणार आहे याची सम्यक कल्पना या आकडेवारीवरून सहजासहजी येईलच असे नाही.

तुलनेने कमी-अधिक प्रगत देशांची ही स्थिती आहे, तर आशिया-आफ्रिका खंडातील ज्या देशांत मुळातच पाण्याचा तुटवडा आहे, तेथील लोकांची काय दारुण अवस्था आहे व होणार आहे हे समजावून घेणे अत्यावश्यक आहे. पाण्याच्या टंचाईमुळे वातावरण किती स्फोटक बनले आहे याकडे १९९५ साली लक्ष वेधताना जागतिक बँकेचे उपाध्यक्ष, इस्माईल सेरागेल्डीन यांनी आपल्या एका भाषणात पुढील विधान केले होते : ''या शतकातील युद्धे जर तेलाच्या साठ्यासाठी झाली असली, तर पुढील शतकातील युद्धे ही पाणी प्राप्त करून घेण्याकरिता होतील.'' हे उद्‌गार ही अतिशयोक्ती नाही हे केवळ दोन उदाहरणांवरून पटण्यासारखे आहे.

युफ्रेटिस नदीचे पाणी जर तुर्कस्तान, सिरिया व इराक या तीनही देशांनी साधारण समप्रमाणात समंजसपणे वाटून घेण्याचे ठरविले, तर सर्वांना पाणी मिळू शकेल. त्याकरिता 'थोड्यांना मुबलक याचेऐवजी सर्वांना माफक' हे तत्त्व स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागेल. प्रत्यक्षात मात्र हे तत्त्व स्वीकारले गेले नाही. युफ्रेटिस नदीचा उगम तुर्कस्तानात आहे. इराक व सिरिया मिळून जेवढी लोकसंख्या आहे, त्याच्या निम्मी संख्या आपल्या देशात आहे, अशी कारणे पुढे करून, नदीतील निम्म्यापेक्षा थोडे अधिक पाणी अडविण्याचे तुर्कस्तानने ठरविले. देशात सुमारे ७०० लहान-मध्यम धरणे असूनही तीन अब्ज डॉलरची गुंतवणूक असलेले अजस्र धरण बांधण्याचाही निर्णय या देशाने घेतला. सिरिया व इराकनेसुद्धा अजस्र नसले तरी मोठ्या धरणप्रकल्पांची तयारी केली. तीनही योजलेल्या धरणांतील पाणी हे युफ्रेटिस नदीत उपलब्ध असलेल्या पाण्यापेक्षा कितीतरी जास्त आहे! तुर्कस्तानच्या नियोजित मोठ्या धरणामुळे, आपल्याला पाहिजे तेवढे पाणी मिळण्याची शक्यता नाही हे सिरियाच्या लक्षात आले. तुर्कस्तान हा मोठ्या लष्कराने सुसज्ज असा देश असल्यामुळे, त्याच्या विरुद्ध युद्ध करण्याचे धाडस करून चालणार नाही हेही सिरियाला उमजले. म्हणून तुर्कस्तानचा कट्टर शत्रू असलेल्या अब्दुल्ला ओकालान या दहशतवादी नेत्याला सिरियाने तुर्कस्तानविरुद्ध पुष्कळ चिथावणी व मदत दिली. तुर्कस्तानने शेवटी या दहशतवाद्याला अटक केली आणि सिरियात जाणारा प्रवाह अडविण्यात येईल अशी धमकी सिरियाला दिली. तेव्हापासून या दोन देशांमध्ये केव्हाही बिघडेल अशी अस्वस्थ शांतता आहे. गेली सुमारे २० वर्षे हा ताणतणाव चालू आहे. इराण, कुवेत व अमेरिका यांच्या विरुद्ध युद्धात गुंतल्यामुळे व पराभवानंतर एकाकी पडल्यामुळे इराकला आपला आक्रमक पवित्रा तुर्कस्तानच्या दिशेने वळविता आलेला नाही. पुढे कधी संधी इराकला मिळाली तर काय होईल हे फार निश्चितपणे सांगणे कठीण आहे. संभाव्य प्राणहानी जी

आहे ती तेलासाठी नाही तर पाण्यासाठी!

दुसरे उदाहरण इस्राईल व लेबेनॉन यांच्यातील संभाव्य संघर्षाचे आहे. हेजबोल्ला या दहशतवादी संघटनेने दक्षिण लेबेनॉनवर आपले वर्चस्व प्रस्थापित केल्यावर हाट्सबानी नदीचे इस्राईलकडे वाहणारे पाणी इतरत्र वळविण्याचे ठरविले. हा निर्णय प्रत्यक्ष अमलात आणल्यास, युद्ध सुरू करण्यास प्रवृत्त करणारी ती कृती ठरेल, हे लेबेनॉनने लक्षात ठेवावे असा इशारा इस्राईलने दिला आहे.

जगातील इतर काही मोठ्या नद्यांशी संलग्न असलेल्या देशांमध्ये चालू असलेल्या कमी-अधिक तीव्र वाद अथवा बेबनावांची दु:खद कहाणी, एक पुस्तक लिहिण्याइतकी विस्तृत आहे.

वरील कारणांव्यतिरिक्त पृथ्वीवरील वाढते तापमान, त्यातून होणारे बाष्पीभवन, हवामानात होत असलेले बदल, त्यातून बेभरवशाची पर्जन्यवृष्टी, पिके व पाणी-योजनेतील अविवेक, त्यातून निर्माण होणारी क्षारयुक्त पाण्याची वाढ या कारणांमुळेही पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. हिमनग वितळविणे, किंवा समुद्राचे खारे पाणी शुद्ध करून पिण्यालायक किंवा शेतीकरिता उपयुक्त करणे हे तांत्रिकदृष्ट्या असाध्य नसले तरी त्याकरिता जगाला न परवडणारा भरमसाठ खर्च करावा लागेल.

जगात असलेले पाणी व दरवर्षी मिळू शकणारे पाणी सर्व देशांनी एकमेकांशी सहकार्य करून, अनावश्यक उधळपट्टी टाळून, योजनाबद्ध पद्धतीने वापरल्यास, ज्यांना पाणी मिळत नाही त्यांच्यापर्यंत ते पोहोचविण्याकरिता आवश्यक ती भांडवल गुंतवणूक केल्यास, हा अत्यंत मर्यादित निसर्गघटक सर्वांना आनंदाने उपभोगता येईल. सध्या जगात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छतारक्षण याकरिता सुमारे ७० अब्ज डॉलर खर्च होत असतात असा अंदाज जागतिक पाणी आयोगाने व्यक्त केला आहे. ज्यांच्यापर्यंत सध्या पाणी पोहोचत नाही त्यांपैकी निम्म्या लोकांपर्यंत २०१५ सालपर्यंत पाणी पोहोचवावयाचे असेल तर या रकमेत दरवर्षी निदान २५ अब्ज डॉलर्सची भर घालावी लागेल अशी शिफारस स्वीडनमधील स्टॉकहोम येथे ऑगस्ट २००२ साली भरलेल्या परिषदेत करण्यात आली होती. या परिषदेत १०० देशांतील राजकीय नेते, शास्त्रज्ञ व उद्योगधंद्यांचे प्रतिनिधी मिळून ९०० जण सहभागी झाले होते.

स्टॉकहोम परिषदेनंतर जवळजवळ लगेच जोहान्सबर्ग येथे १०९ देशांचा सहभाग असलेली जंगी आंतरराष्ट्रीय परिषद झाली. ही परिषद भरविण्याकरिता अंदाजे साडेपाच कोटी डॉलर्स खर्च करण्यात आले. पाण्यासकट पाच विषय या परिषदेत चर्चेसाठी आयोजित करण्यात आले होते. चर्चेव्यतिरिक्त या परिषदेतून अद्याप काहीही निष्पन्न झालेले नाही. १९९२ साली, रिओ दी जॅनेरिओ येथे भरलेल्या वसुंधरा परिषदेत विकसित देशांनी विकसनशील देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या अर्ध्या टक्क्यापेक्षा थोडी जास्त रक्कम (सातदशांश टक्के) अनुदान म्हणून द्यावी असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर आठ वर्षे लोटली तरी विकसित देशांनी आपली जबाबदारी पार पाडली

नाही याबद्दल जोहान्सबर्ग परिषदेत या देशांना कोणी धारेवर धरले नाही.

विकसित देशांनी अनुदान देण्याच्याऐवजी एक अत्यंत स्वार्थांध निर्णय घेतला आहे. हवेप्रमाणे पाणी हा जीवनासाठी अत्यावश्यक असलेला अमूल्य घटक आहे असे मानण्याच्या ऐवजी, पाण्याला क्रयवस्तूंच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी एक अजब युक्तिवाद जागतिक बँकेसारख्या वित्तीय संस्था व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मांडला आहे. या कावेबाज शक्तींना त्याकरिता संशोधनपांडित्य दाखविण्याचीही गरज भासली. इंग्लंडमधील प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ अॅडम स्मिथ (१७२३-९०) याने सुमारे २५० वर्षांपूर्वी असा प्रश्न उपस्थित केला होता की मानवी जीवनाला अनावश्यक अशा हिऱ्याकरिता जर मोठी किंमत द्यावी लागते तर माणसाला अत्यावश्यक असलेले पाणी विनामूल्य का मिळावे? या प्रश्नाची आठवण करून देऊन, त्यावेळी दाखविण्यात आलेल्या सुज्ञपणाकडे दुर्लक्ष झाले म्हणून आजची परिस्थिती ओढवली आहे असा युक्तिवाद पुढे मांडण्यात येत आहे!

पाणी अत्यल्प दरात जर पुरविले गेले किंवा लोकांना जर विनामूल्य ते घेता आले तर अपव्यय करण्याची प्रवृत्ती वाढते. पाणीपुरवठा करण्याकरिता लागणारी गुंतवणूक फार मोठी असते. पाणीपट्टी खर्चाच्या प्रमाणात वाढविली तर लोकमत विरुद्ध जाण्याची प्रत्येक निवडून आलेल्या स्थानिक पातळीवरील राज्ययंत्रणेला भीती वाटत असते. त्यामुळे पाणीपुरवठा नुकसान सोसून केला जातो. यामुळे ज्यांना पाणी मिळविणे दुरापास्त असते त्यांच्यापर्यंत पाणी पोहोचविण्याकरिता आवश्यक ती भांडवल-गुंतवणूक करता येत नाही. पाण्याचे खासगीकरण केले आणि ते पुरविण्याची जबाबदारी जर खासगी कंपन्यांकडे दिली तर खर्च व वसुली यांचा ताळमेळ जुळेल. खासगी कंपन्यांना नफा मिळेल हे जरी खरे असले तरी सधनांना मिळणारी अतिरिक्त सवलत संपुष्टात येईल आणि गरीबांकडूनसुद्धा माफक पाणीपट्टी वसूल करून त्यांच्यापर्यंत पाणी पोहोचविता येईल.

पाणीपुरवठा करण्याच्या खर्चापेक्षा वापरल्या गेलेल्या पाण्याची विल्हेवाट लावणे (शुद्धीकरण करून योग्य त्या प्रवाहात ते मार्गस्थ करणे किंवा पुन्हा वापरण्यासाठी उपयुक्त करणे) याकरिता खर्च पुष्कळ जास्त येतो. त्या खर्चाची जबाबदारी स्वत:वर न घेता स्थानिक पातळीवरील राज्यसंस्थांवर ती ढकलून देण्याचे करार खासगी कंपन्या करीत असतात. वित्तीय संस्था विकसनशील देशांना कर्ज अथवा अनुदानाचा हिस्सा देण्याचे नाकारून पाण्याचे खासगीकरण करण्याकरिता दबाव आणीत असतात. त्याचा फायदा घेऊन व्हिव्हेंडी व सुएझसारख्या फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पाणीपुरवठा करण्याचे करार अनेक विकसनशील देशांशी करून प्रचंड नफा मिळविला आहे. अगुआस ही बारसेलोना (स्पेन), टेम्स वॉटर (ब्रिटन) व बेचटेल (अमेरिका) या कंपन्याही या पाण्याच्या धंद्यात उतरल्या आहेत.

वरील कंपन्यांनी (विशेषत: फ्रेंच कंपन्यांनी) ज्या देशांत पाणीपट्टीचे दर प्रचंड

प्रमाणात वाढविले तेथे, घाना किंवा अर्जेंटिनासारख्या देशात या कंपन्यांना उग्र निदर्शने व आंदोलनांना तोंड द्यावे लागले. करार रद्द करून माघारही घ्यावी लागली आहे. पाणी ही क्रयवस्तू बनविली म्हणजे लोकांच्या हातातील क्रयशक्ती वाढते असे नाही. त्यामुळे पाण्याची बाजारपेठ शहरातील काही विभागांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. परंतु आर्थिक अरिष्टाच्या काळात इतर वस्तू खपविणे कठीण जात असल्यामुळे पाण्याचा मर्यादित धंदासुद्धा किफायतशीर ठरतो आहे. ग्रामीण जनता अद्यापही पाण्यासाठी दाही दिशा वणवणते आहे.

गेल्या सुमारे ७० वर्षांत जगातील लोकसंख्या तिप्पट वाढली आहे. पाण्याची मागणी मात्र जवळजवळ सहा पट वाढली आहे. स्थानिक पातळीवरील स्रोतांपासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पाण्याचे बहुविधस्पर्शी नियोजन जर केले नाही तर पाण्याची समस्या सुटणे अशक्य आहे याचे भान जगातील अनेक संस्था-संघटना-गटांना आले आहे.

खालील काही संस्था-संघटना पाण्याची निर्मिती, जपणूक व न्याय्य वाटप यांसाठी आपला आवाज बुलंद करीत आहेत.

- World Coalition Against Water Privatisation
- Our World is not for sale
- Water for all (अमेरिका)
- Council of Canadian (कॅनडा)
- Jal Biradari (जल बिरादरी) भारत
- Ghana Coalition Against Water Privatisation

(मिळून साऱ्याजणी, दिवाळी २००३)

❑

जागतिकीकरण :
मार्क्सला ही संकल्पना अवगत होती का?

गेली सुमारे १५ वर्षे जागतिकीकरण हा शब्द जगात सर्वत्र वापरला जातो आहे. परंतु त्या शब्दाच्या आशयाविषयी, प्राथमिक स्वरूपाचा वादसुद्धा अद्याप संपुष्टात आलेला नाही. त्याचे कारण, या संकल्पनेला आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक असे तीन पैलू आहेत.

गेल्या काही दशकात जगभर चालू असलेली आर्थिक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण अशी अगदी ढोबळ व्याख्या काही लेखकांनी केली आहे. स्थळ, काळ आणि राष्ट्रीय चलन यांच्या बंधनांपासून मुक्त असणारी बाजारपेठ असे जागतिकीकरणाचे वर्णन इंग्लंडमधल्या Financial Times ने मे १९८७ मध्ये केले होते. जन्मभर एकच काम (नोकरी) अथवा व्यवसाय या जीवनसरणीचा अंत आणि जागतिक बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रविद्येचा प्रसार यातून होत असतो अशी मांडणी इंग्लंडमधल्या Guardian मध्ये लिहिणाऱ्या लॅरी एलियट या लेखकाने जुलै १९९७ मध्ये केली होती. अल्पसंख्याक महाकाय उद्योग प्रकल्पांच्या कारवायांतून निर्माण होणाऱ्या दारुण सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा चेहरामोहरा, जागतिकीकरणाचे विविध विरोधक प्रकट करीत असतात. मानव समाजाने तिसऱ्या सहस्त्रकात प्रवेश करण्यापूर्वीचा संक्रमणकाळ समजावून घेण्याची जागतिकीकरण ही गुरूकिल्ली आहे असे त्या वास्तवाचे निदान काही समाजशास्त्रज्ञ करीत असतात. या शब्दातून व्यक्त होणारे स्थित्यंतर एव्हाना पुरे झाले आहे असे काहीजण मांडतात, तर आताशी कुठे त्याला सुरूवात झाली आहे असे काहीजणांचे मत आहे.

वर उल्लेखिलेल्या मतभिन्नतेतून असे दिसेल की या संकल्पनेविषयी व वास्तवाविषयी अद्यापही एकमत झालेले नाही. ही संकल्पना पुढे रेटण्याची कामगिरी मुख्यत: जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या आंतरराष्ट्रीय संस्थांनी केली आहे आणि त्याचे पडसाद जागतिक राष्ट्र संघ व आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यामध्ये होणाऱ्या चर्चांमधूनही पडले आहेत.

या शब्दाच्या आशयाचे सांस्कृतिक अंगाने आकलन करणारे विचारवंत 'जग हे

आता एकसंध होत चालले आहे' या विधानावर भर देत असतात. प्रवासाची वाढती सुलभता आणि संज्ञापनाची विविध साधने यातून राष्ट्रीय भेद क्षीण होत चालले आहेत, बऱ्याच महत्त्वपूर्ण राष्ट्रीय घटना हा केवळ स्थानिक आविष्कार नसतो तर तो दूरवरच्या आंतरराष्ट्रीय घटनांचा परिपाक असतो; लोक, वस्तू, माहिती (ज्ञान) आणि विविध प्रतिमा यांचे देशांतर सतत चालू असते आणि त्यातून जीवनाचा एक नवा अर्थही प्रवाही होत असतो; वैशिष्ट्यपूर्ण सुसंगत अशा राष्ट्रीय संस्कृतीला आता शबलता प्राप्त होत आहे; कामाला (कष्टाला) गौण स्थान देणारी, उपभोगाला प्राधान्य देणारी एक नवीन जागतिक उत्पादनप्रक्रिया साकार होते आहे; आधुनिकोत्तर आजच्या जगात, वर्गसंघर्षाधिष्ठित राजकारण विलयाला जाते आहे आणि वैचारिकतेपेक्षा भावनोत्कटतेवर भर देणारी नवीन सामाजिक आंदोलने निर्माण होत आहेत, असाही एक निष्कर्ष, सांस्कृतिक अंगाने विवेचन करणारे काही लेखक व्यक्त करीत आहेत.

जागतिकीकरणाच्या राजकीय पैलूवर भर देणारे लेखक, आंतरराष्ट्रीय संस्था-संघटनांच्या कामगिरीकडे लक्ष वेधीत आहेत. कोणत्याही महत्त्वपूर्ण समस्या मांडण्याकरिता अथवा सोडविण्याकरिता, राष्ट्रीय पुढाकाराला आता फारसे महत्त्व राहिलेले नसून, आंतरराष्ट्रीय संस्था-संघटना याच परिणामकारक ठरत असतात असा या लेखकांचा दावा आहे. कोणत्याही राष्ट्राचे आपल्या नागरिकांना स्वबळावर संरक्षण देण्याचे सामर्थ्य आता कमी होत चालले आहे. राष्ट्राबाहेरच्या घटनांतून होणाऱ्या परिणामांना एक-एकट्या राष्ट्राला तोंड देणे दुरापास्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय वाटाघाटी हाच अधिक समंजस व उपयुक्त उपाय ठरू पाहत आहे.अनेक समस्या अशा आहेत की ज्या आंतरराष्ट्रीय पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न कसोशीने झाला नाही तर दहशतवाद फैलावण्याचा धोका आहे. मुक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ही जर अनियंत्रित राहिली (तो धोका निश्चितच आहे) तर त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांविरुद्ध उग्र, स्फोटक निदर्शने होणे कदाचित अपरिहार्य ठरेल आणि १९३० च्या महामंदीच्या वेळी जी परिस्थिती निर्माण झाली होती त्याची पुनरावृत्ती होणार नाही अशी शाश्वती देणे कठीण आहे. गेल्या काही वर्षांत भारतात सुमारे २० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत हे लक्षात घेणे इष्ट आहे. जागतिकीकरणाचा माहोल जर चालू ठेवला तर या 'मुक्त बाजारपेठे'वर नियंत्रण ठेवणाऱ्या प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संस्था-संघटना निर्माण होतील अशी आशा काहींनी वर्तविली आहे. आज अस्तित्वात असलेल्या जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, प्रादेशिक विकास बँका यासारख्या संस्थांनी मात्र आपल्या धोरणांच्या दावणीला बांधून अनेक देशांना कर्जाच्या सापळ्यात अडकवून ठेवले आहे याकडे सूजन स्ट्रेंज या लेखिकेने The New World of Debt या आपल्या एका अभ्यासपूर्ण लेखात लक्ष वेधले आहे.

जागतिकीकरणाच्या आर्थिक पैलूवर लक्ष केंद्रित करणारे अनेक लेखक या प्रक्रियेचे मंजूळ गोडवे गाण्यात आरंभापासून मग्न आहेत. विकसित जग आणि विकसनशील

जग यांच्यातील तफावत या एका मंत्रोत्तर विधीने नष्ट होईल. विकसनशील जगाला स्पर्धेत उतरावे लागले म्हणजे त्याची भरभराट होईल. अनेक औद्योगिक प्रकल्प मजुरी स्वस्त दरात असेल अशा ठिकाणी स्थलांतर करतील. त्यामुळे विकसित देशांची अतिरिक्त भरभराट कमी होईल. याचाच परिणाम म्हणजे प्रादेशिक असमतोल कमी होईल. आताचे जग हे मोठमोठ्या जड वस्तू उत्पादन करण्याचे राहिलेले नाही. राष्ट्रीय निर्बंध संपुष्टात येत आहेत, आयात कर शिथिल होत आहेत. भांडवलाचा संचार अतिशय द्रुत गतीने सर्वत्र होतो आहे. गुंतवणुकीला मोकळीक असली की देश-काल-परिस्थितीनुसार गुंतवणूक होईल आणि त्यातून आर्थिक उन्नती होणे अपरिहार्य आहे असे अनेक साधार-निराधार दावे जागतिकीकरणाचे समर्थक करीत असतात.

मोठ्या प्रमाणावर प्रदूषण करणाऱ्या उद्योगांचे विकसनशील देशात स्थलांतर करणे, श्रमप्रधान उद्योगांऐवजी भांडवलप्रधान उद्योगांना प्राधान्य देऊन बेकारी निर्माण करणे व वाढविणे, प्रचंड नफा ज्यातून मिळतो अशा वस्तू व सेवा विकसनशील देशांवर लादणे, लहरीप्रमाणे भांडवल गुंतविणे व अकस्मातपणे ते काढून घेणे अशा जागतिकीकरणाच्या अनेक दुष्परिणामांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या लेखकांना मुख्य प्रसारमाध्यमातून फारच थोडी प्रसिद्धी मिळत असते. युरोप, उत्तर अमेरिका व जपान यांचे वर्चस्व हाच जागतिकीकरणाचा खरा आशय आहे हे अनेक लेखकांनी पुढे आणलेले सत्य जन-सामान्यांत अजून पुरेशा प्रमाणात पोहोचावयाचे आहे. जागतिकीकरणाला पर्याय नाही अशी हताशपणाची भूमिका मांडणाऱ्यांशी प्रतिवाद करणे अपरिहार्य आहे हे जनमानसात तातडीने रूजविणे अत्यावश्यक आहे.

भांडवलशाहीच्या स्थिती-गतीचे सखोल विश्लेषण करणाऱ्या कार्ल मार्क्स व फ्रेड्रिक एंगल्स यांना जागतिकीकरणाची चाहूल सुमारे १५० वर्षांपूर्वी लागली होती का असे प्रश्न काहीजण उपस्थित करीत असतात किंबहुना इतकी दूरदृष्टी असणे असंभाव्य होते असेही काहींना वाटत असते. या दोन क्रांतिकारक विद्वानांच्या लिखाणावर काळजीपूर्वक नजर टाकली तर काय आढळते?

जागतिकीकरण हा शब्द मार्क्सने व एंगल्सने कोठे वापरल्याचे आढळत नाही हे खरे आहे. महत्त्वाचा मुद्दा जो लक्षात घ्यावयास हवा तो हा की मार्क्सने भांडवलशाहीमुळे जग कसे बदलले आहे याचेच फक्त विवेचन केलेले नाही, तर भांडवलशाही व्यवस्थेचे अपरिहार्य भवितव्य काय संभवते याचे साधार भाकितही करून ठेवले आहे.

उत्पादित वस्तूंना विस्तृत बाजारपेठ सतत मिळत राहावी याकरिता भांडवलदारांना सारे जग व्यापून टाकणे आवश्यक होऊन बसते. जगभर ठाण मांडून बसणे, सर्वत्र संबंध प्रस्थापित करणे याशिवाय भांडवलशाहीला गत्यंतर नसते असे भविष्य १८४८ च्या जगप्रसिद्ध कम्युनिस्ट जाहीरनाम्यात वर्तवून ठेवण्यात आलेले आहे. दैवाचा विपरीत खेळ (Irony) असे ज्याला म्हणता येईल तो असा आहे की १९९६ साली जागतिक बँकेने 'जागतिक विकासाचा अहवाल' प्रसिद्ध केला त्यावेळेस 'कम्युनिस्ट

जाहीरनाम्यातील' वरील आशयाचे अवतरण आपल्या अहवालात उद्धृत केले आहे! त्याच सुमारास जागतिक बँकेला, पूर्वी कम्युनिस्ट राजवटी असलेल्या पूर्व युरोपमधील देशांमध्ये 'बाजारपेठप्रणालीचा' मंत्र प्रसृत करावयाचा होता! त्याकरिता त्यांनी मार्क्सच्या अवतरणाचा उपयोग केला!!

इंग्लंडमधल्या कन्यूट नावाच्या राजाची एक आख्यायिका आहे. समुद्रकिनाऱ्यावर उभा राहून, घोंघावत येणाऱ्या लाटांना, 'लाटांनो, मागे फिरा' असे तो फर्मावीत होता. लाटांनी त्याच्या आज्ञेकडे दुर्लक्ष केले. त्या आदळतच राहिल्या. जागतिकीकरणाला विरोध करणे म्हणजे कन्यूट राजाच्या आज्ञेइतकेच ते हास्यास्पद आहे असे जागतिकीकरणाचे समर्थक सांगत असतात. तात्पुरते 'अपरिहार्य' जे भासते, ते कायमचे हितकारक असते असे नाही याकडे १८४४ साली एंगल्सने लक्ष वेधले होते. सर्वांना सुसंस्कृत करण्याकरीता जग पादाक्रांत करीत असल्याचा दावा भांडवलदार करीत असतात. भांडवलदारांचा हा भ्रातृभाव हा चोरांचा भ्रातृभाव आहे असा इशारा एंगल्सने दिलेला आहे.

जागतिकीकरण हे सरधोपट एकाच पद्धतीने होईल ही अपेक्षा आधारशून्य आहे. आदिम साम्यवाद या समाजव्यवस्थेपासून तो भांडवलशाही समाजव्यवस्थेपर्यंत मानवी प्रगतीचे सर्वसाधारण नियम जरी मार्क्सने विशद केले असले तरी देश-काल परिस्थितीचे भान ठेवूनच या नियमांची सत्यासत्यता पडताळून पाहावी लागेल, हे अनुभवांती त्याने आवर्जून सांगितले आहे. सरंजामशाहीनंतर, भांडवलशाहीचे आगमन हे सर्वसाधारणपणे जरी दृश्य वास्तव असले तरी, रशियामध्ये प्रगल्भ भांडवलशाहीचा टप्पा गाळून समाजसत्तावादाच्या दिशेने पाऊल टाकणे अशक्य नाही हे त्याने लक्षात आणून दिले होते. तथाकथित जागतिकीकरणाचा वेग व आवाका सर्वत्र सारखा असेल असे मानणाऱ्यांनी मार्क्सने अनुभवांती केलेले आत्मपरीक्षण लक्षात घेण्याजोगे आहे.

जागतिकीकरणातून प्रगती साधते असे उच्च रवाने घोषित करणाऱ्या समर्थकांना मार्क्सने या प्रगतीचे स्वरूप लक्षात आणून दिले आहे. साम्राज्यवाद्यांच्या वर्चस्वातून वसाहतींमध्ये वरकरणी प्रगती होताना दिसते. (रेल्वे, आधुनिक पद्धतीच्या शाळा, पोस्ट ऑफिस, कारखाने वगैरे) परंतु दैत्यांनी हत्या केलेल्यांच्या कवट्यातून रक्त पिताना, त्याला अमृत म्हणण्यासारखेच ते आहे, अशी विदारक टीका मार्क्सने केली आहे, हे जागतिकीकरणाच्या मुखंडांपैकी कितीजणांना माहीत आहे?

उपभोगवाद, वस्तूंची निवड करण्याचे 'स्वातंत्र्य', स्वस्त दरात मजुरी व उत्पादित वस्तूंची किंमत यांचे व्यस्त संबंध, क्रयवस्तूंची निर्मिती आणि परात्मभाव किंवा माणसातील माणुसकी हरपण्याचे दु:खद घोर वास्तव, औद्योगिक उत्पादनाऐवजी वित्त संचाराचा परिणाम व प्रभाव, नफा-दर वाढीचे सातत्य, - भांडवलशाहीप्रणीत जागतिकीकरणाच्या हरएक पैलूंवर मार्क्स व एंगल्स यांनी आपले भाष्य नोंदवून ठेवले आहे. उतारे व अवतरणे ज्यांना तपासून पाहण्याची जिज्ञासा असेल, त्यांना खालील

१८४ पानांचा ग्रंथ उपयुक्त ठरेल.

Marx On Globalisation, Edited And Selected by David Renton, Published by Lawrence & Wishart, London, 2001

(आंदोलन-शाश्वत विकासासाठी, डिसेंबर २००४)

❑

कुटुंबसंस्था : एक समालोचन

कुटुंब म्हणजे काय?

जगातील संस्थांच्या निर्मितीप्रक्रियेत धर्म, शासनसंस्था, शिक्षणसंस्था आहे, तसेच कुटुंब या संस्थेलाही अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. जगात आता असा एकही देश नाही की जेथे कुटुंबसंस्था कोणत्या ना कोणत्यातरी स्वरूपात अस्तित्वात नाही.

रक्ताचे नाते असलेल्या, विवाह संबंधातून नाते प्रस्थापित झालेल्या किंवा दत्तक विधीतून संबंध प्रस्थापित झालेल्या दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती जर एका छपराखाली पुष्कळशा सातत्याने राहत असतील तर त्या निवासात राहणाऱ्या व्यक्तिसमूहाला कुटुंब म्हणावे अशी कुटुंब या संकल्पनेची व्यापक व्याख्या जनगणनेच्या संदर्भात केली जाते.

समाजशास्त्रीय मांडणीत वरील व्याख्येचा थोडा विस्तारही केला जातो. त्यानुसार, कुटुंबातील अशा व्यक्तींमध्ये आर्थिक व्यवहार असणे हेही अभिप्रेत असते. तसेच, समाजाला मान्य असलेले लैंगिक संबंध ठेवणारे (वैवाहिक संबंध) किमान एक पुरुष व एक स्त्री असणे, त्यांची या विवाहसंबंधांतून अथवा दत्तक विधीतून एक अथवा अधिक मुले असणे हे या व्याख्येत अनुस्यूत असते. कुटुंब हे जसे परिपूर्ण असू शकते, तसे ते अपरिपूर्णही असू शकते. उदाहरणार्थ, परित्यक्ता अथवा विधवा आई आणि मुलगा अथवा मुलगी हे सातत्याने एकत्र राहणे हेही घडत असते आणि अशा व्यक्तिसमूहासही कुटुंब म्हणता येते.

दोन पिढ्यांपेक्षा अधिक पिढ्या जर एकत्र राहत असतील (आजी-आजोबा, आई-वडील व मुले) तर असे कुटुंब एकत्र कुटुंब या कोटीत जमा केले जाते. तर फक्त पती-पत्नी व मुले एकत्र राहत असतील तर विभक्त कुटुंब असे त्याचे वर्गीकरण केले जाते. विभक्त राहिल्यामुळे नात्यागोत्याने बांधलेल्या या कुटुंब समूहांमध्ये एकजिनसीपणा नसला तरी आर्थिक संबंध (विशेषत: व्यापार हा व्यवसाय असणाऱ्या कुटुंबांमध्ये) पुष्कळ घनिष्ट असू शकतात. कौटुंबिक समारंभातील एकोपाही, परस्पर संमतीने अथवा परंपरेच्या बंधनाने, विशिष्ट पद्धतीने नियंत्रित असू शकतो. व्यक्तीभोवती

कमी-अधिक प्रमाणात सुरक्षिततेचे कवच निर्माण करणे ही कुटुंब निर्मितीमागील एक अपरोक्ष प्रेरणा आहे.

कुटुंबनिर्मिती

लैंगिक संबंध काळाच्या ओघात नियंत्रित होत जाणे हा कुटुंबनिर्मितीच्या प्रक्रियेचा गाभा आहे असे मानण्यासही आधार आहे. पुरातन काळी, स्त्री-पुरुषांमध्ये स्वैराचाराचे संबंध असणे, हा दुराचार आहे असे मानले जात नसे. एक पति व त्या पतीच्या अनेक पत्नीं, एक पत्नी व तिचे अनेक पती, एक पति-पत्नी, एकेका समूहाची पत्नी अथवा पती, अशा विविध टप्प्यांतून कुटुंबसंस्था उत्क्रांत झाली आहे. मात्र उत्क्रांत याचा अर्थ कालक्रमानुसार एका मागोमाग हे टप्पे सर्वत्र प्रस्थापित झाले असे मानण्यास निश्चित पुरावा नाही (असे आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी मांडले आहे.) एकाच कालखंडात, एकाच विस्तीर्ण प्रदेशात बहुपति, बहुपत्नी, एक पति-पत्नी अशा विविध वैवाहिक बंधनाने राहणारे लोक होते. अखेर समाजात, एक पति-पत्नी हा कुटुंबव्यवस्थेचा टप्पा मान्यताप्राप्त झाला आणि तो आजतागायत आदर्श मानला जातो, ही वस्तुस्थिती सर्वसामान्यपणे मान्य करता येण्यासारखी आहे. आदिम समाजव्यवस्थेत, जेव्हा वैवाहिक बंधने नव्हती किंवा अतिशय शिथिल होती, त्या कालखंडात स्त्रियांवर जाचक बंधने नव्हती, पुरुषांच्या बरोबरीने त्यांना समाजात स्थान होते असे मानण्यासही आधार सापडतो. शेती मोठ्या प्रमाणावर करण्यास समाज शिकला, अधिक स्थिर जीवन तो जगू लागला व खासगी मालमत्ता बाळगणे हा प्रघात रुढ झाला तेव्हापासून समाज पितृसत्ताक बनला आणि स्त्रियांवरील बंधने वाढू लागली. स्त्री ही खासगी मालमत्ता बनली आणि आनुवांशिक मालमत्तेवरील तिचे हक्क मर्यादित होत गेले. गुलामगिरी व सरंजामशाही या दोन समाज व्यवस्थांच्या कालखंडातील स्त्री-दास्याचा देशनिहाय उहापोह करण्यास, एक स्वतंत्र लेखमाला लिहावी लागेल.

आधुनिक कुटुंब

मध्ययुगात लोक जमिनीला (शेती व्यवसायाला) खिळून राहत असत. भांडवलशाहीच्या युगात विविध ठिकाणी प्रस्थापित होणाऱ्या कारखान्यांमध्ये रोजगारासाठी लोक स्थलांतर करू लागले. साहजिकच एकत्र कुटुंबपद्धती लयाला जाऊ लागली. भारतासारख्या वासाहतिक देशामध्ये, कारखाने जरी मंद गतीने वाढत असले तरी परकीय राजवटीने नवीन सुसंघटित शासनयंत्रणा उभी करण्यास प्रारंभ केला. सरंजामशाहीच्या युगातील बेबंदशाहीला आळा घालणारी ही शासनयंत्रणा असली, तरी ती बहुतांशी लोकाभिमुख नसल्यामुळे, या यंत्रणेला नोकरशाही हा शब्द वापरण्याची प्रथा पडली. परंतु या पद्धतीनेसुद्धा समाजव्यवस्थेत बदल होऊ लागले. आधुनिक

नागरीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. व्यापाराची नवी दालने खुली झाली. या बदलांमुळे जमिनीवरचे अवलंबन संपुष्टात आले नसले, तरी अर्थार्जनाचे स्वतंत्र अथवा पूरक मार्ग निर्माण झाल्यामुळे, आपल्यासारख्या देशातही एकत्र कुटुंबपद्धती विस्कळीत होत जाणे अपरिहार्य होते. अशा या आधुनिक विभक्त कुटुंबपद्धतीचीसुद्धा चार मुख्य उद्दिष्टे मानली जातात.

लैंगिक संबंधांचे नियंत्रण, प्रजोत्पादन, संस्कारात्मक व ज्ञानवर्धक शिक्षण आणि आर्थिक व्यवहाराची लिखित व अलिखित नियमावली, हा त्या चार उद्दिष्टांचा मुख्य आशय आहे असे स्थूलमानाने म्हणता येईल. ही उद्दिष्टे गृहीत धरली तरी व्यक्तीच्या गळचेपीची जाणीव या कुटुंब पद्धतीतही होऊ लागली. भांडवलशाहीच्या युगात, व्यक्तिवाद हे एक महत्त्वपूर्ण मूल्य प्रस्थापित झाले. परंतु व्यक्तीचे 'सार्वभौमत्व' पुरुषापुरतेच मर्यादित राहते आहे हे स्त्रियांच्या लक्षात येऊ लागले.

स्त्रियांचे स्थान

स्त्रीच्या मातृत्वाचे उदात्तीकरण झाले, तिच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासाकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले. 'निसर्गप्राप्त बंधने (प्रजोत्पादन, बालसंगोपन, नाजुकता) ही अनुल्लंघनीय आहेत, भावनिक आधार देणे हा तिचा निसर्गसिद्ध स्वागतार्ह गुण आहे आणि म्हणून तिच्या व्यक्तिमत्वाचा विकास हा पुरुषाच्या व्यक्तिमत्व विकासाशी तुल्यबळ होण्याची गरज नाही' - असे स्त्रीलासुद्धा 'पटवून' देण्याचा प्रयत्न, विभक्त कुटुंबपद्धतीतील पुरुषप्रधान व्यवस्थेने केला.

व्यक्तिवाद हे जसे एक विमोचक सामर्थ्य आहे, तसाच तो एक विषमतापोषक अडसर ठरू शकतो याची प्रचिती अनुभवाने येऊ लागली. त्याबरोबर समता हे भांडवलशाही युगातील मूल्यसुद्धा घोषणेपुरते मर्यादित न राहता, त्याच्या अंमलबजावणीचा आग्रह सर्व प्रकारच्या शोषित घटकांकडून होऊ लागला. नैसर्गिक बंधने ही सर्वथैव अनुल्लंघनीय नसतात हे वैज्ञानिक प्रगतीतून सिद्ध झाले होते. धरण बांधून पाणी अडवता अथवा वळवता येते, डोंगरात बोगदा खणून, रेलगाडी अथवा बसने प्रवास करता येतो, विजेचा दिवा लावून अंधकारावर मात करता येते; तर स्त्री हे प्रजोत्पादनाचे महत्त्वाचे माध्यम असले तरी तिच्यातील अन्य भरघोस क्षमतेचा आविष्कार करण्यास तिला मज्जाव का असावा? हा प्रश्न गेल्या सुमारे पाऊण शतकात, विशेषत: गेल्या पाव शतकात प्रभावीपणे मांडला जाऊ लागला. स्त्रीने फक्त सेवा करावी, मग ती कुटुंबात असो अगर समाजात असो; पुरुषाने मात्र विविध क्षेत्रात कर्तबगारीची शिखरे गाठावीत, या पुरुषपक्षपाती सामाजिक संस्करणाला आव्हान देण्यात येऊ लागले. स्त्रीचा आवाज कधी कर्कश तर कधी बुलंद, पण बहुतांशी रास्त वैचारिक युक्तिवादाने परिपूर्ण आणि म्हणूनच समर्थ होऊ लागला.

आईची केवळ ममता व घरकामातील काबाडकष्ट आणि वडिलांची अर्थार्जनाची

कुशलता किंवा क्षमतेनुसार अन्य गुण प्रकट करण्याची आकांक्षा, सिद्धता व यश असे दृश्य आज बहुसंख्य कुटुंबांतील मुलांसमोर येताना दिसते. आईला जर समान संधी मिळाली तर बालसंगोपन व घरकाम या व्यक्तिरिक्त आईच्या अंगी असलेल्या क्षमतेनुसार (लेखिका, चित्रकार, कारखाना अथवा कचेरीतील व्यवस्थापन कौशल्य) तिच्या गुणांचा आविष्कार होऊ शकेल. आई व वडिलांच्या विविध गुणसमुच्चयाच्या आविष्कारातून निर्माण होणारी समृद्धता मुलांसमोर जर प्रकट झाली तर दर एक पिढी अधिक सकस निपजेल. या प्रक्रियेतून एकूण सामाजिक पातळी उच्च स्तरावर जात राहील, हा निष्कर्ष जगात सर्वत्र सर्वांशाने अद्याप मान्य झालेला नाही. मात्र तो निष्कर्ष हास्यास्पद आहे असे मानण्याची अपप्रवृत्ती क्षीण होण्याच्या वाटेवर आहे.

या सर्व विचारमंथनात कुटुंबसंस्थेची आवश्यकता नाकारण्यात येत नाही हे लक्षात घ्यावयास पाहिजे. बालसंगोपनाचे सर्व ओझे आईवर पडता कामा नये हे तत्त्व महत्त्वाचे आहे. बालसंगोपनगृहे मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित केल्याखेरीज व त्यात उत्तम प्रशिक्षित सेवक / सेविका ठेवल्याखेरीज बालसंगोपन कार्यक्षमतेने करता येणार नाही हे उघडच आहे. परंतु केवळ कार्यक्षमताही पुरणार नाही. सेवक/सेविकांमध्ये प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, जबाबदारीपूर्ण निर्णय घेण्याची पात्रता हे गुण प्रयत्नपूर्वक जोपासावे लागतील. बालसंगोपनगृहाची व्यवस्था ही कुटुंबसंस्थेला जवळ जवळ पर्यायी व्यवस्था असावी की पूरक व्यवस्था असावी यावरील वाद अद्याप अनिर्णित अवस्थेत आहे असे दिसते.

प्रायोगिक कुटुंब व्यवस्था

स्वीडनसारख्या देशामध्ये 'प्रायोगिक विवाह' मोठ्या प्रमाणावर होत असतात. प्रत्यक्ष धार्मिक अथवा कायद्यानुसार विवाह न नोंदविता स्त्री-पुरुष जोडपी काही काळ (काळाला नेमकी मर्यादा नसते) एकत्र राहतात. या कालावधीत दीर्घकाळ एकत्र राहता येईल इतके प्रेमाचे रज्जू घट्ट आहेत का याचा अंदाज घेण्यात येतो. दीर्घकाळ राहता येईल असे वाटले तर प्रत्यक्ष विवाह (धार्मिक किंवा विधीयुक्त) नोंदविला जातो. प्रत्यक्ष विवाह झालेली काही जोडपीसुद्धा आपला विवाह हा प्रायोगिक आहे असे मानतात व विवाह बंधनात राहावयाचे की घटस्फोट घ्यावयाचा याचा निर्णय विवाहानंतर काही कालावधीने घेतात. विवाहपूर्व संबंधांतून अथवा विवाहोत्तर संबंधांतून झालेल्या मुलांचा कब्जा कोणाकडे असावा याचा निर्णय कायद्यानुसारही घेता येतो किंवा परस्पर सामंजस्यानेही घेता येतो. आधीच्या जोडप्यातील स्त्री-पुरुषांनी पहिले संबंध विसर्जित करून दुसरे जोडीदार निवडले तरीसुद्धा मुलांच्या कब्जाचा प्रश्न सामंजस्याने सोडविण्याकडे अधिक कल आहे असा काही संशोधनात्मक सर्वेक्षणांचा निष्कर्ष आहे. असे प्रायोगिक विवाह कालांतराने जगभर होऊ लागले तरी मुलांच्या कब्जाचा प्रश्न सर्वत्र सामंजस्याने सोडविला जाईल असा निष्कर्ष काढण्यास कोणताही निश्चित पुरावा उपलब्ध नाही.

समस्या

कुटुंबसंस्थेच्या निर्मितीचा गुंतागुंतीचा इतिहास हा विशेष संशोधनाचा विषय आहे. जगात अद्याप अस्तित्वात असलेल्या आदिम मानव समाज घटकांचा (म्हणजेच टोळ्यांचा किंवा अधिक समर्पक शब्द वापरावयाचा झाल्यास गणसंघांचा) अधिक तपशीलवार अभ्यास मानववंश शास्त्रज्ञ करीत आहेत. उपलब्ध लिखित वाङ्मय, मौखिक इतिहास व उत्खनन यातूनही नवे अर्थ सादर करण्याचा प्रयत्न होतो आहे. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या विभक्त कुटुंबव्यवस्थेची उद्दिष्टे आणि या कुटुंबव्यवस्थेतून निर्माण होत असलेल्या समस्या व त्या समस्या सोडविण्याकरिता उपाय यावर अलीकडील संशोधनाचा अधिक भर आहे.

कुटुंबसंस्थेची उद्दिष्टे परिपूर्ण करण्याच्या प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण होत आहेत. घटस्फोटाचे वाढते प्रमाण, विवाहबाह्य संबंधातून निर्माण होणाऱ्या बालकांचे व प्रौढांचेसुद्धा संरक्षण, औद्योगीकरण व नागरीकरणाचे परिणाम, ते परिणाम सुसह्य करण्याकरिता उपाय, कौटुंबिक जीवनाचा व वाढत्या गुन्हेगारीचा संबंध, जोडीदाराची निवड करण्याकरिता आयोजित करण्यात येणारे उपक्रम (उदा. पारंपरिक वधू-वर सूचक मंडळांची परिणामकारकता, युवक-युवतींकरिता चालविण्यात येणारी करमणूक केंद्रे, युवक-युवतींना 'डेटिंग'ला मुभा) व त्याचे इष्टानिष्ट परिणाम, वैवाहिक जीवनात अपरिहार्य ठरणाऱ्या तडजोडी, या तडजोडीत स्त्रियांच्या समंजसपणावर अधिक भर असणे, आई-वडिलांचे व मुलांचे बदलत्या वयानुसार प्रस्थापित होणारे-कित्येकदा क्लेशदायक ठरणारे - संबंध, कौटुंबिक चौकटीत व्यक्तिमत्वाचा विकास, आप्तेष्टांशी व शेजाऱ्यांशी संबंध.

समस्यांची ही यादी अपुरीच आहे. या समस्या सोडविण्याकरिता शासनसंस्थेव्यतिरिक्त, विशिष्ट तज्ज्ञांची, धार्मिक शिक्षणाची, न्यायालयांची व अन्य संस्था-संघटनांकरवी प्रबोधनाची जबाबदारी, असे बहुचर्चित विषय ठसठशीतपणे पुढे येत आहेत.

कुटुंबसंस्थेचे भवितव्य

या व अशा समस्यांना उत्तरे शोधताना,

- व्यक्तीसाठी कुटुंब की कुटुंबाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी व्यक्ती?
- कुटुंब हा एक तुरुंग आहे की सामाजिक कलह नियंत्रित करणारी ती एक विमोचक शक्ती आहे?
- कुटुंब ही सामाजिक सौख्याच्या दृष्टीने हितावह संस्था असली तरी व्यक्तीच्या दृष्टीने विशेषत: स्त्रियांच्या दृष्टीने ती हितावह आहे का?

असेही अनेक प्रश्न विचारले जातात आणि या समस्यांना अथवा प्रश्नांना समर्पक उत्तरे जर सापडत नसतील तर कुटुंबसंस्थेला भवितव्य नाही असा निष्कर्ष काही जण

काढतात. आगामी कालखंडात कुटुंब हे आपुलकी वृद्धिंगत करणारे 'घर' राहणार नाही तर लैंगिक संबंधांकरिता अल्पकाळ वास्तव्य देणारे ते एक केंद्र असेल (मोटार-स्कूटरपार्कप्रमाणे) असे भवितव्यही काहींनी वर्तविले आहे.

समग्रलक्ष्यी दृष्टी ठेवून सामाजिक संबंधाचे विश्लेषण करणारे, कोणत्याही समाजव्यवस्थेत केवळ एक घटक घेऊन त्याच्या भवितव्याचे भाकित करणे उद्बोधक ठरणार नाही असे मानतात. संपूर्ण समाजव्यवस्थेच्या अंगोपांगांचा, अन्योन्य संबंधांचा ऊहापोह केल्यास, त्या व्यवस्थेतील व्यंग्ये दूर करण्याकरिता, आमूलाग्र परिवर्तनाची गरज पडेल या वास्तवाला सामोरे जावे लागेल.

● भावनिक ओलावा निर्माण करू शकणारी

● स्वार्थाचा अतिरेक होऊ न देता, सामूहिक जीवन सामोपचाराने जगण्याचे शिक्षण देणारी

● राष्ट्रे जोपर्यंत अस्तित्वात असतील तोपर्यंत त्या राष्ट्राच्या अभ्युदयासाठी वाटा उचलण्यास मुलांना प्रवृत्त करणारी - नवीन कुटुंबसंस्था, परिवर्तन झालेल्या, स्त्री-पुरुष समता कटाक्षाने पाळणाऱ्या समाजात निर्माण होईल. तिच्या परिणामकारकतेचा पुरा अनुभव घेण्यापूर्वी कुटुंबसंस्थेच्या विसर्जनाची हाक देणे संयुक्तिक ठरणार नाही.

(पालकनीती, ऑक्टोबर-नोव्हेंबर २००४)

❑

अविवाहित राहण्याचा निर्णय

एखादी व्यक्ती आपल्या जीवनात काही जाणीवपूर्वक निर्णय घेते तेव्हा तिच्या जीवनात ज्या घटना घडलेल्या असतात किंवा इतरांच्या जीवनाचे निरीक्षण केलेले असते त्याचा अप्रत्यक्ष परिणाम संबंधित निर्णय घेण्याला पुष्कळदा कारणीभूत ठरत असतो. मी अविवाहित राहण्याचा जो निर्णय घेतला त्याला माझी कौटुंबिक पार्श्वभूमी हे एक कारण असल्यामुळे त्याचा थोडक्यात उल्लेख करणे उचित ठरेल.

मी एका कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलो आणि वाढलो. पारंपरिक रीतीरिवाजांचा आणि मूल्यांचा जबरदस्त पगडा माझ्या वडिलांच्या मनावर होता. त्यामुळे ते अतिरिक्त वर्चस्ववादी, कठोर शिस्तप्रेमी आणि या प्रवृत्तींशी सुसंगत असे कर्तव्यदक्ष कुटुंबप्रमुख होते. मुलांच्या शिक्षणाबद्दल त्यांना आस्था होती. परंतु मुलांच्यातील उपजत प्रवृत्ती कोणत्या आहेत किंवा कोणते विषय ग्रहण करण्याकडे त्यांचा अधिक कल आहे याचे निरीक्षण करण्यात व ते समजावून घेण्यात त्यांना स्वारस्य नव्हते. ज्यातून प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता आहे, आर्थिक भरभराट प्राप्त करून देण्याची क्षमता आहे आणि मुख्य म्हणजे जे भावी संसाराला उपयुक्त असेल तेच शिक्षण मोलाचे असे त्यांना वाटत असे. मुलींनासुद्धा शिक्षण द्यावे, त्यात काही प्रमाणात इंग्रजी भाषेचाही समावेश असावा हे मानण्याइतपत आधुनिकीकरण त्यांनी अंगीकारलेले होते. परंतु साधारणत: १६-१७ व्या वर्षी लग्न होईपर्यंत, विशेषत: सांसारिक व्यवहारात फार काही अडू नये इथपर्यंतचे शिक्षण मुलींना पुरेसे आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ही कल्पना त्यांना हास्यास्पद वाटत असे. एखाद्या मुलीचा आवाज मधुर असल्यामुळे तिला गायन शिकविण्याची व्यवस्था तिचे पालक करीत असल्याचे त्यांना कळले तर ते म्हणत, ''पुढे लग्न झाल्यानंतर नवरा कामावरून घरी आल्यावर त्याला चहा-चिवडाच करून घालावयाचा आहे ना? ती त्याचे स्वागत गाणे म्हणून का करीत बसणार आहे? शाळेच्या पलीकडचे जर काही शिक्षण द्यावयाचेच असेल तर घरात उपयोगी पडेल असे शिवणकामाचे किंवा टीपकामाचे शिक्षण तिला फार तर द्यावे.'' शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींना

'कोळ्याला आठ पाय असतात,' किंवा 'फुलांच्या पाकळ्या आणि पराग' असले विषय शिकविण्यात वेळ का घालविला जातो असा प्रश्न त्यांना पडत असे. पुढे उतार वयात मुलींनी अधिक शिक्षण घ्यावे, पदवीधर व्हावे हे त्यांना पटू लागले होते. तथापि त्या मागचासुद्धा मुख्य हेतू मर्यादितच होता. उच्च शिक्षण घेतल्याने स्त्रियांना नोकरी करण्याची संधी मिळते आणि त्यातून कुटुंबाची आर्थिक स्थिती काहीशी उंचावते, मुलांच्या शिक्षणाला थोडी मदत होते, अशी केवळ संसारकेंद्रित दृष्टी उच्च शिक्षणाला मान्यता देण्यामध्ये होती.

वरील तपशील अपुरा आहे, मात्र एका मर्यादित लेखात माझ्या वडिलांचा मानसपिंड तामसी होता याची कल्पना वाचकांना यावी याकरिता तो पुरेसा आहे. पोथी-कहाणी वाचण्याइतपत किंवा जरूर पडल्यास खुशालीचे लहान पत्र लिहिण्याइतपत माझ्या आईचे शिक्षण एका लहानशा खेड्यात झालेले होते. अस्सल सात्त्विकतेची ती चालती-बोलती प्रतीक होती. तिच्याशी माझे वडील कर्दनकाळासारखे वागत असत. क्वचित स्वयंपाकातील एखादा पदार्थ मनासारखा झाला नाही, सहजासहजी न निघणारा कपड्यावर पडलेला एखादा डाग धुण्यातून निघाला नाही, त्यांना अपेक्षित असलेल्या वेळेत एखादे काम झाले नाही तर ते उच्च स्वरात, कित्येकदा अश्लाघ्य भाषेत बोलत असत किंवा कृतिशील धाकदपटशा दाखविण्यालाही मागे-पुढे पाहत नसत. आई आजारी पडली तर अतिशय चांगला वैद्यकीय सल्ला घेणे व आवश्यक तो औषधोपचार करणे यात ते फारसे काही कमी पडू देत नसत, परंतु त्यात आपुलकीपेक्षा कर्तव्यदक्षतेची भावना अधिक वरचढ असायची. लवकर बरे होऊन, सुदृढ प्रकृती ठेवून तिने आपली सेवा अखंडपणे करावी आणि मोठ्या कुटुंबाचं रहाटगाडगं शेवटपर्यंत रेटीत रहावं ही त्या औषधोपचारामागची भावना अधिक प्रबळ होती. अविचल पतिनिष्ठा या संस्कारावर मात करण्याची जागृती निर्माण झालेली नसल्यामुळे आई या सर्व वागणुकीपुढे सोशीकतेने शरण जात असे. देवपूजा, उपासतापास, हेतूविरहित सर्वांवर प्रेम यातून पुण्यसंचय होत जाईल आणि त्यातून पुढे आपल्या वाट्याला बरे दिवस येतील अशी आशा ती सतत बाळगीत असे.

माझ्या वडिलांना ब्रह्मदेशात (सध्याचा म्यानमार) रंगून बंदराच्या हवामान खात्यात नोकरी असल्यामुळे माझ्या वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत आमचे कुटुंब रंगूनपासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर राहत असे. माझ्या वडिलांची आकांक्षा मी उच्च पदापर्यंत चढणारा आय.सी.एस. ऑफिसर व्हावे अशी होती. म्हणून प्रथम प्राथमिक शिक्षणाकरिता आणि नंतर पुढील शालेय शिक्षणाकरिता त्यांनी माझे नाव उत्तम प्रॉटेस्टंट इंग्रजी शाळांमध्ये नोंदविले. दोन्ही शाळा खरोखरीच उत्तम होत्या. ब्रह्मी भाषा शिकविणारे शिक्षक-शिक्षिका वगळून सर्व शिक्षक-शिक्षिका ब्रिटिश आणि अँग्लोइंडियन असत. चर्चमध्ये जाण्याची सक्ती बिगरख्रिश्चन मुलांवर कधीच नसे. परीक्षेचे पेपर तपासण्यात, पारितोषिक वितरणात किंवा अन्य वागणुकीतही ब्रह्मी, भारतीय, चिनी, ज्यू,

अँग्लोइंडियन किंवा अँग्लो-ब्रह्मी व ब्रिटिश अशा बहुधर्मीय अथवा बहुदेशीय विद्यार्थ्यांमध्ये कोणताही भेदभाव दाखविला जात नसे. आठवड्यातून दोनदा बायबलचा तास असे. त्यालाही बिगरख्रिश्चन मुलांवर सक्ती नव्हती, परंतु दोन-तीन वेळा आपण होऊन उपस्थित राहिल्यावर त्यातील कथा आमच्यापैकी काही बिगरख्रिश्चन विद्यार्थ्यांना आवडू लागल्या म्हणून आम्ही त्या तासांना उपस्थित राहू लागलो. इतर विषय शिकविताना उदारमतवाद, विज्ञान यावर भर दिला जात असे. शाळेतील आमच्या एक शिक्षिका 'ऑफ' तासाला येत असत तेव्हा त्या आम्हाला समजेल अशा भाषेत स्त्री-स्वातंत्र्याविषयी आणि त्याचा केवढा मोठा टप्पा गाठावयाचा आहे ते मोठ्या आत्मीयतेने सांगत असत. या शिक्षिका ज्यू होत्या. ब्रिटिश वसाहतवादाचे कडवे समर्थन शाळेत केले जात नसे. वर उल्लेख केलेल्या शिक्षिका स्वातंत्र्य, लोकशाही या संकल्पनांविषयी अधूनमधून बोलत तेव्हा, ''जो तो देश स्वातंत्र्याला पात्र असतो. कोणाला, केव्हा स्वातंत्र्य मिळेल ते नियती ठरवीत असते.'' असे सांगत असत.

शाळेत मिळणारे शिक्षण आणि घरातील वागणूक व संस्कार यात कमालीची तफावत होती. याची जाणीव मात्र माझ्या वडिलांना नव्हती. शाळेतील शिक्षणाचे परिणाम माझ्या मनावर सूक्ष्मपणे होत होते. वयाच्या १२-१३ व्या वर्षी माझ्या आईला इतकी हिणकस वागणूक का मिळते आणि त्याविरुद्ध तिला काहीच कसे बोलावेसे वाटत नाही असा प्रश्न मला अधूनमधून व्यथित करून टाकीत असे. नेपोलियन या फ्रेंच नेत्याविषयी त्या वेळी मला फार आदर वाटत असे. त्याच्यासारखे पराक्रमी बनून माझ्या वडिलांचे पारिपत्य करावे आणि इंग्रजांना नेस्तनाबूत करून भारत स्वतंत्र करावा अशा अपरिपक्व कल्पना मनात डोकावून जात असत!

दुसराही एक विचार त्याच सुमारास व त्यानंतरही माझ्या मनात तरळून जात असे. पुरुष हा नवरा बनला तरच तो स्त्रियांना अशी हृदयशून्य वागणूक देण्यास प्रवृत्त होतो. आपल्या आईला जशी वागणूक मिळते तशी अनेक स्त्रियांना कमी-अधिक प्रमाणात मिळते हे मला समजू-उमजू लागले होते. अशी वागणूक स्त्रीला मिळू नये असे जर मनापासून वाटत असेल तर नवरा कधी न होणे हेच चांगले असा विचार मनास स्पर्श करू लागला. हा विचार थोडा अधिक दृढ होण्याला आणखीही एक लहानसे कारण झाले. मी अभ्यास करीत असताना किंवा एखादे काम करीत असताना सापशिडी किंवा कॅरमसारखा खेळ खेळत असताना माझी धाकटी बहीण जर खोड्या करू लागली आणि त्याबद्दल मी जर तिला थोडा रागावलो किंवा सौम्य धपाटा दिला तरी माझी आई मलाच जरा रागवत असे. ''लहान बहिणीवर असे कधी रागावू नये, गोड बोलून सांगावे'' असा उपदेश ऐकावा लागे. ''मोठ्या बहिणीने सांगितलेले एखादे काम करण्याची टाळाटाळ जर मी केली तर मोठ्या बहिणीचे नेहमी ऐकावे, नाही तर पुढे ती कधी भाऊबीजेला बोलावणार नाही आणि ओवाळणार नाही बरे का!'' असे आई म्हणत असे. त्या वेळेस बहिणींचा धाक भावांना असावा पण बायकोचा धाक

नवऱ्याला असावा असे कधी कोणी सांगत नाही असे मला दिसू व वाटू लागले. नवरा झाल्यावर खलपुरुष बनणे हे अपरिहार्य असते की काय अशी शंका माझ्या मनात अधिक तीव्रतेने येऊ लागली. ज्यांचे वैवाहिक जीवन सुरळीतपणे चालू आहे असे म्हटले जात असे त्यांच्या बाबतीतही पत्नी समंजस आहे, वाद वाढवीत नाही, जुळवून घेते, म्हणून सर्व काही सुखाने चालू आहे असे पाहावयास व ऐकावयास मिळत असे. अनेक बाबतीत समजूतदारपणाने वागणारे अनेक पुरुष मला माहीत आहेत. पण विवाह झाल्यावर पत्नीशी वागताना या समजूतदारपणाला ओहोटी का लागते असा प्रश्न मला पडत असे. त्यामुळे आपल्याला जर सौम्य अथवा आक्रमक वर्चस्ववादी बनावयाचे नसेल तर अविवाहित राहणे हे अधिक संयुक्तिक ठरेल असा (अगदी पक्का नसलेला) निर्णय मी घेऊ लागलो होतो. विवाहित पुरुषांच्या दुसऱ्या एका दुर्गुणाबद्दल बोलले जायचे, त्याचे तर मला अधिक आश्चर्य वाटत असे. ''हा माणूस कसला नेभळट आहे. बायकोच्या ओंजळीने पाणी पितो,'' असा अभिप्राय केवळ पुरुष नव्हे, तर बायकाही देताना आढळतात. एखादा पुरुष जर कोणत्याही कारणामुळे अथवा स्वभावत:च नेभळट असेल तर विवाह झाल्यावर विशेषत: बायकोशी वागताना त्याचा नेभळटपणा नष्ट झालाच पाहिजे अशी अपेक्षा ठेवण्याचे कारण काय? बायकोच्या कर्तृत्वाच्या आधारे जर तो जीवन जगला, तिचा सल्ला जर तो अधिक वेळा घेत असला आणि असे करिता करिता त्याचा नेभळटपणा जर काही प्रमाणात ओसरला तर त्यात आक्षेपार्ह काय आहे? सर्वसामान्यपणे समाजात याला अद्याप मान्यता नाही. तेव्हा आक्रमकता किंवा नेभळटपणा यापैकी कोणताही ठपका जर टाळावयाचा असेल तर अविवाहित राहणे हेच अधिक श्रेयस्कर असा निर्णय अधिक पक्का होऊ लागला. वरील सर्व विचार हे पुण्यातील शालेय जीवन संपण्याच्या आणि कॉलेजचे जीवन चालू होण्याच्या कालखंडातील होते. त्या वेळेस ते पुरेसे स्पष्ट होते असे नाही परंतु हळूहळू ते अधिक स्पष्ट होत गेले म्हणून अधिक स्पष्ट स्वरूपात वर नोंदविले आहेत.

कॉलेजचं जीवन सुरू होईपर्यंत मी सामाजिक-राजकीय कार्य करू लागलो होतो. शाळेपासून कॉलेजच्या पहिल्या वर्षापर्यंत माझ्यावर स्वा.सावरकरांच्या (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नव्हे) विचारसरणीचा अधिक प्रभाव होता. तसे पाहिले तर ती एक विसंगतीच होती. कारण वर नोंदविलेले मनातील विचार हे पाहिलेल्या कौटुंबिक जीवनातून आणि इंग्रजी शाळेतील शिक्षणातून निर्माण झालेले होते. सावरकर विचारप्रणालीला त्याचे फारसे भान आहे असे नाही. परंतु सावरकरांची राजकीयप्रणाली दमदार व अधिक तर्कशुद्ध आहे असे मला वाटत असे. अशा या दुभंगलेल्या मन:स्थितीत कॉलेजमध्ये जाऊ लागल्यावर माझा समाजसत्तावाद या विचारसरणीशी - विशेषत: कार्ल मार्क्सप्रणीत क्रांतिकारक परिवर्तनाच्या तत्त्वज्ञानाशी परिचय होऊ लागला आणि सावरकरांच्या विचारधारेतील बऱ्याच मर्यादा मला जाणवल्या. क्रांतीचे ध्येय साध्य

करण्यासाठी आपले जीवन व्यतीत करावे असा निश्चय होऊ लागला. क्रांतिकारकाचे खडतर जीवन जर जगावयाचे असेल तर वैवाहिक जीवन हा त्याला फार मोठा अडथळा ठरेल याबद्दल माझ्या मनाची खात्री झाली. विवाह न करण्याचा निर्णय अधिक दृढ होऊ लागला. आपले विचार बहुतांशी पटणारी पत्नी जर असेल तर संभाव्य खडतर जीवन सुसह्य व एकमेकांना पूरक होऊ शकेल असाही विचार अधूनमधून मनात येत असे. मुलगी 'पाहून' लग्न करणे हे तर मला अजिबात रुचण्यासारखे नव्हते. स्वभावत: मुलींशी व पुढे अधिक प्रौढ वयात मध्यमवयीन महिलांशी लवकर परिचय करून घेणे, तो परिचय वाढविणे हे मला जमत नाही. स्त्रियांना काय आवडेल आणि काय नाही याची एक प्रकारची भीती मला सतत वाटत आलेली आहे. मी कॉलेजात शिकत असताना पुण्यातील बहुसंख्य युवक-युवती मोकळेपणाने एकमेकांशी फारसा संपर्क ठेवत नसत किंवा (फार झाले तर वर्गाच्या सहलीच्या वेळी वगळून) एकमेकांशी फारसे बोलतही नसत. कामाच्या निमित्ताने किंवा एरवी किरकोळ संभाषण जरी मुलीशी झाले तरी 'काय भानगड आहे?' असे कॉलेजमधील मित्र विचारीत असत. एखाद्या दिसावयास बऱ्या नसणाऱ्या मुलीशी थोडा वेळ कॉलेजच्या आवारात संवाद झाला तरी 'वर्गात एवढ्या कंडा पोरी असताना घोरपडीशी काय बोलत बसता राव?' असा प्रश्न सभ्यतेला सोडून टारगट नसलेले मित्रसुद्धा विनोद करण्याच्या बुद्धीने विचारीत. ('कंडा' हा शब्द त्या काळी सुस्वरूप मुलींना अनुलक्षून वापरला जात असे. हा शब्द कसा, कोठून आला, त्याचा उगम काय हे अद्यापही मला माहीत नाही.) आपली सामाजिक-राजकीय कार्यातील प्रतिमा जर निष्कलंक ठेवावयाची असेल तर 'भानगड' हा ठपका आपल्यावर येऊ नये म्हणूनसुद्धा मी कॉलेजातील मुली किंवा परिचय झालेल्या कार्यकर्त्या यांच्याशी काहीशा अलिप्तपणाने वागत असे. एकूण जरा जपून पावले टाकणाऱ्यांपैकी मी आहे अशी माझी व माझ्याहीपेक्षा मला ओळखणाऱ्यांची समजूत असल्यामुळे जर एखाद्या युवतीला किंवा पुढे एखाद्या आवडलेल्या कार्यकर्तीला मी विचार करून लग्नासंबंधी विचारण्याचे धैर्य केले असते आणि नकार मिळाला असता तर ते मला आवडले नसते. वास्तविक यात न आवडण्यासारखे काहीही नाही. सुप्त पुरुषी अहंकारातून ते मला रुचले नसते की काय अशी शंका माझ्या मनाला कधी कधी त्रस्त करते. परंतु नकार स्वीकारण्यापेक्षा लग्नाचा विचारच मनात फारसा येऊ न देणे हे अधिक बरे असे मला वाटते.

वरील सर्व कारणे जरी कमी-अधिक प्रमाणात माझ्या निर्णयाला कारणीभूत ठरलेली असली तरी माझा निर्णय अधिक निर्णायक होण्याला जे महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे स्त्रियांची मला वाटणारी भीती. सामाजिक जीवनात जरी संघर्ष अटळ आहे म्हणून तो स्वीकारला पाहिजे असे मला वाटत असले तरी वैयक्तिक पातळीवरील जीवन हे सुसंवादी, जवळ जवळ संघर्षरहित, शीतल असावे असे मला वाटते. मला भेटलेल्या अथवा माहीत असलेल्या महिलांपैकी काही अपवाद वगळून फारच

थोड्याजणी संथपणे वादविवाद करू शकतात असे मला आढळले आहे. त्या फार लवकर संतप्त तरी होतात किंवा अश्रू ढाळू लागतात. म्हणून मला स्त्रियांची एकूण बरीच धास्ती वाटते. ५०-६० वर्षांच्या वैवाहिक जीवनापैकी बराच काळ तणावपूर्ण वातावरणात जाईल की काय अशी शंका भेडसावीत असायची. विवाह न करण्याचा निर्णय घेण्यामागचे हे एक अतिशय महत्त्वाचे कारण आहे.

कॉलेज जीवनात व त्यानंतर व्यक्तीच्या (विशेषत: पुरुषांच्या) लैंगिक गरजेविषयी मी वाचलेले आहे. पण लैंगिक गरज ही तहानभुकेसारखी अनिवार्य गरज आहे असे मला वाटत नाही. आपले मन जर व्यापक उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये (ते उद्दिष्ट राजकीय अथवा सामाजिकच असले पाहिजे असे नाही.) व्यग्र असेल तर लैंगिक गरजेचे उन्नयन मनाला ताण पडू न देता करता येते.

अविवाहित राहिल्याने जीवनात - विशेषत: वार्धक्यात - आपत्तीच्या प्रसंगी किंवा आजारात पुरेशा आपुलकीने कोणी कदाचित आपल्याकडे लक्ष देणार नाही अशी खंत वाटण्याची शक्यता असते. परंतु जेट विमानाच्या वेगाने अतिजलद प्रवास करावयाचा असेल तर अधिक पेट्रोल खर्च करावे लागते; ही किंमत जशी मोजावी लागते, त्याचप्रमाणे जर अविवाहित जीवन जगावयाचे असेल तर त्याकरिता लागणारी किंमत देण्याची तयारी निर्धारपूर्वक करावी लागेल असे मी मानतो.

(पुरुष स्पंदनं, २००१)

❑

कॉ. रा. प. नेने ! डाव्या, पुरोगामी वर्तुळातील अत्यंत आदरणीय आणि विलक्षण असं व्यक्तिमत्व ! विविध पुरोगामी, राजकीय, सामाजिक संस्था, व्यक्ती - संघटना, लढे - आंदोलनं, याच्याशी त्यांचं जैव नातं होतं. त्यांचं पीपल्स बुक हाऊस हा पुरोगामी, डाव्या कार्यकर्त्यांचा एक अड्डाच होता. त्यांच्या जीवनाला आणि कार्याला विवेकवादी विचारांचा ठाम पाया होता.

कॉ. नेन्यांचा मार्क्सवाद, इतिहास आणि इतर विषयांचा व्यासंग, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व मदत करण्याची निरपेक्ष वृत्ती, साधेपणा, नम्रता यामुळे पुरोगामी, डाव्या चळवळीतील सर्व नव्या आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांना त्यांचा बौध्दिक आणि सक्रिय आधार होता.

त्यांचे विचार, त्यांचं लेखन आणि आचरण यात एक समरूपता होती. या पुस्तकातील त्यांचे लेख व त्यांच्या सुहृदांनी लिहलेल्या स्मृती-लेखातून ही समरूपता प्रत्ययास येते.

कॉ. नेने यांचे सहकारी कार्यकर्ते, मित्र आणि कुटुंबियांनी लिहलेल्या आठवणींमधून त्यांचे पारदर्शी, बहुआयामी व्यक्तिमत्व तसेच पुस्तकातील नेने यांच्या स्वत:च्या लेखांतून लोकशाही, मानवी हक्क, स्त्रीप्रश्न, सौंदर्यस्पर्धा, जातव्यवस्था, धर्म, व्यक्तिचित्रे, इत्यादी बाबतचा त्यांचा प्रचंड व्यासंग, विषयाच्या मुळाशी जाऊन केलेलं चिकित्सक विश्लेषण असा व्यापक पट वाचकांसमोर येतो.

कॉ. नेन्यांच्या परिवर्तनवादी विचारांचा आणि त्यांच्या बाबतच्या आठवणींचा हा बहुमोल ठेवा जिज्ञासू वाचकांना निश्चित आवडेल!

कॉ. रा.प. नेने स्मृतिग्रंथ समिती *समाज विज्ञान अकादमी*